म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

१९

# श्री भक्तलीलामृत कथारस आणि हिंदुलोकांचें मूर्तिपूजन.

# श्रीभक्तलीलामृत कथारस

आणि

# हिंदुलोकांचें मूर्त्तिपूजन.

हें पुस्तक

प्रिय देशबंधुभगिनींच्या हितार्थ

मूरकर
मंडळी

यांनीं

मुंबईत

'जॉइन्ट-स्टॉक प्रिन्टिंग प्रेस' मध्यें छापविलें.

सन १८९०

किंमत एक रुपया बारा आणे.

हें पुस्तक 'मूरकर मंडळी' नें रजिस्टर करून सर्व प्रकारचे हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

अलीकडे बहुतकरून कल्पित कादंबऱ्या व संगीत नाटकें यांचीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत. त्यापेक्षां आमचे सुशिक्षित लोक जर भारत, भागवतादि पुराणग्रंथांतील बोधकर व मनोरंजक कथानकें सरळ गोष्टीच्या रूपानें लिहिण्याचें मनावर घेतील तर आमच्या नूतन शिकलेल्या स्त्रीपुरुषांस त्यांचा चांगला उपयोग होऊन तीं मनरंजनासही कारणीभूत होतील. हा विचार मनांत आणून महीपतिकवीनें केलेल्या 'श्रीभक्तलीलामृत' ग्रंथाधारें आह्मीं हा "श्रीभक्तलीलामृत कथारस" ग्रंथ तयार केला आहे.

शिवाय आमच्या पुराणग्रंथांत कर्म, उपासना व ज्ञान हे ईश्वरप्राप्तीचे तीन्ही मार्ग सांगितले आहेत. परंतु, तीं सर्वच पुराणें गहन अशा संस्कृत भाषेंत आहेत. त्यांतूनही प्राचीन कविजनांच्या विशेष विद्वत्तेनें अनेक प्रकारचे अलंकार त्यांमध्यें असल्यामुळें, आमच्या सारख्या जड बुद्धीच्या मनुष्यांस हा ईश्वरपदप्राप्तीचा मार्ग खडतरसा होऊन गेला आहे. आतां, कांहीं अर्वाचीन कवींनीं केवळ परोपकारबुद्धीनें पुराणग्रंथांची गीर्वाणता मोडून प्राकृतभाषेचें त्यांस रूप दिल्यामुळें, त्यांत बराच सोपेपणा झाला आहे; तथापि तीही पद्यात्मक भाषा असल्यामुळें, आम्हांसारख्या अज्ञान्यांस तींत गहनपणा बराच वाटतो. सबब ज्यांतील अर्थबोध लहान मुलांस किंवा साधारण शिकलेल्या स्त्रियांस देखील व्हावा, अशा प्रकारें सर्व पुराण-

ग्रंथ मराठी भाषेत सरळ गोष्टीच्या रूपानें तयार करून प्रिय देशबंधुभगिनींपुढें ठेवण्याचा आम्हीं निश्चय केला आहे. त्याप्रमाणें १ **श्रीहरिविजय कथारस** आणि श्रीकृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडण, २ **श्रीपांडवप्रताप कथारस** आणि आमचीं पुराणें शिमगा आहेत कीं काय?, ३ **श्रीरामविजय कथारस** आणि श्रीरामचंद्र ईश्वरावतार आहे, ४ **श्रीभक्तविजय कथारस** आणि मनुष्यजन्माचें सार्थक, ५ **श्रीसंतलीलामृत कथारस** आणि आमचे अलिकडील सुधारलेले विद्वान् , ६ **श्रीजैमिनिअश्वमेध कथारस** आणि हिंदूंचें प्राचीन वैभव, ७ **श्रीशिवलीलामृत कथारस** आणि आमच्या शैववैष्णवांतील बखेडा, हे सात ग्रंथ प्रसिद्ध केले; आणि आज हा आठवा यत्न आह्मीं जनसेवेंत सादर करीत आहों.

ख्रिस्ती लोक व त्यांच्या छंदानें वागणारे आमच्यांतील कांहीं अर्ध्या हळकुंडानें सगळें जग पिवळें करूं पहाणारे अर्धवट सुधारक, आम्हीं राम, गणपति इत्यादि मूर्त्तींचें पूजन करतों म्हणून आम्हांस हंसतात. आणि आम्हीं मोठे वेडगळ व अज्ञानी तसेच आम्हांसारखे धर्मभोळे व पापी सगळ्या जगांत सांपडणार नाहींत अशी त्यांची समजूत झाली आहे! व ह्या मूर्त्ति चटसाऱ्या फेंकून दिल्यावांचून आम्हां लोकांची अक्कल फैलावणार नाहीं अशी त्यांची ओरडही नेहमी ऐकूं येते!! यांत तथ्यांश किती आहे याचा आम्हीं यथाशक्ति विचार करून तो निबंधही ह्याच ग्रंथाचे शेवटीं निराळा घातला आहे. —निबंध लिहितांना आमचे परमपूज्य व सन्माननीय मित्र रा० रा० अंतराव कृष्णाजी तिवरेकर, जी. आय. पी. रेलवे, ऑडिट ऑफिस,

गुडस डिपार्टमेन्टचे हेड क्लार्क यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून जी कांहीं आम्हांस केवळ परोपकारबुद्धीनें ज्ञानद्वारें मदत केली, तिजबद्दल ही मंडळी त्यांची फार आभारी आहे.

आमचे विद्वान् व लोकप्रिय **श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सरकारसाहेब** यांनीं कृपा करून या मंडळीस रुपये दोनशें बक्षीस देऊन सुमारें सवातीनशें रुपयांचीं पुस्तकेंही विकत घेतलीं; याजबद्दल आम्हीं त्यांचे फार फार उपकार मानितों.

आतां शेवटीं आमचीं पुस्तकें लोकाश्रयास पात्र होवोत, अशी सर्वशक्तिमान् परमेश्वरापाशीं आम्हीं अनन्यभावानें प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

मुंबई,
ता० १ फेब्रुआरी १८९०

**मूरकर मंडळी.**

# विषयानुक्रमणिका.



| अध्याय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ० | मंगलाचरण | १ |
| १ | ग्रंथारंभ व नाभाजी | १ |
| २ | चांगदेव | ५ |
| ३ | चांगदेव | ११ |
| ,, | विठोबा | १३ |
| ,, | ज्ञानदेव | १७ |
| ४ | चांगदेव | १९ |
| ,, | ज्ञानदेव | २० |
| ५ | चांगदेव | २४ |
| ६ | चांगदेव | २९ |
| ७ | चांगदेव | ३४ |
| ८ | चांगदेव व यादवपंत | ४१ |
| ९ | चांगदेव | ४५ |
| १० | चांगदेव | ५० |
| ११ | नानक | ५५ |
| १२ | रोहिदास | ६१ |
| १३ | एकनाथ | ६७ |
| १४ | एकनाथ | ७२ |
| १५ | एकनाथ | ७७ |
| १६ | एकनाथ | ८३ |
| १७ | एकनाथ | ८७ |
| १८ | एकनाथ | ९४ |
| १९ | एकनाथ | ९९ |
| २० | एकनाथ | १०६ |
| २१ | एकनाथ | १११ |
| २२ | एकनाथ | ११७ |
| २३ | एकनाथ | १२१ |
| २४ | एकनाथ | १२६ |
| २५ | विश्वंभर | १३१ |
| ,, | अमाबाई | १३४ |
| २६ | विठोबा | १३८ |
| ,, | बोल्होबा | १३९ |
| ,, | तुकाराम | १४१ |
| २७ | तुकाराम | १४३ |
| २८ | तुकाराम | १४८ |
| २९ | तुकाराम | १५२ |
| ३० | तुकाराम | १५५ |
| ३१ | तुकाराम | १६० |
| ३२ | तुकाराम | १६७ |
| ३३ | तुकाराम | १७४ |
| ३४ | तुकाराम | १८२ |
| ३५ | तुकाराम | १९३ |
| ३६ | तुकाराम | २०२ |
| ३७ | तुकाराम | २०९ |
| ३८ | तुकाराम | २१५ |
| ३९ | तुकाराम | २२१ |
| ४० | तुकाराम | २२५ |
| ४१ | केशवस्वामी | २३३ |
| ,, | बाजीद पठाण | २३५ |
| ,, | संतोबा पवार | २३६ |
| ,, | मालोपंत | २३८ |
| ४२ | प्रेमाबाई | २४० |

अध्याय. पृ.

४२ शिळाबाई ........ २४२
,, नरपाळराजा ........ २४३
,, पिलाबाई ........ २४[illegible]
,, रमाबाई ........ २४[illegible]
,, रामराजा ........ २४[illegible]
,, नरहरिदास ........ २४[illegible]
४३ बोगरासा वाणी ........ २४[illegible]
,, हरिआनंद ........ २४[illegible]
,, रामचंद्रभट ........ २५[illegible]
,, सुहागशहा ........ २५[illegible]
,, पऱ्हाजी रजपूत ........ २५[illegible]
,, जयमल्लराजा ........ २५४
,, श्रीधरपंत ........ २५५
४४ हरिपाळ ........ २५६
,, जसू ........ २५७
,, धन्नाजाट ........ २५८
,, सुखानंद ........ २५९
,, माधवदास ........ २६०
४५ हरिव्यास ........ २६३
,, त्रिपुरदास ........ २६५
,, लाल्हनखोनी ........ २६६
,, लाडू ........ २६६
,, त्रिलोक सोनार ........ २६७
,, सजण कसाई ........ २६९
४६ नरवाहन ........ २७१

अध्याय. पृष्ठ.

४६ रायसिंग आणि अंगद. २७२
,, माधोसिंग व गुणवंती. २७४
,, कुंवराबाई ........ २७६
,, गिरिधरलाल ........ २७७
,, नारायणस्वामी ........ २७८
४७ रामकृष्ण ........ २७९
,, रामचंद्रभट ........ २८०
,, काजी महंमद ........ २८१
,, बलखबुखारी ........ २८३
,, शेखफरीद ........ २८४
,, नारायणभट ........ २८६
४८ रत्नाकर ........ २८८
,, माधवदास ........ २९०
,, विठ्ठल पुरंदर ........ २९२
४९ नरसिंहसरस्वती ........ २९४
,, मुद्गलभट ........ २९९
५० जनजसवंत ........ ३०२
,, निरंजनस्वामी ........ ३०३
,, कृष्णदास ........ ३०६
,, जयरामस्वामी ........ ३०५
५१ माणकोजी बोधला ........ ३०८
,, मच्छनाथ ........ ३१०
कविता ........ ३१६
हिंदुलोकांचें मूर्त्तिपूजन १—१४



# श्रीभक्तलीलामृत कथारस.

## मंगलाचरण.

हे अनंतब्रह्मांडनायका, ब्रह्मानंदा, निर्गुणा, निर्विकारा, पुराणपुरुषा, मायाचक्रचालका, रुक्मिणीपते पांडुरंगा; तुला आमचा साष्टांग नमस्कार असो. तूं सर्वशक्तिमान, सर्वव्यापक व करुणेचा तर केवळ सागरच आहेस. तुझ्याच इच्छामात्रें करून जगाची उत्पत्ति, स्थिति व लय हीं होतात. तुला आदि, मध्य व अंत नाहीं. गणपति, शिव, विष्णु, सरस्वती, शक्ति इत्यादि रूपें तुझींच होत. तूं सर्व जग व्यापूनही उरला आहेस. भक्तांवर प्रेम करणारा व सर्व संकटें निवारण करून त्यांचे मनोरथ पूर्ण करणारा तूंच आहेस. परमेश्वरा, तूं बुद्धीचा दाता आहेस. व्यास, वाल्मिकादि महाकविजनांस बुद्धि देऊन त्यांकडून सत्पुरुषांचीं चरित्रें तूंच वर्णन करविलींस; ह्मणून तुलाच आह्मी हीन, दीन, कुमति, अनन्यभावें शरण येऊन ज्यांत भक्तांचीं प्रेमळ चरित्रें वर्णिलीं आहेत, असा हा महीपतिकविकृत ओवीबद्ध "श्रीभक्तलीलामृत" ग्रंथ मराठी भाषेंत सरळ गोष्टीच्या रूपानें लिहिण्याचा प्रयत्न करीत आहों ; तो तुझ्या कृपेनें सिद्धीस जावो.

---

## अध्याय १ ला.

### ग्रंथारंभ व नाभाजी.

प्रथमारंभीं सर्व आदिदैवतांस, ऋषिमुनींस व साधुसंतांस वंदन करून महीपतिकवि ह्मणतात कीं, परमेश्वराचे गुण गाऊन जगाचा उद्धार व्हावा ह्मणून संतांनीं अवतार घेतले ; आणि त्यांचीं चरित्रें जनांत प्रख्यात व्हावीं यासाठीं ईश्वरानें मला बाहुल्याप्रमाणें पुढें केला.

आणि मजकडून "श्रीभक्तविजय" व "श्रीसंतलीलामृत." हे ग्रंथ लिहविले; तरी पुष्कळ भक्तांचीं चरित्रें अजून शिल्लक राहिलीं ह्मणून या ग्रंथाची योजना करविली. आतां, हीं संतांचीं सर्व चरित्रें एकाच ग्रंथांत कां घेतलीं नाहींत, अशी कदाचित् कोणी कल्पना काढील, तर त्यास असें समाधान आहे कीं, श्रीहरीचीं चरित्रें बहुत असून तीं अनेक संतांनीं निरनिराळ्या रीतीनें वर्णिलीं आहेत. श्रीव्यासानें अठरा पुराणें लिहिलीं. तितक्यानें पूर्णता झाली नाहीं ह्मणून उपपुराणें केलीं. शिवाय एकच वेद जर केला असता, तर शिकणारांस फारच जड गेलें असतें; ह्मणून चार भाग केले. सबंध एकसारखें रामायण लिहिलें असतें तर वाचणारांस व ऐकणारांस कंटाळा आला असता ह्मणून त्याचीं सात कांडें ( भाग ) केलीं. भारताचीं अठरा पर्वें करण्याचें कारण तरी हेंच. अस्तु.

कलियुगामध्यें धर्माचा लोप झाला व जगाचा तरणोपाय होण्याचा मार्ग दिसेना ; तेव्हां वैकुंठपतीनें भक्तांस आज्ञा केली कीं, तुम्हीं पृथ्वीवर अवतार घेऊन सगुणभक्ति स्थापन करून माझ्या लीला गाव्या; आणि जडजीवांस तारावें. अशी आज्ञा होतांच विश्वोद्धार करावयास संत अवतार घेऊन पृथ्वीवर आले. त्यांचीं चरित्रें श्रीव्यासमुनीनें भविष्योत्तरपुराणामध्यें लिहिलीं आहेत; परंतु तो समग्र ग्रंथ कैलासास राहिला, एथें नाहीं. तर मग हीं संतचरित्रें वर्णन केलीं कशीं, अशी शंका उत्पन्न होते; तर ह्याविषयीं असें समाधान आहे कीं, हिंदुस्थान देशांत नाभाजी ह्मणून मोठा भगवद्भक्त होऊन गेला. त्यानें ग्वाल्हेरी भाषेंत जीं संतचरित्रें वर्णन केलीं आहेत, त्या आधारानें मीं हा ग्रंथ लिहिला आहे.

या नाभाजीची मूळ हकिकत अशी आहे:—रामानंदस्वामी ह्मणून एक संन्यासी वाराणशीस रहात असे. भक्ति, ज्ञान, वैराग्य हीं त्याच्यांत मूर्तिमंत वसत होतीं. आनंदानंद ह्मणून एक स्वामी होता; तो त्यास शरण गेला. त्या आनंदानंदाचा पोहरीदास नांवाचा एक शिष्य होता. त्यानें अग्रजी आणि किलजी असे दोघे शिष्य केले. त्यांपैकीं अग्रजी हा विरक्त असून निरंतर प्रेमानें भजन करीत असे

तो निराभिमानी असून बृहस्पतीसारखा वक्ता असे. तो संपूर्ण जीव आपल्याप्रमाणें मानी. मोठमोठे राजे त्याच्या पायां पडूं लागले. श्रवण, कीर्त्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन हे भक्तीचे नऊ मार्ग आहेत. हे सर्व एकाच्यानें करवत नाहींत. कलियुगांत स्मरणभक्तीच्या द्वारानें अगणित जडजीव तरले; यास्तव अग्रजी हाच मार्ग पतकरून रात्रंदिवस प्रेमानें नामस्मरण करी. त्याचा भाव पाहून देवानें त्यास साक्षात्कार दिला, इतकेंच नव्हें, तर रुक्मिणीकांत सगुणरूपानें त्यास वारंवार भेट देई. अग्रदास बाहेर जाई, तेव्हां श्रीकृष्ण बरोबर असे. जप, तप, व्रत, अनुष्ठान हीं भक्तीवांचून व्यर्थ होत. वेदशास्त्रें, पुराणें शिकला, संपूर्ण तीर्थयात्रा केल्या, कीर्त्तनें केलीं, सिद्धांत ग्रंथ पाहिले, अध्यात्मज्ञान सांगू लागला, तरीं भक्तीवांचून हीं सर्व निष्फळ होत. भक्ति, ज्ञान व वैराग्याचें लक्षण अग्रदासाच्या अंगांत पूर्ण भरलें होतें.

एकदां अग्रदास रहात होता त्या देशांत मोठा दुष्काळ पडला. तेव्हां एका स्त्रिनें आपलें मूल भाकर मागतें म्हणून गंगेवर नेऊन त्यास चुकाविलें. मुलानें पुष्कळ शोध केला, पण आईचा पत्ता लागला नाहीं; तेव्हां तो रडूं लागला. तों अग्रदास गंगेवर स्नानाकरितां गेले होते, त्यानें त्या मुलास रडतांना पाहिलें. मग त्यास कळवळा येऊन त्यानें त्या मुलाजवळ रडण्याचें कारण काय ह्मणून चौकशी केली. तेव्हां मुलानें आपला वृत्तांत त्यास सांगितला. मग त्यानें त्यास 'भिऊं नको' ह्मणून सांगितलें; आणि स्नान करून नित्यनेम सारिल्यानंतर त्या मुलास घेऊन मठांत गेले. त्यास 'नाभाजी' असें सर्व ह्मणूं लागले. अग्रजीच्या मठांत नित्य अन्नशांति होई. भोजनास येण्याचा कोणास प्रतिबंध नव्हता. उरलेलें अग्रजी त्या मुलास देववी. हा अनाथ आहे, असें ते ज्याला सांगत. हा कोणाचा मुलगा आहे, याची जात कोणती, ही लागत नाहीं; ह्मणून त्याला मठांत आणावयास अग्रदासाचें होचे. त्याला निराळें एक खोंपट बांधून दिलें होतें; त्यांत श्रीविष्णूची पूजाअर्चा होई, ती दाराशीं उभा राहून

नाभाजी पहात असे. त्या सत्समागमाचे योगानें नाभाजीस भागवत श्रवण होऊन अद्भुत ज्ञान झालें. त्याला जीवमात्राचे मनोगत सांगितल्याशिवाय समजत. व भूत, भविष्य, वर्त्तमान कळत असतांही तो प्रतिष्ठा मिरवीत नसे.

एके दिवशीं अग्रजी गंगास्नान करून आला. नंतर देवपूजा झाल्यावर लक्ष्मीकांतास आरती केली व दार बंद करून मानसपूजा करावयास बसला. नाभाजीस दाराशीं ठेविलें होतें व आंत कोणाला येऊं देऊं नये अशी वर्दी दिली होती. अग्रजी एकाग्रचित्त करून श्रीकृष्णाचें ध्यान करूं लागले; परंतु ध्यानामध्यें श्रीकृष्ण येईना. तेव्हां मानसपूजा कशी करावी ह्मणून विचारांत पडले. हें नाभाजीनें जाणून त्यास सांगितलें कीं, एका सौदागराचें जहाज समुद्रांत बुडत आहे. त्याणें चिंताग्रस्त होऊन द्वारकापतीस नवस केला कीं, जर मी या संकटांतून निभावलों तर जें कांहीं मजजवळ आहे त्याचा पांचवा वांटा अग्रजीला देईन; ह्मणून द्वारकापति कृष्ण तें जहाज काढण्यासाठीं समुद्रामध्यें गुंतले आहेत. यास्तव ध्यानांत येत नाहींत. क्षणभर निवांत बसून रहावें. जहाज वर काढून आतां इतक्यांत येतील. मग तुह्मीं एकाग्रचित्त करून ध्यान करावें.

ह्या प्रमाणें नाभाजीनें सांगतांच अग्रजीस नवल वाटलें. व पुढें त्यास ध्यानामध्यें वैकुंठनाथाचा पितांबर उदकानें भरलेलाही दिसला. मग सर्वोपचारांनीं पूजा केल्यानंतर कृष्णास विचारिलें कीं, देवा, आज कोठें गुंतला होतास हें मला सांगावें. अग्रजीनें असें विचारितांच कृष्णास हंसूं आलें. त्यानें त्यास सांगितलें कीं, एका सावकाराचें जहाज समुद्रांत बुडत होतें, तें मी वर काढून आलों. त्यानें पांचवा हिस्सा तुला देण्याचा नवस केला आहे. तुझ्या पदरीं खर्च फार. अखंड साधुसंत जेवीत आहेतच. आतां तुझ्याकडे लवकरच त्या सावकाराची हुंडी येईल.

नंतर अग्रजीची मानसपूजा झाल्यानंतर त्यानें नाभाजीला आंत बोलाविलें; आणि ईश्वर ह्या कामांत गुंतला आहे, हें तुला कसें समजलें ह्मणून विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, हा संतांचा प्रसादमहिमा

होय. तुह्मीं मला सद्गुरु मिळालेत. आतां ह्या भवसमुद्रांतून सोडवा. तेव्हां अग्रजीनें त्यास सांगितलें कीं, भवसमुद्र तरावयाचा आहे तर श्रीहरीची कीर्त्ति वर्णन करणें, हा एक उपाय आहे. पण महा ऋषींनीं व सभाग्य संतांनीं ईश्वराचे गुणानुवाद वर्णन केले आहेत. यास्तव आतां तूं संतांचीं चरित्रें वर्णन कर. मग सद्गुरूची आज्ञा शिरसावंद्य करून नाभाजीनें ग्रंथ लिहावयास आरंभ केला. त्या ग्रंथाचा मला ( महीपति कवीला ) आधार सांपडला. दुसरे ह्या देशांत जे संत झाले त्यांची माहिती मी त्यांच्याच वंशजाकडून मिळविली. वाल्मिकानें रामायण केलें; व्यासांनीं भारत केलें; त्याचप्रमाणें नाभाजीनें संतांचीं चरित्रें वर्णन केलीं; ह्मणून त्याचें चरित्र प्रथम वर्णन केलें आहे.

---

## अध्याय २ रा.

### चांगदेव.

एके दिवशीं इंद्रानें मरुद्गण जवळ होता त्यास कांहीं काम सांगितलें; परंतु इंद्र काय सांगत आहे त्याकडे त्या गणाचें लक्ष नव्हतें. ह्यामुळें इंद्राला राग येऊन त्यानें त्यास शाप दिला कीं, तूं मृत्युलोकीं मनुष्य होशील. असा शाप ऐकून त्यास फार वाईट वाटलें. मग त्याणें आपला अन्याय कबूल करून विनंती केली कीं, तुमच्यावरचीं विघ्नें टळावीं ह्मणून ईश्वरानें वेळोवेळीं अवतार घेतले. तर तुह्मींही कृपा करून मला उःशाप द्यावा; आणि जेणेंकरून माझा उद्धार होईल असा उपाय सांगावा. जशी मुलावर आई प्रथम रागावते आणि मग त्याची समजूत करिते, त्याप्रमाणें इंद्रास शाप दिल्यानंतर काकळूत आली आणि त्याणें त्यास उःशाप दिला कीं, जगदुद्धार करावयाकरितां ब्रह्मदेव, विष्णु, शंकर हे अवतार घेतील. योगमाया जी आदिशक्ति ती मुक्ताबाई होईल; शंकर निवृत्ति व विष्णु ज्ञानदेव होतील; व ब्रह्मदेवाचा अवतार सोपानदेव; तर तूं निष्ठापूर्वक त्यांस शरण जा. सत्समागमाच्या योगानें तूं अध्यात्मविद्येंत प्रवीण होशील व द्वैताचें निरसन होऊन सर्व जन विश्वरूप भासेल.

सद्गुरूच्या कृपेनें तुला साक्षात्कार होईल. साक्षात् परब्रह्म श्रीपांडुरंग-मूर्ति भीमातीरीं विटेवर उभी आहे, त्याची तूं उपासना कर; ह्मणजे तो श्रीहरि तुला संकटापासून रक्षील. गृहस्थाश्रम करून तुला संतति होईल; ती मागें ठेवून तूं शेवटीं समाधिसुख पावशील व आपल्या पूर्वपदीं येशील. ह्याप्रमाणें उःशाप मिळतांच मरुद्गणानें आनंदित होऊन इंद्रास नमस्कार केला. मग तो पृथ्वीवर उतरला. तो मोठा तेजस्वी पुरुष झाला. उत्तम तेजस्वी देह प्राप्त होणें, हें पूर्व सुकृताचें फल होय. असो.

इंद्रास नमस्कार करून मरुद्गण दिव्य स्वरूप धरून निघाला. तो खानदेशांत तापीनदीच्या कांठीं एका रम्य वनांत उतरला. तेथें स्नान केल्यावर डोळे मिटून अनुष्ठान करूं लागला. तो कोणाशीं बोलत नसे. तापी व पयोष्णी या नद्यांच्या संगमांमधील कर्दळीवनांत कोणी एक अंधऋषि तप करीत बसला आहे, तो महातेजस्वी आहे, पण कोठून आला आहे हें समजत नाहीं; अशी लोकांत त्याच्या विषयीं चर्चा चालूं लागली. त्याचें तें सुंदर रूप पाहून, मृत्युलोकीं असा तेजस्वी पुरुष पाहिला नाहीं; असें जो तो बोले. त्याचें रूप 'चांगलें' होतें ह्मणून, लोक त्याला 'चांगदेव' असें ह्मणूं लागले; व त्याच्या दर्शनाकरितां येऊं लागले.

त्या वेळेस वरुणगांवचे दोघे ब्राह्मण भाऊ भाऊ होते. ते आपलें कल्याण होईल ह्या आशेनें चांगदेवाकडे तुलसी, फुलें, बुका, खजूर घेऊन गेले. त्या समयीं त्याचें तें रूप पाहून त्यांचे डोळे दिपून गेले; व हा प्रत्यक्ष स्वर्गाहून उतरला आहे असें त्यांस वाटलें. मग ते दोघे हात जोडून त्याच्यापुढें उभे राहिले. संताचें दर्शन झालें ह्मणून त्यांना आनंद झाला. संताचे रजःकण वंदन केल्यानें आज धन्य झालों, असें त्यांस वाटलें. विश्वोद्धार करावयाकरितां संत अवतार घेतात; त्यांच्या दर्शनानें आपला उद्धार होईल; अशा विचारानें ते दोघे बंधु चांगदेवाची सेवा करावयास राहिले. त्याची ते उत्तम बर्दास्त ठेवीत. त्यास जें पाहिजे तें ते आणून देत. आपल्या घरची सर्व काळजी सोडून ते तेथें राहिले. एक महिनाभर त्यांनीं गुरूची सेवा

उत्तम केली. पुढें एके दिवशीं त्यांनीं गुरूस विनंती केली कीं, आतां अनुग्रह करावा; म्हणजे आमचा संसार सुफळ होईल व आमच्या जिवाचा उद्धार होईल. तेव्हां चांगदेव ह्मणाले, उपदेश करण्याची कशी काय रीत आहे ती मला ठाऊक नाहीं. मी आंधळा एकटा ह्या वनांत पडलें आहें. मंत्रतंत्रांची मला माहिती नाहीं. माझें घरदार, आईबाप कोठें आहेत हें ठाऊक नाहीं. पुत्र, बायको हीं मला नाहींत. मला जगांत मानमान्यता नाहीं. मला ही भानगड नको. तुह्मीं कोणी थोर सत्पुरुष पाहून त्याचा अनुग्रह घ्यावा. तेव्हां ते शिष्य ह्मणाले, आमचा निश्चय तुमच्या ठिकाणीं आहे. आह्मीं अनुग्रह घेतल्यावांचून कदापि जाणार नाहीं. आपली आमच्यावर कृपा व्हावी इतकाच आमचा हेतु आहे; तो पुरविला पाहिजे.

कामनिक भक्तांची भक्ति वरवरची समजावी. त्यांना ईश्वरप्राप्ति होत नाहीं. निष्कामभक्तांचीं कामें वैकुंठनायक स्वतः करतो. कामनिक भक्तीच्या योगानें मिळालेलें ऐश्वर्य काळें करून नष्ट होतें. असो. ते दोघे द्रव्याची इच्छा धरून चांगदेवाजवळ अनुग्रह मागूं लागले. त्यांचा आग्रह पाहून स्वामीनें त्यांस उपदेश करून त्यांच्या मस्तकावर हात ठेविला. त्यांना उपासनामंत्र सांगून नामस्मरणाकडे लाविलें. उपदेश घेतल्यानंतर त्यांनीं सात महिने गुरूची सेवा एकनिष्ठपणें केली.

एके दिवशीं त्यांनीं गुरूजवळ गोष्ट काढिली कीं, आह्मीं पुष्कळ खटपट करितों; परंतु पोटभर अन्नसुद्धां आह्मांस मिळत नाहीं. कर्जानें अगदीं गांजलों आहों. मुलांमाणसांचा त्रास; ह्मणून सर्व सोडून स्वामीचे पाय धरिले आहेत. असें त्यांनीं आपलें वर्तमान सांगतांच चांगदेवाचें मन द्रवून गेलें. त्यानें त्यांस विचारिलें कीं, तुह्मीं कोणता धंदा करतां? तेव्हां ते ह्मणाले, चाटेपणा करीत असतों. हें ऐकून चांगदेवानें सांगितलें कीं, तुह्मीं जेव्हां बाजारास जाल, तेव्हां मला बरोबर घेऊन जावें. पुढें दर सोमवारीं संगमावर बाजार भरे, तेथें ते गुरूस घेऊन गेले. आणि दुकान मांडून स्वामीस तेथें बसविलें. स्वामीच्या बरोबर रिद्धिसिद्धि सर्वदा असतात. ज्याच्या घरास संतांचे पाय लागतात, त्याचें दैन्य दिगंतरास जातें. चांगदेव नुसते जवळ

बसलेले होते; पण जे गिऱ्हाईक येत, ते सर्व ह्यांच्या दुकानावरून मुकाट्यानें सांगितलेला पैसा देऊन माल घेऊन जात. तेव्हां शिष्यांस नवल वाटलें. जितकें कापड नेलें होतें तितकें विकलें व हिशेब करून पाहिला तों दुप्पट नफा दिसला. मग त्यांनीं चांगदेवास सांगितलें कीं, आपल्या प्रसादानें आज पुष्कळ नफा झाला. हें ऐकून गुरूनें सांगितलें कीं, तुमची भक्ति पाहून साक्षात् श्रीशंकर तुह्मांस प्रसन्न झाले.

आपल्या अंगीं सामर्थ्य असून त्याची प्रौढी न मिरवितां साधु ईश्वरानें कार्य केलें ह्मणून ह्मणतात. तें 'मीं केलें' असें बोलत नाहींत. आह्मीं ब्रह्मनिष्ठ अशी शेखी मिरविणारे लोक अज्ञान होत. पाहिजे तितका आत्मज्ञानी झाला तरी उत्पत्ति, स्थिति, प्रलय हीं त्याच्या इच्छेनें होत नाहींत; ती सत्ता वेगळीच आहे. असो. मग त्या शिष्यांनीं स्वयंपाक केला. इतक्यांत चांगदेवाची पूजा आटोपली. धूप, दीप दाखवून व प्रदक्षिणा घालून महा नैवेद्य समर्पण करून शंकरास संतुष्ट केलें. मग तिघांनीं भोजन केलें. गुरूस त्यांनीं तांबूल दिला व मऊ बिछाना घालून त्यावर निजविला. आपला मतलब साधावयासाठीं गुरूची सेवा करूं लागले. याप्रमाणें त्यांनीं सारी रात्र घालविली. दुसऱ्या दिवशीं चांगदेव उठून कर्दळीवनांत गेले. गुरूस त्यांच्या आश्रमीं ठेवून आपण घरीं आले; परंतु गुरूच्या सेवेंत अंतर पडूं नये ह्मणून ते लवकरच परत गेले. मग ते दुसऱ्याही खेपेस गुरूजीस घेऊन बाजारास गेले व कापड विकूं लागले. त्या वेळीं त्यांना चौपट नफा झाला. ह्याप्रमाणें त्यांनीं एक वर्ष केलें व सावकारांचें कर्ज वारून ते दोघे ब्राह्मण लक्षाधिपति झाले. त्यांनीं दागिने वगैरे सर्व श्रीमंती थाटाचे केले. पुष्कळ द्रव्य खर्च करून शहरांत एक भव्य मंदिर बांधलें. त्यांची मोठी कीर्ति झाली. मोठमोठ्या लोकांत त्यांचें जाणें येणें होऊं लागलें. श्रीमंत लोकांनीं त्यांच्या घरीं आपल्या मुली दिल्या. मग त्यांचें दिवसेंदिवस संसाराकडे विशेष लक्ष लागून गुरुसेवेंत अंतर पडत चाललें. दोघांमधून कोणी तरी एकदां जाऊन गुरूचा समाचार घेत असत. अशा रीतीनें

त्याच्या वृत्तींत फरक पडला; तेव्हां ही गोष्ट चांगदेवाच्या लक्षांत आली. पैसा व स्त्री यांकडे प्रीति जडल्यानें परमार्थांत घोंटाळा होतो. जसें, मुलगा आईचें ऐकेनासा होऊन बायकोच्या तंत्रानें वागतो; तद्वत् सद्गुरूच्या कृपेनें धनदौलत त्यांना मिळाली असतां त्यास विसरून ते संसारांत रमले. ते ब्राह्मण पूर्वी दरिद्री होते; पण सद्गुरूनें महा सिद्धि दिल्यानंतर ते श्रीमंत झाले; असें असतां त्यास विसरले.

एके दिवशीं चांगदेवानें त्या शिष्यांस पार्थिव (लिंग) करण्यासाठीं माती मळून आणावयास सांगितली; परंतु त्यांचें चित्त संसाराकडे पूर्ण रमून गुरूवरची श्रद्धा उडाली होती. त्या वेळीं त्यांणीं युक्ति योजिली ती अशी कीं, संगमावर बाळूची पिंडी करून वर वाटी उपडी घातली आणि बोलले, स्वामी तर आंधळे आहेत; यास्तव हें स्थावर लिंग आहे, असें सांगावें व पूजा झाल्यावर आपण वाटी काढून घ्यावी. असें कपट मनांत आणून त्यांणीं मठांत येऊन गुरूस सांगितलें कीं, माती मिळाली नाहीं. परंतु संगमावर आयतें लिंग आहे. आह्मीं तें आतांच पाहून आलों. त्याची आपण पूजा करावी आणि आपला नित्य नेम सारावा. असें त्यांणीं सांगितल्यावरून चांगदेवानें उत्तर दिलें कीं, सारी पृथ्वी लिंगाकार आहे. रिता ठाव मुळींच दिसत नाहीं. त्या कैलासनायकाचें विराट स्वरूप आहे. त्याचा कोणास अंत लागत नाहीं. तरीं भक्तांच्या आवडीसाठीं ईश्वर लहान थोर होतो. असें त्यांस सांगून तें स्थावर लिंग दाखवावें ह्मणून स्वामीनें त्यांना सांगितलें. मग ते पूजेचें साहित्य घेऊन व चांगदेवास हातीं धरून संगमावर गेले; आणि उपडी घातलेली वाटी हस्तस्पर्श करून दाखविली व 'हरहर' शब्दांचा उच्चार केला. तेव्हां तेथेंच भाव धरून चांगदेव पूजा करावयास बसला, तों असें झालें कीं, शंकरानें तें लिंग स्थावर करून दाखविलें.

गुरूला पूजा करावयास बसवून आपण दोघेही जेवण करावयास घरीं गेले. इकडे चांगदेवानें यथासांग सर्व उपचारांनीं शंकराची पूजा केली; तों शिष्य नैवेद्य घेऊन आले. तो शिवास दाखवून चांगदेवानें नमस्कार घातला. आणि प्रार्थना केली कीं, हे पार्वतीरमणा, मला मंत्र, तंत्र, भाव, अर्चा, पूजा, हीं कशीं करावीं हें कळत नाहीं;

हे सर्व तुला ठाऊक आहे. अशी स्तुति करतांच शंकर प्रसन्न होऊन ह्मणाले, तूं यथासांग पूजन केलेंस; ह्मणून मी संतुष्ट झालों. नंतर सर्व पूजा आटोपल्यावर शिष्यांबरोबर चांगदेव मठांत गेले. भोजनास बसतेवेळेस त्यानें शिष्यांस, आमची तूप घेण्याची वाटी कोठें आहे ती लवकर घेऊन या, असें सांगितलें. तेव्हां वाटी आणावयाकरितां ते संगमावर गेले; तों तेथें अघटित चमत्कार झालेला पाहिला. त्यांनीं आपलेकडून होते तितके इलाज केले; परंतु तें लिंग उपटेना. ती वाळूही दगडासारखी झाली. त्यांनीं पुष्कळ खोल उकरून पाहिलें; परंतु अंत लागेना. तेव्हां ते महा चिंतेंत पडले; आणि ह्मणूं लागले कीं, जर आपण केलेलें कपट गुरुजीला समजलें, तर शाप देऊन कुळक्षय करून टाकतील. सर्पाच्या शेंपटीवर पाय ठेवणें, वीष भक्षण करणें,मोठ्या वाघाशीं संघटण ठेवणें, तपस्व्याचा छळ करणें, ही मोठी चूक होय. आह्मी फुटक्या नशिबाचे खचित. ज्याच्या वचनांनीं वाटीचा तात्काळ ईश्वर झाला, तो कोपला तर जसें पाहिजे तसें करील ; असें त्यांस भय उत्पन्न होऊन आतां पुढें कशी युक्ति योजावी ह्मणून ते विचारांत पडले. मग, जें होईल तें होवो, असा मनाचा निर्धार करून ते चांगदेवापाशीं गेले; व साष्टांग दंडवत घालून हात जोडून उभे राहिले. आणि ह्मणूं लागले कीं, गुरुजी, आमच्या हातून मोठा अपराध घडला आहे, तो असा कीं, माती मिळाली नाहीं ह्मणून रेतीची पिंडी केली व वर वाटी उपडी घातली होती. आणि संगमावर ऐतें लिंग निघालें आहे ह्मणून तुह्मांस सांगितलें; परंतु स्वामींनीं तें पुजिल्यानें अक्षयी लिंग होऊन गेलें. आह्मी पुष्कळ इलाज केले; परंतु तें हालत नाहीं. पुष्कळ खणून पाहिलें; परंतु खालीं किती खोल गेलें आहे त्याचा अंत लागत नाहीं. असें ऐकतांच चांगदेवाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. कंठ सद्गदित झाला. आपलें अंगीं कांहीं तसा गुण नसतां शंकर 'वाटींत' स्वयमेव प्रगट झाले ह्मणून त्याचें नांव 'वटेश्वर' असें ठेविलें. मग सेवा घडावी ह्मणून चांगदेवानें शंकराचें पुष्कळ स्तवन केलें व माझी कीर्त्ति वाढवावी ह्मणून, देवा, तूं हें अद्भुत कृत्य

करून दाखविलेंस असें ह्मणाला. पुढें नेत्र उघडून पाहूं लागला तों त्यास दिव्य दृष्टि आली. तेव्हां तर त्यास अति विस्मय वाटला. मग त्यानें शिष्यांस रागावल्याशिवाय संतोषानें घरीं जावयास परवानगी दिली. त्यांचा अपराध असतांही त्यांस, आपल्या सुकृताची हानि न व्हावी ह्मणून शाप दिला नाहीं. अपराधाची क्षमा करून मन न दुखविणें, हेंच खऱ्या साधूचें लक्षण होय.

मग चांगदेवानें शिष्यांस सांगितलें कीं, तुह्मीं आपल्या घरीं जावें. वटेश्वराची पूजा करावयास आह्मीं तापीच्या संगमावर राहूं. सद्गुरु शाप देतील ही शिष्यांस मोठी भीति होती, ती नाहींशी झाली; व ते आनंदानें घरीं जाऊन संसारांत गढून गेले. असो. चांगदेवासाठीं वाटीमध्यें शंकर प्रगट झाले, हें वर्तमान गांवोगांव समजलें; तेव्हां तेथील सर्व लहान थोर चांगदेवाच्या दर्शनास येऊं लागले. ते नवसाला पावत. एके सावकारानें त्यांना तेथें मठ बांधून दिला.

---

## अध्याय ३ रा.

### चांगदेव, विठोबा व ज्ञानदेव.

#### चांगदेव.

चांगदेवाच्या कपटी शिष्यांनीं वाळूवर वाटी पालथी घातली असतां, चांगदेवाच्या भक्तीस्तव साक्षात् महादेव तेथें प्रगट झाला. मग चांगदेवास वटेश्वराचा ध्यास लागला. तो त्रिकाळ पूजा करूं लागला. नित्य लोक दर्शनास येऊं लागले. पुढें चौदा विद्यांचा अभ्यास करावा, असें चांगदेवाच्या मनांत आलें. हा स्वर्गवासी चांगदेव शाप झाल्या कारणानें योगभ्रष्ट होऊन भुलोकास उतरलेला होता. त्यास विद्याभ्यास करावयास मोठे श्रम करावयाचें कारण नव्हतें. ग्रंथ पाहिला कीं, तो त्याच्या मुखोद्गत होई. सारांश, सर्व विद्या त्यास चांगल्या अवगत झाल्या. चौदा विद्या, चौसष्ट कळा कोणीही शिकला व जर त्याचे ठायीं ईश्वराविषयीं प्रेम नसलें, तर त्यांपासून त्यास व्हावा तसा उपयोग होत नाहीं. चांगदेवाची अशी

स्थिति नव्हती. पण त्यास आत्मज्ञान नव्हतें; तेंही पुढें ज्ञानदेवाची भेट झाल्यावर पूर्णपणें कळून आलें.

चांगदेव हा ईश्वराचा अवतार, असें लोक ह्मणूं लागले. त्याची कीर्त्ति देशोदेश पसरली. हजारों लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले. लोकांचे मनोरथ पूर्ण होऊं लागले. नित्य भजन, पूजन, कीर्त्तन होऊं लागलें. अशीं शंभर वर्षें झालीं, तेव्हां काळ ( मृत्यु ) आला असें ज्ञानदृष्टीनें पाहून, त्या अशी युक्ति योजिली कीं, आत्मा ब्रह्मांडीं नेऊन शरीर काष्ठवत् केलें. हा चमत्कार सर्व लोक पहात होते. याप्रमाणें नऊ रात्रंदिवसपर्यंत राहिले व काळास मागें फिरविलें. त्याचे बरेच शिष्य होते, त्यांनीं शरिराचें रक्षण केलें; तों चांगदेवाच्या शरिरांतून श्वासोश्वास येतांच सर्वांना उल्हास झाला. जसें निजून उठावें त्याप्रमाणें चांगदेव उठले. कलियुगांत शंभर वर्षांचें आयुष्य ठेविलें आहे; ह्मणून ती मुदत भरत आली ह्मणजे चांगदेव दुसरीकडे जात. तेथें एक वर्ष राहून पुनः परत येत. प्रत्येक शंभर वर्षीं यमाच्या धास्तीनें आत्मा ब्रह्मांडीं नेऊन पुनः परत सावध होत. ह्याप्रमाणें त्यांनीं चौदाशें वर्षें काढिलीं. त्यांपैकीं चौदा वर्षें निरनिराळ्या स्थळीं काढिलीं.

एके दिवशीं एक पैठणकर ब्राह्मण मार्गानें जात असतां, यात्रेकरू पुष्कळ उतरले होते त्यांना तुह्मीं कोठें जात आहां? असें विचारूं लागला. तेव्हां यात्रेकऱ्यांनीं त्यास सांगितलें कीं, तापीच्या किनारीं चांगदेव म्हणून एक सिद्धपुरुष आहे; त्यानें चौदाशें वर्षें शरिराचें रक्षण केलें; व त्याचें दर्शन घेतलें असतां मनकामना पूर्ण होते. असें त्यांनीं सांगतांच त्या ब्राम्हणास आनंद झाला. मग त्यानें अशा सिद्धपुरुषाचें एकदां तरी दर्शन घेईन, असा निश्चय केला; आणि वटेश्वरीं गेला. तेथें तापीच्या कांठीं असंख्य यात्रा जमलेली पहातांच त्यास नवल वाटलें. त्याणें जाऊन चांगदेवास साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां साक्षात् शंकरासारखें त्याचें रूप त्यास भासलें. ज्या दैवताची भक्ति करावी तदाकार वृत्ति होते. त्याची शिवमयवृत्ति पाहून ब्राह्मण आनंदानें त्याच्याजवळ बसला; व

स्वामीचें दर्शन झाल्यामुळें आज मी धन्य होऊन सर्व पातकांपासून मुक्त झालों असें त्यास वाटलें. आज पूर्व पुण्य उदयास आलें, किंवा सकळ तीर्थांचें स्नान घडलें, कीं योगायाग सुफळ झाले, ह्मणून आज संतांचीं पावलें नजरेस पडलीं; असेही तर्क त्याच्या मनांत येऊं लागले.

तो ब्राह्मण चांगदेवाची स्तुति करीत होता, तें चांगदेवानें ऐकलें. मग त्यानें त्यास विचारिलें कीं, तुह्मीं आलां कोठून; जावयाचें कोठें; तुमचें घर कोण्या गांवीं; नवल वर्त्तमान तुह्मीं कांहीं ऐकिलें किंवा पाहिलें असेल तर आह्मांस कळवावें. तेव्हां तो विप्र ह्मणाला, आह्मीं पैठणक्षेत्रांत राहतों. गांवांत भिक्षा मागून कुटुंबाचें पोषण करितों. त्या गांवांत मागें न झालेली व पुढें न होण्याजोगी एक चमत्कारिक गोष्ट घडली. ती अशी कीं, एका संन्याश्याचे तीन मुलगे आपल्या बहिणीसह गांवांत आले; त्यांपैकीं एकानें रेड्याच्या तोंडून वेद ह्मणविले. हा प्रकार मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलेला स्वामीस निवेदन केला आहे. हें ऐकून चांगदेवास नवल वाटलें. तो त्यास ह्मणाला, संन्याश्यानें स्त्रिचा त्याग केलेला असतो; तेव्हां स्त्रीवांचून संन्याशास पुत्र झाले कसे? हें सविस्तर मला कळवावें. मग त्यानें त्यास मुलांची हकीगत सांगितली. ती अशी:—

## विठोबा.

गंगातीरीं आप्पेगांव ह्मणून एक खेडें आहे. तेथें एक पुण्यशील ब्राह्मण राहत असे. त्याचें नांव गोविंदपंत; व त्याच्या स्त्रिचें निराबाई असें होतें. त्या उभयतांनीं गैनीनाथ ह्मणून एका सिद्धपुरुषाचा उपदेश घेतला. पुढें निराबाई गरोदर राहिली. नवमास भरतांच पुत्र झाला. त्याचें नांव त्यांणीं विठोबा असें ठेविलें. मुलाचीं लक्षणें पाहून उभयतांस आनंद होई. त्यांनीं त्याची आठवे वर्षीं मुंज केली. नंतर वेदशास्त्रांचा अभ्यास पूर्ण केल्यावर आईबापांस विचारून तो तीर्थयात्रेस गेला. त्यास अनुताप होऊन राम, कृष्ण, नारायण यांचें प्रेमानें तो अखंड नामस्मरण करूं लागला. प्रथम

द्वारकेस गेला. तेथें गोमतीचें स्नान करून श्रीविष्णूचें दर्शन घेतलें. मग सर्व पश्चिमतीर्थें करीत करीत भीमाशंकरास गेला. तेथून आळंदीस गेला व इंद्रायणीच्ें तीरीं स्नान केल्यावर श्रीविष्णूची पूजा केली. तेथील कुळकर्णी सिधोपंत याच वेळीं स्नान करून देव-मंदिरांत आले. तेथें विठोबाची व त्याची गांठ पडली. त्यास सिधोपंत भोजनाकरितां आपल्या घरीं घेऊन गेला. नंतर सर्व विचारपूस झाल्यावर सिधोपंतास झोंप येऊं लागली, ह्मणून तो स्वस्थ निजला.

त्या वेळीं पांडुरंगानें सिधोपंताच्या स्वप्नांत जाऊन सांगितलें कीं, तुझी कन्या उपवर झालेली आहे ती तूं या ब्राह्मणास दे. मूर्त्तिमंत चार अवतार ह्याच्या उदरीं येणार आहेत. मग तो जागा झाल्यावर ज्योतिषास बोलावून लग्नदिवस नक्की ठरविला व दोन्हींकडचें साहित्य सिद्ध करून विठोबास कन्या दिली. चार दिवसपर्यंत लग्नसोहळा होऊन समारंभ संपला. मग कन्या व जांवई यांस श्रीपांडुरंगास भेटविण्यासाठीं सिधोपंत आपल्या कुटुंबासह पंढरपुरास गेला. जांव-याच्या मनांत रामेश्वराची यात्रा करावयाची होती, ह्मणून तो त्यास विचारून तिकडे गेला; व सिधोपंत मुलीस घेऊन आपल्या गांवीं आला.

पुढें कांहीं दिवस लोटल्यावर विठोबाही रामेश्वरादि सर्व दक्षिण-तीर्थें करून आळंदीस आला. मग सिधोपंतास भेटल्यावर सर्वांना आनंद झाला. पुढें मातापित्यास भेटण्याची आपली इच्छा त्यानें सिधोपंतास कळविली; आणि आपल्या घरीं जावयास आज्ञा मागितली. मग सिधोपंत कन्येस बरोबर घेऊन त्याच्या समागमें आप्पेगांवास निघाला. तेथें गेल्यावर गोविंदपंताची भेट घेऊन त्यास सर्व वृत्तांत कळविला आणि त्याच्या स्त्रीसह त्यास वस्त्राभुषणांनीं गौरविलें. पुत्र व सून पाहून त्या उभयतां मातापित्यांस संतोष वाटला. मग सिधो-पंत आपल्या गांवीं आला.

कांहीं दिवस लोटल्यावर, विठोबाची आईबापें मरण पावलीं; हें वर्त्तमान सिधोपंतास कळलें. तेव्हां जांवयाकडची कशी काय व्यवस्था आहे ती पहावी ह्मणून सिधोपंत आप्पेगांवास आला. तेव्हां विठो-बाचें चित्त संसाराकडे नसून तो विरक्त झालेला होता. मग विठोबास

समजावून आपल्या कन्येसह त्यास आळंदीस घेऊन गेला. व त्यानें त्याला सांगितलें कीं, मुलेंलेंकरें होईपर्यंत तुह्मी आतां एथेंच असावें. त्यावरून विठोबा तेथेंच राहिला. तो दर आषाढीकार्त्तिकीस पंढरपुरास जाई.

विठोबा सासुरवाडीस पुष्कळ दिवस राहिला होता. त्यास कांहीं संतान झालें नाहीं. तेव्हां उदास होऊन त्यानें, संन्यास घ्यावयास रुकार द्यावा ह्मणून बायकोस विचारिलें. त्या वेळीं त्याची स्त्री रखुमाबाई इणें आपल्या बापापाशीं ही गोष्ट काढिली. तेव्हां, पुत्र झाल्यावांचून होकार देऊं नको ह्मणून त्यानें तिला सांगितलें; म्हणून ती गोष्ट कांहीं दिवस तशीच राहिली. नंतर पुन्हा एकदां त्यानें स्त्रीजवळ गोष्ट काढिली कीं, मी गंगास्नानास जाऊन येतों. तेव्हां ती कावरीबावरी झाल्यामुळें तिनें जा म्हणून सांगितलें. मग तो वाराणशीस गेला. तेथें त्यानें स्नान केलें व पुराण ऐकिलें. त्यांत संन्यासमहिमा ऐकून त्यानें संन्यास घेण्याचा निश्चय केला. नंतर लागलेंच श्रीपादस्वामीस (रामानंदस्वामीस) शरण जाऊन मला संन्यास द्यावा म्हणून त्यानें सांगितलें. तेव्हां त्यांनीं विचारपूस केली, तेव्हां मी एकटाच आहें; मला दुसरा मागें पाश नाहीं; असें त्यानें सांगितलें. या त्याच्या बोलण्यावर भरंवसा ठेवून स्वामीनें त्यास संन्यास दिला.

विठोबानें संन्यास घेतल्याची बातमी ग्रामस्थांनीं सिधोपंतास कळविली. तेव्हां त्यास परम दुःख झालें. रखुमाबाईही दुःखी झाली. तिनें पिंपळाची मोठ्या प्रेमानें सेवा आरंभिली. उग्र अनुष्ठान करतांच तिला लक्ष्मीकांत प्रसन्न झाले. पुढें श्रीपादस्वामी येऊन पारावर बसले. रखुमाईनें त्यास पाहिलें व हे कोणी यति आहेत असें जाणून त्यास नमस्कार केला. तेव्हां 'पुत्रवति हो' असा त्यानें तिला आशिर्वाद दिला. त्या वेळीं रखुमाईस हंसूं आलें. मग त्यानें तिला हंसण्याचें कारण विचारिलें. तेव्हां ती ह्मणाली, पतीनें वाराणशीस जाऊन संन्यास घेतला आहे; यास्तव तुमचा आशिर्वाद खरा कसा होईल? हें ऐकून स्वामी ह्मणाले, स्त्री तरुण असून संतान नसतां ज्यांनीं संन्यास दिला त्या गुरूस व शिष्यास शिक्षा करावयास पाहिजे. मग त्यानें

सर्व खुणाखाणा विचारून घेतल्या; तेव्हां हें आपल्याच गळ्यांत घोंगडें येत आहे असें त्यास वाटलें. मग तो रखुमाबाईस ह्मणाला कीं, तुझे कोणी आप्त असतील तर मजजवळ घेऊन ये. मग ती घरीं जाऊन आपल्या बापास घेऊन त्याकडे आली. त्यानें त्या यतीस आपल्या घरीं नेऊन त्याची पूजा केली. भोजन झाल्यानंतर श्रीपादस्वामीनें सांगितलें कीं, आमचा मठ वाराणशीस आहे. रामेश्वरास जाण्याचा आमचा हेतु होता, परंतु तुमच्या कन्येनें मला संपूर्ण वृत्तांत सांगितला; तर आतां वाराणशीस परत गेलें पाहिजे. ह्यास्तव तुह्मीं कन्येस घेऊन आमच्याबरोबर चला. इच्या दोषानें आमचें सुकृत नष्ट होईल. हें ऐकून सिधोपंतानें त्याचें ह्मणणें कबूल करून कन्येस घेऊन त्याच्या समागमें वाराणशीस गेला.

विठोबास संन्यास दिला त्या वेळेस श्रीपादस्वामीनें त्याचें नांव चैतन्य असें ठेविलें होतें. स्वामीनें सिधोपंतास मठाबाहेर ठेविलें व आपण आंत गेले. नंतर त्यानें चैतन्यास विचारिलें कीं, तुझीं घरीं कोण कोण मनुष्यें आहेत? तेव्हां तो भयाभित झाला; व स्वामीच्या चरणावर मस्तक ठेवून हळूच बोलला कीं, माझी स्त्री घरीं आहे. मग त्यानें रखुमाबाईस हांक मारून तिला त्याच्या स्वाधीन केलें व त्याला सांगितलें कीं, आतां ह्मिचा अंगिकार कर. अविधिकर्माचें भय मनांत बाळगूं नको. तुला माझी आज्ञा ऐकली पाहिजे. ईश्वर तुला साह्य होईल.

मग चैतन्यानें गुरूच्या पायांवर मस्तक ठेविलें; व स्त्रीसह आळंदीस येऊन गृहस्थाश्रम करूं लागला. तेव्हां लोक नाना प्रकारें निंदा करूं लागले. ब्राह्मणांनीं त्यास जातीबाहेर टाकिलें; तरी त्यानें तिकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. मग तो एक खोंपट बांधून स्त्रीसह अरण्यांत राहिला. तो भिक्षा मागून निर्वाह चालवी. ह्याप्रमाणें त्यानें बारा वर्षें काढिलीं. त्यास तीन पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें झालीं. प्रथम शंकरानें अवतार घेतला, त्याचें नांव निवृत्ति; विष्णूचा अवतार ज्ञानदेव; ब्रह्मदेवाचा अवतार सोपान; व आदिमाया तीचें मुक्ताबाई. हीं चार मुलें झालीं तेव्हां त्यांस संतोष झाला.

## ज्ञानदेव.

एके दिवशीं रखुमाईनें पतीजवळ गोष्ट काढिली कीं, मुलें मोठीं झालीं; आतां ब्राह्मण बोलावून त्यांच्या मुंजी करून घ्या. मग त्यानें ब्राह्मणांची सभा भरविली व त्यांस ह्मणाला, तुह्मीं जें प्रायश्चित्त सांगाल तें मी घेतों. असें ऐकतांच पंडित ह्मणूं लागले कीं, तूं संन्यास घेतल्यावर स्त्रिचा अंगिकार केलास; यास्तव तुला देहांतप्रायश्चित्तावांचून दुसरा उपाय नाहीं. असें ब्राह्मणांनीं बोलतांच त्यास अनुताप होऊन तो मुलें टाकून स्त्रीसह आनंदवनास निघून गेला. मग निवृत्तीनें ब्राह्मणांस विचारिलें कीं, आमचीं आईबापें निघून गेलीं; आतां आह्मीं चार मुलांनीं काय करावें तें सांगा. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, तुह्मीं पैठणच्या ब्राह्मणांकडे जाऊन आपला उलगडा करून या; त्यांचें करणें आह्मांस मान्य आहे. असें सांगून त्यांना एक पत्र पैठणच्या ब्राह्मणांवर दिलें. त्यांत त्यांनीं सविस्तर हकिकत लिहिली होती.

मग तीं चौघें पैठणास आलीं. त्यांणीं तेथच्या ब्राह्मणांस नमस्कार करून पत्र दिलें; व आपला संपूर्ण वृत्तांत त्यांस कळविला. ब्राह्मणांनीं शास्त्रें पाहून त्यांस सांगितलें कीं, तुह्मांस प्रायश्चित्त दिसत नाहीं; परंतु, तुमचा तरणोपाय होण्याचा एक रस्ता आहे. तो हा कीं, तुम्हीं श्रीहरीला शरण जाऊन त्याचें भजन करावें. सर्व ब्रह्ममय समजून सर्व जाती वंदाव्या. अंत्यजांसही दंडवत घालावें. तेणेंकरून तुम्हांस निर्वाणपद ( मोक्ष ) प्राप्त होईल. हें ऐकून चौघांस आनंद झाला. व त्यांना ती युक्ति फारच मानवली.

पुढें ते ब्राह्मण ज्ञानदेवास ह्मणाले कीं, तुमचें नांव ज्ञानदेव कोणीं ठेविलें? असा तुह्मीं कोणता अभ्यास केला आहे? पहा, तो आमचा रेडा येत आहे, त्याचेंही नांव ज्ञान ठेवावें; अशा अनेक कुचेष्टा करूं लागले. तेव्हां, त्या रेड्यांत व माझ्यांत अगदीं भिन्नता नाहीं, ह्मणून ज्ञानदेवानें सांगितलें; व रेड्याच्या मुखांतून चार वेद बोलविले. तेव्हां सर्वांना आश्चर्य वाटलें. मग सर्व निराभिमान होऊन ज्ञानदेवाच्या पायां पडले.

याप्रमाणें त्या पैठणकर ब्राह्मणानें सांगितल्यावर चांगदेवास नवल

माझ्या अंगीं नाहीं; अशी चांगदेवाची खात्री झाली. मग ब्राह्मणानें त्यास दुसरा एक चमत्कार सांगितला तो असा कीं, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं पैठणास एका ब्राह्मणाकडे राहिलीं होतीं; ह्यामुळें त्या ब्राह्मणाशीं कोणी अन्नव्यवहार करीना. पुढें एक महिन्यानें त्याच्या घरीं पितृतिथि आली. तेव्हां कोणीच त्याकडे भोजनास जाण्याचें कबूल करीना; म्हणून तो विचारांत पडला. त्याला ज्ञानदेवानें चिंतातुर होण्याचें कारण काय म्हणून विचारलें; त्यावरून त्याणें त्यास सर्व वर्त्तमान विदित केलें. तेव्हां ज्ञानदेव म्हणाला, आह्मीं तुमच्या घरीं राहिल्यामुळें तुम्हांस या अडचणींत पडावें लागलें आहे. तुम्हांस अपंक्त करण्याचें कारणही हेंच; तरीं तुम्हीं कांहीं काळजी करूं नका. तुह्मीं सर्व स्वयंपाक यथास्थित करावा. श्रीसद्गुरु निवृत्तीच्या प्रसादानें साक्षात् पितर भोजनास येतील. मग सर्व स्वयंपाक तयार झाला. पुजेची तयारी केली. पानें मांडून आसनें मांडिलीं. मग ज्ञानदेवानें 'आगतं' असें म्हणतांच सर्व पितर येऊन आसनावर बसले. पुढें सर्व पितरांची पूजा केली. वेदघोष होऊं लागला. तेव्हां गांवचे ब्राह्मण विस्मित झाले. त्यांनीं आजूबाजूच्या घरांतून लपून छपून हें सर्व कृत्य पाहिलें. तेव्हां ज्ञानदेव साक्षात् ईश्वरावतार आहे, अशी त्यांची खात्री झाली. इतक्यांत पितर जेवून तृप्त झाले. नंतर सर्व कृत्य आटोपल्यावर 'स्वस्थाने वासः' असें ज्ञानदेवानें म्हणतांच पितर अदृश्य झाले. मग पैठणचे सर्व लोक त्याची स्तुति करूं लागले. पुढें ते पैठणाहून आळंदीस गेले. त्या वेळीं ज्या रेड्यानें वेद म्हटले तो रेडाही बरोबर नेला. या गोष्टीस एक महिना झाला. याप्रमाणें मीं नजरेनें पाहिलेली हकीकत तुह्मांस सांगितली आहे; असें त्या ब्राम्हणाकडून ऐकून चांगदेवास नवल वाटलें. मीच उत्तम गाणार असा नारदास गर्व झाला; मग देवानें आस्वलाच्या मुखानें सुस्वर गाववून त्याचा गर्व हारविला. मी थोर असा सागराला गर्व झाल्यावरून अगस्तिमुनीनें आचमन करून त्याचा गर्व उतरला तसेंच मी चौदाशें वर्षें वांचून सिद्ध झालें; परंतु ज्ञानदेवाची करणी अघटित होय.

# अध्याय ४ था.

## चांगदेव व ज्ञानदेव.

### चांगदेव.

पारड्यांत पृथ्वी घालून तिचें वजन करवेल; वारा अति चंचळ आहे, तरी तो पिंजऱ्यांत कोंडून ठेवितां येईल; आकाशास आधार देववेल; अस्तास जात असतां सूर्यास धरवेल; परंतु देवभक्तांचीं चरित्रें पुरीं वर्णवणार नाहींत. असो. मागच्या अध्यायांत पैठणच्या ब्राह्मणानें ज्ञानदेवाचें चरित्र वर्णन चांगदेवाजवळ केलें. तेव्हां तें कितपत खरें आहे ह्याचा अनुभव पहावा ह्मणून, चांगदेवानें प्राणायाम करून समाधि लाविली; व पाहिलें तों ब्रह्मा, विष्णु व शिव या तीन देवांचे अवतार त्याच्या ध्यानांत आले. रेड्याकडून वेद बोलविले वगैरे सांगितलें तें सर्व खरें, अशी त्याची खात्री झाली. मग समाधि विसर्जन करून देहावर आल्यानंतर चांगदेव निराभिमान होऊन पैठणकर ब्राह्मणास ह्मणाला कीं, कांहीं अपराधावरून इंद्रानें मला शाप दिला. तेव्हां मीं त्याचे पाय धरतांच त्यानें संतुष्ट होऊन उःशाप दिला कीं, पुढें तीन्हीं देवांचे अवतार पृथ्वीवर होतील त्यांस तूं शरण जा; ह्मणजे तात्काळ मुक्त होशील व स्वर्गी येऊन पूर्ववत् सुख भोगशील. मग मी पृथ्वीवर उतरलों. आज चौदाशें वर्षें मीं देह वांचविला ह्याचा मतलब, ज्ञानदेवाचे पाय पहावे हाच होय. आतां त्याचा अवतार झाला आहे, तर भेटीस जावें असें वाटतें.

ह्या प्रमाणें स्वामीनें ह्मटल्यानंतर, ज्ञानदेवाची भेट झाल्यानें स्वामी शापमुक्त होऊन स्वर्गास जाईल; तेणेंकरून त्याचा वियोग होणार ह्मणून शिष्यांस अति वाईट वाटलें. मग त्याच्या जाण्यांत व्यत्यय आणावयासाठीं शिष्य म्हणाले, दुसऱ्याची कीर्ति ऐकून सर्वथा स्थानभ्रष्ट होऊं नये. त्या योगानें महत्वास हानि येऊन आपल्याकडे हीनत्व येतें. तर आम्हांस एक अशी युक्ति सुचली आहे कीं, आपण जाण्याच्या पूर्वीं ज्ञानदेवास एक पत्र पाठवावें; आणि त्याच्याकडून उत्तर आल्यावर मग जावें. ह्या शिष्यांच्या म्हणण्यास चांगदेवानें रुकार

दिला. मग दौतलेखणी घेऊन पत्र लिहावयास चांगदेव लागला, असतां विचारांत पडला. कारण ज्ञानदेवास मोठेपणा देऊन जर लिहावें, तर तो वयानें लहान पडला; व आपणाहून कनिष्ठ असें मानावें, तर अघटित करणी करून दाखविण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं अधिक आहे. मग पत्र कसें लिहावें ह्याच विचारांत चांगदेव पडला. शेवटीं त्यानें कोरा कागद देऊन आपल्या दोघां शिष्यांस ज्ञानदेवाकडे पाठविलें. त्या वेळीं त्यानें शिष्यांस सांगितलें कीं, तुह्मीं आळंदीस जाऊन ज्ञानदेवादि चौघांची स्थिति कशी आहे ती पहावी. उपासना कोणाची करितात, स्नानसंध्या कशा रीतीनें करितात, शास्त्राध्ययन कोणतें केलें आहे, विद्या कोणत्या साध्य केल्या आहेत, प्राणीमात्रांवर भूतदया कशी आहे वगैरे त्यांच्या सर्व लीला तुह्मीं समक्ष पहाव्या. नंतर त्या चौघांना माझा नमस्कार सांगा ह्मणून सुचविलें. नंतर त्यांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांस उत्तर घेऊन यावयास सांगितलें.

## ज्ञानदेव.

मग ते गुरूस नमस्कार करून आळंदीस निघाले. तेव्हां चांगदेवानें अशी युक्ति केली कीं, त्यांना एका घटकेंत आळंदीस नेऊन ठेविलें. तरी आपण आळंदीस आलों हें त्या शिष्यांस समजलें नाहीं. ते त्या गांवाची चौकशी करूं लागले असतां, गांवकऱ्यांनीं हीच आळंदी आहे असें सांगितलें. तेव्हां नवल वाटून शिष्यांनीं विचारिलें कीं, एथून चांगदेव किती लांब आहेत? तेव्हां त्यांनीं अडतीस योजनें ह्मणून सांगितलें; व ते असेंही ह्मणाले कीं, एका घटकेंत दीडशें कोस आल्याचें नवल मानावयास नको. कारण, चांगदेवस्वामींच्या अंगीं तसेच गुण आहेत; हें आह्मांस ठाऊक आहे. आह्मींही त्याचें दर्शन घ्यावयास गेलों होतों. असो. चांगदेवाच्या शिष्यांनीं इंद्रायणीतीर्थीं स्नान केलें व ते गांवांत आले. ज्ञानदेवाचें दर्शन केव्हां होईल असें त्यांस झालें होतें. मग चौकशी करून ते ज्ञानदेवाच्या मठांत गेले तों तेथें त्यांणीं असा चमत्कार पाहिला कीं, ज्ञानदेवानें त्या शिष्यांस पाहतांच तो निवृत्तीस ह्मणूं लागला कीं, ज्याच्यासाठीं आपण मृत्युलोकीं अवतार घेतला, त्या चांगदेवाचें आपणांस दर्शन होईल असें दि-

सत आहे. तो वटेश्वरासिद्ध महापुरुष ; त्यानें दोघा शिष्यांस आपणांला पत्र देऊन पाठविलें आहे; परंतु कागद कोरा आहे. असें निवृत्तीस सांगत होते, इतक्यांत त्या शिष्यांनीं पुढें येऊन ज्ञानदेवास साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां ज्ञानदेवानें त्यांना सांगितलें कीं, तुह्मीं तापीच्या तीराहून आलेत. चांगदेवानें तुमच्याजवळ कोरा कागद आह्मांस पत्र ह्मणून देण्यासाठीं दिला आहे; आणा पाहूं तो इकडे! असें ऐकतांच चांगदेवाच्या शिष्यांस विस्मय वाटला. ते ह्मणाले, तुह्मीं परब्रह्म पुतळे आहां. आह्मीं सांगितल्यावांचून तुह्मांस समजलें. तुह्मीं जगाचा उद्धार करावयाकरितां ब्रह्मा, विष्णु, महेश या तिन्हीं देवांचे अवतार आहां. अशी आह्मीं तुमची कीर्त्ति ऐकिली ती खरी आहे; असें सांगून कोरा कागद ज्ञानदेवापुढें टाकिला. तो त्यानें निवृत्तीस दाखविला; व कोरा कागद कां पाठविला ह्मणून विचारिलें. तेव्हां निवृत्तिदेवानें सांगितलें कीं, हा चांगावटेश्वर मरुद्गणाचा अवतार आहे. हा चौदा विद्या चौसष्ट कलांमध्यें निपुण आहे. ह्यानें अष्टांगयोग साधिलें आहेत व सर्व सिद्धि वश करून घेतल्या आहेत. हा काळाचा फेरा आला ह्मणजे आपला आत्मा ब्रह्मांडीं नेतो; अशा रीतीनें चौदाशें वर्षें वांचला. ह्याच्या सिद्धीचा ब्रह्मादिकांना अंत लागत नाहीं. परंतु ब्रह्मज्ञानाविषयीं तो अगदीं आंधळा आहे. ह्मणून त्याचें ज्ञान मातींत गेलें. संपूर्ण अलंकार घालून नटलेली सुंदर स्त्री कुंकावांचून शोभत नाहीं; तशीच ह्याची गत आहे. किंवा कमळपत्रासारखे नेत्र असून दिसत नसलें तर ते डोळे निरुपयोगी; असे बहुत दृष्टांत देऊन त्याचें ज्ञान निरुपयोगी ह्मणून सांगितलें. व आणखी तो ह्मणाला, पत्र लिहावयास घेतलें असतां, अभिमानानें श्रेष्ठ व कनिष्ठ हा भाव त्याच्या मनांत येऊन काय लिहावें तें त्यास सुचेना; तेव्हां कोरेंच पत्र पाठविलें. कांकीं, ब्रह्मज्ञानावांचून तोच कोरा आहे. यास्तव त्यास उत्तर असें लिहा कीं, त्यास बोध होईल. अशी निवृत्तिनाथाची आज्ञा झाल्यावर ज्ञानदेवानें सिद्धांतज्ञानावर 'लिखितपासष्ठी' ह्मणून ग्रंथ लिहिला. त्यांतील भावार्थ असा:—स्वस्ति

नये. हें शरीर कोणाचें आहे, आंत कोण नांदत आहे, ह्याचा तूं विचार करून पहा. बहुत कष्ट करून योगसाधन केल्यानें रिद्धि-सिद्धि प्राप्त होतात; परंतु परमेश्वर कोठें मिळतो ? इंद्रियांत मन चंचळ आहे. तें जेथें जाईल तेथें आपणामध्यें द्वैत नसलें पाहिजे. तर ह्या पांसष्ट ओंव्या वाचून त्यांचा अर्थ ध्यानांत आण; व सूक्ष्म दृष्टीनें विचार करून अनुभव घेऊन अंतःकरणांत ठेव. अशा मतलबाचें पासष्ट ओंव्यांनीं पत्र लिहून शिष्यांजवळ दिलें. आणि ह्मणाले कीं, चांगदेवास ज्ञानदेवाचा नमस्कार सांगा; आणि असेंही कळवा कीं, आज चौदाशें वर्षें वांचलेंत त्याचें सार्थक या उत्तरांतील मथकुराचा अनुभव घ्याल तेव्हां होईल !

असा ज्ञानदेवाचा निरोप ऐकून व पत्र घेऊन ते शिष्य चांगदेवापाशीं आले; व निरोप सांगून पत्र दिल्यावर म्हणाले कीं, त्यांमध्यें दांभिक-पणा नाहीं. त्यांचा अगदीं साधा बाणा आहे. त्यांना मानापमान कांहींएक नाहीं. निवृत्तीचें वय सात वर्षांचें, ज्ञानदेव सहा वर्षांचा, पांच वर्षांचा सोपान व मुक्ताई चार वर्षांची आहे. तीं पांडुरंगाची उपासना करितात वगैरे त्यांची सर्व हकीगत सांगितली. मग चांगदेव पत्र शिरसावंद्य करून वाचून पाहूं लागला. पहिली ओंवी वाच-तांच मनामध्यें नाना तरंग उत्पन्न झाले व अनेक अर्थ होऊं ला-गले. तेव्हां त्याची मति कुंठित झाली. कांहींकेल्या पुरा अर्थ ध्यानांत येईना. शेवटीं त्यानें ज्ञानदेवाची भेट घेऊन त्याच्यापासून उलगडा करून घेण्याचा निश्चय केला. मग शिष्यांस सांगितलें कीं, ज्ञानदे-वाची भेट घ्यावयास जावयाचें आहे; तर आमच्या समागमें चला. मग चांगदेव व सर्व शिष्यमंडळी वाघांवर बसून व हातांत सर्पांचे चाबूक घेऊन ज्ञानदेवाकडे जावयास निघाली.

ज्यांनीं ज्यांनीं हा चमत्कार पाहिला, त्यांची मति थक्क होऊन गेली. त्याची कितीएकांनीं पूजा केली; कित्येकांनीं त्यास नमन करून आपलीं कार्यें करून घेतलीं. त्याचें दर्शन घेण्यास पुष्कळ लोक जात. मग तो अशा डामडौलानें पिंपळगांवास येऊन उतरला. तेथून आळंदी योजनभर आहे. नंतर आपण आल्याची बातमी

कळविण्याकरितां त्यानें आपल्या एका शिष्यास ज्ञानदेवाकडे जावयास सांगितलें व तो वाघावर बसून आळंदीस निघाला.

इकडे निवृत्तीनें ज्ञानदेवास सांगितलें कीं, पत्राचा अर्थ कळला नाहीं म्हणून चांगदेव आपल्या सिद्धीची घमेंडी बाळगून वाघावर बसून आपल्या भेटीस येत आहे; वगैरे सांगत आहे इतक्यांत तो शिष्य येऊन पोंचला. तो दर्शन घेऊन साष्टांग नमस्कार घालीत आहे तों चांगदेव भेटीस येत असल्याचें वर्त्तमान सोपानानें कळविलें. तेव्हां त्यास सामोरें जावें हें उत्तम, असें निवृत्तीनें ज्ञानदेवास सुचविलें. मग ज्ञानेश्वरानें आह्मांस सामोरें घेऊन चलावें म्हणून भिंतीस आज्ञा केली. तेव्हां भींत चौघांस घेऊन घोड्याप्रमाणें जलद जाऊं लागली; तेव्हां सर्वांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. चांगदेवासही हें समजतांच नवल वाटलें व निर्जीव भिंतीस चेतना आणिली, यावरून ह्यांच्यासारखीं अद्भुत कृत्यें करून दाखविण्याचें सामर्थ्य दुसऱ्याच्या अंगीं नाहीं; व सजीव वाघावर बसून आपण भेटीस जात आहों हें अयोग्य होय; अशी त्याची खात्री झाली. मग तो निराभिमान होऊन वाघावरून खालीं उतरला. तेव्हां शिष्यही उतरले व सर्वजण लोटांगण घालीत चालले. त्या वेळेस चांगदेवाचें सर्व तेज लोपून गेलें. चांगदेवास पहातांच निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई हीं भिंतीवरून खालीं उतरलीं; व जवळ जातांच चौघांनीं त्यास साष्टांग नमस्कार घातले. मग चांगदेवानें त्यांस उठविलें व तोही त्यांच्या पायां पडला. त्या वेळीं प्रेमालिंगन होऊन सर्वांच्या भेटी झाल्या. देवांनीं पुष्पवृष्टि केली. विठ्ठलनामाचा एकसारखा गजर होऊं लागला. व लोक ह्मणूं लागले कीं, बृहस्पतीच्या घरीं जसा शुक गेला; वसिष्ठाचें सामर्थ्य पाहून त्यास विश्वामित्र जसा भेटला; किंवा हरिहर एके ठिकाणीं मिळाले असें सर्वांना वाटूं लागलें. मग चांगदेवाचा हात धरून ज्ञानदेव विश्रांतवटवृक्षाच्या छायेस आले. सर्व मंडळी तेथें बसून विठोबाचें भजन करूं लागली. हें ठिकाण आळंदीपासून अर्धा कोस आहे.

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई आदिकरून सर्व मंडळी विठोबाचें भजन करीत असतां, तुह्मीं निर्जीव भिंत चालविली कशी,

ह्मणून चांगदेवानें ज्ञानेश्वरास विचारिलें. तेव्हां ज्ञानदेवानें त्याच्या पायां पडून एक अभंग ह्मटला. त्याचा भावार्थ असा कीं, देव काय करणार नाहीं? दगड समुद्रावर तरविले व सर्व वानर लंकेंत नेले. श्रीहरीच्या सत्तेनें हवें तें होतें. हें सर्व चराचर तोच नटला आहे. पंचमहाभूतांचें परस्पर वैर आहें; परंतु तो आपल्या सत्तेनें तीं एके ठिकाणीं सख्यत्वानें नांदवितो. त्या श्रीपतीची ही करणी होय. त्याणेंच भिंत चालविली. हें माझें सामर्थ्य नाहीं. असें भाषण ऐकून चांगदेव त्यांच्या पाया पडला.

---

## अध्याय ५ वा.

### चांगदेव.

श्रीहरीची अगाध लीला आहे. तो नानाप्रकारचीं चरित्रें करून दाखवितो. भक्तांची सप्रेम भक्ति पाहून निरंतर त्यांच्याजवळ रहातो. तो त्यांची जातपात कांहींएक पहात नाहीं. नामदेव शिंपी, चोखामेळा हा तर जातीचा महार, दामाजीपंत ब्राह्मण, मिराबाई राजकन्या, कान्होपात्रा वेश्येची कन्या, कबीर यवन, अशी मंडळी संकटांतून राखून त्यांचीं कामें केलीं व त्यांचा महिमा वाढविला. ज्ञानदेव, सोपान, निवृत्ति व मुक्ताबाई यांची कीर्ति व्हावी ह्मणून भींत चालविली. असो.

चांगदेव व ज्ञानदेव यांच्या भेटी झाल्यानंतर ते विश्रांतवटवृक्षाखालीं गोष्टी सांगत बसले. त्या वेळीं, चांगदेव चौदाशें वर्षें जगून अद्यापि कोराच राहिला आहे, तर त्यास उपदेश करून आत्मज्ञानास लावावें; असा निवृत्ति आदिकरून चौघांनीं आपसांत बेत केला. वटवृक्षाखालीं बसून गोष्टी करीत असतां निवृत्ति आणि ज्ञानदेव चांगदेवास ह्मणाले, तुह्मीं थोर आहां; आमचा उद्धार व्हावा ह्मणून तुमचा अवतार आहे. तुह्मीं महा योग सिद्धीस नेले; व रिद्धिसिद्धि वश करून जनांस कौतुक दाखविलें. हें ऐकून चांगदेवानें त्यांना साष्टांग नमस्कार घातला; व हात जोडून विनंती केली कीं, तुमचें आज दर्शन झाल्यानें

मी कृतार्थ झालों. माझा अभिमान गेला व माझें मन निर्मल झालें. तुमच्यासारख्यांचीं दर्शनें घ्यावीं ह्मणून मीं आजपर्यंत शरीर जतन करून ठेविलें. आतां माझी संसाराची गुंती तोडा. तेव्हां मुक्ताबाई ह्मणाली, मी कोण आहें, ह्याचा सर्व भ्रांती टाकून विचार कर. ज्ञान, वैराग्य सर्व त्रिगुणात्मक आहेत. त्यांवांचून निराळें सुख पहा. लवकर सावध हो. आत्मज्ञानाची सर्व खूण तुला सांगतें. तूं जें जें पहाशील तें तें आत्मवत् मान; ह्मणजे भेदभावना निघून जाईल. मीपणा टाकून मन सोहंकार कर; तेव्हां तूंपण हें अर्थात नाहींसें होईल. अभिमान हेंच मीपण; सोहं हेंच परब्रह्म. असें सांगतांच चांगदेव ह्मणाला, चौदाशें वर्षेपर्यंत द्रव्य भुमींत होतें तें आज दिसलें. प्रौढी मिरवावी ह्मणून वाघावर बसून सर्पाचा चाबुक करून तुमच्या भेटीस येत होतों; परंतु आतां माझा मोठेपणा गेला. तुह्मीं चौघें मला महेश्वरासमान आहां. अशा प्रकारचा आत्मज्ञानावर बराच संवाद झाल्यानंतर ज्ञानदेव म्हणाला, अभिमान गलित झाल्यानें अखंड सुख होतें. जनांत शेखी मिरविणें हें अज्ञानांचें काम होय. तुमची व माझी भेट, ही कापूर व अग्नि यांच्या भेटीसारिखी समजावी. तीं एके क्षणांत नाहींशीं होतात. तूं सिद्धीच्या अभिमानानें नाडला गेलास व दंभ माजविलास. तर हें सर्व सोडून द्यावें; म्हणजे सुख होऊन जन्ममरण चुकेल. योग साधणें फार कठीण कर्म होय. तशांत रिद्धिसिद्धि अनेक विघ्नें करितात; तेणेंकरून आत्मसुखास मुकतात. तर ह्यास युक्ति हीच कीं, इंद्रियें व मन आंवरल्यानें ब्रह्मज्ञानाची प्राप्ति. हें ब्रह्मज्ञान वादविवादानें होत नाहीं. आत्मप्रकाश झाल्यावर मीपणा जातोच. अशा प्रकारचा ज्ञानेश्वरानें चांगदेवास बराच उपदेश केला. तेव्हां तो त्याच्या पायां पडला व संतुष्ट झाला.

मग माध्यान्ह झाल्यामुळें सर्व मंडळी आळंदीस ज्ञानेश्वराच्या मठांत गेली. तेव्हां ज्ञानदेवानें सांगितल्यावरून मुक्ताबाई स्वयंपाक करण्यास गेली. चांगदेव लघुशंका करावयास परसांत गेला; तों तेथें मुक्ताबाई नग्न त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां त्यानें डोळे मिटले. व लागलाच तो मागें परतला. असें पाहून मुक्ताबाई ह्मणाली, मेल्या

निगुऱ्या, परततोस कशाला? कसचा संशय तुला आला? तुला विषयवासना आहे; आत्मज्ञानांत तूं दक्ष नाहींस; स्त्री व पुरुष हा भेद मनांत आणून मागें परतलास; पण माझ्या व तुझ्या शरिरांतील आत्मा एकच. ह्यास्तव शरिराकडे न पहातां आत्मरूप एकच आहे असें पहा. अनेक दागिने केले तरी तें सोनें एकच; अनेक मडकीं केलीं तरी तीं मातीच; अनेक वस्त्रें होतात तरीं तो कापूसच; यास्तव तूं आपल्यासारिखें सर्व जगत पहा. स्त्रीपुरुष हा देह निराळा, पण आत्मा एक. तो ओळखला मग मनास विषयविकार होत नाहीं. कुतरीं, मांजरें, गाया, वस्त्रें नेसतात काय? तर त्यांच्याच गमाणें मला कां मानिलें नाहींस? असें टोंचून बोलतांच तो तिच्या पायां पडून स्वस्थ जाऊन मठांत बसला.

दुसरी एक अशी गोष्ट घडली कीं, चांगदेवास एका शिष्यानें भूक लागली ह्मणून सांगितलें. तेव्हां त्यानें जोंधळे आणविले व त्याची पुरचुंडी करून ती त्या शिष्याच्या मस्तकावर ठेविली; तों त्याच्या लाह्या फुटूं लागल्या. तेव्हां, हा अझून सिद्धीची प्रौढी मिरवीत आहे, असें ज्ञानेश्वरानें निवृत्ति व सोपान ह्यांना सांगितलें. तेव्हां कांहीं चमत्कार दाखवून त्याचा गर्व परिहार केला पाहिजे, असें निवृत्तीनें सुचविलें. नंतर चांगदेवास आज पाहुणचार केला पाहिजे, असें ज्ञानेश्वरानें मुक्ताबाईस सांगितल्यावर तिनें सर्व साहित्य आणून मांडे केले. ज्ञानेश्वरानें चांगदेवास तयारी झाली, स्नानास उठा; ह्मणून सांगितलें. तेव्हां चुलींत विस्तव नव्हता ह्मणून त्यास आश्चर्य वाटलें. सर्व स्नानें करून पात्रांवर येऊन बसले. सोपानानें पंचाग्नि चेतविल्यावरोबर मुखांतून ज्वाला निघूं लागल्या. मग तिणें त्याच्या तापलेल्या पाठीवर मांडे केले होते ते भाजले. हें सर्व चांगदेव पहात होता. तो अगदीं ओशाळून गेला. व हे केवळ परब्रह्माचे पुतळेच होत; अशी त्याची खात्री झाली. मग नाना पदार्थ वाढिल्यावर, 'सर्वभूतीं भोक्ता श्रीहरि' असा संकल्प सोडला व सर्व जेवायास लागले. यथास्थित भोजन होऊन तृप्त झाले.व मुखशुद्धि करून स्वस्थ बसले; इतक्यांत मुक्ताबाईदेखील जेवून बाहेर आली.

मग चांगदेव त्या चौघांपुढें हात जोडून उभा राहिला; आणि पत्राचा अर्थ मला समजत नाहीं तो खुला करून सांगावा ह्मणून त्यानें विनंती केली. तेव्हां ज्ञानदेव ह्मणाला, पत्राचा अर्थ तुमच्या मनांत चांगला ठसण्यासाठीं त्यावर बळी द्यावयाकरितां एक शिष्य आमच्या हवालीं करा. तेव्हां चांगदेव ह्मणाला, आमच्याजवळ चौदाशें शिष्य आहेत; त्यांतून एक तुह्माला देऊं. तो कोणता, हें रात्रीस आम्हीं विचार करून सांगूं. असें गुरूनें सांगतांच, कोणावर पाळी येते कोण जाणे म्हणून सारे शिष्य चिंतेंत पडले. आज ह्याच्या तावडीस सांपडून अनायासें जीवावर मात्र संकट आणिलें असें जो तो बोलूं लागला.

रात्रीस कीर्त्तन झालें. त्यांतील सारांश असा कीं, योगमार्ग साधणें कठीण कर्म होय; परंतु नाम सर्वांना पावन करितें. हरिहरांचें नामस्मरण केल्यानें चारी मुक्ति पायां पडतात. जडमुढांचा उद्धार व्हावा म्हणून पुंडलिकानें वर मागितल्यावरून साक्षात् परब्रह्म विटेवर उभे आहेत. त्यांच्या दर्शनमात्रेंच सर्वांचा उद्धार होतो. अशा उपदेशाचें कीर्त्तन संपल्यावर सर्व मंडळी निजावयास गेली.

पत्राचा अर्थ समजून घ्यावयाकारितां एक बळी दिला पाहिजे, तर तुह्मीं सर्व विचार करून मला सांगा; अशी चांगदेवगुरूनें आपल्या शिष्यांपाशीं गोष्ट काढिली. तेव्हां आपणांस हा देह अर्पण केला आहे, ह्याची लागेल तशी व्यवस्था करावी; असें सर्वांनीं सांगितलें. पुढें स्वामीस झोंप लागल्यावर त्यांणीं आपसांत विचार केला कीं, स्वामीस पुष्कळ शिष्य मिळतील; परंतु आपण मात्र बायकोमुलांस अंतरून व्यर्थ जिवास मुकूं! अशा एकेकांनीं कल्पना मनांत आणून सर्व शिष्य मरणाच्या भयानें पळून गेले. चौदाशें शिष्यांतून एक देखील राहिला नाहीं. अशा युक्तीनें ज्ञानदेवानें त्याचे पाश तोडिले. चांगदेव जागा होऊन पहातो तों एकही शिष्य दिसत नाहीं. मग सर्व काम स्वतांच करूं लागला. प्रातःकाळीं ज्ञानदेव त्याच्या दर्शनास गेला. नमस्कार केल्यानंतर चांगदेवास ह्मणाला कीं, पत्रार्थ सांगण्यास आतां उत्तम मुहूर्त्त आहे; यास्तव कोणता शिष्य बळीदानाकरितां देतां तो द्यावा.

जिवावर गोष्ट येतांच शिष्य पळून गेले ह्मणून चांगदेवास वाईट वाटून पश्चात्ताप झाला. व सिद्धीच्या जोरावर आजपर्यंत व्यर्थ डौल मिरविला असें त्यास वाटूं लागलें. मग तो ज्ञानदेवास म्हणाला कीं, आतां माझा देह वळी देऊन कानांत अर्थ सांगावा. कां कीं, जिवाचें भय धरून माझे सारे शिष्य पळून गेले. मी एकटाच उरलों आहे. आतां तुम्हांस वाटेल तसें करा. मी तन, मन व सिद्धींचें धन यांसह तुम्हांस शरण आलों आहें. हें जर मी खोटें सांगत असलों तर तुमचें मन जाणत असेल. चांगदेव असें बोलतांच ज्ञानेश्वराच्या मनासारखें झालें. मग त्यानें हा वृत्तांत निवृत्तीस कळविला. तेव्हां हा सर्व तुझाच खेळ असें सांगून चांगदेवास आतां आपणच उपदेश करावा म्हणून सांगितलें. मग त्यानें चांगदेवास जवळ बसविलें. तेव्हां मुक्ताबाईनें आपल्या तीन्ही बंधूंच्या सांगण्यावरून त्यास उपदेश केला; तो असा :—मी कोण हें आपण ओळखावें; व रात्रंदिवस स्वरूपीं समरस व्हावें; वगैरे मुक्ताबाईनें उपदेश करितांच चांगदेवानें तिचे पाय धरिले. तिचा बोध त्याच्या मनांत पुरा ठसला. सर्व जग त्यास ब्रह्ममय दिसून द्वैतभाव विरून गेला. मग तो ज्ञानेश्वराच्या संगतीस एक महिना राहिला. रात्रौ कीर्त्तन ऐके. मग माझ्या पत्राचा अर्थ कळला कीं नाहीं, हें ज्ञानेश्वरानें चांगदेवास विचारिलें. तेव्हां तो त्याच्या पायां पडून ह्मणाला कीं, 'बुडाला' 'बुडाला' असें सारे म्हणतात; परंतु कोणी बुडालेल्याची दाद घेत नाहीं. परंतु ज्ञानदेव, मुक्ताबाई यांणीं चांगदेवास पार उतरून नेलें. असें ह्मणून त्यांच्या पायां पडला; त्या वेळीं सर्वांना समाधान वाटलें. मग मुक्ताबाई म्हणाली, आज चौदाशें वर्षें हें शरीर तुह्मीं जगविलें. तर आतां असें करा कीं, हा देह सोडून दुसरा जन्म घ्या. मग प्रेमानें विष्णूची पूजा अर्चा करा. श्रीपांडुरंगाच्या भक्तीवांचून सात्विकपणा कदापि यावयाचा नाहीं. सगुण मूर्त्तीची उपासना प्रीतीनें करावी. श्रीरामकृष्णादिकांचीं चरित्रें अति प्रेमानें कीर्तनांत गावीं. जगाचा उद्धार होण्यासाटीं कलियुगांत कीर्त्तनाहून वरिष्ट साधन नाहीं; तर आतां पंढरीस जाऊन विठोबाला ओ-

ळखा. असा तिनें त्यास बोध केला. त्या वेळीं तुमची आज्ञा मला प्रमाण आहे असें बोलून चौघांना साष्टांग नमस्कार घातला. त्यांची पूजा केली. व विठ्ठलनामाचा गजर करून त्यांची बरीच स्तुति केली. आणि वटेश्वरास जावयास आज्ञा मागितली; ती त्यांणीं त्यास आनंदानें दिली. मग त्यांच्या पायां पडून चांगदेव निघाला. मोठ्या आदरसत्कारानें चौघांनीं चांगदेवास बोळविलें. तीं रात्रंदिवस श्रीपांडुरंगमूर्त्ति ध्यानींमनीं पहात. कीर्त्तन चाललेंच असे. ती आळंदी पंढरी प्रमाणें होय. जेथें संत राहिले ते गांव साक्षात् वैकुंठ होत. तेथें यमाचें कांहीं चालत नाहीं.

---

# अध्याय ६ वा.

## चांगदेव.

मनुष्यजन्मास येऊन श्रीहरीचे गुण न गातां व न ऐकतां जे पुरुष केवळ संसारांत निमग्न झालेले असतात, ते पशुसमान होत. निद्रा, आहार, मैथुन हीं संपूर्ण प्राणीमात्रांस आहेतच. तरीं मनुष्यजन्मास आल्याचें कांहींतरीं सार्थक करावें. तीर्थयात्रा कराव्या; श्रीविष्णूची पूजा करावी; साधुसंतांचीं दर्शनें ध्यावीं; तहानेल्यास पाणी व भुकेलेल्यास अन्न द्यावें; परोपकार करावा; जिभेस नामस्मरणाची गोडी लावावी. असो. मागील अध्यायीं तूं दुसरा देह धरून श्रीपांडुरंगाची उपासना कर ह्मणून मुक्ताबाईनें चांगदेवास उपदेश केला. नंतर चांगदेव वटेश्वरीं येऊन शंकरास नमस्कार करून तेथून निघाला; तो तोरणमाळ गांवास गेला. तेथें साक्षात् विष्णूचा अवतार गोरक्षनाथ राहात असे, त्याची भेट घेतली. उभयतांनीं एकमेकांचा उत्तम आदरसत्कार केला. मग तुमची सप्रेम भक्ति पाहून श्रीशंकर प्रगटला व वाटीचा वटेश्वर झाला वगैरे गोरक्षनाथानें चांगदेवाची बहुत स्तुति केली; व कोणता हेतु धरून येणें झालें ह्मणून विचारिलें.

त्या समयीं त्याच्या पायांवर मस्तक ठेवून चांगदेव ह्मणाला कीं, मागें वटेश्वरीं सिद्धाईचा पूर्ण भर असतांना कोणी स्त्रीपुरुष

कामना मनांत धरून अन्नउदक सोडून अनुष्ठान करीत होतीं. त्यांचा निग्रह पाहून वटेश्वर (शंकर) प्रसन्न झाला; व 'ह्यांची मनकामना पूर्ण कर' असा त्यानें मला स्वप्नांत दृष्टांत दिला. मग मी त्यांस, अनुष्ठान करण्याचें कारण काय तें मला कळवावें; तुमचे मनोरथ पूर्ण करावे ह्मणून मला शंकरानें सांगितलें आहे; यास्तव आपण कोण, कोठें असतां, काय धंदा करितां, कोणती इच्छा मनांत आहे हें सर्व मला सांगावें ह्मणून मी त्यांस विचारलें. तेव्हां त्या ब्राह्मणानें उत्तर दिलें कीं, तुमच्यासारखा पुत्र व्हावा कीं जो कुळाचा उद्धार करील; इतकाच माझा हेतु आहे. असें त्याणें सांगतांच मी त्यास वर दिला कीं, साक्षात् विष्णूचा अवतार गोरक्षनाथ जगदुद्धार करावयाकरितां पृथ्वीवर फिरत आहे; तो बारा वर्षांत एके दिवशीं तुमच्या घरीं भिक्षेस येईल. तेव्हां पुंगी वाजवितांच त्या नादांत मी तेथें लहान बालक होऊन प्रगट होईन. तोंपर्यंत फारच सावधपणानें असावें. कोणा अतिथीस विन्मुख दवडूं नये. असा आमचा वर घेऊन तीं उभयतां घरीं गेलीं. तेव्हांपासून आह्मांस तो ध्यास लागला आहे. त्या गोष्टीस साडेअकरा वर्षें लोटलीं व आतां सहा महिन्यांचा अवकाश उरला आहे. ह्मणून ही गोष्ट स्वामीच्या कानावर घालून ठेविली आहे. यास्तव श्रावण महिन्यांत नागपंचमीच्या दिवशीं तुह्मीं तेथें जावें व पुंगी वाजवावी; ह्मणजे मी प्रगट होईन. इतकीच प्रार्थना आहे. मग हें भाषण ऐकून घेऊन तेथें जाण्याचें गोरक्षनाथानें कबूल केलें. मग त्याचा निरोप घेऊन चांगदेव परत येऊन सहा महिने वटेश्वरास राहिला. पुढें त्या मुदतींत चांगदेव गुप्त झाला.

नगरापासून जवळच नारायणडोह ह्मणून एक क्षेत्र आहे. तेथें मुधोपंत या नांवाचा एक यजुर्वेदी ब्राह्मण रहात असे. त्या गांवचें लिहिणें त्याच्याकडे होतें. तो मोठा दयाळू असून उदार असे. तो आल्यागेल्यास अन्न घालीत असे. त्याच्या बायकोचें नांव रुक्मीण. ही आपल्या पतीच्या मर्जीनुरूप वागत असे. त्या उभयतांना रात्रंदिवस चांगदेव दिसत असे. 'मी तुमचा पुत्र होईन' असा त्यांना त्याणें वर दिला होता, त्यावर त्यांचा पूर्ण भरंवसा असे. ह्मणून ती मुदत

भरत आली, तेव्हां तो कधीं भिक्षेस येईल ह्मणून तीं त्याची वाट पहात होतीं; इतक्यांत गोरक्षनाथ तेथें भिक्षेस गेले. त्यांची सुवर्णासारखी सतेज कांति पाहून रुक्मीण विस्मित झाली. तिनें लागलीच भिक्षा आणून घातली; व गोरक्षनाथास शुद्ध अंतःकरणानें नमस्कार केला. तेव्हां त्यानें 'तुझा मनोरथ पूर्ण होवो' असा आशीर्वाद दिला व पुंगी वाजवूं लागले. त्या नादासरिसा मुलगा अंगण्यांत प्रगट झाला. व गोरक्षनाथ अदृश्य झाले.

त्या समयीं मुधोपंत बाहेर गेला होता; पण घरीं येतांच त्यास हा अघटित वृत्तांत समजला. मग मागची आठवण होऊन तो ह्मणाला, वटेश्वर आपणांस प्रसन्न झाला. 'मी पुत्र होईन' असा चांगदेवानें आपणांस वर दिला होता; त्याप्रमाणें आज योग घडून आला आहे. त्या वेळीं रुक्मिणीस अति हर्ष झाला. ही गोष्ट गांवभर झाली. घरोघर आनंदोत्सव चालला; मंगलवाद्यें वाजूं लागलीं व सुंठवडे वांटले. तेव्हां सर्वांस नवल वाटलें. ईश्वराची करणी विलक्षण होय. रुक्मीण मुलास उचलून स्तनाशीं लावून पाजूं लागली; तों दूध उत्पन्न झालें. मुलाचें सुंदर रूप पाहून पुन्हा मरुद्गणानें अवतार घेतला असें लोक बोलूं लागले. तेव्हां मुधोपंतानें दानधर्म बराच केला. बारावे दिवशीं बारसें करून मुलास पाळण्यांत घातलें; तेव्हां त्याचें नांव 'चांगदेव' असें ठेविलें. 'चांगावटेश्वरीं' अनुष्टान केल्यानें पुत्र प्राप्त झाला ह्मणून तेंच नांव ठेविलें. पुढें पांचवे वर्षीं पुष्कळ दानधर्म करून त्याची मुंज केली. त्यास पढविण्यासाठीं गुरूस श्रम घ्यावे लागले नाहींत. तो थोडक्याच काळांत वेदशास्त्रांत निपुण झाला. मोठमोठे विद्वान ब्राह्मण त्याच्या भेटीस येऊं लागले. व आमची भ्रांति फेडावयास ब्रह्मदेव अवतरला आहे असें लोक बोलूं लागले. कित्येक, व्यासानें अवतार घेतला असें ह्मणूं लागले. अवतारमूर्त्ति जाणून कोणीं वस्त्रें दिलीं; कोणीं भूषणें दिलीं; कोणीं मोहरा, होन पुढें ठेविले.

मुधोपंतानें सेवा करून वटेश्वरास प्रसन्न करून घेतलें. त्याचें ऋण तो पुत्रपणानें फेडीत आहे. तो चांगला संपत्तीवान झाला. चांगदेवाची अमर्याद बुद्धि पाहून लोकांनीं त्याला मुली देण्याचें मनांत आणिलें.

शेवटीं एका मुलीशीं त्याचें लग्न नक्की ठरून यथाविधी लग्न होऊन उत्तम सोहळा चार दिवस झाला. त्या लग्नांत, आंदण वरदक्षिणा आदि-करून वेळोवेळीं अमित द्रव्य खर्च झालें.

चांगदेवाची दानधर्माकडे निष्ठा असे. तो अतितांचा चांगला आदरसत्कार करी. दुसरीं मुलें आईबापांची सेवा करावयाची सोडून बायकोंच्या सांगण्यावरून त्यांच्याशीं भांडण करून वेगळीं राहतात; परंतु चांगदेव तशांतला नव्हता. त्याणें वडिलांची सेवा-चाकरी मनापासून केली. जेव्हां पुंडलिकानें बापाची सेवा केली हें नारदानें द्वारकेस जाऊन श्रीकृष्णास कळविलें, व त्याच्या दर्शनानें तुला विश्रांति मिळेल म्हणून सांगितलें, तेव्हां श्रीहरि पुंडलिकाकडे येऊन पाय जोडून निरंतर विटेवर उभे राहिले. भगवत्प्राप्तीची इच्छा करणारांनीं पितृभक्ति करावी. स्नानसंध्या, यज्ञहवन, जप-तप, तीर्थयात्रा, वेदशास्त्रें, पुराणश्रवण हीं सर्व पितृभक्तिवांचून व्यर्थ; हे सर्व विचार मनांत आणून चांगदेवानें बापाची सेवा चोवीस वर्षें उत्तम केली. पुढें मुधोपंतानें देह ठेविला व वैकुंठास गेला; तेव्हां रुक्मीण सती गेली.

चांगदेवानें उभयतांची उत्तरक्रिया केली व तो महायात्रेस गेला. पुष्कळ पैसा खर्च करून गयावर्जन केलें. व परत नारायणडोहास आल्यावर वडिलांचें सर्व द्रव्य गरिबांस वांटून टाकिलें. मग गांवचें वतन दाईजांस दिलें; व विठोबाला भेटण्याची इच्छा धरून उल्हासानें भजन, कीर्तन करीत पंढरपुरास गेला. तेथें सर्व जातीचे लोक जात कुळ न पहातां परस्पर एकमेकांस निराभिमानानें दंडवत घालीत होते. हें पाहून चांगदेवास नवल वाटलें व तोही मोठेपणा टाकून लोटांगण घालीत चालला. मग भीमेवर स्नान करून पुंडलिकाचें दर्शन घेतलें. त्याची षोडशोपचारें पूजा केली. मग प्रदक्षिणा करून महाद्वारांत गेला. व दंडवत घालून पांडुरंगाचें दर्शन घेतलें. त्या समयीं डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहूं लागले; व जन्म घेतल्याचें आज सार्थक झालें असें त्यास वाटलें. त्यानें प्रेमानें पांडुरंगाच्या गळ्यास मिठी मारिली; आणि [illegible]

तुझी व्यापकता आहे. भक्तांना भवसमुद्रापासून ताराववयास तूं अवतार घेतलास. तुझ्या दर्शनानें माया निरसन होते. तूं भक्तांच्या हृदयमंदिरांत राहून त्यांच्याशीं गोष्टी बोलत बसतोस. त्या तुला हा चांगा शरण आला आहे; तर कृपा करून त्याची प्रपंचमाया निरसन कर. ह्याप्रमाणें त्याणें पांडुरंगाचें बहुत स्तवन केलें. मग सत्यभामा, रुक्मिणी यांचें दर्शन घेतलें. तेथचा कीर्त्तनाचा गजर, पांडुरंगाची स्तुति, भजन वगैरे थाट पाहून चांगदेवास परमानंद झाला.

यात्रा उलगल्यानंतर भिवरेंत तीर्थमूर्त्ति आहे, हें कोणास ठाऊक नव्हतें; तरीं 'पांडुरंगमहात्म्यां'त श्रीव्यासानें वर्णन केली आहे. तिचें दर्शन व्हावें ह्मणून भीमातीरीं चांगदेवानें तीन दिवस अन्न, फल, उदक घेतल्यावांचून एकाग्रचित्तानें अनुष्ठान केलें. मग पांडुरंगानें पुढें उभें राहून ह्मटलें कीं, देहावर येऊन मला अवलोकन कर. अर्ध रात्रीस कोण बोलतो आहे ह्मणून चांगदेव चकित होऊन डोळे उघडून पहातो तों, कोटि सूर्यासारखी तेजस्वी, सुकुमार, सुंदर; ज्या ध्यानाची ब्रम्हादि देव इच्छा करितात; कवि वर्णन करितात; अशी श्रीविष्णूची मूर्त्ति पाहून त्याचें चित्त वेधून गेलें. त्यानें साष्टांग नमस्कार घातला व कृपा करून आतां मला ह्या भवसागरांतून मुक्त करावें अशी स्तुति करून चरणावर मस्तक ठेविलें. तेव्हां रुक्मिणीनाथ प्रसन्न झाला. व तूं जें मागशील तें देतों असें कबूल केलें. हें ऐकून त्यास परमानंद झाला. त्यानें पंढरिनाथापाशीं मागणें मागितलें कीं, जेणेंकरून माझ्या जिवास विश्रांति होईल असा मला अनुग्रह करावा; व तो कानीं पडतांच भक्ति, मुक्ति प्राप्त व्हाव्या. असा वर मागतांच पांडुरंगानें त्याचा हात धरून भीमेच्या जळांत प्रवेश केला.

जळांत प्रवेश केल्यानंतर चांगदेवानें असा अद्भुत चमत्कार पाहिला कीं, त्या ठिकाणीं सुवर्णाचा एक भव्य मंडप होता. त्यास रत्नांचीं कोंदणें बसविलीं होतीं. तो मांडव मनुष्यांच्या नजरेस पडत नसे; परंतु चांगदेव प्रेमळ भक्त ह्यामुळें त्यास दिसला. तेथें दिव्य देह धारण करून पुंडलीक आहे; रुक्मिणीकांत त्याचपापुढें तिष्ठत उभा आहे; तेथें शुद्ध वैकुंठीची रचना आहे; चांगदेव भाग्यवान ह्मणून तें स्थळ

त्याच्या पहाण्यांत आलें. तेथें जगज्जिवनानें त्यास षडाक्षरी मंत्राचा उपदेश केला. व 'तुझी वृत्ति निरंतर आनंदमय राहील' असा वर दिला. नंतर त्याजवर मायाजाळ घातलें. पुढें चांगदेव डोळे उघडून पहातो तों, त्यास सर्व पूर्ववत् दिसूं लागलें; त्या वेळीं त्यास मोठें आश्चर्य वाटलें. व रुक्मिणीकांतानें कृपा करून साक्षात् दर्शन देऊन षडाक्षरी मंत्र सांगितल्यामुळें त्यास अनुपम आनंद झाला. मग क्षेत्रांत जाऊन पांडुरंगाची षोडशोपचारांनीं पूजा केली. पुढें पांडुरंगास व पुंडलिकास विचारून आपल्या गांवीं गेला. तेव्हां गांवकऱ्यांनीं त्याचा मोठा सन्मान राखला. चांगदेवाच्या समागमानें पुष्कळ लोक तरले. ज्यास ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची असेल त्यानें सत्संगत धरावी.

---

## अध्याय ७ वा.

### चांगदेव. (चांगाकेशवदास.)

चांगदेव सहकुटुंब पंढरपुराहून नारायणडोहास गेल्यानंतर श्रवण मनन, हरिकीर्तन नित्य करीत असे. बहुतेक गांवकरी ऐकावयास येत असत. साखरेवर मुंग्या तुटून पडतात, किंवा दात्यापाशीं हेतु धरून जसे याचक जातात, त्याच प्रमाणें भाविक, प्रेमळ असे जन नेहमीं चांगदेवाकडे येत असत. असें कितीएक दिवस चाललें. पुढें एके दिवशीं असें वर्तमान घडून आलें कीं, चांगदेव मानसपूजा करीत असतां पंढरीनाथाची स्वारी प्राप्त झाली. साक्षात् परब्रह्म सगुणरूपानें अवचित पुढें पहातांच चांगदेवानें देवाची सर्वोपचारांनीं पूजा केली. मग, आतां तूं गोदातीरीं जाऊन रहा; असें पांडुरंगानें चांगदेवास सांगितलें. तेव्हां मी गोदातीरीं जाऊन नित्य कोणाची पूजा करूं असें त्यानें विचारिलें. असें चांगदेवाचें भाषण ऐकून विठोबानें सांगितलें कीं, तुझी भक्ति पाहून मी प्रसन्न झालों. मी तुला गंडकी शिळेची केशवमूर्ति देतों, असें बोलतांच केशवमूर्ति प्रगट झाली. मग पांडुरंगानें सांगितलें कीं, ह्या मूर्तींत माझा पूर्ण संचार आहे; ह्यास्तव तूं गोदातीरीं राहून हिची पूजा करीत जा. असें सांगून विठोबा

अंतर्धान पावले. नंतर, आह्मी आतां एथून गोदातीरीं जाऊन वास्तव्य करणार, असें चांगदेवानें गांवकऱ्यांस सांगितलें. हें ऐकतांच साधूचा वियोग होणार ह्मणून सर्वांना वाईट वाटलें; व आह्मां निराधार पडणार असें सर्व बोलूं लागले. तेव्हां सर्वांचीं तोंडें उतरून गेलेलीं पाहून त्यांना चांगदेवानें अभय दिलें कीं, तुमची मनांत जी इच्छा असेल ती पूर्ण होईल व लागलाच आपल्या हातानें तेथें दगड स्थापिला. तो नवसास पावून लोकांचे मनोरथ पूर्ण होऊं लागले. हा चमत्कार अद्याप तेथें आहे.

अशा रीतीनें गांवकऱ्यांचें समाधान करून चांगदेव सकुटुंब निघाला, त्या वेळीं सर्व ल्हान थोर मंडळी त्यास पोंचवावयास गेली. त्यांच्या डोळ्यांतून वियोगामुळें टपटप आंसवें गळूं लागलीं. असो. पुढें केशवमूर्त्ति घेऊन चांगदेव गोदातीरीं आला. तिचें ( गोदेचें ) दर्शन होतांच तिला साष्टांग नमस्कार केला; व स्नान करून माझे भवपाश तोडून मला सायुज्यमुक्ति दे ; अशी तिची प्रार्थना केली. श्रीविष्णूच्या चरणापासून तुझा उगम झाला ह्मणून शंकरानें मस्तकावर धरिली. मग जगाचा उद्धार व्हावा ह्मणून महामुनि गौतम ह्याणें शंकराला प्रसन्न करून मृत्युलोकीं आणिली ; तुझ्या उदकानें स्नान केलें असतां प्राणी पातकापासून तात्काल मुक्त होतो. असा तुझा महिमा आहे; तर मला उगमाच्या स्थळीं ठाव दे. अशा प्रकारची गोदेची स्तुति करून सोमतीर्थावर स्नान झाल्यावर रामेश्वराचें दर्शन घेतलें.

श्रीपांडुरंगाची आज्ञा शिरसावंद्य करून त्यानें गोदातीरीं मठ बांधून तेथें केशवमूर्त्तीची समारंभानें स्थापना केली. मग वस्त्रालंकार लेववून पूजा केली. नैवद्य दाखविल्यावर प्रदक्षिणा करून प्रार्थना केली. मूर्त्तीची स्थापना केली त्या सुदिवशीं ब्राह्मणभोजनाचा समारंभ फारच उत्तम झाला. विडे दक्षिणा देऊन ब्राह्मणांस संतुष्ट केलें. येणेंकरून चांगदेवाची कीर्त्ति सर्वत्र पसरली. मनकामना पूर्ण होतात अशी बातमी पसरतांच देशोदेशचे लोक दर्शनास येऊं लागले. पूर्वी शंकराची आराधना केली ; तेव्हां चांगावटेश्वर असें नांव पडलें होतें.

आतां गोदातीरीं केशवमूर्ती स्थापिल्यानंतर चांगाकेशवदास असें त्याचें नांव पडलें. श्रीपांडुरंगानें प्रसन्न होऊन वरदान दिल्यानें तो सांगेल त्याप्रमाणें होऊं लागलें. तेव्हां पुनः वटेश्वर प्रगटला असें लोक बोलूं लागले. लोकांचे मनोरथ पूर्ण होऊं लागल्यानें त्याची लोकांत फारच प्रतिष्ठा वाढली.

चांगाकेशवदासाची कीर्त्ति देवनगरच्या रामराजाच्या कानावर गेली, तेव्हां तो प्रेमानें याच्या दर्शनास आला. दर्शन घेतल्यावर परोपरीनें स्तुति केली. कांहीं तरी चमत्कार पहावा असें राजाच्या मनांत आहे असें जाणून चांगाकेशवदास ह्मणाला कीं, आपलें संपूर्ण सैन्य घेऊन यावें. अशी आज्ञा होतांच राजानें प्रधानास पत्र लिहून पाठविलें व तो सर्व सैन्य घेऊन आला. मग चमत्कार दाखविण्यासाठीं चांगदेवानें सर्वांना भोजनास बोलाविलें. शेंकडो लोकांच्या एकदम पंक्ती बसल्या; परंतु चमत्कार हा कीं, स्वयंपाक केल्यावांचून षड्रस अन्नें पात्रावर दिसूं लागलीं. जो पदार्थ ज्यास लागे तो विपुल. कोणाला कोणत्याही पदार्थाची वाण झाली नाहीं; असें पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. मग करशुद्धि झाल्यानंतर विडे दिले. तेव्हां रामराजा हळूच बोलला, आज स्वामींचें दर्शन झाल्यामुळें मी कृतार्थ झालों. जगदुद्धार करावा ह्मणून आपण हा अवतार घेतला आहे. देव व भक्त यांमध्यें भिन्नता नाहीं, असा बहुतांनीं अनुभव घेतला आहे. शेवटीं राजा त्यास ह्मणाला कीं, आपण उपवनांत येऊन रहावें; तेथून गोदावरी जवळ आहे. ही राजाची प्रार्थना मान्य करून तो कुटुंबासहवर्त्तमान बागांत जाऊन राहिला. नंतर राजा आपल्या नगरास गेला.

पुण्यस्तंभ किंवा पुणतांबें गांवांत चांगाकेशवदास बारा वर्षें राहिला. तो आषाढीकार्त्तिकीस नेमानें पंढरपुरास जाई. मी आतां समाधिस्थ होतों, असें एके दिवशीं त्यानें संपूर्ण संतमंडळीस कळाविलें. त्या समयीं त्यांणीं पुजेची तयारी केली. ब्राह्मणभोजन चालू झालें. व समाधिस्थ व्हावयास सुमुहूर्त्त पाहिला. कथा, कीर्त्तन चाललेंच होतें. दिव्य आसनावर चांगदेव बसला होता. त्याची नित्य पूजा होई. लोक लांबलांबून ही बातमी ऐकल्यावरून दर्शनास येऊं लागले.

अशा रीतीनें पुणतांब्यामध्यें चांगाकेशवदासाच्या समाधिसुखाचा सोहळा मोठ्या धामधुमीनें चालत असतां, असें एक अघटित चरित्र घडून आलें कीं, कल्याणकलबुर्गा ह्मणून एक गांव आहे, तेथें शंकर या नांवाचा एक सधन ब्राह्मण रहात असे. तो पुत्रसंतान होण्यापूर्वींच मरण पावला. घरांत त्याची वृद्ध मातोश्री व अल्पवयस्क पत्नी हीं मागें उरलीं होतीं. त्यांनीं धर्मपुत्राकडून त्याचें उत्तरकार्य करविलें. मग अस्थि घेऊन दुःखानें गांजलेल्या दोघीजणी महायात्रेस जावयास निघाल्या. त्या फिरत फिरत पुण्यस्तंभास आल्या. तेथें तीन दिवस राहिल्या. त्यांनीं चांगदेवाच्या दर्शनास जावयाचें मनांत आणिलें. मग सासू निघाली तेव्हां मीही दर्शनास येतें म्हणून सुनेनें सासूस म्हटलें. तें ऐकून ती म्हणाली, अजून तुझे केंस काढिले नाहींत; म्हणून तो महापुरुष कदाचित् तुजवर रागें भरेल. यास्तव तूं येऊं नको; बिऱ्हाडींच ऐस. परंतु तें न ऐकतां ती सासूबरोबर गेली. त्या दोघी दर्शन घेऊन पायां पडल्या, तेव्हां 'पुत्रवती भव' असा योगेश्वरानें तिच्या सुनेस आशीर्वाद दिला.

'पुत्रवती भव' अशीं अक्षरें निघतांच सर्वांना नवल वाटलें. व खडकावर पाऊस पडला, किंवा अग्निकुंडांत बीं पेरिलें तद्वत हें झालें; असें लोक बोलूं लागले. ती गुणगुण चांगदेवाच्या कानावर गेली. तेव्हां त्यानें तिच्या सासूला (सोनाईला) हकीगत विचारिल्यावर तिणें सांगितलें कीं, आह्मीं यजुर्वेदी ब्राह्मणांच्या स्त्रिया आहोंत व कल्याण कलबुर्ग्यास होतों. तेथें माझा मुलगा वारला. मग आह्मीं जोगाईचें अंबें ह्मणून गांव आहे तेथें येऊन राहिलों, तरीं चैन पडेना; ह्मणून महायात्रेस जात आहों. बरोबर पुत्राच्या अस्थि घेतल्या आहेत. गयावर्जन करावयाचा हेतु आहे; तों मार्गांत हें तीर्थ लागलें. येथें तीन दिवस राहून तीर्थविधि करून जावयाचें; तों आपलें दर्शन घडलें. तूं माझ्याबरोबर येऊं नको, असें मीं या माझ्या सुनेस सांगितलें; परंतु पोरच ती. अझून अक्कल का आहे तिला कांहीं? आली माझ्या बरोबर व नमस्कार करतांच आपण तिला आशीर्वाद दिला. पण विधवेला पुत्र कसा होईल ह्मणून लोक कुजबुजत आहेत. अशी हकिगत सांगून रडूं लागली. त्यानें सांगितलें कीं, अशी जरी हकीगत आहे तरीं

माझें वचन खोटें व्हावयाचें नाहीं. मग त्याणें पांडुरंगाचें स्तवन केलें, आणि तिच्याकडून अस्थि आणविल्या आणि सर्वांस सांगितलें कीं, इला वर दिला त्यापेक्षां पुत्र दिल्यावांचून मला समाधिस्थ होतां येत नाहीं. यास्तव तुह्मां सर्वांच्या साक्षीनिशीं मी इला वरद-पुत्र देतों. असें बोलून संजीवनी मंत्र ह्मणून अस्थि उदकांत बुडविल्या; व तें उदक त्या विधवेस पाजिलें. सत्पुरुषांची अघटित करणी. तिला तात्काळ गर्भ राहिला. तिजवर दया करण्यासाठीं पांडुरंगाची प्रार्थना केली; तेंव्हां तिच्या तोंडावर टवटवी आली व सौभाग्य तेज दिसूं लागलें. हें पाहून सर्व मंडळी घरोघर गेली. "

चांगदेवानें वर्णसंकर मांडिला असें मागें लोक बोलूं लागले, व तिला विठ्ठलसवाशीण ह्मणूं लागले. हा टाणेटोणे जाणतो; सावरी मंत्र ह्यास येतो; हा जातींत कसा घेतां येईल? अशी मागें त्याची निंदा करीत; परंतु तोंडावर कोणाच्यानें एकशब्दही बोलवेना. लोक निंदा करतात हें चांगदेवास कळलें; परंतु ह्या गोष्टींत त्यानें मन घातलें नाहीं. हे लोक विधवेच्या मुलाची दुर्दशा करतील, ह्मणून त्याची योग्य व्यवस्था लागल्यावर समाधिस्थ होण्याचा त्याणें नेम केला. मग नऊ महिने पुरे होतांच ती विधवा प्रसूत होऊन पुत्र झाला. पांडुरंगाचा वरदपुत्र ह्मणून योगेश्वरानें मोठा उत्साह केला. बाराव्या दिवशीं बारसें करून मुलाचें नांव ' विठ्ठल ' असें ठेविलें. मुलगा पांच वर्षांचा झाल्यावर त्याचा व्रतबंध करावयाचा बेत चांगदेवानें केला. विधवेच्या पोराचा समर्थांनीं अंगिकार केला खरा, पण ब्राह्मणांच्या ही गोष्ट मनास येईना; ह्मणून पंढरपुरास जाऊन श्रीपांडुरंगाच्या कानावर ही गोष्ट घालावयाचें मनांत आणून सहकुटुंब सहपरिवार चांगदेव पंढरीस गेला. आणि पांडुरंगाचें दर्शन घेऊन आलिंगन दिलें. मग पांडुरंगानें कांहीं नवल वर्तमान आहे कीं काय ह्मणून विचारिलें. तेंव्हां चांगदेवानें सांगितलें कीं, देवा, तुझा भरंवसा धरून तुझ्याच कृपेच्या जोरावर तूं पुत्र पहाशील; असा ह्या विधवेस मीं वर दिला. त्या प्रमाणें तिला वरदपुत्र झाला आहे तो हा मी आपल्या पायांवर घालीत आहें. ह्यावर कृपा असूं द्यावी.

ह्या वेळीं श्रीपांडुरंगानें सांगितलें कीं, मी तुझें वचन सिद्धीस नेईन. भक्तांचें वचन खरें करावयासाठीं मला अवतार घ्यावा लागतो. प्रल्हादासाठीं खांबांतून प्रगट झालों; बळीकडे द्वारपाळ राहिलों; जमदग्निकरितां आई ठार मारिली; रामावतारांत रावण मारून लंका बिभीषणास दिली; कृष्णावतारांत नंदाच्या गाई राखिल्या; पुंडलिकासाठीं पाय जोडून विटेवर उभा राहिलों; औंवढ्यानागनाथास नामदेवाकरितां देऊळ फिरविलें; ज्ञानदेवाकरितां भिंत चालविली; तर ह्या प्रमाणेंच मी वरदपुत्राचे लळे पुरवीन. हें ऐकून चांगाकेशवदासास संतोष झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं चांगदेवानें ब्राह्मणांस बोलावून त्यांस त्या मुलाची मुळापासून हकिगत सांगून त्याची मुंज करण्याचा हेतु दर्शविला. तेव्हां ब्राह्मणांनीं ही गोष्ट नाकबूल केली. त्यांणीं त्यास स्पष्ट सांगितलें कीं, विधवेची संतति जातींत घेतां येणार नाहीं व आह्मी त्याची मुंज लावणार नाहीं.

रुक्मिणीकांत आपलें संकट निवारण करील, तूं स्वस्थ रहा; असा चांगदेव त्या मुलाच्या आईस धीर देई. तो तिला दुसरें असें ह्मणाला कीं, तूं आतां शंभर पानांचा स्वयंपाक कर; श्रीपांडुरंगाची स्वारी भोजनास यावयाची आहे; असें तिला सांगून देवळांत गेल्यावर पांडुरंगास ह्मणाला कीं, तूं दीनांचा कैवारी आहेस; तर आज भोजनास यावें व ह्या मुलास संकटांतून सोडवावें; वगैरे त्याणें सांगितलें. तें विठोबानें मान्य केलें.

इकडे स्वयंपाक झाल्यावर विधवेनें ब्राह्मणांस बोलाविलें. तेव्हां ते ह्मणाले कीं, तुला तर जातीबाहेर ठेविलें आहे; कशाला इतकें अन्न शिजविलेंस? नवरा मेल्यावर तुला पुष्काळ वर्षांनीं मुलगा झाला आणि तो तूं ज्याला त्याला दाखवितेस; तुला लाज कशी वाटत नाहीं? अशीं भाषणें ऐकून ती खालीं मान घालून उगीच राहिली; इतक्यांत चांगदेव पांडुरंगास भोजनास घेऊन आला.

इकडे देवळांत मूर्त्ति नाहींशी पाहून गडबड झाली. लोकांच्या मनांत नानाप्रकारचे तर्क येऊं लागले. चांगाकेशवदासाकडे गेलीं

असेल असा कित्येकांना संशय आला. मग सर्व लोक त्याकडे गेले; परंतु त्यांच्या दृष्टीस पंढरीनाथ पडेना. तेव्हां सर्व चिंतेंत पडले. मग चांगदेवाचा त्यांना संशय येऊन त्यास विचारिलें असतां त्यानें सांगितलें कीं, तुम्हीं विधवेस वाळींत घातलें. विठोबा जेवावयास आला आहे. परंतु हें सांगणें त्यांना पंढरीनाथ तेथें दिसत नसल्यामुळें खरें वाटेना. ते ह्मणाले, आम्हां सर्वांस जर हें अन्न पुरलें तर तुमचें हें ह्मणणें आम्हीं कबूल करूं; व विधवेच्या मुलाचा व्रतबंध करूं. मग दोन हजारांवर ब्राम्हण, शिवाय पुष्कळ इतर लोक भोजनास बसले; परंतु पदार्थांची खूट पडली नाहीं. माता व पुत्र वाढीत होतीं. त्या वेळीं प्रसाद घेण्याकरितां सारें पंढरपूर लोटलें. जो पदार्थ ज्यास पाहिजे तो पात्रावर तयार. सूर्यानें दिवटी धरल्यावर अंधार कोठचा? चांगदेवाच्या समाराधनेमध्यें प्रत्यक्ष पंढरीनायक आल्यामुळें महासिद्धि पुरवठा करूं लागल्या. असा चमत्कार पाहून सर्वांनीं चांगाकेशवदासाची वाखणणी केली; व ह्यावर श्रीपांडुरंगाची पूर्ण कृपा आहे असें सर्व म्हणूं लागले. मग ब्राम्हणांनीं त्या मुलावर मंत्राक्षता टाकिल्या. पुढें विडा दक्षिणा घेऊन मंडळी देवळांत जाऊन पाहूं लागली तों, सिंहासनावर पांडुरंगाची मूर्त्ति पूर्ववत जशीच्या तशी दिसली. तेव्हां विधवेच्या मुलाची व चांगदेवाची भक्ति वाखाणून सर्वजण देवाच्या पायां पडले.

दुसरे दिवशीं ब्राह्मणांनीं चांगदेवाकडे जाऊन व्रतबंध करण्याचें कबूल केलें. मग सुमुहूर्त्तावर मोठ्या समारंभानें मनस्वी द्रव्य खर्चून त्याची मूंज केली. मग चांगदेव विठोबाचा निरोप घेऊन कल्याण कलबुर्ग्यास त्यांच्या घरीं गेला. पुढें, आपल्या वरदपुत्रास कन्या द्यावी असा माझा हेतु आहे, असें चांगदेवास एका थोर गृहस्थानें सुचविलें. त्या त्याच्या ह्मणण्यास त्यानें रुकार दिला. मग दोहींकडचा खर्च करून मोठ्या थाटानें आपल्या मुलीचें लग्न केलें. जांवयास वरीच देणगी दिली.

पुढें चांगाकेशवदासानें आपला द्वारकेस जाण्याचा बेत कळविला; तेव्हां सर्व हळहळले. विठोबाच्या आईनें त्यास त्याच्या पायांवर घालून वरदान मागून घेतलें कीं, ह्याच्या वंशजांनीं तूंच कुळदैवत असें

मानून पांडुरंगाची भक्ति करावी. जो तसें करणार नाहीं तो दरिद्री होईल. तेव्हां चांगाकेशवदास 'तथास्तु' ह्मणाला. त्याचे वंशज कार्त्तिक महिन्यांत पंढरपुरास येऊन ब्राह्मणांस भात वाढण्याचें वाडवडिलांचें व्रत अद्यापि चालवीत आहेत.

---

# अध्याय ८ वा.

## चांगदेव (चांगाकेशवदास) व यादवपंत.

वरदपुत्र विठोबा याचें लग्न करून कल्याणकलबुर्ग्याहून चांगाकेशवदास निघाल्यावर द्वारकेस जावयाचें त्याच्या मनांत भरलें. मग त्याच्या बरोबर पुष्कळ यात्रा निघाली. त्या बरोबर धारूरचा यादवंपंत ह्मणून एक देशपांड्या ब्राह्मणही निघाला. त्या समयीं त्याची बायको घरीं न राहतां त्याच्या मागोमाग निघाली. ती अल्पवयस्क असून प्रथमची गरोदर होती. तिला पुष्कळांनीं युक्तिप्रयुक्तीनें समजून सांगितलें; तरीं कोणाचें न ऐकतां ती निघालीच. तेव्हां कितीएक ह्मणूं लागले कीं, हिचा नवरा पडला वेडापिसा; तशांत ही गरोदर द्वारकेस जात आहे हें नीट नाहीं. अशा विचारानें तिचे आप्त समजूत करून तिला परतविण्याचा प्रयत्न करूं लागले; परंतु व्यर्थ. तिणें त्यांस सांगितलें कीं, माझी काळजी ईश्वरास आहे. माझा नवरा पडला देवभोळा. जर मी त्यास सोडून राहिलें, व त्याणें तिकडे संन्यास घेतला तर माझी गत कशी होईल? मग तरीं माझ्या संसाराची मानीच ना? वगैरे तिणें सांगतांच त्यांणीं आपला दुराग्रह सोडला.

यादवराव चांगदेवाच्या मंडळींत जाऊन मिळाला. बायकोच्यानें त्याच्याबरोबर जलदीनें चालवेना ह्मणून ती मागून हळूहळू जात होती. कांहीं यात्रेकरी लोक मागून हळू जात होते त्यांच्या सोबतीनें ती चालूं लागली. सायंकाळीं ज्या ठिकाणीं यात्रा उतरली होती, तेथें ती प्रहर रात्रीस जाऊन पोंचली. तेव्हां यादवराव तिला ह्मणाला, तूं कां आलीस? परत घरीं जा; मला तुझा त्रास नको. हें ऐकून ती रडूं लागली. यात्रेकऱ्यांनीं तिला फूस दिली कीं, तूं ह्याची

संगत सोडूं नको. असो. यादवराव चांगदेवास शरण जाऊन त्याचा उपदेश घेऊन समाधान पावला. व प्रपंचमाया मिथ्या आहे अशी त्याची खात्री झाली. तो अगदीं विरक्त झाला. त्यास ध्यानीं, मनीं, स्वप्नीं सद्गुरु दिसूं लागला.

यादवरावाची विदेहस्थिति झाल्यानें त्याणें आपल्या स्त्रिचा शोध केला नाहीं. ती द्वारकेस त्याच्या मागून जात होती. नऊ महिने तिला पुरे भरले, तेव्हां ती महीनदीपर्यंत गेली होती. जवळ दुसरें कोणी नाहीं; अगदीं ओस अरण्य; व चांगदेव यादवरावासहवर्तमान बराच दूर निघून गेला होता. त्यानेंही इचा तपास केला नाहीं. पोट दुखूं लागल्यानें तिला एक पाऊलही पुढें टाकवेना, तेव्हां ती तेथें एकटीच बसली. ती ह्मणाली, देवा, माझीं आईबापें दूर राहिलीं; नवरा टाकून गेला; व मी तर ह्या विपत्तींत पडलें; आतां मी काय करूं ? माझ्यापाशीं कोणीच दुसरें मनुष्य नाहीं. मग तिनें चांगाकेशवदासाचा धांवा केला कीं, पुष्कळांना तूं वर देऊन संकटांतून तारलेंस; विधवेस सुद्धां वरदपुत्र दिलास; ह्या सर्व तुझ्या करणी मला ठाऊक आहेत; ह्मणून मी तुझ्या संगतीनें येत होतें, तों भ्रतारानें टाकिलें; मी गरोदर अशी अडून गेलें आहे; तशांत ही माझी पहिली वेळ; मला धीर देणार दुसरें कोणीं नाहीं; तर तूं ह्या समयीं मला पाव. ह्या रीतीनें तिनें केलेला धांवा श्रीकृष्णपरमात्म्याच्या कानीं गेला. भक्तांकरितां त्याणें अनेक अवतार घेतले; आपण स्वतः त्यांचीं कामें करून संकटें निवारण केलीं; कोणाच्या भिंती ओढिल्या;पाषाणमूर्ति जेवविलीं; कोठें श्रीखंड्या होऊन पाणी वाहिलें; जनीकडे दळलें; चोख्याचीं ढोरें ओढिलीं; सेन्यासाठीं न्हावी झाला; त्याणें ही वाणी ऐकतांच मोठ्या लगबगीनें स्त्रिचें रूप धरून तो यादवरावाच्या स्त्रीजवळ येऊन उभा राहिला.

पांढरें पातळ व पांढरी चोळी घालून स्त्री तेथें येतांच, तूं कोण आहेस, कोठें जातेस वगैरे तिला यादवरावाच्या स्त्रिनें विचारिलें. तेव्हां ती ह्मणाली, माझें नांव कृष्णाबाई. मला चांगदेवानें पाठविलें आहे. तूं बाळंतपणाची कांहीं चिंता करूं नको; मी सर्व सोय

करितें. मग तेथें एक मायावी नगर निर्माण करून धरून एका मंदिरांत नेलें; तेव्हां तिला धीर येऊन आनंद ... ती तिच्या पायां पडली. पुढें तिला पुत्र झाला. मग सुईणीचें स... काम कृष्णाबाई एकटीच करी. तुझी सुटका झाली, फार चांग... झालें; मी कामाची पर्वा करीत नाहीं असें तिणें बोलून दाखविलें न्हाऊं घालणें, औषधें वाटून देणें, शेगडी भरणें, पथ्याचें करणें विडा देणें, दिवे लावणें, सारी रात्र जागत बसणें, सर्व साहित्य मिळवू... सटवीची पूजा करणें, हीं सर्व कामें करून तिणें एक महिनाभर ति... यथास्थित बाळंतपण केलें. परमेश्वरानें हें अघटित केलेलें कृ... कोणास कळूं दिलें नाहीं.

बरोबरच्या मंडळीसह चांगदेव एक महिन्यानें द्वारकेस पोंचला नंतर गोमतीचें स्नान करून देवालयांत गेल्यावर रुक्मिणीसहि... श्रीकृष्णाची मूर्ति ध्यानांत आणीत असतां त्यांत त्याला कांहीं गडब... दिसली. मग तपास करतां श्रीहरी कृष्णाबाईच्या रूपानें महीतीरीं यादवपंताच्या स्त्रिचें बाळंतपण करीत आहे असें त्याच्या ध्यानामध्यें आलें इतक्यांत, तूं कृष्णास सुईण करून बाळंतपण करावयास पाठवून मल तळमळत लाविलेंस; जर त्याणें आह्मांस आज्ञा केली असती त... आह्मीं दासी सेवेंत हजर होतों, परंतु स्वतः सुईणीचें काम करितो; हे त्याचे चांगले गुण नाहींत. अशी रुक्मिणीनें केशवदासाजवळ गाऱ्हाणीं सांगितलीं. तेव्हां तो म्हणाला, भक्तांचीं कामें स्वतः करावीं हा पांडु- रंगाचा स्वभावच आहे. त्याच्या मागच्या कृती पहा. पांडवांकडे उष्टीं काढावयास व घोडीं धुवावयास हा कां? छपन्न कोटी यादव- सैन्य काय कमी होतें? अशाच रीतीनें बाळंतपण केलें; हा त्याचा स्वभाव कोणाच्यानें पालटवणार नाहीं.

रुक्मिणीनें चांगाकेशवदासास सांगितलें कीं, पाहिजे तशी युक्ति करून तूं महीतीरीं जाऊन त्यास घेऊन परत ये. असें ऐकून तो महीतीरास आला. तेथें ब्रह्मारण्यांत एक नगर पाहिलें. मग तो शोध लावून त्या घरीं गेला. कृष्णाबाई आंगण्यांत उभी होती. तिणें चांगदेवास नमस्कार केला; परंतु त्याच्यानेंसुद्धां तिला ओळख-

नाहीं. असो, चांगदेवाच्या लक्षांत येऊं न देतां कृष्णाबाई अदृश्य झाली. चांगदेव मंदिरांत गेला, तों बाळंतिणीनें मुलगा त्याच्या पायांवर घातला; आणि मुळापासून सर्व वृत्तांत त्यास सांगितला. मग कृष्णाबाई आहे कोठें ह्मणून विचारतां, ती बाहेर आंगण्यांत उभी होती ह्मणून सांगितलें.

तिचा वृत्तांत ऐकतांच, जर आपण यादवरावास आणिला नसता तर श्रीहरीस हे कष्ट झाले नसते असें मग त्यास वाटलें. तों तिणें सांगितलें कीं, हा मुलगा तुमचा दास आहे; ह्यावर कृपा असों द्यावी. मग तिला घेऊन चांगदेव द्वारकेस गेला. श्रीकृष्णाची भेट घेतली व ह्मणाला, देवा, स्त्री होऊन बाळंतपण केलेंस. अनाथबंधु हें तुझें नांव तुला खचित साजतें. अशी स्तुति करून कृष्णाची पूजा केली. मग कांता, पुत्र यादवरावाच्या हवालीं करून ह्यांचा त्याग करूं नकोस ह्मणून चांगदेवानें सांगितलें; व वर दिला कीं, या पुत्राचे वंशज हरिभक्त होतील व ते कुळाचा उद्धार करतील. अशी गुरूची आज्ञा मान्य करून तो त्यांस घेऊन बिऱ्हाडीं गेला. मग चांगदेव द्वारकेस चार महिने राहून परत गोदातीरीं आला. हा झालेला चमत्कार सर्वांस समजलाच होता.

चांगाकेशवदास परत पुण्यस्तंभास आल्यानंतर सात दिवसांनीं त्याच्या कानावर अशी गोष्ट आली कीं, आज सात महिने झाले बेदरच्या बादशहानें पंढरपुरास मोठा कहर उडवून दिला. हिंदुधर्माचा मातेरा केला; ब्राह्मणांचा नानाप्रकारांनीं छळ केला ; कथाकीर्त्तन, भजनपूजन बंद केलें; पंढरपूर लुटलें; बडव्यांना विठोबाला तळघरांत लपवावें लागलें; बादशाहाच्या भीतीनें त्याचें नांवसुद्धां घेतना; देवळाची मशीद केली; यवनांचें प्राबल्य झाल्यानें भले लोक पळून गेले. अशी विपरीत बातमी ऐकून चांगाकेशवदासास वाईट वाटलें. त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. तो ह्मणूं लागला कीं, कलीच्या भयानें रुक्मिणीकांत तळघरांत लपून राहिला; यावरून 'माझ्या दर्शनानें जडजिवांचा उद्धार होईल' ह्मणून पुंडलिकाला दिलेलें वरप्रदान लटकें ठरलें असें दिसतें; परंतु देवा, तुमची कीर्त्ति मला ठाऊक आहे. तूं मत्स्यअवतार धरून शंखासुर मारिला-

आमंत्रण केलें. त्या समारंभांत कितीएक लोक स्वतां मेहनत करीत होते. नाथानें ब्राह्मणांचें पूजन केलें. मग 'सर्वांभूतीं जनार्दन भोक्ता' असा संकल्प करून ब्राह्मणभोजन झालें. ब्राह्मण तृप्त होऊन विडा, दक्षिणा घेऊन संतोषानें आपापल्या घरोघर गेले. त्या रात्रीं कीर्त्तन झालें. अशा रीतीनें उत्सव संपूर्ण झाला.

ज्या वाण्यापासून रुपये घेऊन रोखा लिहून दिला होता, त्याचा वायदा संपतांच त्यानें पैशाबद्दल सक्त तगादा लाविला. तेव्हां, सवडीसवडीनें तुमच्या पैशाचा लवकरच निकाल करूं, असें उद्धवानें त्यास सांगितलें; परंतु तो वाणी ऐकेना. तो त्या वेळेस शेंकडों दुरुत्तरें बोलला. जो पैसा मिळतो तो ब्राह्मणभोजनांत खर्चून टाकितां; सारे लोक वेडे केलेत, परंतु माझ्या जवळ तें कांहीं चालावयाचें नाहीं; असें उद्धवास बोलून एकनाथाजवळ गेला. त्या वेळेस तो स्नान संध्या करीत होता. त्यास म्हणाला कीं, माझ्या ऐवजाचा निकाल केल्यावांचून अन्न घ्याल तर तुम्हांस पांडुरंगाची शपथ आहे; असें बोलून तो वाणी आपल्या घरीं गेला. एकनाथ नैवेद्य वैश्वदेव करून ब्राह्मणभोजन झाल्यावर उपाशींच राहिला. उद्धव व गिरिजाबाई हीं देखील जेविलीं नाहींत. उद्धवानें बहुत प्रयत्न केले; परंतु पैशाची सोय झाली नाहीं. यास्तव प्रहररात्र झाली तरी तीं तिघें उपाशीं होतीं.

तीं उपाशीं राहिल्यानें पंढरिनाथास संकट पडलें. मग श्रीहरि उद्धवाचें रूप धरून वाण्याकडे गेला व खत देऊन व्याजासुद्धां सर्व रुपये घे असें त्यास ह्मणाला. रात्र झाल्यामुळें चोपड्या व खत दुकानांत आहेत, हिशोब करावयाला पाहिजे वगैरे सांगून तो सकाळावर लोटीत होता; परंतु तें पांडुरंगानें ऐकलें नाहीं. जर असें होतें तर नाथास तुह्मीं शपथ कशाकारितां घातली? तो अजून उपाशीं आहे असें श्रीविठ्ठलानें सांगितल्यावर वाण्यास वाईट वाटलें. मग दुकानांत जाऊन हिशोब करून पाहिला व तितकाच पैसा मोजून घेतला. मग खत फाडून घेऊन पांडुरंगानें तें एकनाथाच्या पुस्तकांत ठेविलें.

एकनाथ उपाशीं राहून आपण जेविल्यामुळें वाण्यास चुटपुट लागली. तो सारी रात्र तळमळत होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो वाणी एकनाथाकडे गेला व साष्टांगनमस्कार घालून अपराधाची क्षमा व्हावी ह्मणून विनंती करूं लागला. तेव्हां नाथानें सांगितलें कीं, व्यवहाराची रीति अशीच असते. तुझें द्रव्य दिल्याशिवाय आह्मीं जेवणार नाहीं. तेव्हां वाण्यास विस्मय वाटून तो उद्धवास ह्मणाला, तूं पैसा देऊन रोखा आणिला असून नाथास कां कळविलें नाहींस? त्यास अजून कशासाठीं उपाशीं ठेविलेंस? तेव्हां उद्धवानें सांगितलें, मला ह्याविषयीं कांहीं ठाऊक नाहीं. हें ऐकून वाण्यानें पैसे पोंचल्याची शपथ वाहिली. मग उद्धवानें हें नाथास कळविलें. पुढें पुस्तकांत फाडलेला रोखा सांपडला. तेव्हां हें पांडुरंगाचेंच कृत्य असें तें मनांत समजले. मग उद्धवानें वाण्यास सांगितलें कीं, नाथाशीं व्यवहार केल्यामुळें तुला पांडुरंगाचें दर्शन झालें; तूं धन्य आहेस. आतां ही गोष्ट कोणापाशीं बोलूं नकोस. मग साष्टांग नमस्कार घालून वाणी आपल्या घरीं गेला. पुढें स्नानसंध्या, देवतार्चन झाल्यावर नाथासह सर्वांचें भोजन झालें.

पुढें असा चमत्कार झाला कीं, एक भक्त पांडुरंगाच्या दर्शनाची इच्छा धरून पंढरपुरास पुष्कळ दिवस तप करीत होता. एके दिवशीं रुक्मिणीकांतानें त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, तूं दर्शनाची इच्छा धरिलीस; परंतु एकनाथ प्रेमळभक्त आहे त्याच्या घरीं पैठणास मी गुंतलों आहें. मी तेथें विठोबा या नांवानें कीर्त्तनांत मागें टाळ वाजवीत असतों. तर तूं तेथें जा; ह्मणजे माझें तुला दर्शन होईल. मग तो पैठणास नाथाच्या घरीं गेला व विठोबास भेटला. साष्टांग नमस्कार घालतांच त्यानें रूप पालटून ह्मणजे चतुर्भूज होऊन त्यास दर्शन दिलें. तेव्हां लोक एकनाथाची धन्यता वाखाणूं लागले.

# अध्याय १७ वा.

## एकनाथ.

कीर्त्तनांत टाळ वाजविण्यासाठीं एकनाथाजवळ पंढरीनाथ बारा वर्षे राहिले. व पंढरपुराहून आलेल्या ब्राह्मणास सगुणरूपानें एकनाथाच्या घरीं दर्शन दिल्यावर गुप्त झाले. त्यानंतर तुमच्या मुखांतून भागवत ऐकावें असा आपला मानस उद्धवानें एकनाथास जाणविला. त्याच्या हेतुस्तव त्यानें भागवत सांगण्यास आरंभ केला. तेव्हां सर्व जातीचे श्रीमंत व गरीब लोक, बायका मुलांसुद्धां तें पुराण ऐकावयास जात. नाथाची अर्थ सांगण्याची शैली सर्वोत्कृष्ट होती. एकदां विप्रवेषानें पंढरीनाथही पुराण ऐकावयास आले. येतांच नाथानें नमस्कार केला; व कोठून आलेत आपलें नांव काय, वगैरे विचारिलें. तेव्हां माझें नांव केशव; एकटाच मी आहें; भागवत ऐकावें ह्मणून व आपली कीर्त्ति ऐकून आलों आहे; जर आश्वासन द्याल तर एथेंच हमेश रहावें असें मनांत आहे; असें त्यानें सांगितलें. तें त्याचें ह्मणणें नाथानें कबूल केलें; परंतु हा रुक्मिणीकांत असल्याचें कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं. हा केशव व उद्धव हे दोघे मुख्य श्रोते. शिवाय दुसरे बरेच होते. यथायोग्य दृष्टांतांनीं श्रोत्यांच्या संशयांची निवृत्ति एकनाथ उत्तम करी.

नाथानें सर्वांचीं मनें आकलन केलीं; परंतु वैदिक, पंडित ह्यांनीं आपली कमाई बुडूं लागल्यामुळें त्याच्याशीं द्वेष मांडिला. ते त्याची निंदा करीत. दुकान मांडून व्यापार चालविला; आमचे यजमान सर्व मोहून टाकिले; ते कामनीक व्रतें करावयाचीं सोडून नाथाच्या संगतीनें निष्कामभक्ति करूं लागले; आह्मीं विद्वान असतां आह्मांस कोणी विचारीत नाहीं व नाथ विद्वान नसतां त्याच्याकडे द्रव्याच्या व अन्नाच्या राशी घरीं चालून जाऊन पडतात; दुसऱ्यांची गोष्ट विचारूंच नका, पण आमच्या पंडितांच्या स्त्रियासुद्धां मिथ्या प्रपंच ह्मणूं लागल्या व आपल्या पतींस नकळत कीर्त्तनास जाऊं लागल्या; असें ते बोलत. अशी

त्यांनीं अनेक प्रकारांनीं नाथाची निंदा केली; तरी त्याचें तिकडे दुर्लक्ष्य असे. नाथास सर्व सिद्धि साह्य, तेणेंकरून पाहिजे तो पदार्थ तयार. हजारों लोक त्याच्या घरीं रोज जेवीत. कोणी याचक आला असतां त्यास लोक नाथाचें घर दाखवीत.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं पर्जन्य पडूं लागला. तो सात दिवस एकसारखा रात्रंदिवस पडत होता. घरें भिजून गळूं लागलीं. कोरडी जागा नाहींशी झाली. सैंपाकास सुकीं लांकडें नाहींत असें झालें; अशा समयीं दोनप्रहर रात्रीस चार ब्राह्मण गांवांत येऊन अन्नासाठीं फिरूं लागले; तेव्हां गांवकऱ्यांनीं त्यांस एकनाथाचें घर दाखवून दिलें. तेथें जाऊन त्यांनीं नाथास सांगितलें कीं, आह्मी भुकेनें फारच पिडिलों आहों; तर कृपा करून आह्मांस भोजन द्यावें. मग लांकडें नव्हतीं ह्मणून पलंग फोडून लांकडें केलीं व सैंपाक करून त्यांस भोजन घातलें; तेव्हां त्यांनीं त्यास आशीर्वाद दिला.

पुढें एकदां असें झालें कीं, नाथाच्या वडिलांची श्राद्धतीथि आली. त्या दिवशीं सर्व ब्राह्मणांस त्यानें आमंत्रण दिलें. स्वयंपाक सर्व तयार झाला; पण ब्राह्मणांस येण्यास वेळ लागला. इतक्यांत ब्रह्मदेव, शिव व विष्णु यांच्या मनांत एकनाथाचा भाव शुद्ध आहे किंवा नाहीं तो पहावा ह्मणून ते फकिराच्या रूपानें एकनाथाकडे आले; व आम्हीं उपाशीं आहों व आम्हांस पोटभर जेवावयास मिळेल अशी इच्छा धरून आलों आहों ह्मणून ह्मणाले. ती त्यांची विनंती नाथानें मान्य केली. व लागलींच पात्रें वाढून आणिलीं; व आपल्यासमक्ष भोजनास बसवून त्यांस तृप्त होईपर्यंत भोजन घातलें. मग विडे दिले. अशी एकनाथाची भक्ति पाहून तिन्ही देवांनीं प्रगट होऊन एकनाथास दर्शन दिलें. नंतर ते फकिराचा वेष घेऊन जाण्याच्या बेतांत आहेत तोंच ते आमंत्रण दिलेले ब्राह्मण स्नान करून वाड्यांत आले. त्यांना पाहून ते फकीर ढेंकर देऊन एकनाथास यवनीभाषेंत ह्मणाले, आज आह्मांस तूं पोटभर जे-

वावयास घातलेंस; ईश्वर तुझें कल्याण करील. असा आशीर्वाद देऊन ते गेले.

हें कृत्य पाहून एकनाथानें वर्णसंकर मांडिला, असें आपापसांत ते ब्राह्मण ह्मणूं लागले. त्यांनीं नाथास सांगितलें कीं, आज तुझ्या वडिलांची तीथ व आम्हीं श्राद्धाचे ब्राह्मण जेवावयाचे असतां तूं यवनांना प्रथम कसें जेवूं घातलेंस? तेव्हां कोणी कोणी ह्मणाले, ह्याच्या बापाचें सुकृत मोठें ह्मणून दोनप्रहरीं फकीर जेवले! आतां श्राद्ध झालें!! मग आतां एथें आपलें काम कांहींच राहिलें नाहीं; असें बोलून सर्व परत जाऊं लागले. तेव्हां एकनाथानें साष्टांग नमस्कार घालून त्यांना सांगितलें कीं, फकीर उपाशी होते ह्मणून त्यांना जेवावयास घातलें. आतां दुसरी सर्व तयारी केली आहे; तर हा अपराध क्षमा करून श्राद्ध करावें. परंतु तें त्याचें ह्मणणें त्यांणीं मान्य केलें नाहीं. आणि तूं भ्रष्टाकार मांडिलास वगैरे ते त्यास पुष्कळ बोलले; व लागलेंच त्यांनीं हें वर्तमान धर्माधिकाऱ्यास जाऊन कळविलें. तेव्हां तो नाथाकडे दुसरे ब्राह्मण समागमें घेऊन आला. त्यानें नाथास सांगितलें कीं, आज तुमच्याकडे वडिलांचें श्राद्ध असतां प्रथम मुसलमानास जेवावयास घातलेंत; तर तुमचे वडील मुसलमान होते काय? अशा प्रकारची पुष्कळ दुरुत्तरें बोलला; परंतु नाथानें त्यास साष्टांग नमस्कार घालून ह्मटलें कीं, मजवर कृपा करावी. धर्माधिकारी ह्मणाला, तुझें सुकृत फार आहे; आम्हीं न जेवलों ह्मणून काय झालें? तुझे पितर येतील स्वर्गाहून जेवावयास! हें ऐकून नाथांनीं सांगितलें कीं, तुमचें वचन खालीं पडावयाचें नाहीं. जरी ही अघटित गोष्ट आहे तरी तसेंही होईल. असें ऐकतांच ब्राह्मण ह्मणाले, जास्ती बोलूं नको; जर पितर आले नाहींत तर तुला वाळींत घालूं.

मग तीन पाट मांडल्यानंतर नाथानें 'आगतं' असें म्हणतांच पितर येऊन पाटावर बसले. तेव्हां सर्व ब्राह्मण धर्माधिकाऱ्यास घेऊन आले होते ते सर्व खालीं माना घालून मुकाट्यानें उठून गेले.

श्राद्धाचे ब्राह्मणें सोंवळे होते तितके मात्र राहिले. त्यांनीं श्राद्धसंकल्प सांगून त्या पितरांसमवेत भोजन केलें. मग विडे दक्षिणा घेऊन पितर स्वर्गास व ब्राह्मण घरीं गेले. त्या ब्राह्मणांनीं सविस्तर वर्तमान धर्माधिकाऱ्यास सांगितलें; तेव्हां त्यास चुटपुट लागली. एकनाथास ईश्वर साह्य आहे; आपण ह्याचा व्यर्थ छळ केला; असें निंदक बोलूं लागले व खंती झाले.

ब्राह्मणांनीं छळ केल्यामुळें नाथाचें मन दुखावलें नाहीं. तसेंच स्वर्गाहून पितर येऊन जेवून गेल्याचेंही आश्चर्य वाटलें नाहीं. तो निंदा व स्तुति दोन्हीं समान मानी. नाथाच्या एथें रात्रंदिवस यात्रा भरूं लागली. चोर जसे चंद्राच्या प्रकाशानें संतापतात, तद्वत एकनाथाच्या वैभवपसाऱ्यानें ब्राह्मण तळमळूं लागले. ते त्याचें कांहीं तरीं छिद्र पहात होते; तों असा चमत्कार झाला कीं, त्याच ठिकाणीं कृष्णदास नांवाच्या ब्राह्मणानें भवानीची उपासना केली. मग देवी प्रसन्न होऊन वर देण्यास तयार झाली; तेव्हां त्यानें कवित्वशक्तीचा वर मागून घेतला. व रामायणाचें युद्धकांड प्राकृत केलें. तो ग्रंथ पाहून सर्वांस संतोष वाटला. व ते म्हणूं लागले कीं, एकनाथ कविता करितो; पण त्याची वडिजावी स्त्रिया, शुद्र इत्यादि अडाण्यांमध्यें ! मग कितीएक येऊन नाथाजवळ त्या कृष्णदास लोळ्याची स्तुति करूं लागले कीं, कवि पुष्कळ आहेत; परंतु कृष्णदासाची सर येणार नाहीं. त्याची अति उत्तम कविता. त्याला देवीनें प्रसन्न होऊन वर दिला आहे. त्याणें रामायण फारच उत्कृष्ट लिहिलें आहे. हें ऐकून नाथ म्हणाले, ईश्वराच्या असंख्य विभूति आहेत. त्यांचा कोणास पार लागावयाचा नाहीं. कृष्णदासाची लोकांनीं अशी स्तुति केली असतां नाथास वाईट वाटलें नाहीं; किंवा त्याच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला नाहीं; असें पाहून ब्राह्मण ओशाळून मुकाट्यानें घरीं गेले. असो.

इकडे कृष्णदास रामायण लिहीत होता, तें संपूर्ण झालें नव्हतें; तोंच देवीनें त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, उद्यां तिसऱ्या प्रहरीं तुझा अंत होईल. याकरितां तूं फार सावध ऐस. मग ग्रंथ

पुरा होण्यापूर्वीच अंत होणार म्हणून त्यास खेद वाटला सर्व ग्रंथ घेऊन तो एकनाथांकडे गेला. तो आला अ... एकनाथ सामोरा गेला. कृष्णदास त्याच्या पायां पडला. ... एकनाथानें आसनावर बसविलें; आणि मजवर आज समर्थांनीं कृपा केली ह्मणून ह्मटलें. तेव्हां कृष्णदास ह्मणाला, उदईक मी ख-चित मरण पावणार; ह्यास्तव रामायण प्राकृत केलें आहे त्याचा थोडा भाग अवशेष राहिला आहे तो आपण लिहून ग्रंथ संपूर्ण करावा. असें ह्मणून पुस्तक त्याच्यापुढें ठेविलें. तेव्हां एकनाथानें एक अध्याय वांचून पाहिला व परम संतोष दर्शवून त्यास सांगितलें कीं, राहिलेला भाग माझ्यानें ह्या तोडीचा लिहवणार नाहीं; तो तुमच्या मुखानेंच तडीस जाऊं द्या. ग्रंथ समाप्त होई पर्यंत कितीही दिवस लागले तरी तुह्मांस काळाची भीति नाहीं; तुह्मीं ग्रंथ नेऊन खुशाल घरीं लिहा; जर कां काळाचा वारा आला तर मी ताबडतोब येईन. असा नाथानें धीर दिल्यावर तो त्यास नमस्कार करून आपल्या घरीं गेला.

आपणास एकनाथानें मृत्यु टाळण्याचें आश्वासन दिल्याबद्दल त्यानें सर्वांना सांगितलें. मग दुसऱ्या दिवशीं मृत्यूची वेळ आली तेव्हां एकनाथानें त्याच्याकडे जाऊन त्याच्या अंगावरून हात फि-रविला व त्यास धीर देऊन काळास आज्ञा केली कीं, तूं अकरा दिवस-पर्यंत याच्या देहास स्पर्श करूं नको. या नाथाच्या बोलण्यास मान देऊन काळ परत गेला. हा चमत्कार पाहून सर्वांना नवल वाटलें. मग कृष्णदास रामायण लिहावयास लागला.

थोड्याच वेळांत ही चमत्कारिक गोष्ट सर्व गांवभर झाली. तेव्हां ब्राह्मण आपसांत ह्मणूं लागले कीं, जर अकराव्या दिवशीं कृष्णदास मरण पावेल तर हें आम्हीं खरें मानूं; नाहींतर सारें ढोंग समजावयाचें. पुढें दहावें दिवशीं ग्रंथ समाप्त झाला. तेव्हां कृष्ण-दासानें सरस्वतीचें पूजन केलें. ब्राह्मणभोजन झालें. तो नाथाचा महिमा वर्णूं लागला. अकरावे दिवशीं स्नान करून नित्य नेम उर-कून घेतल्यावर प्रयाणाच्या वेळीं एकनाथ आला. त्यानें कृष्णदा-

..ं लाविला. फुलांच्या माळा घातल्या व पूजा करून ..ार घातला. मग कांहीं कष्ट झाल्याशिवाय कृष्णदास मरण पावला. तेव्हां आपसांत ब्राह्मण ह्मणूं लागले कीं, आम्हीं कृष्णदास लोळयास वाखाणीत होतों; परंतु एकनाथाची त्याच्यावर कडी ! आम्हीं त्याची फजिती व्हावी ह्मणून योजिलेले उपाय त्याच्या प्रशंसेस कारण होतात. त्याचें संचित चांगलें म्हणून ईश्वर त्यास साह्य, असें मुखानें ह्मणत; तरी एकनाथाचा उत्कर्ष पाहून ते मनांत तळमळ करीत.

दुसरा एक असाच चमत्कार झाला कीं, कर्नाटकांत एक श्रीमंत सावकार होता. तो श्रीपांडुरंगाची भक्ति करी. तो धार्मिक असे. त्याणें भक्तिपूर्वक एक पांडुरंगाची धातूची सुंदर मूर्त्ति तयार केली. मग प्राणप्रतिष्ठा व ब्राह्मणभोजन करण्यासाठीं सर्व साहित्याची सिद्धता करून सुमुहूर्त्त पाहिला. त्याच रात्रीस पांडुरंगाचा त्यास स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, पैठणास एकनाथ ह्मणून प्रेमळ भक्त आहे; भक्ति, ज्ञान, वैराग्य हीं त्याच्या अंगीं पूर्ण आहेत; ह्यास्तव ही मूर्त्ति तूं त्यास नेऊन दे. हें न ऐकून जर तूं तिची एथें स्थापना करशील तर त्रास पावशील. हें वर्त्तमान त्याणें कांहीं शास्त्रीपुराणिकांना सांगितल्यावर ते ह्मणाले कीं, तुह्मांस जर पुन्हा असाच दृष्टांत झाला तर तसें करा. मग त्यास सतत तीन दिवस स्वप्नांत ‘ मूर्त्ति नेऊन दे ’ असा दृष्टांत झाला.

मग ती मूर्त्ति घेऊन तो सावकार पैठणास गेला. तेव्हां हा आमचा यजमान असेल ह्मणून क्षेत्रस्थ ब्राह्मण आपापल्या वह्या घेऊन आले. त्यांना सकल वर्त्तमान त्यानें विदित केलें. नंतर स्नान करून व ब्राह्मणांस दाक्षिणा देऊन तो एकनाथाकडे गेला. उभयतांची भेट झाल्यावर एकनाथानें येण्याचें कारण, नांव, गांव विचारलें. तेव्हां तो त्यास सारा वृत्तांत कळवून ह्मणाला, माझा भाग्योदय होण्याची वेळ आली ह्मणून हा योग घडून आला; असें बोलून पांडुरंगाची मूर्त्ति पुढें टेविली. ती उचलून आनंदानें एकनाथानें हृदयीं धरिली व प्राणप्रतिष्ठेची तयारी करावयाची उद्धवास आज्ञा केली.

इकडे प्राणप्रतिष्ठेची, जेवणावळीची टोलेजंग तयारी झाली.

प्रहर रात्रीपासून स्वयंपाक करण्याची धामधूम सुरू झाली. ‘
तःकाळ होतांच वैदिक, उपाध्ये आले. मग मंत्र ह्मणून यः
विधि अर्चन करून प्राणप्रतिष्ठा केली. पुढें एकनाथ
लोण्याचा गोळा तळहातावर घेतला; व मूर्तीच्या मुखाशीं लाः
प्रार्थना केली कीं, तूं कृष्णावतारांत पुष्कळ लोणी चोरून कसें खाहें
हें पहावयाची आमची मर्जी आहे. जर तूं कांहीं अघटित कृ
करून दाखविशील, तर तुझा या ठिकाणीं महिमा वाढेल. असें नाथा
भाषण ऐकून मूर्ति हंसली व जीभ काढून सर्व लोणी चाटून खाहें.
हें पाहून भक्तमंडळी जयजयकार करूं लागली.

एकनाथास एकदां आपल्या घरीं न्यावें असें त्या सावकाराच्य
मनांत भरलें. मग त्याणें एक युक्ति योजून नाथाजवळ गोष्ट
काढिली कीं, मी गांवीं गेल्यावर एक रुक्मिणीची मूर्ति तयार क
रितों; तिचें पांडुरंगाशीं लग्न आपण सहकुटुंब सहपरिवार येऊ
लावावें असें माझ्या मनांत आलें आहे. मग उद्धवाच्या संम
तीनें एकनाथानें त्याच्या ह्मणण्यास रुकार दिला. पुढें नाथास
— ...न्य देऊन सावकार आज्ञा घेऊन आपल्या गांवीं गेला.
— ...रुक्मिणीची मूर्ति तयार केली. मग
... लिहून पैठणास

नाथास ...

डामडौलानें लग्नास जावयास ...

नवरीचे गांवीं ते जाऊन पोंचत आहेत तोंच प... .
आल्याची बातमी त्या सावकारास लागली. तो पुष्कळ लोः
समागमें घेऊन त्यांस सामोरा गेला व नाथाची भेट घेऊन त्याच्य
पायां पडला. त्या वेळेस वरास वस्त्रेंभूषणें दिलीं. उपाध्यास वस्त्रें
दिलीं. मग मिरवत जानवस घरीं नेलें. पांडुरंगाचें रुक्मिणी
बरोबर यथाविधि लग्न लागलें. मंगलवाद्यें वाजूं लागलीं. भक्त
मंडळी जयजयकार करूं लागली.

मग तो सावकार नाथाच्या पायां पडून, आपलें एकदां कीर्तन
...न घेऊन आनंद पावलो. अशी प्रार्थना करूं लागला. ती गोष्ट
विचार करून तो अन्नोदकाशिवाः

ानें मान्य केली. मग त्याचें तेथें कीर्त्तन झालें, त्या वेळीं त्यांचें मन रमून गेलें. असो. एकनाथ तेथें एक महिना रा-ला. त्यानें सर्वांना विष्णुभक्तीकडे लाविलें. मग त्या साव-राची परवानगी घेऊन एकनाथ पैठणास जावयास निघाला. गृहस्थानें वरास आंदण पुष्कळ दिलें व वऱ्हाडीमंडळीस त्रें दिलीं. पैठणास पोंचल्यावर पांडुरंगास मिरवत नेऊन स-ांनीं आनंदानें जयजयकार केला.

---

# अध्याय १८ वा.

## एकनाथ.

श्रीपांडुरंगाची मूर्त्ति मिरवत नगरांत नेल्यावर सिंहासनावर बस-विली. ब्राह्मणभोजन झालें. नंतर आह्मीं सेवाहीन असतां ांडुरंग आमच्याकडे आला; आजपर्यंत पंढरीस गेलों नाहीं; आ-ांस त्याची सेवाचाकरी कांहीं घडली नाहीं; तरीं एकदां पंढरपुरास जावयाचें मनांत आहे; असा आपला मानस एकनाथानें उद्धवास सां-गितला. त्यानें सुमुहूर्त्त पाहून जाण्याचा बेत ठरविला. मग नाथाच्या रोबर पुष्कळ यात्रा पंढरीस जावयास निघाली. उद्धवास घरीं ठेविलें होतें. गांवांतील पुष्कळ मंडळी गांव संपेपर्यंत नाथास पों-चविण्यास गेली होती. ज्याप्रमाणें नाथाची व्यवस्था होती, तीच मागें द्धवानें चालविली; त्यांत किंचित् न्यून पाडिलें नाहीं.

इकडे एकनाथ पंढरीस जात असतां गांवगन्ना त्याचीं कीर्त्तनें होत होतीं. साधुसंत भेटला असतां निराभिमानानें तो पायां पडे. पंढरपुरा-जवळ येऊन कळस पाहिला तेव्हां त्यास परमानंद झाला. रात्रीस ुजाऱ्यांस पंढरिनाथाचा स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, एकनाथ मोठा क्त आहे; तो उदईक येणार आहे तर तुह्मीं त्यास सामोरे जाऊन सन्मानानें घेऊन या. व चतुर्दशीस त्याचें कीर्त्तन करवा. असा दृष्टांत झाल्याची बातमी सर्व क्षेत्रांत फैलावली. मग मोठ्या समारंभानें त्यास घेऊन येण्यासाठीं सर्व लोक चंद्रभागे-[illegible] उद्धवास आज्ञा वेळीची टोलेजंग तयारी झा

इकडे पंढरपूर पाहतांच नाथानें साष्टांग नमस्कार घातला. सर्वांच्या चंद्रभागेवर आनंदानें भेटी झाल्या. नाथास व इतर बरोबरच्या मंडळीस पंढरपूर पाहिल्यानें व तेथच्या क्षेत्रस्थ लोकांस एकनाथाचें दर्शन झाल्यानें उभयपक्षीं आनंद झाला. मग सर्वांनीं चंद्रभागेवर स्नान करून पुंडलिकाचें दर्शन घेतलें. नंतर नाथास पांडुरंगाची भेट करविण्यास्तव पुजारी प्रथम महाद्वारांत घेऊन गेला. संतमहंत भजन कीर्त्तन करीत होते, त्यांच्या एकनाथ निराभिमानानें पायां पडला, पंढरपूर हें साक्षात् भूवैकुंठ होय. पृथ्वीवर अन्य तीर्थें पुष्कळ आहेत. तेथें गेल्यानें अभिमान येतो; पण पंढरपुरास तो मुरतो. जन्ममरणाचें मूळ जो अहंकार तो ज्यानें मुरडिला, त्यालाच योगेश्वर ह्मणावें. एकनाथानें प्रेमानें पांडुरंगाच्या चरणांवर मस्तक ठेविलें व पूजा करून स्तवन केलें. मग रुक्मिणी, सत्यभामा यांना भेटले; नंतर बिऱ्हाडीं गेले. मग संपूर्ण क्षेत्रवासी ब्राह्मणांस भोजनाचें आमंत्रण केलें. भोजनाचा बेत उत्तम ठेविला होता. नाथाचें चतुर्दशीस कीर्त्तन करावें असा पुजाऱ्यांना पांडुरंगाचा स्वप्नांत दृष्टांत झाला होता ह्मणून त्यांनीं ती गोष्ट नाथास कळवून कीर्त्तनाचा बेत केला. संत, महंत, सिद्ध, ऋषि, वैदिक, पंडित इत्यादि सर्व क्षेत्रवासी लोक उल्हासानें कीर्त्तन ऐकावयास बसले. प्रथम मंगलाचरण झाल्यावर श्रोता वक्ता श्रीजनार्दन असें ह्मणून नमस्कार केला. व विठ्ठलनामाचा गजर करून टाळ्या वाजविल्या. कृष्णा, विष्णु, गोविंदा, केशवा, नारायणा, माधवा, तूं भक्तवत्सल आहेस; जड, मूढ, अज्ञानी यांना तारावयास तूं भीमातटीं उभा राहिलास; भाविक भक्तांना कृपा करून भेट देऊन त्यांचें संरक्षण करितोस; असें कीर्त्तन चाललें असतां श्रोते देहभान विसरून गेले.

मग तुमचा पूर्वज भानुदास ह्याचें चरित्र ऐकण्याची इच्छा कितीएकांनीं नाथास कळविल्यावरून त्यानें भानुदासाचें अनुसंधान लाविलें. तें येणेंप्रमाणें.—विद्यानगरचा रामराजा ह्याच्या मनांत एकदां पंढरीस जाऊन पांडुरंगाचें दर्शन घ्यावें असें आलें. मग तो तेथें गेला. विठोबाचें दर्शन घेऊन आनंद पावला. आणि ती मूर्त्ति विद्यानगरास न्यावी असा विचार करून तो अन्नोदकाशिवाय तप करूं लागला. त्यास

सातवे दिवशीं दृष्टांत झाला कीं, मी पुंडलिकास्तव एथें राहिलों आहें. मला एथून दुसऱ्या ठिकाणीं जातां येत नाहीं; पण जर तूं मला भुईवर न ठेवितां सोंवळ्या ब्राह्मणांकडून घेऊन जाशील तर मी येईन. मग रामराजानें प्रधानाच्या अनुमतानें पंढरीपासून विद्यानगरापर्यंत एकसारखे ओळीनें सोंवळे ब्राह्मण उभे केले व कोणाचें कांहीं चालूं न देतां पांडुरंगमूर्ति हातोहात विद्यानगरास नेली. इकडे मूर्ति नेल्यामुळें पंढरीचे सर्व लहान थोर तळमळूं लागले; व सर्व पंढरपूर निस्तेज दिसूं लागलें.

राजानें पांडुरंगाची सिंहासनावर स्थापना केली. मोठा उत्सव सुरू झाला. वस्त्रें भूषणें देऊन राजानें सर्वांना गौरविलें. पुष्कळ दक्षिणा देऊन ब्राह्मणांस सुखी केलें. पांडुरंगाला भरजरी वस्त्रें व रत्नजडित मोत्यांचे दागिने घातले. पुढें रामराजास दृष्टांत झाला कीं, जर साधुसंतांचा अपमान होऊन त्यांचा छळ झाला तर मी ताबडतोब निघून जाईन; यास्तव अन्यायानें न वागतां धर्मनीतीनें राज्य कर. मग राजा त्या धास्तीनें सावध राहिला. देवावर एक जात जवाहीर असल्यानें दरवाज्यांना चोरांच्या भीतीस्तव नेहमीं कुलुपें असत. राजा नित्य त्रिकाळ षोडशोपचारांनीं पांडुरंगाची पूजा करी; परंतु पंढरीचा वियोग झाल्यानें देवास चैन पडत नसे. तो येथून आपली सुटका व्हावयाची संधि पहात होता.

आषाढीची पंढरीस मोठी यात्रा जमली. सर्व भक्तमंडळी चिंता करूं लागली. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, नामदेव, सांवता, मुक्ताबाई, कबीर, रोहिदास, गोराकुंभार, गोणाई, राजाई, जनी, आदिकरून भक्त गरुडपारावर बसले होते. नामदेवाचें कीर्तन चाललें होतें इतक्यांत भानुदास आला. त्यानें येतांच सर्वांस नमस्कार केला. मग पांडुरंगास कोठें न कोणीं कशा रीतीनें नेलें हें ज्ञानदेवानें सर्वांना कळवून, आतां विद्यानगरास जाऊन पांडुरंगास घेऊन येण्याची सुचना केली; परंतु कोणाची हिंमत होईना. आपल्यापाशींच ईश्वर आहे असें जे ते बोलूं लागले. मग भानुदास सर्वांना नमस्कार करून मी देवाला घेऊन येतों असें म्हणून विद्यानगरास गेला.

तेथें गेल्यावर पांडुरंगाची मूर्ति कोठें ठेविली आहे याविषयीं तपास करीत होता; पण राजाच्या भीतीनें त्यास कोणीं सांगितलें नाहीं. इतक्यांत एके साधूची भेट झाली. त्याणें तें सांगितलें व सदोदित दरवाजांस कुलुपें असतात ह्मणून देवाचें दर्शन होत नाहीं असेंही कळविलें. नंतर त्याच रात्रीस शेजारती करून कुलुपें लावून राजा घरीं गेला आहे व पुजारी बाहेर निजले आहेत; अशा समयीं भानुदास तेथें जातांच कुलुपें आपोआप उघडलीं. असें पाहून भानुदास उल्हासानें आंत गेला व बाह्यात्कारें राग धरून देवाशीं भांडूं लागला; व ह्मणाला कीं, देवा, तुझी बोलण्याप्रमाणें करणी नाहीं; ह्याचा प्रत्यय मला आला! मी तेथें राहून जडजिवांचा उद्धार करीन ह्मणून तूं पुंडलिकाला दिलेल्या वरावर पाणी पडलें! येथें भरजरी वस्त्रें, जडावाचे अलंकार, नैवेद्यास उत्तम पक्कान्नें; ह्मणून तुला आमचा विसर पडला! असें बोलून स्तुति करूं लागला कीं, पंढरपुरास चंद्रभागेच्या कांठीं विटेवर उभा राहून विठूराजा राज्य करीत होता, त्या वेळीं त्यास रिद्धि सिद्धि अनुकूल; सुवासिक अत्तरांनीं मर्दन; रंभा, तिलोत्तमा, उर्वशी, मेनका अशा सुंदर स्त्रिया निरंतर जवळ; असें ऐश्वर्य टाकून एथें तुला कोणीं भुलवून आणिला? रखुमाई मातोश्री उदास झाली आहे. पुंडलीक कसा उगीच बसून राहिला न कळे? सर्व भक्त दीनासारखे बसून राहिले आहेत. पंढरपूर विश्वाचें माहेरघर आहे; यास्तव आपल्या वचनाची आठवण धरून माझ्यासमागमें चलावें.

भानुदासाचें असें भाषण ऐकून पांडुरंगास गहिंवर आला. त्यानें त्याला पोटाशीं धरिलें आणि ह्मटलें, मी एथें बंदिखान्यांत पडलों आहे! तुह्मांवांचून मला क्षणभर चैन पडत नाहीं. आतां तूं मला घेतल्याशिवाय जाऊं नको; असें सांगून तुळसीच्या फुलांचा हार त्याच्या गळ्यांत घातला. पण त्याबरोबर नव रत्नांचा हार घातला होता हें भानुदासास ठाऊक नव्हतें. मग भानुदास बाहेर गेल्यावर दारांस कुलुपें पूर्ववत् लागलीं.

प्रातःकाळीं कांकडआरतीच्या वेळेस पहातात तों देवाच्या गळ्यांत रत्नांचा हार नाहीं. तेव्हां राजा पुजाऱ्यांवर रागावला.

मग हेर चोराचा शोध करूं लागले, तों भानुदास स्नान करून भजन करीत बसला होता, त्याच्या गळ्यांत हार झळकत होता त्यावर त्यांची नजर गेली. पुढें त्यांनीं भानुदासास राजाजवळ नेलें व त्याच्या गळ्यांतील हारही दाखविला. तो पाहून राजानें अविचारानें भानुदासास सुळावर देण्याची आज्ञा केली. तेव्हां भानुदास म्हणाला, देवा, तुला न्यावयास आलों होतों; तों गळ्यांत हार घालून मला तूं सुळावर देण्याची फार चांगली युक्ति योजिलीस! तुला योग्य वाटेल तसें मला मरण दे; मला त्याची भीति नाहीं. इतकें खरें कीं, तुला बिलकूल दया नाहीं. पण मी मेलों तरीं तुझें भजन सोडणार नाहीं.

अशा रीतीनें पांडुरंगाचा धांवा केला. त्या समयीं असा चमत्कार झाला कीं, ज्या ठिकाणीं सूळ रोंविला होता त्यास पानें, फांद्या फुटून फळें, पुष्पें आलीं व त्याचा एक वृक्ष झाला; असें पाहून सर्वांस नवल वाटलें. मग ही वार्त्ता राजाच्या कानावर जाऊन सर्व नगरांत प्रसिद्ध झाली; तेव्हां राजा दचकला व पश्चात्ताप होऊन पहावयास गेला, तों भानुदास डोळे झांकून विठोबाचें भजन करीत आहे व सुळाचा वृक्ष झाला आहे असें पाहिलें. मग राजानें साष्टांग नमस्कार घालून भानुदासाजवळ क्षमा मागितली. तेव्हां तो मला पंढरीनाथ पावलों म्हणून समजला. नंतर राजानें भानुदासास हातीं धरून देवळांत नेलें, तेव्हां पांडुरंगमूर्त्ति रडत होती; तिला पहातांच साष्टांग नमस्कार घातला व हात जोडून प्रार्थना केली कीं, तुझ्या भक्ताचा छळ केला हा मजकडून मोठा अन्याय घडला. तेव्हां देवानें राजास सांगितलें कीं, आतां तूं माझें रूप आठवून आपल्या नगरांत सुखानें रहा; मी भानुदासाबरोबर पंढरीस जातों. जर मला येथें ठेवण्याचा आग्रह करशील तर मोठा अनर्थ होईल.

नंतर भानुदासानें पांडुरंगास सांगितलें कीं, माझ्याजवळ राजसत्ता नाहीं; कीं मी तुला पुष्कळ लोकांकडून घेऊन जाईन. असें ऐकतांच पांडुरंगाची मूर्त्ति लहान झाली; तेव्हां राजा विस्मित झाला. मग भानुदासानें 'जय श्रीविठ्ठल' ह्मणून मूर्त्ति उचलली व संबळींत घालून तो घेऊन चालला. पुढें त्यानें पंढरीस आल्यावर पद्मतीर्थीं स्नान

केलें. त्या वेळीं मूर्त्ति मोठी झाली व भानुदासास ह्मणाली कीं, गरुड-पारावर भक्तमंडळी वाट पहात असेल त्यांस जाऊन सांग ह्मणजे सर्व एथें येतील. मग त्यानें सर्व वर्त्तमान सांगताच ते त्याजबरोबर आनंदानें भजन करीत पद्मतीर्थी आले. पांडुरंगास आणिल्यानें सर्वांनीं भानुदासाचा उपकार मानिला.

त्या वेळीं पांडुरंगानें भानुदासास वर दिला कीं, तूं मजला पंढरपूर दाखविलेंस; ह्मणून तुझा उपकार माझ्यानें फिटणार नाहीं. मी तुझ्या वंशांत अवतार घेईन. असें सर्वांनीं ऐकून आनंदानें जयजयकार केला. अशा रीतीनें एकनाथानें भानुदासाचें अनुसंधान लावून कीर्त्तन आटोपलें.

---

# अध्याय १९ वा.

## एकनाथ.

भानुदासाचें चरित्र ऐकून पंढरपूरवासी जनांस संतोष झाला. मग एकनाथानें देवळांत जाऊन पांडुरंगाची भेट घेतली. पुढें ब्राह्मणसंतर्पण केल्यावर देवास विचारून पैठणास निघाला. नगराजवळ येतांच उद्धवासह पुष्कळ लोक त्यास आणावयास सामोरे गेले. मोठ्या सन्मानानें त्यास वाजतगाजत घरीं नेलें. पांडुरंगास आरती केली. नंतर सर्व यथास्थीत पूर्वीप्रमाणें चाललें; कांहीं न्यून पडलें नाहीं.

पैठणास एक श्रीपाद संन्यासी ( दंडवत स्वामी ) होता. त्याणें साही रिपु जिंकिले होते. तो परमहंस झाला. सर्व ठिकाणीं त्याला ईश्वर दिसूं लागला. तो राजा व रंक समान मानी. पशु, पक्षी, मनुष्य अथवा कोणताही दुसरा प्राणी दृष्टीस पडला असतां त्यास तो साष्टांग नमस्कार घाली. तेव्हां परमहंसाला जात ना पात, असें लोक बोलूं लागले. कितीएक त्याची स्तुति करीत; व कितीएक त्याची निंदा करीत. परंतु तो विदेही असल्यामुळें त्याच्या तें ध्यानीं मनीं नसे. तो नित्य नेमानें एकनाथाचें दर्शन घेऊन कीर्त्तन ऐकावयास बसत असे.

एके दिवशीं अशी चमत्कारिक गोष्ट घडून आली कीं, दंडवत-

स्वामी गंगेवर स्नानास गेला. तेथेंच गंगेंत एक गाढव बुडालें होतें. तें मरून फुगल्यावर वहात वहात बाहेर वाळवंटावर येऊन पडलें होतें; त्यास स्वामीनें नजरेनें पहातांच नमस्कार केला. तें पाहून सर्व ब्राह्मण हंसूं लागले. व या गाढवांत चैतन्य ( प्राण ) नसतां तुह्मीं नमस्कार कोणास केला ह्मणून त्यांनीं विचारलें. तेव्हां स्वामी न्याहाळून पाहूं लागले, तों गाढव मेलेलें आहे असें समजलें. त्या वेळीं ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, जर तुह्मीं ह्या गाढवास उठविलें नाहीं तर तुमचें हें सारें ढोंग आहे असें आह्मीं समजूं. तें ऐकून स्वामीनें पांडुरंगाचा धांवा केला कीं, देवा, तूं या गाढवाची काया सोडून गेल्या कारणानें माझा दंडवत वायां गेलाना ? असें बोलतांच तें गाढव जिवंत झालें. हें अघटित कृत्य पाहून सर्वांना नवल वाटलें.

तो चमत्कार पहावयास लोकांची अतिशय गर्दी जमली. ब्राह्मण अभिमान सोडून त्याच्या पायां पडले. जो तो त्याची स्तुति करूं लागला. पण एकनाथाची निंदा करून ह्मणूं लागले कीं, नाथानें कीर्त्तन करून अडाणी लोकांस भोंदून टाकिलें; प्रेत उठविण्यास सामर्थ्य त्याच्या अंगीं नाहीं; कोरडें ज्ञान सांगून उपदेश करण्याचें मात्र त्यास चांगलें समजतें ! अशा रीतीनें एकनाथाची लोक निंदा करीत होते. इतक्यांत नाथ ब्रह्मयज्ञ करावयास गोदावरीतीरीं जात होता त्यास पहातांच त्या स्वामीनें साष्टांग नमस्कार घातला. नाथानेंही त्यास नमस्कार केला. व विचारिलें कीं, आज उपाधि फार वाढविली. आधींच हें अमंगळ कलियुग; लोक विकल्पी, कपटी असे आहेत; त्यांत राजा पडला यवन; तो अनेक विघ्नें करील; तुह्मांस तो बंदिखान्यांत ठेवील; व कोणी घरचें मनुष्य मेलें असतां तुमच्याकडून ताबडतोब जिवंत करवील; हे लोक तुह्मांस भूतभविष्य विचारूं लागतील, त्यामुळें तुमच्या स्थितीमध्यें अंतर पडेल त्याबद्दल काय विचार केलात ? नाथाचें हें ह्मणणें खरें असें त्यास वाटलें. मग त्यानें, 'मला समाधि द्यावी' ह्मणून नाथास सांगितलें. ती गोष्ट त्यानें मान्य केली. पुढें मजूर बोलावून गार खणविली. त्यांत स्वामीस बसवून त्यांची पूजा करून वर माती लोटली. मग स्नान [illegible]

दंडवतस्वामी समाधिस्थ झाल्याची बातमी सर्व नगरभर झाली. पंडित, वैदिक, धर्माधिकारी सर्व पिंपळेश्वराच्या देवालयांत जमले. त्यांनीं तेथें नाथास बोलावून विचारलें कीं, आम्हांस कळविल्यावांचून गंगेंत गार खणवून यतीला जिवंत कसा पुरला? तेथें मंत्र कोणीं ह्मटले? असें तूं अविधिकर्म केलेंस व बळेंच समाधि देऊन त्या बिचाऱ्याला पुरून टाकिलास; यास्तव हत्येचा आरोप तुजवर ठेवून आम्हीं तुला बहिष्कृत केलें आहें. त्यानें मेलेलें गाढव उठविलेलें तुला सहन झालें नाहीं हें खचित; ह्मणून त्या यतीवर तूं असा हल्ला केलास; असें ते बोलूं लागले. कोणी असेंही ह्मणाले कीं, हा कर्मभ्रष्ट झाला, टाणेटोणे शिकला, साबरीमंत्रांत निपुण झाला, व ह्यानें संन्याशाचा खून केलेला असून याला या क्रूर कर्माची खंती वाटत नाहीं. अशीं अनेक दूषणें देऊन लोक त्याची निंदा करूं लागले.

ब्राह्मणांनीं एकनाथास सांगितलें कीं, संन्याशी मारल्याची हत्त्या तुझ्या माथीं बसली. तर जवळच हा पाषाणाचा नंदी आहे हा जर कडबा खाईल तरच तूं निर्दोष ठरशील. असें ऐकतांच एकनाथ ह्मणाला, तुमच्या मर्जीनुरूप होण्यास अशक्य नाहीं. तुम्हां ब्राह्मणांचें वाक्य ईश्वर कदापि लटकें करणार नाहीं. इतक्यांत ब्राह्मणांनीं कडब्याची पेंढी आणून नाथाच्या पुढें ठेविली. तेव्हां त्यानें नंदीस सांगितलें कीं, मीं आपल्याच मतानें संन्यासी समाधींत बसविला तो दोष मला जर किंचित् सुद्धां नसेल तर तूं हें गवत खा. हें ऐकतांच नंदीनें जीभ बाहेर काढिली; व गवताची पेंढी खाल्ली. हा चमत्कार सर्वांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिला. तेव्हां, 'तूं दोषमुक्त झालास' असें ते ब्राह्मण नाथास ह्मणाले. मग त्यांना साष्टांग नमस्कार घालून नाथ ह्मणाले कीं, मी मूढ व अज्ञान आहें; मीं वेदाध्ययन केलें नाहीं; व तुमचें तीर्थ घेऊन रहातों. तेव्हां, ह्यास श्रीहरि प्रसन्न आहे, तो ह्याचें वेळोवेळीं रक्षण करितो अशी स्तुति करून ते ब्राह्मण गेले.

हा चमत्कार त्यांनीं क्षेत्रांत सर्वांना कळविला, तेव्हां भाविकांनीं एकनाथाची स्तुति केली; कुटिक लोकांनीं निंदा केली आणि पिंपळेश्वरास जाऊन पाहिलें, तों नंदी पाषाणाचाच आहे. असें पाहि-

कून 'तूं कृष्णरूपांतच होतास' असें नाथानें त्यास सांगितलें. तें ऐकून त्याचा भेदभाव निरसन झाला.

एके दिवशीं राण्याच्या स्त्रिनें नवऱ्याजवळ गोष्ट काढिली कीं, एकनाथ साक्षात् पांडुरंग आहे. तो विश्वोद्धारार्थ सगुण झाला. तर त्यास एथें भोजनास आणावें असा माझा हेतु आहे; ह्मणून तुह्मीं जाऊन त्यांच्याजवळ गोष्ट काढून पहा. जर ते येत असले तर त्याप्रमाणें साहित्य तयार केलें पाहिजे. मग तो तसाच उठून एकनाथाकडे गेला व एकांतीं गांठून त्यानें आपला मनोदय कळविला. मग जनार्दनाच्या कृपेनें तुमचे हेतु पूर्ण होतील; असें अनमान-न करितां नाथानें त्यास सांगितलें. नंतर त्यानें आनंदानें घरीं जाऊन हें आपल्या स्त्रीस सांगितलें.

मग तिणें एके द्वादशीस एकनाथास बोलविण्याचा बेत केला. एकादशीच्या दिवशीं सर्व तयारी करून ठेविली. मग नाथास राण्या आमंत्रण द्यावयास गेला. तो स्नानाच्या वाटेवर नाथाची वाट पहात राहिला; इतक्यांत नाथ आला. तेव्हां त्याणें प्रेमानें नमस्कार केला; आणि प्रार्थना केली कीं, मी जातीचा नीच ह्मणून संकोच वाटतो; परंतु आज भोजनास मजकडे यावें. असें बोलून त्याच्या पायां पडला. तेव्हां एकनाथ ह्मणाले, तूं तर विष्णुभक्त आहेस; तुझा प्रेमळ भाव पाहून श्रीकृष्णनाथ संतुष्ट होईल. वेदशास्त्रज्ञ ब्राम्हण श्रीहरीस विमुख असला, तर त्याहून अंत्यज बरा. असें बोलून प्रमाणाकरितां भागवतांतील एक श्लोक म्हटला. तेव्हां जवळ ब्राह्मण होते त्यांना राग आला. ते सर्व नाथाच्या जवळ गेले आणि गवगवा करून म्हणाले, भागवतांतील श्लोक केवळ श्रुति होय; तो तुम्हीं महारास म्हणून दाखविला हें अनुचित कर्म कसें केलें ? आतां तुला ह्या दोषाबद्दल प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. तेव्हां एकनाथानें हात जोडून नम्रतेनें त्यांस सांगितलें कीं, राण्या महार मोठा भक्त आहे; तो निरंतर श्रीहरीचें भजन करितो. त्यानें काम, क्रोधादि साही शत्रु जिंकिले आहेत; यास्तव तुम्हीं ह्यास अंत्यज म्हणूं नका. " अनामिकाचें लक्षण याच्यामध्यें एकसुद्धां नाहीं. जे जे भागवतधर्म सांगितले आहेत, तेच सर्व

याजमध्यें आहेत.. हा सिद्धांतज्ञानाचा आधिकारी आहे, अशी माझी समजूत आहे. याणें भक्तीनें श्रीहरीला वश्य केलें आहे; ह्मणून मी बोललों. या अपराधाची मला क्षमा करावी. असें ह्मणून दंडवत घातलें. तेव्हां ब्राह्मणांनीं एकनाथाचें ह्मणणें लक्षांत न आणितां तूं अनाधिकाऱ्यास उपदेश केल्यानें कर्मभ्रष्ट झालास; यास्तव प्रायश्चित्त घेतल्या शिवाय तूं शुद्ध नाहींस ह्मणून स्पष्ट सांगितलें. मग दुराग्रह न धरितां प्रायश्चित्त घेण्यास एकनाथ सिद्ध झाला. तो गंगेच्या डोहांत जाऊन उभा राहिल्यावर ब्राह्मणांनीं मंत्र म्हणून त्यास प्रायश्चित्त दिलें. हें पाहून तो महार मुकास्थानें आपल्या घरीं गेला; व स्त्रीस सकल वृत्तांत सांगूं लागला. तेव्हां ती कपाळास हात लावून खिन्न झाली. ती जमिनीवर अंग टाकून रडूं लागली. तेव्हां त्यानें तिला सांगितलें कीं, एकनाथ दयाळू आहे; यास्तव मी आणखी त्यास विचारितों. जर ते न येतील तर मग आपणाला तरी जीव ठेवून काय करावयाचें आहे? असें बोलून गंगातीरीं गेला. तेथें नाथाची भेट झाली. मग त्यानें त्यास आपल्या घरीं भोजनास बोलाविलें. त्यावेळीं ब्राम्हण जवळ होतेच. असें असतांही नाथानें भोजनास मध्यान्हसमयीं येऊं ह्मणून सांगितलें; तेव्हां तो उल्हासानें घरीं गेला.

ब्राम्हण आपसांत विचार करूं लागले कीं, याणें भ्रष्टाकार मांडिला आहे. याच्या कृतीनें वर्णसंकर लवकरच होईल. महारास भागवतांतील श्लोक सांगितल्यामुळें प्रायश्चित्त दिलें; तरी त्याच्याकडे भोजनास जाण्याचें कबूल केलें. तर आतां विचार कोणता करावा? मग त्यांणीं भोजनास बसेल तेव्हां धरण्याचा बेत केला व ते टपत बसले.

इकडे एकनाथ घरीं येऊन देवार्चन झाल्यानंतर पुराण सांगूं लागले, तों दुपार भरली. तेव्हां अतीतअभ्यागतांचा आदरसत्कार करून पात्रें वाढिलीं; इतक्यांत घरीं रांगोळ्या घालून पुजेचें साहित्य तयार करून तो महार नाथास बोलवायास आला. तेव्हां तूं पुढें चल; आम्हीं मागून येतों ह्मणून त्यास सांगितलें. हें ऐकून जे ब्राम्हण द्वारीं लपून बसले होते ते नेत्रसंकेतानें एकमेकांस इशारा करूं लागले कीं, आतां फारच सावध असावें. इतक्यांत एकनाथाच्या रूपानें श्रीपांडु-

रंग महाराकडे प्रगट झाले. नाथ तेथें जातांच उभयतांनीं आनंदानें भक्तिपूर्वक पांडुरंगास नमस्कार केला. त्याची पूजा केली, गंध लाविलें, तुळशीच्या माळा गळ्यांत घातल्या, व पाय धुऊन तीर्थ घेतलें; हें सर्व तेथें असलेल्या ब्राह्मणांनीं चोरून पाहिलें. तेव्हां एकनाथ नजर चुकवून कसा गेला म्हणून त्यांणीं नाना कल्पना काढिल्या. मग त्यांणीं घरीं तसेंच महाराकडे एकनाथास पाहिलें; ह्यामुळें ब्राह्मण विस्मयांत पडले. परंतु एकनाथ व श्रीपांडुरंग एकच असून जगाचा उद्धार करावयास अवतार घेतला हें त्यांस कळेना. त्यांनीं तिसऱ्या प्रहरपर्यंत इकडे तिकडे येरझार करून पाहिल्या, तों एकनाथ महाराकडे व आपल्याही घरीं आहेच! मग हा सावरी मंत्र शिकला आहे; व वेताळ, झोटिंग यांना प्रसन्न करून असलीं अघटित कृत्यें करून दाखवितो; असे कुतर्क काढून ते ब्राह्मण आपापल्या घरोघर गेले.

---

## अध्याय २० वा.

### एकनाथ.

पैठण नगरांत एक गृहस्थ होता त्यास परीस सांपडला; त्यामुळें तो हव्या तशा मजा मारी. पुढें कांहीं दिवस गेल्यावर त्याची बायको व मुलें मरण पावलीं. मग एकटाच राहिला, तेव्हां तो उदास झाला. त्यास चैन पडेना ह्मणून त्याणें महायात्रेस जाण्याचा बेत केला. नंतर परीस कोणा विश्वासू मनुष्याजवळ ठेवून जावें अशा विचारानें तो एकनाथाकडे गेला व आपला हेतु त्यास सांगितला. तेव्हां नाथानें त्यास सांगितलें कीं, तुमचा ज्यावर विश्वास आहे त्याच्याजवळ परीस ठेवा. त्यावर तो म्हणाला, माझा पूर्ण विश्वास तुमच्यावर आहे व तुम्हीं मला दगा देणार नाहीं अशी माझी खात्री आहे; ह्मणून मी माझी अमोल वस्तु तुमच्याजवळ जतन करून ठेवावयास देतों. असें बोलून परीस नाथाच्या स्वाधीन केला. तेव्हां एकनाथ आश्चर्यानें ह्मणाला, हा तर दगड आहे; आणि अमोल वस्तु ह्मणून म्हणतां हें कसें काय तें मला कळत नाहीं. तेव्हां त्यानें तो परीस

लोखंडास लावून सोनें करून दाखवून ह्मटलें, तुम्हांस परमेश्वर साह्य आहे, यास्तव ह्या परिसाची तुम्हांला गरज नाहीं. मी यात्रेहून आल्यावर माझा मला द्यावा. मग नाथानें तो परीस सिंहासनाखालीं टाकिला. व तो गृहस्थ नाथास नमस्कार करून यात्रेस गेला.

परीस जतन करून ठेवावयास नाथाच्या ध्यानांत राहिलें नाहीं. त्यास सोनें व शेण दोन्हीं सारखींच दिसत. असो. पुढें एक वर्षानें तो गृहस्थ यात्रा करून आल्यावर एकनाथास भेटला. तेव्हां आपण मागितल्याशिवाय परीस मिळेल, असें त्या गृहस्थास प्रथम वाटलें होतें; ह्मणून तो चार घटका वाट पहात राहिला. परंतु नाथास तें स्मरण नसल्यानें त्यानें ती गोष्ट काढिली नाहीं. तेव्हां त्या गृहस्थास वाटलें कीं, आजची पहिलीच भेट आहे ह्मणून दिला नसेल; उद्यां देतील. अशा समजुतीनें तो घरीं गेला; परंतु त्यास चैन पडेना. प्रातःकाळीं स्नानादि नित्य कर्में उरकल्यावर तो एकनाथाकडे गेला. नमस्कार करून कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या, तरी एकनाथानें परिसाची गोष्ट काढिली नाहीं; म्हणून त्या विषयीं त्याणें नाथास विचारिलें. तेव्हां तो सिंहासनाखालीं पाहूं लागला पण तेथें परीस नाहीं, असें पाहून नाथानें ब्राह्मणास सांगितलें कीं, दर एकादशीस निर्माल्य गंगेंत नेऊन टाकीत असतों, त्याबरोबर तो परीस गंगेंत गेला असावा. हें ऐकून तो गृहस्थ खिन्न झाला. मग एकनाथ त्यास घेऊन गंगेवर गेले; आणि उदकांत निर्माल्य टाकिला त्यासरसा परीस पडला असेल असें बोलून उदकांतून पांच सात खडे उचलले. व तुझा परीस कोणता तो ओळखून घ्यावयास सांगितला. मग त्यानें सारे खडे लोखंडास लावून पाहिले तों सर्वही परीस. तेव्हां हे सर्व खडे आपणांस मिळतील तर बरें असें त्यास वाटलें. पण नाथानें त्यांतून एकच परीस घ्यावयास सांगितल्यावर त्याणें एक खडा उचलून घेतला. बाकीचे नाथानें गंगेंत टाकून दिले. मग स्नान करून दोघेही आपापल्या घरीं गेले.

एकनाथाची सेवा करण्याच्या हेतूनें श्रीकृष्ण ब्राह्मणाच्या रूपानें द्वारकेहून पैठणास आला. त्यानें गंगेवर स्नान करून

नाथाची भेट घेतली व विनंती केली, तूं मोठा भगवद्भक्त आहेस व मला संतांची सेवा करावयाची फार आवड. तशांत मी संतांची सेवाचाकरी जन्मापासून करीतही आलों. पगाराची मला इच्छा नाहीं. पोटभर अन्न व जाडेंभरडें वस्त्र मिळालें म्हणजे झालें. ईश्वरीमाया अनिवार आहे. एकनाथाच्यानें देखील श्रीहरीस ओळखवलें नाहीं. मग त्याची चौकशी केली, तेव्हां तो म्हणाला, मी एकटाच आहें. मागें बायकामुलांचा पाश नाहीं. मला श्रीखंड्या ह्मणतात. पाहिजे त्या देशीं जाण्याची मला मोकळीक. मी ऋग्वेदी ब्राह्मण आहें. मला वाटेल तेथें मी रहातों. तूर्त तुह्मी सेवा करून परमार्थ साधावा असें मनांत आहे. तो वृत्तांत ऐकून घेतल्यावर नाथ म्हणाला, तुला सेवा चाकरी करण्याचें कारण नाहीं. अन्नवस्त्र घेऊन खुशाल परमार्थसाधन करावा. तेव्हां विप्ररूपी कृष्ण ह्मणाला, काम करण्याची माझ्या अंगांत शक्ति आहे व संतांची सेवा घडावी असा माझा हेतु आहे; असें बोलून खांद्यावर कावड घेऊन गंगेवर पाणी आणावयास गेला.

जो ब्रह्मादिकांना पूज्य; शंकराला वंद्य; ज्याची कीर्त्ति वर्णन कारितांना श्रुति, पुराणें थकलीं; जो क्षीरसागरीं प्रभाकर बेटांत शेषावर शयन करणारा; अष्टांग योग साधून योगी ज्याचें ध्यान करितात; ज्याच्या चरणापासून भागीरथी निघालेली; अठ्यांयशीं सहस्त्र ऋषि ज्याचें ध्यान करितात; लक्ष्मीसुद्धां अष्टसिद्धि ज्याच्या दासी; चंद्र, सूर्य ज्याच्या सत्तेनें प्रकाशतात; तो श्रीकृष्ण परमात्मा ब्राह्मणाच्या रूपानें एकनाथाकडे सेवा करावयास राहिला. सकाळींच उठून पाणी आणणें, देवपुजेची तयारी करणें, गंध उगाळणें, फुलांच्या माळा करणें, उष्टीं काढणें, दिवेबत्ती करणें, हीं सर्व कामें तो लक्ष्यपूर्वक चपळाईनें करी. एकनाथाच्या नकळत तो त्याच्या स्त्रीससुद्धां काम करण्यास मदत करी. हें पाहून नागरिक लोकांस आश्चर्य वाटे. व कांहीं वेतन घेतल्याशिवाय एकनाथाचा ब्राह्मण सर्व कामें भराभर करून टाकितो असें म्हणत.

इकडे द्वारकेस एक ब्राह्मण बारा वर्षे कृष्णप्राप्तीस्तव अनुष्ठान क-

रीत होता. त्यास साक्षात्कार होईना. मग एके दिवशीं तो अगदीं उपाशीं राहिला. तेव्हां रुक्मिणीनें त्यास दृष्टांत देऊन कळविलें कीं, तूं निर्वाण मांडिलेंस; परंतु कृष्ण एथें नाहीं. पैठण नगरांत एकनाथ मोठा भक्त आहे, त्याची तो सेवा करीत आहे. श्रीखंड्या हें त्याचें नांव, तर तूं त्याची तेथें जाऊन भेट घे. मग तो ब्राह्मण जागा झाल्यावर पैठणास आला. तेथें गंगेवर स्नान करीत होता, इतक्यांत श्रीखंड्या पाण्यास गेला; तेव्हां त्यानें त्यास ओळखून ह्मटलें कीं, हा रिणकरी एथें कशाला आला? आजपर्यंत मी सुखानें काळ कंठीत होतों; परंतु रुक्मिणीनें गवगवा करून ह्यास एथें पाठविलें! मग कावड भरून नेल्यावर घरांत ठेविली, व देवघरांत जाऊन तो गंध उगाळूं लागला; तों तो ब्राह्मण शोध करीत एकनाथाकडे गेला. मग विचारपूस केल्यावर त्याणें सविस्तर वर्त्तमान नाथास सांगितलें; व श्रीखंड्याचें दर्शन करवा असें बोलून त्याच्या पायां पडला. तेव्हां नाथास आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला, कृष्णावांचून रिती जागा कोणती आहे हें मला सांगा. तेव्हां तो ब्राह्मण ह्मणाला, मला ब्रह्मज्ञान ऐकायाला नको; तो तुमचा श्रीखंड्या दाखवा! तुमचें नशीब थोर; ह्मणून आज बारा वर्षें देव तुमच्याकडे गुलामासारखा खपत आहे.

मग श्रीखंड्यास बोलावून आणण्यास एकनाथानें उद्धवास सांगितलें. तेव्हां तो देवघरांत होता, तो लागलाच रूप पालटून चतुर्भुज झाला; हातांत शंखचक्रादि आयुधें घेतलीं; मुगुट घातला; कानांत कुंडलें; गळ्यांत वैजयंती माळा; व पितांबर नेसून शामसुंदर दैदिप्यमान मूर्त्ति उभी राहिली आहे. असें रूप पहातांच तो ब्राह्मण धांवत जाऊन पायां पडला. परमात्म्यास कष्टविल्यामुळें एकनाथास अनुताप झाला. मग देवास आलिंगन देऊन, हें करणें तुला उचित होतें काय? असें ह्मणून पुन्हा पायां पडले. कृष्णानें एकनाथास सांगितलें कीं, तुझी अप्रतिम भक्ति पाहून मी संतुष्ट झालों. मागें विठ्ठल होऊन बारा वर्षें तुझ्यामागें कीर्त्तनांत सुर धरिला. मग केशव होऊन बारा वर्षें भागवत ऐकिलें; अशी मी चोवीस वर्षें एथें काढिलीं. हें ऐकून नाथ ह्मणाले, देवा, तुझी करणी कोणास कळणार नाहीं. असें बोल-

तात तो देव गुप्त झाला. मग ब्राह्मण नाथाच्या पायां पडला. पण आज तुझ्या योगानें मला सगुणदर्शन झालें असें एकनाथानें त्यास सांगितलें. तेव्हां नाथ हा कृष्णरूप आहे अशी त्या ब्राह्मणाची खात्री झाली.

एकदां कीर्त्तन होत असतां चौघे चोर चोरी करण्याच्या आशेनें कीर्त्तनांत येऊन बसले. व कीर्त्तन संपल्यावर ते तेथेंच लपून राहिले. दारें लावून सर्व लोक निजल्यावर फक्त एकनाथ नामस्मरण करीत बसले. चोर जिनसा टेहळूं लागले असतां एकाएकीं ते चोर आंधळे झाले. तेव्हां, आतां कसें करावें ह्मणून त्यांना चिंता उत्पन्न झाली. त्यांची चालतांना डोकीं खांबावर आदळून फुटलीं. हा ईश्वराचा क्षोभ असें त्यांच्या मनांत ठसलें; व विष्णुभक्ताकडे चोरीस आलों ह्मणून हा घात झाला असेंही ते समजले. असा पश्चात्ताप झाल्यावर ते फिरत फिरत देवघरांत नाथाजवळ गेले. तेव्हां असा चमत्कार झाला कीं, चोरांना दिसूं लागलें. त्यांची दुर्बुद्धि गेली. ते नाथाच्या पायां पडले. शेवटीं हात जोडून चौघांनीं स्तुति केली. मग एकनाथानें त्यांना तुम्हीं कोण वगैरे विचारिल्यावर त्यांणीं संपूर्ण वर्त्तमान त्याला निवेदन केलें. तें ऐकून एकनाथास त्यांची दया आली. तो म्हणाला, आमच्या घरीं तुम्हीं आशा धरून आलेत; त्यापेक्षां रंजीस होऊन जाऊं नका. मग त्यांना सर्व भांडार दाखवून ह्यांतून तुम्हांस लागेल तें घेऊन जा म्हणून सांगितलें. अशा गडबडींत त्यांना बोध झाला, व प्रसादाशिवाय दुसरी कशाचीच इच्छा नाहीं असें ते म्हणाले. मग नाथानें उद्धव आणि गिरिजाबाई यांना उठवून स्वयंपाक करविला व त्यांना सन्मानानें जेवूं घातलें. नंतर विडे घेऊन ते गेले. ह्या दिवसापासून ते चोरी करावयाची सोडून भजन करूं लागले.

आणखी एक अशी गोष्ट घडली कीं, एका महारास चोरीची खोड लागली होती. तो एके दिवशीं सांपडला. तेव्हां घरधन्यानें त्यास दरबारांत नेलें. तेथें त्यास खोड्यांत घातला. त्या बिचाऱ्यास कोणीं सोडविलें नाहीं. तेथें त्यानें पुष्कळ उपास काढिले. मग चार दोन दिवसांत मरेल असें पाहून अधिकाऱ्यानें सोडून दिला. पण त्यास चालण्याचें सुद्धां अवसान नव्हतें. तेव्हां आतां आपण सुटे आतों

उपासना, भक्ति, ज्ञान कसें काय आहे हें पहावें. मग एक एक जण ही मठांत गेला; तों एकनाथ बसला होता, तो त्यांना कृष्णरूप दिसूं लागला. मग त्यास नमस्कार करून सर्वजण हात जोडून उभे राहिले. व ही विश्वोद्धारार्थ नारायणमूर्त्ति प्रगटली आहे असें ह्मणूं लागले. आपल्या स्वामीचें ऐकिलें असतें तर मोठा अनर्थ घडला असता असें त्यांस वाटलें. मग एका शिष्यानें हें वर्त्तमान महंतास कळवून सर्वांनीं तुमची आज्ञा अमान्य केली ह्मणून कळ लाविली. हें ऐकतांच तो रागानें लालभडक होऊन गेला; व मनांत ह्मणाला कीं, तो नाथ असा कोणता मंत्रतंत्र शिकला आहे कीं माझ्या तीनशें शिष्यांस पहातांच त्यानें मोहनी घातली! नंतर त्यानें आपल्या मठांतील आसनापुढें पडदा लावावयास सांगितलें. कांहीं वेळानें स्वामी दुसऱ्या दारानें मठांत जाऊन आसनावर कडासन घालून बसले. आड पडदा असल्यामुळें बाहेरचें कांहीं दिसत नव्हतें; पण तीनशें संन्याशांना एकनाथ कृष्णरूप दिसल्यानें त्यांचा द्वैतभाव निरसन झाला होता; व ते एकनाथाचें स्तवन करीत होते तें त्यानें ऐकिलें. मग तो नाथास ह्मणाला कीं, सर्वांमध्यें श्रेष्ठ यती तो मी. तुला आतां दंड करीन. असें त्याचें अभिमानाचें भाषण ऐकल्यावर शांती व दयेचा समुद्र असा एकनाथ मधुर वाणीनें ह्मणाला कीं, स्वामींनीं मला कृपा करून या वेळेस दर्शन द्यावें. मी लीनतेनें भक्तिपूर्वक तुमच्या चरणांवर मस्तक ठेवीत आहें. मला बाळाला दर्शनास बोलाविलें ह्मणून मी इतका दूर आलों. कांहीं अपराध झाला असेल तर क्षमा करा. मीं संस्कृतांत निपूण नाहीं. भाव, भक्ति, ज्ञान, वैराग्य, वेदशास्त्राध्ययन हें मला कांहींच कळत नाहीं. तुमच्यासारख्यांच्या सेवेच्या योगानें कविता करण्याची शक्ति किंचित् आहे; ह्मणून भागवतास आरंभ केला. एकादशस्कंध झाला आहे; त्याचा अर्थ ध्यानांत आणून पहावा. जर चूक असेल तर मणिकर्णिकेंत बुडवावा. तुह्मीं साक्षात् नारायण आहां. ज्ञानसंपन्न असून क्षेत्रांत असतां. तुह्मींच ग्रंथ अमान्य केल्यास इतर कसें मान्य करील? हें ऐकून तो महंत शांत झाला. मग त्याला शिष्यांनीं सांगितलें कीं, एकनाथ मनुष्य नव्हे; साक्षात् परब्रह्ममूर्त्ति होय. हा जगदुद्धार करावयास वैकुंठपति अवतरला आहे.

व मठांत येऊन अनायासें दर्शन देत आहे; तर पडदा काढून दृष्टीनें पहावें. तेव्हां महंतानें पडदा काढून पाहिलें तों प्रत्यक्ष श्रीकृष्ण. मग त्यास अनुताप झाला. आणि 'त्राहि त्राहि' ह्मणून साष्टांगनमस्कार घातला. पुढें नाथानें मनुष्यरूप धरून त्यास उठविलें. आपला उद्धार झाला असें मानून संन्यासी जयजयकार करूं लागले. 'ओंनमो नारायण' ह्मणून नाथानें त्यास नमस्कार केला. मग नाथास जवळ घेऊन स्वामी आसनावर बसले व प्राकृत ग्रंथ पाहून समाधान पावले. शेवटीं हात जोडून विनंती केली कीं, एका श्लोकाची टीका पांच अध्यायांत केली आहे; तर आतां एथें राहून एकादशस्कंध पुरा करावा. ही त्यांची प्रार्थना नाथानें मान्य केली व तेथें राहून ग्रंथ संपविला.

मग सरस्वतीचें पूजन करावें असा महंतानें बेत करून साहित्य करविलें. क्षेत्रांतील पंडितादि मुख्य मंडळीस आमंत्रण केलें व उत्साहाचें कारण त्यांस कळविलें. तेव्हां ते निंदा करूं लागले व स्वामीनाही बराच ठपका दिला. व कलियुगांत पाखंड माजत चाललें असें ह्मणूं लागले. आणि स्वामींना भूरळ पडली ह्मणून त्यांना दोन गोष्टी सांगून तो ग्रंथ बुडवून टाकण्याचा त्यांनीं घाट घातला. मग ते मठांत येऊन स्वामीस भेटले व त्याचे गुण वर्णन करून, आह्मीं सर्व आपले विद्यार्थी आहों, आपण प्राकृताचा अंगिकार करूं नये; वगैरे बोलून ग्रंथ बुडवून टाकण्याचा त्यांनीं आग्रह धरिला.

एकनाथाचा आह्मीं पुष्कळ प्रकारांनीं छळ केल्यावरून हा साक्षात् विष्णूचा अवतार आहे अशी आमची खात्री झाली आहे अतएव ग्रंथ पुजून मान्य करावा; असें मठाधिपतीनें त्यांना नाना रीतीनें सांगितलें असतांही तें त्यांस रुचलें नाहीं. मग पंडितांनीं नाथापासून तो ग्रंथ मागून घेऊन मणिकर्णिकेंत झुगारून दिला. तेव्हां असा चमत्कार झाला कीं, मूर्त्तिमंत भागीरथी प्रगट होऊन तिनें आपल्या दोन्ही हातांनीं तो ग्रंथ वरचेवर झेलून धरिला; हें पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. भक्तमंडळी आनंदानें टाळ्या वाजवून जयजयकार करूं लागली. मला चंद्रमौळी पावला, असें महंत ह्मणूं लागला. मग त्याणें मणिकर्णिकेंत उडी टाकून ग्रंथ आपल्या हातांत घेऊन

मस्तकावर ठेविला. आणि सर्वांनीं एकनाथाला शरण जावें ह्मणून सांगितलें. त्या वेळीं दुराग्रही लोकांनीं मुकाट्यानें खालीं माना घातल्या व स्वामीच्या पायां पडून आपला अन्याय कबूल केला.

---

# अध्याय २२ वा.

## एकनाथ.

त्या मठाधिपतीनें भक्तिपूर्वक एकनाथाची पूजा करावी ह्मणून सर्व मंडळीस आज्ञा केली. आत्मज्ञानाचा पंडितांस वारा सुद्धां नव्हता, परंतु चमत्कार पाहिल्यानें त्यांची एकनाथावर श्रद्धा जडली व ते पायां पडूं लागले. तेव्हां नाथ ह्मणाले, असें अनुचित कर्म करूं नका. मी ब्राह्मणांचा दासानुदास आहें. मर्जी असल्यास आपण ग्रंथाचें पूजन करावें; त्याचा मला संतोष आहे. हें ह्मणणें सर्वांना रुचलें. मग मुख्य यतीनें हत्ती शृंगारून आणिला व त्यावरील अंबारींत ग्रंथ ठेविला. त्या वेळीं मोठ्या समारंभानें मिरवणूक काढिली. बरोबरची मंडळी भजन करीत जात होती. नगरवासी संपूर्ण लोक हें कौतुक पहात होते. मधून मधून नळे, चंद्रज्योति वगैरे दारूकाम सोडीत असत. बुका, पुष्पें वारंवार उधळीत होते. हा उत्सव सात दिवस एकसारखा होत होता. नित्य ब्राह्मणभोजन होत होतें. सर्व शहरांत मिरवणूक अहोरात्र सात दिवस काढून आठवे दिवशीं मठांत आले. तेथेंही मोठा उत्सव झाला. त्या रात्रीस एकनाथाचें कीर्त्तन झालें. तेव्हां त्यानें आत्मज्ञानाचा कांहीं भाग सांगून भक्तीचा महिमा प्रतिपादन केला. कीर्तनांत सर्वांचीं मनें लुब्ध होऊन गेलीं. चार दिवस कीर्त्तन होऊन पांचवे दिवशीं गोपाळकाला झाला. शेवटीं यतीनें उपदेश केल्यावरून या भागवताची प्रत सर्वांनीं मिळून त्वरित उतरून घेतली. 'रुक्मणीस्वयंवर' हा ग्रंथ नाथानें तेथेंच केला. एकनाथीभागवत स्वामी नित्य वाचीत. नंतर सर्वांच्या परवानगीनें एकनाथ पैठणास जावयास निघाले.

एकनाथ परत येतांना दासोपंताची मार्गांत भेट झाली. ह्या

दासोपंतानें दत्तात्रयाचें दर्शन व्हावें ह्मणून वीस वर्षें एकसारखीं देहाची पर्वा केली नाहीं; थंडी, उन्ह, पाऊस जुमानलें नाहीं; व सर्व परिवाराचा त्याग करून अरण्यांत जाऊन दारुण अनुष्ठान केलें. तो मनुष्याच्या वाऱ्यासही उभा रहात नसे. त्यास दत्तात्रयानें साक्षात् दर्शन दिलें. त्याची तेव्हां दिव्य कांती झाली. तो कविता चांगली करी. पुढें तो जोगाईचें अंबें एथें येऊन राहिला. तो श्रीमंत झाला होता. त्यानें एकनाथाची कीर्ति ऐकलेली होतीच; तशांत भेट झाली तेव्हां तर अनुपम आनंद झाला. त्यानें नाथाचा उत्तम आदरसत्कार केला. एक महिना त्यास ठेवून घेतलें. जातेसमयीं दासोपंतानें त्यास घोडीं, माणसें, द्रव्य वगैरे बरोबर देऊन रवानगी करून देण्याचा ओघ आणिला; परंतु एकनाथानें कांहींच बरोबर घेतलें नाहीं. निघतांना कृष्णजयंतीचा उत्सव घरीं असतो, तर आपण अवश्य यावें ह्मणून सांगितलें; तें ऐकून दासोपंतानें येईन ह्मणून कबूल केलें.

एकनाथ पैठणास येत आहेत असें ऐकून उद्धव व दुसरे भाविक लोक त्यास आणावयास सामोरे गेले. मोठ्या समारंभानें वाजत गाजत त्यांना घरीं नेलें.

पुढें कृष्णजयंतीचा उत्सव जवळ आला; तेव्हां सर्व साहित्याची तयारी झाली. उत्सवास दासोपंत आला. त्यानें दाराशीं दत्तात्रयाची स्वारी द्वारपाळ बनून राहिली आहे असें पाहून त्यास आश्चर्य वाटलें; व साष्टांग नमस्कार घालून एथें उभें राहण्याचें कारण विचारिलें. तेव्हां श्रीदत्तानें एकनाथाची सर्व माहिती करून दिली. मग दासोपंत आल्याची नाथास जाऊन बातमी कळविली; तेव्हां तो आनंदानें त्यास सामोरा गेला. परस्पर पायां पडून भेटल्यावर त्याचा हात धरून नाथानें त्यास घरांत नेलें. उद्धवानें त्याच्या मानसन्मानाची मिसळ लाविली. प्रतिपदेपासून कृष्णजयंतीचा उत्सव सुरू झाला. दशमीस गोपाळकाला व ललित होऊन उत्सव तडीस गेला. मीच दत्तउपासक असें दासोपंतास वाटत होतें; परंतु एकनाथाचें ऐश्वर्य पाहून विस्मित झाला. द्वादशीस पारणें झाल्यावर दासोपंत आपल्या गांवीं गेला.

एके दिवशीं एकनाथ गंगेचें स्नान करून परत घरीं येत असतां वाटेंत एक मुसलमान भुईवर थुंकला; तों एकनाथ त्याच रस्त्यानें जात होता त्याच्या अंगावर ती थुंकी पडली. पण राग आला नाहीं. त्यानें पुनः मुकाट्यानें नदीवर जाऊन स्नान केलें. पण तो मुसलमान अधोगतीस जाईल ह्मणून त्यास त्याचा कळवळा आला. मग दोन मनुष्यांचें अन्न एका पात्रांत घेऊन नाथानें त्या यवनाच्या घरीं जाऊन त्यास नमन करून प्रसाद गृहण करण्याकरितां विनंती केली. झांकण काढून पाहिलें.तों दिव्य अन्न दृष्टीस पडलें. नंतर मुसलमानानें आपला अन्याय कबूल करून एकनाथाजवळ क्षमा मागितली व पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां नाथानें त्यास उचलून आलिंगन दिलें व तूं दोषमुक्त झालास ह्मणून सांगितलें.

एकदां असें झालें कीं, वैशाखाचा महिना, ऐन दोन प्रहर भरलेली, अशा वेळीं एक लहान मूल गंगेच्या रेतींत होतें. रेती तापलेली असल्यामुळें मूल एकसारखें मोठमोठ्यानें रडत होतें. हें एकनाथानें गंगेवरून घरीं जातांना पाहिलें. मग त्या मुलास कडेवर घेऊन चालले. मुलास बोलतां येत नव्हतें ह्मणून तो बोटानें खूण करी त्या धोरणावर तो त्यास घेऊन गेला. आपल्या खोपटाशीं जातांच तो मुलगा मोठमोठ्यानें रडूं लागला, तों त्याची आई बाहेर आली. तिनें आपलें मूल घेतलें. त्या वेळीं हें मूल महाराचें असें समजलें. मग फिरून नदीवर जाऊन स्नान करून नाथ घरीं गेले. ही गोष्ट कोणास माहीत नव्हती. परंतु नाथाची कीर्त्ति प्रगट व्हावी ही पांडुरंगाची इच्छा; ह्मणून असें झालें कीं, एका ब्राह्मणाच्या अंगावर महारोग होता. त्या दुःखानें वैतागून तो त्र्यंबकेश्वरीं अनुष्ठान करूं लागला. तो कंदमुळें खाऊन बारा वर्षें राहिला, तेव्हां त्र्यंबकेश्वराचा त्यास दृष्टांत झाला कीं, तूं गोदातीरीं पैठणास जा. तेथें एकनाथ ह्मणून महान् भगवद्भक्त आहे; त्याची सर्वांभूतीं सारखी दयार्द्रदृष्टि आहे. त्यानें एका महाराचें मूल वाळवंटावर उन्हांत तळमळत पडलें होतें तें उचलून त्याच्या आईपाशीं नेऊन दिलें, तें पुण्य जर तो तुला देईल तर तूं ह्या महारोगापासून मुक्त होशील. असा दृष्टांत झाल्यावर तो पैठणास

एकनाथाची जाऊन चौकशी करूं लागला. तेव्हां नाथ गंगेमध्यें स्नान करीत होता त्यास लोकांनीं दाखविलें. मग त्या रोग्यानें उदकांत जाऊन नाथास त्र्यंबकेश्वरानें दिलेला दृष्टांत निवेदन केला. तो ऐकून एकनाथ जन्मभर केलेल्या पुण्याचें उदक त्याच्या हातावर घालण्यास राजी झाला. परंतु तें त्यानें नाकारल्यावरून जें पुण्य दिलें असतां रोगापासून सुटका होईल असा दृष्टांत झाला होता त्याच पुण्याचें उदक त्याच्या हातावर घातलें. तेव्हां तो रोगमुक्त होऊन त्याची कांती सतेज झाली. हा चमत्कार सर्वांनीं पाहिला.

आणखी एक चमत्कार झाला तो असा कीं, एकनाथानें केलेल्या भागवताचें श्रवण व्हावें ही आपली इच्छा लोकांनीं त्यास जाणविल्यावरून त्यानें भागवत वाचण्यास आरंभ केला. पुष्कळ लोक श्रवणास जात. प्रत्यक्ष गंगा स्त्रिचें रूप धरून पुराण ऐकावयास येऊं लागली. भक्तांच्या रसाळ कथा ऐकून तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रु गळत.

एकनाथाच्या तोंडून भागवत ऐकण्याची इच्छा गंगेस झाल्यानें ती अप्रतिम स्त्रिचें रूप धरून नाथाच्या जवळ बसे. ती अनोळखी गांवकऱ्यांपैकीं नाहीं आणि सुंदर, सौभाग्यवती, तरुण, दिव्य वस्त्रालंकारमंडित असल्यामुळें टवाळ लोकांना नाथाची कुचेष्टा करावयास फावलें. गंगा खालीं मान घालून मुकाट्यानें एकाग्र चित्तानें भागवत ऐकून परत जाई. तेव्हां कुटिळांनीं तिची चौकशी करण्याकरितां तिच्या मागोमाग जाण्याचा घाट घातला.

ही गोष्ट नगरांत प्रगट झाली. तेव्हां पुराणाच्या मिषानें तिला पहाण्यासाठीं पुष्कळ टवाळ लोक येऊं लागले. मग तिचा एके दिवशीं शोध करावयाचें मनांत आणून तिच्या मागून जाऊन पाहिलें तों ती गोदावरींत गुढघ्या इतक्या पाण्यांत जाऊन तेथें गुप्त झाली. तेव्हां ही गंगा असें समजून त्यांना पश्चात्ताप झाला.

दुसरे दिवशीं गंगा न आल्यानें तिची क्षणभर वाट पहावी व नंतर वाचण्यास आरंभ करावा; असें नाथानें बोलून दाखविल्यावर टवाळ लोक त्यास शरण गेले. त्यांणीं मुळारंभापासून सर्व वृत्तांत कळविला व आपला अन्याय कबूल केला; आणि क्षमा [illegible]

विनंती करूं लागले. त्यांना एकनाथानें सांगितलें कीं, तुमच्या पदरीं सुकृत होतें ह्मणून तुह्माला गंगेचें दर्शन झालें. तुमची सर्व पातकें जळून गेलीं. आतां चित्तांत कांहीं एक संशय न आणितां भागवत श्रवण करावें.

---

## अध्याय २३ वा.

### एकनाथ.

एक व्यापारी गृहस्थ एकनाथाच्या शेजारीं रहात असे; पण तो त्याच्या घरीं कधीं जात नसे. त्याणें पुराण, कीर्त्तन कधींही कोठें ऐकलें नव्हतें. गंगेवर स्नानाला न जातां घरींच उष्ण पाण्यानें स्नान करी. तो असा अभक्त असून अनाचारी होता. त्याची अशी स्थिति पाहून एकनाथास दया आली; व ईश्वरभजनाकडे त्याचें मन वळवावें असें मनांत आलें. मग एके दिवशीं नाथानें त्यास मार्गामध्यें गांठलें; व आपण कोण, आपली घरची व्यवस्था कशी काय असें विचारिलें असतां, त्यानें सांगितलें कीं, मी तुमच्या शेजारींच असतों. माझी बायको मुलें घरीं आहेत. एका व्यापाऱ्याकडे मला चाकरी आहे. गरिबीनें गुजारा चालवितों. असें सांगितल्यावर एकनाथ ह्मणाला, माझें तुझ्याजवळ एक मागणें आहे. तेव्हां हा कांहीं द्रव्य मागत असेल असें मनांत आणून तो उगाच राहिला. तेव्हां नाथ ह्मणाला, मी तुमच्याजवळ द्रव्य मागत नाहीं. तुह्मीं क्षणभर आपल्या कामांतल्या कामांत अवकाश करून कीर्त्तनास येत जा. फुरसुत नसेल तर मी तुह्मांस विष्णुसहस्रनामांतील एक श्लोक सांगतों तो नित्य ह्मणत जा; तेणेंकरून तुह्मीं कृतार्थ व्हाल, असें ह्मणून एक श्लोक लिहून दिला. तो पाठ झाल्यावर त्याची मती पालटली. मग दुसरे दिवशीं त्यानें नाथास दुसरा श्लोक विचारला व तोही पाठ केला. याप्रमाणें सर्व विष्णुसहस्रनाम त्याच्या मुखोद्गत झालें. पुढें त्याला विष्णुसहस्रनाम ह्मटल्यावांचून तसेंच नाथाचे चरण वंदन केल्यावांचून चैन पडत नसे. पुढें तो देवदर्शनास व कथापुराणास जाऊं लागला. असे बरेच दिवस

लोटल्यावर नवज्वर होऊन तो मरावयास टेंकला. त्यानें अंतकाळीं विष्णुसहस्रनामाचा घडघडीत पाठ केल्यामुळें यमाच्या दुतांचें कांहीं चालूं न देतां विष्णुदुतांनीं त्यास वैकुंठास नेलें.

नाथाच्या कुटुंबाचें नांव गिरिजाबाई. तिला प्रथम कन्या झाली, तिचें नांव गोदूबाई. तिला पैठण गांवांतच दिली होती. तिच्या पाठीवर मुलगा झाला, त्याचें नांव हरी असें ठेविलें. त्यावर कन्या झाली तिचें नांव गंगाबाई. ही कर्नाटकांत दिली होती; तिला एक पुत्र झाला त्याचें नांव पुंडाजी. तो मोठा भगवद्भक्त होता. असो. एकनाथाचा पुत्र हरी याचा व्रतबंध झाल्यावर तो सर्व शास्त्रांत निपुण झाला. पैठणांतील सर्व विद्वानांवर त्याची मात्रा असे. तो सर्वांस मान्य होऊन लोक त्यास हरिपंडित ह्मणूं लागले; व एकनाथापेक्षां त्यास वाखाणूं लागले.

मी साही शास्त्रांत निपुण व संस्कृतांत पटाईत असतां बाप प्राकृत वाचतो, तेणेंकरून मला हा कलंक लावितो; तर आतां देशत्याग करावा असें वाटून हरिपंडितानें काशीस जाऊन राहण्याचा निश्चय केला. त्यास तीन मुलगे होते, त्यांतून धाकटा मुलगा राघोबा आजाजवळ ठेवून दोघे मुलगे व बायको घेऊन जन्मभर राहण्याच्याच बेतानें तो काशीस गेला. राघोबा, आईबाप व भाऊ जवळ नसल्यामुळें अगदीं खंती नसे. तो आजाच्या मागें उभा राहून कीर्त्तनांत सूर देई. एके दिवशीं नाथानें त्यास अनुग्रह दिला. तो नाथाचें नांव बुडूं देणार नाहीं असें लोक बोलूं लागले व त्यास वाखाणूं लागले. इकडे काशींत हरिपंडिताची मानमान्यता बरीच झाली. त्यास तेथें पुष्कळ द्रव्य मिळालें. मग एक मोठा वाडा बांधून त्यांत तो राहिला.

पुढें कांहीं दिवसांनीं एकनाथाच्या मनांत आलें कीं, आपला पुत्र हरि हा विद्येच्या ताठ्यानें फुगून गेला आहे; तर त्याचा अभिमान जिरवून त्यास एथें घेऊन यावें व भक्तीकडे लावून आपला अवतार समाप्त करावा. असा विचार करून तो काशीस गेला. प्रथम मणिकर्णिकेचें स्नान करून विश्वेश्वराचें दर्शन घेतलें. मग हरिपंडिताच्या घरीं गेला. उभयतांच्या मोठ्या प्रेमानें भेटी झाल्या. त्या वेळीं त्यांस अ-

त्याल्हाद झाला. एकनाथ काशीस बरेच दिवस राहिला, तोंपर्यंत हरिपंडित त्याच्या सेवेंत तत्पर असे. एकनाथाच्या भागवताच्या वेळेस झालेला अत्यद्भुत चमत्कार काशींतल्या पंडितांस माहीत होताच; ह्या-मुळें ते नाथाची पूर्णपणें योग्यता जाणून होते. त्यांणीं ते सर्व चमत्कार हरिपंडितास सांगून मठांतले महंत, संन्यासी यांणींही त्यास नाथाच्या आज्ञेंत वागण्याविषयीं पुष्कळ उपदेश केला; तेव्हां मी त्याच्या आज्ञेबाहेर नाहीं ह्मणून हरिपंडितानें उत्तर दिलें.

एके दिवशीं एकनाथानें हरीस एकांतीं जवळ बसवून उपदेश केला कीं, आतां माझा वृद्धापकाळ झाला व प्रयाणाचे दिवस जवळ येऊन ठेपले आहेत; तर राहिलेले दिवस तुझ्या संगतीनें काढावे असा माझा हेतु आहे. तुझ्या वियोगानें मला दुःसह दुःख होत आहे. तूं माझा पुत्र पण पैठणास राहिलास तर लौकिक वाढेल. तूं तेथें रहा. व तुझ्या दोघां मुलांना एथें राहूं दे. असें ऐकून घेतल्यावर हरिपंडितानें सांगितलें कीं, मी तुमच्या ह्मणण्याप्रमाणें तेथें येऊन रहातों; परंतु मी सांगतों तें तुमच्यानें होणार नाहीं. तें हें कीं, तुह्मीं तेथें प्राकृत पुराण वाचूं नये व दुसऱ्याकडचें अन्न सेवन करूं नये. ह्या दोन गोष्टी जर तुह्मांस कबूल होत असतील तर मी तेथें येतों. हें ऐकून नाथानें सांगितलें कीं, तुला न आवडणाऱ्या या गोष्टी मी करणार नाहीं. तेव्हां हरीला समाधान वाटलें. मग तो पित्यासह पैठणास आला. लोक आनंदानें उभयतांस सामोरे गेले. त्या दिवशीं कीर्त्तन होईल अशी भाविक लोकांना मोठी आशा होती; परंतु कीर्त्तन झालें नाहीं.

दुसरे दिवशीं हरिपंडिताचें संस्कृत पुराण झालें. त्या दिवशीं मोठमोठे वैदिक, महंत, विद्वान् मंडळी सुद्धां पुराणास आली. नाथही ऐकावयास बसले. पुष्कळांचा हेतु नाथाचें पुराण ऐकण्याचा होता; परंतु मी प्राकृत पुराण वाचणार नाहीं व दुसऱ्याकडचें अन्न घेणार नाहीं असें नाथानें कबूल करून हरिपंडितास आणिलें असल्याची वार्त्ता नगरांत कळली. भाविक लोक, आमचें नशीब फुटकें असें ह्मणूं लागले. अडाणी बायका व शुद्रादिकांना समज पडेना ह्मणून त्यांनीं संस्कृत पुराणास येण्याचें टाकिलें. नाथ पुराण वाचीत तेव्हां

वाडा श्रोत्यांनीं गच्च भरून जात असे; परंतु हरिपंडिताच्या पुराणास दहा पांच मंडळी. यामुळें वाडा भणभणित दिसत असे.

एकदां असा एक चमत्कार झाला कीं, पैठणास एका श्रीमंत ब्राह्मणाच्या बायकोनें रुक्मिणीनाथास सहस्त्रब्राह्मणभोजन घालण्याचा नवस केला. परंतु पुढें द्रव्याची वाताहात झाली; भ्रतार मरण पावला; व अन्नास महाग होऊन वेळेवेळेची पंचाईत पडूं लागली. ती कोणाचें काम करून आपला निर्वाह चालवी; परंतु तिच्या जिवास नवस फिटला नसल्याचें नेहमी टोंचे. ती नित्य नाथाचे पुराणास जात असे. तिणें एका ब्राह्मणास आपली स्थिति सांगून व ही नवसाची हकीगत कळवून देवाच्या ऋणांत राहिल्याची दिलगिरी दर्शविली. तेव्हां त्याणें तिला सांगितलें कीं, ज्यास वेदाक्षर माहीत नाहीं व नुसता गायत्रीमंत्र शिकला आहे असे शंभर ब्राह्मण जेविले, तर एक वैदिक ब्राह्मण जेविल्याबरोबर आहेत; शंभर वैदिकांबरोबर एक महापंडित; त्या शंभरांच्या ठिकाणीं एक अनुष्ठानी; त्या शंभरांच्या बरोबर एक इंद्रियजित; अशा शंभरांच्या बरोबर एक विष्णुभक्त होय. विष्णुभक्तांच्या ठिकाणीं मत्सर रहात नाहीं. जो शत्रु मित्र समान मानून सर्वांना ईश्वररूप पहातो असा एकनाथ आहे, त्यास भोजनास बोलाविल्यानें लक्ष ब्राह्मणभोजनाचें श्रेय येईल. हें ऐकून तिला संतोष वाटला. मग एकनाथास जेवावयास बोलवावयाचें ह्मणून तिनें नाना प्रकारचीं पक्वान्नें तयार करण्याची सामग्री आणून ठेविली. मग त्याच गृहस्थास बरोबर घेऊन नाथास आमंत्रण द्यावयास गेली. तेव्हां त्यानें हें हरीला विचारावयास सांगितलें. नंतर हरिपंडिताजवळ जाऊन त्या गृहस्थानें बाईची सर्व हकिगत त्यास निवेदन करून तिचा हेतु कळविला; तेव्हां त्यास राग आला. तो ह्मणाला, आतां महायात्रा करून नाथ आले आहेत; यास्तव दुसऱ्याचें अन्न घेण्याचें त्यांनीं वर्ज केलें आहे. हें ऐकून तिची निराशा झाली व ती एकनाथाजवळ येऊन हात जोडून उभी राहिली. त्या समयीं तिचा भाव पाहून नाथ संकटांत पडले व त्याणें पुत्रास बोलावून इचा हेतु पूर्ण करावा ह्मणून ह्मटलें. हें ऐकून हरिपंडितानें सांगितलें कीं

तुह्मीं आपलें वचन पाळा ह्मणजे झालें. मी तुमच्या वचनावर भरंवसा ठेवून आलों आहें. तेव्हां नाथानें त्याची समजूत करून सांगितलें कीं, मी तुला दिलेलें वचन न मोडतां या बाईची इच्छा पूर्ण होऊन तिचा नवस फिटेल अशी तजवीज सांगतों. ती अशी कीं, तूं आपल्या हातानें तेथें जाऊन स्वयंपाक कर व आपण तेथें दोघे जेवूं; ह्मणजे दोन्ही कार्यें सांग होतील. मग नाथाच्या भिडेस्तव त्याच्यानें नाहीं ह्मणवेना; परंतु आपण केलेले पदार्थ निष्फळ होणार असें पाहून त्या बाईनें आपली दिलगिरी दर्शविली. तेव्हां आह्मीं जेवावयास बसल्यावर 'तूं केलेले पदार्थ वाढ' ह्मणून नाथानें सांगितलें; तेव्हां तिला आनंद झाला.

दुसरे दिवशीं हरिपंडितानें तिच्या घरीं जाऊन स्वयंपाक केला. ती घरची एकटी असल्यामुळें पुनः बोलावण्याची वाट न पहातां नाथ तिजकडे भोजनास गेले. मग तिच्याकडून 'भोक्ता जनार्दन' असा संकल्प सोडवून पितापुत्र भोजनास बसले. नंतर पुरणपोळ्या, वडे, भजीं असे पदार्थ तिनें नाथास वाढिले व तो कांहीं न बोलतां लगबगीनें लवकर जेवला. तेव्हां हरीस राग आला व मनांत ह्मणाला, जर असें दुसऱ्यांचें अन्न भक्षण करावयाचें होतें तर माझ्यापासून स्वयंपाक करविण्याची खटपट कशाला करविली? त्याची त्या वेळची रागीट मुद्रा पाहून ह्मातारी थरथर कापूं लागली. तो पित्याची अमर्यादा केल्याचा महादोष आहे ह्मणून त्या वेळीं ज्यास्त न बोलतां मुकाट्यानें जेवला.

दोघे जेवून तृप्त झाले. मुखशुद्धि केल्यावर आपलीं दोन्ही उष्टीं काढावयास नाथानें हरीस सांगितलें. तेव्हां त्यानें नाथाची पत्रावळ उचलून आपल्या पत्रावळीवर ठेविली. पण तेथें दुसरी आहे असें पाहून त्यास आश्चर्य वाटूं लागलें. मग दुसरी उचलली, तों तिसरी आहेच. चार, पांच, दहा अशीं हजारों पात्रें उचललीं; परंतु पत्रावळ जाग्यावर आहेच. हें पाहून त्यास पश्चात्ताप होऊन त्यानें नाथास साष्टांग नमस्कार घातला; आणि प्रार्थना केली कीं, हे पुराणपुरुषा, तूं अव्यक्त, अविनाशी आहेस. हे वैकुंठाच्या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या जगद्गुरो, तुझा महिमा मीं न जाणल्यामुळें माझ्याहातून थोर

अमर्यादा घडली. तूं साक्षात् श्रीविष्णूचा अवतार आहेस हें मला पूर्णपणें कळून आलें. आतां हें लीलाचरित्र आवरून मजवर कृपा करावी. अशी प्रार्थना करून चरणांवर मस्तक ठेविलें. मग नाथानें 'आतां अधिक पत्रावळ्या निघणार नाहींत' म्हणून सांगितलें.

मग उष्टीं काढल्यावर हरीपंडित तिला ह्मणाला कीं, तुझें भाग्य थोर ह्मणून तूं नाथास आमंत्रण दिलेंस. तुला खरोखर लक्ष ब्राह्मणभोजनाचें पूण्य घडलें; असें मी अनुभव घेऊन सांगतों. मग म्हातारीनें नाथाच्या पायांवर मस्तक ठेविलें. असो. हरिपंडितास आपल्या विद्येची मोठी घमेंडी होती ती नाहींशी झाली. मग तो निराभिमानानें नाथास म्हणाला, आतां समर्थांना वाटेल तेथें भोजनास जावें व प्राकृत ग्रंथ वाचावे. नंतर ते उभयता आपल्या घरीं गेले.

---

# अध्याय २४ वा.

## एकनाथ.

विद्याभिमानानें फुगलेला हरिपंडित हा नाथाची उष्टी पत्रावळ काढीत असतां सहस्रावधि पत्रावळी नवीन निघत होत्या त्या काढिल्या असतांही संपल्या नाहींत. पत्रावळी उचलतांना तो हलक होऊन घामाघूम झाला. तेव्हां त्यानें निराभिमान होऊन एकनाथास साष्टांग नमस्कार घातल्यावर पत्रावळी निघावयाच्या बंद झाल्या. ही गोष्ट बाहेर कोणास माहीत नव्हती; परंतु त्या पत्रावळ्यांचा भारा बांधून जेव्हां ती ह्मातारी ब्राह्मणीण गंगेंत टाकावयास गेली तेव्हां हें वर्त्तमान गांवभर झालें. पुढें हरिपंडित प्रेमळ भक्त झाला. तो नित्य नाथाचें पुराण कीर्त्तन ऐकावयास अति उल्हासानें बसे.

दुसरा एक चमत्कार असा झाला कीं, गंगातीरीं एके खेडेगांवांत एक ग्रामलेखक ब्राह्मण रहात असे. त्यास मुलेंबाळें पुष्कळ होतीं. त्या सर्वांच्या पोटापुरती सुद्धां त्यास कमाई होत नसे. तो गरिबीनें आपली उपजीविका चालवी. त्याचा शेवटचा मुलगा वेडा, वांकडा व मुका असा होता; त्याचें नांव गावजी असें ठेविलें होतें. तो आर

वर्षांचा झाला तरी त्यास बोलतां येईना. त्याचें सर्वदां खेळामध्यें ध्यान. त्याचा व्रतबंध केला; परंतु केशव, नारायण हे शब्द देखील ह्मणतां येईनात, मग गायत्रीमंत्राच्या उच्चाराचें नांव कशाला हवें? आईबापास, ह्याची पुढें कशी गत होईल, ही काळजी रात्रंदिवस असे.

एके सणास त्याच्याकडे पुरणाच्या पोळ्या केल्या होत्या. त्या मुक्या मुलानें खाल्ल्यावर दुसऱ्या दिवशींही त्याणें त्या पुनः खुणेनें मागितल्या. तेव्हां आईनें शिळी उरलेली पोळी त्यास दिली. तिसरे दिवशीं पुनः मागितली. तेव्हां आईस राग आला व ती गावजीला मारूं लागली; व ह्मणाली, करंट्या, पोटीं येऊन असा कां छळतोस? तेव्हां तो मोठमोठ्यानें रडूं लागला. त्यानें भाजीभाकर खाल्ली नाहीं व पुरणपोळीचा हट्ट सोडिला नाहीं. मग तिला त्याची दया आली तरी त्याचा छंद तिच्यानें पुरवला नाहीं. नंतर ती त्यास घेऊन पैठणास गेली. व एकनाथाचें दर्शन घेऊन त्याच्या पायांवर त्यास घालून ह्मणाली, माझ्या या गावजीचा आतां स्वामींनीं अंगिकार करावा. हा नऊ वर्षांचा झाला आहे; पण अजून एक शब्दसुद्धां बोलत नाहीं व रोज गोड गोड खावयास मागतो. आमचा पडला गारिबी विचार. याला दररोज मिष्टान्न कोठून द्यावें? आपल्याकडे नित्य गोड गोड होतें; तर आतां मी ह्यास तुमच्या स्वाधीन करितें. मग एकनाथानें त्यास आपल्याकडे ठेवून घेतलें व गिरिजाबाईस हांक मारून सांगितलें कीं, ह्या मुलावर लोभ ठेवून ह्याचा चांगला प्रतिपाळ कर. असें नाथानें सांगितल्यावर ती त्यास घरांत घेऊन गेली; व स्नान घालून जेवावयास बसविलें. आपला मुलगा सुस्थळीं पडला असें पाहून गावजीची आई आनंदित झाली व नाथाना नमस्कार करून आपल्या गांवीं गेली; व पतीस दोन गोष्टी सांगून त्याचेंही तिनें समाधान केलें.

इकडे गावजीस खाण्यापिण्याची व कपड्यालत्त्याची वाण नसल्यामुळें तो आईबापांसाठीं खंती न होतां खुशाल आनंदानें खेळे. एके दिवशीं एकनाथ देवघरांत बसला असतां त्यानें गावजीस बोलावून रामनामाचा जप सांगितला; परंतु तो मुका असल्यामुळें त्याच्यानें उ-

च्चार होईना

नंतर माझें नांव काय ह्मणून नाथानें विचारिल्यावर

त्यास वाचा फुटून 'एकनाथ' ह्मणून सांगितलें. मग नाथानें त्यास तोच जप निरंतर करावयास सांगितला. त्या दिवसापासून त्याचे खेळ वगैरे सर्व छंद सुटून तो एकसारखा रात्रंदिवस जप करूं लागला. त्याची अशी मति पालटलेली पाहून लोकांस नवल वाटलें. त्याचीं आईबापें एकदां त्यास भेटावयास गेलीं; परंतु त्यानें त्यांच्याकडे पाहिलेंसुद्धां नाहीं.

या गोष्टीस कांहीं दिवस लोटल्यानंतर एके दिवशीं एकनाथ देवघरांत ध्यानस्थ बसले असतां, श्रीरामचंद्रानें तेथें प्रगट होऊन त्यास सावध केलें. श्रीराममूर्त्ति पाहतांच नाथानें त्याच्या पायीं मिठी मारिली. मग रामानें त्यास वाल्मीकिरामायणाचें प्राकृत रामायण करण्याची आज्ञा केली. ती ऐकून एकनाथ ह्मणाला, सातकांडें रामायण माझ्याहातून तडीस जाईल असें दिसत नाहीं; कारण आयुष्यमर्यादा अगदीं थोडी उरली आहे. तेव्हां रामानें सांगितलें कीं, स्नानसंध्या, नित्यनेम वेताबातानें उरकून सर्वकाळ रामायण लिहावें. तुझें भक्तिप्रेम अद्भुत होय. तुझीं वचनें मला खरोखर मनापासून आवडतात. यास्तव 'भावार्थरामायण' हें नांव तुझ्या ग्रंथास ठेवावें. मी तुझ्या हृदयांत राहून तुला स्मरण देईन. काळ तुझ्या स्वाधीन आहे; त्याची चिंता तूं करूं नको. हें ऐकून एकनाथ ह्मणाला, देवा, तुझी आज्ञा मला प्रमाण आहे; असें ह्मणून पायां पडला. मग अयोध्यापति गुप्त होऊन नाथाच्या हृदयांत राहिला.

मग एकनाथानें सुमुहुर्त्तावर रामायणास आरंभ केला; तेव्हां भाविक मंडळीस मोठा आनंद झाला. जितका ग्रंथ नित्य होई तितका श्रोत्यांस ऐकवीत; तो ऐकून त्यांस अत्यंत आनंद होई. बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंदाकांड, सुंदरकांड हीं पुरीं होऊन युद्धकांडाचे चव्वेचाळीस अध्याय संपूर्ण झाले; तों प्रयाणसमय संन्निध येऊन ठेपला. ही गोष्ट त्यानें सर्वांना सांगितली. ती ऐकतांच सर्वांना वाईट वाटलें. मग संपूर्ण रामायण झालें नाहीं ह्यास्तव युद्धकांड पुरें करून शेवटचें उत्तरकांड संपल्यावर मग प्रयाणकाळ नेमावा; अशी सर्वांनीं प्रार्थना केली. [illegible]

कीं, काळाची वेळ चुकणार नाहीं. तेव्हां कितीएक ह्मणाले कीं, कृष्णदास लोळ्या तुम्हांस शरण आला तेव्हां काळाला तुम्हीं अकरा दिवस थांबवून घेऊन त्याच्यापासून युद्धकांड पूर्ण करविलें; त्याच प्रमाणें आतां काळास थांबवून हा ग्रंथ संपूर्ण करावा. तेणेंकरून सर्वांस संतोष वाटेल. हें ऐकून नाथानें सांगितलें कीं, काळाला शिक्षा करून मीं आपलें कवित्व सिद्धीस न्यावें ही गोष्ट मला अनुचित होय. यास्तव बाकी राहिलेलें युद्धकांड व उत्तरकांड गावजी सिद्धीस नेईल; ह्यांत अंतर पडणार नाहीं. मग, गावजी तर बुद्धि-हीन आहे, त्याच्या हातून हें कार्य कसें तडीस जाईल? अशी लोकांनीं नाथास सुचना केली. त्या वेळीं नाथानें गावजीस हांक मारून त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेविल्यावर आपली लेखणी त्याच्या हातांत दिली व आमच्या देहांतील कवित्वशक्ति तुला येवो म्हणून म्हटलें.

एकनाथानें आपला वरदहस्त गावजीच्या मस्तकावर ठेविल्यानंतर त्याची बुद्धि प्रफुल्लित झाली. मग तो ग्रंथ लिहूं लागला. त्यानें नाथाच्या साम्यतेच्या ओव्या रचिल्या. एक अध्याय संपल्यावर तो श्रोत्यांस वाचून दाखविला; तेव्हां याच्या हातून ग्रंथ पुरा होईल अशी त्यांची खात्री झाली. नाथाच्या देखत एक अध्याय झाला. राहिलेला ग्रंथ त्यानें मागाहून सिद्धीस नेला.

फाल्गुन वद्य पंचमीच्या रात्रीस एकनाथाचें शेवटचें कीर्तन झालें. खिरापत वांटल्यानंतर नाथानें विनंती केली कीं, उदईक आमचें प्रयाण आहे; तर सर्वांनीं स्नान करून यावें व आह्मांस गंगेपर्यंत पोंचवावें. नाथ अवतार समाप्त करणार ह्मणून सर्वांना खेद झाला. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं वाड्यांत गर्दी जमली. तेव्हां एकनाथ व्याकुल होऊन मूर्च्छित पडला, अशी अवस्था पाहून भाविक लोक दुःखानें रडूं लागले; पण निंदक म्हणूं लागले कीं, पाहिजे तेवढीं चमत्कारिक चित्रें दाखविलीं, पण मरण तर एकसारखेंचना? आतां लोकांच्याच [illegible]ावर नाथाचें शरीर जाईल! त्या वेळीं भाविकांना अतिशय वाईट [illegible]लें. ते नाथाच्या लीला मनांत आणून ह्मणाले कीं, जगाचा उ[illegible]व्हावा ह्यासाठींच तुझा सगुण अवतार. यास्तव लोकांप्रमाणें

तुला मरण नसावें; असा आमचा हेतु आहे. मग भाविकांचे मनोरथ पाहून एकनाथ सावध होऊन बसला. असें पाहून सर्वांनीं विठ्ठलनामाची गर्जना करून टाळ्या वाजवून जयजयकार केला. पुढें नाथानें उद्धवाकडून स्नानास उदक आणविलें. स्नान करून धुतलेलें धोतर नेसले. मग आसनावर बसून गोपीचंदनाचे टिळे लाविले. गळ्यांत तुळशीच्या माळा घातल्या. जनार्दनस्वामीचें स्मरण करून तारकमंत्राचा मनांत उच्चार केला. मग विणा घेऊन विठ्ठलाचें भजन केलें व त्याचें रूप ध्यानांत आणून नामाची गर्जना करून दाड्यांतून निघाले. त्या वेळीं लोक त्याची पूजा करूं लागले व आरत्या ओंवाळूं लागले. नाथाकडे पाहून आबालवृद्धांच्या डोळ्यांतून आंसवें गळूं लागलीं. त्याचें दर्शन पुन्हा दुर्लभ ह्मणून लांबलांबून लोक आले. मंडळी नाथाबरोबर भजन करीत गंगेवर लक्ष्मीतीर्थ आहे तेथवर मिरवत गेली. तेव्हां देवांनीं विमानांतून नाथावर निलोत्पल पुष्पांची वृष्टि केली, ती सर्वांनीं पाहिली..

नाथानें गंगेच्या वाळवंटावर उभें राहून, सर्वांनीं लक्षपूर्वक श्रीहरीचे गुण ऐकण्यासाठीं लोकांना आज्ञा केली. मग सर्व मंडळी बसल्यावर नाथानें कीर्त्तन केलें. त्या वेळीं अत्यद्भुत भक्तीची मात्तबरी वर्णन केली. आणि ध्यानांत ठेवावयास सांगून ह्मणाले कीं, कलियुगामध्यें तरणोपाय होण्यास नामावांचून अन्य सुलभ साधन नाहीं. 'सर्वांभूतीं दया असावी' हें वचन निरंतर ध्यानांत असूं द्या. तुमच्या हितासाठीं आह्मांस मृत्युलोकीं यावें लागतें. एऱ्हवीं मी मायातीत चैतन्यघन आहे. अशा उपदेशाचें नाथाचें कीर्त्तन झालें; नंतर नामघोष करून नमस्कार घातला. आणि आतां 'सर्वांनीं कृपा असूं द्यावी' अशी हात जोडून प्रार्थना केली. तेव्हां सर्वांना वाईट वाटून 'जय नाथ एकनाथ' ह्मणून नमस्कार घातला.

पुढें एकनाथ चालत गंगेच्या उदकांत गेले आणि बेंबी ध्या पाण्यांत उभे राहिले. मग सर्वांकडून हरिनामाचा गजर [illegible]न कुडींतून प्राण सोडिला; त्या वेळेस देवांनीं पुष्पांचा वर्षाव केला [illegible]

लोकरिवाजाप्रमाणें नाथाचा देह दहन केला व सर्व लोक शोक करीत घरोघर गेले.

दुसरे दिवशीं रक्षा भरून टाकण्यासाठीं पुत्रास घेऊन लोक गेले, तों तेथें कृष्णतुळस व अश्वत्थवृक्ष उगवला होता. तेव्हां सर्वांना आनंद झाला; व अश्वत्थरूपानें एकनाथ पुनः प्रगट झाले असें ह्मणूं लागले. मग मध्यें अश्वत्थवृक्ष ठेवून तेथें वृंदावन बांधिलें. व नाथांच्या पादुकांची स्थापना देउळांत केली. तें स्थान अद्यापि तेथें आहे. तेथें सेवा करणारांचे मनोरथ पूर्ण होतात. पैठणास षष्टीचा उत्सव होत असतो. वृंदावन फुटेल ह्मणून अश्वत्थ तितकाच लहान आहे. हा चमत्कार अद्याप तेथें आहे. नाथांच्या पादुकांच्या दर्शनानें असंख्य जीव उद्धरतात.

---

# अध्याय २५ वा.

## विश्वंभर व अमाबाई.

### विश्वंभर.

विश्वंभरबावा ह्मणून तुकारामाचा मूळपुरुष मोठा भक्त होता. तो पांडुरंगाची आराधना करी. सचोटीनें व्यापारधंदा करी व कदापि खोटें बोलत नसे. त्याची दानधर्माकडे चांगली श्रद्धा होती. तो अतितअभ्यागत, साधुसंत, ब्राह्मण इत्यादिकांचा चांगला सत्कार करी. तो कीर्त्तन करीत असे. त्याला सर्वांचा कळवळा येई. परोपकाराकारितां तो प्राणापलीकडे झटत असे.

एके दिवशीं विश्वंभराच्या आईनें त्यास बोध केला कीं, तूं पंढरीस जाण्याची तयारी कर. तुझे वाडवडील पंढरीची वारी करीत आले; त्यांत खंड न पाडतां वागशील तर तुझा संसार सफळ होईल. आधींच विश्वंभर हा प्रेमळ भक्त, तशांत मातोश्रीचा उपदेश; तो त्यानें श्रुतिसमान मान्य केला. त्यानें आईला सांगितलें कीं, तुझा उपदेश माझ्या मनांत पूर्ण ठसला. आतां मी पंढरपुरास जातों. असें बोलून तिला नमस्कार करून निघाला. तो वारकऱ्यांच्या संगतीसोबतीनें

पंढरपुरास गेला. चंद्रभागेचें स्नान करून पुंडलिकाचें दर्शन घेतलें. क्षेत्रप्रदक्षिणा करून महाद्वारांत गेला. तेथचें कीर्त्तन ऐकून त्याला संतोष झाला. मग पांडुरंगाची मूर्त्ति पाहून समाधान वाटलें. तो पांच दिवस पंढरपुरास राहून घरीं गेला व मातोश्रीस नमस्कार करून त्यानें पंढरपुरांतील सकल वृत्तांत तिला निवेदन केला. त्या विश्वंभराच्या अंतःकरणांत पांडुरंगाचें स्वरूप पूर्ण ठसलें होतें. त्यास पांडुरंगाच्या भेटीचा निजध्यास लागला.

एके समयीं नवमीस विश्वंभर पंढरीस जावयास निघाला. तेथें गेल्यावर चंद्रभागेंत स्नान करून पांडुरंगाचें दर्शन घेतलें; व प्रेमानें पायीं मिठी घातली. तो अगदीं विदेही होऊन गेला. दशमीस एकभुक्त राहिला; एकादशीस उपोषण केलें व त्याच रात्रीस कीर्त्तन ऐकिलें. द्वादशीस पारणें केलें. तेव्हां पंक्तीस कांहीं वैष्णव होते. तीन दिवस राहून मग पांडुरंगाचा निरोप घेऊन आपल्या गांवीं निघाला. त्या वेळीं त्याचे डोळे पाण्यानें भरून गेले. तो ह्मणाला, देवा, तुझा वियोग मला सहन होत नाहीं. असें विश्वंभराचें भाषण ऐकून पांडुरंगानें त्यास सांगितलें कीं, माझ्यावांचून रिती जागा कोठेंच नाहीं. जसें आकाश वायूनें भरलें आहे, तद्वत् मीच हें चराचर व्यापिलें आहें. सुवर्णाचे नानाप्रकारचे अलंकार केले तरी सोनें, व ते दागिने मोडून आटले तरी सोनेंच. त्याप्रमाणेंच अज्ञानास जगाचा भास होतो; परंतु सर्व मीच आहें. व प्रळयांतीं तरी मीच रहाणार; असा माझा ऐश्वर्ययोग जाणून तूं देहूस जा. अशा रीतीनें पांडुरंगानें विश्वंभराची समजूत केली असतां त्याचें ह्मणणें असें पडलें कीं, हें तुझें ज्ञान तूं तुझे पाशींच ठेव. माझी प्रीति सगुण रूपाच्या ठिकाणीं जडली आहे. तुझें निराकार विराटरूप वेदांनाही अतर्क्य त्याला मी काय करूं? मी आलिंगन कोणास देऊं? गुण कसे गाऊं? तुझी भक्ति कोणत्या रीतीनें करूं? तुझीं चरित्रें कशीं ऐकूं? असें तो बोलूं लागला; तेव्हां रुक्मिणीकांतानें त्याच्या मस्तकावर हात ठेवून व हरिनाममंत्राचा उपदेश करून त्यास देहूस पाठविलें.

मग तो दर एकादशीस पंढरीस जाऊं लागला. ...

ज्येष्ठापर्यंत तो सोळा वेळां पंढरीस गेला. त्याच्याविषयीं लोक नाना तर्क करूं लागले, व जर हा संसाराला विटला असता तर पंढरीस रहाता, याच्या नशिबीं प्रपंच ना परमार्थ असें ह्मणूं लागेल. कित्येक असेंही ह्मणत कीं, ह्याच्यासारखा निष्ठावंत दुसरा कोणी नाहीं; परंतु विश्वंभर निंदेकडे किंवा स्तुतीकडे अगदीं लक्ष देत नसे. त्याची सर्वांठायीं समदृष्टि असून त्यास मान अपमान पहाणें अगदीं आवडत नसे. विश्वंभर आठ महिन्यांत सोळा वेळां पंढरपुरास गेला; व पुढेंही असाच क्रम ठेवणार असें पाहून पांडुरंगानें विश्वंभराच्या स्वप्नांत अष्टमीच्या रात्रीस येऊन असा दृष्टांत दिला कीं, तूं मला ऋणी केलेंस. आतां तूं पंढरीस येऊं नको; मीच एथें आलों आहें. तुझे मजवर बहुत उपकार झाले; ते माझ्यानें फिटावयाचे नाहींत. असें बोलून विठोबा अंब्याच्या वनांत जाऊन निजले. ह्याप्रमाणें विश्वंभरास स्वप्न पडल्यामुळें त्यानें ही गोष्ट गांवांतील भाविक लोकांना कळविली; व आतां आपण तेथून देवास गांवांत घेऊन येऊं असें तो ह्मणाला. तेव्हां कित्येकांना ही गोष्ट खरी व कित्येकांना खोटी वाटली. विश्वंभरास विठोबाचें ध्यान लागल्यामुळें तेंच स्वप्नांत दिसलें; एऱ्हवीं सगुणमूर्त्ति दिसेल ही अघटित गोष्ट घडून येण्याचा संभव दिसत नाहीं; असेंही कित्येक ह्मणाले. तथापि ते मौज पहाण्याच्या इच्छेनें त्याच्या समागमें आंबराईत गेले. तेथें पांडुरंगाची मूर्त्ति दिसली नाहीं; पण सुवासाचा घमघमाट चालला होता. फुलें, बुका, तुळसी असलेल्या नजरेस पडल्या. तेथें विश्वंभरानें खणण्याचा विचार केला. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, 'विश्वंभरास भेटावयास पंढरीनाथ आले आहेत; तर शस्त्र न लावितां हातानें खणून मूर्त्ति काढा. पुढें ह्याच्या वंशांत एक विष्णुभक्त जन्मेल तो जगाचा उद्धार करणारा होईल.' तेव्हां सर्वांनीं आनंदानें टाळ्या वाजविल्या. मग विश्वंभरानें हात लावितांच भक्तमंडळींनीं ज़मीन उकरली. प्रथम बुका व तुळसी पुष्कळ निघाल्या. पुढें पांडुरंगाची मूर्त्ति रुक्मिणीसहवर्त्तमान दृष्टीस पडली; तेव्हां सर्वांनीं जयजयकार केला. व मूर्त्ति गांवांत आणिली; व

विधियुक्त इंद्रायणी नदीजवळ स्थापना केली. देवास दिव्य वस्त्रें व दागिनेही बरेच घातले. ब्राह्मणभोजन झालें. पुष्पें व तुळसींच्या माळा घातल्या. संतमंडळी भजन करूं लागली. कीर्तनें होऊं लागलीं. विश्वंभरानें रात्रीं पांडुरंगाची स्तुति केली कीं, हे करुणसागरा रुक्मिणीपते, तूंच हें त्रैलोक्य व्यापिलें आहेस; तुझी भेट दुर्लभ असतां तूं इंद्रायणीतटीं मजसाठीं आलास. तुझी भक्ति, पूजा, अर्चा कशी करावी तें मला कळत नाहीं; परंतु तूं अनाथांचा बंधु आहेस ही माझी खात्री झाली. असें ऐकून, तुझी इच्छा काय आहे ह्मणून पांडुरंगानें विश्वंभरास विचारिलें. तेव्हां त्याणें मागितलें कीं, तुझें भजन करण्याची मला निरंतर आवड असावी. साधूंची संगत घडावी. पुढें होणाऱ्या वंशजांना तुझी भक्ति आवडावी. हें देहूगांव पुण्यक्षेत्र जाणून एथें आपण राहावें व दर्शन देऊन जड जीवांचा उद्धार करावा; इतकीच माझी इच्छा आहे. मग 'तुझे हेतु मी पूर्ण करीन' असें त्यास पांडुरंगानें आश्वासन दिलें. असे कांहीं दिवस लोटल्यावर विश्वंभर वारला. त्यास विष्णुदुतांनीं विमानांत बसवून वैकुंठास नेलें.

## अमाबाई.

विश्वंभराच्या मागें त्याची स्त्री अमाबाई, व पुत्र हरी आणि मुकुंद होते. अमाई संसाराविषयीं उदास होऊन भजनाकडे वळली. तिचा भक्तिप्रेमा पाहून पांडुरंगानें स्वप्नांत येऊन इच्छित मागावयास सांगितलें असतां, तुझ्या भजनावांचून मला दुसरें कांहीं नको असें ह्मणून ती पांडुरंगाच्या पायां पडली. तेव्हां त्यानें तिला उचलून हृदयीं धरिली. असें स्वप्न पडल्यावर ती जागी झाली. अमाईची निष्काम भक्ति पाहून परमेश्वर ऋणी झाल्यानें सर्व सिद्धि अनुकूळ झाल्या. पाहिजे तो पदार्थ तिला प्राप्त होऊं लागला.

सिद्धींची अनुकूलता झाली असतां साधकांच्या बुद्धीला भ्रम पडतो व प्रपंचाची उपाधि वाढत जाऊन ईश्वराकडचें लक्ष कमी होतें. जेथें विषयाचा आरोप आला तेथें पापाचा संचार होऊन अनतापाचा

अभाव होतो. या कारणामुळेंच साधुसंत उपाधिरहित होऊन अरण्यामध्यें एकांतवासांत रहातात; व श्रीहरीचें भजन करितात. असो. अमाईच्या मुलांना श्रीहरीचा विसर पडला. मग मानमान्यता, ख्यालीखुशाली असावी व श्रीमंती थाटानें त्यांना रहावें अशी इच्छा झाली. आणखी, राजाची भेट घेऊन त्याच्या चाकरीस रहावें असेंही मनांत आलें. त्यांनीं आपला हेतु आईला कळविला. तेव्हां तुमची वडिजावी येथेंच पंढरीनाथ चालवील असें तिणें सांगितलें; परंतु त्यांच्या तें मनास येईना. मग तिणें त्यांना जाण्यास रजा दिली. " व ते राजाची भेट घेण्यास निघाले.

राजाची भेट झाल्यावर त्यांना मोठा सैन्याचा अधिकार मिळाला. मग बायकांना घेऊन येण्यासाठीं त्यांनीं आईस पत्र लिहिलें, व त्यांना आणावयाकरितां घोडीं, मनुष्यें पाठविलीं. पांडुरंगाचे पाय अंतरतील ह्मणून तिला दुःख झालें. ती पुत्राच्या मोहास्तव आपल्या दोघी सुना बरोबर घेऊन मुलांकडे गेली; परंतु देवाचे पाय अंतरल्यामुळें तिला चुटपुट लागली. नंतर पुत्राच्या ऐश्वर्यांत ती रमून गेली.

एके दिवशीं पांडुरंगानें तिला स्वप्नांत सांगितलें कीं, तूं मला सोडून पुत्रमोहानें एथें राहिलीस. मला विश्वंभरानें वचन देऊन देहूक्षेत्रांत वसविलें; पण तें सर्व तूं विसरून एथें मजा मारावयास राहिलीस. आतां हें सर्व वैभव सोडून देहूस चल. इतकें ऐकतांच ती जागी झाली. मग तिणें आपल्या दोघां मुलांस मुळची हकीकत सांगितली कीं, तुमच्या वडिलांनीं देवास देहूस वसवून वैकुंठभुवनास गमन केलें; व आज स्वप्नांत येऊन पांडुरंग मला परत देहूगांवीं बोलावीत आहे. तेव्हां त्यांणीं आईस सांगितलें कीं, स्वप्नांतील गोष्टी कोणी खऱ्या मानितो काय? हें ऐकून ती उगीच राहिली. पुढें चार दिवस लोटल्यानंतर, आज काय विठोबा बोलला? असें विनोदानें त्यांनीं आईस विचारिलें. तेव्हां तसेच दोन दृष्टांत झाले ह्मणून तिनें सांगितले; परंतु त्यांना तें खरें वाटेना. पुढें चार दिवसांनीं पांडुरंगानें दृष्टांत दिला कीं, तूं माझें ऐकत नाहींस त्यापेक्षां आज दोन प्रहरीं तुझे पुत्र मरून जातील व द्रव्याची वाताहात होईल. तेव्हां ती रडूं लागली व

ह्मणाली, पुत्र मेल्यावर मला सद्गतीला कोण लावील ? हें ऐकून तिला सद्गतीला लाविण्याचें जोखीम पांडुरंगानें आपल्या अंगावर घेतलें. त्याच दिवशीं 'आज कांहीं पांडुरंगानें सांगितलें काय' असें विनोदानें विचारून रडण्याचें कारण सांगावें, ह्मणून पुत्रांनीं अमाईला ह्मटल्यावर तिनें हा सर्व प्रकार स्पष्टपणें सांगितला असतांही त्यांच्या तिच्या बोलण्यावर विश्वास पटला नाहीं. त्यांनीं हिला आतां ह्मातारचळ लागला अशी कल्पना केली. मग ते आईस ह्मणाले, आज एकदां तुझ्या हातचें भोजन आह्मांस घाल.

पुढें ते जेवून पानसुपारी खात होते,इतक्यांत परचक्र आल्याची बातमी हेरांनीं कळवून लढाईवर जाण्याबद्दल राजाचें आज्ञापत्र त्यांस दिलें. तें पत्र पाहतांच मातोश्रीस नमस्कार करून ते सैन्य घेऊन शत्रूवर चालून गेले. युद्धांत दोघेजण विकल झाले; तेव्हां हाहाकार झाला. शत्रूंनीं घरदार लुटलें. ते पडले त्या वेळेस, आम्हीं मातेचें ऐकलें नाहीं ह्मणून ह्या पळयास गोष्ट येऊन ठेपली, असें त्यांना वाटून अनुताप झाला. व पांडुरंगानें दर्शन द्यावें ह्मणून त्याचा धांवा केला. तेव्हां विठोबानें दर्शन देऊन विमानांत बसवून त्यांना वैकुंठास नेलें. असें कां ह्मणून कोणी विचारील, तर त्यास असें समाधान आहे कीं, कुळाचा उद्धार करण्याचा पतकर घेतल्यामुळें ईश्वरास दर्शन द्यावें लागलें.

ही दुःखकारक वार्त्ता ऐकून घरच्यांना झालेलें दुःख वर्णन करण्याची सोय नाहीं. अमाई तर निचेष्ट पडली. धाकट्या मुकुंदाची बायको सती गेली. पांडुरंगानें तिला भेट देऊन वैकुंठास नेलें व तिच्या भ्रतारास भेटविलें. असो. अमाई जेष्ठ सुनेस घेऊन पळून गेली. ती सून तेव्हां गरोदर होती. अमाईनें देहूस जाऊन पांडुरंगाचें दर्शन घेतलें; व पायां पडून ह्मटलें कीं, रे संसारविटंबण्या, बरें वैर साधिलेंस. माझे मुलगे रणांत पाडिलेस. जे तुझ्या भजनीं लागतात त्यांचा तूं असाच नाश करितोस. शंकर तुझा भक्त, पण त्याला उचलून थेट मसणवटींत नेऊन घातलेंस. लंगोटी नेसवून नारदास बारा वाटा मोकळ्या टेविल्यास. रावणास ।

त्याच्या बिभीषण भावास त्याची लंका देऊन तूं मोठ्या उदारपणाचा आव घातलास. तुझ्या नामस्मरणामुळें प्रल्हादास अतोनात कष्ट भोगावयास लावून शेवटीं त्याच्या बापावर हल्ला केलास. हें तूं अगदीं अनुचित कर्म केलेंस. पण ह्या दुसऱ्यांच्या गोष्टी कशाला? माझेच हां हां ह्मणतां दोन्ही पुत्र मारून टाकिलेस. माझ्या संसाराची धूळधाणी करून कुळक्षय केलास व आपणाजवळ आणिलेंस. आतां माझा वृद्धापकाळ, सेवाचाकरी कोण करील तें सांग बरें? असें नाना प्रकारांनीं त्यास बोलल्यावर पांडुरंगानें अमाईला पोटाशीं धरून ह्मटलें कीं, होणार होतें तें झालें; आतां कष्टी होऊं नकोस. मी तुझ्याजवळ असेन. अशी तिची नानाप्रकारांनीं समजूत केली.

पुढें असें झालें कीं, निर्वाहाची सोय नसल्यामुळें अमाईनें आपल्या सुनेस माहेरीं पाठविली. आपण तेथेंच राहिली; परंतु तिच्या चित्तास चैन पडत नसे. पुढें तिच्या डोळ्यांस अपकार होऊन ती आंधळी झाली. मग सगुण रूप धारण करून पांडुरंगानें तिला सांगितलें कीं, मी तुझ्याजवळ असतां तूं शोक कां करितेस? तूं सांगत असलीस तर मी तुझे पुत्र आतां आणवितों; व तुला दिव्य दृष्टि देतों. त्यावर अमाईनें उत्तर दिलें कीं, मला नाशिवंताची गरज नाहीं. तुझ्यावांचून मला दुसरें कांहीं नको; ह्मणून मीं तुला पूर्वीं सांगितलेलें तूं विसरलास काय? तेव्हां पांडुरंगानें तिला सांगितलें कीं, आतां मीच तुझा पुत्र असें समज. रुक्मीण तुझी आवडती सून. ती तुझी सेवा चाकरी करील. तेव्हां, तूं विश्वाचा बाप माझा मुलगा कसा होशील ह्मणून तिनें त्यास विचारिलें असतां, त्यानें ह्मटलें, मी सप्रेम भक्तीस्तव यशोदेचा मुलगा झालों, हें तुला ठाऊक नाहीं काय? मग श्रीहरीनें तिच्या पुत्राचें रूप धरिलें व रुक्मीण तिची सून झाली. उभयतां सर्व कामकाज करून तिची बर्दास्त उत्तम ठेवीत. तो तिच्याजवळ जेवावयास बसे. यावरून परमेश्वर भक्तीला किती भुलतो हें पहा. तो जात, कुळ पहात नाहीं. तो तिला नेऊन बाजेवर निजवी. रुक्मीण आंधमग नेणी पाठ रगडी. तोही केव्हां केव्हां हीं कामें

करी. असें पुष्कळ दिवस चाललें; परंतु गांवांत बोभाट झाला नाहीं. रुक्मीण कोणास सून वाटे; कोणास शेजारीण वाटे. पुढें तिच्या अंत:काळीं विमान आणवून आपली मांडी तिला उशाला दिल्यावर तिचे प्राण आकर्षण करून दिव्य देह केली व विमानांत बसवून वैकुंठास पाठविली. पुढें दहन वगैरे पुढचें सर्व उत्तरकार्य त्या वेषधारी पुत्रानेंच केलें. तेराव्या दिवशीं जात जेवविली. ही बातमी तिच्या सुनेस कळल्यावर तिला खेद झाला. तिचा पुत्रही मोठा झाला होता त्यास घेऊन ती देहूस आली; व आमचे हात ह्यातारीला लागले नाहींत वगैरे ती लोकांना सांगे. तेंव्हां तीं ह्मणत, तुह्मींच तिची सर्व क्रिया केलीत तर खरी, आणि आतां असें कसें ह्मणतां? असें ऐकून तीं सर्व विस्मयांत पडलीं.

---

# अध्याय २६ वा.

## विठोबा, बोल्होबा व तुकाराम.

### विठोबा.

अमाईच्या मरणाची वार्ता ऐकून तिची सून विस्मित झाली. तिचा मुलगा विठोबा, ह्यानें आईस विचारिलें कीं, आपण एथें नसतां लोक जें काय बोलतात ह्यांतलें इंगित काय असावें हें मला समजत नाहीं. भरंवसा न ठेवावा तर लोक जेवले ही गोष्ट त्या सर्वांच्या सांगण्यावरून खोटी नव्हे. तेंव्हां, विश्वंभर तुझा आजा, त्याणें पांडुरंगास वश करून मूर्त्ति आणिली वगैरे आपली घडलेली मुळापासून सर्व हकीकत त्यास त्याच्या आईनें सांगितली.

अशी बातमी ऐकतांच विठोबास पांडुरंगाचा राग आला. तो स्नान करून लागलाच देवालयांत गेला; व समोर उभा राहून देवास ह्मणाला, पांडुरंगा, तूं आमचा घात केलास हें चांगलें केलेंस काय? माझा आजा तुझ्या नादीं लागला; माझा बाप रणांत मारविलास; अशी अपकीर्त्ति केलीस. आतां मला तुझा छंद नको. असें बोलून तो शस्त्र घेऊन आपलें उदर फाडणार तों पांडुरंगानें

धरला. त्यानें देवास सांगितलें कीं, तूं माझा हात सोड; मी तुझी कीर्ति ऐकिली आहे! प्रल्हाद तुझ्या नादीं लागला ह्मणून तूं त्याच्या पित्यास मारिलास; तसाच अंगदाचा पिता वाळी तूं विनाकारण मारिलास, व अंगदाला गुलाम केलास; तसाच तूं माझा बाप मारिलास. मला तुझी गरज नाहीं किंवा मला माझ्या जिवाची पर्वा नाहीं. असें त्याचें भाषण ऐकून पांडुरंग दयेनें द्रवला व त्याणें त्यास आलिंगन देऊन त्याचे डोळे पुसले आणि ह्मटलें, होणार गोष्ट होऊन गेली; आतां कां व्यर्थ श्रम करितोस? माझें वचन घेऊन विश्वंभरानें मला ऋणी केलें आहें; तें फेडण्याकरितां मी देहूस येऊन राहिलों. मी भक्त-कैवारी असतां तूं मला दूषण ठेविलेंस. असो. सुधारसाला विष ह्मणावें, किंवा सूर्याला राहू ह्मणावें, असेंच हें झालें; ह्याचें मला मोठें नवल वाटतें. मी तुझे कुळाचा देणेंदार आहें; हें घे मी तुला वचन देतों. असें ऐकतांच विठोबा देवाच्या पायां पडला. मग माता व पुत्र निरंतर भजन करूं लागलीं. तीं उभयतां पंढरीची वारकरी झालीं.

## बोल्होबा.

आतां, त्या विठोबाचा पुत्र पदाजी, तोही भक्त होता; त्याचा पुत्र शंकर; त्याचा कान्हया; त्याचा बोल्होबा. हा पांडुरंगाची सकामभक्ति करी; ह्मणजे मनोरथ पुरविण्यासाठीं विनवणी करी. तो आषाढीकार्त्तिकीस पंढरपुरास जाई. अतिथींचा आदरानें समाचार घेऊन त्यांस जेवावयास घाली. साधुसंतांची पूजा करी. सचोटीनें व्यापारधंदा करी. त्याच्या मनांत द्वैतभाव नसे.

बोल्होबानें चोवीस वर्षें पंढरीची वारी केली, तेव्हां त्यास श्रीहरि प्रसन्न झाला. ब्रह्मा, विष्णु, महेश यांनीं स्वप्नांत येऊन त्यास दर्शन दिलें आणि सांगितलें, आह्मीं प्रसन्न झालों; इच्छा असेल तें माग. मग सावध होऊन बोल्होबानें तीन्हीं देवांना नमस्कार केला; व मला पुत्र व्हावे अशी इच्छा आहे असें सांगितलें. तेव्हां शिव व ब्रह्मदेव 'तथास्तु' ह्मणाले. नंतर तुला मी कसा पुत्र देऊं ह्मणून श्रीहरीनें विचारिलें. तेव्हां तो त्यास ह्मणाला, जो तुझे गुण गाईल व जगाचा उद्धार करील असा दे.

मग, 'तुझे मनोरथ पूर्ण होतील' असा वर दिल्यावर त्यानें देवांना साष्टांग नमस्कार घातला. असा दृष्टांत झाल्यावर बोल्होबा जागा झाला व कनकाईला ( स्त्रिला ) उठवून त्यानें झालेली हकीगत सांगितली. पुढें थोड्याच दिवसांनीं कनकाई गरोदर राहिली. पुत्र झाला; तो शिवाच्या वरानें म्हणून त्याचें नांव सावजी ठेविलें.

पुढें अशी गोष्ट घडून आली कीं, नारद, तुंबर, उद्धव, पुंडलीक, ज्ञानदेव, नामदेव, विश्वंभर इत्यादि संपूर्ण भक्तमंडळीसहवर्त्तमान श्रीहरि वैकुंठास बसले असतां ह्मणाले कीं,ह्या विश्वंभराच्या वंशांत बोल्होबा प्रेमळ भक्त आहे. त्यास विश्वतारक असा पुत्र मीं देऊं केला आहे; तो कोणता द्यावा हा विचार करावयाचा आहे. तेव्हां सर्व भक्त जयजयकार करूं लागले. मग भगवंतानें नामदेवास हांक मारून एकीकडे नेलें आणि सांगितलें कीं, मी वेळोवेळीं अवतार घेऊन दुष्टांचा नाश करून धर्माचें रक्षण करितों; आतां तुह्मीं अवतार घेऊन माझी सप्रेम भक्ति करावी; व भजन करवून दीनांचा उद्धार करावा. तूं अवतार घेऊन भजनक्रिया सांगावी. चारी मुक्तीहून भक्ति श्रेष्ठ, असें गीतेंत व भागवतांत सांगितलें आहे; तर माझी कीर्त्ति वाखाणावी. तूं मागें पण केलास कीं, शतकोटि ग्रंथ मदर्पण असो; त्यापैकीं कांहीं शेष राहिलें आहें तें तूं आतां पूर्ण कर. ब्रह्म शब्दाचा अर्थ फार खोल आहे, तो तूं स्पष्ट करून दाखीव. सप्रेम भक्ति हें उदक देऊन जिवांना निवीव. तुझ्या साह्यास तुजबरोबर मी मोक्ष देतों. हा तुझ्या हुकुमांत राहील; व तूं सांगशील तें काम करील. तशाच चारी मुक्ति, रिद्धिसिद्धि, ह्या तुझ्या ताब्यांत असतील. तुला यांची गरज नाहीं ही गोष्ट खरी आहे; परंतु जनांच्या ह्या उपयोगी पडतील. हें सर्व नामदेवानें कबूल करून ह्मटलें कीं, हें कलियुग सांगूनसवरून खोटें, त्यांत तुझा बौद्ध अवतार; तेव्हां, आह्मांस कांहीं संकट पडलें तर आह्मीं कोणास विचारावें? तेव्हां श्रीहरि ह्मणाले, मी बौद्धपण टाकून सगुण रूप धरीन; व तुझ्याशीं बोलून संकटांचें तात्काळ निवारण करीन. असें बोलून त्यास देवानें पोटाशीं धरिलें. मग नामदेवानें अवतार कोठें घ्यावयाचा हें विचारिल्यावर सांगितलें

कीं, या विश्वंभरानें भक्तीनें मला गोंवून टाकिलें. ह्याच्या वंशांत बोल्होबाला दिलेले वर, त्याची भक्ति वगैरे सविस्तर झालेली हकीगत सांगून मी त्यास दिलेलें वचन पाळावयासाठीं तूं तेथें अवतार घे. मग श्रीहरीस नमस्कार करून तो मृत्युलोकीं उतरला.

## तुकाराम.

इकडे कनकाई गरोदर राहिली. पूर्ण दिवस भरतांच ती आपल्य मंदिरामध्यें असतां असंभाव्य प्रभा पडली. कनकाई पुत्राचें तोंड पहाते तों तेजोमय पुतळा दिसला. जणू तो शांतिसुखाचा कोंब, किंवा मूर्त्तिमंत वैराग्य, कीं भक्तिनिधान प्रगट होऊन पुढें येऊन उभें राहिलें; असें वाटून कनकाई विस्मित झाली व चार घटका तशीच तटस्थ राहिली. तिचें देहभान नाहींसें झालें. विष्णुभक्त पुत्र प्रगटतांच शक्तिपात झाला. त्या समयीं हृदयांत पांडुरंगमूर्त्तीनें प्रगट होऊन बालकास उपदेश केला कीं, लोकरिवाजास अनुसरून वर्त्तावें.

इकडे कनकाई डोळे उघडून पहाते तों पुढें मुलगा दिसला. इतक्यांत शेजारणी आल्या व कनकाई बाळंत झाल्याची बातमी गांवभर झाली. बोल्होबाला परमानंद झाला. बारावे दिवशीं मुलाला देवळांत नेऊन रुक्मिणीनाथाच्या पायांवर घातलें; व तुझा हा दास आहे असें कनकाई ह्मणाली. मग पांडुरंगानें सांगितल्यावरून रुक्मिणीनें मुलाला तिच्या ओंटींत घातलें. पुढें कनकाईनें बोलाविल्यावरून मुलाला पाळण्यांत घालून नांव ठेवण्यासाठीं रुक्मीण तिजबरोबर गेली. पुष्कळ बायका गेल्या होत्या. त्या वेळीं जगन्मातेनें सुंदर स्त्रिचें रूप घेतलें होतें. हळदकुंकू रुक्मिणीनें लाविलें, व मुलाचा पाळणा हलवूं लागली. अक्षर, अव्यक्त, अद्वैत असून परक्याची वाचा कुंठित करणारा; ज्ञाता, ध्येय जें सिद्धांतज्ञान, सगुणरूप धरणारा; अशा पांडुरंगाच्या ठिकाणीं प्रीति ठेवून, बाळा, तूं आतां नीज; अशा भावार्थाचा पाळणा गाइला. मग कनकाईस विचारून मुलाचें तुका असें नांव ठेविलें. शेवटीं सुवासिणींना वाणें दिलीं व घुगऱ्या वांटल्यावर रुक्मीण गेली. मुलगा दिवसेंदिवस मोठा होऊं लागला. ह्याच्

पाठीवर ब्रह्मदेवानें वर दिल्यामुळें आणखी एक पुत्र झाला, त्याचें नांव कान्हया ठेविलें.

बोल्होबाला सावजी, तुका आणि कान्हया असे तिघे पुत्र झाले. जणू जगाचा उद्धार करण्याकरितां सत्व, रज, तम पुत्ररूपानें ज्ञान, वैराग्य, भक्ति साधून देण्यास जगांत प्रगट झाले. ते मोठे झाल्यावर मोठमोठ्यांनीं त्यांना आपल्या मुली दिल्या. त्यांना धंद्यांत दोन पैसे मिळत. संत आणि इतर जन संसार करितात; पण दोहोंचा अनुभव निराळा. प्रारब्ध पांगळें असें अज्ञान लोक ह्मणतात त्यांची समजूत अशी कीं, प्रयत्न करून प्रपंचांत सर्वकाळ दक्ष आम्हीं असतों ह्मणून दोन पैसे दिसतात. वास्तव ते मीपणानें बद्ध होऊन सायुज्यमुक्तीला अंतरून चौऱ्यांयशींच्या फेऱ्यांत पडतात. आतां सज्ञानांचा संसार असा कीं, ते सर्व कर्त्ता श्रीहरि असें ह्मणतात. संचित असेल तितकें मिळतें, व जें होणार तें कदापि चुकत नाहीं; अशा समजुतीनें साधु वागतात.ते जिवन्मुक्त ह्मणावे. मी कर्त्ता असें बोल्होबा बोलत नसे व पांडुरंगाचें भजनपूजन करी ह्मणून त्याला परमार्थ साधला.

पुढें वृद्धावस्था झाल्यानें बोल्होबानें वडील पुत्र सावजी याला जवळ बोलावून सांगितलें कीं, मी आतां ह्मातारा झालों; तूं देणें घेणें संभाळ व नीट मन घालून संसार कर. हें ऐकून तो ह्मणाला, ह्या भानगडींत मी पडत नाहीं; मी आतां तीर्थयात्रेस जातों. तुम्हीं शिरावर आहां ह्मणून आजपर्यंत थांबलों; नाहींतर केव्हांच गेलों असतों. मग बोल्होबानें मनांत विचार केला कीं, हा सावजी शिवाच्या वरप्रभावानें माझा पुत्र झाला खरा; पण त्या देवाप्रमाणेंच हा वैरागी आहे. याच्यानें संसार होणार नाहीं. नंतर त्यानें तुकारामास सर्व गृहव्यवस्था समजावून दिली; व हिताच्या दोन गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून घेऊन तुकारामानें संसाराचा बोजा अंगावर घेऊन तो नीट चालवूं लागल्यामुळें लोक त्यास नावाजूं लागले.

तुकारामाच्या पहिल्या बायकोस दम्याची व्यथा होती; ह्मणून त्यानें आपाजी गुळव्या, पुण्याचा रहाणारा, ह्याची मुलगी दुसरी बायको केली. तो चांगला संसार करूं लागला; यामुळें आईबापांना आनंद झाला.

# अध्याय २७ वा.

## तुकाराम.

सुखापुढें दुःख ठेविलेलेंच किंवा हर्षापुढें शोक यावयाचाच. जसा सूर्यास्तानंतर अंधार, किंवा सन्मान झाला कीं निंदा आहेच; त्याप्रमाणेंच तुकाराम व्यापारधंदा, देवघेव मोठ्या नेकीनें करीत असतां बरीच मानमान्यता पावला. तो उमेदीनें व्यापार करीत असतां त्याचीं आईबापें वारलीं; त्यामुळें तुकारामास झालेला खेद आवरेना. भाऊ व बहीण शोक करीत; त्यांकडे पाहून त्यास अधिक दुःख होई. तशांत संसाराचें सर्व ओझें त्याच्या अंगावर पडलें, ह्यामुळें तो गांगरून गेला; तरी विवेक करून तो मनास धीर देई. इतक्यांत सावजीची बायको परलोकवासी झाली. आधींच सावजीचें संसारांत मन नव्हतें; कोठें बायकोचा पाश होता, पण तोही तुटल्यावर तो एकदम तीर्थयात्रेस निघून गेला.

आईबापें मरण पावल्याच्या योगानें एक तर तुकाराम दुःखानें गांजून गेला. तशांत त्याचा व्यापारधंदा अगदीं बसून गेला. येणें बुडालें व देणें छातीवर बसलें. तशांत कोणाचें पाठबळ नव्हतें; व आईबापें होतीं तोंपर्यंत त्यास कशाचीच काळजी नव्हती. तो ह्मणे, देवा, मी आतां कसें करूं? शीतकाळीं अभ्रें लय पावतात; किंवा तृणांकुर उष्णकाळीं वाळून जातात; किंवा अभ्रछाया, इंद्रधनुष्य, उदकावरील तरंग हीं जशीं लवकर नाहींशीं होतात; तशीच तुकारामाची दौलत गडप झाली. कमाई नसून खर्च वाढत चालला. द्रव्य मिळविण्यासाठीं तो अनेक यत्न करी; परंतु पुरवठा येईना. शेवटीं दुकान घातलें. तो मापामध्यें घालमेल किंवा दगाबाजी करीत नसे. असत्य हें पापाचें मूळ जाणून त्याचा त्यानें त्याग केला होता. तो निरंतर नामस्मरण करी. निर्वाहापुरतें दुकानांत उत्पन्न होईना; दुसरे तिसरे धंदे करून पाहिले पण फायदा होईना. घरांत कांहीं होतें नव्हतें तें सर्व मोडमोडून खाल्लें व सावकारांच्या भरीस घातलें; तरी कर्ज फिटेना.

शेट वाणी हा भोळा, असें पाहून हव्यातशा त्यास थापा मारून उधार मिरच्या लोक घेऊन गेले. थोड्याच वेळांत सर्व मिरच्यांचा निकाल झाला. अशी मिरच्यांची लूट लाविल्यानें, व मी एकटा आहें माझा विश्वास तुमच्यावर आहे, तुमच्या हातानें तुह्मीं हव्या तितक्या घेऊन जा, असें बोलून दाखविल्यामुळें, जोरावर लोकांस लूट करण्यास फावलें व कमजोर मागें पडले. दहा शेर, पांच शेर, अर्धा शेर कोणी बचक-भर अशा रीतीनें त्याच्या सर्व मिरच्या खपल्या. एकानें थाप मारून सबंध एक गोण नेली, तेव्हां रिती गोण तरी असूं द्या, असें तुकावाण्यानें सांगितलें; तेव्हां, माझ्या घरांत सांठवण नाहीं असें सांगून मिरच्या-सह गोणही घेऊन गेला. अशा रीतीनें त्याचा सर्व माल गांवकऱ्यांनीं थापा देऊन नेला. मग सर्व माल विकल्यावर तो आंघोळ करून स्वयंपाक करावयास गुंतला. तोंडानें नामस्मरण चाललें होतेंच.

इकडे भक्तकैवारी पंढरीनाथ ह्यास ही गोष्ट सहन झाली नाहीं. तुकारामास ठकवून लोक मिरच्या घेऊन गेल्यामुळें विठोबा चाकराच्या रूपानें उगराणी करण्याकरितां घरोघर गेला. ठक लोक त्यास दाद देतना. हंबेतुंबेवर येऊन शिव्यागाळी झाल्या, तरी तितक्यांना पुरा पडून व मारहाण करून बहुतेक किरकोळ नेणारांकडून तुकाशे-[illegible] 'विठोजी' नोकर या नात्यानें पैसा उगविला. नंतर ज्यानें सगळी [illegible]ण नेली होती त्याच्याकडे गेला व मी तुकाशेटवाणी देहुकर ह्याचा नोकर आहें; माझें नांव विठोजी; मिरच्यांचे पैसे लौकर द्या; आह्मांस जावयास उशीर होतो; शेट वाट पहात आहे, असें सांगितलें. तेव्हां, मी तुला ओळखीत नाहीं; तुझा शेट माझा स्नेही आहे; मी त्यास पैशाविषयीं सांगेन; अशी उडवाउडवी करूं लागला. परंतु, मी उगराणी करावयास निघालों आहें; पैसे घेत-ल्यावांचून जाणार नाहीं; बरे बोलानें पैसे द्या; असें सामोपचारानें ह्म-टलें असतांही तो ऐकेना. उलट, मी देत नाहीं; पहातों कसे घेतोस ते ! असें तो गृहस्थ विठोजीस बोलला. तेव्हां विठोजी दोराचा फांस गळ्यास लावून घेऊन प्राण देऊं लागला व प्राण देऊन [illegible] घोटाळ्यांत घालितों असें बोलला. [illegible]

वायकापुरुषांची गर्दी जमली गास ... ... णी अन्नावांचून
गोणभर मिरच्या फुकट कोण त्यांनीं त्या ठकास फजीत करून,
तलें. ज्याच्या प्राप्तिस्तव महदेईल, असें बोलून पैसे देण्यास सांगि-
भक्तिस्तव गळ्यास फांस लावूनर्षे अनुष्ठानें करितात, तो तुकारामाच्या
प्राण दिला तर सारा गां घेतो. असो.
ठकास लाथाबुक्यांनीं मारिला अडचणींत पडेल ह्मणून लोकांनीं त्या
प्रयासानें पैसा दिला. मग . त्यानें मिरच्या तोलून घेऊन मोठ्या
धून पुरचुंडी नीट ठेविली. विठोजीनें सर्व उगराणी एके ठिकाणीं बां-
कडे गेला व उगराणी देउं पुढें तो चौधऱ्याचें रूप घेऊन तुकारामा-
फुकट दिल्या वगैरे सांगित लागला; तेव्हां मी एकेकाला मिरच्या
शाला हवें? आम्हीं नामांल्यावर चौधरी ह्मणाला, तुमचें फुकट क-
कमती केलें नाहीं. असेकेत थोर गृहस्थ; ईश्वरानें आह्मांस कांहीं
मग तुकशेटनें त्याजकडून बोलून द्रव्याची पुरचुंडी त्यापुढें ठेविली.
एक तांब्या भरून आणिने सहा रुपयांचें तूप मागविलें. तें त्यानें
न सांगितलें. तेव्हां तुका. व एथें तूप पुष्कळ स्वस्त मिळतें ह्मणू-
राहवून घेतला. इतक्यरामानें चौधऱ्याला आग्रह करून भोजनास
आली; व मी भुकेलागांत अतिताच्या रूपानें तेथें शंकराची स्वारी
रहावून घेतलें. मग आहें असें ह्मटल्यावर त्यासही तुकारामानें
स भोजन केलें. अरमापति, उमापति यांणीं प्रेमळ भक्ताच्या पंक्ती-
चौधरीरूपी पांडुरंगही तेतानें जातेवेळीं त्यास आशीर्वाद दिला. मग
कांहीं वेळानें गांव गेला.
गांव बुडविला होता. करी तुकारामाजवळ आले व ह्मणाले, तुम्हीं आज
घेऊन गेले. पण तुम्हीं मिरच्या फुकट दिल्या ह्मणून गांवकरी
तर गोंधळ करून टातुम्हीं विठोजी चाकर उगराणीस पाठविला; त्यानें
कशी हकीगत झाली किला होता. हें ऐकून तुकारामास नवल वाटलें व
सांगितलें. तेव्हां त्यांनी विचारिल्यावर एकानें सर्व झालेलें वर्त्तमान
आणिले; खरें ह्मण तुकारामास वाटलें कीं, जर खोटें ह्मणावें तर पैसे
माया अनिवार आवें तर मी चाकर ठेविला नव्हता. मग ईश्वराची
नाहीं; असें मनांतहे; तो कशी लीला करून दाखवील याचा अंत

# अध्याय २९ वा.

## तुकाराम.

तुकारामाच्या हातांत चौधऱ्यानें पैसे दिल्यानंतर तो मार्गस्थ झाला; तों त्यास एक ठक मिळाला. त्याच्याजवळ सोन्याचा मुलामा दिलेलीं पितळेचीं कडीं होतीं; तीं त्यानें तुकारामाच्या माथीं मारून त्याच्यापासून रुपये उपटून घेऊन व बाकी राहिलेला पैसा मी मागाहून घेऊन जाईन असें बोलून चालता झाला. व तुकाराम संतोषानें आपले गांवीं आला.

कुंतीचा पुत्र धर्मराज, ह्यास त्रिभुवनांत कोणीच दुष्ट मनुष्य दिसत नसे; तद्वत् तुकारामासहीं सारे लोक निष्कपटी आहेत असें भासे. तो घरीं गेल्यावर सावकार आले; त्यांस त्याणें कड्यांचा जोड दिला; व हा कर्जापोटीं ध्या ह्मणून तो बोलला. हातीं घेतांच हीं नकली कडीं ह्मणून ते हंसूं लागले. मग परिक्षकांनीं तावून सुलाखून तो कड्यांचा जोड पितळेचाच अशी त्याची खात्री करून देऊन त्याची पुष्कळ खरडपट्टी काढून ते कपाळ बडवीत निघून गेले. घरांत बायकांनीं सुद्धां पुष्कळ तारांगण केलें.

तुकारामास बायका दोन. थोरलीचें नांव रखुमाबाई व धाकटीचें नांव अवलाई ; पण तिला लोक फारकरून जिजाई किंवा जिजाबाई ह्मणत. त्या जिजाईनें विचार केला कीं, हा तर आतां खंक झाला ; तर ह्यास पुनः कांहीं भांडवल करून देऊन नफा येईल त्यांत गरिबीनें गुजारा चालवावा. अशा विचारानें तिनें आपल्या जोखमावर एका सावकारास खत लिहून देऊन दोनशें रुपये आणिले. जिजाईचे भाऊ श्रीमंत असल्यामुळें तिनें टाकलेला शब्द सावकारानें मान्य केला. जिजाईनें तुकारामास भांडवल देतेवेळेस नफा करण्याविषयीं हडसून बजाविलें होतें.

मीठ भरून वाणी बालेघाट प्रांतीं जात होते, त्यांच्या समागमें तुकारामास मीठ भरून पाठविलें. पुढें मीठ विकून व्यापारी शहरांत [illegible] लागले. तुकारा[illegible] [illegible]बर विकून पैसा [illegible] गांव घोटाळ्यात घालितों असें बोलला.

तुह्मीं ह्मणतां, तर पंढरिनाथास न भजणारे हजारो प्राणी अन्नावांचून कां मरण पावले? जें होणार असेल तें कदापि चुकावयाचें नाहीं.

पुढें त्याचा जेष्ठ पुत्र संतोबा हाही अन्न अन्न करीत मरण पावला. त्या वेळीं दुःखानें त्यास संसाराचा वीट आला. अनिवार दुःखें भोगावीं लागलीं ह्मणजे मनुष्य वैतागतो, व संसारावर लाथ मारून परमेश्वरास आठवतो व अंतीं मोक्षसुख पावतो. तुकारामाची ह्याचप्रमाणें गत झाली.

तेराव्या वर्षी बापानें संसाराचें ओझें त्याच्या गळ्यांत घातलें. सत्राव्या वर्षी आईबापें व वडील भावजय हीं निवर्त्तलीं. नंतर अठराव्या वर्षी त्याचा वडील भाऊ सावजी बैरागी होऊन तीर्थाटणास गेला. विसाव्यांत बायको व मुलगा ह्यांच्या मायापाशांत पडला. तेव्हां तेथून मन विटावें ह्मणून विपरीत काळ प्राप्त झाला; व दिवाळें निघून भिकारी झाला. लोक छीः थूः करूं लागले अन्न अन्न करीत बायको व मुलगा हीं मरण पावलीं. मग तो उदास होऊन एकीकडे जाऊन विचार करूं लागला असतां, हा संसार दुःखाचा अफाट पर्वत आहे असें त्याच्या अनुभवास आलें; व संसारांत राहून ईश्वरप्राप्ति व्हावयाची नाहीं अशी त्याची खात्री झाली. व राहिलेलें आयुष्य ईश्वरभजनांत घालविण्याचा निश्चय करून तो भांबनाथ पर्वतावर गेला. तेथें नेत्र लावून पांडुरंगाची मूर्त्ति ध्यानांत आणून ह्मणूं लागला कीं, हे देवाधिदेवा पांडुरंगा, तुझें ध्यान कसें करावें, तुला कसें ओळखावें, तुझी स्तुति कशी करावी, तूं कोणत्या योगानें मला भेटशील हें मला कांहीं कळत नाहीं; तरी हें सारें तूं मला सांग. तूं तर अलक्ष, अगोचर आहेस; त्या तुला मी कसा लक्षांत आणूं? यमधर्म, वरुण, कुबेर, चंद्र, सूर्य, इंद्रादि देव यांनाही तुझा पार लागत नाहीं; मग मला कसा लागेल?

भांबनाथ पर्वतावर तुकाराम पांडुरंगाची मूर्त्ति ध्यानांत आणून खाणेंपिणें सोडून सात दिवस अखंड भजन करीत होता. तेव्हां असा चमत्कार झाला कीं, पांडुरंगानें कृष्णवर्ण व अति विशाळ अशा भयंकर सर्पाचें रूप धारण करून धुधुःकार टाकीत महाकाळासारखा त्याच्यासभोंवतीं फिरूं लागला; तरी तो भ्याला नाहीं. तेव्हां

आकाशवाणी झाली कीं, सर्परूपानें रुक्मिणीकांत आले आहेत; तर भय न धरतां नेत्र उघडून तूं त्यास पहा. हें ऐकून तें रूप न पाहण्याचा त्यानें दृढ निश्चय केला. तो पांडुरंगउपासक असल्यामुळें जें ध्यान वेदशास्त्रांनीं वर्णन केलें; संतांनीं हृदयांत सांठविलें; त्या रूपानें दर्शन मिळेल तरच मी पाहीन असा त्याणें दृढ निश्चय केला. तुकारामाचा असा भाव पाहून पांडुरंगानें त्यास तात्कळ दर्शन दिलें, व उचलून पोटाशीं धरिलें. व 'मी तुला कधीं विसंबणार नाहीं' असें कबूल करून डोळे उघडून पहावयास सांगितलें. मग त्यानें पांडुरंगाची मूर्त्ति डोळे भरून पाहिली.

इकडे तुकाराम घरांतून निघून गेल्यावर त्याच्याविषयीं पुष्कळ शोध केला; परंतु कोठें ठिकाण लागेना ह्मणून त्याचा धाकटा भाऊ कान्हया रात्रंदिवस शोध करीत होता. भावाच्या वियोगामुळें त्याणें-ही अन्नपाणी वर्ज केलें होतें. तो शोध करीत करीत भांबनाथास गेला; तेथें त्यास पांडुरंगाचें व तुकारामाचें,दर्शन झालें. पांडुरंगानें वर मागावयास सांगितल्यावर तुकाराम ह्मणाला, 'तुमचा विसर होऊं नये व माझें मुलाप्रमाणें रक्षण करावें.' हें ऐकून पांडुरंगानें वरदान देऊन सांगितलें कीं, तुम्हां भक्तासाठीं मी सगुण होतों; पुंडलिकासाठीं भीमातटीं उभा राहिलों; तुझा पूर्वज विश्वंभर त्याणें माझी अपार भक्ति केली, यास्तव त्यास वर देऊन मी देहूस येऊन राहिलों. मग तुकारामानें देवाच्या पायांवर मस्तक ठेविलें.

---

## अध्याय २१ वा.

### तुकाराम.

भांबनाथ पर्वतावर तुकारामास पांडुरंगानें दर्शन दिलें, त्या वेळीं त्याचा धाकटा भाऊ कान्हया हाही तेथें होता. विठोबा अंतर्धान पावल्यानंतर दोघे बंधु तेथून निघून देहूस आले. तुकारामास देवानें दर्शन दिलें, तेथें कान्हयानें पादुकांची स्थापना केली; तें स्थान अद्यापि पहाण्यांत आहे. असो. पुढें उभय बंधूंनीं इंद्रायणीचें स्नान

करून सात दिवसांचें पारणें तेथें सोडिलें. मग तुकारामानें कान्हयाकडून वडिलांच्या वेळचीं सर्व खतें, पत्रें आणविलीं; व वसूल येण्याची आशा नसल्यामुळें तो ते सर्व कागदपत्र इंद्रायणींत बुडवूं लागला. तेव्हां कान्हया म्हणाला, तुम्हीं तर विरक्त झालां; प्रपंचाचा सर्व बोजा मजवर पडला; पुढें पोरेंबाळें काय खातील? हें मीं तुम्हांस सांगावें असें नाहीं. त्या वेळीं तुकारामानें दोन भाग करून आपल्या भागाचे कागदपत्र बुडविले; आणि सांगितलें, आज पासून आम्हीं भिक्षा मागून निर्वाह करूं. तुम्हीं खुशाल संसार करावा. मग कान्हया वेगळा निघून संसार करूं लागला व तुकाराम पांडुरंगाचें भजन करूं लागला.

तुकाराम नित्य इंद्रायणीचें स्नान करून देवालयांत जाऊन पांडुरंगाचें दर्शन घेई. नंतर देहूपासून पश्चिमेस तीन कोसांवर भांडार नांवाचा पर्वत आहे तेथें जाऊन तो भजन करीत असे. लोक काय बोलतात ह्याकडे तो अगदीं लक्ष देत नसे. व पांडुरंगमय विश्व जाणून रात्रंदिवस त्याचेंच भजन करीत बसे. तो म्हणे, देवा, नामस्मरणावांचून दुसरें साधन नाहीं. नामावांचून मला विश्रांति नाहीं. तप, मंत्र, जप, कुळधर्म, धनदौलत सर्व तुझेंच नांव होय. आतां मला भवसागर उतरून पलीकडे ने. अशा रीतीनें तुकाराम नित्य एकांतामध्यें ईश्वराची प्रार्थना करी. तो दिवसास रानांत राही व रात्रीस गांवांत येऊन देवळांत कीर्त्तन करी. त्याची अशी स्थिति झाल्यावर लोक ह्यास वेड लागलें असें म्हणूं लागले. कोणी म्हणत, व्यापारांत तोटा येऊन दिवाळें निघाल्यानें हा चळला. कोणी कोणी तो परमार्थाकडे वळला असें म्हणत. कोणी असेंही म्हणत कीं, प्रपंच टाकून देण्यांत फायदा कोणता? पोट तर त्यास सुटलें नाहींना? मुलेंबाळें सोडून डोंगरावर जाऊन बसला तरी पोटासाठीं भिक्षा मागावयास गांवांत तर येतोच! अशा रीतीनें ज्याला जसें वाटे तसें तो बोले.

तुकाराम इंद्रायणीच्या तीरीं भजन करी. त्या शेजारीं एक शेत होतें, त्यास पुष्कळ पीक आलेलें पाहून शेतकरी त्यास ह्मणाला, तुक-

शेट, तुह्मीं एथें भजन रिकामें करीत आहां; त्यापेक्षां माझ्या शेतांत राखण बसून स्वस्थ भजन करीत जा. मी तुह्मांस अर्द्धमण धान्य देईन; तें घेऊन कुटुंबाचें रक्षण करावें. हें त्याचें ह्मणणें कबूल करून तुकाराम त्याजसमागमें शेतांत गेला. तेव्हां शेतकरी तुकारामाच्या स्वाधीन शेत करून घरीं गेला.

माळ्यावर बसून पांखरें 'राखावयास' तुकारामास शेतकऱ्यानें सांगितलें होतें; त्याप्रमाणें तो माळ्यावर बसून राही. पांखरें खुशाल शेत खात; परंतु तो त्यांना हांकलीत नसे. तो मनांत ह्मणे कीं, हे ईश्वराच्या घरचे जीव भुकेलेले असतील. यांना मागें दुष्काळ पडल्यामुळें पोटभर खावयास मिळालें नाहीं; म्हणून हे आतां पोटभर धान्य भक्षण करीत आहेत. यांस हाकून लावल्यास पातक घडेल.असो.

सर्व गांवचीं पांखरें येऊन शेत खात, त्या योगानें तुकारामास परम संतोष होई. शेतकरी बाहेर गांवीं व्यापाराकरितां गेला होता त्यानें घरीं आल्यावर तें पांखरांनीं खाल्लेलें शेत पाहिलें, तेव्हां तो संतापून गेला. व तुकाराम माळ्यावर बसून भजन करीत होता, त्यास पुष्कळ उपमर्दाचीं भाषणें बोलून मणगट धरून खालीं पाडिला; आणि धक्काबुक्की करीत पाटील कुळकर्ण्यापाशीं घेऊन गेला. मग त्या कुणब्यानें आपला सर्व वृत्तांत त्यांस रडत कळविला व ऊर बडवून घेऊं लागला. नंतर तुकारामास विचारिलें; तेव्हां त्याणें सांगितलें कीं, ह्याचा माझा असा करार झाला आहे कीं, मीं ह्याच्या शेतांत माळ्यावर बसून पांखरें 'राखावीं' व त्याजबद्दल ह्यानें मला अर्धा मण धान्य द्यावें. आतां शेतावर बसलेलीं पांखरें मीं उडविलीं नाहींत; व पक्षांनीं धान्य घरीं नेलें नाहीं; मग मी त्यांना खाण्यासाठीं प्रतिबंध कां करावा? पक्षी 'रक्षावे' असें ह्याचें मला सांगणें होतें; ह्मणून मीं त्यांचें पालन केलें व त्यांस उडविलें नाहीं. तुकारामाचें असें भाषण ऐकून सर्व मंडळी गदगदां हंसूं लागली. मग त्यांनीं शेतकऱ्याचें दोन खंडीचें झालेलें नुकसान भरून देण्याचा तुकारामापासून त्यास रोखा लिहून देवविला. तुकारामानें अनमान केल्याशिवाय खत लिहून दिलें. अशी त्यांनीं कज्ज्याची तोड करून शेतकऱ्याचें समाधान केलें.

परंतु शेताची स्थिति कशी आहे ती पहावी ह्मणून सर्व शेतांत गेले; तों तेथें दाण्यांनीं भरपूर भरलेलीं कणसें नजरेस पडलीं. इतकें पीक आलेलें पाहून त्यांना ह्या गोष्टीचा मोठा विस्मय वाटला. शेतकऱ्यानें तुकारामास तो रोखा परत देण्याविषयीं पुष्कळ खटपट केली; परंतु गांवकऱ्यांनीं तें कबुल केलें नाहीं. तुकाराम विठोबाचा भक्त असल्यामुळें त्या देवासच दया येऊन शेत पांखरांनीं खाल्लें असतां अतिशय पीक आलें; ह्मणून तें तुकारामाच्या नशिबाचें असल्यानें दोन खंडी ठेवून बाकीचें तुकारामानें घेऊन जावें असें गांवकऱ्यांनीं स्पष्ट सांगितलें. व पुढें शेत राखावयास तुकारामास सांगितलें. पण ही गोष्ट त्याणें नाकबूल केली. तो ह्मणाला, मी कांहीं न घेतां एवढा ठपका आला; तर सर्व शेताचें उत्पन्न घेतल्यावर काय होईल कोण जाणे ? मग शेत कापून झोडविलें; तों दोन खंडीच्या जागीं सतरा खंडी धान्य झालें. इतकें पीक पाहून सर्व चकित झाले. मग दोन खंडी धान्य त्या शेतकऱ्यास देऊन बाकीचें पंधरा खंडी तुकारामास देऊं लागले; परंतु तो घेईना. तेव्हां तें सत्कर्मी लावण्याच्या हेतूनें महादाजीपंत देशपांडे यानें आपल्या घरीं नेलें.

---

## अध्याय ३० वा.

### तुकाराम.

तुकारामानें प[ाखरां क]डून शेत खावविलें असतां, श्रीपांडुरंगानें अद्भुत चमत्कार दाखवून भरपूर पीक आणि[लें]; व तें तुकारामास देत असतांही त्याणें घेतलें नाहीं; हें वर्तमान त्याच्या बायकोस कळल्यावर तिला तळमळ लागली. घरीं मुलांलेकरांस उपास पडतात ह्मणून देवानें दिलें, पण कर्मानें नेलें; असें ती ह्मणे. परंतु तुकारामास ह्याचें कांहींच वाटत नसे. तो आनंदानें भजन करीत बसे.

एके दिवशीं तुकारामाच्या मनांत आलें कीं, पांडुरंगाच्या देवालयाचा जीर्णोद्धार करावा. मग तो देवालयाची एकटाच दुरुस्ती करूं लागला. असें पाहून देवानें महादाजीपंत देशपांड्यास दृष्टांत

दिला कीं, तूं पंधरा खंडी धान्य तुकारामानें न घेतल्यामुळें आपल्यापाशीं सत्कामीं लावण्याच्या हेतूनें ठेविलें आहेस; त्या धान्याचा देऊळ बांधण्याकडे उपयोग कर. मग त्याणें हें वर्त्तमान ग्रामस्थांना निवेदन केलें. तेव्हां ते आश्चर्यभरित होत्साते जाऊन पाहूं लागले तों, तुकाराम हातांत कुदळी घेऊन चिखल करून त्यानें देवळाची भिंत घाली. याप्रमाणें तो एकटाच देवळाचें काम करीत आहे असें दृष्टीस पडलें, तेव्हां पांडुरंगानें स्वप्नांत दिलेला दृष्टांत खरा, असें समजून कांहीं मजूर तुकारामाच्या मदतीस दिले. कारागीर ठेवून सर्व देवालय दुरुस्त केलें. त्यांच्या मजुरीच्या पोटीं सारें धान्य संपलें. उद्यापन, ब्राह्मणभोजन करण्यास धान्य उरलें नाहीं; तेव्हां तुकारामास पुन्हा चिंता उत्पन्न झाली. मग पांडुरंगानें पुन्हा महादाजीपंताच्या स्वप्नांत जाऊन सांगितलें कीं, तुह्मीं न्याय ध्यानांत आणिल्यावांचून मागें इनसाफ कसा केलात? तुम्हीं तुकारामाच्या मेहेनतीबद्दल राखणावळीचा ठरलेला आदमण दाणा कां देवविला नाहीं? तर तो आतां वाढीसुद्धां देववावा. मग त्याणें वाढीसुद्धां सर्व धान्य आणून दिलें. हा चमत्कार पाहून गांवकऱ्यांनींही कणीक, डाळ, तूप, गूळ, इत्यादि अनेक साहित्याचा पुरवठा केला. नंतर सुमुहुर्त्तावर पांडुरंगाची पुन्हा यथाविधि स्थापना केली. ब्राह्मणभोजन झालें. त्या वेळेस तुकारामास परमानंद झाला. मग कीर्त्तन करावें असें त्याच्या मनांत आलें. त्याणें जुनीं कवनें पाठ केलीं. नामदेव, कबीर यांचीं वचनें तसेच अध्यात्मज्ञानाचे ज्ञानेश्वराचे ग्रंथ पाहिले. एकनाथाची भागवतावरची टीका ध्यानांत आणिली. व त्यांचेंच भावार्थरामायण पाठ केलें. तसेंच, भागवत, योगवासिष्ठ, अमृतानुभव, ह्याही ग्रंथांचें चांगलें मनन केलें. तुकारामानें भांडारपर्वतावर निवांत जागा पाहिली; परंतु तेथें उदक नव्हतें, तेंही उत्पन्न झालें.

तेथें पाणी उत्पन्न होण्याचें कारण असें झालें कीं, तुकारामाची बायको फार कठीण होती; तरी तिचें त्यावर अति प्रेम होतें. त्याणें खाल्ल्यावांचून ती अन्नपाणी घेत नसे. ती त्यास त्या पर्वतावर नित्य

भाकर व पाणी नेऊन देई. तिला दररोज दीड योजन चालावें लागे; ह्मणून ती अगदीं बेजार झाली. ती पांडुरंगाला नानाप्रकारच्या शिव्या देई. तिणें विरोधभाक्ति मांडली होती. 'काळा' दृष्टीस पडेल ह्मणून ती देवळांत देखील जात नसे. आमचा पूर्वज विश्वंभर याणें हा दावेदार आणून वंशाला लावून ठेविला; ह्यानें माझा भ्रतार वेडा केला; पोराबाळांच्या अन्नाची मला विवंचना; तो मजवर संसार सोपून आपण पर्वतावर जाऊन बसला; रात्रीस देवळांत येऊन काळ्यापुढें नृत्यगायन करितो व प्रातःकाळीं स्नान करून त्या मेल्याची पूजा करितो; कोणत्या जन्मींचें तो ऋण फेडीत आहे कोणास ठाऊक? गांवांत जरी तो राहता तरीं फार चांगलें झालें असतें; असें तुकारामाची बायको नेहमी बोले.

मग विठोबाला तिची दया आली. व तिचा नवरा डोंगरावर जाऊन बसला ह्मणून ही मला नित्य छळिते; असें पंढरिनाथास वाटल्यावर त्याणें असा चमत्कार करून दाखविला कीं, एके दिवशीं एक भाकर व भोंपळाभर पाणी घेऊन अवली ( तुकारामाची स्त्री जिजाई ) जात होती. त्या वेळेस ऐन दुपार असल्यामुळें उन्हाचा ताप अतिशय लागत होता, तिचे डोळे डोंगराकडे लागले होते व पायांत वाहाणा नसल्यामुळें पाय पोळत व खडे रुपत होते. त्या योगानें ती कासावीस झाली; इतक्यांत करवंदाचा एक कांटा तिच्या पायांत शिरला, त्यासरसी घेरी येऊन ती जमिनीवर पडली. पाणी सांडून गेलें. पुढें सावध होऊन पहाते तों पायांतून रक्ताची धार वाहूं लागली आहे. मग ती मोठमोठ्यानें रडूं लागली. व जन्मांतरचें वैर साधून काळ्या दावेदार होऊन बसला; असें ती बोलूं लागली. ती कांटा काढूं लागली, परंतु तो निघेना; तेव्हां तिला मनस्वी वाईट वाटलें. पुष्कळ पैसा खर्चून बापानें मोठ्या डामडौलानें माझें लग्न केलें; शेवटीं असे हाल भोगावयाचे नशिबीं आले! मला भावाबरोबर महायात्रा घडली व माझी त्याणें तुळा केली; पण आतां मला पोटभर अन्नदेखील मिळत नाहीं! तें महायात्रेचें पुण्यसुद्धां या समयीं उभें रहात नाहीं असें ती ह्मणूं लागली. अशा संकटांत अवली पडली असतांही ती

'देवा' ह्मणून हांक मारीना. कारण, तो वैरी धांवून येईल असें .. ह्मणे. रुक्मिणीकांत माझा दुस्मान आहे, त्यास ही गोष्ट कळ.. कामा नये. जर कां तो अकस्मात् एथें आला, तर मला हं.. मात्र पोट भरून. व मला शिव्या देतेस ह्मणून कांटा रुतला; हें अ.. माझ्या मनासारखें घडून आलें असें बोलेल. पडल्या काळचीं .. सोसून रहावें; पण तीं वैऱ्यास कळवूं नयेत. प्राण गेला तरीं पुरवलें.. पण वैऱ्याला शरण जाऊन काकुळती कदापि करूं नये. अशा विचारानें ती रडत रडत कांटा काढीत होती.

मग इची तर इकडे अशी अवस्था झाली; व तिकडे तुकाराम डोंगरावर उपाशीं राहिला; असें पाहून पंढरिनाथास दया आली. तो तिजपुढें अचानक येऊन उभा राहिला. तेव्हां अवली त्यास पाहून शिव्या देऊं लागली. माझ्या संसाराचा मातेरा करण्यास हाच काळ्या मुख्य, असें ह्मणून तोंड फिरवून बसली; तरीं विठोबा तिजपुढें उभा आहेच. ती जिकडे तोंड फिरवी तिकडे तो तिला दिसेच. आतां अवलीची सप्रेमभक्ति नसून ती तर निरंतर त्याची द्वेषानें निंदाच करी. असें असतां विठोबानें तिला बळेंच दर्शन कसें दिलें असें स्वाभाविक मनांत येतें; परंतु असें आहे कीं, भक्तिभावानें रामचंद्र ध्यानास येईना ह्मणून विरोधभक्ति करून ह्मणजे द्वेष करूं लागल्यामुळें रावणाला सारी लंकानगरी राममय दिसे. त्याप्रमाणेंच कंसाला कृष्ण वैऱ्याप्रमाणें वाटूं लागल्यानें त्यास सर्वकाळ श्रीहरि डोळ्यापुढें दिसे. तशीच तुकारामाची स्त्री पांडुरंगा.. ला दुस्मानासारखा समजे ह्मणून तो तिच्यापुढें उभा राही. तो दिसूं नये यास्तव अवलीनें डोळे मिटले असतां, तो तिला मनांत दिसूं लागला. तेव्हां ती त्याला पुष्कळ वाईट शब्द बोलली.

मग, आतां मजवर इची प्रीति जडेल अशी युक्ति करावी असें पांडुरंगानें मनांत आणून तो तिला ह्मणूं लागला कीं, तूं माझी कन्या आहेस; मनांत कांहीं द्वैत धरूं नकोस. तूं मला दावेदार ह्मणून ह्मणत असतेस तर मीं कोणतें वैर साधिलें? भ्रतार विदेही केला हें .. .. निराधार होय. देंठापासून सुटलेलें फळ ..

खालीं पडतें, त्याप्रमाणेंच तुकारामाच्या वैराग्यास मी कारण झालों. ाझ्या रूपीं चित्त लावून तो अरण्यांत जाऊन बसतो; ह्यामुळें तु- ऱ्यासारखेंच मला झालें. तुम्हांस खावयास नव्हतें ह्मणून मीं विपुल ोक आणिलें. असें असतां तुकारामानें तें घेतलें नाहीं; ह्यांत माझा ाय अपराध ? असें बोलून तिचा पाय आपल्या मांडीवर घेऊन चटकन ांटा काढून टाकिला. व त्या वेळीं ईश्वरानें तिच्याकडे कृपादृष्टीनें पहातांच तिला सर्व दुःखाचा विसर पडला.

मला डोंगरावर जाण्यास फार उशीर झाला असें बोलून कुरकुली डोक्यावर घेऊन ती जाऊं लागली. विठोबाही तिच्या मागोमाग जात होता. तीं पर्वतावर जातांच, आज अपूर्व गोष्ट दृष्टीस प आहे ह्मणून तुकारामास विस्मय वाटला. आज रात्र व सूर्य, ि समुद्र आणि अगस्ति, यांप्रमाणें अवली व शेषशायी यांना एके काणीं सख्यत्वानें पाहिल्यानें त्यास अत्यद्भुत नवल वाटलें. इतक्यात तीं उभयतां जवळ आलीं. व तुकारामानें श्रीहरीच्या पायांवर मस्तक ठेविलें. मग तीं तिथें स्वस्थ बसलीं.

पुढें विठोबाला जेवावयास घालावयाकरितां तुकारामानें अवलीस सांगितलें. तेव्हां एक भाकर असल्यामुळें ही दोघांना कशी पुरेल ह्याचा तिला मोठा विचार पडला. तरी तिणें न वंचितां देवाच्या पानावर सगळी भाकर वाढिली. तेव्हां अवलीची विरोधभक्ति असूनही तिनें असें केलें म्हणून पांडुरंगाला संतोष वाटला. मग देवानें कुरकु- ळीभर पक्वान्नें निर्माण केल्यावर तिला तुकारामाला वाढावयास सांगितलें. तें ऐकून ती दुसरी भाकरी नाहीं ह्मणून मनांत लाजित झाली. ग कुरकुलीवरचें वस्त्र काढून पहाते तों ती पक्वान्नानें भरलेली दि- सली. त्या समयीं मला कुळस्वामिणी पावली; भैरव, खंडेराव, भवानी यांणीं येऊन माझी अब्रू राखिली असें तिला वाटलें. मग हें कोणाचें कर्तृत्व आहे हें मला कळत नाहीं; ज्याणें माझा मान राखिला त्यास मी शरण आहें; असें ती मनांत ह्मणूं लागली. तेव्हां पांडुरं- गानें तिला सांगितलें कीं, तूं ज्यास अंतःकरणापासून शरण गेलीस तो मीच होय. मला तूं ओळखलें नाहींस. मींच एथें देखत

देखत पक्कान्नें निर्माण केलीं; हें तूं खरें समज. तरीं त्याचें हें भाषण तिला खरें वाटेना. तिच्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना येऊं लागल्या. तिणें तीं पक्कान्नें दोघांना वाढिलीं; परंतु पाणी नाहीं ह्मणून ती चिंतेंत पडली. तेव्हां पांडुरंगानें अमुक ठिकाणीं पाण्याचा झरा आहे असें सांगितलें. पण तेथें उदक नव्हतें हें तिला ठाऊक असल्यामुळें त्याचें तें ह्मणणें तिला सत्य वाटेना. परंतु ती तेथें जाऊन पहातें तों, निर्मळ झरा पाहून चकित झाली. व ही सर्व याचीच करणी, अशी मग तिची खात्री झाली. हा सावरी मंत्र शिकून कपटविद्येंत निपुण झाला, असें तिला वाटलें. मग ती तेथून पाणी घेऊन आली. ते उभयतां भोजनास बसलेले पाहून देवांनीं पुष्पांचा वर्षाव केला. मी तुझा योग सिद्धीस नेईन ह्मणून त्याणें तुकारामास सांगितलें. मग तिघांनीं तेथें भोजन केलें.

मग संपूर्ण ठिकाणीं मी भरलेला आहें, अशा मतलबाचा पांडुरंगानें तुकारामास बोध करून सांगितलें कीं, तूं आजपासून पर्वतावर नित्य येत जाऊं नकों; कांकीं अवलीला फार कष्ट होतात. मग तुकाराम बहुत स्तुति करून पांडुरंगाच्या पायां पडून त्याच्या सांगण्याप्रमाणें वागण्यास कबूल झाला. पांडुरंगानें त्यास आलिंगन देऊन पोटाशीं धरिलें व आपण अंतर्धान पावले. तुकारामाच्या मुखांतून निघलेलीं प्रासादिक वचनें श्रुतिसमान होत. नंतर अवलीस बरोबर घेऊन तुकाराम गांवांत येऊन राहिला.

---

## अध्याय ३१ वा.

### तुकाराम.

पांडुरंगानें भांबपर्वतावर तुकारामास उपदेश केल्यानंतर तो गांवांत येऊन राहिला. तो साधुसंतांचा उत्तम आदरसत्कार करी. तो संतचरणांचें तीर्थ ब्रह्मरसाहून श्रेष्ठ मानून प्राशन करी. सर्व तीर्थें साधूंच्या चरणांवर लोळतात अशी त्याची पक्की खात्री होती. कोणी भुकेला त्यास कळला असतां आदरसत्कारानें तो त्यास भोजनास घेऊन

येई. संतसेवा व त्यांच्या वचनांवर त्याचा विश्वास चांगला जडला. तो साधूंच्या मागें कीर्त्तनामध्यें सूर देण्यास उभा राही. उत्तम भक्तांचीं जीं लक्षणें भागवतग्रंथांत सांगितलीं आहेत तीं सर्व तुकारामाच्या अंगीं होतीं. लोक तो वेडा असें समजत. त्यास कोणीं कांहीं काम सांगितलें असतां तो तें आवडीनें करी. आपल्याजवळ असलेली वस्तु कोणीं मागितली असतां ती तो त्यास लागलीच देई. तो स्वत: कोणापाशीं कांहीं मागत नसे. लोकांस ब्रह्मज्ञान सांगावयाचें पण आपण कवडीसाठीं प्राण देणाऱ्या लोकांप्रमाणें तुकाराम नव्हता. तो आपल्याप्रमाणें सर्व जगत मानून बोलल्याप्रमाणें वागत असे. त्याजमध्यें द्वैतभाव अगदीं नव्हता. कोणी स्तुति करो किंवा निंदा करो; पण त्याबद्दल तो हर्ष किंवा शोक मानीत नसे.

एके दिवशीं अशी गोष्ट घडून आली कीं, तुकारामाची बायको आपलें लुगडें भिंतीवर ठेवून परसांत स्नान करीत होती. इतक्यांत एक गरीब ब्राह्मणीण येऊन तुकारामाजवळ वस्त्र मागूं लागली. तिणें त्याचें पुष्कळ आर्जव केलें, व मजजवळ दुसरें वस्त्रच नाहीं; यास्तव एखादें जुनेंपानें दिलेंस तर पडदणीस उपयोगीं पडेल, व तुला अपार पुण्य लागेल असें ती बोलली. त्या वेळेस तो भजन करीत होता. त्याणें तिला खुणेनें तें आपल्या बायकोनें नेसावयाकरितां भिंतीवर ठेवलेलें जुनें लुगडें घेऊन लवकर जावयास सांगितलें. मग ती वस्त्र घेऊन तुकारामास आशीर्वाद देऊन निघून गेली. मागाहून तोही इंद्रायणीच्या तीरीं जाऊन भजन करीत बसला.

इकडे तुकारामाची बायको जिजाबाई परसांत स्नान करून भिंतीवर पाहूं लागली तों लुगडें नाहीं. मग ती लज्जित झाली. कांकीं, मुळीं तिच्याजवळ आडजुनें एकच लुगडें होतें ह्मणून तें भिंतीवर ठेवून ती नग्न होऊन अंघोळ करावयास बसली होती. लुगडें नाहींसें झालेलें पाहून ती विस्मित झाली; व ह्मणूं लागली कीं, माझें कर्म ओढवलें; देखत देखत वस्त्र गेलें. बुबायी दासी घरीं नाहीं. ती शेणी आणावयास दूर गेली आहे. गंगा तान्हें लेंकरूं, तें बाहेर खेळत आहे. महादेव विठोबास घेऊन स्नानास गेला आहे. त्याणें नग

वडिलाचा कित्ता घेतलाच ! केव्हांचा गेला आहे पण अजून आलाच नाहीं. काशी व भागीरथी ह्या दोघी पोरी मात्र संसारांत दक्ष होत्या; पण त्या सासरीं जाऊं लागल्यापासून घरांत चीजवस्त संभाळावयास कोणी नाहीं. पाहिजे तें पाहिजे त्यास उचलून देतो. हे घरीं बसले असतां एक ब्राह्मणीण वस्त्र मागावयास आली होती तिचा चुटपुटता शब्द मीं ऐकला होता. तिलाच तें देऊन टाकून आपण निघून गेला असेल ह्यांत संशय नाहीं; ह्मणून तोंड लपवून चोरून गेला. एऱ्हवीं बाहेर जातांना काळ्याच्या नांवानें हांका मारीत जावयाचा ! आज अन्याय झाला ह्मणून तो मुकाट्यानें चालता झाला. हा नवरा नव्हे; माझा दावेदारच. जन्मांतरचें वैर साधून घेत आहे. कोठून रांड भटीण आली कोणाला ठाऊक ? लुगडें मात्र घेऊन गेली. फुकटचें घ्यायाला तिला काय ? माझा बाप आपाजी याणें तें मला दिलें होतें. ह्या नवऱ्याच्या कमाईचें धड अन्न तरीं कोठें खावयास मिळतें आहे ? गळ्यांत मणी मंगळसूत्र बांधून फुकटचा मेला धनी होऊन बसला ! धंदा करावयाची अक्कल असती तर कां दिवाळें काढून बसता? अन्नअन्न करीत एक बायको मेली; तरी त्याची लाज नाहीं. खुशाल फिरत असतो, रखुमाईच्या पदरीं सुकृत होतें, ह्मणून ती अगोदर मेली. मला विपत्ति भोगावयाची आहे; ह्मणून मी अद्याप वांचलें आहें. आतां घरांत जावें तर लोक हिंडतात फिरतात; असें बोलून कांहीं उपाय न सचल्यामुळें ती खिन्न होऊन तेथेंच बसून राहिली. इतक्यांत व्याही व दुसरे लोक लग्नाचें आमंत्रण द्यावयास घरांत आले. त्यांणीं तिला बाहेर यावयास हांक मारिली. अवली त्या वेळीं अंघोळीच्या धोंडीवर नग्न बसली होती. ती त्या वेळीं शरमून गेली; व ह्या वेळेस दावेदार असता, तर फाडकन तोंडांत मारिली असती ह्मणून बोलली. व असा प्रसंग पडल्यानें खिन्न झाली.

अवली उर्फ जिजाबाई अशा संकटांत पडलेली पाहून पांडुरंगानें असें कौतुक करून दाखविलें कीं, एक उत्तम पितांबर तिजवर टाकिला; आणि लज्जा रक्षण केली. तेव्हां तो दिव्य पितांबर पाहून ती चकित झाली, व ही काळ्यावांचून दुसऱ्याची करणी नाहीं

ह्मणून समजली. व माझ्या नवऱ्याला वेड लाविलें ह्मणून तो माझा वारंवार संभाळ करितो; ह्यांत त्याचा कसचा उपकार आला आहे ? असें बोलून पितांबर नेसून घरांत गेली. तो दिव्य पितांबर पाहून सर्वांचे डोळे दिपून गेले. व आजपर्यंत असें वस्त्र आमच्या पहाण्यांत आलें नाहीं; हें तुकारामानें कोणाचें घर बुडवून आणिलें असावें असें ते मनांत ह्मणाले. नंतर जिजाबाईस लग्नाचें आमंत्रण केलें; व अहेर मिळण्याची आशा नसल्यानें त्यांणीं तिला बराच वरवर आग्रह केला. त्यांची चर्या पाहून सवड झाली तर मी मागाहून येईन असें अवलीनें उत्तर दिलें, तें ऐकून ते निमूटपणें चालते झाले.

इकडे वस्त्र दिल्यामुळें अवली रागावेल ह्या धास्तीनें तुकाराम वनांत गेला; आणि पांडुरंगाची प्रार्थना करूं लागला कीं, मी संपूर्ण पातकांचा केवळ पुतळा बनून राहिलों आहें. ह्यास्तव माझी मानखंडणा होईल तो मला दंड करावा. तिकडे संसाराची धुळधाणी झाली; इकडे तुझी सेवाही बरोबर घडत नाहीं; हें तूं सर्व लक्षांत असूं दे. असें बोलून भजन करीत बसला. पुढें तो चार घटका रात्र झाल्यानंतर देवळांत गेला. ही बातमी अवलीला समजली. तिचा राग देवानें पितांबर दिल्यानें शांत झाला होताच; यास्तव तिनें मुलीजवळ भाजी भाकर देऊन त्याकडे पाठवून दिली. मग तीं खाऊन त्याणें हातीं दगडाचे टाळ घेऊन तेथें कीर्त्तन केलें. भाविक लोक ऐकावयास बसत. तो नित्य दिवसास वनांत राही व रात्रीस देवळांत कीर्त्तन करी. तें आटोपल्यावर तेथेंच नामस्मरण करीत राही. त्यास झोंप येई तेव्हां तो शेंडीस दोरी बांधून टांगून ठेवी व डुलकी आली ह्मणजे हिसका बसे तेव्हां तो जागा होई. त्यानें असें चार दिवस करून झोंप पळविली. तो परोपकार करण्यासाठीं मनापासून झटे. तो अतीतअभ्यागतांस आपल्या घरीं नेऊन किंवा देवळांत ठेवून त्यांच्या खाण्यापिण्याची बर्दास्त ठेवी व त्यांची सेवाचाकरी करी. हिंसाकर्म न होऊं देण्याविषयीं त्याचा मोठा कटाक्ष असे.

एकदां तुकाराम इंद्रायणीच्या तटीं भजन करीत बसला असतां कांहीं व्यापारी बाजाराला जात होते त्यांनीं सहज विनोदानें, आमच्या

बरोबर चल, असें सांगितल्यावरून तो त्यांच्या संगतीं जाऊं लागला. मार्गांत एक वृद्ध ब्राह्मणीण काठी टेंकीत टेंकीत मोठ्या कष्टानें बाजारास जात होती; तिला तो पाठीवर उचलून घेऊन जाण्यास कबूल झाला. तेव्हां तूं मला जर बाजारांतून तेल आणून देशील तर मी परत घरीं जाईन; असें ती तुकारामास ह्मणाली. मग केवळ परोपकारासाठींच तेल आणून देण्याचें त्याणें कबूल केल्यावर तिणें संतोषानें पैसे व भांडें त्याच्याजवळ दिलें व आपण घरीं गेली. दुसऱ्या दिवशीं त्याणें तेल तिच्या घरीं नेऊन पोचतें केलें. तेव्हां तुझे उपकार झाले; पण ते फेडावयास्तव माझ्याजवळ तुला देण्यास कांहीं नाहीं असें तिणें त्यास सांगितलें.

पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर त्या ह्मातारीनें लोकांत अशी गोष्ट उघडकीस आणिली कीं, तुकारामानें मला आठ दिवसांच्या बेताचें तेल आणून दिलें असतां मला तें पुष्कळ दिवस पुरलें; ह्याचें मला मोठें नवल वाटतें. पुढें थोड्याच वेळांत ही चमत्कारिक वार्ता साऱ्या गांवभर झाली. मग पुष्कळ लोकांनीं त्याच्यापासून तेल आणवून पाहिलें; तों त्यांनाही तें तेल बरेंच दिवस पुरलें. तेव्हां ते त्याची तारीफ करूं लागले. मग बहुतेक लोक तुकारामाची प्रार्थना करून त्याजकडून तेल आणवूं लागले. परोपकारास्तव त्याणेंही कधींच अनमान केला नाहीं. त्याला कोणीही काम सांगो तें तो बिनतक्रार करीत असे.

एकदां तो मार्गांतून जात असतां लोकांनीं पुष्कळ नळे (तेलाचीं भांडीं) व पैसे दिले ते घेऊन तो बाजारांत गेला. पण कोणीं कोणीं किती पैसे दिले व किती तेल आणावयाचें हें त्यास भजनांत निमग्न असल्यामुळें समजलें नाहीं. जेव्हां तेल्यास नळे व पैसे देऊन तेल घालण्यास सांगितलें, तेव्हां कोणत्या नळ्यांत किती तेल घालावयाचें ह्मणून तेलवाल्यानें त्यास विचारिल्यावर, हें मला माहीत नाहीं; तुला कळेल तसें तूं कर ह्मणून त्यानें त्यास उत्तर दिलें. तें ऐकून वाण्यानें सरसकट सारखें तेल सर्व नळ्यांत भरलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तुकाराम तेलाचे नळे घेऊन परत आला. त्याच्या येण्याची वाट पहात लोक रस्त्यावर टपून उभे राहिलेच होते.

त्यांनीं आपापले नळे ओळखून घेतले. वाण्यानें सर्व नळ्यांत सारखें तेल भरलें असतां ईश्वरी चमत्कार असा झाला कीं, ज्यांचे जितके पैसे होते त्या हिशेबाप्रमाणें तेल त्यांच्या नळ्यांत राहिलें. ह्या पांडुरंगाच्या चमत्कारानें तुकाराम सर्वांच्या प्रीतीस पात्र झाला.

हा मजकूर जेव्हां अवलीला समजला, तेव्हां आपल्या नवऱ्यापासून लोक फुकट आणि जिवापलीकडे काम घेऊं लागले ह्मणून ती त्यांस घालूनपाडून बोले. तेव्हां कित्येक तिला ह्मणाले कीं, आपला दाम खोटा आणि परक्याशीं झगडा काय कामाचा? तुझा नवरा कामें ऐकतो ह्मणून ते सांगतात; ह्यांत लोकांना कां नाना प्रकारांनीं बोलतेस? अशा रीतीनें लोक तिची समजूत करीत व ह्मणत कीं, तुझ्या नवऱ्याच्या हातून तेल आणिलें असतां पुष्कळ दिवस पुरतें; ह्मणून लोक त्याची खुशामत करून तेल आणण्यास सांगतात व तो परोपकारास्तव आणूनही देतो. मग तूं विनाकारण दुसऱ्याला कां ह्मणून शब्द लावितेस? असें ऐकून ती आपल्या नशिबास बोल लावून उगीच राहिली.

एके दिवशीं जिजाबाईनें तुकारामास सांगितलें कीं, आज तुमच्या वडिलांची पुण्यतीथ आहे; यास्तव सामानाची कांहींतरी सोय केली पाहिजे. घरांत तर कांहींच नाहीं. हें ऐकून, मी भाजी पुष्कळ घेऊन येतों ती शिजवून पितरांना जेवावयास घाल; असें तिला सांगून तो नामस्मरण करीत रानांत जावयास निघाला; व स्वस्थपणें भजन करीत चालला. वाटेंत एका शेतकऱ्यानें त्यास गहूं उपटण्याच्या कामावर लाविलें. तें पीक कापण्याचें काम तो दुसऱ्या मजुरांप्रमाणें कचराई न करितां करूं लागला. त्या वेळीं नामस्मरणांत गढून गेल्यामुळें आपण भाजी न्यावयास आल्याचें भान त्यास राहिलें नाहीं. इकडे घरीं उशीर झाल्यानें त्याची बायको चरफडूं लागली; व वाटेल तसें बोलूं लागली. तेव्हां भक्ताचें उणें पडूं द्यावयाचें नाहीं ह्मणून पांडुरंगानें साहित्य करावयाचें मनांत आणून तुकारामाचें रूप धरलें व तो सामानसरंजामाची मोट बांधून घेऊन गेला. त्यानें जिजाईस सांगितलें कीं, मोट सोडून सामान काढून घेऊन स्वयंपा-

कांची तयारी कर; मी चार भांडीं घेऊन येतों असें बोलून निघून गेला. मागें जिजाबाई गाठोडें सोडून पहाते तों आंत डाळ, तांदुळ, कणीक, तूप, साखर, गूळ, भाज्या अगदीं जिन्यामिन्यासुद्धां. ती सर्व सामान पाहून आनंदानें काढून नेत होती, इतक्यांत पुन: भांडीं घेऊन वेषधारी तुकाराम आला. पुढें त्यानें गांवांत जाऊन सर्वांना भोजनाचें आमंत्रण केलें. त्या वेळीं सर्वांना मोठें नवल वाटलें व तुकारामानें आतां संसारांत मन घातलें असें ते ह्मणूं लागले. कितीएक जण हें आमंत्रण खोटें समजून थट्टा करूं लागले.

वेषधारी तुकारामानें सर्वांना भोजनास सांगितलें. नंतर स्वयंपाक झाल्यावर घरोघर हिंडून देवानें सर्वांस भोजनास बोलावून आणिलें. लोक आल्यावर देवानें त्यांस आसन देऊन पूजा झाल्यावर भोजनास बसविलें. सावकाश जेवा; जें लागेल तें मागून घ्या; अशी मधून मधून तुकारामरूपी पांडुरंग प्रार्थना करीत होताच. सर्व मंडळी तृप्त होऊन आनंदानें विडे घेऊन घरीं गेली. जीं गरीबगुरीब अन्न मागावयास आलीं, त्या सर्वांस जिजाईनें अन्न दिलें. कोणासच विन्मुख दवडिलें नाहीं. अन्नाला खूप बर्कत आली असें अवलीस वाटून तिला आनंद झाला. नंतर आतां भांडीं ज्यांची त्यांस नेऊन देऊन मग स्वस्थपणें मी जेवीन असें बोलून वेषधारी तुकारामानें भांडीं नदीवर नेऊन घांसून ज्यांचीं त्यांस देऊन आपण गुप्त झाला.

इकडे मजुरीबद्दल तुकारामास शेतकऱ्यानें गव्हांच्या चार पेंढ्या दिल्या. त्या घेऊन तो घरीं गेला व स्त्रीस सांजा करावयास सांगूं लागला असतां ती विस्मित झाली. व झालेला सर्व प्रकार सांगून पदार्थ केलेले दाखविले; तेव्हां तुकारामास हें पांडुरंगानें कृत्य केल्याचें समजलें.

तुकाराम घरीं येत असतां मध्यें एक असा चमत्कार झाला कीं, एके ठिकाणीं मधमाशांनीं मधोलें घातलें होतें त्यास त्या गव्हांच्या पेंढ्यांचें कूस लागतांच सर्व माशा त्याच्या अंगास झोंबल्या; परंतु त्या त्याणें उडविल्या नाहींत. सर्व पितर माशांच्या रूपानें आले, असें त्यानें मनांत आणिलें. तेव्हां गुप्तरूपानें पांडुरंगानें माशा घालविल्या. असो.

अवलीनें गांवांतील लोकांस भोजन घातल्याचें वर्तमान सांगितलेलें ऐकून घेतल्यानंतर, माझ्यासाठीं पांडुरंगास कष्ट पडले ह्मणून त्याचे डोळे आंसवांनीं भरून आले. तो देवाचा धांवा करून ह्मणाला, पांडुरंगा, तुझ्यावांचून मी एकटा जेवणार नाहीं. मग पंढरीनाथ तात्काळ प्रगट झाले. नंतर उभयतांनीं भोजन केलें. जिजाबाईनें अति आवडीनें त्यांना वाढिलें. जेवून तृप्त झाल्यावर रुक्मिणीकांत अंतर्धान पावला. हें सर्व कृत्य पाहून जिजाईला नवल वाटलें.

---

## अध्याय ३२ वा.

### तुकाराम.

जगज्जिवनानें तुकारामाचें रूप धरून सर्व साहित्याचा पुरवठा केला व त्याचे पितर जेववून तृप्त केले. पुढें तुकाराम घरीं आल्यावर ह्या प्रमाणें प्रकार घडल्याचें वर्तमान स्त्रिनें त्याच्या कानावर घातलें. त्या वेळीं आपणाकरितां रुक्मिणीकांतास फारच श्रम पडतात असें त्यानें स्त्रीस बोलून दाखविलें. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं तुकाराम उठून इंद्रायणीचें स्नान करून देवालयांत गेला; व पांडुरंगाची पूजा केल्यानंतर स्तवन करूं लागला कीं, देवा पंढरिनाथा, तूं कृपेचा केवळ सागर आहेस. तूं जात, कूळ, कांहींएक न पाहतां भक्तांचें संरक्षण करितोस. नामदेवाचीं मुलें उपाशीं मरूं लागल्यामुळें राजाई वारंवार विवंचनेंत पडे; अशा प्रसंगीं साह्य करण्यासाठीं तूं केशवशेट होऊन तिला गोणभर होन नेऊन दिलेस. चोखामेळा जातीचा महार असतां त्याचीं ढोरें ओढिलींस; व मोठ्या आवडीनें त्याच्याबरोबर जेवलास सुद्धां. ज्ञानदेवासाठीं भींत चालविलीस. दामाजीपंतानें अपार धान्य लुटविल्यानें त्या धान्याचे पैसे तूं विठ्यानाईक महार होऊन भरलेस. मिराबाईसाठीं विष प्राशन करून तिची लज्जा राखून कीर्ति वाढविलीस. नरसीमेहेत्यासाठीं सांवळा नांवाचा सावकार होऊन त्याणें लिहिलेली हुंडी स्विकारून अपूर्व लाघव करून दाखविलेस. देवा, असे तुझे भक्त अनेक झाले. मी

केवळ अल्पमति मूढ आहें. तुकारामाची अशी स्तुति ऐकून विठोबास संतोष वाटला. व तो मागेल तें देण्याचें देवानें मनांत आणिलें.

कायिक, वाचिक आणि मानसिक हीं तिन्हीं प्रकारचीं तपें तुकारामास घडलीं. परोपकार करण्यांत तर त्याणें आपलें सर्व आयुष्य घालविलें. तो आषाढी कार्त्तिकीची पंढरीची वारी नेमानें चालवी. माहेरीं जाण्यास जसा सासुरवासिणीस आनंद होतो, तसाच आनंद तुकारामास पंढरपुरास जातांना होई. तो पायीं चालत पंढरीस जाई. त्याला कीर्त्तनाची फार आवड. हिचेंच नांव कायिक तपश्चर्या. दुसरी वाचिक तपश्चर्या ती अशी कीं, तो जें भाषण करी तें सत्य व स्पष्ट बोले; व अहोरात्र नामस्मरण करण्यांत चूर. तिसरी मानसीक तपश्चर्या ती ही कीं, पांडुरंगाच्या चरणारविंदीं त्याचें मन रमून गेलें होतें. जसें चातक पक्षी मेघावांचून उदक पीत नाहींत, अगर लहान मूल रडूं लागलें असतां आईनें घेतल्यावांचून उगें रहात नाहीं, तद्वत पंढरिनाथावांचून तुकाराम दुसरें कांहींच जाणत नसे.

पांडुरंगाच्याच चरणीं तुकारामाचें चित्त जर मुरलें होतें, तर मग कायेक तप ह्मणजे साधुसंतसेवा व परोपकार करण्याकरितां तो कां झटत असे? असा कदाचित् कोणास संशय येईल तर त्या शंकेचें अशा रीतीनें निराकरण करतां येतें कीं, एका श्रीहरीच्या सत्तेनें चराचर वर्त्तत आहे, असें जाणून तो श्रीहरीचें मनोगत राखावयासाठीं सर्वांशीं नम्रतेनें वागत असे. जसी सासुरवासीण पतिव्रता आपल्या पतीच्या ठिकाणींच प्रीति ठेवित असते; पण पतीची आपणावर इतराजी न होतां त्याची प्रीति कायम रहावी ह्मणून सासू, सासरा, दीर, नणंद इत्यादिकांशीं तिला तीं नाना दुरुत्तरें बोलत असतांही आर्जवानें वागत असते. तथापि नवऱ्यावांचून तिचें प्रेम दुसऱ्यांवर खरोखर नसते. अशाच रीतीनें तुकाराम सर्वांशीं आर्जवानें वागत असे; तरीं पांडुरंगाच्याच ठिकाणीं त्याचें मन होतें. तुकाराम हें संपूर्ण चराचर पांडुरंगमय मानून सर्वांभूतीं नमन करीत असे. तो कर्म, उपासना व ज्ञान ह्या तिन्हीं कांडांत निपुण असे व तदनुसार त्याची जनाशीं वर्त्तणूकही असे

हा सर्व तुकारामाच्या स्थितीचा प्रकार जाणून पांडुरंगानें आपले गुणानुवाद गातां येण्यासाठीं त्यास कविता करण्याची शक्ति द्यावी असें मनांत आणलें. मग नामदेवाचा हात धरून पंढरिरायाची स्वारी देहूस गेली. त्याच रात्रीस पांडुरंगानें तुकारामास निद्रिस्त असतां पाठ थोपटून जागें केलें आणि ह्मटलें, तुकारामा, तूं उठून माझ्या भाषणाकडे नीट लक्ष दे. हा नामदेव माझा पूर्ण भक्त आहे. ह्यानें शंभर कोटि प्राकृत ग्रंथ करण्याचा पण करून संकल्प केला होता. त्याजला साह्य केल्यावांचून मला रहावेना; ह्मणून मीं त्यास स्फूर्ति देऊन थ्याची कविता स्वतः आपल्या हातानें लिहिली. ती संख्या चवऱ्याण्णव कोटि चाळीस लक्ष. शिवाय नऊ लक्ष लळीत शेवटीं लिहिलें. नंतर हा वैकुंठास आला. तेव्हां बाकी राहिलेलें लिहावयाचें तसेंच राहून गेलें. यास्तव आतां तुला मी इतकेंच सांगतों कीं, पांच कोटि एकावन्न लक्ष शेष राहिलेलें कवित्व त्वां पुरें करावें. ह्या कामीं तुला माझें पूर्ण साह्य आहे. तुझ्या योगानें वहुतांचा उद्धार होईल. यास्तव त्वरित कवित्व करण्यास आरंभ कर. इतका दृष्टांत दाखवून देव नामदेवासह गुप्त झाला. मागाहून तुकाराम जागा झाला. स्वप्नामध्यें त्यास देव, भक्त, यांचें दर्शन झालें; तें ध्यान त्यास डोळ्यांपुढें दिसत होतें. त्यास संतांचीं वचनें पाठ करण्याची आवड होतीच; तशांत त्यास प्रसादिक वचनें बोलण्याची पांडुरंगाची आज्ञा झाली ह्यामुळें तुकारामास परम संतोष झाला.

तुकारामास पूर्वीं बाळबोध लिहितां वाचतां येत नव्हतें असें असतां, त्यानें कोऱ्या चोपड्या करून त्यांवर बाळबोध लिहिण्याचा झपाटा चालविला. श्रीव्यासानें श्रीभागवत ग्रंथ केला, त्यांतील दहाव्या स्कंधांत गोकुळांतली भगवंताची सर्व क्रीडा वर्णन केली आहे; ती बाळक्रीडा लिहिण्यास तुकारामानें प्रथमतां आरंभ केला. तुकाराम कीर्त्तन करीत असतां त्यास चरित्राची कविता पाठ नसली, तर तो तावडतोब त्यावर अभंग करी. त्याची वरदवाणी असल्यामुळें कीर्त्तनांत ओतप्रोत रंग भरत असे; येणेंकरून श्रोत्यांस परम आश्चर्य वाटे. पांडुरंगाच्या देवालयामध्यें तो दररोज दोन प्रहर कीर्त्तन करी. एकादशीस

मात्र चारी प्रहर कीर्त्तन होई. आसपासच्या गांवोगांवचे भाविक लोक कीर्त्तन ऐकावयास येत असत.

मंबाजीबावा ह्मणून एक ब्राह्मण कांहीं दिवस चिंचवडास राहिला होता. तो गोसावी होऊन सहकुटुंब देहू गांवीं येऊन मठ बांधून राहिला. त्याणें त्या ठिकाणीं कांहीं शिष्यमंडळी मिळविली. त्याचा खर्च तेच शिष्य चालवीत. त्या वेळीं तुकारामाची भरभराट पाहून त्याच्याविषयीं त्या मंबाजीच्या मनांत वैरभाव उत्पन्न झाला. तो ह्मणे कीं, ह्या तुकारामानें आमच्यादेखत वह्या पाठ केल्या. ह्याची इतकी वडिजावी झाली कीं, ह्यास ब्राह्मणदेखील नमस्कार करूं लागले. हा तुकाराम ह्मटला ह्मणजे जातीचा वाणी व मी प्रतिष्टित महंत; परंतु बहुतेकांचा कल पहावा तो तुकारामाकडे. ह्यामुळें त्याची कीर्त्ति होऊं लागली; व मला कोणी विचारिनासा झाला. असले विचार मंबाजाच्या मनांत येऊं लागल्यावर त्याणें हरप्रयत्नानें तुकारामाचा अपमान करून सूड उगविण्याचा निश्चय केला.

तुकारामाविषयीं त्याच्या मनांत इतका द्वेष उत्पन्न झाला असतांही तो लौकिकार्थ त्याच्या कीर्त्तनास जात असे. तुकाराम शत्रु व मित्र दोघे सारखेच मानी. असो. देवालयाच्या मागच्या बाजूस दक्षिणच्या अंगीं त्या मंबाजीनें कांहीं झाडें लाविलीं होतीं. त्यांच्या सभोंवतीं कुंपण घालून बंदोबस्तानें त्यांवर तो स्वतः देखरेख ठेवी. एकदां तुकारामाच्या सासऱ्यानें आपल्या मुलीला एक दुभती ह्मैस दिली होती ती तिणें एके दिवशीं पाणी पिण्यास सोडली असतां, वई मोडून मंबाजीच्या बागेंत शिरली. तेव्हां बागेची नासाडी झालेली पाहून तो फारच रागावला, व तुकारामास परोपरीचे अपशब्द बोलला. नंतर त्याणें ह्याबद्दल बाटाघाट केली नाहीं, तरी तुकारामास हात दाखविण्याची तो संधि पहात होताच.

पुढें एकादशीचे दिवशीं सूर्यास्त होण्याच्या संधीस देवदर्शन घेण्याकरितां यात्रा येऊन थडकली. प्रदक्षिणेच्या वाटेवर मंबाजीनें कांठ्या रोंविल्या होत्या, त्या रस्ता मोकळा करण्यासाठीं तुकारामानें उपटून टाकिल्या. त्या महंताच्या मनांत तुकारामाविषयीं मत्सर उद्भवून,

त्याची अप्रतिष्ठा करावी ह्मणून तो टपून बसला होताच; त्यासाठीं त्यास हें कारण कामास आलें. तो विस्तवाप्रमाणें लाल होऊन नाना प्रकारचे अपशब्द बोलत तुकारामाच्या अंगावर चालून गेला; व त्याच काठीनें त्यास मारूं लागला. त्याणें तशा दहा वीस कांटेरी काठ्या तुकारामाच्या अंगावर फोडिल्या; पण त्यानें एक चकार शब्द तोंडांतून काढिला नाहीं. त्या समयीं मंबाजीच्या अंतःकरणांत लेशभर सुद्धां दया आली नाहीं. तो पक्का निष्ठुर, व तुकाराम शांतिक्षमेचा सागर बनला. तो तेथून न हालतां तेथेंच मार खात असतां पांडुरंगाचें भजन करीत होता. त्या मंबाजीची काया मात्र ब्राह्मणाची; परंतु करणी सर्व कसाबाची होय.

नंतर तुकाराम देवालयांत गेला. त्याच्या अंगांत कांटे रुपून रक्त निघत होतें तें पाहून वरकड मंडळीस कळवळा आला. त्यांच्या डोळ्यांतून टपटप आंसवें पडूं लागलीं. त्या वेळीं तुकाराम विठोबास ह्मणाला, आज मला शिवीगाळी देववून खासा मार देवविलास! देवा, ही सर्व तुझीच करणी होय; असें त्याणें स्पष्ट ह्मटलें. मग अवलीनें सर्व कांटे काढून टाकून दिले व काळ्या हात धुऊन पाठीस लागला असल्यामुळें अशी संसारांत फजिती करीत चालला असें ती ह्मणाली. तेव्हां पंढरिनाथानें तुकारामाकडे कृपादृष्टीनें पहातांच कांट्यांचीं क्षतें साफ बुजून शरीर पूर्ववत् झालें.

तो एकादशीचा दिवस, सारी रात्र हरिजागर करून घालवावयाची; ह्मणून तुकारामाचें कीर्तन ऐकावयास पुष्कळ लोक बसले होते. तेव्हां तुकाराम ह्मणाला कीं, मंबाजी बावा महा पुरुष होय; कीर्त्तनास ते नित्य येत असतां आज कोणत्या कारणास्तव त्यांस विलंब लागला कळत नाहीं; असें बोलून त्यांस बोलावूं पाठविलें. त्यावर, माझें अंग फार दुखतें आहे असा त्याच्याकडून जबाब आला. मग तुकाराम स्वतः त्याकडे गेला व साष्टांग दंडवत घालून त्याचें अंग रगडीत बसला. तो ह्मणाला, मला काठ्यांनीं सडकून मार दिल्यामुळें स्वामीस शीण झाला. आपण आतां माझ्या अपराधाची मला क्षमा करून कीर्त्तनास चलावें; असें ह्मणून चार घटका अंग रगडीत बसला. त्या समयीं मंबाजी

अगदीं ओशाळा पडला. तो तसाच खालीं मान घालून मुकाठ्यानें कीर्त्तनास गेला; तरी तुकारामाविषयीं त्याचें मन शुद्ध नव्हतेंच. संतांनीं पाहिजे तसे चमत्कार दाखविले, तरीं दुष्टाच्या अंतःकरणांत पाझर सुटत नाहीं. पांडवांचा कैवार घेण्यासाठीं देवानें अनेक तऱ्हा केल्या; पण दुर्योधनाचें मन पालटलें नाहीं. सर्प अन्न खात नाहीं ह्मणून त्यास एकादशी घडते काय? चित्त शुद्ध झाल्यावांचून फल प्राप्त होण्याची आशा बाळगूंच नये. दगड बोलत नाहीं ह्मणून ते तपस्वी होतात काय? गाढवें राखेंत लोळतात ह्मणून त्यांस अनुताप झाला असतो काय? नाहीं. पण तुकाराम शत्रुमित्र समसमान मानी. कपट असें त्याच्या मनांत बिलकूल येत नसे. नामरूपीं चित्तवृत्ति जडल्यानें तो मान अपमान कांहीं एक समजत नसे. त्याचें कीर्त्तन प्रेमळ असल्यामुळें रंग चांगला भरत असे.

त्याच रात्रीस असा चमत्कार झाला कीं, तुकाराम कीर्त्तनामध्यें गुंतलेला होता व अवली घरीं स्वस्थ निजलेली; अशी संधि पाहून तुकारामाची दुभती ह्मैस दोघे चोर घेऊन चालले. एक पुढून ओढीत होता व दुसरा मागून हांकीत होता. ते चोर गांवचे पश्चिमेस बोडक्याची वाडी पाव कोसावर आहे तेथपर्यंत ह्मैस घेऊन गेले. अशा समयीं पंढरिनाथास ह्मैस सोडविल्यावांचून रहावेना. तो ह्मणाला, ह्मैस नेल्याचें वर्त्तमान उभयतां नवरा बायकोस ठाऊक नाहीं. आणि जर मीं ह्या वेळेस ती न सोडविली, तर अवली तुकारामास नानापरी गांजील. मग पांडुरंगानें विक्राळ पुरूषाचें रूप घेऊन चोरांस मारावयास हातांत एक टोणपा घेतला व त्यांच्यापुढें मार्गांत उभा राहिला. त्यास पाहून चोर भिऊन गेले. हा भयंकर पुरुष कोण व ह्याच्या हातून आपणास ह्मैस पसार करतां येते कशी? ह्यांविषयीं त्या चोरांच्या मनांत नाना तरंग येऊं लागले. मग ते त्या मार्गानें न जातां दुसऱ्या मार्गानें जाऊं लागले; तों तिकडेही विठोबा त्या महा विक्राळ रूपानें हातांत टोणपा घेऊन उभा आहेच! ते जिकडे पहात तिकडे तो पुरुष त्यांस दिसे; मग मात्र त्यांची हिंमत खचून कंबर बसून गेली. ह्या ब्रह्मराक्षसाच्या किंवा पिशाच्याच्या तडाक्यांतून जगण्याची आशा त्यांस,

दिसली नसल्यानें त्यांची पांचावर धारण बसली. व सूर्य उगवल्यावर आपणास लोक ओळखतील व आपली फजिती होईल ह्यास्तव ते महत् संकटांत पडले.

शेवटीं ते आपसांत ह्मणूं लागले कीं, तुकाराम हा विठोबाचा पूर्ण भक्त आहे; त्याची ह्मैस आपण घेऊन जात आहों ही आपणास जिरणार नाहीं. भूत पुढें येऊन आडविण्याचें कारण तरी हेंच. त्याच्या देवाची करणी कोणास कळावयाची नाहीं. आपल्या हातून हा मोठा अपराध घडला आहे, यास्तव ह्मैस जेथर्ची तेथें नेऊन बांधून ठेवावी; हा मार्ग जीव व अब्रू बचावण्यास योग्य आहे. असा विचार करून त्यांणीं परत जाऊन तुकारामाच्या घरीं ह्मैस पूर्वीं होती तेथेंच बांधिली व पुन्हा गांवाबाहेर ते निघून गेले. तरी विठोबा हातांत टोणपा घेऊन विक्राळ रूपानें त्यांचा पाठलाग करीत होताच! त्यांना तो आड मार्गानें सुद्धां जाऊं देईना. शेवटीं त्यांणीं देवालयांत जाऊन तुकारामास ही गोष्ट सांगण्याचा निश्चय केला. व सर्व घडलेला प्रकार त्यास कळविला; व प्रार्थना केली कीं, तूं विष्णुभक्त आहेस; तुझ्या ठिकाणीं द्वैतभाव मुळींच नाहीं; शत्रुमित्र समसमान मानितोस; ह्यास्तव आह्मांवर कृपा करून कोणत्या तरी युक्तीनें आमची त्या भयंकर पुरुषापासून सुटका कर. असें भापण ऐकून सर्व लोकांस विस्मय वाटला.

ही चोरांची गोष्ट ऐकून तुकारामासही नवल वाटलें. मग पांडुरंगमूर्त्ति ध्यानांत आणून पाहूं लागला, तों रुक्मिणीकांत कीर्त्तनांत नाहीं; असें पाहून चोरांच्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसला. तो नेत्र झांकून पांडुरंगाचा धांवा करतांना ह्मणाला, देवाधिदेवा पंढरिनाथा, आमची नजर चुकवून तूं एथून केंव्हां गेलास? आह्मीं एथें हरिजागरण करीत आहों; पण तूं रानोरान भटकत फिरत आहेस! गुरें राखण्याची संवय तुला पूर्वींपासून लागली आहेच! आह्मीं भक्तिपूर्वक तुझे गुण वर्णन करितों असें असतां तुझें मन एथें रमत नाहीं; आणि वेडेंवांकडें रूप धरून चोरांस दर्शन देतोस. आतां प्रभातसमय झाला; आरतीच्या वेळेस तरी ये! असा तुकाराम धांवा करीत कीर्त्तनांत नाचत आहे, तों हातांत टोणपा घेऊन पंढरीनाथ आले हें

सर्वांनीं पाहिलें. तेव्हां चोरांना विक्राळ भयंकर रूप दिसें; इतर लोकांस साधारण दिसे. तुकारामानें चोरांस निर्भय जावयास सांगून म्हैस पाहिजे असल्यास घेऊन जाण्याची परवानगी दिली; पण ते जीव वांचल्याबद्दलच तुकारामाचे आभार मानून निघून गेले.

हा चमत्कार ऐकून व पाहून मंबाजी विस्मित झाला; व उत्तरोत्तर तुकारामाची कीर्ति वाढेल अशी त्याची पूर्ण खात्री झाली. विष्णुभक्तांची करणी कशी असते ती कपटी मनुष्यास कळत नसते. अभक्तांचे दृष्टांत कवीला वारंवार योजावे लागतात; कारण, अभक्तांच्या योगानें भक्तांचा महिमा वाढतो. जर खोटीं नाणीं नसतीं, तर खऱ्यांची पारख कशी करतां आली असती? यमपुरी निर्माण केली नसती, तर स्वर्गाची इच्छा कोण धरणार होता? चौऱ्यायशीं लक्ष योनी फिरावयाच्या नसल्या तर मोक्षाची आस्था कोण बाळगणार होता? त्याचप्रमाणें जर चोरांनीं त्या समयीं म्हैस नेली नसती, तर तुकारामाचा महिमा विठोबानें कोणत्या उपायानें वाढविला असता? असो.

त्या वेळीं तुकारामानें परोपरीनें विष्णूचे गुण वर्णन केले. ते असें कीं, विष्णूचें नांव सुद्धां हिरण्यकशिपु प्रल्हादास घेऊं देत नसे; परंतु त्याच्यासाठीं चक्रपाणी खांबांत प्रगट झाला. भक्ताचा छळ कीर्ति होण्यास कारणीभूत होतो. जगज्जिवन काळवेळ कांहींएक न पाहतां सद्धर्माची स्थापना करून साधूंचें संरक्षण व्हावें ह्मणून अवतार घेतो. परंतु कलियुगामध्यें भक्तांसाठीं ईश्वरास अनेक प्रकारच्या विपत्ति सोसाव्या लागतात. असें त्या समयीं तुकारामानें चरित्र गाऊन श्रोत्यांस उपदेश केला कीं, हा संसार अशाश्वत मानून श्रीहरीच्या भजनीं रत होणाराचा साक्षात् काळ दास बनून रहातो. मग सर्वांनीं नामगर्जना केली व टाळ्या वाजवून मंगळ आरती करून पांडुरंगास ओंवाळिलें.

---

## अध्याय ३३ वा.

### तुकाराम.

चोरांनीं म्हैस नेलेली विठोबानें आणवून बांधविल्याची बातमी लोकांनीं अवलीस सांगितली. ही चमत्कारिक बातमी ऐकून ती

विस्मित झाली; व घरीं आल्यावर तुकारामास तिणें अति हर्षानें भोजनास बसविलें. भात, भाजी आणि भाकर असे तीन पदार्थ तिणें केले होते. नंतर वाटीभर दूध आणून दिलें; तें पाहून तुकारामास नवल वाटलें. तेव्हां तो अवलीस म्हणाला, जर शुद्ध अंतःकरणानें तांब्याभर दूध देशील तर विठोबास नेऊन पाजावयाचें माझ्या मनांत आलें आहे. तिणें तें म्हणणें मोठ्या आनंदानें कबूल केलें व तांब्या घांसून स्वच्छ करून तो दुधानें भरून तुकारामास आणून दिला. मग दूध घेऊन देवालयांत गेल्यावर त्याणें पांडुरंगमूर्त्तीस पाजिलें.

आतां ही पांडुरंगाची मूर्त्ति पाषाणाची आहे असें लोकांस स्पष्ट दिसत असतां तुकाराम तिला नित्य दूध पाजी; व तीही आवडीनें पिई. ब्रह्मादिकांना वश्य न होणारा परमेश्वर भक्तांच्या स्वाधीन रहातो. असो, पांडुरंगाला दूध पाजण्याचा हा क्रम बरेच दिवस चालला असतां, अवलीच्या मनांत एके दिवशीं अशी शंका आली कीं, घरधनी नित्य तांब्याभर दूध घेऊन जात असतात, परंतु त्याचें काय होतें हें कळत नाहीं. घरीं सगळा पोरवडा पडला; अशानें ताकपाणी होईल कसें? संसार करण्याची हातवटी ह्यांना कशी ती कळत नाहीं. मग सर्वांत धाकटी कन्या भागीरथी ही तुकाराम दूध घेऊन देवालयांत जात असत तेव्हां नित्य त्याजबरोबर जाई; म्हणून दूध विठोबा पितो कीं काय ही गोष्ट जिजाईनें तिला विचारिली. तेव्हां विठोबाची मूर्त्ति दूध पिते; थोडेसें उरतें त्यांतून थोडें बाबा पितात व बाकीचें मी पितें असें तिनें सांगितलें. हें भागिरथीचें भाषण ऐकून तिला आश्चर्य वाटलें. पुढें एके दिवशीं ती तुकारामास म्हणाली, मी आज दूध पाजून येतें.

विठ्ठलमूर्त्तीस पाजण्यासाठीं दूध घेऊन अवली देवालयांत चालली; त्या वेळीं पांडुरंगास मोठ्या संकटांत पडल्यासारखें झालें. कारण, जर दूध प्यावें तर अवलीची सप्रेमभक्ति नाहीं; आणि जर न प्यावें तर ती तुकारामास गांजील. मिळून पांडुरंगास दोहोंकडून पेंचांत सांपडल्यासारिखें झालें. ती विठोबाला हवें-

तसें टाकून बोले, ह्यामुळें तो तिला फार भिई. अंधारानें सूर्य कोंडून ठेवावा, काळानें बागुलास भिऊन लपून रहावें, पिंजऱ्यांत वारा कोंडून ठेवावा, आकाश घागरींत ठेवावें, अशा गोष्टी घडलेल्या ऐकणें ह्मणजे महत् आश्चर्य समजावयाचें. त्याप्रमाणेंच अविनाश, निश्चल परब्रह्म, ज्याचें योगी निरंतर ध्यान करितात, तो चिंताक्रांत झाला. असो.

अवली तांब्याभर दूध घेऊन निघाली ती देवळांत आली. दूध फारच उन्ह होतें तें क्षणभर बसून निववावें हें तिला सुचलें नाहीं. तिनें कढत दुधाचा तांब्या विठोबाच्या तोंडास लावितांच तो पोळला व मान वांकडी झाली; तेव्हां अवलीला विस्मय वाटला. ती मनाशीं ह्मणूं लागली कीं, डोळ्यांनीं तर हा काळा दगड दिसतो; पण ह्यांत जीव आहे! घरधनी ह्यास नित्य दूध पाजितात हें कांहीं खोटें नव्हे. पुढें बारीक नजरेनें देवाकडे पहात असतां तिणें मूर्तीच्या ओंठास फोड आलेला पाहिला व लवकरच देवळांतून ती आपले घरीं गेली. इतक्यांत तुकारामाच्या ध्यानांत विठोबानें येऊन सांगितलें कीं, तूं आज आळस करून अवलीच्या हातीं दूध पाठविलेंस; पण तिणें मनांत कांहींएक विचार न आणितां कढत दुधाचा तांब्या माझ्या तोंडास लाविला. तूं संसारावर लाथ मारिलीस; ह्यामुळें ती माझा द्वेष करिते. माझें नांव तिणें 'दावेदार' असें ठेविलें आहे. मजवर तिची काडीभरदेखील माया नाहीं.

पांडुरंगानें असें सांगतांच तुकाराम विव्हळ झाला. देवाला कढत दूध कां पाजिलेंस ह्मणून त्याणें तिला विचारिलें. तेव्हां तिणें उत्तर दिलें कीं, तुह्मीं देवळांत नित्य गाणें गात असता कीं, गोकुळामध्यें श्रीकृष्णानें द्वादश गांवें अग्नि गिळिला; असें त्याचें सामर्थ्य असतां माझें दूध किंचित् उन्ह होतें ह्यास्तव त्याणें वांकडी मान केली व ओंठास तरतरून फोड आला! मी जर हें खोटें सांगत असलें तर देवळांत जाऊन पहा. जर मागची लीला खरी असती, तर दूध पितांना पोळून फोड येऊन वांकडी मान कां झाली असती? हें अवलीचें भाषण ऐकून तुकाराम सद्गदित झाला. तो धांवत धांवत देवालयांत जाऊन मूर्तीकडे पाहूं लागला तों ओंठास फोड ...

मान आंखडलेली दिसली. तेव्हां त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. मग त्याणें पांडुरंगाची बरीच स्तुति केल्यावर फोड जिरून गेला; पण मान किंचित् वांकडी राहून गेली ती अद्याप तशीच आहे.

एकदां तुकाराम चाकणच्या रानांत असतां त्याच्या अंगावर असंख्य डांस येऊन बसले. त्यानें डांस शरिरास झोंबल्याचें दुःख बिलकूल मानिलें नाहींच; पण उलट तो असें ह्मणूं लागला कीं, आज अनायासानें देह परोपकारीं लागत आहे. जर आपण आपल्या शरिराची आशा बाळगावी व तें रक्षण करण्यास लागावें, तर इतक्या जिवांचें मन दुखावलें जाईल. हा नाशिवंत देह कधीं तरीं जावयाचा आहेच; ह्यास्तव ह्याची आशा बाळगून लाभ दिसत नाहीं. असा विचार मनांत आणून असंख्य डांस शरिरास झोंबून डसत असतांही तो त्याचें दुःख न मानितां पांडुरंगाचें भजन करीत होता. दुसऱ्या जाणाऱ्या येणाऱ्या पांथस्थांनीं ही तुकारामाची अवस्था पाहिली; परंतु डांस उडवून त्यास दुःखमुक्त करण्याची कोणास छाती होईना. तेव्हां पांडुरंग वाटसरूचें रूप धरून व हातांत शिंदीची डहाळी घेऊन त्याजवळ गेला; व ते डांस उडवून टाकिले. मग तुकाराम तेथून निघाला. अस्तमानाच्या सुमारास देहूस जाऊन पोंचल्यावर देवाळयांत जाऊन विठ्ठलमूर्त्तीस साष्टांग दंडवत घातलें. त्या रात्रीं तुकारामाचें कीर्त्तन झालें. तेव्हां तो ह्मणाला, हे पतितपावना श्रीहरी, ह्या भवसागरापासून मला तार. खावयास अन्न मिळालें नाहीं व पोरेंबाळें आणखीं झालीं नाहींत तरीं मला पर्वा नाहीं; शरिराची व्यवस्था कोणत्याही रीतीची झाली तरी पुरवेल; संसारांत अनेक विपत्ति भोगाव्या लागल्या तरीं चालतील; पण मला फक्त तुझी कृपा पाहिजे, असा माझ्या मनाचा पक्का निग्रह झाला आहे. अशा भावार्थाचा तुकारामानें कीर्त्तनामध्यें उपदेश केला.

तुकारामाच्या वडील मुलाचें नांव महादेव व धाकट्याचें विठोबा. महादेवास मूतखडा झाला, त्या दारुण व्यथेनें तो अत्यावस्थ पडला; व त्याचा प्राण कासावीस होई. अवलीनें आपलेकडून करावयाचे तितके उपाय करण्यांत बाकी ठेविली नाहीं. लोकांनीं सांगितलेलीं

औषधें, तशींच वैद्यांचीं औषधें त्यांच्या सांगण्याप्रमाणें घेऊन पथ्य केलें; तरी गुण नाहीं. भूतबाधा झाली असेल म्हणून पंचाक्षऱ्यांचें अंगारे लाविले, दोरे बांधले; पण लेशभर देखील गुण नाहीं. तेव्हां अवली महत् संकटांत पडली व तिला कांहीं सुचेनासें झालें. महादेवास लघवी करतांना तिडका लागत, ह्यामुळें त्याचा प्राण घाबरा होई, हें दुःख तुकारामाच्यानें पहावेना; ह्मणून तो घरांतून निघून गेला.

नवरा पडला अशा स्थितीचा, मुलाचीं घटका पळें घातलेलीं; असा त्याच्या जिवाचा भरंवसा उडून गेल्यामुळें तिला वारंवार रडें येई. ती ज्याला त्याला मुलाचें रोगाचें चिन्ह सांगे व औषध विचारी. व आपल्या संसाराची अशी दुर्दशा होत असल्याचें गाऱ्हाणें मैत्रिणींस सांगे. मुलाची अशी स्थिति ऐकून कितीएक तिजबरोबर तिच्या घरीं गेल्या. आणि त्या मुलाची ती अवस्था पाहून ह्मणाल्या, तूं आतां ह्यास किती जरीं औषधें दिलीस तरीं गुण पडावयाचा नाहीं. तुझ्या नवऱ्याचा सारा भरंवसा रुक्मिणीपतीवर. रात्रंदिवस त्याला ध्यानीं मनीं तोच; ह्यामुळें एक एक नवीन नवीन विघ्न उपस्थित होऊन संसाराची वाताहात होऊं लागली. प्रथम बायको व नंतर मुलगा यांवर धाड आली. पुढें दिवसेंदिवस गरिबी येत चालली. कोणचें बरें झालें आहे तेव्हांपासून? असें तिला शेजारणींनीं सांगतांच ती विठोबावर दांतओंठ खाऊं लागली. देवाविषयीं द्रोह तिच्या मनांत पूर्वीपासून होताच. तशांत तिला शेजारणींची कुमक मिळाली; मग काय पहावयाचें आहे? माकडास मद्य पाजलेलें, त्यावर विंचवानें दंश केला; मग त्याच्या नाना चेष्टा किती पहाव्या? कुबुद्धि सांगण्यासाठीं जसा दुर्योधनाला शकुनी साह्य झाला; ताटिकेला कुबुद्धि सांगावयास शूर्पणखा भेटली; त्याचप्रमाणें जिजाईस शेजारणी कळ लावून देऊन निघून गेल्या.

मुलाकडे पाहून जिजाबाईचा जीव खालवर होऊं लागला. अस्तमानाच्या सुमारास मुलाची लघवी कोंडून पोट फुगलें. चलनवलन बंद होऊन हातपाय गार पडले. कांहींच बोलेनासा झाला; मग मात्र अवली घाबरली. मुलगा वांचत नाहीं अशी तिची पक्की खात्री हो

ऊन त्यास देवळांत नेऊन पांडुरंगाच्या पायांवर आपटण्याचा तिणें निर्धार केला. मग ती रागानें मुलास फरफरां ओढीत देवळांत घेऊन चालली. हा सर्व प्रकार लक्षांत आणून पांडुरंगास विस्मय वाटला. जर ह्या वेळेस अवलीनें मुलास मारिलें तर जनांत अपकीर्त्ति होईल यास्तव कोणती युक्ति योजावी ह्या विचारांत पंढरीनाथ पडला. त्याणें हा सर्व मजकूर रुक्मिणीस सांगून तिचा अभिप्राय विचारिला. तेंव्हां ती ह्मणाली, देवा, इतक्याच साठीं तुह्मीं चिंतेंत कां ह्मणून पडतां? पृथ्वीवर प्रकाश पाडावयास सूर्यानें कां ह्मणून विवंचनेंत पडावें?

काळ्याच्या पायांवर आपटण्यास्तव अवली महादेवास घेऊन देवळांत गेली व मुलास पांडुरंगाच्या पायांवर आपटणार तों तिला रुक्मिणीनें ह्मटलें कीं, आतां हा निरोगी झाला; ह्यास घेऊन घरीं जा. हे शब्द ऐकून अवलीस विस्मय वाटला. व ती मुलाकडे पाहूं लागली तों लघवी झाली. मग चिखल होईल ह्मणून ती त्यास घेऊन देवळाबाहेर गेली. तेथें लघवी साफ झाल्यानंतर पोट रितें होऊन मुलास भूक लागली. त्याणें तिच्यापाशीं खावयास मागितलें. मग तिनें त्यास घरीं नेऊन जेवावयास घातलें व ह्मटलें कीं, रुक्मिणीकांतास माझें भय वाटलें; ह्मणून त्याणें मुलगा बरा केला.

मुलगा रोगापासून मुक्त झाला, ही गोष्ट तुकारामास कळल्यावर तो ह्मणाला, देवाची करणी कोणास कळणार नाहीं. मग भोजन करून तुकाराम देवळांत गेला. चार घटका रात्र झाल्यावर त्याणें कीर्त्तन करण्यास प्रारंभ केला. त्या वेळीं तुकारामाजवळ ध्रुपदी बरेच होते. गंगाधर मवाळ कडुसकर, हा ब्राह्मण होता. दुसरा संताजी हा तेली; त्याचें उपनांव जगनाडे होतें. तो चाकणांत रहात असे. हे दोघे संसार सोडून तुकारामास शरण जाऊन त्यापाशींच राहिले होते. हे दोघे तुकारामाची सर्व कविता लिहीत व कीर्त्तनांत तालसूर देण्यास टाळ विणा घेऊन त्याच्यामागें उभे रहात. असो. कीर्त्तनाचे प्रारंभीं पांडुरंगाचें स्तवन झालें तें असें कीं, देवा पंढरीराया, तूं माझा अंगिकार करशील कीं नाहीं ह्याचा मला मोठा विचार पडला आहे; व यामुळें मी रात्रंदिवस झुरत आहें. देवा, तुझ्यावांचून मला दुसऱ्या कोणाचें साह्य

नाहीं. मी कर्माचा हीन आहें; तर माझी हेळसांड करूं नको. मजकडून तुझी बरोबर रीतीनें सेवा होत नाहीं; ह्याची मला माझें मन साक्ष देत आहे. माझी जात श्रेष्ठ नाहीं; कुळ कर्महि शुद्ध नाहीं; भक्तिप्रेम नाहीं; एवंच सर्व प्रकारांनीं मी दुर्बळ, केवळ खायाला काळ व भुमीला भार असा आहें ; हें सर्व तुला ठाऊक आहे. अशी करुणा भाकीत असतां तुकाराम विदेहस्थिति पावला.

तुकारामाची अशी स्थिति झालेली पाहून पांडुरंगास चिंता उत्पन्न झाली. तुकाराम समरसीं मिळाला तर मग आपणांस बोलाचालावयास दुसरें कोणी नाहीं; हाही विचार त्या समयीं विठोबाच्या मनांत येऊन उभा राहिला. मग पंढरिनाथानें तुकारामास आलिंगन देऊन पोटाशीं धरिल्यावर तो देहावर आला. मग देवा, दीनदयाळा पंढरिनाथा, आई, बाप, भाऊ, बहीण, इष्ट, मित्र वगैरे मला तुझ्यावांचून दुसरें कोणी नाहीं; मला भवसागराच्या पलिकडच्या बाजूस घेऊन जा; देवा, तुझें नाम निरंतर मी गाईन असा मला वर दे; असें स्तवन करून देवास आरती करून ओंवाळिल्यानंतर तो त्याच्या पायां पडला.

पुढें पांडुरंगानें रुक्मिणीस ह्मटलें कीं, तुकाराम हा नामदेवाचा अवतार होय. सगुणाच्या ठिकाणीं ह्याचें अत्यंत प्रेम जडलें. अद्वैत शास्त्र ह्यास आवडत नाहीं ह्मणून हा सद्गुरूस शरण जात नाहीं. पुढें हाच रिवाज अमलांत येऊन गुरु करण्याच्या भरीस कोणी पडणार नाहीं. कारण, मोठ्याच्या आचरणाचा कित्ता घेऊन त्याच धोरणानें वागण्याचा लोकांचा कल असतो. करितां मला ब्राह्मणाचें रूप धरून तुकारामास अनुग्रह दिला पाहिजे. ह्यावर रुक्मिणीचें असें ह्मणणें पडलें कीं, तुह्मीं स्वत: ज्यास अनुग्रह देतां तो तात्काळ अमर होतो. मागें घडलेल्या गोष्टी . लक्षांत आणा. ब्रह्मशापेंकरून संपूर्ण यादव मरण पावले; परंतु उद्धव वांचला गेला. तुह्मीं त्याव अनुग्रह केल्यामुळें ब्रह्मशापाचें कांहीं चाललें नाहीं. भागवत सांगू त्या समयीं तुम्हीं त्यास वांचविलें. रामावतारामध्यें बिभीषण, हनुमं

हे दाखले पहा. आतां तुकारामाच्या मस्तकावर हात ठेविला असतां तोही अमर होईल. रुक्मिणीचें हें भाषण ऐकून पांडुरंगास हंसें आलें. तो तिला ह्मणाला, तूं ह्मणतेस ही गोष्ट खरी आहे; पण तुकाराम माझा जिवलग प्राण आहे. ह्यास काळापासून अलग केला पाहिजे; ह्मणूनच मी स्वतः ह्यास अनुग्रह देण्याच्या भरीस पडत आहें. असें सांगून तिचें समाधान केलें.

मग, माघ शुद्ध दशमीस गुरुवारीं सुमुहुर्त्तावर पांडुरंगानें स्वतः तुकारामास उपदेश केला. तो असा कीं, पांडुरंगाची मूर्त्ति ध्यानीं आणून रात्रीस तुकाराम निद्रिस्त असतां त्यास स्वप्न पडलें. तें असें कीं, “ तुकाराम इंद्रायणीचें स्नान करून देवळांत जात आहे; हातांत तुळसीपत्रें आहेत; तों मार्गांत ब्राह्मण भेटला. तुकारामाची अशी चाल होती कीं, ब्राह्मण किंवा संत भेटला कीं त्यास साष्टांग दंडवत घालावयाचा. त्याप्रमाणें त्याणें त्या ब्राह्मणास तुळसीपत्र वाहून साष्टांग दंडवत घातलें. मग ब्राह्मणानें संतुष्ट होऊन तुकारामाच्या मस्तकावर हात ठेवून रामकृष्णहरीनामाचा मंत्र सांगितला. त्या वेळीं आपलें नांव बाबा चैतन्य, असें कळवून श्रीपांडुरंगाची उपासना कर व त्याचे चरण सोडूं नको; असा त्यानें उपदेशही केला. तो ऐकून तुकारामास आनंद झाला. त्याणें सद्गुरूला विनंती केली कीं, घरीं येऊन माझा आश्रम पवित्र करावा; व तेथें आपले हातानें सैंपाक करून पोटभर जेवावें. त्या वेळीं वेषधारी पांडुरंगानें तुकारामास सांगितलें कीं, जर तूं मला पावशेर तूप देण्याचें कबूल करीत असलास तर मी तुझ्या घरीं येतों. हें ह्मणणें कबूल करून तुकाराम त्यास घेऊन आपले घरीं आला. मग आपले घरीं देव आले आहेत सबब त्यांस शिधासाहित्य व निदान पावशेर तरी तूप दे; असें तुकारामानें आपल्या स्त्रीस सांगितलें तेव्हां तिला अति राग आला. ती ह्मणाली, कोठून मेला ब्राह्मण आला आहे कोण जाणे? पावशेर तूप कोठून देऊं? रोज रोज ब्राह्मण येऊन त्यांनीं भांडीं देखील जाळून खापरासारखीं केलीं! कसा संसार करावा तरीं मीं? असा उभयतांमध्यें कलह लागलेला

तुकाराम जागा झाल्यावर पस्ताऱ्यांत पडला. सद्गुरूनें भेट देऊन भवसागराच्या पलीकडे नेलें असें तो ह्मणाला; परंतु पावशेर तुपासाठीं कलह पडल्यामुळें गुरूस जेवल्यावांचून जावें लागलें. 'बाबा चैतन्य' असें आपलें नांव व 'रामकृष्णहरी' हा मंत्र सांगितला; हें पक्कें आठवतें. माघ शुद्ध दशमीस गुरुवारीं सुमुहुर्त्तावर माझा अंगिकार करून सद्गुरु निघून गेले; असें तो ह्मणूं लागला.

---

# अध्याय ३४ वा.

## तुकाराम.

एके दिवशीं तुकाराम अरण्यांत असतांना त्याच्या मनांत अशा प्रकारच्या कल्पना येऊं लागल्या कीं, कर्कशा स्त्रिची संगत घडल्यामुळें माझी वारंवार जनांत फजिती होते. गृहस्थाश्रमांत असण्याचा हेतु हाच कीं, अतिथअभ्यागत, साधुसंत ह्यांची सेवा घडावी; पण माझें हें सांगणें तिला पसंत पडतच नाहीं. मधुर व मनमिळाऊ भाषण तर ती माझ्याशीं स्वप्नांतसुद्धां करीत नाहीं. देवानें हें तरीं एक बरें केलें कीं, या प्रपंचबंधनापासून सोडविलें; असें मनांत आणून तो अरण्यांत आनंदानें भजन करीत बसला.

चार घटका रात्र झाल्यावर तुकाराम देवालयांत कीर्त्तन करावयास आला. पुष्कळ लोक कीर्त्तन ऐकावयास येत. चारी प्रहर कीर्त्तन केल्यावर प्रातःकाळीं इंद्रायणीचें स्नान करून पांडुरंगाचें पूजन केल्यानंतर अरण्यांत जाऊन नित्य भजन करीत बसण्याचा त्याणें क्रम चालविला. कोणीं भाकरतुकडा आणून दिला असतां तो खाऊन राही; परंतु अवलीच्या कर्कश स्वभावामुळें व ती त्याच्याशीं धड बोलत नसल्यामुळें तो तिच्या संगतीस कंटाळून गेला. यास्तव त्याच्या मनांत घरीं जावें असें येईना. तो कीर्त्तन आटोपल्यावर परभारें अरण्यांत जाई. व रात्रीस परभारेंच देवळांत येऊन कीर्त्तन करी. असे दोन महिने झाले; पण तो घरीं गेला नाहीं. त्याची बायको अवली त्याच्या

कागाळ्या शेजारणींस सांगूं लागली कीं, हा पिसा गांवांत येतो; पण मजकडे ढुंकून पहात सुद्धां नाहीं. लोक ऐतें खावयास नेऊन देतात, मग घरची काळजी कशाला करील?

एके दिवशीं असा योग घडून आला कीं, तुकाराम इंद्रायणींत स्नान करून देवळांत जात होता; व अवली इंद्रायणीचें उदक घेऊन घरीं जात होती; तों अवचित उभयतांची मार्गांत गांठ पडली. मग तिणें तुकारामाचा पदर धरून त्यास तेथें वाटेंत उभा केला व मोठ्या रागाच्या झपाट्यानें त्यास ह्मणाली कीं, दोन महिने झाले, तूं घरीं येत नाहींस; तर मी कोणाची बायको होऊन हा संसार चालवूं? त्यावर तुकारामानें तिला शांततेनें उत्तर दिलें कीं, विठोबा रखुमाई आपलीं मायबापें आहेत; त्यांच्या पायांचें चिंतन करीत जा ह्मणजे संसार चालविण्यास तुला कांहीं काळजी व्हावी लागणार नाहीं. मग अवलीनें तुकारामास सांगितलें कीं, जें झालें तें वरें झालें; आतां तुह्मीं घरीं चला. तो ह्मणाला, तूं माझें ह्मणणें कबूल करून जर मला वचन देशील तर मी घरीं येईन. हें ऐकून अवली तुकारामाच्या मर्जीनुरूप वागण्यास राजी होऊन त्यास वचन दिल्यावर आपल्याच समागमें घरीं घेऊन गेली. मग तो तुळसीवृंदावनाशीं जाऊन बसला. त्या दिवशीं एकादशी होती; ह्यामुळें भजन, कीर्त्तन श्रवण करावयास लोक येऊं लागले. त्यांस पाहून अवली वसवसून पाठीस लागली. त्या वेळीं तुकारामानें तिला बोध केला कीं, तुला मान, सन्मान, मोठेपणा या भुषणाची चाड नाहीं; विनाकारण दांत ओंठ कां खातेस? देवासाठीं ब्रह्मांड आमचें सोइरें झालें आहे; त्यांच्याशीं तूं नम्रतेनें व मधुर बोललीस तर त्यांत तुझें काय जातें? लोक आपला उद्योगधंदा टाकून आनंदानें मजकडे येतात, ह्यांत तूं भूषण मानावयाचें; तर तें एके बाजूस ठेवून कां चरफडतेस? ह्याप्रमाणें तुकारामानें तिची समजूत पाडल्यानंतर अवली कांहींएक उत्तर न देतां गुपचूप बसून राहिली; तरी तिच्या भीतिस्तव लोक वाड्यांत जावयास वचकत.

मग तुकारामानें तिला वृंदावनाशीं बसवून कीर्त्तन एकाग्र मन करून ऐकावयास सांगितलें. तेव्हां 'मी तुमच्या सांगण्याप्रमाणें वागेन'

असें वचन देऊन त्यास घरीं घेऊन आल्यामुळें तिला त्याचा शब्द मोडतां येईना; यास्तव श्रवण करावयास ती त्याच्या शेजारीं बसली. तुकारामानें तिला उपदेश करण्यास सुरुवात केली कीं, जेवढें जगांत दिसतें आहे तेवढें सर्व नाशिवंत आहे; ह्यास्तव ह्या समयीं तूं मला अनुकूळ हो. उद्यां द्वादशी व सोमवार आहे. तूं सकाळींच स्नान कर व ब्राह्मणांस बोलावून घरांतली सर्व जिनगी लुटीव. अन्नवस्त्राबद्दल तूं कांहींएक काळजी वाहूं नको. पांडुरंग आपला मायबाप होय; तो कदापि आपलें उणें पडूं देणार नाहीं. जर तूं माझी ही गोष्ट ऐकलीस तर तुझा जगामध्यें मोठा लौकीक होईल. ह्या गोष्टीचें तुझ्या मनास वाईट वाटूं नये व समाधानच वाटावें ह्मणून मी तुला एक तोड सांगतों ती अशी कीं, चोरी झाली त्यांत भांडींकुंडीं वगैरे सर्व सामान चोरांनीं नेलें; चारा वैरण मिळत नसल्यामुळें उपास पडून गुरेंढोरें मरून गेलीं; आशा, माया ह्यांत न गुटमळतां वज्राप्रमाणें मन कठीण करून मुलेंबाळें झालीं नाहींत ह्मणून समज. अशा प्रकारानें मनाची समजूत करून आनंदानें रहावें. ह्या नाशिवंतांची ममता अगदीं धरूं नकोस. देव, ब्राह्मण, अतितअभ्यागत यांस सन्मानानें घरीं आणून पुजावें, व प्रेमानें विठोबाचें नामस्मरण करावें. हा वरील उपदेश तुकारामानें तुळसीवृंदावनाशीं अवलीस अकरा अभंग ह्मणून केला. त्या अकरा अभंगांचा एक निराळा ग्रंथ करून त्यास 'पूर्णबोध' असें नांव दिलें आहे. तीं तुकारामाचीं अनुपम वचनें साधकांनीं नित्य पठण केलीं असतां भक्ति, ज्ञान व वैराग्य उत्पन्न होईल. हा उपदेश झाल्यावर सारी रात्र कीर्त्तन झालें. त्या वेळेस तर अवलीच्या मनांत तुकारामाचा उपदेश पूर्ण ठसला.

प्रातःकाळीं जिजाबाईनें स्नान करून ब्राह्मणांस बोलावून आपली सर्व चिजवस्त लुटविली. तिच्या चुलींतली राख देखील संन्याशांनीं अंगास लावण्यास नेली. जिजाईनें एक आडजुनें फाटकें वस्त्र परसांत सुकत घातलें होतें, तेंही महारणीच्या रूपानें रुक्मीणमातेनें तुकारामापाशीं मोठ्या काकुळतीनें मागितलें असतां त्यानें तें तीस देऊन मुकाट्यानें लौकर निघून जावयास सांगितलें.

तुकारामाचें तें कृत्य गांवच्या मुलांनीं पाहिलें होतें; त्यांणीं लागलेंच अवलीस सांगितलें. तें ऐकतांच तिची वृत्ति पुनः संसाराकडे वळली; व नवऱ्याला समजावून घरीं आणल्याचा हा परिणाम! असें चटकन तिच्या मनांत आलें. ती ह्मणूं लागली कीं, जर ह्यास घरीं घेऊन आलें नसतें, तर आज मला ह्या विपत्तींत कां पडावें लागलें असतें ? म्यां दळणकांडण करून आजपर्यंत संसार कसाबसा चालविला. त्याचें परभारें भिक्षेवर पोट भरतेंच आहे! मला पहाना कशी अवदसा आठवली ती !! वचन दिल्यामुळें माझा निरुपाय झाला. माझ्यापासून सर्व संसारावर पाणी सोडविलें. मला ह्मणाले कीं, काळ्याचे पाय आठवित जा ह्मणजे तो अन्नवस्त्र पुरवील. हें खरें वाटल्यावरून मीं घर लुटविलें. मीं एके रात्रींत काळ्याचे पाय दोन वेळां आठविले; त्याची मला प्रचीत आली कीं, जें कांहीं होतें नव्हतें तें सर्व गेलें ! मग संतापानें काळ्याच्या पायांवर दगड मारून तो पायच मोडून चूर करावे असें मनांत आणून एक मोठा दगड मस्तकावर घेऊन अवली देवालयाकडे जावयास निघाली.

अवली दगड घेऊन आपले पायांवर घालण्यासाठीं येत आहे असें पाहून, पांडुरंग थरथरां कांपूं लागला. इतक्यांत रागानें फणफणत अवली देवळांत आली; तेव्हां 'दगड आणून काय करतेस' असें रुक्मिणीनें तिला विचारिलें. त्यावर अवलीनें उत्तर दिलें कीं, तुझा नवरा फारच घातकी आहे; त्याच्या पायांवर घालून एकदांचे ते फोडून टाकितें. माझ्या भ्रतारानें रात्रीस मला नाना रीतीनें उपदेश केला, त्यावरून मीं तुझ्या नवऱ्याचे पाय आठविले; तों मला दरिद्र प्राप्त आलें! धन, धान्य, गुरें वगैरे सर्व ब्राह्मण घेऊन गेले. एक जाडजुनें वस्त्र राहिलें होतें, तेंही परसांतून ओढून दिलें. माझा नवरा विदेही केला, आतां खावयास अन्न व नेसावयास वस्त्र नाहीं; यास्तव तुझ्या नवऱ्याचा मला मनस्वीच राग आला आहे. असें अवलीचें भाषण ऐकून रुक्मिणीनें तिला ह्मटलें कीं, तूं अन्नवस्त्राची बिलकूल चिंता करूं नको. असें ह्मणून तिणें अवलीस मूठभर होन व चोळी लुगडें दिलें. मग ती अवली लुगडें नेसून, चोळी घालून व

होन घेऊन बाहेर आली. हिचें हें उतावळीचें व अविचाराचें करणें तुकारामास आवडलें नाहीं. ती देवळांतून बाहेर आली तोंच त्यानें ते होन घेऊन ब्राह्मणांस वांटून टाकिले. नंतर स्वस्थपणानें भजन करीत बसला. तो अगदीं निरिच्छ होता. त्याचें नांव देशोदेश गाजूं लागलें. लांबलांबून लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले.

त्या काळीं चिंचवड गांवांत चिंतामणिदेव या नांवाचा एक भक्त होता. त्यास ही गोष्ट ऐकून विस्मय वाटला. मग तुकारामास बोलावून कांहीं चमत्कार आपण समक्ष पहावे असें त्याच्या मनांत येऊन त्याणें तुकारामास येथें येऊन आपणास भेटून जाण्याचा निरोप पाठविला.

आपल्या भेटीची इच्छा धरून चिंतामणिदेवानें आपणास बोलावावयास गडी पाठविल्याचा प्रकार देहूस तुकारामास न सांगतांही समजला. मग तो चिंचवडास जावयास निघाला. वाटेंत चिंतामणिदेवानें पाठविलेला मनुष्य भेटला. त्याणें देवांचा निरोप त्यास सांगितला. पुढें तुकाराम चिंचवडास येऊन पोंचल्यावर त्याणें गणपतीस नमस्कार केला. त्या समयीं चिंतामणिदेव स्नान करून संध्येस बसला होता. त्यास तुकाराम आपले घरीं आल्याचें वर्त्तमान समजलें नाहीं. पण चिंतामणिदेवाच्या ध्यानांत चलविचल होऊन त्याचें मन चंचळ झालें. देवघरांत एकांतामध्यें असतांही त्याच्या मानसपुजेंत गडबड झाली. त्या वेळेस चमत्कार असा झाला कीं, त्यास बागेमध्यें फुलझाडें लाविलीं होतीं. त्या पुष्पवाटिकेचें स्मरण झालें. तो मनांत ह्मणूं लागला कीं, 'झाडांची नासाडी फारच झाली आहे; त्यांत केरकचरा भारीच पडलेला आहे; तर तेथच्या माळ्यास बोलावून शिक्षा केली पाहिजे.' इतकी कल्पना मनांत येऊन गेल्यावर पुनः एकाग्र मन करून गजवदनाची मानसपूजा करूं लागला.

पूजा आटोपल्यानंतर चिंतामणिदेव बाहेर आला. त्यास तुकारामानें साष्टांग दंडवत घातलें; पण तुकाराम हा शुद्र असल्यामुळें ह्यास नमस्कार करूं नये असें चिंतामणिदेवाच्या मनांत आलें. मग त्याणें तुकारामास ह्मटलें कीं, आपण केव्हां आलांत? तेव्हां तुकारामानें

उत्तर दिलें कीं, तुम्हीं मानसपूजा करीत असतां बागेमध्यें गेलेत त्याच संधीस मी एथें आलों होतों! हें भाषण ऐकून चिंतामणिदेवास आश्चर्य वाटलें. व तुकारामास दुसऱ्याच्या मनांतलें सर्व समजतें; तो परचित्तपरिक्षक आहे, असें जे लोक बोलतात हें खरें असा अनुभव पुष्पवाटिकेच्या उदाहरणावरून चिंतामणिदेवास आला. आतां ह्याच्याबरोबर . नित्य विष्णुमूर्ति जेवीत असते अशी जी अवाई उठली आहे, ही कितपत खरी आहे ह्याचा खुलासा भोजनाच्या वेळेस करून घेतां येईल असा मनांत विचार केला. दुसरी अशीही कल्पना मनांत आणिली कीं, ह्याची उत्तरोत्तर कीर्ति वाढत जात आहे; मोठमोठाले ब्राह्मण ह्यास नमस्कार करतात; पण याणें जर आपणास कांहीं चमत्कार दाखविला, तर आपणही ह्यास नमस्कार करून आदर सत्कार उत्तम प्रकारानें करूं. जर कांहीं मायावी लाघव असेल तर शिक्षा करावयास उशीर लागणार नाहीं; ह्यास्तव भोजन झाल्यानंतर ह्या सर्व गोष्टीचा विचार करतां येईल. वैश्वदेवसमयीं हा अतित आला आहे तर ह्यास विष्णुसमान मानून ब्राह्मणांच्या पंक्तीस बसवावें; असा विचार मनांत आणून ब्राह्मणाच्या पात्रांपासून चार हाताच्या अंतरानें तुकारामाचें पान मांडिलें. तेव्हां तुकारामानें आणखी दोन पात्रें आपल्या पात्राशेजारीं वाढावयास सांगितलीं. मग आणखीं दोघेजण कोण आहेत त्यांस भोजनास बोलवावयास चिंतामणिदेवांनीं सांगितलें. त्या वेळीं तुकारामानें देवांस ह्मटलें कीं, रुक्मिणीकांताकरितां एक पान वाढविलें आहे, त्यास मी बोलावीन; व दुसरें गजवदनाकरितां, त्यास तुह्मीं बोलावा. हें ऐकून चिंतामणिदेवानें गायत्रीमंत्र ह्मटला व पात्रें प्रोक्षून गणपतीस डोळे मिटून नैवेद्य दाखविला.

तेव्हां तुकाराम चिंतामणीस ह्मणाला कीं, एक भक्त समुद्रामध्यें स्नान करीत असतां बुडत होता; त्याणें गजवदनाचा धांवा केल्यावरून तो त्यास समुद्रांतून बाहेर काढण्यासाठीं गेला आहे हें वर्त्तमान मला समजलें. असें असतां तुह्मीं नैवेद्य कोणास दाखविला? मी सांगतों ही गोष्ट खरी किंवा खोटी हा अनुभव क्षणभर थांबून पहावा ह्मणजे खात्री होईल. हें तुकारामाचें भाषण ऐकून चिंतामणिदेवास मोठेंच नवल वाटलें. समोरें

अर्धे घटका झाल्यावर गणपति भक्तास समुद्राबाहेर काढून आला. मग गणपतीचा पितांबर पिळून पाहतां पाणी खारट लागलें. पुढें प्रत्यक्ष भोजनास येऊन बसण्यासाठीं तुकारामानें गणपतीस बोलवावें ह्मणून चिंतामणिदेवास सांगितलें. त्यावर त्यानें ह्मटलें कीं, मूर्त्ति प्रत्यक्ष येऊन भोजन करील कशी? नैवेद्य त्यास दाखविला म्हणजे सुवास त्यास जातो; हेंच देवाचें भोजन समजावें. त्यावर तुकाराम ह्मणाला कीं, प्रत्यक्ष गणपति एथें आणून जेववावा; येणेंकरून चित्तास संतोष होईल. असें न झालें तर उपासना व्यर्थ होय. आकाशांत अभ्र दाटलें असतां वर्षाव न झाला तर त्याचा काय उपयोग? उदकावांचून ठणठणीत कोरडी पडलेली नदी काय कामाची? सुंदर स्त्री असली तरी संतानावांचून निस्तेज दिसते. भ्रतारावांचून अलंकार, प्राणावांचून शरीर, दृष्टिवांचून डोळे, तद्वतच जर दैवत साक्षात्कार न देईल तर उपासनामंत्र व्यर्थ होय व भजनपूजन केल्याचा कांहीं फायदा नाहीं. मग देवांनीं त्यास सांगितलें कीं, आह्मीं श्रीगणपतीची उपासना करितों; पण प्रत्यक्ष मूर्त्ति येऊन जेवील हें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. तुह्मीं आपणास वैष्णववीर ह्मणवीत आहां; तर तुह्मीं रुक्मिणीकांतास व गणपतीस आणून जेववावें. ते भोजनास आल्यावांचून आह्मीं जेवावयास बसणार नाहीं.

मग, तुमच्या कृपेनें मी त्यांस आणून जेववीन ह्मणून तुकारामानें सांगून गणपतीची दोन अभंग ह्मणून स्तुति केली कीं, देवा लंबोदरा, तूं संपूर्ण विद्यांचा व सिद्धींचा नायक आहेस. तुझें नृत्य पाहून नारद तुंबर देखील तटस्थ होतात. तूं ज्यांकडे कृपादृष्टीनें पहातोस त्यांचीं विघ्नें देशोधडीस पळून जातात. अशी श्रीगणपतीची स्तुति केली; परंतु तो येईना. मग त्याणें पुन्हा प्रार्थना केली कीं, तूं चिंतामणीच्या भक्तिस्तव वांझ्या गाईस दूध दिलेंस; परंतु मी तुला तशा प्रकारची भीड घालीत नाहीं. आइतेंच अन्नाचें पात्र वाढून तयार आहे; येऊन जेव. अशी तुकारामाची प्रार्थना ऐकून गणपतीस संतोष वाटला व तो सगुणरूप धरून पात्रावर येऊन बसला. आपलें आराध्यदैवत पाहून चिंतामणिदेवास परमानंद झाला व

त्यानें गणपतीस भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार घातला. मग तुकारामानें नेत्र झांकून पांडुरंगाचें स्मरण केलें. त्याच्या भक्तिस्तव विठोबाही येऊन पात्रावर बसला. त्यासही चिंतामणिदेवानें परमानंदानें साष्टांग नमस्कार घातला. विठोबाचें व गणपतीचें साक्षात् दर्शन तुकारामास व चिंतामणिदेवास मात्र होत होतें; बरकड भोजनास बसलेल्या ब्राह्मणमंडळीस ते दिसत नव्हते. पण दोन्ही देवांच्या पानांवरचें अन्न सरत असे तें मात्र सर्वांस दिसे. हा चमत्कार पाहून इतर मंडळी विस्मयांत पडली. भोजन झाल्यावर श्रीपांडुरंगास व मोरयास तुकारामानें स्वतः हात धुवावयास पाणी घातलें, विडे दिले, व तो यांच्या पायां पडला. मग भक्तांस विचारून दोन्ही मूर्ति अंतर्धान पावल्या.

पुढें चिंतामणिदेवानें तुकारामास आलिंगन देऊन साष्टांग दंडवत घातला. त्यास तुकारामानें हातीं धरून उठविलें व ह्मटलें कीं, तुह्मां ब्राह्मणांचें पाय मला पूज्य आहेत; असें असतां हें अनुचित कसें करतां? संपूर्ण तीर्थें तुमच्या चरणापाशीं वास्तव्य करितात; तेथें माझा हीन जातीचा काय पाड लागला आहे ? मग चिंतामणिदेवानें उत्तर दिलें कीं, विष्णुभक्त नीच जातीचा ह्मणूं नये; असें भागवतांत सांगितलें आहे. पर्वतांमध्यें कनकाद्रि, धनुर्धरांमध्यें श्रीजानकीकांत, योग्यांमध्यें श्रीशंकर त्याचप्रमाणें वैष्णवांमध्यें तूं मुगुटमणी आहेस. तूं श्रीहरिकीर्त्तन करून आपली काया ब्रह्मरूप करून घेशील; असें मला खचित वाटत आहे. आणखी तो म्हणाला कीं, आज तुमच्या प्रसादानें मला श्रीपांडुरंगाचें व श्रीगजाननाचें साक्षात् दर्शन झालें. हें ऐकून तुकारामानें, हा सर्व आपल्या कृपेचा महिमा होय असें सांगितलें; व आपण चिंतामणिदेवांची आज्ञा घेऊन देहूस परत गेला.

तुकाराम निरिच्छ होता; त्यास कोणीं द्रव्य दिलें तरी तो तें घेत नसे. अशा त्याच्या स्थितिवरून अशी शंका येईल कीं, तुकाराम हा गृहस्थाश्रमी होता व त्यास मुलेंबाळें होतीं; तर त्याणें पैक्यावांचून यांचीं लग्नें कशीं केलीं? त्यास समाधान असें आहे कीं, तुकारामास तीन कन्या होत्या. थोरलीचें नांव काशीबाई, मधली भागीरथी व धाकटी गंगा.

ह्या तिघी मुली लग्नाला योग्य झाल्या होत्या त्यांचीं लग्नें कशीं होतील ह्मणून अवली चिंताग्रस्त झाली. तिणें ही लग्नाची गोष्ट तुकारामाजवळ काढिली ती त्याच्याही मनांत भरली. मग तो बाहेर गेला, आणि आपल्या जातीचे तीन मुलगे खेळत होते त्यांस आपल्या घरीं घेऊन आला. त्या दिवशीं लग्नतिथीही होती. मग त्या वधुवरांस हळद लावून ब्राह्मणांकडून लग्नें लाविलीं व त्यांस दूधभात जेवूं घातला. ही गोष्ट दुसरे दिवशीं वरांच्या बापांस समजली. मग मोसे, गाडे, जांबुळकर, हे तुकारामाचे सोयरे झाले. ते तिघे सोयरे वऱ्हाड घेऊन देहूस आले. त्या वेळीं भाविक मंडळीनें तुकारामाकडे साहित्याचा पुरवठा केला. चार दिवस लग्नसोहळा झाला. ज्याणें आपला सखा श्रीहरि केला, त्याच्यावर सर्वांची कृपा असते.

एकदां आणखी एक असा चमत्कार झाला कीं, बीड परगण्याचा देशपांड्या एक ब्राह्मण होता; तो धरणें धरून पंढरपुरास बसला होता. त्याणें अन्नपाण्यावांचून दहा दिवस उपाशीं राहून कडक अनुष्ठान केलें. आपणास पुराणव्युत्पत्ति असावी हाच त्याचा तपश्चर्या करण्याचा मूळ हेतु होता. मग पांडुरंगानें त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, तूं आळंदीस ज्ञानदेवाकडे जा व तो सांगेल तसें कर; ह्मणजे तुझे मनोरथ पूर्ण होतील. इतकें स्वप्न पडतांच तो जागा झाला व आळंदीस गेला. भुक्ति, मुक्ति आणि पुराणव्युत्पत्ति प्राप्त होण्याचा मूळ उद्देश मनांत धरून तो ज्ञानदेवाजवळ धरणें धरून बसला. त्याणें अन्नपाण्यावांचून बारा दिवस काढिले, तेव्हां ज्ञानेश्वर संकटांत पडले; कारण तो ब्राह्मण दैवहीन होता. तरी ज्ञानदेवानें त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, तूं देहूस जा; तेथें तुकाराम ह्मणून साधु आहे. तो नामदेवाचा अवतार असून जगदोद्धारार्थ अवतरला आहे. तो जो अनुग्रह करील त्याप्रमाणें विश्वासानें कर ह्मणजे तुझे मनोरथ पूर्ण होतील.

मग तुकारामाविषयीं त्याच्या मनांत विकल्प आला कीं, तुकाराम शूद्र, जातीचा वाणी आहे; त्याच्यापाशीं जाऊन माझे मनोरथ कसे पूर्ण व्हावयाचे आहेत ? असा विकल्प त्याच्या मनांत येऊन गेला

तरीं तो ज्ञानदेवाच्या दृष्टांताप्रमाणें देहूस तुकारामाकडे गेला; व त्यास संपूर्ण कच्चा मजकूर निवेदन केला. त्याची हकीकत ऐकून घेतल्यानंतर तुकारामास विस्मय वाटला. त्यानें मनांत आणिलें कीं, आपला वरदहस्त ठेवून रेड्याच्या मुखांतून वेद बोलविले; चांगदेव प्रचीत पहाण्यास येत असतां भींत चालविली; तो माझा स्वामी ज्ञानेश्वर ज्याची पाहिजे तें करण्याची शक्ति असतां कोणत्या कमताईमुळें त्यानें धरणेकरी मजकडे पाठवून दिला ? मी तरीं देवाचा दास खरा आहें असें नाहीं; पण जनांत डांगोरा केला. हे दीनबंधो ज्ञानेश्वरा, मजकडे ही उपाधि कां पाठवून दिली ? मी तुह्मांस लेंकरासमान आहें. समर्थापाशीं काय सामर्थ्य नव्हतें, ह्मणून धरणेकरी मजकडे पाठवून दिला ? असें ह्मणून तुकारामानें अकरा अभंग लिहिले; त्या ग्रंथास 'उत्तमज्ञान' असें ह्मणतात. ते अकरा अभंग व महाफळ ( नारळ ) तो ब्राह्मण जवळच बसला होता त्यास दिला; पण त्यास तें रुचलें नाहीं. त्याणें लागलेंच टाकून दिलें. तो ह्मणूं लागला कीं, मी पुराणव्युत्पत्तीची इच्छा धरिली आहे; आणि मला हा प्राकृत पद्यें लिहून देतो. मी व्यर्थ ह्या ठिकाणीं आलों. असें ह्मणून तेथून तसाच परतला, तो पुन्हा आळंदीस येऊन ज्ञानेश्वरापाशीं धरणें धरून बसला.

मग तुकारामानें तेरा अभंगाचें पत्र ज्ञानदेवास लिहिलें कीं, तुह्मीं त्या ब्राह्मणाचें जन्मांतर जाणून त्यास मजकडे पाठविलें; तुमची आज्ञा मला अमान्य करतां येईना; म्हणून मी त्यास अकरा अभंग व एक महाफळ दिलें; परंतु त्याचें नशीब फुटकें असल्यामुळें तो तें सर्व तेथल्या तेथेंच ठेवून परत गेला. अशा मतलबाचें पत्र तुकारामानें ज्ञानेश्वरास पाठविलें; तें वाचतांच त्यानें तो धरणेकरी ब्राह्मण तेथून पिटून लाविला.

इकडे देहूस भगवद्भक्त तुकाराम पत्रावरील ते अभंग पाहून ह्मणाला कीं, हे कोणाकरितां लिहिले गेले हें मझ्यानें सांगवत नाहीं ! असें ह्मणतो आहे तोंच कोणीएक कोंडोबा नांवाचा धष्टपुष्ट ब्राह्मण ज्याला लिहितां वाचतां कांहीं एक येत नव्हतें, तो अवचित त्या मार्गानें जात होता; त्याणें जाऊन तुकारामाचें दर्शन घेतलें. त्याचा शुद्ध भाव पाहून तुकारामानें पसन्न होऊन ते लिहिलेले अकरा अभंग त्या कों-

डोबास दिले व धरणेकऱ्यानें टाकून दिलेला नारळही त्यास दिला. तो त्याणें लागलाच फोडला; तों आंत मोत्यें भरलेलीं पाहिलीं.

आतां ह्या नारळांत मोत्यें आलीं कशीं ह्याची संपूर्ण हकीगत अशी आहे कीं, अमदाबादेच्या एका सावकारानें एक लक्ष रुपयांचें जवाहीर, काम झालें असतां समाधीवर वहाण्याचा नवस ज्ञानदेवास केला होता. मग काम झाल्यावर तो सावकार नवस फेडावयास आळंदीस आला. त्यास ज्ञानदेवानें दृष्टांत दिला कीं, तूं नवसाचें जवाहीर समाधीवर न वहातां तुकारामास नेऊन दे. तूं त्याच्यासमोर ठेविलेंस ह्मणजे मला पावलें. मग त्या सावकारानें नारळ कोरून आंत मोत्यें भरलीं व पाया पडून तो तुकारामाच्या समोर ठेविला. त्याच दिवशीं धरणेकरी आला, त्यास तो नारळ दिला होता; परंतु त्याच्या प्रारब्धीं नव्हतें ह्मणून तो तें टाकून गेला. तेंच तुकारामानें मग कोंडोबास दिलें. अभंग वाचल्याबरोबर त्यास संस्कृत भाषा उत्तम येऊं लागली. हा कोंडोबा शिवाजीराजाजवळ जो एक पुराण सांगणारा पंडित होता त्याच्याजवळ घरचाकर होता. तो प्रेमपूर्वक तुकारामास शरण आला. त्याच्या कृपेमुळें पुराणव्युत्पत्ति येऊन भागवतादि ग्रंथांचा अर्थ त्यास समजूं लागला.

तुकारामाच्या प्रसादानें कोंडोबा ज्ञानसंपन्न झाला, ही गोष्ट शिवाजी राजाच्या कानावर गेली. त्याणें कोंडोबास वस्त्रेंभुषणें दिलीं; व तुकारामाचें दर्शन घेण्याचेंही त्याच्या मनांत आलें. तुकारामाची मानमान्यता व कीर्त्ति दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चालली. त्याचा कीर्त्तनद्वारा होत असलेला उपदेश लोकांच्या मनांत चांगला बिंबे.

एकदां तुकाराम आळंदीस गेला असतां त्याचें महाद्वारांत कीर्त्तन झालें; तें ऐकावयास लोहगांवची बरीच मंडळी आली होती. त्यांणीं तुकारामाच्या पायां पडून विनंती केली कीं, स्वामींनीं एकदां तेथवर येऊन आमचा आश्रम पवित्र करावा; असा आह्मां सर्वांचा हेतु आहे. त्यांच्या मनाचा ओढा पाहून तुकारामानें त्यांचें ह्मणणें कबूल केलें.

दुसरे दिवशीं ते तुकारामास मोठ्या सन्मानानें लोहगांवास घेऊन गेले. त्या दिवशीं मोठी टोलेजंग समाराधना झाली. ब्राह्मणभोजन

झाल्यावर रात्रीस तुकारामाचें कीर्त्तन झालें. त्याकरितां मोठा विस्तीर्ण मांडव घातला होता. ब्रह्मादिकांना दुर्लभ असा प्रेमरस कीर्त्तनामध्यें लोटला. तुकारामाची वाणी प्रसादिक होती. एकसारखें लक्ष लावून मंडळी कीर्त्तन ऐकत होती.

---

# अध्याय २५ वा.

## तुकाराम.

एके दिवशीं एका विधवा वृद्ध ब्राह्मणीनें तुकारामास आपले घरीं भोजन करून कीर्त्तन करण्याचा आग्रह केला. तिची पूज्यबुद्धि पाहून त्यानें तिचें ह्मणणें कबूल केलें. मग तिणें मोलमजुरी करून दहा ब्राह्मणांच्या बेगमीचें साहित्य तयार केलें. त्या दिवशीं पाऊस फारच पडला व त्या बाईची झोंपडी शेजारच्या वाड्याच्या ज्या भिंतीस लागून होती, तीच भिंत पावसानें भिजून अगदीं पडावयास झाली; असें पाहून ती बाई तुकारामाच्या घरीं गेली. तिणें रडत रडत त्यास भिंतीची हकीगत सांगितली; व सामानाची नासाडी होईल ह्मणून ह्मटलें. हें ऐकून तुकारामानें तिला आश्वासन दिलें कीं, तूं भिऊं नको; खुशाल साहित्य कर. आम्हीं जेवल्यावांचून भिंत पडावयाची नाहीं. हें संकट विठाबाई निवारण करील. भिंत अगदींच लवंडली होती, तरीं पडेना; हा अद्भुत चमत्काराचा प्रकार बहुतेक गांवकऱ्यांनीं पाहिला. तेव्हां त्यांनाही मोठें नवल वाटलें. असो. तिनें चार दिवस लोटल्यावर स्वयंपाक केला व तुकारामास आपल्या घरीं आणून त्याची सर्वोपचारांनीं पूजा केली. नंतर ब्राह्मणांसमवेत तुकारामाचें यथास्थित भोजन झाल्यावर त्याणें त्या म्हातारीस लौकर जेवून घ्यावयास सांगितलें. तिचें भोजन झाल्यावर सामानसुमान बाहेर काढविल्यावर तुकाराम बाहेर आला तों लागलीच ती कललेली भिंत कोसळली. तेव्हां गांवकऱ्यांस सांगून तुकारामानें त्या म्हातारीस रहावयास दुसरें घर देवविलें. मग त्या नव्या घरांत रात्रीस तुकारामाचें कीर्त्तन झालें.

वाघोली गांवांत रामेश्वरभट म्हणून एक ब्राह्मण रहात असे.

त्याणें चार शास्त्रांचें अध्ययन केलें होतें. तो तुकारामाचा उघड द्वेष करूं लागला; व त्यानें पाखंडमत माजविलें आहे म्हणून ज्याला त्याला सांगूं लागला. मग जेणेंकरून तुकारामाची जनांत मानखंडणा होऊन अपकीर्ति होईल असा उपाय योजण्याचें त्याणें मनांत आणिलें. पुढें गांवच्या सरकारी अधिकाऱ्यापाशीं तुकारामाच्या पारिपत्याविषयीं मजबूत भीड घातली व त्याच्या मनांत असा विरोध भरवून दिला कीं, तुकाराम जातीचा शूद्र असूनही श्रुतिसंमत भाषण करितो. त्याणें हरिकीर्त्तन करून भाविक भोळ्या लोकांस भुलवून टाकिलें आहे. मोठमोठे ब्राह्मणही त्यास नमस्कार करतात; या गोष्टीनें आम्हांस खालीं पहावें लागत आहे. त्याणें संपूर्ण धर्म बुडविला.

रामेश्वरभटानें अशी जेव्हां तुकारामाची निंदा केली, तेव्हां तो अधिकारी रागावला. त्याणें लागलेंच तुकारामास देहूच्या हद्दपार करावयासाठीं तेथल्या पाटलास आज्ञापत्र लिहिलें. तो कागद जाऊन पोंचल्याबरोबर लोकांनीं हुकूम बजाविण्यासाठीं तें आज्ञापत्र तुकारामास दाखविलें. त्यानें हुकूम मान्य करतेसमयीं कोणत्याही कारणाच्या निमित्तानें हरकत आणिली नाहीं; पण एका अभंगानें म्हणून दाखविलें कीं, आतां आम्हीं काय करावें? कोणत्या देशांत जावें? ह्यापुढें ह्या गांवांत रहाण्यास ईश्वराच्याच मनांत नाहीं असें दिसतें. गांवचे लोक, पाटील, हे आमच्यावर रागावले आहेत; आतां आम्हांस कोण भीक घालील? ह्या लोकांच्या संगतीनें कोणत्याही सुखाचा लाभ होणार नाहीं; यास्तव वैकुंठनायक शोधावा हें फारच उत्तम होय.

पुढें तुकारामानें वाघोलीस रामेश्वरभटाकडे जावें, असा मनांत विचार आणून तो लागलाच तिकडे गेला; त्या समयीं रामेश्वरभट स्नान-संध्येस बसला होता. त्यास तुकारामानें साष्टांग दंडवत घातलें; व मनांत संकोच न धरतां हरिनामाचा गजर करून तो सर्व प्रसादिक वचनें बोलूं लागला. त्या वेळेस रामेश्वरभट तुकारामास ह्मणाला कीं, तूं जातीचा शूद्र आहेस; आणखी जी कविता बोलत आहेस त्यांत श्रुतीचा अर्थ निघत आहे. तुला अधिकार नसतां तूं हें श्रुतिसंमत भाषण करीत आहेस हें आमच्या मतानें शास्त्रविरुद्ध होय. यामुळें मांगणार

व ऐकणारा या दोघांनाही रौरवयातना भोगाव्या लागणार; अतएव आजपासून तूं ही असली कविता बोलूं नकोस.

रामेश्वरभटाच्या आज्ञेबरहुकूम वागण्यास तुकाराम राजी झाला. तो मनाशीं बोलूं लागला कीं, मला पंढरिनाथानें आज्ञा केल्यावरून मी कविताद्वारानें लोकांस भक्तिमार्ग दाखवित होतों; परंतु त्या माझ्या श्रमाचें कांहीं सार्थक झालें नाहीं. माझी वाणी व्यर्थ गेल्या सारखें झालें. मग तो रामेश्वरास ह्मणाला, तुह्मीं ब्राह्मण साक्षात् ईश्वररूप आहां. तुमची आज्ञा मला मान्य असून त्याप्रमाणें वागण्यास मी कबूल आहें. ह्यापुढें मी अशी कविता ह्मणणार नाहीं व नवीन करून लिहिणारही नाहीं; परंतु मागें जी कविता करून लिहिली आहे तिची वाट काय करावी ती आज्ञा व्हावी ह्मणजे तसें करण्यास ठीक पडेल. मग मागें लिहिलेली कविता उदकांत नेऊन बुडविण्याची रामेश्वरभटानें त्यास आज्ञा केली. नंतर आपल्या आज्ञेप्रमाणें कविता उदकांत बुडवितों असें रामेश्वरास बोलून तुकाराम देहूस आला.

देहूस गेल्यानंतर त्यानें देवालयांत प्रवेश केला व पांडुरंगमूर्त्तीस पहातांच त्याचा कंठ दाटून आला. डोळे पाण्यानें भरून आले. मग त्यानें प्रार्थना केली कीं, देवा रुक्मिणीकांता, सर्व कर्त्ता तूं आहेस; मी पामर मूढ मतिहीन आहें. विठाबाई, तुझ्या आज्ञेनें अबद्ध, वेडेंवांकडें बोललों; आतां तें सर्व उदकांत बुडविण्याची वेळ येऊन ठेपली आहे. असें ह्मणून लिहिलेल्या सर्व वह्या एका रुमालांत बांधिल्या व वरती येऊं नये ह्मणून वजनासाठीं त्यांत दगडही घातले. नंतर इंद्रायणीच्या डोहांत स्वतः घेऊन जाऊन बुडवून टाकल्या; व विठ्ठलनामाचा गजर केला. त्या वेळीं प्रेमळ भाविक लोक हळहळले; पण निंदकांस अति आनंद झाला. ते आपापसांत चर्चा करूं लागले कीं, कविता करून मोठेपणा मिरविण्योचा चांगला घाट घातला होता; परंतु हें कारस्थान तडीस गेलें नाहीं. रामेश्वर ह्मटला ह्मणजे खरोखर विद्वान् ब्राम्हण; केवळ प्रतिसूर्य होय. त्याणें हें तुकारामानें माजविलेलें बंड क्षणांत मोडून टाकिलें. त्याच्यापुढें असल्याम थारा मिळणें

कठीण. पूर्वीं जैमिनीनें भारत केलें होतें, पण व्यासानें तें सर्व बुडविलें; फक्त त्याचा अश्वमेधग्रंथ राखून ठेविला. त्याचप्रमाणें जैनमताचे सर्व ग्रंथ शंकराचार्यांनीं उदकांत सोडिलें; पण जैनांपैकीं एक अमरकोश मात्र ठेविला. परंतु तुकारामाचें कांहींच राहिलें नाहीं. त्याच्या अभंगाच्या सर्वच वह्या रामेश्वरानें उदकांत बुडविल्या. असें कुटिल लोक विष्णुमहिमा कसा आहे हें जाणल्यावांचून मनास येईल तसें अद्वातद्वा बोलूं लागले. वह्या उदकांत बुडविल्यामुळें तुकारामास वाईट वाटलें नाहीं. कोणत्याही कारणानें त्यास हर्ष किंवा शोक होत नसे. जें कांहीं होतें तें सर्व ईश्वराच्या इच्छेनेंच होत असतें, अशी त्याची पक्की समजूत होती; ह्यामुळें वाईट न वाटतां तो आनंदानें भजन करीत होता.

वह्या बुडविल्यास पांच दिवस झाल्यानंतर ब्राह्मण वगैरे कुटिल लोक तुकारामाजवळ येऊन नाना दुरुत्तरें बोलूं लागले. ते त्यास ह्मणाले, तूं मागें खतेंपत्रें होतीं तीं सर्व उदकांत बुडवून टाकिलींस; त्या वेळेस तुला अनुताप झाल्यामुळें तूं प्रपंचावर लाथ मारिलीस! मग परमार्थामध्यें शिरून कविता लिहिलीस; तीही उदकांत बुडविण्याचा प्रसंग येऊन ठेपला! जर दुसरा कोणी असता तर त्याणें प्राण ठेविला नसता. प्रपंच व परमार्थ ह्या दोहोंनाही तूं मुकलास, तरी लोकांना कसें तोंड दाखवित फिरतोस? अशीं नाना दुरुत्तरें बोलून ते आपल्या घरीं गेले.

त्यांचे ते वाग्बाण तुकारामाच्या काळजास लागले. तो विचार करूं लागला कीं, जर प्राण द्यावा तर आत्महत्या घडते; करितां अन्न, उदक वर्ज करून देवद्वारीं धरणें धरून बसावें हें प्राण जाण्याचें एक खासें साधन आहे. मग तो देवळासमोर वृंदावनाजवळच्या शिळेवर पांडुरंगाच्या चरणीं लक्ष लावून अन्नपाण्यावांचून स्वस्थ निजला.

लोकांत तुकारामाची अतिशय अप्रतिष्ठा झाली; ह्यामुळें त्याची स्त्रीसुद्धां त्याचा समाचार घेईनाशी झाली. त्याणें संसार सोडून परमार्थाकडे झोंक फिरविल्यानें तिचा त्याचा वेबनाव पूर्वीच झाला होता. वरकड लोकांचें त्याच्यावरचें प्रेम नाहींसें होऊन पूज्यबुद्धि गेली. मनांत विकल्प येऊं लागला. कांहीं भाविक होते ते मात्र

येऊन तुकारामाची पायधरणी करीत; पण तो त्यांशीं बोलत नसे. तो देवद्वारीं धरणें धरून मेल्यासारखा पडून राहिला. मेला किंवा जिवंत आहे हें देखील कोणास कळेना. असो.

इकडे वाघोलीमध्यें रामेश्वरभटास भक्तद्रोह घडला, ह्या कारणानें त्याजवर ईश्वराची अवकृपा झाली. श्रीरामचंद्राचा द्वेष करणारे रावण व कुंभकर्ण मोक्षास गेले; पण भगवद्भक्ताचा द्वेष करणारास मोक्ष तर मिळावयाचा नाहींच, पण रौरवनरक कदापि चुकावयाचा नाहीं. हरप्रयत्नानें भक्ताचें संरक्षण ईश्वर करितो व अभक्तास अपाय करितो. साधूचा छळ केल्यानें सुकृताची हानि होते व पातकांचा बोजा शिरावर बसतो. त्याचप्रमाणें रामेश्वरभट तपस्वी ब्राह्मण, पण साधूचा द्रोह केल्यानें पुण्याचा क्षय होऊन कसा नाडला गेला तो पहा.

एके दिवशीं तो शिवाच्या दर्शनास पुण्यास गेला. तेथें नागनाथ नांवाचें दैवत जागृत होतें; त्याच्या ठिकाणीं त्याचें चित्त रमलें. द्वादशी, प्रदोष, सोमवार, पर्वकाळ पाहून तो देवदर्शनास जाई. एकदां असा चमत्कार झाला कीं, अनगडशा ह्मणून एक अनुष्ठानी फकीर सिद्ध पुरुष होता त्याच्या बागेंत रामेश्वर शिरला. बरोबर दोघे विद्यार्थी होते. प्रातःस्नानाची वेळ झाल्यामुळें रामेश्वरानें बागेंतील तलावांत स्नान केलें. स्नान करितांना प्रयोगमंत्र ह्मटला, तो अनगडशानें आपल्या आश्रमामधून ऐकतांच शाप दिला कीं, ‘ माझें निमाज पढावयाचें निर्मळ उदक ज्यानें ढवळून गढूळ करून टाकिलें त्याच्या सर्वांगाची उदकावांचून निरंतर आग होईल.’

फकिरानें शाप देतांच रामेश्वराच्या अंगाची आग होऊं लागली. तो माशाप्रमाणें तरफडूं लागला. उदकांतून बाहेर आला कीं आग होई. ती व्यथा सहन होईना ह्मणून तो हेल काढून मोठमोठ्यानें रडूं लागला; व शिष्यांना आतां कोणता उपाय करावा ह्मणून विचारूं लागला. मग ही करणी फकिराची असेल ह्यास्तव त्यास शरण जावें, असें शिष्यांनीं त्यास सांगितलें; पण तें त्यास रुचलें नाहीं. तो त्यांस ह्मणाला, मी ब्राह्मण उत्तम वर्णाचा; यवनाची जात ह्मटली ह्मणजे हलकी; तशांत तो फकीर; त्याला मजसारख्या ब्राह्मणानें शरण

जाणें शोभत नाहीं; असा अभिमान बाळगून त्यास शरण गेला नाहीं.

तो चार घटका पाण्यांत राहिल्यानंतर बाहेर आला; पण आग होण्याची बंद होईना. ओलीं धोत्रें अंगावर निथळत ठेविलीं. विद्यार्थी वरच्यावर पाणी घालीत होते. त्याला अशा स्थितींत घरीं जातां येईना. व फार दिवस वांचण्याचीही निराशा झाली. अशा दारुण व्यथेमध्यें आपला अंत होणार ह्मणून तो फारच चिंतेंत पडला. असें होण्याचें कारण काय हें त्याच्या लक्षांत येईना. फकिरानें कांहीं तरी कुडें केलें असें कोणी ह्मणूं लागले. कोणी कोणी असेंही ह्मणत कीं, तुकारामाचे अभंग ह्यानें बुडविले ह्यास्तव ह्याजवर पंढरिनाथाचाच क्षोभ झाला; निमित्ताला मात्र अनगडशा. अशा प्रकारानें जसें मनास येईल तसें लोक बोलत. असो. रामेश्वरास ती दारुण व्यथा सहन होईना ह्मणून तो आळंदीस ज्ञानदेवाजवळ जाऊन अजानवृक्षास गळती बांधून तिजखालीं धरणें धरून बसला.

इकडे तुकाराम देहूस देवालयाजवळ वृंदावनाशीं अन्नउदक सोडून दगडावर मेल्याप्रमाणें पडून राहिला होता. तेव्हां पंढरिनाथानें बाळरूप धरून तुकारामास वचन देऊन सांगितलें कीं, मी तुझा कैवारी तुझ्या शिरावर असतां तूं असा कां व्यर्थ चिंतेंत पडलास ? माझें नामस्मरण करी ह्मणून प्रल्हादाचा परोपरीनें छळ झाला. त्यास माझा शत्रु हिरण्यकशिपू यानें पर्वतावरून लोटविलें; समुद्रांत बुडविलें; अग्नीमध्यें टाकविलें; हत्तींच्या पायीं देवविलें; सर्प डसविले; विष पाजविलें; इत्यादि अनेक उपाय त्यानें त्याच्या मरण्यास्तव केले, पण सर्वच फुकट गेले. शेवटीं मीं खांबांतून प्रगट होऊन शत्रूचा प्राण घेऊन भक्ताचें संरक्षण केलें. अशीं माझीं अनेक चरित्रें तूं ऐकलींस व गाइलींस तीं कांहीं खोटीं नाहींत. मी तुझ्या वह्या उदकामध्यें धरून बसलों आहे; हा अनुभव तुला लौकरच येईल असें बोलून तुकारामास पोटाशीं धरिलें. नंतर श्रीहरि अंतर्धान पावले.

तुकाराम मेला किंवा जिवंत आहे हें भाविक तसेच कुटिल लोक वरचेवर जाऊन पहात. तो जसा निजला होता तसाच होता. हालला चालला नाहीं; तेव्हां बायकोप्रमाणें ह्यासही अन्न अन्न क-

रितां वाईट रीतीनें मरण आलें अशी निंदक त्याची कुचेष्टा करूं लागले. परंतु भाविक लोक ह्मणत कीं, तुकारामाचें श्रीहरि रक्षण करीत आहे. अन्नउदकावांचून पडला आहे, तरी सतेज टवटवीत दिसतो आहे; नामस्मरणाचा ध्वनि उमटते आहे; जवळ जाऊन खात्री करून घ्या; अशा तुकारामाविषयीं लोक अनेक कल्पना करूं लागले. पण तो आनंदामध्यें स्वस्थ पडला होता.

तेरा दिवस लोटल्यानंतर पंढरिनाथाचा बहुतांना रात्रीस दृष्टांत झाला कीं, 'तुकारामानें लिहिलेल्या अभंगांच्या वह्या मीं उदकामध्यें जतन करून कोरड्याच अजूनपर्यंत ठेविल्या आहेत; त्या उद्यां तरंगून वर येतील त्या तुह्मीं काढून न्याव्या.' मग या दृष्टांतावरून लोक सकाळीं जाऊन पाहूं लागले तों उदकावर वह्या तरंगत आहेत. त्या वेळीं भक्तमंडळीनें टाळ्या वाजवून आनंदानें विठ्ठलनामाची गर्जना केली. मग पोहणाऱ्या लोकांनीं तावडतोब उड्या टाकून हातोहात वह्या बाहेर काढिल्या. त्या ज्यांच्या ज्यांच्या हातीं लागल्या, त्यांणीं त्या पसार करून आपापल्यापाशीं ठेविल्या. लोकांनीं त्यांच्या अनेक प्रति उतरून घेतल्या. ह्या वेळेस तुकारामाची कीर्त्ति होऊन तो जगप्रसिद्ध झाला.

मग देवालयांत जाऊन हा सर्व मजकूर लोकांनीं तुकारामास सांगितला. तेव्हां त्याणें डोळे उघडून पाहिलें व सात अभंगांनीं पांडुरंगाचें स्तवन केलें. त्यांतील तात्पर्य इतकेंच कीं, रुक्मिणीकांता श्रीविठ्ठला, लोकापवाद टाळण्यास्तव मीं तुला श्रमवून संकटांत पाडिलें; हा मजकडून मोठा अन्याय घडला आहे. अन्नउदकावांचून तेरा दिवस वांचविणें व उदकांत कागद कोरे ठेवणें ह्या दोन्ही अघटित गोष्टी तूं लोकांच्या अनुभवास आणून दिल्यास. मी पतित आहें ही गोष्ट खरी आहे; पण मी धरणें धरून तुझ्या दाराशीं बसून राहिलों हाही एक दुसरा महा अन्याय मजकडून झाला आहे. झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. आतां ह्यापुढें सर्वांनीं एक कट करून माझा गळा जरी कापला तरी पुरवला; पण तुला कधीं शिणविणार नाहीं. तुला कष्टविण्याचा मला अधिकार नाहीं. आतां मी ह्या संसारास अगदीं वि-

टलों आहे. अनेक कल्पना मनांत वारंवार येतात; तर आतां तूं माझी आशा, चिंता वारून माझ्या हृदयीं वास कर. तुझ्या नामस्मरणावांचून मला दुसरी कशाचीच गोडी नाहीं.

सिद्धाच्या शापापासून मुक्त व्हावें ह्मणून रामेश्वरभट आळंदीस अजानवृक्षाखालीं ज्ञानेश्वराजवळ धरणें धरून बसला होता. त्याच्या अंगाची आग होत असल्यामुळें वस्त्रें सतत ओलींचिंब अंगावर ठेविलीं होतीं. तूं विष्णूचा अवतार आहेस; कृपा करून सिद्धाच्या शापापासून माझी मोकळीक कर; माझ्यानें दुःख सहन करवत नाहीं; अशा रीतीनें रामेश्वरानें रात्रंदिवस ज्ञानदेवाची स्तुति केली. मग त्यास एके रात्रीं ज्ञानदेवाचा दृष्टांत झाला कीं, सर्व भक्तमंडळीमध्यें नामदेव हा भक्त श्रेष्ठ होय. ह्या प्रेमळ वैष्णववीराचा अवतार तुकाराम जगाचा उद्धार करण्यासाठीं झाला आहे. तूं द्वेषबुद्धीनें त्याची निंदा केलीस; येणेंकरून तुझ्या पदरीं जें सुकृत होतें त्याचा क्षय झाला व कदापि न जाणाऱ्या दोषांचा संग्रह पदरांत पडला. हे दोष तुझ्या देहास अनेक दुःखें भोगवित आहेत. आतां जर तूं अंतर्यामीं प्रेमभाव धरून त्यास शरण जाशील, तरच या महारोगापासून सुटून भवसागर तरशील; नाहींतर हवे तितके उपाय केलेस तरी दोषमुक्त व रोगमुक्त होणार नाहींस. असा ज्ञानदेवाचा स्वप्नांत दृष्टांत होतांच रामेश्वरास पश्चात्ताप झाला. कांहीं तरीं आंच बसल्यावांचून संसारावरचें मन विटत नाहीं व अनुतापावांचून पाप जात नाहीं.

तुकारामाचा मजकडून एक अपराध झाल्यामुळें मी या विपत्तींत येऊन पडलों आहें; जर मी त्याच्या दर्शनास आतांच गेलों तर न जाणो कदाचित् ईश्वर आणखी एखाद्या अपायांत टाकील; कारण, मजकडुन तुकारामाचा थोर अन्याय झाला आहे असें रामेश्वराच्या मनांत आलें. व तुकारामाच्या कोरड्या वह्या उदकांतून निघाल्या; ज्ञानेश्वरानेंही स्वप्नांत दृष्टांत दाखविला; ह्या अत्यद्भुत चमत्कारानें तुकाराम हा ईश्वराच्या पूर्ण कृपेंतला; अशी मनाची खात्री पटल्यावरून आपण जाण्याचा बेत न करितां भीत भीत एक पत्र लिहून शिष्यास देऊन त्यास तुकारामाकडे पाठविला. त्या शिष्यानें तुकारामास पत्र देऊन

सर्व कच्चा मजकूर निवेदन केला. हा दुःखकारक वृत्तांत ऐकून तुकारामास कळवळा आला. तो शत्रुमित्र समान मानीत असल्यामुळें रामेश्वराविषयीं त्याच्या मनांत मुळींच द्वेष नव्हता. मग एक अभंग लिहून दिला; तो विद्यार्थ्यांनीं देहूस नेऊन रामेश्वरास दिला व सर्व मजकूर कळविला.

तुकारामानें लिहिलेल्या अभंगांतील मतलब असा कीं, आपलें चित्त शुद्ध असलें ह्मणजे शत्रुदेखील मित्र होतील. वाघ, सर्प इजा न देतां जवळ येऊन बसतील. विषाचें अमृत होईल. पण असें घडण्यास ईश्वराची कृपा संपादन केली पाहिजे. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणीं एक भाव असावा व त्यांस आपणासमान मानावें. अशा मतलबाचा रामेश्वरानें अभंग वाचल्याबरोबर अनगडशाच्या शापानें होत असलेली त्याच्या अंगाची आग शांत झाली. हा अनुभव येतांच तो अगदीं फिक्का पडून ओशाळला. संतांचा महिमा अनुपम होय, अशी त्याची खात्री झाली. मग पश्चात्ताप पावून तेथूनच तुकारामास साष्टांग नमस्कार घातला; व हाच सद्गुरु तुकाराम मला भवसागरापासून तारील, अशी त्याच्या मनाची पुरी खात्री होऊन तो तुकारामाच्या दर्शनास जावयास निघाला.

रामेश्वर आपल्या दर्शनास येत आहे असें तुकारामानें अंतरदृष्टीनें जाणलें व तो त्यास सामोरा चालला. मार्गांत उभयतांची भेट झाली. रामेश्वरानें तुकारामास ह्मटलें कीं, तुम्हीं परमभक्त व वैष्णववीर आहां हें मला ठाऊक नव्हतें; ह्मणून मी वह्या बुडवून टाकावयास सांगितल्या. जगाचा उद्धार करावयास तुह्मीं अवतरलां आहां हें मी आतां पक्केपणीं समजलों; पण पूर्वीं मीं अज्ञानी असल्यामुळें तुमचा व्यर्थ छळ केला. असें बोलल्यावर तुकारामानें त्यास सांगितलें कीं, मी तरी जातीचा नीच आहें; व तुमची कृपा निरंतर इच्छित आहें. मग रामेश्वरानें उत्तर दिलें कीं, तुह्मीं अभंग लिहिला तोच मला अनुग्रह झाला; आतां मी तुमचा समागम सोडून परत घरीं कदापि जावयाचा नाहीं. असें बोलून तो तुकारामाच्या पांयां पडला.

---

# अध्याय ३६ वा.

## तुकाराम.

रामेश्वरभट शिष्य झाल्यानंतर तुकारामानें आळंदीस जाऊन ज्ञानदेवाचें दर्शन घेतलें. तो तेथें आल्याची वार्त्ता प्रसिद्ध होतांच हजारों लोक दर्शनास येऊं लागले. मग ज्ञानदेवाची भेट घेऊन तो देहूस गेला. हा सर्व वृत्तांत पुण्यांतील अनगडशा फकीरबावास कळला व तो तुकारामाचें दर्शन घेऊन चमत्कार पहावा ह्मणून देहूस यावयास निघाला. तो प्रथम चिंचवडास गेला. तेथें चिंतामणि देव हे गणपतिभक्त होते त्यांच्याकडे भिक्षेस गेला; व साहनक (भिक्षापात्र) भरून भिक्षा मागितली. तेव्हां तेथील एक कारभारी पुष्कळ शिधा घेऊन आला परंतु साहनक भरेना, ह्मणून विस्मित होऊन त्यानें चिंतामणिदेवास वर्त्तमान कळविलें. त्यानें जितकें धान्य असेल तितकें घाला पण अतित विन्मुख जाऊं देऊं नका ह्मणून आज्ञा केली. त्यावरून धान्यांचीं कोठारें सारीं रिकामीं झालीं; परंतु भिक्षापात्र भरेना. शेवटीं चिंतामणिदेवानें स्वतः बाहेर येऊन तेथें सिद्धि उभ्या केल्या व आपल्या हातानें फकिराचें भिक्षापात्र भरलें.

मग तो तेथून देहूस गेला. तेथें तुकारामाच्या घरीं जाऊन त्यानें पात्रभर पिठाची भिक्षा मागितली. त्या वेळीं अवली घरांत स्वयंपाक करीत होती. ती ह्मणाली, हः असा मेला श्रीमंत भिकारी कोठून आला आहे? या मेल्यांनीं आमची पाठ घेतली आहे. यांना धान्य कोठून आणावें? इतक्यांत तुकारामाची धाकटी कन्या गंगा इनें मूठ भरून पीठ घेतलें तें पाहून अवलीनें तिच्या हातास झोंबून थोडेसें पीठ खालीं पाडलें. शेवटीं मुलीनें हातांत राहिलेलें थोडेसें पीठ फकिराच्या पात्रांत घातलें; तों तें भिक्षापात्र भरून गेलें. तेव्हां तो फकीर चकित झाला. त्याची तेथें कांहींकेल्या करामत चालेना. मग तुझेंच नांव तुकाराम काय? असें त्याणें तिला विचारल्यावर तिणें त्यास वेडगळ ठरवून, तुकाराम तो माझा बाप व तो देवळांत आहे ह्मणून सांगितलें. हें ऐकून तो

देवळांत जाऊन पाहूं लागला तों पूर्णब्रह्मसनातन अशी तुकारामाची मूर्त्ति त्याच्या नजरेस पडली. त्याबरोबर त्यानें साष्टांगदंडवत घातलें. तो तेथें दोन दिवस होता; तोंपर्यंत तुकारामानेंही त्याचा आदरसत्कार चांगला केला. त्याचें कीर्त्तन ऐकून फकीर संतोष पावला. मग त्याची आज्ञा घेऊन तो आपल्या मठांत जावयास निघाला.

देहूमध्यें तुकारामाच्या दर्शनास लांबलांबचे लोक येऊं लागले असतां एकदां असें झालें कीं, एक सुंदर व सकुमार स्त्री कामातुर होऊन तुकारामास एकांतीं गांठून ह्मणाली, मी पुष्कळ दिवसांपासून संधि पहात होतें तो आज योग आला; तर माझे मनोरथ पूर्ण करावे. हें ऐकून तो थरथरां कांपूं लागला. मग दोन अभंगांनीं तिला उपदेश करून सांगितलें कीं, परस्त्री मला मातोश्रीप्रमाणें आहे. मीं काम, क्रोधादि षड्वैरी विठोबाच्या पायांवर घातले; महासिद्धीचा त्याग केला; तेथें या प्रकृतीचा पाड काय? माते, आतां एथून लवकर जा; असा तिला उपदेश करून आपण भजन करीत बसला.

एके दिवशीं लोहोगांवच्या भाविक लोकांनीं पुष्कळ आग्रह करून तुकारामास आपल्या गांवीं नेलें. त्याच्याबरोबर रामेश्वरभट, तुकारामाचा भाऊ कान्होबा, गंगाजी मवाळ, संताजी तेली अशी मंडळी होती. तेथें मोठा उत्सव सुरू झाला. लोक नित्य यथाशक्ति ब्राह्मणभोजन घालून कथाकीर्त्तन करवूं लागले. सर्व गांव तुकारामाकडे वळला होता; परंतु तेथें शिवजी ह्मणून एक कांसार असे तो मात्र कृपण व मोठाच निंदक होता. तो कीर्त्तनास न जातां अपशब्द बोलून तुकारामाची व्यर्थ निर्भर्त्सना करी.

एका ब्राह्मणास दहा हजार रुपये कर्ज होतें, ह्मणून तो अन्नपाणी सोडून सहा महिने आळंदीस ज्ञानेश्वराकडे धरणें धरून बसला. त्यास, तूं तुकारामाकडे जा, ह्मणजे तो तुझ्या कर्जाची सोय करील; असा ज्ञानेश्वराचा दृष्टांत झाला. तेव्हां त्यानें लोहोगांवास जाऊन तुकारामाचें दर्शन घेतलें व मला ज्ञानदेवानें पाठविलें आहे असें सांगितलें. हें ऐकतांच तुकाराम त्याच्या येण्याचें कारण न सांगतांही समजला. त्याणें गांवांतील लोकांना मदत करावयास सांगून शिवजीकडे जाऊन

कांहीं मागून आणा ह्मणून सांगितलें. लोकांना तुकारामाचा शब्द अमान्य करवला नाहीं. ते शिवजीकडे गेले. तेव्हां त्यांनीं मोठ्या मारामारीनें त्याच्यापासून दोन ढबू ( पैसे ) काढिले, व तुकारामास आणून दिले. मग त्या पैशांस तुकारामानें एक खडा घांसतांच त्यांचें सुवर्ण झालें; तें त्यास दिलें. पण इतक्यानें कर्जाची फेड होणार नाहीं असें ब्राह्मणानें सांगितल्यावरून त्याच्याच तांब्याच्या उपकरण्यांस खडा लावून सुवर्ण करून त्यास दिलें. अशी त्याच्या कर्जाच्या फेडीपुरती रकम तयार केली. नंतर तो खडा विहिरींत टाकला. ह्या चमत्कारानें गांवचे लोक चकित झाले.

मग ह्याच्याजवळ परीस आहे असें समजून आपलें दरिद्र दूर करून घेण्याच्या हेतूनें शिवजी कांसार तुकारामाच्या नादीं लागला. त्याणें एक संवत्सर कथाकीर्त्तनें ऐकली; तेव्हां त्याला रुक्मिणीकांत प्रसन्न झाला. तो प्रकार असा:—त्याणें छत्तीस बैल बरोबर देऊन गुमास्त्यास मुंबईस कथील आणावयास पाठविलें होतें. मार्गांत त्या सर्व कथलाची चांदी झाली. असें पाहून तें रुपें त्याणें परत पाठवून दिलें; परंतु जेथून खरेदी केलें होतें त्या धन्यानें हें रुपें माझें नव्हें ह्मणून स्पष्ट सांगितलें. मग त्यानें परत लोहोगांवास जाऊन शिवजीस झालेला मजकूर सांगितला. तेव्हां नवल वाटून त्याणें ही गोष्ट तुकारामाच्या कानावर घातली. ती ऐकतांच त्याणें त्यास सांगितलें कीं, तुला रुक्मिणीकांत पावला ह्मणून हें अत्यद्भुत कृत्य घडून आलें; तर ह्याचा तूं सत्कारणीं उपयोग कर. हें ऐकून त्यानें एक मोठी विहीर बांधिली. तिला कांसारविहीर ह्मणतात. ही विहीर बांधून उरलेल्या पैशांचा त्यानें दुसऱ्या प्रकारचा दानधर्म केला. मग तो विरक्त झाला व घरदार सोडून तुकारामाजवळ राहिला.

एके दिवशीं शिवजीच्या बायकोनें आपल्या नवऱ्यास वेडा करून नादीं लावलें ह्मणून तुकारामास मारून टाकण्याचा घाट घातला. तिणें त्यास युक्तीनें आपल्या घरीं नेऊन पाटावर बसविलें व त्याच्या अंगावर अतिशय कढत पाणी ओतलें; तेणेंकरून त्याचें सर्वांग होरपळून गेलें. त्या वेळीं त्याणें एका अभंगानें पांडुरंगाचा धांवा केला;

तेव्हां पाणी व अंग शितळ झालें. त्याला कढत पाण्यानें स्नान घातलें तरीही वांचलेला पाहून तिनें फराळास वाढलें. त्यांतही विष घातलें होतें; परंतु पांडुरंगानें तुकारामास इजा न होऊं देतां त्यांतूनही वांचविलें.

तुकाराम तेथून जातांच तिच्या अंगावर तावडतोब महारोग उद्भवला; तेणेंकरून तिचा प्राण कासावीस होऊं लागला. त्या दिवशीं शिवजी घरीं आल्यावर पहातो तों बायको गलितकुष्टानें व्याकुळ होऊन पडली आहे. तेव्हां मांडवास पुष्पहार अडकला होता; तोही त्याणें ओळखला. त्यावरून इणें साधूचा छळ केला, असें तो खास समजला. मग जेथें तुकारामास स्नान घातलें तेथची माती अंगास लाविल्यानें रोग साफ जाईल असें रामेश्वरभटानें त्यास सुचविलें तसें शिवजीनें करतांच तिची काया निरोगी झाली. मग तीही द्वेष टाकून तुकारामाचें कीर्त्तन ऐकावयास जाऊं लागली.

तुकारामाचे पुष्कळ चमत्कार शिवाजीराजाच्या कानावर गेले. तेव्हां दर्शन घेऊन हरिकीर्त्तन ऐकावें ह्मणून त्याणें त्यास सन्मानानें आणावयास कारभारी पाठविले. बरोबर एक घोडा, छत्री इत्यादि सरंजामही दिला होता; परंतु तुकारामास तें रुचलें नाहीं. तो पूर्ण विरक्त असल्यामुळें मानापमानाची पर्वा करीत नसे. त्याणें चार अभंग लिहून शिवाजी राजास देण्याकरितां कारकुनाजवळ दिले. तुकारामास आणावयास पाठविलेला घोडा मोठा खंदा होता तो कोणास आपल्या पाठीवर बसूं देत नाहीं असें कारकुनानें तुकारामास सांगितलें, तेव्हां त्या घोड्याच्या पाठीवर हात फिरवितांच तो अगदीं सौम्य झाला.

कारकुनानें परत गेल्यावर राजास हें वर्त्तमान सांगितलें; त्या वेळीं त्यास नवल वाटलें. त्याणें अभंग वाचून पाहिले. मग दर्शन घेण्यासाठीं आपण स्वतः निघाला. वस्त्रें, अलंकार, मोहरा, होन व पुजेचें साहित्य बरोबर घेऊन लोहोगांवास गेला. समागमें प्रधान व दुसरे संभावित लोक घेतले होते. त्यानें बरोबरच्या मंडळीसह तुकारामाचें दर्शन घेऊन साष्टांग दंडवत घातला. राजानें बुका लावून तुळशीच्या माळा गळ्यांत घालून सुवर्णमुद्रा तबकांत भरून

तें पुढें ठेविलें ; तें पाहून तुकाराम विरस झाला. त्यानें राजास उपदेश केला; तो असा कीं, आम्हांला हें द्रव्य कशाला पाहिजे ? आम्हांस विठ्ठलावांचून कशाची गरज नाहीं. तुमची बहुत कीर्त्ति ऐकत होतों; परंतु आज उदारत्व कळून आलें! ज्याची आह्मांस गोडी नाहीं तें देऊन उपयोग कोणता? समुद्रावर मेघवृष्टि झाली तरीं तिची तो पर्वा करीत नाहीं. क्षीरसागराला दुधाळ गाय कितपत उपयोगी पडेल ? कनकाद्रीस सुवर्ण वाहिल्यानें तो समाधान पावेल काय ? तूं आणिलेलें द्रव्य आम्हांस गोमांसवत होय. आतां जेणेंकरून तुला समाधान होईल तें मी सांगतों. गळ्यांत तुळसीची माळ घालीत जा व एकादशीव्रत करीत जा. यावांचून तुझी देणगी मी मृत्तिकेप्रमाणें मानितों. आणखी आमच्या मनांत इतकाच हेतु आहे कीं, तुम्हीं आपणाला विठोबाचे दास म्हणवा. असा तुकारामाचा बोध ऐकून राजास परमानंद झाला. त्याणें आणिलेलें द्रव्य ब्राम्हणांस वांटिलें. रात्रीस हरिकीर्त्तन ऐकिलें. कीर्त्तनांत विठोबाचा महिमा वर्णन करून माझें काय तें सर्व तूंच; तुझ्यावांचून मी दुसरें कांहीं जाणत नाहीं; तुजवांचून मला कशाची आवड नाहीं; मी सर्वसंग परित्याग करून आपला देह विठ्ठलचरणीं अर्पण केला आहे; विठ्ठलावांचून ब्रह्मज्ञान निरुपयोगी; हा संसार नाशिवंत, यास्तव जर तुम्हीं पांडुरंगाच्या चरणीं निष्टा ठेवून भजन कराल तरच भवसागर तराल; अशा प्रकारचा तुकारामानें कीर्त्तनामध्यें फार चांगला उपदेश केला.

तुकारामाच्या कीर्त्तनानें राजा विरक्त झाला; व राज्य सोडून अरण्यांत जाऊन नामस्मरण करूं लागला. असें पाहून प्रधानानें शिवाजीची आई जिजाबाई, ईस संपूर्ण घडलेली हकिगत लिहून कळविली. तेव्हां ती अत्यंत खिन्न होऊन तावडतोब लोहोगांवास आली; व तुकारामाचें दर्शन घेऊन पदर पसरून म्हणाली, मला एक पुत्र होता तो तुझ्या कीर्त्तनानें विरक्त झाला., त्याच्या पोटीं पुत्र नाहीं कीं तो राज्यकारभार चालवील. यास्तव तो पूर्वींप्रमाणें राज्य करील असें कर; म्हणजे मला पुत्रदान दिल्यासारखें होईल

मी तुझे उपकार कधींही विसरणार नाहीं. मग शिवाजीला चार गोष्टी सांगून वळवीन म्हणून तुकारामानें तिला आश्वासन दिलें; व स्वस्थ राहून विठोबाचें भजन करावयास सांगितलें.

मग रात्रीस राजा कीर्त्तनास आल्यावर तुकारामानें कर्मकांड सांगावयास आरंभ केला. त्याचा सारांश असा.—भवसमुद्र तरावयास सत्कर्मच मुख्य होय. प्रत्येकानें आपापल्या स्वधर्मानें आचरण करावें. दुसऱ्याचा धर्म उत्तम असें कल्पून कोणी त्या धर्मानें वागेल तर कदापि तरणोपाय होणार नाहीं. मासा पाणी टाकून तुपांत शिरेल तर जगणार नाहीं. पक्षांनीं आकाश सोडून बिळांत घुसूं नये. सर्प अन्न खाल्यानें मरतो. ज्याणें आपला स्वधर्म सोडला; तोच त्याचा मारक होय. परमेश्वरानें सृष्टी निर्माण करून कर्ममार्ग सांगितला. उत्पत्तीचें काम ब्रह्मदेवाकडे दिलें; पालन करण्याचें आपण पतकरलें; शेषानें पृथ्वी धरावी; ती वासुकीनें हलूं देऊं नये; समुद्रानें पृथ्वीस वेढा देऊन मर्यादा धरून रहावें; सूर्यानें प्रखर प्रकाश पाडावा; चंद्रानें शीतलत्व द्यावें; अशी व्यवस्था लाविली. ह्या आज्ञेचें उल्लंघन न करितां तीं वागत आहेत. श्रुतिवचनाप्रमाणें न चालणारे अधःपातास जातात. विप्राचें हें कर्म कीं, प्रथम ब्रह्मचर्यव्रत करून विद्याभ्यास करावा. पुढें गृहस्थाश्रम पतकरल्यावर षट्कर्मांचा विचार करून तदनुसार वागावें. नंतर वानप्रस्थ होऊन सर्व विषय जिंकून ते आपल्या कबजांत आणावे. शेवटीं सर्व संकल्पाचा त्याग करून संन्यासदीक्षा घ्यावी. क्षत्रियांचे धर्म हे कीं, शत्रूंस जिंकून सद्धर्मानें प्रजेचें पालन करावें. जसा अवयवांचें पोषण करून विलासी सुखी होतो, किंवा कुटुंबवत्सल घरीं गेल्यावर परिवार पाहून समाधान पावतो, त्याप्रमाणेंच प्रजा सुखी पाहून राजास हर्ष व्हावा. सारांश, ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शुद्र ह्या सर्वांनीं चित्तांत समता धरून सर्व जगत् ईश्वरमय पहावें. कोणाचा घात करूं नये. प्रेमानें भजन करावें. असत्य न बोलतां आपापला व्यापारधंदा सचोटीनें करावा. भुकेलेल्याला अन्न द्यावें. नीतीनें वागून खुशाल संसार करावा. त्यास वनांत जावयास नको; घरींच श्रीहरि भेटेल. अशा या तुकारामाच्या

उपदेशानें राजा तटस्थ राहिला. मग आपण राज्यकारभार चालवावा अशी तुकारामाची इच्छा जाणून शिवाजीनें राजवस्त्रें घेतलीं. तेव्हां राजाची आई तुकोबाच्या पायां पडली. मग आणखी चार दिवस राजा तेथें राहिला.

नावजी ह्मणून एक माळी भाविक होता. त्याच्या मनांत कीर्त्तन करावें असें आल्यावरून एके दिवशीं तुकारामास थांबवून चार घटिका त्यानें नृत्य करीत भजन केलें. तो नित्य फुलांचें हार करून कीर्त्तनांत ब्राह्मणांस घाली व नाचे. 'द्वारकेचें केणें चोजवीत पंढरीस आलें' असें ह्मणावयास अवघड जाई ह्मणून 'चोजवीत' या शब्दांतील 'ज' च्या ठिकाणीं तो 'द' ह्मणे; तेव्हां सर्व गदगदां हंसत. मग एका ब्राह्मणानें त्यास असें अबद्ध वचन बोलण्याचा निषेध केला. तेव्हां त्याणें समजूत करून सांगितल्यामुळें नावजी त्याच्या पायां पडला; परंतु त्याच्या मनांत विकल्प घातल्यामुळें ब्राम्हणाची वाचा जाऊन तो मुका झाला. पुढें त्या ब्राम्हणानें झालेला मजकूर लिहून रामेश्वरास दाखविला; तो त्याणें तुकारामास समजून सांगितला. त्याच संधीस एका कुणब्यानें कोंवळें वाळूक आणिलें; त्याच्या तुकारामानें चार फांका करून तीन आपण खाल्ल्या; चौथीचे दोन तुकडे केले; व एक तुकडा वाचा गेलेल्यास दिला. तो खातांक्षणींच पूर्ववत बोलूं लागला. मग राहिलेल्या अर्ध्या फांकेचे तुकडे करून सर्वांना दिले, ते सर्वांना कडू लागले; म्हणून एके बाजूस नकळत थुंकूं लागले. असो. रात्रीस नावजीनें कीर्त्तनांत नृत्य करण्याचें नाकारलें; परंतु तुझें हें प्रेमाचें बोलणें देवास आवडतें वगैरे सांगून तुकारामानें त्याची समजून केली. मग तो पूर्वींप्रमाणें हर्षानें नाचूं लागला.

मग शिवाजीराजानें घरीं जाण्यास आज्ञा मागितली. त्या वेळीं राज्य सुटावयाचें असेल तर भाकर व पोटीं संतान व्हावयाचें असेल तर नारळ देण्यासाठीं आपला हेतु दर्शविला. तो पाहून तुकारामानें भाकर व नारळ हीं दोन्ही दिलीं. मग साष्टांग दंडवत घालून शिवाजी राजा आपल्या राजधानीस गेला. तुकारामाजवळ कोंडभट पुराणीक व रामेश्वरभट असे दोघे ब्राम्हण शिवाय चौदाजण संसार सोडून राहिले.

# अध्याय ३७ वा.

## तुकाराम.

तुकाराम चार महिने लोहोगांवास राहून देहूस गेला. त्यानंतर असा चमत्कार झाला कीं, एके समयीं भीमाशंकरास जाण्याच्या उद्देशानें चिंचवडचा चिंतामणिदेव पुष्कळ यात्रा समागमें घेऊन देहूस आला. तुकारामानें त्यास साष्टांग दंडवत घालून भेटल्यावर उभयतांस परमानंद झाला. मग चिंतामणिदेव तुकारामास म्हणाला, तूं प्रेमळ वैष्णव भक्त आहेस; ह्यास्तव कांहीं प्रसाद द्यावा. आम्हांपुरतें भोजनाचें साहित्य दिलें तरीं मनोरथ पूर्ण होतील. मग चिंतामणिदेवाची इच्छा पाहून तुकाराम कणीक, डाळ, तांदूळ, तूप असें एकास पुरेल इतकें सामान आपल्या घरीं जाऊन घेऊन आला; इतक्यांत सर्व यात्राही तेथें येऊन प्रसाद मागूं लागली. तेव्हां तुकारामास संकट पडून त्याणें पांडुरंगास आठविलें. तेव्हां गुप्तरूपें पंढरीनाथ तेथें येऊन राहिला; तेणेंकरून एकाचें सामान होतें, तें वांटीत असतां संपूर्ण यात्रेकरी मंडळीस पुरलें. हें पाहून चिंतामणिदेव तेथें सिद्धी न येतां एकाचा शिधा सर्वांस पुरला म्हणून विस्मित झाला. मग स्वयंपाक झाल्यावर चिंतामणिदेवानें तुकारामास पंक्तीस घेऊन भोजन केलें. त्या रात्रीं कीर्त्तन झालें.

दुसरा एक असा चमत्कार झाला कीं, एक ब्राह्मण ज्ञानेश्वराजवळ धरणें धरून बसला असतां, तुकारामाकडे जाण्याविषयीं त्यास दृष्टांत झाला. त्यावरून त्यानें देहूस येऊन तुकारामाचें दर्शन घेतलें व सर्व वृत्तांत कळविला. तो ऐकून त्यानें त्यास लोहोगांवास शिवजी कांसाराकडे पाठविला; व तो जें देईल तें घेऊन यावयास सांगितलें. मग त्याणें जाऊन शिवजीस झालेला मजकूर सांगितला. त्याणें त्यास घरांत नेऊन लोखंडाचे चार मोठे तुकडे त्यास दिले; ते देहूस जाऊन तुकारामास दाखवावयास सांगितले. द्रव्यासाठीं इतकी खटपट करीत असतां कांहीं हातास लागेना ह्मणून तो ब्राह्मण खिन्न झाला. तरी तो तें लोखंडाचें ओझें तसेंच सहन करून

जात होता; परंतु झेंपेना. शेवटीं कन्हे व रेके असे दोन पर्वत आहेत, तेथें तीन तुकडे ठेविले व एकच घेऊन तो देहूस गेला. त्यानें तो तुकडा तुकारामास दाखविला; पण त्याच्या नजरेस पडतांच त्याचें सुवर्ण झालें. नंतर तुकारामानें त्यास सांगितलें कीं, हें सोनें तुला ज्ञानदेवांनीं दिलें आहे; तें घेऊन आतां सुखानें संसार कर. मग तुकारामास नमन करून तो घरीं चालला. जातांना ठेविलेले तुकडे पाहूं लागला, तों तेथें ते नाहींत; असें पाहून चकित झाला.

एकदां तुकाराम मुळाभिवरासंगमतीर्थीं स्नानास जात असतां, एक पिसाळलेला कुत्रा भेटला; तो मनुष्यास पाहिल्यांबरोबर अंगावर भोंकत जाई व त्याची नरडी फोडून रक्त पिई. तोच जातांना तुकारामासमीप आला; परंतु त्याला त्याची भीति वाटली नाहीं. पण जेव्हां कुत्रा भोंकावयास लागला तेव्हां तुकाराम ह्मणाला, आह्मीं गुरगुरत नसतां तूंच कां गुरगुरतोस? असें विचारतांच तो कुत्रा पाळलेल्या मांजरासारखा नरम पडला. असें पाहून सर्व लोकांस नवल वाटलें.

भीमेवर स्नान करून भजन झाल्यावर तुकाराम दोन प्रहरीं भिक्षेस्तव रांजणगांवीं एका ब्राह्मणाकडे गेला. त्याणें तुकारामास वैश्वदेवसमयीं आलेला पहातांच भोजनास वाढलें. नंतर विनंती केली कीं, माझ्या मुलाचें वय आठ वर्षांचें झालें, तरी तो बोलत नाहीं; ह्मणून ह्याचा अझून व्रतबंध केला नाहीं. मग, मुलास आणवून तुकारामानें अनुग्रह दिला व 'विठ्ठल विठ्ठल' ह्मणावयास लावून मुलगा बोलता केला. असें पाहून आईबापांनीं उपकार मानून तुकारामास राहवून घेतलें व दुसरे दिवशीं मुलाची मुंज केली. येथून परत जातांना कुत्रा कामांतून गेला असें त्याच्या धन्यानें सांगतांच तुकाराम त्यास आपल्याबरोबर घेऊन आला. तो नेहमीं कीर्त्तन ऐके व एकादशीस कांहीं खात नसे.

एकदां यलवडकर जांवई ( माल्जी गाड्या ) यानें पायां पडून कांहीं नेम सांगण्याची तुकारामास विनंती केल्यावरून त्यानें त्यास गीता वाचावयास सांगितली. त्यावरून तो नित्य गीता वाची, पण

अशुद्धें रहात; तरी पांडुरंगास तें आवडत असे. एके दिवशीं त्याकडे खेडकर जोशी. गेला. त्याणें, तूं गीता अशुद्ध वाचतोस हें नरकाचें साधन होय, तर वाचण्याचें बंद कर; असें सांगितलें. तें मालजी गाड्यास खरें वाटून त्याणें गीता वाचावयाचें सोडून दिलें. मग 'तूं विकल्प मनांत भरवून गीता वाचण्याचें बंद कर असें सांगितलेंस, यास्तव आतांच त्याच्या घरीं जाऊन तो गीता वाचील असें कर; नाहीं तर तुझें कल्याण होणार नाहीं;' असा पंढरिनाथाचा जोशास दृष्टांत झाला. त्यावरून तो भयाभित होऊन एलवड्यास गेला व मालजी गाड्यास त्यानें गीता वाचावयास सांगितली; परंतु शुद्ध वाचतां येत नव्हतें म्हणून त्याणें वाचण्याचें नाकबूल केलें. मग तो ब्राह्मण तेथें चार महिने राहिला; व त्यानें त्यास गीता शुद्ध वाचावयास शिकविली.

तुकारामानें बालक्रीडेचे अभंग केले, त्यांत 'श्रीकृष्णाचें मुख मलीन' असें आहे; त्यांत 'मलीन' शब्द रामेश्वरभटानें खोडून 'म्लान' हा संस्कृत शब्द लिहिला. मग पंढरिनाथाचा रामेश्वर भटास स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, तूं तुकारामाचें वचन खोडून आपलें मत स्थापिलेंस; तर मला मुख म्लान होण्यासारखी बाळपणांत कोणती चिंता होती ? मीं बाळपणीं माती खाल्ल्यानें तोंड मलीन झालेंच होतें. दर अवतारीं तुकाराम माझ्यासमागमें असतो; त्याणें जसें पाहिलें होतें तसें लिहिलें; हें स्वप्न त्यानें सर्वांना सांगून पुनः तुकारामाचाच शब्द कायम ठेविला.

एकदां चैत्र महिन्यांत गंगाजी मवाळ आणि संताजी तेली यांस बरोबर घेऊन, तुकाराम कोथळपर्वतावर कोथळेश्वराचें शिवालय आहे त्याचें दर्शन घ्यावयास गेले. त्या पर्वतावर उदक नव्हतें ह्मणून पर्वताखालीं सिंगणापूर क्षेत्राजवळच्या एका सरोवराचे कांठीं भोजन उरकून नंतर देवदर्शनास वरतीं जाण्याचा बेत केला. त्याप्रमाणें त्यांनीं तेथें जाऊन चौघांचा स्वयंपाक केला. इतक्यांत दिगंबर अशा अतिताच्या रूपानें कैलासनाथ येऊन तुकारामास ह्मणाला कीं, मी तुझ्या दर्शनाची इच्छा धरून आलों आहें; आज बहुत दिवसांचा उपाशीं आहें.

मग तुकोबानें त्यास रहावून घेतलें; व आसन बसावयास देऊन त्याच्या पायांवर मस्तक ठेविलें. प्रथम अतिथी जेवून तृप्त झाल्यावर आपण भोजन करूं असें तुकारामानें गंगाजीस सांगून लागलेंच त्याचें एक पात्र मांडून त्यास जेवावयास बसविलें. त्या अतिथीनें चौघांचें अन्न पार केलें; व पाणी पिऊन मुखशुद्धि झाल्यावर ' तुक्या, तुझें कल्याण होईल ' ह्मणून आशीर्वाद दिला. नंतर तो अतीत कोथळपर्वतावर गेल्यावर, तुह्मीं जेवण लवकर तयार करण्याची बरी युक्ति सांगितली, नाहींतर अतीत उपाशीं गेला असता; असें तुकारामास बोलून गंगाजीनें संताजीस शिध्यासाठीं गांवांत धाडिलें व खरकैंच्या भांड्यांवर माशा बसतील ह्मणून वस्त्र घातलें. पुढें संताजी सामग्री घेऊन आला. मग स्वयंपाक करण्यासाठीं भांडीं उघडून पाहिलीं तों तीं सर्व अन्नांनीं भरलेलीं दिसलीं. ह्या चमत्कारानें त्यांस नवल वाटलें; व अतीतरूपानें कैलासपति दर्शन देऊन व भोजन करून गेले असें ते समजले. मग तिघांनीं भोजन केलें. नंतर पर्वतावर जाऊन शंभूचें दर्शन घेतलें. तेथें पांच दिवस राहून कीर्त्तनें करून परत देहूस गेले.

एकदां असा चमत्कार झाला कीं, चालतांना नामस्मरण करीत असतां पदोपदीं यज्ञ केल्याचें फळ प्राप्त होतें; अशा अर्थाचा एक अभंग एके दिवशीं तुकारामानें कीर्त्तनामध्यें ह्मटला. तो लक्षांत ठेवून लोहोगांवच्या एका ब्राह्मणानें पूर्ण विश्वासानें प्रत्येक पावलास हरिनाम घेऊन सुतळीस गांठी देऊन ती दोरी ठेविली. ह्या गोष्टीस वर्ष झालें; तों एका नामांकित गृहस्थास ब्रह्मसंबंध लागला होता; तो पुष्कळ दिवस हरिहरेश्वरास येऊन राहिला असतां एके दिवशीं संबंध अंगांत येऊन त्यास ह्मणाला कीं, जर एका यज्ञाचें पुण्य देशील तर मी तुला सोडून जाईन. हें ऐकून त्या गृहस्थानें मोटमोठीं क्षेत्रें, शहरें फिरून तपास केला; परंतु कोठेंही कार्य होईना. मग तो फिरत फिरत लोहोगांवास आला. तेथें तपास करतां करतां त्या गृहस्थास हें समजलें. त्याणें त्यास आपल्या घरीं नेऊन सुतळीला हरीनाम घेऊन हजारों गांठी मारल्या होत्या त्यांतील एक गांठ तोडून ती पाण्यांत चोळून तें पाणी संबंध लागलेल्या मनुष्यास प्यावयास दिलें; त्या क्ष-

र्णींच संबंध त्यास सोडून गेला. हा चमत्कार सर्वांनीं पाहिला. असा नामाचा महिमा आहे. मग तो ब्राह्मण सुखी होऊन आपल्या गांवीं गेला. तुकारामाच्या वचनांच्या खरेपणाचा अनुभव सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिला.

तुकाराम नेमानें आषाढीकार्त्तिकीस पंढरीस जाई. परंतु तो एकदां शीतज्वरानें क्षीण झाल्यामुळें पंढरीस जाण्याचें त्यास अवसान नव्हतें; ह्मणून पंढरीची वारी अंतरल्या कारणानें तो चिंतेंत पडला. तुकारामाच्या समागमें पंढरीस जाण्यासाठीं भाविक मंडळी चौदाशें पताका घेऊन देहूस येऊन थडकली. तेव्हां त्याणें चोवीस अभंगाचें पत्र लिहून तें विठोबास देण्यासाठीं वारकऱ्यांजवळ दिलें. त्यांतील भावार्थ असा कीं, पांडुरंगा, वेद, शास्त्रें, पुराणें हीं तुझे गुण वर्णन करतांना थकलीं; त्यांपेक्षां माझ्या अंगीं कोठून अधिक सामर्थ्य असणार? तूं संपूर्ण विश्वाचा पालनकर्त्ता असून तुला माझा विसर कोणत्या कारणानें पडला नकळे? मला बोलावूं पाठविण्याची तरीं तुला काय गरज पडली आहे? पण मला तळमळ लागून मी झुरत आहें. तुझें मन इतकें संकोचतें तर पोरें व्यालास तरीं कशाला? ज्याप्रमाणें पाडसाचें लक्ष हरिणीकडे किंवा चातकपक्षाचें मेघाकडे त्याप्रमाणेंच माझी स्थिति झाली आहे.

त्याणें यात्रेकऱ्यांस सांगितलें कीं, तुह्मी पंढरिनाथास विचारा कीं, तुका कोणत्या अन्यायामुळें पायांस अंतरला? मग विठ्ठलनामाचा गजर करीत वारकरी पंढरीस आले. तेथें त्यांनीं एकमेकांस आलिंगन देऊन चंद्रभागेवर स्नान केलें व क्षेत्रप्रदक्षिणा करून पुंडलिकाचें दर्शन घेतलें. मग गरुडपारावर कीर्त्तन होत असतां पत्र देवास वाचून दाखविलें. तें ऐकून भाविकांच्या डोळ्यांतून टपटप पाणी पडूं लागलें. मग रामेश्वरभट, गंगाधर मवाळ कडुसकर, संताजी तेली आदिकरून वारकरी लोकांनीं पांडुरंगास पत्र देऊन निरोप सांगितला; तेव्हां विठोबाचें हृदय सद्गदित झालें. त्याणें रुक्मिणीस बोलावून सांगितलें कीं, तुकारामास पंढरीस येण्याचें अवसान राहिलें नाहीं, ह्मणून त्याचें पत्र आलें आहे; तर त्याच्या समाचारास गेलें

पाहिजे. हें ऐकून रुक्मीण ह्मणाली कीं, तुमच्या दर्शनासाठीं एथें असंख्य लोक आले आहेत, त्यांस तुह्मीं न भेटाल तर ते कष्टी होतील; ह्मणून गरुडास पाठवून तुकारामास येथेंच आणवावें. मग पांडुरंगानें त्यास आणावयास गरुडास पाठविला.

पांडुरंगाची आज्ञा वंदन करून गरुड देहूस गेला. तुकाराम यात्रेकऱ्यांस बोळविण्यास गांवाबाहेर गेला होता, तो तेथेंच देहभान विसरून पंढरिनाथाची वाट पहात एखाद्या झाडाच्या खुंटासारखा उभा होता; त्यास पहातांच गरुड चकित झाला. तो त्याजवळ जाऊन देवाचें पत्र हातांत देऊन ह्मणाला कीं, तुझ्या वियोगानें विठोबा अतियश खंति झाला आहे; व शक्तिहीन झाल्यानें तुझ्यानें पंढरीस येववलें नाहीं ह्मणून त्याचे हुकुमानें तुला नेण्यासाठीं मी आलों आहें. हें ऐकल्यानंतर तुकारामानें देवाचें पत्र वाचलें त्यांतील भावार्थ असा कीं, जावत्कालपर्यंत वैकुंठ, कैलास आहे, तावत्कालपर्यंत तुका चिरंजीव असो. चराचरीं माझें जें ऐश्वर्य आहें त्याचा अधिकारी तूंच आहेस. मांझा वियोग तुला तसाच तुझा वियोग मला सहन होत नाहीं; ह्यास्तव तुला आणावयास गरुडास पाठविला आहे. तर अनमान न करितां त्याच्या पाठीवर बसून पंढरीस येऊन मला आनंदित कर. हें वाचून तुकाराम गरुडास ह्मणाला, तूं माझ्या स्वामीचें वहन आहेस व मी त्याचा दास आहें; ह्मणून तुजवर बसणें अनुचित होय; यास्तव पांडुरंगास एथेंच घेऊन ये. त्यास तूं ही माझी स्थिति सांग; असें बोलून तो गरुडाच्या पायां पडला.

मग गरुडानें परत पंढरीस येऊन देवास नमस्कार केल्यावर सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हां रुक्मिणीच्या अनुमतानें तुकारामाच्या भेटीस जाण्याचा देवाचा बेत ठरला. मग गोपाळकाला झाल्यावर भक्तमंडळी जिकडे तिकडे फांकली. जातांना तुकारामाचा समाचार घेण्याची वारकऱ्यांनीं देवास विनंती केली. ते वारकरी परत आले व पहातात तों तुकाराम जेथवर बोळवीत आला होता तेथेंच ध्यानस्थ उभा आहे; तेव्हां वारकरीमंडळी विस्मित झाली; व असा कोणांचा निर्धार नाहीं असें सर्व ह्मणूं लागले. त्या वेळीं तुकारामाची काया ब्रह्मरूप होऊन गेली होती.

तुकारामानें वारकऱ्यांस पहातांच लोटांगण घातलें. रामेश्वरभट त्याचा सांप्रदायी असतांही त्याच्या पायां पडला. नंतर वारकऱ्यांनीं प्रसाद दिला तो तुकारामानें मोठ्या आवडीनें सेवन केला. शेवटीं यात्रेचा सकळ वृत्तांत निवेदन करून, तुह्मांस भेटावयास रुक्मिणीकांत आज येणार आहेत ह्मणून सांगितलें. नंतर सर्व आपापल्या घरोघर गेले.

तुकाराम तेथें उभा राहून पांडुरंगाचा धांवा करीत होता कीं, देवा, अजून तूं कां येत नाहींस? कोणत्या भक्ताची पूजा घेत बसलास; ह्मणून तेथें प्रीति जडून माझा विसर पडला? किंवा दुसऱ्या भक्ताला संकटांतून काढण्याकरितां गुंतलास? असा करुणस्वरानें पांडुरंगाचा धांवा करीत आहे, तोंच रुक्मिणीसह पांडुरंग पुढें उभा राहिला व त्यास आलिंगन दिलें. मग तुकाराम पांडुरंगाच्या पायां पडला.

---

# अध्याय ३८ वा.

## तुकाराम.

त्यानंतर पंढरीनाथ तुकारामास घेऊन त्याच्या घरीं गेले. तेव्हां देवानें कांहीं खावयास मागितल्यावरून तो अवलीस ह्मणाला कीं, आज आपल्या घरीं पंढरीनाथ आले आहेत त्यांना भूक लागली आहे; यास्तव कंटाळा न करितां सुखासमाधानानें जें असेल तें त्यांस खावयास दे. मग तिणें कण्याचा भात केला, भाजी केली, भाकर भाजली व देवास जेवावयास बसविलें. ईश्वरास भक्ति प्रिय असल्यामुळें तुकारामाकडे कदन्न खाण्यासही त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. मग तुकारामाचें समाधान करून पंढरीनाथ अंतर्धान पावले.

एक ब्राह्मण 'विवेकसिंधु' नित्यनेमानें वाचीत असे. तो तुकारामाची कीर्त्ति ऐकून देहूस आला. तेव्हां तुकाराम इंद्रायणीच्या कांठीं भजन करीत बसला होता, त्या समयीं परस्परांनीं नमस्कार केल्यावर तो तुकारामास ह्मणाला, श्रीमुकुंदराज यांणीं विवेकसिंधु ह्मणून अध्यात्मग्रंथ केला आहे त्याचें मी एथें पारायण करितों; आपण श्रवण करावें. त्याच्या समाधानासाठीं तुकारामानें तें कबूल केलें; पण तो डोक्या-

वरून गोधडी घेऊन स्वस्थ बसला. असें करण्याचें कारण त्याणें ब्राह्मणास सांगितलें कीं, इकडे तिकडे मन फांकून जातें तें न जावें ह्मणून डोळे मिटून व सर्व अंग झांकून बसतों; तुह्मी पारायण करावें. मग त्याणें एक प्रहरभर ग्रंथ वाचून अर्थ सांगितला; तोंपर्यंत तुकाराम कांहीं बोलला चालला नाहीं. त्यावरून ब्राह्मणानें सहज गोधडी काढून पाहिलें, तों तो कानांत बोटें घालून नामस्मरण करीत होता. तेव्हां ब्राह्मण विरस झाला. तो तुकारामास ह्मणाला कीं, माझी भूलचूक निघून तुमच्या मुखानें मला कांहीं अर्थ कळेल ह्मणून मुद्दाम मीं एथें येऊन आपलेसंन्निध ग्रंथ वाचला; परंतु आपण तिकडे लक्ष दिलें नाहीं. हें ऐकून तुकारामानें अभंग ह्मणून त्यास सुचविलें कीं, मला ह्यासाठींच अरण्यवास आवडला, व नामस्मरणाचा नेम धरिला; ह्यास्तव अन्य गोष्टी मी कानांनीं ऐकत नाहीं. जेणेंकरून विक्षेप होईल तें करूं नये. आतां हें संपूर्ण जगत् ब्रह्मरूप आहे असें आत्मज्ञान सांगून बाजारांत कवडीसाठीं भांडण करणें फार वाईट. जर अवघें ब्रह्मरूप भासलें आहे तर गेल्या आल्याची हळहळ कशाकरितां? जरी उदंड ब्रह्मनिष्ठ झाला, तरीं ईश्वरीसत्ता अनिवार आहे; उत्पत्ति आणि संहार त्याच्या हातांत नाहीं; वगैरे केलेला उपदेश त्याच्या अंतःकरणांत चांगला वठला. त्याचें चित्त सगुणभजनीं पूर्ण जडलें; व तो आवडीनें संतांचीं पुरातन वाक्यें ऐकूं व गाऊं लागला.

एकदां तुकारामास लोहगांवकऱ्यांनीं आपल्या गांवीं नेलें. त्यांची त्याच्या ठिकाणीं पूर्ण श्रद्धा बसली. ते तऱ्हेतऱ्हेच्या पक्वान्नांच्या समाराधना घालून रात्रीस तुकारामाचें कीर्त्तन करवीत. तेथें एका विहिरीचें पाणी खारें होतें; पण तुकाराम तिजमध्यें स्नान करितांच तें गोडें झालें. हा चमत्कार सर्वांनीं पाहिला. त्या विहिरीस कांसारविहीर ह्मणतात. ती अद्यापि तेथें आहे.

तेथचाच एक ब्राह्मण तुकारामाच्या कथा कीर्त्तनानें प्रपंचाचा त्याग करण्याच्या बेतांत होता. त्याची बायको देखणी होती, तिच्या मनांत तुकारामाविषयीं मत्सर उद्भवला. आपला भ्रतार बाहेर गांवीं गेल्याची संधि पाहून तिणें तुकोबास भोजनास बोलाविलें, त्या समयीं तिनें कडू

भोंपळ्याची भाजी केली होती. ती त्यानें फार गोड झाली आहे असें ह्मणून आवडीनें खाल्ली; व तिणेंही त्यास आग्रह करकरून वाढिली. तो जेवून जातांच तिजवर वैकुंठनायकाची इतराजी झाली. तिच्या सर्वांगास आंवळ्याएवढीं गुल्में आलीं. तीं पुष्कळ औषधें केलीं तरीं गेलीं नाहींत. देवाचा द्वेष करणारे मोक्षपदास गेले; पण भक्तांचा द्वेष करणारांस रौरवनरक प्राप्त व्हावयाचाच.

तेथच्याच एका ब्राह्मणानें तुकारामास सोमवारीं रात्रीस भोजनास आणलें. तो जेवतांना दिव्यांतलें तेल सरलें व घरांतही आणिलेलें नव्हतें; तेंव्हां दिवा जाईल म्हणून ब्राह्मणाला चिंता उत्पन्न झाली. मग तुकारामानें घरधनिणीस रित्या बुधल्यांत पहावयास सांगितलें. तिणें पाहिलें तों आंत तेल आलें. मग त्यांस संतोष झाला. तीं उभयतां जोंपर्यंत जिवंत होतीं तोंपर्यंत त्या बुधल्यांतील तेल सरलें नाहीं. जेथें देवभक्तांची आस्था, तेथें सर्व सिद्धि हात जोडून उभ्या असतात.

एका पाटलाच्या द्वारीं एक शिळा होती, तिजवर तुकाराम बसत असत. त्याच्यापुढें एक तुंबडीवाला खेळ करीत असे. असें त्यानें एक महिना केलें. मग एके दिवशीं तो लोखंडाचे तुकडे जमवून तुकारामाजवळ गेला व तुंबडी भरावयास सांगितलें. तेंव्हां त्यांणीं तुला आज काय मिळालें ह्मणून विचारल्यावर त्यानें लोखंडाचे तुकडे त्या शिळेवर ठेविले ते तुकारामाच्या दृष्टीस पडतांच त्यांचें सोनें झालें. तें तुकारामानें त्यास न्यावयास सांगितलें. तो तें अति हर्षानें घेऊन गेला. मग पुष्कळांनीं त्या शिळेवर लोखंड घांसून पाहिलें; परंतु सोनें झालें नाहीं. ती शिळा अझून तेथेंच आहे.

तेथचाच एक जोशी तुकारामाच्या कीर्त्तनास नित्य नेमानें जात असे. त्याचा मुलगा आजारामुळें मरावयास टेंकला होता. तो दोन चार घटकांनीं मरणार असें असतांही तो तसाच कीर्त्तनास गेला पुढें थोड्याच वेळानें तो मुलगा मरण पावला. त्याच्या बायकोनें तें प्रेत कीर्त्तनांत आणून तुकारामाजवळ ठेविलें. तेंव्हां ती

ह्मणाली, जर मुलास उठविलेंस तर तूं विष्णुभक्त खरा; नाहींतर हें तुझें सारें ढोंग आहे असें मी समजेन.

मग तुकारामानें पांडुरंगाचें ध्यान केलें. त्यांतील भावार्थ असा कीं, जर हें मूल जिवंत झालें नाहीं तर मी प्राण ठेवणार नाहीं. हें ऐकतांच पांडुरंगानें येऊन तुक्याला आश्वासन दिलें; व माझ्या नामाची मृत-संजीवनी तुझ्याजवळ असतां असा चिंताक्रांत कां म्हणून सांगितलें? मग विठ्ठलनामाचा गजर केल्यावर मूल जिवंत झालें व भजन करूं लागलें. तें पाहून त्याच्या आईनें तुकारामाच्या पायीं मिठी मारिली. हा चमत्कार पाहून सर्व मंडळीस आनंद झाला.

त्या दिवशीं कीर्तनांत दोघे संन्यासी होते. त्या वेळीं, नामा-सारिखें अन्य सुलभ साधन नाहीं; कोणतेंही कर्म केलें तरीं आधीं केशव, नारायण असें म्हणावें लागतें; लग्नामध्यें वधुवरांचे छत्तीस गुण मिळाले तरीं, लक्ष्मीकांताचें नामस्मरण केल्यावांचून सरत नाहीं; पितृश्राद्धें यथासांग करून शेवटीं जनार्दनस्वरूपीं अर्पण कारितात; हरिनामावांचून कर्म नाहींच; असा उपदेश चालला होता तो तेथें अस-लेल्या संन्याशांस आवडला नाहीं. शुद्राच्या तोंडचें आपण ऐकूं नये असें आपापसांत बोलून ते उठून चालते झाले.

दादूकोंडदेव या नांवाचा एक मोकासदार पुण्यास होता; त्याज-कडे त्या संन्याशांनीं फिर्याद केली कीं, तुकाराम हा शूद्र असून त्याणें भक्तिमार्ग वाढवून कर्ममार्ग बुडविला. ब्राह्मणसुद्धां त्यास नमस्कार करतात; ही गोष्ट उचित नाहीं. तूं देशाचा अधिकारी आहेस, यास्तव त्यास बोलावून शिक्षा कर; नाहींतर आम्हीं प्राण देऊं. तेव्हां दादोजीनें त्यांना सांगितलें कीं, तुम्हीं स्वस्थ असा; मी तुकारामास एथें बोलावून आणितों. मग तुमचा व त्याचा वाद-विवाद होऊं द्या; पण जो हरेल तो शिक्षेस पात्र होईल.

मग दादू कोंडदेवानें तेथील ब्राह्मणांस सविस्तर हकीगतीचें पत्र लिहून तुकारामास आणावयास शिपाई पाठविले. त्यांणीं लोहोगांवास आल्यावर ब्राह्मणांस पत्र दिलें. तें पाहतांच त्यांस चिंता उत्पन्न झाली; परंतु तुकारामानें त्यांस धीर देऊन स्वस्थ केलें. मग तुकाराम पुण्यास

जावयास निघाला. समागमें पुष्कळ मंडळी भजन करीत चालली होती. पुण्यास गेल्यावर सर्व संगमावर उतरले. तुकाराम आल्याची वदंता उठतांच लोक बायकामुलें घेऊन दर्शनास येऊं लागले. त्या वेळीं सैन्याचा तळ पडला आहे कीं काय असें वाटूं लागलें. पुण्यांत व त्याच्या आसपास सारी धामधूम कायती तुकारामाच्या दर्शनाची. तेव्हां कोणाचें सैन्य येऊन उतरलें आहे याची दादोजी सेवकांजवळ चौकशी करूं लागला, तेव्हां त्यांणीं त्यास तुकारामाचा सर्व वृत्तांत सांगितला. मग आपणही त्याचें दर्शन घ्यावें असें दादोजीच्या मनांत येऊन तो पूजा घेऊन दर्शनास जात असतां ते संन्यासी आडवे येऊन म्हणूं लागले कीं, तूं गांवचा अधिकारी असून हें तूं काय करितोस ? आमचा सर्व आधार तुझ्यावर; आणि तूं त्याच्या दर्शनास जातोस. असें ऐकून दादोजीनें त्यांची समजूत केली कीं, जनांबरोबर आम्हांस दर्शनास गेलें पाहिजे. आतां मी त्यास प्रार्थून गांवांत घेऊन येतों. तुम्हीं त्यास जिंकिलें तर मी त्यास शिक्षा करीन; व न जिंकिलेंत तर तुम्हांस करीन; ह्याचा पुरा विचार करून असा. मग मोठमोठे लोक बरोबर घेऊन त्याणें तुकारामाचें दर्शन घेतलें. तेव्हां नामस्मरणाचा एकसारखा संपाटा चालला होता व लोक लक्षपूर्वक कीर्त्तन ऐकत होते. इतक्यांत अंगास विभूति लाविलेला, तेजःपुंज, नग्न व जटाधारी असा एक पुरुष कीर्त्तनांत प्रगट झाला. त्यानें तुकारामास आलिंगन देऊन साष्टांग दंडवत घातला व आपल्या दर्शनाची फार इच्छा होती ती आतां पूर्ण झाली असें बोलून आकाशमार्गें गमन केलें. हा चमत्कार सर्वांनीं पाहिला. त्या वेळीं तो तापसी कोणाला दत्तात्रेयासारखा व कोणाला शंकरासारखा भासला. मग आरती करून खिरापती वांटल्या.

मग दादोजी कोंडदेवानें गांवांत येण्याची विनंती केली, ती तुकारामानें मान्य केली. त्यास त्यानें मोठ्या सन्मानानें नेऊन एका हवेलींत ठेविलें. त्या दिवशीं एका सावकारानें ब्राह्मणसंतर्पण केलें. दोन हजार मनुष्यें तुकारामाच्या पंक्तीस होतीं. तिसरे प्रहरीं त्याचें कीर्त्तन सुरू झालें. तेव्हां वादविवाद करण्यासाठीं दादोजीनें त्या संन्याशांस

सुचविलें. मग ते कांहीं कुटिल पंडित समागमें घेऊन तुकारामाचा पाडाव करण्यास्तव कीर्त्तनांत जाऊन बसले, मग कीर्त्तनास प्रारंभ केला. तो असा कीं, हें आयुष्य क्षणभंगुर आहे; काळ अकस्मात् घाला घालून प्राण घेऊन जाईल; यास्तव त्याच्या हातून सुटका होण्याचा मार्ग म्हटला म्हणजे परमेश्वराचें भक्तिपूर्वक नामस्मरण करणें हाच होय. तेव्हां असें झालें कीं, ते दोन्ही संन्यासी उठून तुकारामाच्या पायां पडले. असें पाहून दादोजी कोंडदेवानें त्यांस हें तुम्हीं काय कारितां म्हणून विचारिलें; व तुम्हांस मी शिक्षा करीन असेंही सांगितलें. तेव्हां ते संन्याशी म्हणाले, तुकाराम आम्हांस प्रत्यक्ष चतुर्भुज नारायणरूप दिसतो आहे; म्हणून आम्हीं त्यास नमस्कार केला. हें ऐकून त्या मोकासदारानें अधिकच संतापून तुकारामाचा विनाकारण द्वेष केला व त्याचा छळ करण्यास्तव त्यास येथवर आणविलें, ह्मणून संन्याशांचे पांच पाट काढून त्यांस गाढवावर बसवून नगरांत हिंडविण्याचा त्यानें हुकूम दिला; परंतु तसें करण्याची तुकारामानें मनाई केली. त्याचें ह्मणणें जर दादोजीनें ऐकिलें नसतें तर त्याचा हुकूम फिरविणारा दुसरा कोणी त्या गांवांत नव्हता.

एकदां अशी गोष्ट झाली कीं, दादोजी फराळ करीत असतां त्याची बायको बाहेर गेली. भाजी, मीठ इत्यादि जवळ असल्यामुळें त्याणें आपल्या हातानें भाजी घेतली. पुढें स्त्री येतांच विनोदानें ह्मणाली, हें तुह्मीं अनुचित केलें; एथें माझा अधिकार असतां तुह्मीं हात घालून भाजी कशी घेतली ? तुह्मीं लोकांस राजनीति सांगत असता, मग तुह्मींच असें विपरीत कां केलें ? तिचें हें भाषण ऐकून तो हातानें अपराध केला ह्मणून हात तोडून टाकण्यास तयार झाला. मग मोठाल्या विद्वान ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, अंगरख्याची बाही तोकडी केली ह्मणजे हात कापला असें होतें. मग त्याणें जन्मभर तसेंच केलें. तो मोठा न्यायी असे; परंतु तुकारामाचें वचन त्याच्यानें मोडवलें नाहीं म्हणून संन्यासी सुटले.

# अध्याय ३९ वा.

## तुकाराम.

तुकारामास नारायणरूप पाहिल्यानंतर संन्यासी शरण आले; याविषयीं सकल वृत्तांत दादोजी कोंडदेवानें शिवाजीराजास लिहून पाठविला. मग राजानें पुण्यास येऊन तुकारामाचें दर्शन घेतलें व नाना उपचारांनीं त्याची पूजा करून पायांवर मस्तक ठेविलें. त्या दिवशीं एकादशी होती ह्मणून कीर्त्तन लवकर सुरू झालें. शिवाजी प्रेमानें ऐकावयास बसला. तो राजा पुण्यांत असल्याचें वर्त्तमान चाकणांतील यवन अधिकाऱ्यास कळतांच त्यानें शिवाजीस धरावयास दोन हजार पठाण पाठविले. हें वर्त्तमान राजास कळतांच त्यानें तुकारामाजवळ जावयास आज्ञा मागितली. मग तुकारामानें चार अभंगांनीं पांडुरंगाचा धांवा केला; त्यांतील अर्थ असा कीं, मी स्वतः मरणास भीत नाहीं; परंतु जनाचें दुःख माझ्यानें पहावत नाहीं. यास्तव तूं हें संकट निवारण कर. मग, तूं खुशाल कीर्त्तन कर; मी रक्षण करणारा आहें असें पांडुरंगानें तुकारामास सांगितलें.

शिवाजी राजा पठाणांच्या ओळखीचा नसल्यामुळें त्यांणीं कीर्त्तनस्थानीं असलेल्या सर्व जणांस ठार मारण्याचा बेत केला. इतक्यांत असें झालें कीं, पांडुरंग शिवाजीराजाचें रूप घेऊन कीर्त्तनामधून बाहेर पडला व पळून जाऊं लागला. तेव्हां पठाणसैन्यांत कांहीं हेर शिवाजीस ओळखणारे होते त्यांनीं लागलीच, हा पहा शिवाजी पळून चालला; धरा, धांवा, मारा अशी आरोळी ठोकली; त्यासरसे ते सारे पठाण त्याच्या मागें लागले. तो शिवाजी ( विठोबा ) कांहीं वेळ दृष्टीस पडे व कांहीं वेळ गुप्त राही. केव्हां ते त्यास अगदीं जवळ पहात व धरूं जात तों दिसेनासा होई. अशा रीतीनें पठाण वीस कोस गेले. जसा, काळयवनाच्या भयानें श्रीकृष्ण मुचकुंद राजाच्या विवरांत दडून राहिला, तसा विठोबा एका कांटेऱ्या रानांत नाहींसा झाला. इतकें होईपर्यंत चंद्र मावळून अंधार पडला; पठाणांना मार्ग दिसेना; कांटे लागून त्यांचीं वस्त्रें फाटलीं; घोडे पळून गेले; व त्यांची अगदीं दुर्दशा झाली.

इकडे तुकारामाचें कीर्त्तन चाललेंच होतें. मंडळी तटस्थ होऊन अद्भुत रंग आला होता. चार प्रहर कीर्त्तन झालें. परचक्र आलेलें संतसंगतीनें निवारण होऊन राजाचें मरण चुकलें. मग राजास सिंहगडास जातांना तुकारामानें ओंजळभर लीद प्रसाद दिला; तो घेऊन राजा संतोषानें निघून गेला.

मग तुकाराम परत लोहोगांवीं गेला. तेथें कोंडोबा लोहकऱ्या या नांवाचा तुकारामाचा एक ध्रुपदी होता. त्याच्या मनांत महायात्रेस जाण्याचें येऊन त्याणें तुकारामाजवळ ही गोष्ट काढिली व वाटखर्चीचीही सोय करून देण्याचें सुचविलें. मग आसनाखालीं हात घालून एक होन काढून तुकारामानें त्यास दिला व सांगितलें कीं, तूं हा होन मोडून एक पैसा ठेवून बाकीचा सर्व खर्च कर. मग तो पैसा पुनः होन होईल. मात्र शेवटचा पैसा जतन करून ठेव व परत आल्यावर होन होईल तो आह्मांस परत दे. परंतु ही गोष्ट कोणास सांगूं नको ह्मणून सुचविलें; व तीन अंभग लिहून त्याजवळ दिले. एक काशीविश्वेश्वरास, त्यांत असें लिहिलें होतें कीं, ही अपूर्व विश्वरचना दिसते तें तुझेंच स्वरूप होय; ह्मणून तुला 'विश्वनाथ' ह्मणतात. मी वारंवार तुमच्या पायांवर मस्तक ठेवीत आहें; तर मज दीन अनाथावर कृपा करावी. दुसरा भागिरथीस, त्याचा भावार्थ असा कीं, मातोश्री, संपूर्ण तीर्थांचें स्वामित्व तुजकडे आहें; महादोषांचें निवारण तुझ्या दर्शनानें होतें; तुजमध्यें स्नान करणारांना मुक्ति प्राप्त होते; ह्मणून मी तुझ्या चरणाप्रत नमस्कार करितों. तिसरा गयेस ( विष्णुपदास ) त्याचा भावार्थ हा कीं, आपल्या हातानें पदावर पिंड दिल्यानें माझें गयावर्जन झालें; पितरांचें ऋण फिटलें; व मीपणाचें ओझें उतरलें. मग पत्र घेऊन कोंडोबा महायात्रेस गेला. वाटखर्चीची सोय असल्यानें त्यास मार्गांत कोणतीच अडचण पडत नसे. त्याचा उधळा खर्च पाहून हा द्रव्य कोठून आणितो ह्माबद्दल लोकांत नाना प्रकारच्या चर्चा होऊं लागल्या.

तो काशीस गेल्यावर भागिरथीमध्यें स्नान करून तिला ह्मणाला कीं, हे मातोश्री, सकळ तीर्थांचे स्वामिनी, तुकारामानें तुला पत्र दिलें आहे. असें ह्मणतांच त्या महापात्रांतून हात बाहेर आला. त्या हस्तां-

तील रत्नजडित कंकणाची सूर्यासारखी प्रभा फांकत होती. प्रत्यक्ष भागीरथी आली ह्मणून लोकांचीं स्नानें करण्याची धांदल उडाली. तिची पूजा करून कोणी वायनें, कोणी मोहोरा, कोणी होन हातावर ठेवीत; परंतु ती घेईना. मग कोंडोबानें तुकारामाचें पत्र उदकांत जाऊन हातांत दिलें; तें घेऊन तिनें मूठ मिटली व हात उदकांत नेला. पुढें कोंडोबानें विश्वेश्वराचें दर्शन घेऊन तुकारामाचा अभंग निवेदन केला. तो ऐकून विश्वेश्वरानें माथा डोलविला; तेव्हां मस्तकावरील बेल व पुष्पें पडूं लागलीं. मग कोंडोबा गयेस गेल्यावर वडिलांचा उतराई झाला.

पुढें यथासांग यात्रा करून कोंडोबा परत आल्यावर होन तुकारामास परत देऊं नये असें त्याच्या मनांत आलें. त्यानें लोहोगांवच्या बाहेर तुकाराम भजन करीत बसला होता, तेथें जाऊन दर्शन घेऊन पायांवर मस्तक ठेविलें; व यात्रा करून आलों ह्मणून सांगितलें. मग त्याणें होन परत मागितला तेव्हां कोंडोबानें तो मजवळून हरवला असें उत्तर दिलें. मग कोंडभट घरीं येऊन पहातो तों धोतराची गांठ तशीच आहे, पण आंत होन नाहीं; असें पाहून विस्मयांत पडला. कारण, दोन प्रहरीं स्नान केल्यावर होन नीट गांठीं देऊन मजबुतीनें बांधून ठेविल्याची त्यास पक्की आठवण होती. मग गुरुजवळ खोटें बोललों हें माझें कपट मला फळलें असें ह्मणून पस्ताव्यांत पडला.

एके दिवशीं लोहोगांवीं तुकाराम कीर्त्तन करीत असतां, नामघोषानें श्रोतेसुद्धां तल्लीन होऊन देहभान विसरले त्या वेळीं हिलाल तेल संपल्यामुळें विझून गेले. इतक्यांत तुकारामाच्या आंगचा प्रकाश पडला. कोटि सूर्यांचें तेज ज्याच्या मुगुटाला असा जो भक्तवत्सल परमात्मा, तो तुकारामाच्या हृदयस्थ झाल्यावर तेज पडलें ह्यांत काय आश्चर्य आहे? कीर्त्तन संपल्यावर पुनः अंधार पडला; व सर्व लोक देहावर आले. मग हिलाल लावितांना तेलाचीं भांडीं पाहिलीं तों तीं जशींच्या तशींच भरलेलीं होतीं; तेव्हां सर्व लोक आश्चर्य करूं लागले.

पुढें तो देहूस गेला. तेथें पांडुरंगाचें दर्शन घेऊन विनंती करूं लागला कीं, तुह्मीं आतां माझा अंगिकार करा. मला कशाची आशा

राहिली नाहीं. अवगुणांना थारा मिळून निद्रा, आळस हीं देहांत वाढलीं. असें ऐकून पांडुरंगास हंसूं आलें. मग तुझे मनोरथ पूर्ण होतील व तुझा देह काळाच्या दृष्टीस पडूं देणार नाहीं ह्मणून सांगितलें. तें ऐकून तुकारामाचा कंठ सद्गदित होऊन गेला.

एके दिवशीं तुकारामानें आळंदीस जाऊन सभामंडपांतून देवास दंडवत घातलें. तेव्हां अजानवृक्षाखालीं पक्षी बसले होते, ते तुकारामास पाहतांच उडून गेले; असें पाहून तुकारामाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तो ह्मणूं लागला, जर माझें चित्त अभेद असतें; तर पक्षी उडून जाते ना. काम, क्रोधादि षडवैरी जिंकून वैष्णव झालों; आत्मवत् जगत् भासूं लागलें; प्रेतवत् शरीर झालें; संसारास पाठमोरा झालों; हा देहघट विठोबाच्या पायांवर फोडिला; वासनेचा त्याग केला; आयुष्य न सरतां आपोआप शरिराची रक्षा होऊन पांडुरंगदीप देहांत उजळला; अशी माझी स्थिति असून मला भिऊन पक्षी उडाले ह्मणून खेद होतो. असें बोलून पांडुरंगाचें चिंतन केलें; आणि निवांत उभा राहिला. मग त्याच्या हृदयांत पांडुरंगानें प्रवेश केल्यावर त्याच्या अंगावर ते पक्षी येऊन बसले.

तुकाराम कोणास न समजूं देतां आळंदीस आला होता ह्मणून त्याचे चौदा शिष्य त्याचा शोध करीत इकडे आले. त्यांनीं हा चमत्कार पाहिल्यावर जवळ येतांच पक्षी उडून गेले. मग तेथें तुकारामानें कीर्त्तन केलें. ज्ञानेश्वरानें केलेले हरिपाठाचे अभंग गाइले. कीर्त्तन आटोपल्यावर दुसरे दिवशीं ज्ञानदेवाची आज्ञा घेऊन देहूस गेले.

हा तुकारामाचा आळंदींतील चमत्कार चिंचवडच्या चिंतामणि देवांनीं ऐकल्यावर तुकारामाचें दर्शन घेऊन कीर्त्तन ऐकण्याच्या उद्देशानें त्यास आणावयास देहूस एक मनुष्य पाठविला. त्यास तुकारामाचें कीर्त्तन ऐकून देवांचा निरोप सांगण्याचें भान राहिलें नाहीं. तो तेथें रमून गेला. तीन दिवस त्या मनुष्याची वाट पाहून चिंतामणी स्वतः देहूस जाण्यास निघाले. हें तुकारामानें जाणून कोणास न सांगतां तोही त्यास सामोरा जावयास निघाला. मार्गांत उभयतांच्या भेटी झाल्या. तुकारामाचें दर्शन झाल्यावर चिंतामणीदेवास आज

धन्य झालों असें वाटलें. मग त्यानें तुकारामाच्या चमत्कारांचें वर्णन करून, तूं कोण आहेस हें आमच्या अनुभवास आणून देऊन संशयनिवृत्ति करण्याची विनंती केली. ती ऐकून तुकारामानें आपल्या मांडीचें कातडें काढून आंत हाड, मांस, रक्त हीं नसून सर्व कापूस भरलेला आहे असें दाखविलें; तेव्हां तुकाराम मनुष्य नव्हे अशी त्यांची खात्री झाली. मग त्यास चिंतामणिदेवानें साष्टांग नमस्कार घातला. त्या वेळेस तुकाराम ह्मणाला, मी जातीचा शूद्र असून साऱ्या संतांचा सेवक आहें; असें बोलून देवाचे पाय धरिले.

मग चिंतामणिदेवानें तुकारामास चिंचवडास नेऊन तेथें त्यास तीन दिवस रहावून घेतलें. तेथें तऱ्हतऱ्हेचीं पक्वान्नें करून ब्राह्मणभोजन होई. तुकारामाच्या पंक्तीस चिंतामणिदेव भोजन करी व रात्रीस त्याचें कीर्त्तन ऐके. त्यानें तुकारामाचा उत्तम सन्मान राखून त्याची प्रीतीनें पूजा केली. मग देवास विचारून तो देहूस गेला. भागवतांत 'भक्त श्रेष्ठ' असें सांगितलें तें खरें करून दाखविण्यासाठीं तुकारामाचा अवतार होय. ह्यानें कीर्त्तनगजर करून दुर्धर काळास जिंकलें व अमर काया करून घेऊन ब्रह्मरूप होऊन राहिला. पृथ्वीवर पुष्कळ सत्पुरुष झाले; परंतु देहासुद्धां वैकुंठास जाणारा असा हा एकटा तुकाराम.

---

# अध्याय ४० वा.

## तुकाराम.

इकडे वैकुंठास श्रीहरीनें भक्तमंडळीसमवेत विचार केला कीं, तुकारामावांचून मला करमत नाहीं. विश्वोद्धारास्तव मीं त्यास मृत्युलोकीं पाठविला आहे. तो सगुणाच्या ठिकाणीं प्रीति ठेवून रात्रंदिवस कीर्त्तन करितो. आतां त्यास कोण घेऊन येईल? कळीकाळ त्याचे अंकित झाले; त्यांची सत्ता त्यावर चालत नाहीं. त्याचाही हेतु तेथेंच राहण्याचा आहे. घरीं येण्याची त्याची मर्जी नाहीं; तर कसेंही करून त्यास आणिला पाहिजे. तेव्हां भक्तांनीं सांगितलें कीं, त्याचें तेथून मन विटविलें पाहिजे. ही भक्तांनीं काढिलेली युक्ति श्रीहरीस

मानवली. मग लोहोगांवचे लोक तुकारामाच्या पूर्ण नादीं लागले आहेत, ते त्याची सेवा करून संपत्तिवान झाले आहेत व संसार व परमार्थ साधण्यांत गुंतले आहेत; त्यांचें संसारावरचें मन उपद्रव देऊन उडविल्याशिवाय ते एथें यावयाचे नाहींत; व तोही विटणार नाहीं असें मनांत आणिलें.

लोकांनीं देहूहून लोहोगांवास तुकारामाला नेलें. एक महिना कीर्तनगजर चालला; इतक्यांत श्रीहरीच्या सत्तेनें लुटारूंनीं सर्व गांव लुटून भिकेस लाविला. मग ज्यांना बोध पुरा ठसला होता, ते तळमळले नाहींत; पण प्रपंच व परमार्थ या दोहींकडे ज्यांचें चित्त, ते मात्र उद्विग्न होऊन हळहळूं लागले. तेव्हां, होणार तें होऊन गेलें, त्याची खंति कां करितां? हा देह देखील आपला नव्हे, मग द्रव्य तरीं कोणाचें आहे? असें तुकारामानें सांगितलें. असा गांवकऱ्यांस उपदेश केल्यानंतर तुकाराम पांडुरंगास ह्मणाला, मला आतां वैकुंठास ने. एथें ठेवशील तर तुला तुझ्या भक्तांची शपथ आहे; असें बोलून देहूस गेला. तेव्हां लोहोगांव लुटल्यानें कितीएकांचें मन उदास झालें होतें. ते संसारास लाथ मारून तुकारामाच्या मागोमाग देहूस गेले. दुसरेही गांवोगांवचे लोक आले. तेथें नित्य कीर्तन होई. नवीन प्रासादिक अभंग ऐकण्यांत येत. ताल, सूर, ध्रुपद धरण्यास चौदाजण तुकारामाच्या मागें असत.

इकडे वैकुंठास श्रीहरीनें लक्ष्मीशीं तुकारामास नेण्याची मसलत केली. मग गरुडाबरोबर विमान पाठवून त्यास दिव्य देह करून आणविण्याचें लक्ष्मीनें सुचविलें. तेव्हां श्रीहरीनें तिला सांगितलें कीं, माझ्या मनें तुकारामास देहासुद्धां आणावा. कांकीं, कृष्णअवतारामध्यें मीं निजधामास येतेसमयीं उद्धवाची सगुणीं प्रीति जडल्यामुळें तो परत येईना; असें पाहून मीं त्यास उपदेश करून बदरिकाश्रमास पाठविलें. मग आम्हीं निजधामास आल्यावर कलीचा अंमल बराच बसला; पाप वाढून भक्तिमार्गाचा लोप झाला; यज्ञयागादि सत्कर्मं राहिलीं. मग मृत्युलोकीं माझी कीर्त्ति गाऊन जगदुद्धार करण्यासाठीं अवतार घेण्याची मीं उद्धवास आज्ञा केली. तेव्हां, मी आतां गर्भवासास

कंटाळल्यामुळें वैकुंठ सोडून मृत्युलोकीं जात नाहीं; असें त्याचें ह्मणणें पडलें. मग मी त्याचा आग्रह पुरविण्याचें कबूल केलें व गर्भवास केल्याशिवाय ह्मणजे त्यास शिंपल्यांत घालून तो चंद्रभागेंत सोडून दिला. दामशेट शिंपी व त्याची पत्नी गोणाई ह्यांनीं आमची सेवा केल्यावरून मी त्यांस प्रसन्न झालों; तेव्हां त्यांणीं पुत्र मागितला. मग मी दृष्टांत देऊन कळविलें कीं, चंद्रभागेंत एक शिंपला वहात येईल त्यांत एक मुलगा असेल; तोच उद्धवाचा अवतार, त्यास काढून नेऊन लालनपालन कर ह्मणून कळविलें. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दामशेट चंद्रभागेतटीं बसला व वहात आलेल्या शिंपल्यांतून मुलगा काढून घरीं घेऊन गेला. तीं उभयतां त्यावर अत्यंत प्रीति करीत. मग बारावे दिवशीं मुलास पाळण्यांत घालून नामदेव असें त्याचें नांव ठेविलें. मी पुंडलिकासाठीं पांडुरंग अवतार घेतला; पण नामदेवावर प्रीति बसली. सातवे वर्षीं त्याणें नैवेद्य देवळांत आणलेला मीं भक्षण केला व त्याजबरोबर बोललों. पुढें मजपाशीं मागून ज्ञानदेव त्यास घेऊन तीर्थास गेला. त्या नामदेवाचा छळ करून यवनानें त्याच्यासमोर गाय मारिली, ती मीं उठविली; व त्यास संकटांतून सोडविलें. पुढें मारवाडांत नामदेव ज्ञानदेवासह आल्यावर त्यांस तहान लागली. तेथें विहीर होती; पण तिचें पाणी खोल होतें. तेव्हां ज्ञानदेव योगसामर्थ्यानें घुंगुरुट होऊन त्या विहिरीचें पाणी पिऊन वर आला; पण नामदेवास ती युक्ति येईना. त्यानें माझा धांवा करतांच विहीर तुडुंब भरून पाणी वाहूं लागलें. आंवढ्यानागनाथास शिवरात्रीच्या दिवशीं कीर्त्तन करीत असतां नामदेवास ब्राह्मणांनीं मनाई करून बाहेर काढिल्यावर तो देवालयाच्या मागें कथा करूं लागला; मग मीं सर्व पाषाणाचें देऊळ फिरविलें तें अद्याप तसेंच आहें. त्याच्या गरिबीमुळें मी राजाईजवळ गोणभर होन दिले, ते त्यानें वांटून टाकले. त्यानें शंभर कोटि प्राकृत अभंग करण्याचा पण केला. चौऱ्याण्णव कोटि एकुणपन्नास लक्ष कविता झाली. त्याचा पण शेवटास गेला नाहीं; म्हणून त्याचाच अवतार हा तुकाराम होय. यानें ब्रह्मरूप काया करून घेतली. तूं मृत्युलोकीं अवतार घे, तुला जन्ममरण नाहीं; असें मीं पूर्वी उद्धवास

वचन दिलें आहे. आतां त्या उद्धवाचा अवतार नामदेव व त्याचा तुकाराम ह्मणून यास देहासुद्धां वैकुंठास आणिलें पाहिजे; असें लक्ष्मीस सांगून भक्तमंडळीसह श्रीहरि विमानांत बसून देहूक्षेत्रास येऊन पोंचले. त्या वेळीं जगज्जिवनानें तुकारामास पोटाशीं धरिलें व तुझ्यावांचून वैकुंठपुरी ओसाड वाटते; तूं कीर्त्तन करून सुकीर्त्ति केलीस; सर्व जिवांना तरणोपायासाठीं हेंच साधन होय असें सांगितलें.

फाल्गुन शुद्ध एकादशीस वैकुंठनाथ तुकारामास न्यावयास आले. तेव्हां रुक्मिणीनें विनंती केली कीं, इंद्रायणीच्या तीरीं वैकुंठीची रचना आणून तुकयास भोजन द्यावें. ज्याप्रमाणें नामदेवानें अघटित आळ घेतल्यावरून ज्ञानदेवाच्या समाधिसमयीं सोहळा केला त्याप्रमाणें एथें करावा. हें तिचें ह्मणणें श्रीहरीनें कबूल करून योगमायेचें चिंतन केलें. मग विश्वकर्म्यानें वैकुंठपूर निर्माण केलें. अष्टसिद्धि हात जोडून साहित्य करण्यास तयार झाल्या. तें कौतुक पहावयास देव आले. हा सुखसोहळा पाहून योग्यांचीं ध्यानें राहून गेलीं. ते तुकारामाची वाहवा करूं लागले. उद्धव, अक्रुर, अंबऋषि आदिकरून वैकुंठीं रहाणारे हे दिव्य देह धरून तुकारामाच्या पंक्तीस भोजनास बसावयास आले. नारद, तुंबर, शुकयोगी, सिद्धसनकादिक मंडळीही येऊन पोंचली. तेव्हां श्रीहरीनें भक्तांची पूजा केली. लक्ष्मी वाढीत होती. देवांनीं पुष्पांचा वर्षाव केला. हा सोहळा पांच दिवस सारखा चालला होता; परंतु तुकारामावांचून कोणास कळला नाहीं.

तुकारामाचें नित्य कीर्त्तन चाललें होतेंच. एवढा मोठा शिमग्याचा सण, पण तो कीर्त्तन ऐकण्यांत झटकन गेला. फाल्गुन वद्य प्रतिपदेच्या रात्रीस वैकुंठनायकानें तुकारामास सांगितलें कीं, आज सारी रात्र कीर्त्तन करून उदईक आमच्यासमागमें वैकुंठास चलावें; असें बोलून पोटाशीं धरिलें व तुजवांचून माझी बरोबरी करणारा कोणी नाहीं ह्मणून सांगितलें. शरिराचें व प्राणाचें तूं मला बळिदान दिलेंस; काम, क्रोधादिकांना बंदींत घालून चंचळ मन आंवरिलेंस; भजनीं प्रीति धरिलीस; तूं दर अवतारांतील माझा जिवलग मित्र आहेस; तुझा उतराई होण्याचा मार्ग मला दिसत नाहीं; तूं महासिद्धींस लाथा मारून दूर का-

ढिलेंस; मुक्ति तुला नको; यास्तव उदईक देहासुद्धां तुला वैकुंठास नेतों असें सांगितलें. हें ऐकून तुकारामानें श्रीहरीचे पाय धरून ह्मटलें कीं, देवा, वैकुंठास नेऊन मला एके कोंपऱ्यांत ठेवशील; आणि माझी तर इच्छा रात्रंदिवस कीर्त्तन करण्याची. एथें भूवैकुंठ (पंढरपूर) असतां मला इतका दूर नेऊं नकोस. तेव्हां लक्ष्मीकांत ह्मणाले कीं, तूं एकदां तेथपर्यंत चल; तेणेंकरून सत्कीर्त्ति प्रगट होईल. जसा मी चराचरीं व्यापक तसाच तूं समज. ह्या लोकीं निरंतर राहिल्यानें लोकांची पूर्णपणानें तुजवर आस्था बसणार नाहीं; ह्यास्तव आग्रह सोडून मजबरोबर चल. मग वैकुंठास जावयास तुकाराम कबूल झाला. नंतर तुकारामाचें उत्तम कीर्त्तन सुरू झालें. तें ऐकून श्रोते विस्मित झाले. विमानांतून देवही कीर्त्तन ऐकत होते. कपिलमुनीसारखे ब्रह्मज्ञानाचे निवळ पुतळे तुक्याचें प्रेमळ कीर्त्तन ऐकून लाळ घोंटूं लागले. जो तिन्हीं देवांचा अवतार जीवन्मुक्त जगद्गुरु दत्तात्रेय तोही कीर्त्तन ऐकूं लागला. तपस्व्यांचा मुगुटमणी जो शंकर तो देखील कीर्त्तन ऐकून तटस्थ झाला. यज्ञयाग करून सर्व सुख भोगणारे कीर्त्तन ऐकून समाधान पावले. स्वर्ग सोडून मृत्युलोकीं राहून कीर्त्तन ऐकण्याची आपली इच्छा इंद्रानेंसुद्धां गुरूस कळविली. तुकारामानें ब्रह्मरूप काया केल्यामुळें सनकादिकांसुद्धां एकंदर मंडळी त्यास वाखाणूं लागली.

कीर्त्तन संपतांच तुकारामानें विठ्ठलनामाचा गजर केल्यावर वैकुंठनायकानें त्यास विमानांत बसून वैकुंठास येण्यासाठीं सांगितलें. मग त्यानें देवाच्या पायांस मिठी मारली. पूर्वी त्यानें अकरा अभंगांनीं आपल्या स्त्रीस उपदेश करतेवेळीं वैकुंठास नेण्याचें कबूल केलें होतें ह्मणून तिला निरोप पाठविला कीं, आह्मीं वैकुंठास जात आहों; तर समागमें चलावें. पण तिणें सांगून पाठविलें कीं, मी पांच महिन्यांची गरोदर आहें; घरीं दुभती म्हैस असून पोरें लहान लहान आहेत, त्यांचा कोण सांभाळ करील? हा निरोप ऐकून मायेच्या अनिवार सत्तेचें तुकारामास आश्चर्य वाटलें. परंतु ह्यांत जिजाईचाही अन्याय दिसत नाहीं. कारण, तुकारामाची अशी वहिवाट होती कीं, कोठें जाऊं लागला कीं, 'मी वैकुंठास जातों' असें तो तिला व सर्वांना सांगे. तेव्हां त्याच

प्रमाणें कोठें बाहेरगांवीं जात असेल या समजुतीवर ती गेली. त्यानें, आह्मीं वैकुंठास जातों; पुनः परत येणार नाहीं; असें सर्वांना सांगितलें. तें ऐकून सर्व मंडळी उदास होऊन रडूं लागली. पण तुकाराम देहासुद्धां वैकुंठास जाणार ही कल्पना कोणाच्याही मनांत आली नाहीं. तीर्थाटणास जात असतील असेंच वाटलें. कोणी हिमाचल पर्वताची, कोणी बदरिकाश्रमास जात असल्याची, कोणी काशीस जाण्याची, अशा अनेक कल्पना लोकांच्या मनांत आल्या. मग तुकाराम कीर्त्तनगजर करीत देवळाच्या बाहेर आले, ते इंद्रायणीच्या तटीं गेले आणि ह्मणाले कीं, मीं मोहपाश तोडलाच आहे व सर्व संसारसुखें तुच्छ मानिलीं आहेत. एका श्रीहरिवांचून मी कांहींच इच्छित नव्हतों. त्याची मला प्राप्तीही झाली आहे. आतां कशाची चिंता व कोणतेंही भय मनांत बागविण्याची गरज नाहीं. तो केव्हांपासून मला नेण्याकरितां वाट पहात उभा राहिला आहे; त्याजबरोबर मीं आतां देहासुद्धां वैकुंठास जातों. मजवर आतां सर्वांनीं कृपा ठेवावी हीच विनंती आहे.

इतकें ह्मटल्यावर असें अद्भुत कौतुक झालें कीं, विमानांतून सर्व देव परमानंदानें जयजयकार करूं लागले. नारद, तुंबर गायन करूं लागले. पार्वतीसमवेत शंकर आले. ब्रह्मदेव, विष्णु, रुद्र, कौतुक पहात होते. गंधर्व, अप्सरा यांनीं गाणीं गाइलीं. दत्तात्रेय, कपिल आदिकरून ऋषि; यक्ष, किन्नर इत्यादि मागच्या युगांतले थोर थोर भक्त; व कलियुगांतलें सर्व संत विमानांतून कौतुक पहात होते. त्यांना तुकारामाची काया ब्रह्मरूप दिसूं लागली. ते ह्मणूं लागले कीं, ह्या नामधारकानें मृत्युलोकीं अवतार घेऊन कीर्त्तन करून विश्वोद्धार केला.

तुकारामाच्या बरोबरच्या मंडळीचे पुष्पक विमानाच्या तेजानें डोळे दिपून गेले व त्यांस कांहीं दिसेनासें झालें. अशा संधींत तुकाराम विमानांत बसून वैकुंठास चालला. गगनांत घंटानाद होऊं लागला. गंधर्व गायन करूं लागले. पुष्पकाचा प्रकाश दूर होतांच लोक डोळे उघडून पाहूं लागले तों तुकाराम कोठें दिसेनासा झाला. त्या वेळेस सर्व लोक बोलबोलतां हातांतून रत्न गेलें ह्मणून शोक करूं लागले.

जिजाबाईस ही गोष्ट कळतांच तीही ऊर बडवित तेथें आली. सं-

पूर्ण लोक शोकसागरांत बुडून गेले. श्रीकृष्णाच्या वियोगानें गोकुळवासी लोकांच्या शोकाप्रमाणेंच या वेळीं सर्वांना झालेला शोक आवरेना. शके पंधरांशें एकाहत्तर, विरोधीनाम संवत्सर, फाल्गुन वद्य द्वितिया रोजीं प्रातःकाळीं चार घटका दिवसास जगद्गुरु वैष्णवभक्त तुकाराम देहासह वैकुंठास गेले.

बोलावूं पाठविलें असतां गेले नाहीं ह्मणून अवलीनें फार शोक केला. जर निदान कळलें असतें, तर मी त्याचा पदर धरून गेलें असतें; अशा प्रकारच्या भाषणांनीं तिनें अति विलाप केला. तिला मूर्च्छा येऊन ती जमिनीवर पडली. दोघे मुलगे महादेव व विठोबा यांणींही रडून डोळे सुजविले. परत येईल या आशेनें सायंकाळपर्यंत लोक तेथेंच बसून राहिले होते; शेवटीं निराश होऊन घरोघर गेले. मग पंढरिनाथानें तुकारामास देहासुद्धां विमानांत बसवून वैकुंठास नेल्याची आश्चर्यकारक वार्ता देशोदेशीं पसरली.

इकडे देहूमध्यें ज्या ठिकाणीं तुकाराम गुप्त झाला त्या ठिकाणीं तुकारामाचा भाऊ कान्हया, रामेश्वरभट, गंगाजी मवाळ कडूसकर, कोंडोबा लोहकऱ्या, संताजी तेली जगनाड्या व दुसरे नऊ असे चोंदाजण घरीं न जातां सद्गुरु दर्शन न देतील तर प्राण ठेवायाचा नाहीं या इरादानें तेथेंच बसून राहिले. त्या वेळीं कान्हयानें फार शोक केला. ते सद्गुरूच्या दर्शनाच्या आशेनें निर्धार करून इंद्रायणीच्या तटीं तीन रात्रंदिवस बसून राहिले. तों पंचमीच्या प्रातःकाळीं असें अत्यद्भुत चरित्र घडून आलें कीं, तुकारामाच्या हातांतील टाळ आणि पांघरावची गोधडी आकाशांतून खालीं पडली. तेव्हां सद्गुरु वैकुंठवासी झाल्याचा निश्चय करून ते सर्व स्नान करून देवालयांत गेले.

टाळ व गोधडी हींच तुकाराम असें समजून लोक लांबलांबून सुद्धां दर्शनास येऊं लागले. आतां, पुढें कसें काय करावयाचें; पुण्यतीथ कोणती वगैरे रामेश्वरभटास शास्त्रार्थ विचारिला. तेव्हां तो ह्मणाला, तुकाराम क्रियाकर्मरहित आहे. त्यानें एथें देह ठेविला असता, तर क्रियाकर्मांतर करण्याचा अधिकार होता. एथें देह न ठेवितां तो फाल्गुन वद्य द्वितियेस श्रीविष्णुलोकास गेला. परंतु टाळ व गोधडी आप-

त्यास निरोप सांगण्यासाठीं आज पंचमीस आल्यामुळें आजचा सुदीन समजून उत्सव सुरू करा व कीर्त्तनास आरंभ करा. आणखी ह्मणाला, अनिवार वैष्णवीमायेचें तुकारामापुढें कांहीं चाललें नाहीं. तो देहींच विदेहत्व पावून ब्रह्मरूप काया करून निघून गेला. नामदेवाचा अवतार तुकाराम याणें जनांस लीला दाखवून भक्तिमार्गाचा जीर्णोद्धार केला. असें रामेश्वरभटानें कळवितांच सर्वांनीं जयजयकार केला. मग उत्सवास प्रारंभ झाला. कीर्त्तन, ब्राह्मणसंतर्पण सुरू झालें. तीन दिवस उत्सव होत होता.

तुकाराम वैकुंठवासी झाले त्या वेळीं त्याची बायको अवली ही गरोदर होती. नऊ महिने भरल्यावर प्रसूत होऊन पुत्र झाला; त्याचें नांव नारायण ठेविलें. तो मोठा झाला तेव्हां शिवाजी राजा त्याच्या दर्शनास गेला. मग त्यानें चार गांव इनाम देऊन विठोबाच्या देवालयाची दुरुस्ती केली. पुढें नारायण विरक्त होऊन घर लुटवून द्वारकेस गेला. तेथून तो काशीस गेला. त्यानें स्वतः भागिरथीच्या अकरा कावडी नेऊन रामेश्वराची पूजा केली. तो नारायणबावा कीर्त्तन करीत असे; तेव्हां तो तुकारामाचे अभंग ह्मणे. त्याचे दोघे बंधु वडील, पण तेही त्याच्या आज्ञेंत असत.

भाविकांना अद्यापि तुकारामाचें दर्शन होतें. कान्हयाला झालें. कानडा लिंगाईत वाणी गबाशेट यासही झालें. हा सुदउंबऱ्या गांवांत रहात होता. तो विरक्त असे. त्यानें तुकारामाची पुष्कळ सेवा केली, व मला अंतकाळीं दर्शन द्यावें ह्मणून विनंती केली होती. तुकारामानें त्याचें प्रेम पाहून मनोरथ पूर्ण करण्याचें कबूल केलें होतें. तो ही गोष्ट कोणा कोणाजवळ अंतस्थ बोलत असे. पुढें अंतसमयीं त्याणें देहूस मनुष्य पाठवून रामेश्वरभट, कान्हया व नारायणबावा यांस बोलावून नेलें. त्यांची सर्वोपचारांनीं पूजा केली; इतक्यांत तुकारामही तेथें आले. त्यांस वाण्यानें नमस्कार करून, बुका लावून, व गळ्यांत पुष्पांचा हार घालून, पतितास कृपा करून दर्शन दिलें असें ह्मटलें; तेव्हां सर्वांस आश्चर्य वाटलें. परंतु अधांत्रीं पुष्पांचा हार सर्वांना दिसत होता. तेव्हां नामघोष करून सर्वांनीं

जयजयकार केला. मग पांडुरंगाचें नामस्मरण करून वाण्यानें प्राण सोडिला. रामकृष्ण अवतार संपले असतांही, त्यांचीं दर्शनें होतात; तद्वत् तुकारामाचें अद्यांप भाविकांस दर्शन होतें.

---

# अध्याय ४१ वा.

## केशवस्वामी, बाजीद पठाण, संतोबा पवार व मालोपंत.

### केशवस्वामी.

हा विजापुरास रहात असे. भक्ति, ज्ञान, वैराग्य हीं तिन्हीं याजमध्यें परिपूर्ण होतीं. तो पांडुरंगाची उपासना करी. त्याची सर्वांभूतीं समदृष्टि असे. तो कविता करी, ती बहुतकरून कीर्त्तनांत ह्मणे. तो पंढरीची वारी नेमानें चालवित असे. त्याची जनांत प्रतिष्ठा फार वाढली; तेणेंकरून त्याचें मन संसारावरचें उडालें. मग कृष्णातीर्थीं स्नान करावयास जावें असें त्याच्या मनांत येऊन तो कोणास न विचारितां अर्ध रात्रीस भजन करीत चालला. त्या वेळेस असा चमत्कार झाला कीं, पंढरीनाथ बालकरूपानें त्याच्या खांद्यावर बसले. ही गोष्ट केशवस्वामीच्या लक्षांत आली नाहीं; परंतु एक कुणबी शेतांत माळ्यावर बसला होता, त्याणें तें बालक पाहिलें. त्या समयीं त्याचें मन वेधून गेलें. तें दिसेनासें झाल्यावर त्याला चुटपुट लागली; त्यास अन्न, उदक गोड लागेना. केशवस्वामीनें कृष्णातीरीं जाऊन स्नान केलें व तीन रात्री तेथें राहिला. परत येतांना तो कुणबी मार्गावर केशस्वामीची वाट पहात होताच; त्यानें त्यास तुमच्या खांद्यावर जातांना मूल होतें तें कोठें आहे ह्मणून विचारिलें. तें ऐकून त्यास विस्मय वाटला. त्यानें त्यास उत्तर दिलें कीं, मीं तें मूल पाहिलें नाहीं; व खांद्यावर घेतलेंही नव्हतें. मग विस्मित होऊन तो अरण्यांत गेला आणि एकाग्र मन करून डोळे झांकून ह्मणूं लागला कीं, देवाधिदेवा पंढरीनाथा, मी निरंतर तुझी सेवा करीत असतां मला अझूनपर्यंत दर्शन न देतां बालकरूप धरून माझ्या खांद्यावर बसून तो रानवट कुणबी

माळ्यावर बसला होता त्यास तूं दर्शन दिलेंस. तुझी चालच आहे कीं, जो तुला भजेल त्याच्यापासून दूर रहावयाचें; आणि द्वेष करणाऱ्याच्या समोर असावयाचें! हें तुझें स्वभाविक लक्षण आहें; तर मला दर्शन दे. तूं न आलास तर मी प्राण देईन. त्या वेळेस पांडुरंगानें त्यास साक्षात् दर्शन देऊन सांगितलें कीं, तूं कृष्णातीरीं जात असतां मीच खांद्यावर बसलों होतों; परंतु तुला देहभान नसल्यामुळें मी तुझ्या दृष्टीस पडलों नाहीं. आतां तूं विजापुरास गेल्यावर कीर्त्तन करीत जा. असें सांगून पंढरीनाथ अंतर्धान पावले. मग तो विजापुरास आला; तेणेंकरून तेंथील भाविक जनांस अत्यानंद झाला.

त्या संधीस असा एक चमत्कार झाला कीं, तेथें एक सावकार होता, त्याणें पन्नास हजार रुपये खर्च करून मोठा वाडा बांधिला. मग गृहशांति करून भोजन, दानें वगैरे देऊन ब्राह्मण संतुष्ट केले. त्या घरांत दोन ब्रह्मराक्षस होते. ते त्या सावकारास वाड्यांत निजूं देत नसत. जर का कोणी निजला तर बाहेर नेऊन टाकीत. ह्यास्तव तो सावकार तें घर सोडून मुलांमाणसांसह जुन्या घरांत जाऊन राहिला. त्यानें ते ब्रह्मराक्षस निघण्यासाठीं अनुष्ठानें, जप, मंत्र, आदिकरून अनेक उपाय करून पाहिले. मंत्र मंत्रून विभूति पंचाक्षरी बाहेरून टाकीत; पण घरांत गेले तर त्यांची मोट बांधून ते ब्रह्मराक्षस बाहेर झुगारून देत. पुढें केशवस्वामी कीर्त्तन करून ब्रह्मराक्षसांस बाहेर घालवितील अशी त्याची कोणीं सावकारापाशीं शिफारस केली; त्यावरून त्यानें त्या हवेलींत कीर्त्तन करण्याविषयीं केशवस्वामीस विनंती केली. ती स्वामीनें आनंदानें कबूल केली. मग तो कीर्त्तन करण्यासाठीं त्या हवेलींत जात असतांना मुखानें भगवंताचें नामस्मरण चाललेंच होतें. त्या वेळीं ते ब्रह्मराक्षस हात जोडून पुढें आले, व तुमच्या दर्शनानें आमचा उद्धार झाला, असें बोलून अदृश्य झाले. हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. कीर्त्तनास, इतकी गर्दी झाली होती कीं, पाय ठेवण्यास जागा नव्हती. नामस्मरणाच्या योगानें सर्व लोक तन्मय होऊन राहिले. मग सावकारानें सहस्रभोजन घातलें; आणि मुलांमाणसांसुद्धां तो वाड्यांत जाऊन खुशाल राहिला.

## बाजीद पठाण.

हा विजापुरच्या बादशाहाकडे एका फौजेचा अंमलदार होता. त्याच्या ताब्यांत पंचवीस हजार फौज होती. तो लढाईस गेला कीं, विजयी होऊन यावयाचाच. त्याच्यासमोर शत्रू लढाईस उभा राहात नसे. एकदां तो हिंदुस्थानांतून पुष्कळ संपत्ति घेऊन परत येत असतां, उंटावर खजिना घातला होता त्याचा भार सहन न होऊन तो उंट उरीं फुटून मरण पावला. मग खजिना खालीं ठेवून सारवान राखीत बसले. मागाहून बाजीद पठाणाची स्वारी सर्व सेनेसह आली. त्यानें सारवानांस तेथें बसण्याचें कारण विचारितांच त्यांनीं उंट मेल्याचें वर्त्तमान सांगितलें. तेव्हां पठाण ह्मणाला, मला तर तो उंट आहे तसाच दिसतो; त्यांत मेलं तें काय? उठवा त्याला! हें ऐकून सारवानांनीं त्याच्या भीतिस्तव चार मेढी रोवून त्यावर उंटाचें प्रेत ठेविलें व वर खजिना घातला. मनुष्य मरतें कसें हा अनुभव बाजीद पठाणास नव्हता. कारण, जन्मल्यापासून त्यास मरणाचें दुःख ठाऊक नव्हतें. आईबाप, बायकामुलें, वगैरे कुटुंबाचीं सर्व मनुष्यें हयात होतीं. पूर्व पुण्याईच्या योगानें मृत्यूविषयीं त्याणें ऐकलेंच नव्हतें. असो.

त्याणें सारवानांस उंट चालविण्याकरितां सांगितल्यावर ते ह्मणाले कीं, आंतील चैतन्य निघून गेलें. तरी प्रेतावर खजिना घातलेला आहे; पण तो चालावयाचा नाहीं. चौऱ्यायशीं लक्ष देहांची हीच अवस्था. मरण कोणालाही चुकवितां यावयाचें नाहीं. असें ऐकतांच बाजीद पठाणास अनुताप झाला. त्याणें सर्व सैन्याचा पगार चुकवून उरलेलें द्रव्य वांटून टाकलें व अगदीं बैरागी होऊन राहिला. शुद्ध सात्विक वैराग्याचें लक्षण त्याच्यांत पूर्ण बिंबलें.

तो विजापुरास आल्यावर केशवस्वामीस शरण गेला व त्याचा अनुग्रह संपादन करून श्रीरामाचें भजन करूं लागला. त्याणें यवनीभाषेत बोधपर साख्या, पदें वगैरे कविता केल्या आहेत. तो कीर्त्तनही करी, त्यावरून त्याची कीर्त्ति फार वाढली. पुढें त्यास पांडुरंगाचा साक्षात्कार झाला.

## संतोबा पवार.

हा रांजण गांवचा रहाणारा. तो दोनशें स्वारांच्या तुकडीचा एक शिवाजी राजाचा सरदार होता. तो शूर असे. त्यास कांहीं गांव राजानें जाहगीर दिले होते. त्यास संतान नव्हतें. त्याची स्त्री येसुबाई, ही सद्गुणी असून पतीच्या मर्जीबाहेर वागत नसे. तिणें संतति व्हावी ह्मणून दुसरी स्त्री करण्यासाठीं पतीला सांगितलें. तें ऐकून त्याणें तिला उत्तर दिलें कीं, त्या योगानें तुझ्या माझ्या प्रीतींत अंतर पडेल. माझ्या भावाचे दोन मुलगे आहेत ते आपल्याच मुलांसारखे वागीव ह्मणजे झालें; अशी त्याणें तिची युक्तीनें समजूत केली. मग तीं उभयतां त्या मुलांवर विशेष प्रीति करूं लागलीं. मुलांना लिहिणें शिकविण्यासाठीं एक पंतोजीही घरीं ठेविला.

एकदां मुलें काय शिकतात तें पहाण्यासाठीं संतोबा पंतोजीजवळ गेला. त्या वेळीं तो स्नान करून मानसपुजेस बसला होता. तेव्हां हा काय वडबडत आहे, ह्मणून संतोबानें विचारल्यावर सद्गुरूनें सांगितलेला जप करीत आहें ह्मणून उत्तर दिलें. हें ऐकून तो मंत्र मला सांगा असा संतोबानें आग्रह धरिला. असें पाहून पंतोजीनें सांगितलें, मी तुमचा नोकर आहें; उपदेश देण्याजोगी माझी योग्यता नाहीं; ह्यास्तव एखाद्या मोठ्या सद्गुरूपासून अनुग्रह घ्या. पण देह अशाश्वत, मन अस्थिर जाणून लागलेंच त्यानें पुजेचें साहित्य आणवून पंतोजीची पूजा करून त्यास गुरु केला. त्यास वस्त्रें-भुषणें दिलीं; सहस्र ब्राह्मणभोजनाची समाराधना घातली; व कीर्त्तन करविलें. नंतर एक मंदिर बांधून त्यांत गुरूस ठेविलें. बदोस्तीस्तव आचारी, पाणके, दासी नेमून खर्चास लागेल तितकें द्रव्य देण्याचा कारभाऱ्यास हुकूम केला, व मुलांना शिकविण्यास दुसरा पंतोजी ठेविला.

पुढें संतोबा लढाईवर गेला. तेव्हां त्यानें सद्गुरूचा समाचार घेण्यासाठीं आपल्या स्त्रीस ( येसूबाईस ) सांगून ठेविलें होतें; ह्यामुळें तिणें त्याचें उणें पडूं दिलें नाहीं. त्याची दागदागिन्यांची, कपड्यालत्याची, जेवणाखाणाची व राहण्याची सोय तर उत्तम झाली; पण स्त्री नसल्यामुळें त्याचें चित्त उद्विग्न होई. तो तरुण

असून सर्व उपचार होऊं लागल्यानें मदनानें त्याच्या देहांत पक्का अंमल बसविला. मग सेवेस दिलेल्या दासीशीं त्याचें सूत जमलें. पुढें ही गोष्ट हळूहळू कारभाऱ्यांच्या कानावर गेली. मग, संतोबा भोळा पडला, पंतोजीचें ऋण लागत होता तें फेडतो आहे; असें अनेक प्रकारांनीं ते बोलूं लागले. त्यांणीं ही गोष्ट येसुबाईच्या कानावर घातली; पण तिणें लक्ष न देतां त्यांसच फजीत केलें.

संतोबा पवार एक वर्षानें घरीं आला व सद्गुरूचें दर्शन घेऊन समाधान पावला. दुसरे दिवशीं त्यानें गुरूची पूजा करण्याची तयारी केली; त्या वेळीं गुरूच्या दुर्वर्त्तनाची गोष्ट कुटिल लोकांनीं पवाराच्या कानावर घातली. ती ऐकून त्यानें त्यांची समजूत केली कीं, सद्गुरु पिता आह्मीं जोडिला होता; परंतु त्याजबरोबर पुजावयास माता नव्हती. आतां फार चांगली गोष्ट घडून आली आहे; असें बोलून त्यानें उभयतांची पूजा करून त्यांस वस्त्रें, अलंकार देऊन गौरविलें. ह्या करण्यानें निंदकांचीं तोंडें बंद झालीं.

संतोबाची निःसीम भक्ति पाहून पंढरीनाथ संतोष पावला. मीच सद्गुरुरूप मानून ह्यानें यथासांग गुरुपूजा केल्यामुळें यास आतां वैराग्ययुक्त निःसीम भक्ति अर्पावी असें जगज्जिवनानें मनांत आणिलें. पुढें त्याणें कीर्त्तनांत तुकोबाचे दोन अभंग ऐकिले. तेव्हां संसाराचा त्याग करून पांडुरंगास भजावें असें त्याच्या मनांत भरलें. त्यावरून त्याणें सर्व संपत्ति लुटाविली; आणि फाटकें नेसून भजन करूं लागला. त्याची स्त्री त्याच्या मागून गेली; तिला त्याणें संसारसुख सोडून येण्याचें कारण विचारिलें, तेव्हां तिनें ह्मटलें कीं, शरिराच्या छायेप्रमाणें मीं तुमच्या पायाशीं जडलें आहें; मला जाण्यास कोठें जागाच नाहीं. हें ऐकून महान वैराग्यशील व अंतरसाक्षी संतोबा तिला ह्मणाला कीं, आह्मीं अन्न न खातां झाडाचा पाला खाऊन राहणार; तसें तुला रहावें लागेल! असें ऐकतांच तिनें लागलेंच सर्व अंगावर होतें नव्हतें तें सर्व उतरून टाकलें व फाटकें धोतर नेसून ती संतीण बनली. मग त्यांनीं तीन दिवस अन्नपाण्यावांचून काढिले, तेव्हां पांडुरंगानें त्यांस दर्शन दिलें; व आलिंगन देऊन सांगितलें

कीं, मी निरंतर तुमच्या हृदयांत आहें; खंती करूं नका. भिक्षा मागून निर्वाह करावा व रात्रंदिवस भजन करून कालक्षेप करावा; असें सांगून श्रीहरि अंतर्धान पावले.

## मालोपंत.

या साधूचें अति अद्भुत चरित्र असें आहे कीं, हा वऱ्हाड देशांत रहात असे. हा रात्रंदिवस पांडुरंगाचें भजन करी. पुढें तो व्यापाराच्या संबंधानें सहकुटुंब कर्नाटकांत जाऊन राहिला.त्यास नरहरि नांवाचा एक मुलगा होता. तोही आपल्या बापाप्रमाणें विवेकी होता. गरीब दुबळ्यांचा, पांथस्थांचा, साधुसंतांचा मालोपंत चांगला परामर्ष घेत असे. तो असत्याचा तिरस्कार करी. पुढें कांहीं दिवसांनीं त्याची बायको मरण पावली; तिचें त्यास असह्य दुःख झालें. नंतर लोकांनीं आग्रह करून एके मुलीशीं त्याचें लग्न लाविलें; तेंच पुढें दुःखद झालें. पुढें कांहीं दिवसांनीं तिचा बाप आला. तो होता जातीनें महार, त्याणें आपली मुलगी ओळखली. मग त्याणें लागलाच मालोपंतास सर्व वृत्तांत निवेदन केला व नांवगांव, ठावठिकाण, जातपात सांगून ह्मणाला कीं, माझी कन्या चोरट्यांनीं एके रात्रीस चोरून येथें आणिली; ती माझी मुलगी हल्लीं तुमच्या घरांत आहे. आज बहुत दिवस मी तिचा शोध करीत फिरत आहें. माझी महाराची मुलगी तुह्मीं केली हा धडधडीत अनाचार दिसतो. हें ऐकून मालोपंतास पश्चात्ताप झाला. त्यानें त्या अरिष्टांतून मुक्त करण्याकरितां पांडुरंगाचा धांवा केला. मग कांतेस बोलावून हाच तुझा बाप काय ह्मणून विचारिल्यावर ती उगीच राहिली. असें पाहून त्यानें महारास सांगितलें कीं, तूं ही आपली मुलगी घेऊन जा; आह्मांस जसें ब्राह्मण सांगतील तसें आह्मीं वागूं. हें ऐकून तो ह्मणाला, हें विटाळलेलें भांडें मी आतां परत नेऊन काय करूं? मला जातीबाहेर रहावें लागेल. असें सांगून तो महार मुलीस न नेतां परत गेला. मग हें वर्त्तमान गांवभर झालें. ज्या ब्राह्मणानें लग्न जमविलें होतें तो पळून गेला. सर्व सोयरेधायरेही मालोपंतास सोडून निघून गेले. त्याचा मुलगा नरहरि मात्र बापास धरून रा-

हिला. त्या दोघांस गांवकऱ्यांनीं जातीबाहेर ठेविलें. मग त्याणें सर्व धनदौलत, चीजवस्त ब्राह्मणांकडून लुटविली.

मग मालोपंतानें ब्राह्मणांस मला कोणतें प्रायश्चित्त देतां असें विचारतांच त्यांनीं देहांत प्रायश्चित्त घेण्यास सांगितलें. तदनंतर प्रायश्चित्त घेण्याचा विधि विचारिल्यावर पुन्हा ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, चिंचेचें मोठें ढोल पाहून त्यांत शरीर ठेवून सभोंवतीं गोंवऱ्या, लांकडें लाविलीं असतील त्यांस आपल्या हातानें अग्नि लावून घेऊन जळून जावें. ह्या प्रायश्चित्ताच्या विधीप्रमाणें करून तो पांडुरंगाचा धांवा करूं लागला कीं, माझें सर्व प्रकारें रक्षण करणारा तुझ्यावांचून दुसरा कोणी नाहीं; ह्यास्तव देहाचें बंधन चुकवून निरंतर तुझें स्मरण असावें इतकेंच मी मागत आहें. अशा मतलबाचा धांवा करून पांडुरंगाचें ध्यान धरून भजन करीत होता. त्या वेळीं चिंचेचें झाड सर्व जळून पडलें; परंतु मालोजीस अग्नीची इजा अगदीं झाली नाहीं. तो तेजःपुंज होऊन बाहेर आला. हें आश्चर्य पाहून मालोपंतास पंढरीनाथ पावला असें लोक बोलूं लागले. मग तो सर्व व्यासंग सोडून भजन, हरिकीर्त्तन करूं लागला.

मालोजीच्या स्त्रीसही पश्चात्ताप झाला. ती त्यास ह्मणाली कीं, माझ्या नशिबीं होतें तसें झालें; आतां माझा तरणोपाय कसा होईल हें मला सांगा. तेव्हां मालोजी बोलला, ह्यांत तुझा मुळींच अन्याय नाहीं. तुझा बाप तुला टाकून गेला त्यापेक्षां आह्मीं तुला अन्नवस्त्र देऊं; तूं निरंतर श्रीहरीचें स्मरण करीत जा. असें सांगितल्यावर, तिला एक खोंपट बांधून देऊन त्यांत तिला ठेविली. ती तेथें रात्रंदिवस भजन करी; तेणेंकरून तिला साक्षात्कार झाला. पुढें कांहीं दिवसांनीं ती मरण पावली; तेव्हां विष्णुदुतांनीं तिला वैकुंठीं नेली. तिचें प्रेत कोणी स्मशानांत नेईना. यास्तव मालोजी स्वतः खोंपटांत शिरला; व प्रेतावरचें वस्त्र काढून पाहतो तों तिच्या सर्व देहाचीं फुलें झालेलीं दृष्टीस पडलीं.

असा हा विष्णुभजनाचा अत्यद्भुत प्रभाव प्रत्यक्ष पांडुरंगानें जनांस दाखविला. तेव्हां मालोपंतास सर्व मान देऊं लागले; व

ह्यास ईश्वर साह्य आहे अशी त्यांची पक्की खात्री झाली. मग त्याचें कीर्त्तन ऐकावयास लोकांची अति गर्दी होई. भगवत्प्राप्ति होऊन भवसिंधु उतरून जाण्याची इच्छा असेल तर करुणरसानें देवास आळवावें. देवाची भेट व्हावी; असें भक्तांस वाटलें, तर वनांत जाऊन त्याचा धांवा करावा. तसें न होईल तर खुशाल संसार करून निश्चित होऊन संतांचीं चरित्रें ऐकावीं.

---

# अध्याय ४२ वा.

## प्रेमाबाई, झिळाबाई, नरपाळराजा, पिलाबाई, रमाबाई, रामराजा व नरहरिदास.

### प्रेमाबाई.

ही ज्ञान, वैराग्य कांहींच जाणत नसे. पुराण, कीर्त्तन ऐकून तिणें ईश्वरप्राप्ति करून घेतली. ती द्वैत मानीत नसे. ती अतितअभ्यागतांचा समाचार घेत असे. नित्य गंगास्नान करून ती गोपाळमूर्त्तीचें अर्चन करी. ती पुराण, कीर्त्तन ‘ प्रेमानें ’ ऐकत असतां तन्मय होत असे; ह्या मुळेंच तिचें नांव वैष्णवांनीं ‘ प्रेमाबाई ’ असें ठेविलें.

एके दिवशीं तिच्या घरीं साधु आले. ते भुकेलेले होते. तेव्हां, पुराणास गेल्यानें संतसेवेस अडथळा येईल व न गेल्यानें पुराण अंतरेल; अशी दोहींकडून ती पेचांत पडली. पूजा करीत असतां जर वैष्णव घरीं आले, तर पूजा ठेवून वैष्णवांचा सत्कार करावा; संतांचा अनादर करून श्रीहरीची पूजा करीत बसलें, तर तो त्यांत राजी नाहीं; असा विचार करून ती त्यांच्या सेवेस घरीं राहिली. तिला भ्रतार नव्हता. फक्त एक दहा वर्षांच्या मुलाशिवाय दुसरें कोणी नव्हतें. मग तिनें आपल्या मुलास पुराणास पाठविलें; व आपण घरींच काम करीत होती; तरीं तिचें सर्व चित्त पुराणाकडे लागलें होतें. तिणें साधूंची पूजा करून तीर्थ घेतलें. कृष्णार्पण ह्मणून संकल्प सोडिल्यावर संतमंडळी जेवून तृप्त झाली. इतक्यांत पुराण ऐकून मुलगा आला; मग तीं दोघें जेविलीं.

मग तिणें मुलास बोलावून आज पुराणांत काय काय ऐकलेंस तें सांग ह्मणून विचारलें. त्या वेळेस सुमारें प्रहर दिवस राहिला असतां त्याणें सांगण्यास आरंभ केला, त्यांतील भावार्थ असा:—एके दिवशीं गोकुळांत यशोदा ताक करीत होती; तों रडत रडत कृष्ण जवळ आला व तिनें त्यास स्तनपान करण्यास्तव आडवें घेतलें. तेव्हां, आईचें मजवर कितपत प्रेम आहे, हें पाहण्यास दूध तापत ठेविलें होतें तें उतास नेण्याची अग्नीला आज्ञा केली; त्या क्षणींच अग्नि प्रदिप्त होऊन दूध उतून गेलें. इतक्यांत यशोदा करपट वास आल्यामुळें कृष्णास खालीं ठेवून दूध पहावयास गेली; तों दूध उतून गेलेलें पाहून हळहळली. तिकडे कृष्ण आई टाकून गेली ह्मणून रडूं लागला. जवळचा कल्पवृक्ष सोडून सिंदीस पाणी घालण्याप्रमाणें यशोदेनें केलें. इकडे कृष्णानें दहीं घुसळण्याचा डेरा फोडून टाकिला; व सर्व लोणी आपण खाल्लें व सोबत्यांनाही दिलें. इतक्यांत यशोदा आली; व त्यास पुष्कळ प्रकारांनीं रागें भरली. गांवच्या बायका याच्या रोज चहाड्या सांगतात त्या खऱ्याच असतील या ह्याच्या गुणांवरून ! असें बोलून मारावयास काठी घेतली; तेव्हां कृष्ण पळाला व यशोदा त्याच्या पाठीस लागली. ती शेवटीं अगदीं दमली तरी तो तिच्या हातीं लागेना. गांवच्या गौळणीही त्या वेळेस तिला हिणावून बोलूं लागल्या. भरदुपार झाली, तरी कृष्ण हातीं लागेना; मग त्यासच तिची दया आली. नंतर तो थांबल्यावर ती त्यास धरून घरीं घेऊन गेली व दाव्यांनीं उखळास बांधून ठेवूं लागली. या कृत्यास व्रजवासी स्त्रियांनीं उत्तेजन दिलें. कारण त्यांस यामुळें आनंद झाला. यशोदेजवळचीं सर्व दावीं संपलीं तरीं कृष्ण बांधवला नाहीं. गांवांतून गोपींनीं हजारों दोऱ्या आणिल्या; पण त्याही पुरल्या नाहींत. एवढ्या ब्रह्मांडाचें प्रचंड धेंड ज्याच्या रोमरंध्रीं मावतें त्या श्रीकृष्ण परमात्म्यास यशोदा दाव्यांनीं बांधूं पहातें हें घडेल तरीं कसें ? सर्व दोऱ्या संपल्या तरीं वीतभर कमीच ! तेव्हां कृष्णास दया आली; व शेवटचा दोर त्यांच्याच कृपेनें पुरला. मग तिणें त्यास बांधून टाकिला. सोडावें ह्मणून तो तिच्या काकुळती करूं लागला

ळ्यांतून टपटपां अश्रुधारा पडूं लागल्या; पण यशोदेनें तिकडे दुर्लक्ष केलें. ती त्यास तसाच ठेवून कामकाज करूं लागली.

ही मुलानें सांगितलेली कथा ऐकून प्रेमाबाई रडूं लागली. त्या वेळीं ती ह्मणाली, गोरस सांडल्यामुळें भगवान कृष्णास मारणारणीला आई कोण ह्मणेल? शेवटीं तिणें आपल्या मुलास सांगितलें कीं, आतां माझ्या मागें तूं संसार कर; मी कृष्णास सोडावयास गोकुळीं जातें. असें बोलून कुडींतून प्राण सोडिला. हा चमत्कार घरीं उतरलेल्या साधूंनीं पाहिला; तेव्हां त्यांणीं तिची स्तुति केली.

## शिळाबाई.

ही राजकन्या होती. तिला लहानपणीं बापानें लिहावयास व वाचावयास शिकविण्याकरितां एक पंडित ठेविला. तो पंडित शाळिग्रामाची नित्य पूजा करी. हें एके दिवशीं शिळाबाईच्या पहाण्यांत आलें, त्यावरून तिणें त्याजवळ एक शाळिग्राम शिळा पूजा करण्यास मागितली; व देण्यासाठीं ती त्याच्या पाठीस लागली. मग त्याणें एक गोटा दिला; त्याची ती नित्य पूजा करी. तिला मंत्र येत नव्हते; तरीं तिचा भाव पाहून श्रीहरि प्रगट झाला. त्यास भक्तीची फार आवड. भक्तिवांचून साक्षात्कार नाहीं. असो. शिळाबाईची अपूर्व प्रीति पाहून पाषाणांत देव प्रगट होऊन पूजा घेऊं लागला. ह्या इतक्या पल्ल्यास येऊन ठेपलेली गोष्ट आईबापांच्या लक्षांत आली नाहीं. ही मुलगी केवळ खेळ खेळते; इतकीच त्यांची समजूत होती.

पुढें लवकरच तिचें एका राजपुत्राबरोबर लग्न झालें. सोहळा आटोपल्यावर तिनें सासरीं जातेवेळीं आपला पूजा करण्याचा सर्व सरंजाम बरोबर घेतला. ती वाटेंत मुक्कामास राहिल्यावर देवास आरती करूं लागली. तिचा नवरा दुष्ट असे, त्यास देवधर्म केलेला पहावत नसे; त्यामुळें त्यानें तिची नजर चुकवून उपकरणीं वगैरे देवपुजेचें सर्व सामान नदींत चोंहींकडे टाकून दिलें.

दुसरे दिवशीं शिळाबाई स्नान केल्यावर पाहूं लागली तों उपकर-

णीं ठेवण्याचा पेटारा दिसेना; तेव्हां ती चिंताक्रांत झाली. मग, शाळिग्राम सांपडून देवपूजा न होईल तर जीव देईन; असा तिणें निश्चय केला. त्यावेळीं कोणत्या अन्यायामुळें मजवर हा तुझा कोप झाला कोण जाणे! असें बोलून ती ईश्वराची विनवणी करूं लागली. सासू, सासरा, नवरा यांनीं तिला परोपरीनें सांगून पाहिलें; परंतु तें तिनें ऐकिलें नाहीं. तिनें अन्नउदक सोडिलें. असा चार दिवस तिचा निर्धार पाहून तिच्या पंतोजीच्या रूपानें श्रीहरीनें स्वप्नांत येऊन पेटारा आणून दिला. शिळाबाई जागी होऊन पहाते तों देवपुजेची सामग्री जवळ आहे. मग ती स्नान करून पूजा करूं लागली. हें पाहून तिच्या भ्रतारास परम आश्चर्य वाटलें. मग स्त्रिची छळणा केली ह्मणून त्यास पश्चात्ताप झाला. कांतेचा निश्चय पाहून तिला तात्काळ देवाधिदेव पावला; असा अनुभव येऊन तोही विष्णूची भक्ति करूं लागला.

## नरपाळराजा.

हा राजा हिंदुस्थानांत होता. त्याची बायको सुलक्षणी होती. ती दाही अवतारांचे उत्सव व एकादशीव्रत करी. वैष्णवलोक कीर्त्तन करीत तें ऐके. ती वारंवार नामस्मरण करी. तिचा भ्रतार नरपाळराजा अंतरनिष्ठ वैष्णव होता. त्यास हे बाहेरचे उपचार अगदीं आवडत नसत. तो कधीं विष्णुपूजा करीत नसे, कीर्त्तन ऐकत नसे, नामस्मरण उघडपणें करीत नसे, ह्यामुळें लोक त्याची निंदा करीत; पण तो देवाची आठवण केल्यावांचून एक क्षणभर देखील रहात नसे.

एके दिवशीं राणीनें त्यास सांगितलें कीं, तुह्मांस कांहीं विष्णुभक्ति घडावी असें माझ्या मनांत आहे. त्यावर त्यानें तिला सांगितलें कीं, मी विषयासक्त असल्यानें मला भक्तिपंथ आवडत नाहीं. पुढें एके दिवशीं राजा निजला असतां त्याच्या मुखांतून 'राम' असा निघालेला शब्द राणीनें ऐकून प्रातःकाळ होतांच परमानंदानें मोठा उत्सव मांडिला. दानधर्म, पूजा, कीर्त्तन चालविलें. तें पाहून

आजच्या उत्सवाचें कारण कोणतें ह्मणून राजानें तिला विचारिलें. तेव्हां ती ह्मणाली, तुह्मीं रात्रीं निद्रिस्थ असतां मुखांतून 'राम' शब्द निघाला तो म्यां ऐकिला; यास्तव परम संतोष वाटून मीं आज उत्सव आरंभिला आहे. असें तिचें भाषण ऐकून राजा ह्मणाला, देहांतून राम निघाल्यावर मग जिणें ठेवणें व्यर्थ; असें बोलून प्राण सोडला. हें कौतुक पाहून त्याच्या अंतरनिष्ठपणाविषयीं सर्वांची खात्री झाली. अशी भ्रताराची अवस्था पाहून राणीनेंही तात्काळ प्राण सोडला. ह्या रीतीनें त्या उभयतांनीं देव जोडला. असा भक्तीचा महिमा होय.

## पिलाबाई.

ही प्रधानाची मुलगी होती. ती नित्य विष्णूची पूजा करी. तिचा भ्रतार मरण पावल्यावर ती माहेरीं राहिली. पुढें तिचा बाप निवर्तल्यावर तिच्या दोघा भावांत कलह उत्पन्न झाला व ते दोन गांव वांटून घेऊन विभक्त राहिले. पुढें धाकट्या भावानें सैन्य ठेवून वडील बंधूचा गांव लुटून धुळीस मिळविला. त्या संधीस पिलाबाईच्या देवपुजेच्या सामानांची वाताहात झाली. त्याचा शोध करण्यासाठीं तिनें बंधूसहीं सांगून पाठविलें. व अन्नपाणी वर्ज केलें तेव्हां तिच्या भावानें पुष्कळ शोध केला; परंतु देवाचा व पुजेच्या सामानांचा कोठें थांग लागेना. मग तिला त्यानें निरोप पाठविला कीं, एथें सांपडत नाहीं; मर्जीस येईल तर तूं येथें येऊन पहा मग ती त्याच्या गांवीं गेली. तिणेंही तेथें पुष्कळ शोध करून पाहिलें परंतु थांग लागला नाहीं. विष्णुमूर्त्ति हरवल्यामुळें तिला पांच उपास घडले. मग ईश्वरानें स्वप्नांत विप्ररूपानें येऊन मूर्त्ति व देवपुजेचें सामान आणून दिलें. हा चमत्कार पाहून धाकट्या बंधूस अनुताप झाला; व व्यर्थ कलह केला असें उमजून वडील बंधूस शरण गेला. त्यानें त्यास सर्व वर्त्तमान कळवून आपला अन्याय कबूल केला व तेथेंच त्याच्याशीं सख्यत्वानें राहिला. ते उभय बंधु अनुग्रह घेऊन पिलाबाईचे शिष्य झाले. पुढें त्यांसही पांडुरंगाचा साक्षात्कार झाला.

## रमाबाई.

ही राजकन्या होती. हिचा बाप संतराजा भगवद्भक्त होता. तशीच तीही परम भाविक होती; परंतु तिच्या सासरीं पूजा अर्चा कांहीं होत नव्हती. देवाचें फुकटचें नामस्मरण सुद्धां होत नसे; मग साधुसंतांची सेवा कोठून घडणार ? असा अभक्तांशीं प्रसंग पडल्यामुळें रमाबाई निरंतर चिंता वाही. पुढें कांहीं दिवसांनीं तिला पुत्र झाला. ती वारंवार ह्मणे कीं, देवा, मी तुझ्या पायांचें नित्य स्मरण करितें; एथें तर अभक्तांशीं प्रसंग पडला; मला दुसऱ्या कोणाचा आधार नाहीं; तुझ्यावांचून मला क्षणभर कंठवत नाहीं; तरीं अभक्तांस प्रत्यय दाखवून माझी सोय कधीं करशील कोण जाणे ?

पुढें एके एकादशीस तिच्या भ्रतारानें पशु मारावयाकरितां घरीं आणिला. त्या वेळीं रमाबाईनें त्यास, आज हिंसा करूं नये ह्मणून परोपरीनें सांगितलें; पण त्यानें तिचें न ऐकून त्या पशूचा वध केला. मग तिनें नगरांत आज कोणी साधुसंत आहेत कीं नाहींत हें पहावयास मनुष्यें पाठविलीं. त्यांनीं शोध करून संत देवळांत उतरले आहेत ह्मणून सांगितल्यावर रमाबाईनें आपल्या पुत्रास विष पाजून पाळण्यांत निजविलें. मग लौकरच मुलगा मेल्याची गोष्ट बाहेर फुटली; घरचीं सर्व मनुष्यें मोठमोठ्यानें रडूं लागलीं; परंतु मुलाची आई रडेना. ती आनंदानें नामस्मरण करीत होती. तेव्हां राजा तिला ह्मणाला कीं, तूं मोठी निर्दय आहेस. मुलगा मेला असतांही तुझा डोळ्यांतून पाण्याचा एक थेंबसुद्धां निघत नाहीं, ह्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. तेव्हां रमाबाई ह्मणाली, नाशिवंताचा शोक करून काय उपयोग ? तें शेवटीं नासून जावयाचेंच. दिसतें आहे हें सारें मायेचें औडंबर आहे. परमेश्वराच्या कृपेनें विघ्नें निवारण होतात. जर संतांस आपल्या घरीं आणाल तर एक उपाय ठाऊक आहे तो सांगतें. मग राजा तिच्या ह्मणण्यास कबूल झाल्यावर तिणें सांगितलें कीं, संतांस आणून त्यांची पूजा करून चरणतीर्थ पाजिल्यानें बालक उठेल. हें ऐकून राजानें संतांस आणून त्यांचें चरणतीर्थ पाजिल्यावर लागलाच मुलगा उठून

बसला. हा अपूर्व चमत्कार पाहून राजाचा भाव बसला व दुर्बुद्धि टाकून तो भगवद्भक्त झाला. नित्य विष्णूची, साधुसंतांची पूजाअर्चा करून व हरिकीर्त्तन ऐकून नामस्मरण करूं लागला. रमाबाईचा संतांवर निश्चय अढळ; ह्मणूनच तिनें विष देऊन आपला पुत्र मारिला व चमत्कार दाखविला.

## रामराजा.

हा मोठा रामभक्त होता. तो नित्य रामाचें नामस्मरण करी. त्याचीं चरित्रें ऐके; परंतु सीताहरण ऐकत नसे. कांकी, राम प्रसंगांत पडल्याचें तें चरित्र होय. एके दिवशीं पुराणिकाची प्रकृति बिघल्यामुळें, त्यानें आपल्या पुत्रास तें चरित्र न सांगण्याचें सुचविलें असतांही त्याच्या लक्षांत न राहिल्यामुळें त्यानें तें सीताहरण लाविलें; तें असें कीं, श्रीराम पंचवटींत असतांना तेथें एक कपटी राक्षस सुवर्णमृग होऊन आला. त्यास जानकीनें पहातांच त्याच्या कातड्याची मला कंचुकी ( चोळी ) करावी ह्मणून रामास विनंती केली. पुढील भविष्य जाणून रामही धनुष्य बाण घेऊन त्याचा वध करावयास गेला. ही संधि पाहून रावण संन्यासी होऊन भिक्षा मागावयास आला व कपटानें जानकीस घेऊन गेला.

इतकी कथा सांगतांच राजास क्रोध आला. त्यानें सैन्य सिद्ध करण्याची प्रधानास आज्ञा केली. मग सैन्य सिद्ध झाल्यावर रावणापासून जानकीस सोडविण्यासाठीं व रावणाचा वध करावयास जाण्यासाठीं समुद्रापर्यंत येऊन उदकांत शिरला. त्याचा भाव पाहून श्रीरामचंद्रास संकट पडलें. त्यानें सीतेस कडेवर घेऊन तेथें प्रगट झाल्यावर रामराजास सांगितलें कीं, रावणानें सीता नेली होती ती मीं ही पहा रावणाचा वध करून सोडवून आणिली; आतां तुला लंकेस जाण्याचें कारण राहिलें नाहीं. मग राजानें समुद्राबाहेर येऊन श्रीरामाची षोडशोपचारांनीं पूजा केली. अशी त्याची भक्ति कीं, त्यानें श्रीराम हृदयांत ठेविला. मग तो सैन्य घेऊन नगरास परत गेला.

## नरहरिदास.

हा वोढेजगन्नाथास होता. तो स्वरूपीं लक्ष लावून प्रेमानें भजन करीत असे. मूर्तिमंत चौसष्ट कळा त्याच्या अंगीं होत्या. तो श्रीहरीच्या अवतारांचीं प्रीतीनें सोंगें आणीत असे. त्यास साक्षात्कारही होत.

एकदां असा चमत्कार झाला कीं, नारसिंह अवताराचें सोंग त्याणें स्वतः घेतलें होतें; व दुसऱ्या एकाला हिरण्यकशिपूचें सोंग दिलें होतें. प्रल्हादानें ( सोंगानें ) स्मरण करितांच कागदाचा स्तंभ फोडून नरसिंह बाहेर पडला; आणि हिरण्यकशिपूस आडवा पाडून त्यास खरोखर ठार मारून टाकिलें; व नखांनीं त्याचीं आतडीं बाहेर काढिलीं. तेव्हां हाहाकार झाला.

मृगजळाच्या पुरांत हत्ती बुडावा, लांकडाच्या वज्रानें पर्वत चूर्ण व्हावा, दोरीच्या सर्पानें दंश करावा, चित्रांतल्या अग्नीनें खांडववन जाळावें, त्याप्रमाणें आज घडून आलें असें लोक बोलूं लागले. व उभयतांचें वैर होतें, ह्यास्तव सोंग आणून अशा रीतीनें सूड उगविला; असेंही कांहीं लोक ह्मणत. मग ही गोष्ट त्याच्या आप्तांनीं राजास कळविल्यावर त्यानें प्रेतास मूठमाती देण्याचा हुकूम दिला व पुढें चौकशी करून इनसाफ करूं ह्मणून सांगितलें.

मग नरहरीला राजानें दशरथाचें सोंग दिलें. दोघा मुलांना रामलक्ष्मणांचीं सोंगें दिलीं. एक रागीट स्त्री पाहून ती कैकयी बनविली. मग हरिदासाचें कीर्त्तन सुरू झालें. वाल्मिकीकृत बालकांड अनुसंधान लाविलें. रामास सिंहासनावर बसविण्याचें वेळीं कैकयी आडवी आली. तिनें आपणास दशरथानें दिलेल्या वराची त्यास आठवण करण्यास सांगितलें. तेव्हां कैकयी म्हणाली, माझें म्हणणें इतकेंच कीं, रामलक्ष्मणांस वनांत पाठवावें; आणि भरताला राज्यावर बसवावें. मग तिच्या आग्रहावरून राम वनांत गेला. तेव्हां वेषधारी दशरथानें आकांत मांडिला. रामाला वनांत न पाठविण्याविषयीं त्यानें तिचें बहुत आर्जव केलें. तेव्हां रामानें दशरथास नमस्कार करून समागमें लक्ष्मण सीता घेऊन वनाचा मार्ग धरला; असें

पाहून वेषधारी दशरथानें अतिशय शोक केला. श्रीराम माझा जिवलग प्राण; माझा विसांवा मला टाकून चालला; त्या वांचून मला दशदीशा शून्य दिसतात; रामावांचून कोणी माझें नाहीं; तूं मला टाकून वनास गेलास; आतां मला वांचून काय करावयाचें आहे असें बोलून नरहरिदासानें प्राण सोडिला. लोक अंगास हात लावून पाहूं लागले; तो थंड गार. तो श्रीरामचरणीं लक्ष ठेवून सायुज्यमुक्ति पावला. सोंगासारखी संपादणी केलेली पाहून लोक विस्मित झाले.

---

# अध्याय ४३ वा.

## वोगरासा वाणी, हरिआनंद, रामचंद्रभट, सुहागब्रह्मा, पन्हाजी रजपूत, जयमल्लराजा व श्रीधरपंत.

### वोगरासा वाणी.

हा मोठा भगवद्भक्त होता. तो निरंतर श्रीहरीच्या पायांचें चिंतन करी. सारें विश्व आत्मवत मानी. तो अगदीं गरीब असे; तरी नित्य दहा मनुष्यांस तो अन्न घाली. सत्वाची हानि न होण्यासाठीं तो फार जपत असे. त्याची स्त्री परम प्रतिव्रता होती. ती आपल्या पतीच्या इच्छेप्रमाणें वागत असे. त्याचें सत्व पहावयास वैकुंठनाथ एके दिवशीं साधूचा वेष घेऊन त्याच्या घरीं गेले; व घरधनी कोठें गेले ह्मणून त्यानें अंगणांत उभें राहून यजमानीण बाईस विचारिलें. तेव्हां ती ह्मणाली, माझा भ्रतार बाजाराला गेला आहे; उदयीक येईल. असें बोलून तिनें त्यास बसावयास आसन देऊन नमस्कार केला. नंतर साधूनें सांगितलें कीं, मला भूक लागली आहे; व एथें जेवावयास मिळेल ह्या आशेनें आलों आहें. हें ऐकून यजमानीण ह्मणाली, तुह्मीं स्वस्थ असा; मीं स्वयंपाक करून तुह्मांस जेवावयास वाढितें. मग घरांत शिधा नव्हता तरीं व सत्वाची हानि होऊं नये ह्मणून तिनें आपल्या नाकांत नथी ऐवजीं वालभर सोन्याचें सुंकलें होतें, तें बाजारांत विकून त्या पैशांचा शिधा घेतला; व स्वयंपाक

करून साधूला जेवायाला वाढलें. तेव्हां तो तिला ह्मणाला, फार दिवस झाले पोटभर जेवावयास मिळालें नव्हतें ह्मणून तुमच्या घरीं आलों; परंतु आज यथेच्छ जेवून तृप्त झालों. तिला अन्न उरलें नव्हतें, तरी ती समाधानवृत्तीनें उपाशीं राहिली. तेव्हां लक्ष्मीकांत प्रसन्न झाला मग माजघरांत जाऊन त्याणें आपल्या हातानें एक मडकें पुरून ठेविलें; व तिला सांगितलें कीं, जितकें द्रव्य पाहिजे तितकें यांत उत्पन्न होईल; तें घेऊन नित्य खर्च करून साधुसंतांस भोजन घालीत जा असें बोलून गुप्त झाला.

दुसरे दिवशीं वोगरासा घरीं आल्यावर त्यास तिनें झालेला सर्व मजकूर निवेदन केला; तो त्याणें स्वस्थपणें ऐकून घेतला. तो निरिच्छ असल्यामुळें मडक्यांत पाहीना. एके दिवशीं पुष्कळ साधू घरीं आले, तेव्हां मात्र तो विचारांत पडला; असें पाहून स्त्रिनें मडक्यांत हात घालतांच मोहरा, होन हातास लागले. मग साधुसंतांस तृप्त केलें. पुढें त्यानें तिला सांगितलें कीं, मी बाजारास गेल्यावर एकजण आला तो साधु नव्हता; लक्ष्मीकांतच होता. त्याची तूं पूजा केली नाहींस. तुला कशी भूल पडली? माझ्या आधीं तुला दर्शन दिलें व अझूनही मला नाहीं; त्या अर्थीं आतां जगून काय करावयाचें आहे, असें बोलून रडूं लागला. मग श्रीहरीची स्तुति केली. त्याचा सप्रेम धांवा ऐकून वैकुंठनाथ प्रगट झाले. ती चतुर्भूज, श्यामसुंदर, सांवळी मूर्त्ति पाहून वोगरासा यानें नमस्कार करून सर्वोपचारांनीं पूजा केली; नंतर श्रीहरी अंतर्धान पावले.

## हरिआनंद.

हा रामानंदसांप्रदायी होता. तो प्रेमळ भक्त निरंतर नामस्मरण करून आपला काळ घालवित असे. त्याच्या उपदेशानें पुष्कळ लोक भक्तीकडे वळले. तो नगरांत आपल्या एका शिष्याला भिक्षेस पाठवी; त्यास शेरभर पीठ मिळे तितक्यांत परमेश्वरकृपेनें शंभर ब्राह्मण जेवीत असत.

एके दिवशीं रामानंदस्वामी संन्यासी शिष्यांसहवर्त्तमान त्याच्या नगरास आले. नित्याप्रमाणें हरिआनंदाचा शिष्य भिक्षा मागावयास

गेला असतां रामानंदस्वामीच्या बिऱ्हाडीं गेला. तेव्हां स्वामी ह्मणाले कीं, हा शिष्य गुरुसेवेंत तत्पर आहे; परंतु उद्यां तिसरे प्रहरीं मरण पावेल. हें ऐकून त्याची हिंमत खचली. मग तो घरीं येऊन झालेलें वर्त्तमान सद्गुरूस निवेदन केल्यावर ह्मणाला कीं, मी, अभागी माझ्या हातून सेवा घडली नाहीं; असें ह्मणून रडूं लागला. तेव्हां गुरूनें त्यास अभय दिलें आणि त्याची भीति उडविली.

दुसरे दिवशीं हरिआनंदानें स्नान करून नित्यनेम सारिल्यानंतर, शिष्यास आपल्या पाठीमागें बसवून श्रीहरीची मूर्त्ति ध्यानांत आणिली; तशीच मूर्त्ति बाहेर प्रगट झाली. त्याचें सगुणस्वरूपीं चित्त लागल्यामुळें देहभान नाहींसें झालें; इतक्यांत शिष्यास नेण्यासाठीं काळाचे दूत येऊन थडकले. जेथें देवभक्तांची ऐक्यता तेथें काळाचा शिरकाव होत नाहीं. त्यांनीं एक प्रहरपर्यंत वाट पाहिली; शेवटीं निरुपाय होऊन ते परत गेले. असें पाहून शिष्यानें विनंती केली कीं, मरणाची वेळ चुकली. सूर्य अस्तास जाण्याचा समय आला; आतां चित्तीं सावध व्हावें. इतक्यांत सगुणमूर्त्ति हृदयांत सांठवून गुरूनें नेत्र उघडिले; तेव्हां शिष्य त्याच्या पायां पडला.

मग दुसरे दिवशीं तो रामानंदस्वामीकडे गेला. त्यास पहातांच स्वामीस विस्मय वाटला. मग तूं वांचलास कसा ह्मणून विचारल्यावर त्यानें घडलेली हकीगत त्यास कळविली. ती ऐकून स्वामी हरिआनंदाच्या आश्रमीं गेले. नमस्कार होऊन उभयतांच्या प्रीतीनें भेटी झाल्या. मग रामानंदस्वामी ह्मणाले कीं, योगबलानें आह्मांस आपल्याच प्राणाचें रक्षण करवतें; पण दुसऱ्याचे प्राण वांचविण्याचें सामर्थ्य मजमध्यें नाहीं. तेव्हां हरिआनंदानें हा स्वामीच्या कृपेचा महिमा होय असें सांगितलें. मग रामानंदस्वामी गेल्यावर तो श्रीपुरुषोत्तमाचें भजन करूं लागला. योग्यापेक्षां सगुणभक्तीचा महिमा विशेष होय. परमेश्वर भक्तीचा भुकेला आहे; तो भक्तांचें उणें पडूं देत नाहीं.

## रामचंद्रभट.

हा साधु अमळा गांवीं रहात होता. तो निरिच्छ असे; व श्रीहरीचें

भजन करी. तो वेदशास्त्रांत निपुण असे. तो भिक्षा मागून आपला निर्वाह चालवी. तो राजाचा उपाध्याय असतांही त्याकडे जात नसे. पुढें राणीच्या मनांत त्याला द्रव्य द्यावें असें आलें. मग तिणें त्याच्या स्त्रीस बोलावून नेऊन तिला नमस्कार केला, व मी कांहीं देतें त्याचा अव्हेर करूं नका; असें सांगून आपले सर्व रत्नजडित दागिने तिला दिले. ते अंगावर घालून ती घरीं गेली. हें पाहून रामचंद्रभट तिला रागें भरला; व ही उपाधि कशासाठीं आणिलीस? ह्यानें श्रीहरी मात्र अंतरेल; असें बोलून ते दागिने अग्निकुंडांत टाकिले. मग ही गोष्ट राजास कळल्यावरून तो त्याच्या घरीं गेला व दागिने परत मागूं लागला. तेव्हां रामचंद्रभटानें यज्ञनारायणाची स्तुति केली; इतक्यांत ते सर्व अलंकार कुंडांतून बाहेर आले. ते पूर्वीहून सतेज दिसूं लागले. असें हें कौतुक पाहून राजानें त्याचे पाय धरिले. रामचंद्रभटानें दागिने परत घेण्याची राजास विनंती केली. तेव्हां राजा ह्मणाला, दिलेलें दान परत घेत नाहीं; पण कौतुक पहाण्यासाठीं मीं ही गोष्ट केली. हें ऐकून रामभटानें ते दागिने ब्राह्मणांस वांटले. तो निरपेक्षपणें श्रीहरीचें भजन करीत असे.

## सुहागशहा.

हा भक्त अमदाबादेस रहात असे. तो हिजडा होता, तरीं प्रेमानें भजन करी. जो सर्व देहांत व्यापक असून कोणाच्याही कर्मासीं लिप्त नसतो; त्या शेषशायी लक्ष्मीकांतास सुहागशहा ध्यात असे. त्याचे जातवाले नगरांत फिरत; पण तो कोठें न जातां घरींच असे. पुढें त्यास साक्षात्कार झाला. तेव्हांपासून शेषशायी सगुणरूपानें त्यास वारंवार भेटे.

पुढें त्या देशांत अवर्षण पडलें; तेव्हां पुष्कळ लोक अन्नान्न करून मेले. पावसाकडे सर्वांचे डोळे लागले होते. राजानें पाऊस पडावा ह्मणून अनुष्ठानें केलीं; सात दिवस उपास केले. मग जो देवाधिदेव लक्ष्मीकांत त्यानें ब्राह्मणाच्या रूपानें त्याच्या स्वप्नांत जाऊन दृष्टांत दिला कीं, सुहागशहा भक्त एका हिजड्याच्या घरीं राहिला आहे; त्यास तूं निराभिमानानें शरण जाऊन साष्टांग नमन कर; ह्मणजे विश्वाचा प्रतिपाळ

करणारा श्रीहरि संतुष्ट होऊन पर्जन्यवृष्टि करील. हा दृष्टांत राजानें लोकांना सांगितला, तेव्हां त्यांनीं त्यास नमस्कार करण्यासाठीं अनुमोदन दिलें.

मग राजा पुष्कळ लोक घेऊन सुहागशहाकडे गेला. त्यानें त्यास संपूर्ण वृत्तांत निवेदन केला; आणि कृपा करून जनाचें दुःख निवारण करण्याची प्रार्थना केली. शेवटीं हात जोडून साष्टांग नमस्कारही घातला. तेव्हां तो ह्मणूं लागला, देवा, ही उपाधि माझ्या मागें कां लाविलीस? सर्व जिवांत कुलक्षणी, नचि मी; तूं काय करशील कळत नाहीं. मग तो अंगणांत उभा राहून वर पाहूं लागला; पण पाऊस पडला नाहीं. त्यावरून त्यानें नेत्र लावून श्रीविष्णूचें ध्यान केलें; परंतु पर्जन्य पडेना. तेव्हां, आजपासून हरिभजन न करण्याचा नेम करून नाकांतली नथ काढून घेतली, व हातांतल्या बांगड्या फोडूं लागला; इतक्यांत श्रीहरि प्रसन्न झाले व तात्काळ पर्जन्यवृष्टि झाली. तेव्हां लोकांनीं जयजयकार केला. पुढें चौदा दिवस एकसारखा पाऊस पडत होता.

नंतर राजानें कांहीं मागण्यासाठीं सुहागशहास सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला, आह्मी श्रीहरीचे दास; सर्व सिद्धी हात जोडून आमच्या जवळ; तर तूं आह्मांस काय देणार? आतां जनांत उपाधि मात्र वाढावयाची यास्तव मी समाधि घेणार; व ही नाशिवंत काया सोडणार. मग अधिकाऱ्यानें गार खणविली; तीमध्यें तो उभा राहिला. तेव्हां त्यानें श्रीविष्णूचें चिंतन केलें; व देवानें त्यास भेट दिली. ही बातमी गांवभर झाली. लोकांनीं फुलें, बुका उधळिला; वैष्णव लोक भजन करूं लागले. तेव्हां माझ्या दीक्षेचा अंगिकार केला असतां भवव्यथा नासेल; असें सुहागशहा ह्मणाला. पण निंद्य वेष ह्मणून कोणी धजेना; इतक्यांत एक गरीब येऊन त्याच्या पायां पडला. त्यास त्यानें उपासनामंत्र सांगितला; कांकणें काढून त्याच्या हातांत घातलीं; व नाक टोंचून नथ घातली. तो संप्रदाय अद्यापि चालत आहे. असो. शेवटीं त्यानें श्रीविष्णूचें रूप ध्यानांत आणून प्राण सोडिला. परमेश्वर काळ, वेळ, ज्ञान, कूळ कांहीं न पहातां भक्तांस पावतो.

## पन्हाजी रजपूत.

हा रजपूत साधु गुजराथ देशांत झाला. हा डोंगरपुरवासवाडे एथच्या खुमानसिंग राजाच्या पदरीं असे. तो विश्वासु होता, ह्मणून त्याजवर राजाची पूर्ण मर्जी बसून त्यास पलंगापाशीं असण्याचें काम दिलें होतें. तो कुटुंबपोषणासाठीं ही नोकरी करी. तो द्वारकाधीशाचें नामस्मरण करी व कधींही खोटें बोलत नसे. असे बहुत दिवस लोटल्यानंतर त्यास साक्षात्कार झाला.

एके दिवाळीच्या अमावास्येच्या रात्रीं मोठा दीपोत्सव झाला. अर्धरात्र झाल्यावर राजा आपल्या मंदिरांत निजावयास येत आहे असें पाहून पन्हाजी पटकन उठला, आणि त्याच्या अंगरख्याचा पदर घेऊन चोळूं लागला. हें पाहून राजानें त्यास असें करण्याचें कारण विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला, द्वारकेस दीपोत्सव झाला; त्यांत एक अरिष्ट उद्भवलें. तें हें कीं, श्रीकृष्णाला पुजाऱ्यांनीं पुष्कळ वस्त्रेंभूषणें घातलीं; पण आरती करतेवेळेस देवाच्या अंगड्यास कापुराचा अग्नि लागला; तो माझ्या दृष्टीस पडल्यानें मीं तो आतांच विझविला. मग राजानें विस्मित होऊन देवावर पोशाख कसा आहे ह्मणून विचारलें. तेव्हां हिरवा पोशाख अंगावर आहे, अशी मूर्त्ति मला दिसते ह्मणून तो ह्मणाला.

मग राबड्याचा राजा, हा आपला साडू व मित्र, त्यास खुमानसिंग राजानें पत्र लिहिलें. त्यांत अमवास्येच्या रात्रीस विष्णुमंदिरीं घडलेली सविस्तर हकीगत लिहून पाठवावी; अशा अर्थाचा मजकूर लिहिला होता. राजानें पत्र पाहून त्याच मनुष्याबरोबर पत्राचें उत्तर पाठविलें कीं, मोठा दीपोत्सव झाला; तो करण्यांत अर्ध रात्र झाली; व देवावर हिरवा पोशाख होता. जेव्हां कर्पुरआरती उजळली, तेव्हां अंगड्याचा घेर खालीं पडला होता, त्यास तो आरतीचा कापूर लागला. त्या वेळीं पन्हाजी रजपूत देवाजवळ होता; त्यानें आपल्या हातानें चोळून अग्नि तात्काळ विझविला.

असें उत्तर आल्यावर राजास चमत्कार वाटला. मग पन्हाजीजवळ येऊन राजानें त्यास नमस्कार केला आणि सांगितलें, तूं वि-

ष्णुभक्त आहेस; अशी खात्री झाली. आतां तुझ्यापासून सेवा घेणें मला अनुचित होय. तुह्मीं द्वारकाधीश सच्चिदानंद परमात्मा ह्याचें निश्चित भजन करावें. मग राजानें घरखर्चासाठीं त्यास दोन गांव दिले. तेव्हांपासून पन्हाजी द्वारकेस राहिला व भजन करूं लागला.

## जयमल्लराजा.

हा राजा असून मोठा देवभक्त होता. तो मेडत्यामध्यें रहात असे. त्यास विष्णूच्या पुजेस एक प्रहर लागे. पूजा होईपर्यंत कोणास देवघरांत जाण्याची सक्त मनाई होती. मुखानें नामस्मरण चाललेलेंच असे. राजाचा धाकटा भाऊ होता तो बरोबर वांटा मागूं लागला. तो एकवट न रहातां रुसून गेला; तेथेंच पुष्कळ सैन्य ठेवून मेडत्यावर चालून आला. राजाची पुजेची वेळ पाहून लढाई सुरू केली. तेव्हां जयमल्लाच्या फौजेचा मोड होऊन प्रधानानें पलायन केलें. ही गोष्ट राजाच्या कानावर घालावी तर तो पुजेमध्यें गुंतलेला; व त्या वेळेस कोणालाच त्याजवळ जाण्याचा हुकूम नव्हता; ह्मणून प्रधानानें ही गोष्ट राजाच्या मातोश्रीस सांगितली. तिनें देवघरांत जाऊन राजास सांगितलें; परंतु तो पूजा करण्यांत गुंतल्यामुळें त्यानें तिला उत्तर दिलें नाहीं. त्या वेळीं 'सांवळा' अशीं मुखांतून अक्षरें बाहेर पडतांच श्रीहरी सगुणरूप धरून घोड्यावर बसून युद्धांत शिरला व त्यानें शत्रूची फौज पळवून लाविली. तेव्हां ह्याच्याविषयीं सर्वांना अटकळ करवेना. त्या वेषधारी हरीनें राजाच्या शत्रूस बांधून आणून पागेंत ठेविलें; व आपण अंतर्धान पावले.

राजा पूजा करून बाहेर आला तेव्हां प्रधानानें अव्वलपासून अखेरपर्यंत सविस्तर हकीगत त्यास निवेदन केली. मग हें सांवळ्याचेंच कृत्य ह्मणून राजा समजला. मग बंधूला दर्शन दिलें आणि मला कोणत्या अन्यायाबद्दल दर्शन नाहीं असें बोलून पांच उपास केले. त्यावरून श्रीहरीनें त्यास साक्षात् दर्शन दिलें. पुढें तो

राजबंधु पश्चात्ताप पावून व वैर सोडून शरण आला; व ईश्वरभजनीं लागला. आंच बसल्यावांचून पश्चात्ताप होत नसतो.

## श्रीधरपंत.

हा ब्राह्मण मोठा भगवद्भक्त होता. तो स्वभावानें अगदीं भोळा असे. तो निरंतर श्रीरामाचें नामस्मरण करी. त्याची स्त्रीही त्याच्या सारखीच निर्मळ मनाची होती. कोणी विनोदानें एखादी गोष्ट सांगितली तरीं ती त्यांना खरी वाटे. एकदां तीं उभयतां यात्रेस जात असतां तो स्त्रिला तट्टावर बसवून आपण मागून पायीं चालत होता. अरण्यांतून जात असतांना त्यांना चोरांनीं गांठलें. तेव्हां स्त्री घाबरली व त्यास ह्मणाली, आतां रात्रीचा समय, मला भय वाटतें; चला आपण मागें जाऊं. हें ऐकून चोरांनीं श्रीधरपंतास सांगितलें कीं, आह्मीं तुमच्या समागमें असतां भितां कां? मग तो ह्मणाला, तुह्मीं कांहीं प्रतिज्ञा करा ह्मणजे आमची भीति उडेल; व तुमच्या बोलण्यावर विश्वास बसेल. तेव्हां ते ह्मणाले, तुह्मां आह्मांमध्यें मध्यस्थ आत्माराम आहे; तो देवाधिदेव पुरुषोत्तम भक्तांचे श्रम हरितो. असें बोलतांच त्यांच्यावर दोघांचाही विश्वास बसला. मग ते कांहीं पुढें गेल्यावर चोरांनीं परमार्थाच्या गोष्टी बोलून श्रीधरास भूल पाडिली; व पुढें त्यांनीं त्याचा शिरच्छेद करून चिजवस्त घेतली; व त्याच्या कांतेस घेऊन ते पुढें जाऊं लागले. ती घात झाला असें मनांत समजून क्षणक्षणां मागें पहात होती. तेव्हां, आह्मीं तुझ्या नवऱ्यास ठार मारिला असून तूं वारंवार मागें काय पहातेस तें सांग; असें चोरांनीं तिला विचारितांच ती ह्मणाली, तुह्मां आह्मांमध्यें अयोध्यापति राम होता; ज्याचा विश्वास धरिल्यानें माझा पति मृत्यु पावला; तो आला किंवा नाहीं हें मी पहातें. तो सर्वांभूतीं व्यापक असून अंतरसाक्ष आहे. तो जानकीपति, रावणास मारून देवांस सोडविणारा भक्तकैवारी रघुवीर कोठें गुंतला? त्यास माझा विसर कां पडला? असें ह्मणतांच श्रीराम तेथें प्रगट झाला. त्यानें धनुष्यबाण हातांत घेऊन चोरांस मारून टाकिलें. मग श्रीधराचें प्रेत उठविलें. तो श्रीराम त्यांच्याबरोबर सुगम मार्ग व सुसंगत मिळेपर्यंत बरोबर गेला व मग अदृश्य झाला. परमेश्वर भक्तांचा

कैवार घेण्यासाठीं नाना अवतार घेतो; व दुष्टांच्या संहारासाठीं धनुष्य, गदा, चक्र इत्यादि आयुधें हातांत वागवितो.

---

## अध्याय ४१ वा.

### हरिपाळ, जमू, धनाजाट, सुखानंद व माधवदास.

#### हरिपाळ.

हा साधु श्रीमंत असे. त्याची संतांच्या ठायीं मोठी निष्ठा होती. तो प्रेमानें त्यांची पूजा करी; व त्यांस देवाप्रमाणें मानी. कोणी साधु गांवांत आला असतां त्यास सामोरा जाऊन व नमस्कार करून आग्रहानें आपल्या घरीं घेऊन येत असे. मग इच्छाभोजन देऊन वस्त्रें अलंकार शक्तिप्रमाणें देई; ह्यामुळें जवळची दौलत नाहींशी झाली तेणेंकरून तो चिंतेंत पडला. त्याची कीर्त्ति ऐकून साधुसंत घरीं येत; पण त्यांची पूर्वीप्रमाणें बर्दास्त राखणें जड जाऊं लागलें. व आदरातिथ्य न करतां परत गेले तर सत्वाची हानि होईल असा तो पेंचांत आला. मग तो चोराचें सोंग घेऊन प्रवासी लोकांचें द्रव्य हरण करूं लागला. तो धमकी देऊन घाबरवी; परंतु कोणास ठार मारीत नसे. साधुसंतांना उपद्रव दिल्यावांचून जाऊं देई. अशा रीतीनें तो जें द्रव्य आणी, तें साधुसंतांच्या कामीं लावीत असे. ह्या पुण्याचा अंश ज्याचें द्रव्य त्यासच मिळो असेंही तो ह्मणे.

असा क्रम चालत असतां एके दिवशीं त्याकडे पुष्कळ साधु आले; तेव्हां मात्र तो अति संकटांत पडला. मग धनुष्यबाण घेऊन अरण्यांत गेला; परंतु त्या दिवशीं शिकार साधेना व साधु उपाशीं रहातील ह्मणून काळजींत पडला. इतक्यांत वैकुंठवासी सारंगधर सावकार बनून रुक्मिणीसहित गाडींतून जात आहेत असें कौतुक करून ते प्रगट होतांच हरिपाळास संतोष झाला. मग आडवा होऊन धनुष्य बाण लाविला, आणि जवळचें सर्व द्रव्य दे नाहींतर आतांच प्राण घेतों असा दम देऊं लागला. तो ऐकून रुक्मिणीकांत दीन होऊन काकुळतीस आला; पण त्याणें तिकडे लक्ष दिलें नाहीं. मग देवानें

व रुक्मिणीनें आपले सर्व अलंकार त्याच्या स्वाधीन केले. अशा रीतीनें देवास नागविल्यावर त्यानें आनंदानें घरीं जाऊन संतांस उत्तम भोजन घातलें.

आतां बोलतां बोलतां तुमच्या भक्तानें माझे दागिने हिरावून नेले; पुढें कसें करावें ह्मणून श्रीहरीला रुक्मिणीनें विचारिलें. तेव्हां देवानें उत्तर दिलें कीं, आपणांस त्यानें जिवंत सोडलें हा त्याचा मोठा उपकार मान ! तो संतसेवेच्या कामासाठींच पांथस्थांचें द्रव्य हरण करितो. असें ऐकतांच त्याची ती रीतभात पहाण्याचें रुक्मिणीच्या मनांत भरलें. पुढें श्रीहरी बैरागी व रुक्मीण बैरागीण होऊन हरिपाळाकडे गेलीं; व 'जय सीताराम' असा त्यांनीं उच्चार केला. तो ऐकून हरिपाळानें साष्टांग नमस्कार करून षोडशोपचारांनीं त्यांची पूजा केली; व आज स्वामींनीं कृपा करून मला दासाला दर्शन दिल्यानें मी धन्य झालों; आतां आपली काय इच्छा असेल ती कळवावी ह्मणून सांगितलें. असें ऐकतांच वेषधारी वैराग्यानें आपणांस एका चोरानें लुटल्याचें सकल वर्त्तमान निवेदन केलें. तेव्हां तो ह्मणाला, तुह्मांस लुटणाराचा मी अरण्यांत जाऊन प्राण घेतों. हें ऐकून भगवंतानें सावकाराचें रूप धरिलें; तेव्हां हरिपाळ ओशाळा पडला. त्यास अनुताप होऊन तो रडूं लागला व अज्ञानपणानें आपली ओळख न पटल्यामुळें आपल्या हातानें झालेल्या महा अपराधाची क्षमा करण्यासाठीं विनंती करूं लागला. त्याणें ते सर्व अलंकार परत देऊन रुक्मिणीच्या अंगावर घातले. शेवटीं पांडुरंगानें प्रसन्न होऊन आपलें चतुर्भुज रूप प्रगट करून हरिपाळास दर्शन दिलें व आजपासून तुझ्या घरीं रिद्धिसिद्धि रावतील; तूं खुशाल संतांची सेवा करीत जा; असें बोलून देव रुक्मिणीसह अंतर्धान पावले.

## जसू.

हा कुणबी भाविक होता. तो श्रीहरीचें भजन करी; व अतितांस अन्न घाली. त्याचे दोन बैल होते ते रात्रीं चोरांनीं नेले. मग देवानें दुसरे बैल निर्माण केले. त्यांस त्यानें शेतांत नेऊन नांगरास जुंपिलें

हें पाहून चोर विस्मित झाले व त्यांनीं चोरून नेलेले बैल जाऊन पाहिले तों ते बांधिलेल्या जागीं तसेच होते. मग चोरांनीं चारदां त्याचे बैल नेले, तरीं पुनः देव तेथें दुसरे बैल निर्माण करी. मग चोरांना पश्चात्ताप झाला. त्यांणीं जसूस सकळ सविस्तर वर्त्तमान विदित करून त्याचे पाय धरिले; व त्याचा अनुग्रह घेऊन ते त्याच्या सेवेस राहिले.

## धनाजाट.

हा कुणबी लहान असतां एकदां त्याच्या घरीं साधु गेले. त्यांचें देवतार्चन पाहून त्यानें साष्टांग नमस्कार घातला व पूजा करावयास त्यांच्याजवळ शाळिग्राम मागितला. तेव्हां त्यांणीं त्यास एक काळा गोटा दिला. त्याची तो प्रेमानें पूजा करी. तो गाई चारावयास जाई, तेव्हां तो शाळिग्राम बरोबर नेत असे. तो तेथें स्नान करून देवास रानफुलें वाहून पूजा करी; सिदोरीचा नैवेद्य दाखवी, तो देव खाई; मग उरलेली नैवेद्यापैकीं भाकर आपण खाई. त्यास बाळपणापासूनच ईश्वरप्राप्ति झाली. एके दिवशीं शेतांत जातांना त्यास पुष्कळ साधु भेटले. ते त्यास ह्मणाले, आह्मीं भुकेलेले आहों; तुझी कीर्त्ति ऐकून आलों आहों. दुष्काळ पडल्यामुळें कोणी अन्नदाता राहिला नाहीं. हें ऐकून तो विचारांत पडला. घरीं धान्य नव्हतें ह्मणून त्यानें पेरावयाकरितां ठेविलेलें गव्हांचें बीं दळावें असें मनांत आणून घरीं गेल्यावर गहूं दळून वैष्णवांना भोजन घालून तृप्त केलें. तेव्हां त्यांणीं त्यास आशीर्वाद दिला कीं, जो देवाधिदेव रुक्मिणीकांत तो तुला निरंतर साह्य असो; तुझ्या सत्वाची हानि कदापि न होवो; व तुझी सत्कीर्त्ति पसरो. असा आशीर्वाद देऊन साधु गेले. तेव्हां धनाजाटास संतोष वाटला; परंतु निंदकांना हें करणें सहन न होऊन मनास वाटेल तसें ते बोलूं लागले. प्रपंच साधून परमार्थ साधणें रीतीची गोष्ट होय, पण यानें मुद्दलच बुडविलें. त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं असें लोक बोलत, तरीं तो हळहळला नाहीं; ह्मणून त्यास वैकुंठनाथाची प्राप्ति झाली. मग शेतांत काय पेरावें ह्याची घरच्या मनुष्यांना काळजी लागली, पण त्याचा सर्व भरंवसा ईश्वरावर; ह्मणून तो प्रेमानें

नामस्मरण करूं लागला. तेव्हां जो भक्तवत्सल वैकुंठनाथ, त्याणें स्वतः शेतांत गहूं पेरला. दुसरे दिवशीं लोकांनीं शेतांत गहूं उगवलेला पाहिला; तेव्हां त्यांना नवल वाटलें व त्यास ईश्वर पावला असें ते ह्मणूं लागले. पुढें पीक पुष्कळ आलें, तेंही त्यानें सत्कारणीं लाविलें; येणें-करून त्याची फार सत्कीर्त्ति झाली.

## सुखानंद.

हा ब्राह्मण श्रीहरीचें भजन करी. साधुसंतांचा आदरसत्कार करी. तो अगदीं भोळा असे. विष्णूचा नैवेद्य हा महाप्रसाद, तो कोणीं आणिला असतां कांक्षा घेतल्यावांचून प्रीतीनें भक्षण करी. त्याच्या बायकोचें नांव सुरसुरी, ही देखील भाविक असून पतिव्रता होती. त्यांस हरिप्रसादाशिवाय दुसरी अपेक्षा नव्हती.

एकदां कुटिल लोकांनीं अविचार करून बाजारांतून जिलब्या, वडे विकत घेतले व सुखानंदाकडे जाऊन सांगितलें कीं, आह्मीं हरि-मंदिरांत जाऊन तुमच्याकरितां हा हरिप्रसाद आणिला आहे. तेव्हां तो त्याणें आनंदानें भक्षण केला. असें पाहून ते हंसूं लागले व ह्मणाले, आह्मीं हें बाजारांतून आणिलें; तुह्मीं ब्राह्मण सुज्ञान असून हें अनुचित केलेंत. हरिप्रसादास विटाळ नाहीं; परंतु बाजारांतलें अन्न कसें भक्षण केलें? आतां प्रायश्चित्त घ्या; नाहींतर जातीबाहेर ठेवूं. असें निंदकांचें भाषण ऐकून त्यानें तोंडाशीं हात नेऊन जिलब्या, वडे जसेच्या तसेच बाहेर काढिले. तेव्हां हे पदार्थ एक घटिका झाली तरी जसेच्या तसे कसे निघाले ह्मणून त्यांना विस्मय वाटला; व आह्मीं तुमचा व्यर्थ छळ केला असें ह्मणून ते त्याच्या पायां पडले.

तीं उभयतां नवराबायको एकमतानें वागत असतां एके दिवशीं यात्रा करावयास सुखानंद मथुरेस गेले. संतसेवेंत अंतर पाडूं नको असें जातांना तिला सांगून ठेविलें होतें. पुढें एक बैरागी त्याच्या घरीं आला. त्याची सुरसुरीनें नमस्कार करून प्रेमपूर्वक पूजा केली. पण त्या सुंदर स्त्रीस पाहून तो कामातुर झाला; व आपल्यास अनु-कूळ व्हावें ह्मणून तो तिला उघड बोलला. तेव्हां तिनें सांगितलें

कीं, हें कार्य रात्रीस होईल; आतां भोजन करावें. हें ऐकून तो खुषी झाला. मग प्रहर रात्र झाल्यावर एकांतीं शेज तयार करून सुरसुरीनें एकाग्र मन केलें व स्वपतीचे पाय चित्तांत आठवून त्यास आंत बोलाविलें. तो आंत जावयास निघाला; पण सुरसुरी त्यास वाघीण दिसूं लागली. तेव्हां तो अगदीं भिऊन गेला व ह्मणूं लागला कीं, अमृत पिण्यास घेतलें असतां विष निघावें; रत्नहार ह्मणून गळ्यांत घातला असतां सर्प व्हावा; तद्वत् ही गोष्ट झाली. ती सुरसुरी क्रोधानें डोळे वटारून गर्जना करूं लागली, तेव्हां तो विरघळून गेला. तो घडलेल्या अपराधाची आपणास क्षमा करण्यासाठीं तिची प्रार्थना करूं लागला. त्यानें तिला मातोश्री ह्मणून साष्टांग नमस्कार घातला. शेवटीं आपण बाहेर जाऊन स्वस्थ निजला. मग ती पूर्ववत् झाली. त्या घरीं तो निरंतर षड्रिपू जिंकून सेवेस राहिला. चार महिने झाल्यावर सुखानंद यात्रेहून परत आला; त्यास त्यानें आपला अन्याय निवेदन केला. मग त्याणें त्याच्याकडे कृपादृष्टीनें अवलोकन केलें; तेणेंकरून त्यास साक्षात्कार झाला व तोही निरंतर सप्रेम भजन करूं लागला.

## माधवदास.

हा ब्राह्मण महा पंडित होता. तो वेदशास्त्रांत निपुण असे. तो विरक्त असल्यानें प्रपंचाकडे त्याचें लक्ष नसे. पुढें त्याची स्त्री मरण पावली, तेणेंकरून तो दुःखी झाला नाहींच; उलट संसारबंधन सुटलें ह्मणून समाधान पावला. नंतर त्यानें दागिने, भांडीं, चिरगुटें वगैरे सर्व ब्राह्मणांस वांटून टाकिलें. अशा रीतीनें आशापाश तोडून तो तीर्थयात्रेस निघाला, तो जगन्नाथास गेला. त्या महातीर्थास गेल्यावर समुद्रतीरीं स्नान करून विष्णुमंदिरांत गेला; आणि मला अनाथाला तुझ्यावांचून दुसरें कोणी नाहीं अशी प्रार्थना करून पायां पडला. त्यास पुजाऱ्यांनीं तेव्हां सांगितलें, तूं देवास उपद्रव करूं नको. देवाला एक पैसाही न देतां फुकटचा नमस्कार मात्र वारंवार करितोस ! असें बोलून त्यास बाहेर काढून लाविलें.

मग तो एकीकडे जाऊन बसला; पण परमेश्वरानें सगुणरूपानें दर्शन द्यावें अशी त्याची इच्छा होती. तो म्हणे कीं, देवा, माझ्यापाशीं द्रव्य नाहीं; सेवा, भक्ति हीं मला घडलीं नाहींत; कोणत्या रीतीनें तुझी पूजा करावी, हें कांहींएक मला ठाऊक नाहीं; मी बाह्यात्कारें मात्र तुझा दास म्हणवितों; अशी अनेक प्रकारें प्रार्थना करी. तो अन्नपाण्यावांचून नामस्मरण करी. त्यास तीन उपास घडले. त्या वेळीं त्यानें देहाचीसुद्धां आस्था सोडिली. असा त्याचा निर्धार पाहून रुक्मिणीकांतास संकट पडलें. त्यानें रुक्मिणीस सांगितलें कीं, माधवदासास तीन उपोषणें घडलीं; ह्यास्तव त्यास लौकर जाऊन जेवावयास घाल. मग ती विश्वजननी सुरस अन्नाचें ताट घेऊन त्याजवळ गेली व त्यास देहभान नव्हतें ह्मणून तिनें त्यास सावध केलें; तेव्हां तें सुंदर स्वरूप पाहून तूं कोण आहेस म्हणून त्याणें तिला विचारिलें. त्यावर ती म्हणाली कीं, तूं सर्वकाळ ज्याचें ध्यान करितोस त्याची मी अर्धांगी आहें; मला रुक्मीण म्हणतात. तुला जेवायास घालण्यासाठीं मला त्या वैकुंठनाथानें पाठविलें आहे; तर अनमान न करितां भोजन कर. तुला देवाचेंही साक्षात् दर्शन लवकरच होईल. असें आश्वासन देतांच तो तिच्या पायां पडला. मग त्यानें भोजन केल्यावर जगन्माता रुक्मीण अदृश्य झाली; पण सुवर्णाचें ताट व रत्नजडित झारी तेथेंच राहिली, ती त्यानें धुऊन आंथरुणाशीं ठेविली.

प्रभातसमयीं पुजारी देवळांत कांकडआरती करावयास आले; तों ताट व झारी नाहींशी पाहून त्यांणीं चोरी झाल्याचा बोभाटा केला. मग चोरीचा थांग लावूं लागले असतां माधवदासाजवळ त्या जिनसा मिळाल्या. त्या वेळीं त्यांणीं त्याची अनेक प्रकारचीं दुरुत्तरें बोलून फजिती केली व लागलेंच त्यास बांधून एका कोठडींत नेऊन टाकिलें.

तुह्मीं माधवदासास व्यर्थ छळतां; त्यानें तीन उपोषणें केलीं, ह्मणून रुक्मीण त्यास जेवायास घालण्यास गेली; ती परत येतांना ताट व झारी आणण्यास विसरली ; असा पुजाऱ्यांना स्वप्नांत दृष्टांत झाला. मग त्यांनीं माधवदासाजवळ जाऊन त्यास सोडून त्याच्या पायां पडून माफी मागितली. पुढें त्यास नेऊन देवाच्या पायांवर घातला व प्रसाद दि-

ला. तेव्हांपासून त्याला देवाचा नैवेद्य येऊं लागला व लोक हा भगवद्भक्त आहे असें मानूं लागले.

पुढें एके दिवशीं रात्रीस देवळाच्या बाहेरचे दरवाजे बंद करतेवेळेस माधवदासास पुजाऱ्यांनीं बाहेर जावयास सांगितलें; पण तो ध्यानस्थ होता ह्मणून न ऐकतां तसाच आंत राहिला. पुढें सावध झाल्यावर त्यास थंडी वाजूं लागली ह्मणून देवानें सकलाद त्याच्या अंगावर घातली.

सकाळीं पुजारी शयनगृहांत जाऊन पहातात तों पलंगावर सकलाद नाहीं. मग बाहेर सभामंडपांत आले तों त्यांनीं ती माधवदासाच्या अंगावर पाहिली. तेव्हां, देवाच्या खोलीला कुलुपें असतां आंतील सकलाद बाहेर त्याच्या अंगावर कशी आली? हें श्रीहरीचें लाघव होय; असें समजून सर्व लोक त्यास पूज्य मानूं लागले. राजासुद्धां सर्व त्याच्या पायां पडूं लागले. अशी मानमान्यता वाढतांच माधवदास उदास झाला व तेथून मथुरेस गेला.

मथुरेंत कृष्णनाथाच्या देवळांत गेल्यावर त्यानें प्रथम महाद्वारांतून देवास नमस्कार घातला. मग अंतरमंदिरांत जाऊं लागला असतां पुजाऱ्यांनीं अडथळा केला; व धक्के देऊन त्यास ते बाहेर काढूं लागले. मग तो देवास मनोमय नमस्कार करून बाहेर गेला; व चीरघाटावर जाऊन श्रीकृष्णनाथ ध्यानांत आणून भजन करीत बसला. इतक्यांत तेथें श्यामसुंदर, चतुर्भुज, पितांबरधारी, सुंदर व मनोहर असें रूप आहे जिचें अशी श्रीकृष्णाची मूर्त्ति प्रगट झालेली पाहून माधवदासानें पायीं मिठी घातली. मग देव त्यास पोटाशीं धरून समजूत करूं लागला कीं, तूं माझा प्राणसखा आहेस हें पुजाऱ्यांस ठाऊक नव्हतें; ह्मणून तुला बाहेर घालविलें. तूं रुसून आलास ह्मणून मला चैन पडत नाहीं; ह्मणून मी तुजकडे आलों.

त्याच रात्रीस पुजाऱ्यांना श्रीकृष्णानें दृष्टांतानें दर्शविलें कीं, मी माधवदासाबरोबर चिरघाटीं आहें तेथून तुम्हीं त्यास समजावून आणा; ह्मणजे मी देवळांत येईन. मग त्यांणीं माधवदासास समजावून देवळांत आणिलें. तेव्हांपासून सर्व लोक त्यास मानूं लागले. तो

चार महिने तेथें राहून मग गोकुळवृंदावनावरून जगन्नाथास गेला.

पुढें माधवदासास हगवणीचा उपद्रव झाला; तेव्हां तो समुद्रतीरीं जाऊन बसला. त्याच्यानें ये जा होईना; शक्ति क्षीण झाली; तेव्हां देवानें शौचास उदक नेऊन द्यावें व चिरगुटें धुऊन आणावीं. तेव्हां माझा हा रोग बरा करण्याचें तुझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं काय ह्मणून त्यानें विचारिलें असतां, शरीरभोग भोगला पाहिजे; अझून चार दिवसांनीं तूं बरा होशील; असें देवानें त्यास सांगितलें त्याप्रमाणें तो बरा झाला.

पुढें एक पंडित जगन्नाथक्षेत्रास आला. तो माधवदासास ह्मणाला, तुह्मीं वेदांत प्रविण आहांत; ह्मणून दोन शब्द बोलण्याची माझी मर्जी आहे. तेव्हां तो, बरें आहे, असें बोलून तांब्या घेऊन शौचास गेला; परंतु वाद करून ब्राह्मणाचा अपमान होईल ह्मणून कसेंही करून अरिष्ट टाळण्यासाठीं त्यानें ईश्वराची प्रार्थना केली. मग श्रीहरीनें माधवदासाच्या रूपानें त्यास वादामध्यें कुंठित केलें आणि आपण अदृश्य झाला. माधवदास शौचाहून आल्यावर पंडितानें त्यास नमस्कार केला. त्यानें व इतर लोकांनींही त्यास झालेलें वर्त्तमान सांगितलें. तेव्हां हें करणें श्रीहरीचेंच ह्मणून माधवदास मनांत समजला. त्याची पंडितानें तारीफ केली व आजपर्यंत माझ्या पाहण्यांत तुमच्यासारखा पुरुष आला नाहीं, असें बोलून त्यास शरण गेला; व त्याचा सांप्रदायी होऊन त्यानें भक्तिमार्गानें आपला उद्धार करून घेतला.

---

# अध्याय ४५ वा.

## हरिव्यास, त्रिपुरदास, लाल्हनखोजी, लाडू, त्रिलोक सोनार व सजण कसाई.

### हरिव्यास.

हा भक्त मथुरेमध्यें रहात असे. तो निरंतर भजन करी. जगन्नाथाचें दर्शन घेण्याचें त्याच्या मनांत येऊन तो तेथें जावयास निघाला. त्यास मार्गांत एक सुंदर व रमणीय उपवन लागलें. तेथें तो

शिष्यांसह उतरला. मग त्यांनीं स्नानें करून स्वयंपाकाचीं भांडीं चुलीवर चढविलीं. त्या ठिकाणीं एक देवी होती, तिच्या दर्शनासाठीं पुष्कळ लोक येत. एका शुद्रानें तेथें पशु आणून त्याचा वध केला; हें पाहून हरिव्यासाचें मन विटलें. कांहीं पदरीं दोष होता ह्मणून एथें उतरण्याची वासना झाली असें त्यास वाटलें. जो कोणी दोष करतांना पाहतो तो देखील त्या पापाचा विभागी होतो; असें ह्मणून स्वयंपाक होत होता तो तसाच टाकून देऊन तेथून उपाशींच चालता झाला. त्या समयीं देवी भयाभित झाली. ती मनांत ह्मणाली, माझ्यासारख्या असंख्य दासी श्रीविष्णूकडे पडल्या आहेत; त्या देवाचा हरिव्यास अतिशय लाडका आहे. तो एथून उपाशीं जात आहे हें नीट नाहीं. त्यास समजावून आणिला तरच आपली सत्ता कायम राहील; असा विचार करून ती लागलीच निघाली ती हरिव्यासास साष्टांग नमस्कार घालून ह्मणाली, तूं माझ्या आश्रमाहून आज उपाशीं जातोस येणेंकरून महाविष्णूचा मजवर कोप होईल; ह्मणून मला भय वाटत आहें. तूं विष्णुभक्त आहेस असें मला कळलें; तर तूं तेथें परत ये. अशा प्रकारांनीं देवी त्याची प्रार्थना करूं लागली. तेव्हां हरिव्यास ह्मणाला, तुझ्या दारीं पशु मारिला, तेथें अन्न घेतल्यानें अघोर नरकवास भोगावा लागणार; ह्यास्तव जर तूं हिंसाकर्म वर्ज करशील तर आह्मीं भोजन करूं. ही हरिव्यासाची अट देवीनें कबूल करून त्यास हातीं धरून पूर्वस्थळीं आणिलें. मग तेथच्या राजास रात्रीस देवीचा स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, माझ्या दारीं कोणीं हिंसा करूं नये अशी तूं राज्यांत ताकीद दे; व वैष्णव हरिव्यासास शरण ये. असें स्वप्न पडल्यावर राजाचा थरकांप झाला. प्रातःकाळीं राज्यांत सक्त ताकीद फिरली. राजाही हरिव्यासास शरण गेला; व अनुग्रह देण्यासाठीं त्याच्या गळीं पडला. मग राज्यांत हिंसा बंद करवून त्यास उपदेश केला. हरिव्यास सहा महिनेपर्यंत तेथें राहिला. त्याचे तेथें पुष्कळ शिष्य झाले. एकादशी, हरिकीर्त्तन, नामस्मरण मोठ्या प्रेमानें लोक करूं लागले. हिंसा बंद होऊन निर्दय लोक प्रेमळ झाले. नंतर हरिव्यास जगन्नाथक्षेत्रास गेला.

## त्रिपुरदास.

हा एका राजाचा प्रधान होता; पण गुरूचा उपदेश घेतल्यानंतर सर्व कारभार सोडून तो स्त्रीसह गोकुळवृंदावनांत जाऊन राहिला. तीं उभयतां त्रिकाळ देवदर्शन घेण्यासाठीं पुजेची वेळ चुकूं देत नसत. त्यांस अनेक साक्षात्कार होत. तेथें एका राजानें ब्राह्मणांना पुष्कळ द्रव्य वांटलें. नंतर तो आपल्या नगरास गेला. त्यानें विसर पडल्यामुळें देवाची महापूजा केली नाहीं; हें वर्त्तमान त्रिपुरदासास समजल्यावर तो फार रंजीस झाला. वृक्षाच्या मुळांस पाणी न घालितां डहाळ्यांवरील पानांना घालावें, तद्वत् ही राजाची करणी झाली असें तो ह्मणे.

मग श्रीहरीला वस्त्रें करावयाचीं असें त्रिपुरदासाच्या मनांत येऊन त्याणें ही गोष्ट स्त्रीजवळ काढिली. तेव्हां ती ह्मणाली, घरांत द्रव्य नाहीं; कोणीं आणून दिलें तर तुम्हीं घेत नाहीं; मग रित्या हातीं वस्त्रें कशीं होतील? तशांत त्या वैकुंठनाथाला भरजरी वस्त्रें काय कमी आहेत? तेव्हां तो तिला बोलला, तुझें ह्मणणें खरें आहे; पण माझा तसा हेतूच आहे. मग घरांत एक दौत होती ती एका रुपयास विकून चीट घेतलें. तें देवाला पांघरविण्यासाठीं पुजाऱ्याजवळ देऊं लागला असतां त्यानें धिःकारिलें; व उणीं उत्तरें बोलून त्याचा हिरमोड केला. मग, माझ्या ह्या गरिबाच्या वस्त्राचा अंगिकार कर; अशी देवास प्रार्थना करून तें चीट देवळांत पुजाऱ्याकडे पाठवून दिलें; परंतु त्या दुष्ट पुजाऱ्यानें तें भांडाऱ्याला आंथरावयास दिलें.

इकडे असा चमत्कार झाला कीं, पाखळपूजा होतांच देवाची मूर्त्ति थंडीनें कांपूं लागली; ती कांहीं केल्या स्थीर राहीना. पुष्कळ कपडे पांघरविले; शेगडी पेटविली; परंतु फुकट. चिटावर भांडारी निजला होता त्यास दृष्टांत झाला कीं, त्रिपुरदासानें भक्तिपूर्वक दिलेलें नवें चीट पांघरवा ह्मणजे थंडी राहील. हें कळतांच त्यानें तें चीट पांघरविलें, तेव्हां मूर्त्ति हलावयाची राहिली. हा वृत्तांत त्रिपुरदासास सांगून लोक त्याच्या पायां पडूं लागले. असा भक्तीचा महिमा होय.

## लाल्हनखोजी.

हा साधु निरंतर देवाचें भजन व साधुसंतांची सेवा करून राही. त्याच्या गुरूचा स्वभाव अगदीं भोळा होता. माझ्या अंतकाळीं स्वर्गांत घंटानाद होईल व तेव्हां तुह्मांस भक्ति करावी असें वाटेल; असें तो एकदां लोकांस बोलला होता. परंतु लोकांचा त्यावर विश्वास बसला नाहीं. पुढें लाल्हनखोजी बाहेरगांवीं गेला; तो चार दिवस आला नाहीं. मग गुरूनें माझा सच्छिष्य माझ्या अंतकाळीं जवळ नाहीं असें बोलून प्राण सोडला. मागें लोकांनीं त्याच्या प्रेताची व्यवस्था लाविली. तिसरे दिवशीं लाल्हनखोजी आला. त्यास हें वर्तमान कळतांच परम वाईट वाटलें. तो ह्मणाला, मी अंतकाळीं जवळ नसल्यानें सद्गुरूस माझे हात लागले नाहींत; मजकडून सेवाचाकरी घडली नाहीं; असें बोलून चित्त स्वस्थ केलें.

गुरूच्या अंतकाळीं घंटानाद न झाल्यानें कुटिल लोक गुरूची निंदा करूं लागले. त्या वेळीं लाल्हन ह्मणला, मला रात्रीस गुरूनें दृष्टांत दिला कीं, मी वैकुंठास गेलों; पण घंटानाद तुजकरितां ठेविला आहे. ह्या भाषणावर लोकांचा विश्वास पटला नाहीं. मग लाल्हन स्नान करून आसनावर बसला; व डोळे मिटून त्यानें सद्गुरूची मूर्ति ध्यानांत आणिली, तों आकाशांत घंटानाद होऊं लागला. मग त्याणेंही 'राम राम' ह्मणून प्राण सोडिला. तेव्हां सर्वांना नवल वाटून ते त्याची स्तुति करूं लागले.

## लाडू.

हा साधु जोतपूर नगरांत असे. तो एकांतीं बसून निरंतर श्रीहरीचें ध्यान करून भजन करीत बसे. पुढें तो तीर्थयात्रेस निघाला, तो फिरत फिरत काऊर देशांत गेला. तेथचे सर्व लोक शक्तिउपासक, निर्दय, उन्मत्त व विषयांध होते. ते अनेक प्रकारच्या मद्यमांसांचे नैवेद्य देवीस दाखवीत; व मनुष्याचा बळी देत. एके दिवशीं ते बळी देण्यासाठीं मनुष्य पहात असतां, अनायासें ह्या लाडू त्यांच्या तावडींत सांपडला. त्यास लागलाच चौघांनीं धरून अंबिकेच्या देवालयांत

नेलें. त्या वेळीं त्यानें देहाची आशा सोडून श्रीहरीचें स्मरण केलें; आणि तारता मारता एक विश्वात्मा जगज्जीवन; त्यावांचून इतराची छातीं नाहीं असा मनाचा धडा केला. इतक्यांत तिघांनीं त्यास धरून चौथ्यानें तरवार उपसली; आणि शिरच्छेद करणार, इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, देवीनें विक्राळ रूप धरून चौघांना मारून टाकलें व लाडूच्या पायां पडून अपराध क्षमा करण्यासाठीं त्याची विनवणी करूं लागली. मग देवीनें सौम्यरूप धरून त्यास वर मागावयास सांगितलें असतां लाडू ह्मणाला, आजपासून मनुष्याचा बळी मागूं नको व एथें हिंसा करूं देऊं नको. तुझ्या देशचे लोक वैष्णवसांप्रदायी व्हावे. ह्या त्याच्या मर्जीनुरूप देवीनें त्यास वरदान दिलें. मग रात्रीं ह्या कर्मांच्या मनाईचा राजाला स्वप्नांत देवीचा दृष्टांत झाला; तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें. मग तो देवळांत जाऊन लाडूच्या पायां पडला. त्यास मारणारांचीं देवळांत पडलेलीं प्रेतें पाहून राजा चकित झाला.

## त्रिलोक सोनार.

हा साधु जातीचा सोनार होता. तो विरक्त असे. त्याचा बहुतेक काळ भजन, संतसेवा यांत जाई. तो दागिने करण्यामध्यें दगाबाजी न करितां निव्वळ मजुरीच्या पैशानें उदरनिर्वाह चालवी. पुढें राजाकडे लग्न निघालें. सर्व दागिने जडावाचे करावयाचे ठरलें. मग त्रिलोकापासून अफरातफर व्हावयाची नाहीं व त्याच्या सारखा दुसरा चतुर कोणी नाहीं अशी राजाची खात्री असल्यामुळें त्याणें एक रत्नजडित दागिना करावयास सांगितला. त्याच वेळीं त्यानें सुवर्ण व रत्नें त्यास दिलीं, तीं घेऊन तो घरीं निघाला; तों साधूंचा मेळा त्याच्या दृष्टीस पडला. मग त्याणें त्यांस आपल्या घरीं नेऊन दोन दिवस राहवून घेतलें, त्या गडबडीमुळें राजाचा दागिना करण्याचा त्यास विसर पडला.

तिसरे दिवशीं राजानें त्रिलोकास दागिन्याचें विचारिलें असतां त्यानें उद्यां तयार होईल ह्मणून कबूल केलें. त्या वेळीं राजा ह्मणाला, जर उद्यांची बोली चुकली तर शिक्षा करीन. तें ऐकून तो घरीं गेल्यावर चिंतेंत पडला. कांकीं, त्या दागिन्याचें काम मोठें बिकट

होतें. निदान चार दिवस लागावयाचेच. असें असतां उद्यां दागिना देण्याची केलेली बोली, आणि प्रसंग पडला आहे राजाशीं, तेव्हां तो खचित शिक्षा करील; मग साधूंच्या सेवेंत अंतर पडेल ह्मणून तो फार कष्टी झाला व अरण्यांत जाऊन सारी रात्र भजन करीत बसला.

तेव्हां रुक्मिणीकांतास संकट पडलें. त्यानें त्रिलोकाच्या रूपानें दुकानावर बसून थोड्याच वेळांत दागिना तयार केला व राजाकडे घेऊन जाऊन तो त्यास दिला. तो रत्नजडित दागीना पाहून राजानें त्याच्या चातुर्याची वाहवा केली; व खुष होऊन पुष्कळ द्रव्य दिलें. तें नेऊन श्रीहरीनें घरधनिणीजवळ ( त्रिलोकाच्या स्त्रीजवळ ) दिलें. व आज उत्साह आहे; साधुसंत यावयाचे आहेत; ह्यास्तव चांगलीं पक्वान्नें कर असें सांगितलें. ती गोष्ट तिणें आनंदानें कबूल केली. मग त्या त्रिलोकाच्या रूपानेंच श्रीहरीनें साधूंची पूजा केली. ते जेवून तृप्त झाल्यावर आपण जेवले व प्रसाद पदरास बांधून घेऊन अरण्यांत गेले.

तेथें श्रीहरीनें साधूचें रूप घेतलें व खऱ्या त्रिलोकास ह्मटलें कीं, मी मार्ग चुकून इकडे आलों. या गांवांत त्रिलोक सोनाराकडे मी आज जेवावयास गेलों होतों व दुसरेही पुष्कळ साधु होते. उत्तम पक्वान्नें केलीं होतीं; तीं फार खाल्ल्यामुळें सुस्त झालों व डोळ्यावर झोंप लोटली आणि मार्ग चुकलों. मीं तुझ्यासाठीं प्रसाद आणिला आहे, हा ग्रहण कर; अशी संपादणी करून वेषधारी साधूनें त्रिलोक सोनारास भोजनास बसविलें. मग उत्साह करण्याचें कारण काय ह्मणून विचारिल्यावर त्याणें कळविलें कीं,त्रिलोक सोनारानें एक रत्नजडित दागीना करून राजास दिला; तो पाहून राजानें खुष होऊन त्यास पुष्कळ द्रव्य दिलें. हें ऐकून त्यास विस्मय वाटला. मग तो त्यास घेऊन घरीं गेला व स्त्रीस विचारूं लागला असतां साधु गुप्त झाला. तेव्हां स्त्री ह्मणाली, हें सर्व तुह्मीं स्वतः करून असें काय विचारितां ? तेव्हां हें श्रीहरीचेंच कृत्य ह्मणून तो मनांत समजला. मग ही गोष्ट उगीच उघडकीस आणून जगांत प्रतिष्ठा वाढवून घेणें बरोबर नाहीं, असा विचार करून स्वस्थ राहिला. पुढें त्यास श्रीहरीच्या कृपेनें सर्व सिद्धि अनुकूळ झाल्या व तो संतसेवा करूं लागला.

## सजण कसाई.

हा कसाई असून परम विष्णुभक्त होता. तो हिंसा करीत नसे; व कधीं खोटें बोलत नसे. तो संसारी असून निरंतर हरिभजनांत आपला काळ घालवी. तो साधुसंतांस शिधासाहित्य देऊन तृप्त करी. त्याची स्त्री पतिव्रता होती व ती त्याच्या मर्जीनुरूप वागे. तो आपला मांसविक्रीचा धंदा करी व वजन करण्यासाठीं त्यानें शालिग्राम घेतला होता.

एके दिवशीं तो दुकानावर बसला असतां एका ब्राह्मणानें तो शालिग्राम पाहिला. मग तो त्यास ह्मणाला, हा शालिग्राम श्रीविष्णुमूर्त्ति आहे. ही तूं आपल्याजवळ ठेवूं नयेस; ती मला दे. तूं मागशील ती किंमत मी तुला देतों. मग सजण याणें तो शाळिग्राम त्यास दिला. त्या ब्राह्मणानें यथासांग पूजा करून, ब्राह्मणभोजन घालून, मोठा उत्सव करून शालिग्राम आपल्या घरीं ठेविला;पण श्रीहरीस हें आवडलें नाहीं. त्यानें रात्रीं त्या ब्राह्मणास दृष्टांत दिला कीं, मी सजणकसायाकडे सुखानें होतों, तेथून मला कां आणलेंस ? एथें मला करमत नाहीं; तेथें नेऊन दे. हें न ऐकशील तर तुझा घात होईल. मग दुसरे दिवशीं तो शालिग्राम त्या ब्राह्मणानें सजणास परत नेऊन दिला, व त्याची स्तुति केली. सजणानें शालिग्राम नसल्याकारणानें अन्नपाणी वर्ज करून उपास केले होते; मग पूजा करून पारणें सोडिलें.

पुढें तीर्थयात्रा करावयाचें मनांत येऊन सजणा जगन्नाथास गेला. पुष्कळ यात्रेकरी सोबत होते. तो भिक्षा मागून निर्वाह करी. एके घरीं तो भिक्षेस गेला असतां घरधनीण व्यभिचारीण होती, ती त्यास पाहून कामानें विव्हळ झाली. तिनें त्यास आपल्या घरीं रहावून घेतलें, व शिधा देऊन त्याचा बहुत आदरसत्कार केला. मध्यान्ह रात्रीस ती त्याच्याजवळ गेली; व त्याच्याबरोबर पळून जावयास कबूल झाली. ती गोष्ट त्याणें कबूल केली नाहीं. मग तिणें पतीचा शिरच्छेद करून मस्तक आणून त्यास दाखविलें; आणि आतां तूं माझे मनोरथ पूर्ण कर ह्मणून ह्मणाली. पण तें त्यास रु-

चलें नाहीं. नंतर, जर तूं माझें ऐकत नाहींस तर आतां मी तुझी फजिती करितें; असें बोलून बाहेर गेली आणि यानें माझा पति मारला अशी बोंब तिनें करतांच लोक धांवून आले. त्यांना ती ह्मणाली, हा साधु समजून मी यास उतरावयास जागा दिली; पण ह्यानें असें क्रूर कर्म करून माझ्या पतीचा प्राण घेतला. मग लोकांनीं त्यास पकडून सरकारांत नेलें. मग अधिकाऱ्यानें त्यास विचारिल्यावर आपण घात न केल्याचें सांगून खरी हकीकत त्याणें त्यास सांगितली; पण त्याचें ह्मणणें खरें वाटलें नाहीं. बाई व्यभिचारीण आहे हें कित्येकांना ठाऊक होतें, ह्मणून त्यांनीं ह्याचा पक्ष धरिला; व कित्तीएकांनीं बाईचा पक्ष धरिला. मग त्या सजण कसायास सोडून देण्याची धार्मिकांनीं केलेली शिफारस मान्य करून त्यास सोडून देण्याचें अधिकाऱ्याचेंही मत ठरलें. तेव्हां ती स्त्री आडवी आली व ह्मणाली, ह्याचा हात तोडून टाका; तसें न कराल तर मी राजाकडे जाऊन फिर्याद करीन. मग अधिकाऱ्यानें तिच्याच हातानें त्याचा हात तोडविला.

नंतर तो सजण कसाई मार्गस्थ झाला. त्यास टाकून यात्रा पुढें गेली होती; त्या लोकांना हा जाऊन मिळाला. ह्याचा हात तुटलेला पाहून चोरी वगैरे केल्याचा तर्क लोकांच्या मनांत आला; पण सजण स्वस्थपणें भजन करीत होता. तो जगन्नाथ क्षेत्राजवळ गेला तेव्हां असा चमत्कार झाला कीं, सजण भक्तास पालखींत बसवून आणावा असा देवाचा पंड्यांना दृष्टांत झाला. त्यावरून ते पालखी घेऊन यात्रेंत गेले, व स्वप्नांतला देवाचा दृष्टांत त्यांणीं यात्रेकऱ्यांस सांगितला. पण त्यानें पंड्यांना सांगितलें कीं, मी पालखींत बसणार नाहीं. माझा किंचित् अपराध नसतां, जगन्नाथानें माझा हात तोडविला. असें बोलून रडूं लागला व ह्मणाला, ईश्वराचा मजवर कोप कशासाठीं झाला? हा सांवळा, अनाथबंधु भक्तांना संकटसमयीं पावतो असें पुराणप्रसिद्ध असतां, आज तें खोटें असें माझ्या अनुभवास आलें. त्यास असें करावयाचें होतें तर माझा पूर्वींच कां अंगिकार केला? मीं कायावाचामनेंकरून त्याचे पाय धरिले. अशा रीतीनें तो बोलत आहे इतक्यांत श्रीहरीनें प्रगट होऊन त्यास भेट दिली. त्यानें देवाचे

पाय धरून त्यास हात तोडविण्याचें कारण विचारिलें; तेव्हां जगज्जिवनानें कथा सांगितली कीं,—तूं पूर्वजन्मीं ब्राह्मण होतास. गंगातीरीं ध्यानस्थ असतां एक गाय कसायाच्या हातांतून निसटून गेली; पण त्यानें मागून येतांच तुला विचारल्यावर तूं गाय कोठें गेली हें हाताच्या खुणेनें त्याला दाखविलेंस. मग त्याणें तेथें जाऊन तिचा वध केला. पुढें कसाई व गाय हीं नवराबायको झालीं. ती बायको नवऱ्यास नित्य गांजी. तुझा संबंध होताच ह्मणून तूं त्यांच्या घरीं आलास; तेव्हां तिणें पूर्व वैर साधून नवऱ्याचें शीर आपल्या हातानें कापून तुझ्यावर बालंट घेतलें; व तूं गाईस पूर्वजन्मीं ज्या हातानें दाखविलेंस तो हात तिणें तोडला. तूं विष्णूचें ध्यान करीत असतां कसायास पाहिलेंस, ह्मणून त्याच्या वंशांत जन्म घेतलास; परंतु तुझे ब्राह्मणाचे आचारविचार राहिले; व भक्ति व ज्ञान यांत पालट झाला नाहीं, असें सांगितलें. नंतर श्रीहरीकृपेनें त्यास लागलाच दुसरा हात फुटला. हें पाहून भक्तमंडळी आनंदानें टाळ्या वाजवून जयजयकार करूं लागली.

---

# अध्याय ४६ वा.

## नरवाहन, रायसिंग, अंगद, माधोसिंग, गुणवंती, कुंवराबाई, गिरिधरलाल व नारायणस्वामी.

### नरवाहन.

हा साधु राधाकृष्णाचा निरंतर जप करी. तो नावाडी होता व लोकांना गंगा नदींतून पार उतरीत असे. गरीब, साधु किंवा फकीर ह्यांना तो कांहीं न घेतां पलीकडे नेत असे. श्रीमंतांकडून मात्र ते आपखुषीनें देतील तितके उताराचे पैसे घेई; पण हा होऊन अमकेच पैसे द्या असें कधींही ह्मणत नसे.

एके दिवशीं गांवच्या कुटिल लोकांनीं राजास कळविलें कीं, तुह्मीं गंगेवरील नावेवर नरवाहन यास ठेविला आहे, तो सरकारांत द्रव्य न देतां घरींच नेऊन ठेवितो. हें ऐकतांच राजास क्रोध आला व

त्याणें त्याचें घर तपासण्याचा हुकूम केला. त्यावरून नोकर लोकांनीं त्याचें घर शोधून पाहिलें, जमीनही खणून पाहिली; परंतु द्रव्य सांपडलें नाहीं. मग दुतांनीं त्यास राजासमोर उभें केलें. तेव्हां दुर्जनांनीं, यानें द्रव्य कोठें दुसऱ्या ठिकाणीं ठेविलें असेल असें सांगितलें. तें ऐकून राजानें नरवाहनास द्रव्याकारितां बंदिखान्यांत ठेविलें. तो सारा दिवस उपाशीं होता. संध्याकाळीं एक दासी त्यास खावयास घेऊन गेली. तिणें, श्रीहरीचें चिंतन करा ह्मणजे संकटाचें निवारण होऊन चिंतेचें कारण रहाणार नाहीं ह्मणून सुचविलें. मग तो सगुणरूप ध्यानांत आणून अहोरात्र डोळे मिटून नामस्मरण करूं लागला. तो ह्मणे, देवाधिदेवा, मला तूं आतां या भवभ्रमापासून सोडीव. संकटांमधून असंख्य भक्तांना राखिलेंस; तसेंच माझेंही रक्षण कर असा धांवा केला.

तिसरे दिवशीं राजास दृष्टांत झाला कीं, नरवाहन माझा पूर्ण भक्त असून संतसेवेंत तत्पर असतो; त्याचा तूं छळ करून सुकृताची हानि करून घेतलीस. उन्मत्तपणानें राजनीति पाहिली नाहींस व दुष्टांच्या नादीं लागून साधूचा छळ केलास; तर आतां तूं नरवाहनास शरण जा. असा दृष्टांत होतांच राजा भयाभीत झाला, व बंदिखान्यांतून नरवाहनास सोडून त्याच्या पायां पडला; आणि अपराधाची माफी मागितली. मग ही श्रीहरीचीच करणी समजून नरवाहन आनंदानें घरीं जाऊन भजन, पूजन व संतसेवन करूं लागला.

## रायसिंग आणि अंगद.

हे उभयतां राजकुमार भाऊ भाऊ होते. यांपैकीं धाकटा अंगद होय. त्याची स्त्री भाविक व पतिव्रता होती. ती नित्य विष्णूची पूजा करी. तिणें एका विष्णुभक्त गुरूपासून उपदेश घेतला होता. एके दिवशीं त्या गुरूची स्वारी आपल्या नगरांत आली असें समजल्यावरून तिणें त्यास आपल्या मंदिरीं आणलें व त्याची ती पूजा करूं लागली. ही गोष्ट अंगदाला कळली. तेव्हां तो तिला ह्मणूं लागला, स्त्रिला पतीवांचून दुसरें दैवत नाहीं; यास्तव तुझें हें करणें व्यर्थ होय. असें सांगून गुरूची पूजा करण्याचा अटकाव केला. तेव्हां तिणें तीन

दिवस अन्नपाणी वर्ज केलें. तिच्या भक्तिस्तव श्रीहरीनें तिसरे दिवशीं अंगदास स्वप्नांत दर्शन दिलें. तें चतुर्भुज श्यामसुंदर रूप पाहून त्यानें साष्टांग नमस्कार केला. मग प्रातःकाळीं त्याणें तिची समजूत केली; व मला दृष्टांत झाला आहे असें तिला कळविलें. मग त्याणें तिच्या गुरूस आणून त्याची सर्वोपचारांनीं पूजा केली, व आपण अनुग्रह घेऊन नामस्मरण करूं लागला. तीं उभयतां साधुसंतांची सेवा करून सत्कारणीं द्रव्याचा व्यय करूं लागलीं.

ही गोष्ट वडील बंधु रायसिंग ह्यास कळली. तेव्हां त्यानें अंगदास देशावर पाठविलें. तो सैन्य घेऊन गेला व एक राजनगर लुटून पुष्कळ द्रव्य घेऊन परत आला. लुटींत त्यास शंभर हिरे मिळाले; त्यांतून एक उत्तम हिरा जगन्नाथासाठीं ठेवून बाकीचे साधूंना वांटून टाकिले. बंधूस हिरा न देतां द्रव्य मात्र दिलें. तेव्हां अमोल हिरा चोरून ठेविल्याचें सेवकांनीं रायसिंगास सांगितलें. तें ऐकून त्यानें त्याच्याजवळ हिरा मागितला असतांही त्याणें तो देवासाठीं ठेविला असल्यामुळें दिला नाहीं. त्यावरून त्यास राग येऊन अंगदास विषप्रयोग करण्याची त्याणें आपल्या बहिणीस आज्ञा केली.

एके दिवशीं त्या बहिणीनें अंगदास जेवावयास बोलाविलें. जेव्हां तिनें त्यास जेवावयास बसविलें, तेव्हां अन्नांत विष कालविलेलेंच होतें; पण त्यानें वैकुंठनायकास ध्यानांत आणून नैवेद्य दाखविला ; आणि आतां भोजन करणार इतक्यांत पांडुरंगानें त्याच्या बहिणीकडून बोलविलें कीं, तुझ्या भावानें सांगितल्यावरून अन्नांत विष कालवून तें तुजपुढें वाढलें आहें; तें तूं भक्षण करूं नको. हें ऐकून अंगद ह्मणाला, या अन्नाचा नैवेद्य मीं श्रीहरीस दाखविला आहे व त्याचा हा महाप्रसाद अवश्य भक्षण केलाच पाहिजे. नंतर 'श्रीहरि भोक्ता' ह्मणून सर्व अन्न भक्षिलें; पण ईश्वराच्या कृपेनें त्यास विषाची बाधा झाली नाहीं. मग त्याणें ही गोष्ट आपल्या स्त्रीस सांगितली. व आतां एथें राहणें अयोग्य जाणून तो स्त्रीसह जगन्नाथास जावयास निघाला. ही गोष्ट रायसिंगास कळतांच त्यानें त्यास अटकाव करण्यासाठीं सैन्य पाठविलें.

आज्ञा होतांच प्रधानानें सैन्य घेऊन अंगदासभोंवतीं वेढा दिला व तो

हिरा मागितला. तेव्हां त्यानें (अंगदानें) हिरा हातांत घेतला व सर्वांना दाखवून लागलाच डोहांत झुगारून दिला; व देवा जगन्नाथा, हा तुला पावो असें तो म्हणाला. तेव्हां ते लोक प्रधानासह उद्कांत पाहूं लागले असतां अंगद म्हणाला, तुम्हीं आतां व्यर्थ श्रम कशास्तव करितां ? तो हिरा जगन्नाथानें नेऊन आपल्या कंठांत घातला आहे; खोटें वाटत असेल तर चला प्रत्यक्ष तुह्मांस दाखवितों. हें ऐकून प्रधानास आश्चर्य वाटलें. मग अंगदासमागमें सर्व जगन्नाथास गेले; व देवदर्शनाच्या वेळीं त्यांणीं तो हिरा देवाच्या गळ्यांत पाहिला.

पुढें हा हिरा येथें कसा आला त्याचा शोध चालविला; तेव्हां पंडे ह्मणाले, एकदां दोन प्रहरीं हिरा देवासमोर पडलेला होता, त्यास आज चार दिवस झाले. आह्मीं उचलून ठेविला. पण पुढें 'तो रत्नमाळेमध्यें ओंवून घालावा, कांकीं हा माझा भक्त राजा अंगद याणें मला अर्पण केला आहे' असा आह्मांस देवाचा दृष्टांत झाला; त्यावरून हा हिरा रत्नमाळेंत ओंविला आहे. हें ऐकून सर्वांना विस्मय वाटला. मग प्रधानानें पत्रद्वारें रायसिंगास हें सर्व वर्त्तमान लिहून पाठविलें.

पत्र पाहिल्यावर भावाचा व्यर्थ छळ केला ह्मणून रायसिंगास पश्चात्ताप झाला. त्याणें त्यास पत्र लिहून पाठविलें कीं, तूं साक्षात्कारी विष्णुभक्त आहेस हें मला ठाऊक नव्हतें. मी नाशिवंताची आशा धरून तुझ्याशीं वैर मांडिलें; परंतु आतां मनांत अढी न ठेवितां ममता धरून भेटीस यावें. न ऐकशील तर तुला जगन्नाथाची शपथ आहे, असें पत्र लिहून दुतासमागमें पाठविलें. तें पत्र पाहून अंगदास आश्चर्य वाटलें. त्याणें हात जोडून देवाची प्रार्थना केली कीं, तूं अनाथबंधु आहेस; तुझ्या कृपेनें शत्रु देखील मित्र होतात, हें माझ्या अनुभवास आलें. अशी स्तुति करून व देवाचा निरोप घेऊन अंगद आपल्या गांवीं गेला. मग रायसिंगही विष्णुभक्ति करूं लागला.

## माधोसिंग व गुणवंती.

माधोसिंग राजाची स्त्री गुणवंती परम भाविक होती. ती पृथु राजाची कन्या होय. तिला एक पुत्र झाला, तेव्हां राजानें तिच्या सेवेस एक दासी

ठेविली, ती नामस्मरण करीत असे; ह्यामुळें तिचे ओंठ हालत असत. मग तूं कोणता जप करितेस तो सांग ह्मणून राणीनें तिला विचारलें. तेव्हां ती ह्मणाली, ह्या नाशिवंत देहाचा क्षणांत नाश होऊन जावयाचा ह्मणून मी श्रीहरीचें स्मरण करितें. पुढें राणीच्या आग्रहावरून मंत्र सांगण्याचें दासीनें कबूल करून तिजकडून स्नान करविलें; विष्णूची पूजा करविली; व श्रीकृष्णाचें ध्यान करावयास राणीस सांगितलें. तो बोध मनांत पूर्ण ठसून राणीची वृत्ति श्रीकृष्णचरणीं जडली; व तिला सर्व कामांचा, मुलाचा व नवऱ्याचा सुद्धां विसर पडला. अशी स्थिति होण्याचें कारण काय ह्मणून राजानें तिला विचारिल्यावर तिणें त्यास सर्व खरा प्रकार विदित केला. शेवटीं असें सांगितलें कीं, मला श्रीकृष्णाचा निजध्यास लागलेला आहे; परंतु अजून देवाचें साक्षात् दर्शन झालें नाहीं. हें ऐकून राजा संतापला व डोळे वटारून तिजकडे पाहूं लागला. तेव्हां तिनें भयाभीत होऊन डोळे मिटले तों चतुर्भुज श्यामसुंदर मूर्त्ति तिला दिसली. मग तिणें श्रीकृष्णास नमस्कार केला. तेव्हां देवानें तिच्या मस्तकावर हात ठेवून तुझा रक्षणकर्त्ता मी आहें; संकटसमयीं देखील तूं चिंता करूं नकोस असें अभय दिलें. परंतु ही गोष्ट राजाच्या समजण्यांत आली नाहीं. त्याणें तिला आजपासून साधुसंत घरीं न आणण्याची सक्त ताकीद दिली; व दासीलाही तसेंच बजावून सांगितलें आणि आपण बाहेरगांवीं गेला.

मग राणी त्या दासीकडून संतांचें तीर्थ चोरून आणवी, व विष्णुस्मरणीं तत्पर राही. ही गोष्ट प्रधानाच्या कानावर गेली. तो मोठा अभक्त होता. त्याणें हा सर्व प्रकार राजाला लिहून पाठविला; तेव्हां राजा अति रागावला. इकडे राणी बैरागीण झाली. तिणें आपले केश उतरले; बांगड्या फोडून टाकिल्या. ती गोपीचंदनाचे टिळे लावी; साधुसंतांस घरीं आणून त्यांची पूजा करी. हेंही वर्त्तमान प्रधानानें राजास कळविलें; तेव्हां अधिकच संतापून त्याणें तिला ठार मारून टाकण्याचा चार मारेकऱ्यांस हुकूम केला.

इकडे राणी गुणवंती विष्णुमंदिरांत पूजा करावयास गुंतली होती; ह्मणून ते मारेकरी तिची बाहेर येण्याची वाट पहात टपत बसले होते.

ही गोष्ट गुणवंतीस माहीत नाहीं; असें पाहून देवाधिदेव वैकुंठनारायण वाघाच्या रूपानें तेथेंच प्रगट झाला. तिणें त्याची पूजा केली. मग संतांची सेवा करण्यास बाहेर आली. व मारेकरी तिला धरूं लागले असतां वाघानें त्या चारी मारेकऱ्यांस ठार मारिलें; व देवळांत आपण जाऊन अदृश्य झाला. हेंही वर्तमान माधोसिंग राजास कळलें. मग पश्चात्ताप पावून गुणवंती राणीला लागेल तो खर्च देण्यास प्रधानास लिहून पाठविलें आणि आपणही मागाहून भावासुद्धां घरीं येण्यास निघाला. येतांना एका नदीमध्यें होडी बुडूं लागली, असें पाहून त्यांनीं गुणवंतीचें स्मरण केल्याबरोबर ते सुरक्षित स्वनगरास आले. माधोसिंगाच्या थोरल्या भावानें तिच्या पायां पडून आह्मीं तुझ्या नांवावर नदींतून पार पडलों ह्मणून तिला सांगितलें. मग तेही उभयतां संतसेवा करूं लागले.

## कुंवराबाई.

ही राजाच्या उपाध्याची कन्या होती. ही लहानपणापासून विष्णुभक्ति करी. तिचा नवरा तिला न्यावयास आला तेव्हां ती सासरीं जाईना. ती विरक्त असल्यानें, पुढें पतीसंगेंकरून संतती व्हावी, मायापाशांत पडावें व अनेक यातना भोगून आत्मसुखास अंतरावें; हें तिला आवडेना. यास्तव ती दोनप्रहर रात्रीस आपला दागदागिना घेऊन बाहेर पडली. त्या वेळीं वेशीचा दरवाजा बंद होता, तरी श्रीकृष्णाचें स्मरण करतांच तो उघडला. मग ती नगराबाहेर पडली व भिकाऱ्याचा वेष घेऊन थेट वृंदावनास गेली. तेथें चिरघाटावर स्नान करून श्रीकृष्णाचें दर्शन घेतलें; भवबंधनापासून सोडविण्यासाठीं श्रीकृष्णाची प्रार्थना केली; व पायां पडून सर्व दागिने साधुसंतांस वांटून टाकिले. मग सगुणरूपानें देवानें तिला दर्शन दिलें; व मस्तकावर हात ठेवून निर्धास्तपणें राधाकुंडावर बसावयास सांगितलें. तिची देवानें स्वतः जेवणाखाण्याची व्यवस्था ठेविली.

इकडे तिचा बाप शोध करीत करीत वृंदावनास गेला, तेथें त्यानें तिला पाहिलें. तेव्हां तूं आमचें तोंड काळें केलेंस वगैरे तो तिला बरेंच बोलला. तें ऐकून ती त्यास बोध करूं लागली कीं, तुमची साठी उलटून गेली असून तुह्मांस अझून संसाराची इच्छा आहेच !

हा देह नाशिवंत असून माया मिथ्या आहे; तर विरक्त होऊन श्रीकृष्णाचें तुह्मीं चिंतन करा. मग तो तिच्या मतास अनुकूळ झाला; व सासरीं न जातां घरीं निर्भयपणें श्रीहरीचें चिंतन करण्याची तिला परवानगी देऊन घरीं येण्याविषयीं आर्जव करूं लागला. त्याच्या बरोबर जाण्यासाठीं तिला रात्रीं श्रीहरीचा दृष्टांत झाला; व मी संकटीं तुला रक्षीन असा देवानें वरही दिला.

नंतर ती बापाबरोबर घरीं गेली. ती नित्य विष्णूची यथासांग पूजा करी. साधुसंतांच्या पायां पडून त्यांना पुजी. रात्रीस हरिकीर्त्तन होई. तिची कीर्त्ति सेखावत राजानें ऐकली. त्यानें तिचें हें करणें पसंत करून तिच्या बापाजवळ तिची प्रशंसा केली. पुढें तो तिजकडे गेला, त्या वेळेस कीर्त्तन चाललें होतें. पुष्कळ भाविक लोक बसले होते, त्यांमध्यें राजा जाऊन बसला. पण कुंवराबाईचें लावण्यरूप पहातांच राजा कामातुर झाला. त्यास तिचा ध्यास लागल्यानें झोंप येऊं लागली. त्या वेळीं त्यास असें स्वप्न पडलें कीं, एक महा नदी तुडुंब भरून चालली आहे; व पलीकडच्या बाजूस कुंवराबाई उभी राहून मला बोलावित आहे. इतक्यांत राजा जागा झाल्यावर त्यास पश्चात्ताप झाला, व भवनदीपलीकडे कुंवराबाई गेली पण 'मी कसा जाईन' हा विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. त्या समयीं तो तिला शरण गेला व तिचा अनुग्रह घेऊन श्रीविष्णूची भक्ति करूं लागला.

## गिरिधरलाल.

हा साधु विरक्त असून रात्रंदिवस श्रीहरीचें नामस्मरण करीत असे. तो देवांचीं सोंगें आणून आळवीत असे. एके दिवशीं त्याणें रास(खेळ) आरंभिला. तो पहावयास पुष्कळ लोक आले होते. त्याणें प्रारंभ करण्यापूर्वीं देवास नमस्कार करून, सोंगांचीं वस्त्रें विसरून आलों, आतां घरीं जाऊन तीं घेऊन येण्यास विलंब लागेल असें देवास सांगितलें व देवाच्या तोंडाकडे पाहूं लागला, तों भरजरी वस्त्रें पुढें पडलीं. हा चमत्कार पाहून सर्वांनीं त्यास नमस्कार केला. त्या दिवशीं खेळास अपार रंग येऊन लोक तटस्थ झाले.

दुसरा एक अद्भुत चमत्कार असा झाला कीं, संतसेवेहून विशेष साधन नाहीं; ह्या समजुतीनें गिरिधरलाल साधूंची पूजा करून तीर्थ घेत असे. असा त्याचा क्रम बरेच दिवस चालला. पुढें एक साधु मेलेला होता, त्याची ह्यानें पूजा करून तीर्थ प्राशन केलें. हें ब्राह्मणांनीं पाहून त्याची फजिती केली; व प्रेताचें तीर्थ घेतलें ह्मणून त्यास बराच ठपका दिला; व तुझ्या योगानें वर्णसंकर होईल असें बोलून दाखविलें. तेव्हां गिरिधरलालानें त्यांना उत्तर दिलें कीं, जगाचा उद्धार करण्याकरितांच संतांनीं अवतार घेतले आहेत; ते जन्ममृत्युविरहित असून चैतन्यव्यापक आहेत. हें ऐकून ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, जर असें आहे तर प्रेत उठवावें ह्मणजे आह्मी खरें मानूं; नाहींतर अपंक्त करूं. असें ऐकतांच डोळे मिटून श्रीकृष्णाचें चिंतन केलें. त्या वेळीं प्रेत उठून बसतांच सर्व लोक त्याची स्तुति करून पायां पडले.

## नारायणस्वामी.

हा संन्यासी होता. भक्ति, ज्ञान, वैराग्य हीं तिन्हीं ह्याच्या अंगीं पूर्ण असत. ह्यानें षड्रिपूंना जिंकिलें होतें. तो परमहंसदीक्षेनें वागे. तो राजापासून रंकापर्यंत सर्वांस ब्रह्ममय मानी. एकदां असें झालें कीं, तो सिंहस्थाच्या यात्रेस सोबतीसोबतीनें नाशिकत्र्यंबकास गेला. तेथें गिरिपुरी भारती संन्याशाच्या मठांत नारायणस्वामी दिगंबरवृत्तीनें भिक्षेस गेले. तेव्हां भारती संन्याशानें यास परमहंस जाणून आपल्या बाजूस बसवून भोजनाचा आग्रह केला. तो जेवावयास बसल्यावर सर्व अन्न वाढिलें तरी तो पुरे ह्मणेना. आचाऱ्यानें केलेला सर्व स्वयंपाक पार झाला; असा अचाट जेवणारा पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. पाणी पिण्याचें राहून गेल्यामुळें शिष्यांनीं आणून दिलें असतांही तें न पितां तो अरण्यांत निघून गेला व एका वृक्षाखालीं निजून राहिला. मग त्या महंतानें कांहीं शिष्यांस त्याच्यावर नजर ठेवण्यासाठीं सांगितलें. त्यावरून ते रांजणभर पाणी घेऊन त्याच्याजवळ बसून राहिले; पण तीन दिवस झाले तरी तो उठला नाहीं. चौथ्या दिवशीं जागा झाल्यावर पाणी देऊं लागले; परंतु तो प्याला नाहीं. मग क्षेत्रांत जाऊन एका

मोरींतील घाणेरें पाणी पखालभर प्याला; हें पुष्कळांनीं पाहिलें.

एकदां त्र्यंबकेश्वरावर कांहीं ब्राह्मण लघुरुद्र करीत बसले होते, त्यांस तुम्ही काय करीत आहां असें नारायणस्वामीनें विचारिलें; तेव्हां देवास अभिषेक करीत आहों असें त्यांनीं उत्तर दिलें. मग मी अभिषेकपात्र धरितों, असें बोलून पिंडीवर लघुशंका केली. हें अघटित कृत्य पाहून लोक हंसूं लागले. पुढें ब्राह्मणांनीं त्यास खडसून बजाविलें कीं, आमचा लघुरुद्र संपेपर्यंत लघुशंकेची धार खंड होईल तर इंद्रिय कापून टाकूं. मग लघुरुद्र पुरा झाला तरी मूत्रधार आंखडली नाहीं; तेव्हां त्याची वृत्ति पाहून हा साक्षात् कैलासनाथ होय असें लोक बोलूं लागले.

त्याचा आणखी एक चमत्कार असा कीं, नाशिकाहून एक गृहस्थ सकुटुंब त्र्यंबकेश्वरास जात होता; तों ओझ्यानें त्याचें घोडें वाटेंत मेलें. बरोबरची यात्रा निघून गेली. तेव्हां तो एकटाच मुलांमाणसांस घेऊन तेथेंच बसून राहिला होता, इतक्यांत नारायणस्वामी तेथें गेला. त्यास सर्व मजकूर सांगितल्यावर त्याणें त्या वेळेसच घोड्यास उठवून त्यास त्यांच्या घरीं नेऊन पोंचविण्याची आज्ञा केली. मग तो घोडा त्यांस घेऊन घरीं गेला. पुढें मालकानें त्यावरचें ओझें उतरून ठेवतांच घोड्यानें प्राण सोडिला.

---

# अध्याय ४७ वा.

## रामकृष्ण, रामचंद्रभट, काजी महंमद, बलखबुखारी, शेखफरीद व नारायणभट.

### रामकृष्ण.

हा साधु परम भाविक होता. तो सर्व विश्व आत्मवत् मानून पांडुरंगाचें चिंतन करीत असे. तो उपदेश करीत फिरत असतां एकदां बडोद्यास आला; तेथें त्याचे पुष्कळ शिष्य झाले. एका बाईनें आपल्या नवऱ्यास न कळूं देतां त्याचा उपदेश घेतला. ही गोष्ट

तिच्या नवऱ्याच्या कानावर गेली; त्यावरून त्यानें मी बाहेरगांवीं कामाकरितां चार दिवस जातों. असें सांगून तो तळघरांत तिच्या न कळत लपून बसला. त्याचा हेतु असा होता कीं, मी नाहीं असें समजून ती आपल्या गुरूस घरीं आणील; ह्मणजे त्यास शिक्षा करतां येईल.

त्याची स्त्री भाविक होती. तिणें ही वेळ साधून गुरूस घरीं आणून त्याची पूजा करण्याचा बेत केला व ही गोष्ट शेजारणींस सांगितली. नंतर तिनें आपल्या शेजारणींसह गुरूच्या घरीं जाऊन त्यास आपला हेतु कळविला. तेव्हां त्याणें तुझा नवरा घरीं नाहीं, त्यास हें समजल्यास तो तुला कदाचित रागावेल व मारीलही वगैरे अनेक सबबी सांगून तिची समजूत केली; पण तिणें तें न ऐकतां दिलगीर होऊन मी अभागी, वगैरे बोलून दाखविल्यावर त्याणें तिचा सद्भाव पाहून व ती खट्टू होऊं नये ह्मणून तिजकडे जाण्याचें कबूल केलें. मग तिणें स्वयंपाक करून सद्गुरूस घरीं आणलें व त्याची ती पूजा करूं लागली, इतक्यांत तिचा नवरा बाहेर निघून त्यांजवळ गेला व रागानें स्त्रिला मारण्यासाठीं शस्त्र उगारिलें. त्याच वेळीं त्यानें सद्गुरूकडे पाहिलें, तों तो त्यास स्त्रीरूप दिसला. हा चमत्कार पाहून त्यास पश्चात्ताप झाला. नंतर तो त्यांच्या पायां पडून नम्र झाल्यावर सद्गुरूनें पुनः आपलें पूर्वीचें रूप धरिलें. पुढें तीं उभयतां नवराबायको प्रेमानें संतसेवा करूं लागलीं.

## रामचंद्रभट.

हा साधु दिल्लीस होता. तो वेदशास्त्रांत निपूण असतांही त्यास आपल्या विद्येचा निखालस अभिमान नव्हता. त्याला लोकांशीं वादविवाद करणें आवडत नसे. तो स्नानसंध्या, पूजाअर्चा, पुराण, कीर्त्तन, नामस्मरण यांत आपला बहुतेक वेळ घालवी. अयाचितवृत्तीनें मिळेल त्यांत तो कुटुंबरक्षण करी. त्यास साक्षात्कार झालेला होता.

एकदां असा चमत्कार झाला कीं, बादशहानें मोठा विस्तीर्ण वाडा बांधावयाचें काम चालविलें. त्या वेळेस त्याणें दुप्पट तिप्पट पैसे देऊन लोकांचीं घरें वाड्यासाठीं घेतलीं. त्यांत रामचंद्रभटाचेंही घर भिंतींत येऊं लागल्यामुळें, आह्मीं तुह्मांस दुसरें मंदिर बांधून दे-

तों, त्यांत तुम्हीं जाऊन रहावें असें प्रधानानें सांगितलें; पण रामचंद्रभट त्रासून काशीस जाऊन राहिला. मग बादशाहास काजीच्या रूपानें श्रीहरीनें दृष्टांत दिला कीं, जर तूं रामचंद्रभटास त्रास देशील तर तुझें कल्याण होणार नाहीं. असें स्वप्न पडतांच बादशाहा भयाभीत झाला. त्याणें दिवाणास काशीस पाठवून रामचंद्रभटास समजावून दिल्लीस आणिलें. त्यास श्रीहरि साह्य आहे असें समजून त्याचें घर तसेंच कायम ठेवून पुनः बादशहा त्याच्या वाटेस गेला नाहीं. पुष्कळ लोक त्याच्या समागमानें हरिभजन करूं लागले. बादशहाही दर्शनास येऊन पायां पडूं लागला.

## काजी महंमद.

हा साधु जातीचा यवन असून निरंतर हरिस्मरण करीत असे. त्यास बादशहाकडून पुष्कळ द्रव्य मिळे; परंतु तो तें घेत नसे. त्याची बायको कशिदा उत्कृष्ट काढी, ती बाजारांत विकून जें द्रव्य येई त्यामध्यें आपला गुजारा चालवी. तो कोणाची भीड न धरितां वागत असे; ह्यामुळें इनसाफाचें काम बादशाहा त्याकडे फार पाठवी. तो निर्लोभी असल्यानें त्यास लांच खाण्याचें कारण राहिलेंच नव्हतें. आणखी तो स्वजात परजात हा भेद मनांत न आणितां निःपक्षपातानें योग्य इनसाफ करीत असे.

काजी महंमदास एक कन्या होती, ती श्रीमंताकडे दिली होती. तिचा नवराही बादशाहाच्या पदरीं असून पांचशें फौज त्याजवळ होती. कन्येस मुलगा झाल्यावर थोड्याच दिवसांनीं जांवई मरण पावला. त्याचा कारभारी हिंदु होता, त्याणें कपटानें सारी दौलत छपवून उलटें कर्ज लिहून ठेविलें. तो वारला तेव्हां कारभाऱ्यानें त्याच्या बायकोस व मुलास प्रथम कर्जाचा निकाल झाल्याशिवाय प्रेत उचलावयाचें नाहीं असें स्पष्ट सांगितलें. तेव्हां तीं ह्मणूं लागलीं कीं, घरधनी जिवंत असतां कर्ज असल्याचें ऐकण्यांत नव्हतें; आणि आतांच मेल्यावर कोठून निघालें? मग बादशहानें हा इनसाफ काजी महंमदाकडे पाठवून दिला. व प्रेताचीं आंतडीं काढून त्यांत केशर, कस्तुरी भरून तें प्रेतही काजी महंमदाकडे नेलें. त्या वेळीं मृताच्या बायकोनें व मुलानें रडून

आक्रांत केला. तेथेंही कर्जाची वाट करून मग प्रेताची व्यवस्था लावावी असें कारभारी बोलला. दुसरे नोकरही पैसा देऊन कारभाऱ्यानें वश्य करून घेतले होते; ह्मणून तेही तसेंच बोलूं लागले.

काजी महंमदाच्या लक्षांत कारभाऱ्याच्या लबाडीविषयीं सर्व खरा मजकूर येऊन चुकला; पण कन्येच्या भिडेस्तव पक्षपात केला असें लोक ह्मणतील ह्मणून त्याच्यानें कांहींच बोलवेना. अशा ह्या आणी-बाणीच्या संकटसमयीं त्याणें श्रीहरीचे पाय आठवून ह्मटलें कीं, देवा, जनापवाद न लागेल अशी कांहीं करणी कर. मग तो त्या प्रेतास ह्मणाला कीं, ऊठ लवकर; कारभाऱ्याला सर्व हिशेब समजावून दे-ऊन मग मृत्युपुरास जा. असें ह्मणतांच झोंपेंतून उठल्याप्रमाणें तो जांवई उठून बसला. त्याणें मिशांवर पीळ दिला, डोळे वटा-रिले व शस्त्र उगारून कारभाऱ्याजवळ हिशेब मागूं लागला; त्या वेळीं त्याची बोबडी वळून तो थरथर कांपूं लागला.

त्या वेळीं तो काजी महंमदास शरण गेला; व त्याचे पाय धरून प्राण वांचविण्यासाठीं विनवणी करूं लागला, व जुनें कागदपत्र लपवून नवे कागद करून खोटें कर्ज काढिल्याचें कबूल केलें. नंतर कोठें काय काय ठेविलें होतें तें सर्व सांगून दिलें. अशा रीतीनें कारभा-ऱ्यानें कर्जाची सफाई करून दिल्यानंतर जांवयानें सासऱ्यास विचारून प्राण सोडिला. ही अघटित करणी सर्वांच्या आश्चर्यास कारण झाली. सर्व लोकांनीं त्याचे पाय धरून त्याची स्तुति केली. जां-वयास वांचविण्यासाठीं कन्येनें व नातवानें पराकाष्ठा केली; परंतु त्याणें त्यांची समजूत केली कीं, जर मीं आज ह्यास उठविलें, तर शेंकडों लोक मला पुढें भीड घालतील. मग सहजच लोभ दिसून येऊन माझ्या अब्रूस बट्टा लागेल, यास्तव मला हें करवत नाहीं; अशी तिची समजूत करून प्रेतास मूठमाती दिली.

ही गोष्ट बाहेर फुटल्यावर हजारों लोक दर्शनास येऊं लागले. सहा महिने लोटल्यावर काजीची बायको वारली. मग मृत्युलोकीं न रहा-ण्याचा त्याचा निश्चय झाला. नंतर तो बडासोमोरी गांवांत समा-धिस्थ झाला. अद्यापि त्याचें साक्षात् दर्शन पुण्यवंतांस होतें. त्या-

ची कबर नित्य वाघ येऊन झाडीत असतो. सुवासिक पुष्पें नित्य कबरेवर पडत असतात. तो यवन असतांही हिंसा न होऊं देण्यासाठीं त्याचा मोठा कटाक्ष असे.

## बलखबुखारी.

हा यवन राजा आपल्या प्रजेचें पोटच्या लेंकराप्रमाणें संरक्षण करून धर्मनीतीनें राज्य करीत असल्यानें सर्व प्रजा सुखी असे. भिकारी असा त्याच्या राज्यांत मुळींच नव्हता. तो विलासी असून रात्रंदिवस विषयांत निमग्न असे. पुढें कांहीं दिवस लोटल्यानंतर प्रधानांचा अभिप्राय घेऊन त्यानें काशींतील कबिरास शरण जाऊन त्याजपासून अनुग्रह घेतला. त्याणें त्यास श्रीरामाची उपासना करण्यास सांगितलें.

बलखबुखारी राजास सोळाशें सुंदर स्त्रिया असून शिवाय एक पट्टराणी होती. असा तो विषयलंपट असतां अशा एका कारणावरून त्यास वैराग्य झालें कीं, एके दिवशीं बादशाहा प्रधानाशीं कांहीं खलबत करीत असतां त्यास निजावयास जाण्यास नित्याहून बराच विलंब लागला. त्या वेळीं दासीनें फुलांची शेज तयार करून ठेविली व राजाची वाट पाहून दमल्यामुळें, ती पलंगाला डोकें टेंकून बसली तों तिला झोंप लागली. राजा मंदिरांत गेल्यावर दासी निजलेली आहे असें पहातांच त्यास राग आला व त्यानें चाकराकडून तिला चार फटके मारविले. तेव्हां ती न रडतां खदखदां हंसूं लागली; असें पाहून राजानें तिला हंसण्याचें कारण विचारिलें. त्यास तिणें निर्भिडतेनें उत्तर दिलें कीं, पलंगाला नुस्तें मस्तक टेंकून बसल्यामुळें अंगांतून रक्त निघेपर्यंत मला मार मिळाला; पण तूं नित्य त्या पलंगावर शयन करितोस, तेव्हां तुला कोणता दंड होईल कोण जाणे; ह्मणून मला हंसूं आलें! दासीचे हेच शद्ब त्याच्या वैराग्यास कारण झाले. तो लागलाच राज्याचा त्याग करून नगर सोडून अरण्यांत गेला; व श्रीहरीच्या प्राप्तीचा उपाय योजूं लागला. भूक, तहान, थंडी, उन्ह याची त्यास बाधा होईना. तो निराश होऊन श्रीरामचंद्राचें भजन करूं लागला. चौथे दिवशीं त्यास साक्षात्कार झाला, व लक्ष्मीकांतानें सगुणरूपानें त्यास भेट दिली.

तो फिरतां फिरतां एका फकिराकडे गेला. तो फकीर कोणाकडे कांहीं मागत नसे; ह्मणून देव त्यास नित्य दोन भाकरी पाठवी. त्या फकिरानें त्यास विचारल्यावरून मला जोग घेऊन आठ दिवस झाले वगैरे सांगितलें. मग आपल्यास दोन भाकरी येतात त्यांत हा त्रिभागी होईल असें जाणून त्याणें त्यास मठांत न उतरूं देतां बाहेर उतरावयास सांगितलें. मग बलखबुखारी मठाबाहेर उतरला.

नंतर असा चमत्कार झाला कीं, स्थाईक फकिरास देवानें भाजीभाकरच पाठविली; व बलखबुखारीस रत्नजडित सुवर्णाच्या ताटांत उत्तम पक्वान्नें लक्ष्मी घेऊन येऊन त्यास प्रीतीनें खाऊं घालीत होती. हें फकिरानें पहातांच त्यास विस्मय वाटला. तो ह्मणाला, ह्याची आठ दिवसांची फकिरी व मी आज बहुत दिवसांचा; यावरून ईश्वराकडे न्याय नाहीं हें खचित! मग तो भाजीभाकर न खातां उपाशींच निजला. तेव्हां स्वप्नांत एका फकिराच्या रूपानें देवानें त्यास सांगितलें कीं, बाहेर जो बलखबुखारी उतरला आहे, तो राज्यवैभव सोडून फकीर झाला आहे; व तूं फकीर असून राज्याची इच्छा करीत आहेस; ह्मणून त्याचा सांभाळ मला स्वतः उत्तम प्रतीचा केलाच पाहिजे. व तुला तरी भाजीभाकर धाडीत असतोंच, मग तूं कोणावर रुसतोस? जसें बीज पेरावें तशीं फळें येतात; असा दृष्टांत झाल्यावर तो बलखबुखारीस शरण गेला.

पुढें बलखबुखारी एका नगरांत गेला. तेथें मठांत पुष्काळ फकीर होते; ते त्यास आंत येऊं देतना. मग श्रीहरि, सर्व फकिरांच्या महंताच्या रूपानें प्रगट होऊन हा नवा फकीर माझा परम भक्त आहे असें सांगून तेथेंच अदृश्य झाला. तेव्हां फकिरांनीं विस्मित होऊन त्यास आपणांत घेतला. त्यास वारंवार ईश्वर भेटत असे.

## शेखफरीद.

हा यवन असून अल्पवयी होता. त्याला एकटी आई मात्र होती. एकदां तो तिला 'मला देव दाखीव' असें ह्मणाला. तेव्हां तिनें त्यास सांगितलें कीं, देव काय वाटेवर पडला आहे? त्याची प्राप्ति व्हावयास अनेक बिकट साधनें करावीं लागतात. साधुलोक संपूर्ण विषयांचा

त्याग करितात; कितीएक विरक्त होऊन अरण्यांत जातात; कोणी ब्रह्मचर्यव्रत पाळतात; कांहींजण तप करितात; कोणी आत्मानात्मविचार, उपवास, सत्कीर्ति वर्णन करितात व ऐकतात. सत्कर्में, वृत्तें, व हरिजागर करितात; तसेंच अन्न उदक देणें, कीर्त्तन ऐकणें, सत्वाचें रक्षण करणें, खोटें न बोलणें, निरंतर हरिस्मरण व संतसेवन करणें, परोपकार करणें, सद्गुरूची सेवा करणें, अशीं ईश्वरप्राप्तीचीं अनेक साधनें आहेत; ह्यांतून तुला होण्याजोगें असेल तें तूं कर हें ऐकून शेखफरीद ह्मणाला कीं, मी अन्न उदक त्यजून अरण्यांत फिरेन; परंतु एक भाकर मला दे. ती मी खावयाचा नाहींच; पण सहज पोटावर बांधून घेतों ह्मणजे मनाला धीर येईल. असें बोलून त्यानें आईजवळून भाकर घेतली व ती पोटास बांधली. मग तो पर्वतावर जाऊन बसला. तो आईनें दिलेली भाकर न खातां झाडाचा पाला ओरबडून खात असे. त्यास प्रत्यक्ष साक्षात्कार झाला नाहीं, पण गुप्तरूपानें श्रीहरि त्याचें रक्षण करी व त्याचें वचन कधींही खोटें होऊं देत नसे.

एकदां असा चमत्कार झाला कीं, बैलावर साखरेच्या गोणी घालून कांहीं वाणी नेत असतां, त्यांना 'काय नेत आहां' ह्मणून शेखफरिदानें विचारिलें. त्यावर त्यांणीं 'माती नेत आहों' असें उत्तर दिलें. तें ऐकून 'चांगलें आहे' असें त्याणें ह्मटल्यावर तसेंच झालें. पुढें उदमी घरीं जाऊन पहातात तों आंत खरोखर मातीच निघाली. तेव्हां व्यापारी ऊर बडवून घेऊं लागले व त्या सत्पुरुषाशीं असत्य बोलल्यानें हा परिणाम झाला असें समजून त्यांस पश्चात्ताप झाला. मग ते पुनः परत आले असतां 'काय नेतां' ह्मणून शेख फरीद याणें विचारिल्यावर 'साखर नेतों' असें सांगितलें. तेव्हांही 'बरें आहे' असें ह्मणाल्यावर सर्व मातीची साखर झाली. मग त्याच्या ते पायां पडले. त्यांणीं परातभर साखर काढून त्यास दिली; पण ती न घेतां तो दूर पळून गेला.

आईनें दिलेली भाकरसुद्धां त्याणें न खातां तशीच पोटाला बांधून ठेविली होती. या गोष्टीस बारा वर्षे झालीं, तरी ईश्वराची भेट नाहीं ह्मणून तो घरीं गेला; व आईस नमस्कार करून सांगूं लागला कीं,

तूं दिलेली भाकर माझ्याजवळ अद्याप तशीच आहे. ती मीं खाल्ली नाहीं. झाडपाला मात्र ओरबडून खात होतों. मला अन्न नसल्यामुळें माझें शरीर पहा कसें काष्ठवत् झालें आहे ? मस्तकावर जटांचा भार तरी किती मोठा झाला आहे ? असे मी बहुत कष्ट सोशीत आलों, परंतु श्रीहरीची भेट होत नाहीं; हें ऐकून त्याच्या केसांची बट हातांत धरून आई उपटूं लागली. त्या वेळेस त्यानें किंचित् अंग चोरून धरलें. तें पाहून तूं असेंच दुःख झाडांना दिलेंस, ह्या दोषास्तव तुला अजून श्रीहरि भेटले नाहींत असें आईनें सांगितलें. मग, आतां मी झाडाची हिंसा करणार नाहीं असें आईस सांगून पुनः अरण्यांत गेला; व पडलेलीं पानें खाऊन पुनः बारा वर्षें काढिलीं.

एके दिवशीं त्यानें झाडास टांगून घेतलें व एकाग्र चित्त करून तो विष्णूचा धांवा करूं लागला. त्या वेळीं त्यास कावळे टोंचूं लागले, त्यांस तो ह्मणाला, बापानों, सर्वांग तोडून खा; पण डोळे मात्र कायम ठेवा. कांकीं, श्रीहरीला पहावयाची इच्छा मनांत आहे; असें ह्मणून टपटप आंसवें गाळून रडूं लागला. तेव्हां श्रीहरि लागलेच प्रगट झाले; व देवानें आपल्या हातांनीं दोरी सोडून मोकळा केल्यावर त्यास आलिंगन दिलें. मग तें श्यामसुंदर रूप ध्यानात धरून तो घरीं गेला. तेव्हां आईस संतोष झाला.

### नारायणभट.

हा ब्राह्मण तापी नदीच्या कांठीं थारनेर ह्मणून गांव आहे तेथचा रहणारा. तो निरंतर श्रीहरींचें चिंतन करी. त्याच्या घरीं अन्नवस्त्राचा दुकाळ होता; तरी तो निरिच्छ असे. त्याचें सत्व पहाण्यासाठीं एके दिवशीं श्रीहरि ब्राह्मणाच्या रूपानें त्याकडे गेले; तेव्हां तो स्नानसंध्या करावयास तापी नदीवर गेला होता. मागें त्याची स्त्री एकटीच घरीं होती. तिला तो वेषधारी ब्राह्मण ह्मणाला, मी महायात्रेस जात आहें. माझेजवळ एक परीस आहे तो ठेवावयास आपलें घर एक विश्वासाचें स्थळ आहे ह्मणून तो मी आपल्याजवळ ठेवितों. दोन वर्षांनीं परत आल्यावर मी माझा परीस परत घेऊन जाईन. तोंपर्यंत तुम्हीं तुमचें दरिद्र विच्छिन्न करून घ्या; व मी आल्यावर माझा

मला परत द्या. असें बोलून परीस लोखंडास लावून, सोनें करून दाखवून व तो तिच्या स्वाधीन करून चालता झाला.

मग त्या दिवशीं बायकोनें स्वयंपाक चांगला केला होता; याविषयीं नारायणभटानें घरीं आल्यावर तिला विचारिलें असतां तिणें त्यास झालेला सर्व मजकूर सांगितला. तो ऐकल्यावर त्याणें तो परीस तिच्यापासून मागून घेतला व आपणास ही उपाधि कशाला पाहिजे असें बोलून तापीनदींत टाकून दिला.

पुढें तो ब्राह्मण परीस मागावयास येईल तेव्हां त्यास मी काय सांगूं ह्मणून बायकोनें विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला, त्यास मजकडे पाठवून दे; म्हणजे मी त्यास एकाचें चार देईन; तूं काळजी करूं नको अशी तिची समजूत केली.

पुढें दोन वर्षें झाल्यावर श्रीहरीनें पुनः त्याच ब्राह्मणाच्या रूपानें त्या घरीं जाऊन तिच्याजवळ परीस मागितला. तेव्हां तिणें सांगितलें कीं, घरधनी बाहेर गेले आहेत ते आले ह्मणजे देईन. हें ऐकून तो ह्मणाला, मी परीस तुझ्याजवळ दिला होता; त्यास सांगण्याचें कारण नव्हतें. त्यावर ती ह्मणाली, पतीशीं गोष्ट चोरून ठेवणारी स्त्री पतिव्रता नव्हे; ह्मणून मीं ही गोष्ट त्यांस सांगितली. ते आतां येतील; अंमळ थांबा. तेव्हां तो तिला ह्मणाला, जर येथें थांबलों तर माझी संगतसोबत दूर जाईल; यास्तव तूं मला आतांच घेऊन तापीनदीवर चल. मग मात्र ती चिंतेंत पडली. नंतर ती त्यास घेऊन तापीतीरीं गेली. तिणें पतीस ब्राह्मण आल्याचें वर्तमान सांगितल्यावर, त्यास मजकडे पाठवून दे म्हणून त्यानें सांगितलें. नारायण भटास श्रीहरि ध्यानामध्यें विप्ररूपानें दिसूं लागला. मग नेत्र उघडून पाहिल्यावरही तोच उभा असलेला दिसला; तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें.

मग त्याणें नारायणभटाजवळ परीस मागितला; तेव्हां तो ह्मणाला, तो परीस मीं उदकांत टाकून दिला; आह्मांजवळ ती उपाधि कशाला पाहिजे ? तेव्हां तो ह्मणाला, मी तुझ्यासारखा उदास नाहीं ! मला माझा परीस दे. मी तो घेतल्याशिवाय येथून जाणार नाहीं. असें ऐकून उदकांतून त्यानें चार खडे काढून आपला

कोणता तो ओळखून घ्यावयास सांगितलें. मग लोखंडास चारही खडे लावून पाहिले; तों सर्वच परीस. इतक्यांत श्रीहरीनें ब्राह्मणाचा वेष टाकिला; आणि प्रसन्न होऊन आपलें रूप प्रगट करून त्यास साक्षात् दर्शन दिलें. मग उभयतांनीं साष्टांग नमस्कार करून प्रेमानें श्रीहरीची पूजा केली.

---

# अध्याय ४८ वा.

## रत्नाकर, माधवदास व विठ्ठलपुरंदर.

### रत्नाकर.

हा व्यापारी बागलाण देशांत रहात असे. तो पुष्कळ खटाटोप करून पाही; परंतु पोटापुरतेंही त्यास उत्पन्न होईना. त्यास लोकांचें देणें फार झालें. मग तो उपोषणें करून चौदा दिवस अहोरात्र अनुष्ठान करीत बसला. नामस्मरणांत क्षणभर खंडण पडलें नाहीं. मग रात्रीस त्यास दृष्टांत झाला कीं, तूं व्यापार सोडून माझ्या भजनीं लाग. जर तसें न करशील तर तुला संसारांत कदापि पुरवठा येणार नाहीं. मग त्याणें घरीं जाऊन ही गोष्ट आपल्या स्त्रीस कळविली. तेव्हां, जर आपण उद्योग धंदा सोडून भिक्षा मागून उदरपोषण केलें तर सगेसोयरे हंसतील व लोकांत छी: थू: होईल; असा तिचा अभिप्राय पडल्यामुळें ती गोष्ट तशीच राहिली.

पुढें देशांत मोठा दुष्काळ पडला. धान्य फारच महाग झालें म्हणून तें आणावयास तो चार बैल घेऊन दुसऱ्या देशीं गेला. तेथें त्यास गोणभर धान्य मिळालें. तें घेऊन तो परत येत असतां मार्गांत अरण्यांत असा चमत्कार झाला कीं, श्रीहरीनें श्वापदाचें रूप घेऊन बैल बुजवून चौफेर केले. एका बैलावर गोण होती, ती देखील खालीं पडली ; असें पाहून तो अति संकटांत पडला. त्याणें त्या समयीं ईश्वराचें स्मरण केलें. त्या वेळेस वांटसरूच्या रूपानें श्रीहरि तेथें आले; व चारी बैल आणून एकावर गोणही पूर्वी होती तशी ठेविली. व त्यास मार्गाला लावून देऊन आपण अदृश्य झाले.

रत्नाकर मागें पाहूं लागला तों वाटसरू दिसेना. तेव्हां तो द्वारकानाथच असावा, त्यास मीं व्यर्थ कष्टविला असें मनांत येऊन अनुताप झाला; व घरीं गेल्यावर सर्व घरदार, चीजवस्त ब्राह्मणांस वांटून विरक्त होऊन श्रीहरीचें भजन करीत बसला. त्याच्याजवळ भगवद्गुण ऐकावयास थोर थोर लोक सुद्धां येऊं लागले. त्यानें अनेक चमत्कार दाखविले; तेणेंकरून त्याचा लौकीक फार वाढला. त्याची निरपेक्षवृत्ति पाहून त्यास लोक पुष्कळ पैसा देत; त्याचा व्यय तो परोपकारांत व नित्य सहस्रभोजन घालण्यांत करी.

पुढें तीर्थयात्रा करावया असें मनांत येऊन रत्नाकर वाराणशीस गेला. तेथें भागिरथीचें स्नान करून विश्वेश्वराचें दर्शन घेतलें. समागमें हजारावर मंडळी होती. पुढें गया, प्रयाग हीं तीर्थें केलीं. तेथें पुष्कळ दानधर्म केला. नंतर तो कुरुक्षेत्रास जाऊन हस्तनापुरास गेला. तेथें लोक हा रत्नाकर जगदुद्धार करण्याकरितां ईश्वराचा अवतार होय असें बोलूं लागले. बायकापुरुषांची दर्शनास गर्दी होऊं लागली. जन्माष्टमीचा उत्सव तेथेंच मोठ्या थाटानें केला. मखरांत श्रीविष्णुमूर्त्तीची स्थापना करून स्वतः कीर्त्तन केलें. ब्राह्मणभोजन झालें. मिरवणूक मोठ्या थाटानें निघाली. ती पाहून बादशाहानें देवास पांचशें सुवर्णमुद्रा देऊन वर्षासनही करून दिलें.

पुढें द्वारकेस जातांना भडोच नगरास आला. तेथें एक उन्मत्त यवन अधिकारी होता, त्यास हा डामडौल पाहून संताप आला. त्याणें तबकांत मांस भरून प्रसाद रत्नाकराकडे पाठविला. त्या वेळीं अधिकाऱ्याच्या आज्ञेप्रमाणें आंत मिठाई आहे असें दुतांनीं सांगितलें. त्या संकटीं त्याणें श्रीहरीचा धांवा केला. मग तबकावरचा रुमाल काढून पहातो तों आंत मोगऱ्याचीं फुलें दिसलीं. तीं त्यानें संतोषानें लागलींच सर्वांना वांटून टाकिलीं. थोडीं फुलें अधिकाऱ्याकडेही पाठवून दिलीं. तो हा चमत्कार ऐकून रत्नाकरास शरण आला व आपण केलेल्या अपराधाची क्षमा मागूं लागला. त्यानें हजार रुपये रत्नाकरापुढें ठेविले; व शिबिकेचा खर्च आपण पतकरला. त्यानें बडोद्याच्या अधिकाऱ्यासही ह्यांच्या बर्दास्तीकरितां लिहून पाठविलें.

पुढें द्वारकेस रत्नाकर गेल्यावर तेथें असा चमत्कार झाला कीं, जेथें गोमतीनदी समुद्रास मिळते, त्या संगमावर वाळूचा पर्वतासारखा ढीग झाला होता; तेणेंकरून पाण्याचा ओघ बंद झाल्यानें किडे पडून पाण्याला दुर्गंधि येत होती. तेथील क्षेत्रस्थांना रत्नाकराची कीर्त्ति ऐकून ठाऊक होती; ह्मणून ते पाणी स्वच्छ होण्यासाठीं त्याची प्रार्थना करूं लागले. त्या संकटीं त्याणें देवाचा धांवा केला. तेव्हां त्यास असा दृष्टांत झाला कीं, तूं त्या उदकांत स्नान कर ह्मणजे प्रवाह मोकळा होईल. मग तो प्रहर रात्रीस स्नान करावयास गेला. समागमें पुष्कळ मंडळी चमत्कार पहावयास होती. गोमतीचें पाणी वर चढून वाळू धुपून गेली; व स्नान करितांच पाणी निर्मळ होऊन प्रवाह मोकळा झाला. हें पाहून सर्वजण त्याच्या पायां पडले. पुढें तो तेथें पंधरा दिवस राहून आपल्या गांवीं गेला.

## माधवदास.

हा भक्त सुरतेस होता. तो निर्लोभी असून आपला काळ भजनांत घालवी. पुष्कळ लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले. केव्हां पावशेर, केव्हां अर्धा शेर, एखादे दिवशीं शेर व मणभर साखर लोक आणून देत; तितक्यांतून तो मूठ मूठ साखर शेंकडो लोकांस वांटी. ती सर्वांना पुरे. हा चमत्कार पाहून, ह्यास सिद्धि अनुकूळ आहेत; हा साबरी मंत्र शिकून सर्वांस साखर पुरवितो; ह्यास ईश्वर साह्य आहे; अशा अनेक कल्पना लोकांच्या मनांत येऊं लागल्या. त्याची लोक स्तुति व निंदाही करीत; पण त्याकडे तो लक्ष देत नसे.

एकदां एका दुर्जनानें मडक्यांत राख भरली व त्याचें तोंड बांधून तें हरिमंदिरांत आणिलें. तेव्हां तो माधवदासास ह्मणाला, मी ह्यांत साखर घालून आणिली आहे ती सर्वांस वांटावी. मग त्यानें तिचा नैवेद्य देवास दाखविला व ती सर्वांस वांटली. मडक्यांत राख भरली असतां साखर झाली ह्मणून त्यास मोठें नवल वाटलें, व त्यास पश्चात्तापही झाला. मग तो त्यास शरण गेला व आपला अपराध कबूल करून त्याचा शिष्य होऊन राहिला. पुढें ही गोष्ट तेथील खळ राजास कळली. त्यास

ही गोष्ट खरी वाटेना; यास्तव राजानें आपणही चमत्कार पहावा ह्मणून माधवदासास मंदिरांत बोलावून नेलें. त्या वेळीं त्यानें एका मडक्यांत सर्प भरून त्याचें तोंड बंद केलें ; मग त्यांत साखर आहे ती आपण स्वतः वांटावी ह्मणून सांगितलें. हें ऐकून माधवदासानें मडकें सोडून पाहिलें तों आंत साखर दिसली; व श्रीहरीस नैवेद्य दाखवून सर्वांना प्रसाद दिला. हा चमत्कार पाहून राजासही छळ केल्याबद्दल पश्चात्ताप झाला.

पुढें माधवदास द्वारकेस जावयास निघाला. बरोबर पुष्कळ दुसरी मंडळी निघाली. ते अरण्यांतून जात असतां श्रीहरि वाघाचें रूप घेऊन आडवा आला; त्यास पहातांच यात्रा भयाभीत होऊन चोहींकडे फांकली. फक्त माधवदास त्या वाघासमोर जात होता. जवळ दुसरें कोणी नाहीं असें पाहून श्रीहरीनें वाघाचा वेष टाकून दिला व चतुर्भुज रूप धरून त्यास दर्शन दिलें; आणि आलिंगन देऊन पोटाशीं धरिलें. तेव्हां माधवदासानें देवाच्या चरणीं मिठी घातली; व आपण वाघाचें रूप कां घेतलें होतें ह्मणून विचारिलें असतां श्रीहरीनें सांगितलें कीं, तुझ्या भेटीस एकांत पाहिजे एवढ्याच करितां वाघाचें रूप घेऊन सर्व यात्रेकऱ्यांस लांब पळविलें. तूं माझा पूर्ण भक्त ह्मणून तुला मार्गामध्यें दर्शन दिलें; आतां तूं परत घरीं जा. इतकें बोलून देव अंतर्धान पावले.

जे लोक देहाचा लोभ धरून पळून गेले त्यांस श्रीहरि अंतरला. ते माधवदासास वाघानें मारिलें असेल, आपला बचाव झाला वगैरे बोलत आहेत तों माधवदास यात्रेकऱ्यांस हांका मारूं लागला व वाघ पळून गेला असें सांगूं लागला. मग त्याच्याविषयीं लोकांच्या मनांत नाना कल्पना येऊं लागल्या. ते माधवदासापाशीं आले. तेव्हां तो वाघ नसून साक्षात् श्रीहरि होता; त्याच्या कृपेचा महिमा प्रेमळ भक्तांना मात्र कळतो; त्यानें मला दर्शन दिलें; त्या श्रीहरीची पुढें द्वारकेस जाण्यास मला आज्ञा नाहीं ; असें त्यांस सांगून माधवदास सुरतेस परतला व यात्रा पुढें गेली. त्याणें पुष्कळांना भक्तिमार्गाकडे वळविलें.

## विठ्ठल पुरंदर.

हा वेदरप्रांतांत रहात असे. ह्याचें अत्यद्भुत चरित्र असें आहे कीं, तो संसार करून पांडुरंगाचें नामस्मरण करी. तो सदासर्वदा सत्य भाषण करी. अतितअभ्यागतांस यथाशक्ति अन्न घाली. त्यास संसारांत सर्वोपरी वाण असूनही तो निरंतर समाधानवृत्ति असे. तो आषाढीकार्त्तिकीची पंढरपूरची वारी नेमानें करी.

एके वेळीं असें झालें कीं, कार्त्तिकीची वारी आली व त्यास नवज्वर झाल्यामुळें पंढरपुरास जाण्याचें अवसान राहिलें नव्हतें ह्मणून फारच तळमळ लागली. पंढरीकडे पंचप्राण लागून गेल्यानें त्यास झोंपही येत नसे. तेव्हां तो पांडुरंगाचें स्मरण करी. कोणत्या दोषामुळें हें महाविघ्न आलें, उपाय तरी कोणता करूं; असा तळमळत असतां तीन दिवस झाले, गुण नाहीं. तेव्हां त्याणें पक्का निश्चय केला कीं, एर्वीतेर्वी हें नाशिवंत शरीर; ह्याचा भरंवसा धरिल्यानें विठोबाचे पाय मात्र अंतरावयाचे; मग जीव ठेवून काय करावयाचा आहे? मरण आलें असलें तर तें एथें राहिल्यानें टळेल असें नाहीं; ह्यासाठीं पंढरीस निघावेंच; जें होणार असेल तें होईल, असा विचार करून तसा तापकरीच तिकडे जावयास निघाला. तेव्हां त्याची कांताही समागमें निघाली. तो दांतीं तृण धरून एक एक पाऊल टाकीत दोन मजला तर चालला; त्या श्रमानें त्यास ताप अतिशय आला. प्राणांतअवस्था होऊन प्राण कासावीस झाला. तोंडांतून शद्व निघेना. त्या समयीं आपल्या नवऱ्याचें ठीक चिन्ह दिसत नाहीं असें पाहून त्याच्या स्त्रिनें पांडुरंगाचा धांवा केला. तिला रडें येऊं लागलें. इतक्यांत तो किंचित् सावध झाला. तो तिला ह्मणाला, मला डोलींत घालून पंढरीनाथास भेटीव; तेव्हां मला उतार पडेल. हें ऐकून पंढरपुरास बिन पैशानें जाणें होतें कसें ह्याच चिंतेंत ती पडली. तिला कांहीं उपाय सुचेना. मग तिणें पांडुरंगाचा धांवा आरंभिला कीं, देवा, मी येथें येऊन संकटांत पडलें. आतां धड मागें जाववत नाहीं व पुढें येववत नाहीं. पांडुरंगा, आतां लवकर धांव. असा ती विलाप करीत आहे, तों ऐवढ कोळी होऊन श्रीहरि तेथें येऊन तिला हकीगत विचारूं लागले.

मग तिणें त्यास सकल वृत्तांत निवेदन केला. तेव्हां तो ह्मणाला, बाई, तूं भिऊं नको; मी पंढरपुरचाच रहाणारा आहे. माझे दुसरे तिघे सोबतीही आहेत. आम्हीं तुह्मांस तेथें घेऊन जाऊं. असा तिला धीर दिला; तेव्हां तिला कांहींसें समाधान वाटलें.

प्रातःकाळीं पांडुरंगानें चार रूपें घेतलीं; आणि स्त्रीसह त्यास डोलींत बसवून पंढरपुरास घेऊन चालले. अष्टांगयोगसाधन करणारांना व याग, व्रतें, तपें करणारांना जो सांपडत नाहीं तो भक्तांस खांद्यावर घेऊन जात आहे. त्या वेषधाऱ्यांनीं त्यांना थोड्याच वेळांत पंढरपुरास नेऊन पोंचविलें. तेथें विठ्ठलनामाचा चाललेला गजर ऐकून त्यांस संतोष वाटला. तेथें पोंचविल्यावर एका कोळ्यानें बिऱ्हाडाची सोय करून दिली. पांडुरंगाचें तीर्थ नेऊन विठ्ठलपुरंदरास दिलें. तें प्राशन केल्यावर त्यास किंचित् उतार पडला. मग त्यानें हातीं धरून उभयतांस देवळांत नेलें व देवाचें दर्शन करविलें. त्या वेळीं पायांवर मस्तक ठेवतांच त्यांस परमानंद झाला. मग सत्यभामा, रुक्मीण यांचें दर्शन करविलें व साधुसंतांचें दर्शन करवून त्यांना कोळ्यानें बिऱ्हाडीं नेऊन पोंचविलें.

मग तुझें नांव काय ह्मणून त्या वेषधाऱ्यास विचारिल्यावर तो ह्मणाला कीं, माझें नांव 'पांडुरंग कोळी.' मी एथेंच राहतों. मुलंबाळें घरीं आहेत, तीं वाट पहात असतील; यास्तव आतां मी जातों, उद्यां सकाळीं येईन असें बोलून निघून गेला. सात दिवस उत्सव झाल्यावर पौर्णिमेस गोपाळकाला झाला व विठ्ठल पुरंदराचा ताप जाऊन त्यास थोडीशी शक्तिही आली. मग उभयतांनीं देवळांत जाऊन पांडुरंगाचें दर्शन घेतलें; व त्यास विचारून निघालीं. त्यांना पांडू कोळ्याचा उपकार क्षणक्षणां आठवे. त्याचें स्मरण करतांच तो पुढें येऊन उभा राहिला. तेव्हां विठ्ठल पुरंदरानें त्यास सांगितलें कीं, आम्हांस आषाढमासीं भेट द्यावी. तेव्हां, ठीक आहे, असें पांडूनें उत्तर दिलें. नंतर त्यांस पोंचवून आपण देवळांत गेले.

तीं उभयतां घरीं गेल्यावर रात्रंदिवस पांडुरंगाचें भजन करीत. पुढें तीं आषाढ महिन्यांत पंढरपुरास गेलीं. त्या समयीं त्यांणीं पांडू कोळ्याचा पुष्कळ तपास केला; परंतु कोठें ठावठिकाण लागेना. त्याचा

तपास करण्यामध्यें प्रहर रात्र झाली; तरी तीं उपाशींच होतीं. मग पंढरिनाथास संकट पडलें. तेव्हां तो त्यांना साक्षात् दर्शन देऊन ह्मणाला कीं, मीच पांडूकोळी होऊन तुह्मांस डोलींत घालून येथें घेऊन आलों होतों. दर्शन देतांच तो स्त्रीसह देवाच्या पायां पडला व ह्मणाला, हें माझें नाशिवंत शरीर उचलण्याचे श्रम तूं कशाला वरें केलेस? देवा, तुझे उपकार मी किती तरी आठवूं? तेव्हां पांडुरंगानें त्यास सांगितलें कीं, तूं संपूर्ण भार मजवर टेविला आहेस; त्या अर्थी मला तसें करणें भाग आहे. जो निर्धार करून नेमास ढळणार नाहीं त्यास ईश्वराचें साक्षात् दर्शन होतें.

---

## अध्याय ४१ वा.

### नरसिंहसरस्वती व मुद्गलभट.

#### नरसिंहसरस्वती.

हा दत्तात्रयाचा अवतार होय. जगाचा उद्धार करावयासाठींच ह्याचा जन्म. हा एका ब्राह्मणाच्या पोटीं जन्मला. ह्याचें सुंदर रूप पाहून आईबापांस संतोष वाटला. बारावे दिवशीं नरसिंह असें नांव ठेविलें. पांचवें वर्षी मूंज केली. त्यानें एकदां ग्रंथ वाचला कीं मुखोद्गत होई. त्याच्या जिव्हाग्रीं 'सरस्वती' आहे असें ह्मणत; व त्यामुळेंच त्यास 'नरसिंहसरस्वती' अशी हांक मारीत. आठ वर्षाच्या वयांत वेद, शास्त्रें, पुराणें हीं सर्व त्याच्या तोंडपाठ झालीं. त्याचा आईबापांवर विशेष लोभ नसे. तो विरक्त असून अरण्यामध्यें एकांतीं बसून भजन करी. तो कोणाशीं फारसा बोलत नसे. त्याला खाण्यापिण्याची विशेष गोडी नसे; व त्याचें विषयविलासाकडे मन धांवेना. अशी त्याची स्थिति पाहून आईबापांस चिंता लागली. कां कीं, नवानवसाचा पुत्र झालेला, तो निघाला या अशा प्रकारचा; ह्यामुळें त्याच्या लग्नाचा विचार आईबापांस एके बाजूस ठेवावा लागला.

एके दिवशीं बापानें त्यास विचारलें कीं, तूं एकांतीं जाऊन बसतोस; संसारांत मन घालीत नाहींस हें कसें? त्याचें उत्तर त्यानें असें

दिलें कीं, संसार हा शब्दच लटका आहे. वांझेच्या मुलाची जन्मपत्रिका करणें; मृगजळाच्या समुद्रावर जहाज चालविणें; स्वप्नांतलें द्रव्य सांठवून ठेवणें; ह्याच प्रमाणें हा संसार मिथ्या होय. ह्याची काळजी कां मानितोस? तूं आत्मस्वरूपाचा विचार कर; तेणेंकरून जन्माचें सार्थक होईल. असा उपदेश केलेला त्यास मायाभ्रमांत पडल्यामुळें रुचला नाहीं. मग त्याणें काशीस जाण्याची आज्ञा द्यावी ह्मणून पित्यास विनंती केली. ती ऐकून त्यास वाईट वाटलें. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. आह्मांस दुसरा पुत्र असता, तर तुझें ह्मणणें मीं कबूल केलें असतें; आतां आमचा वृद्धापकाळ आला; संसारांत दिवस कोणत्या रीतीनें कंठूं? असें तो ह्मणाला. हें ऐकून नरसिंहसरस्वतीनें सांगितलें कीं, तुह्मी अगदीं चिंता करूं नका. तुह्मांस दोन पुत्र होतील व एक कन्या होईल. तीं वंशाचा उद्धार करतील; असा वर देऊन व आईबापांस नमस्कार करून तो काशीस गेला.

तेथें त्यानें संन्यास घेतला. पुढें दंडकमंडलू टाकून देऊन परमहंस बनला. त्याचें अफाट ज्ञान पाहून क्षेत्रवासी लोक त्याचा मान फार राखीत. त्याच्या दर्शनानें पुष्कळ संसारी लोक भक्तिमार्गाकडे वळले. तो तेथें एक वर्ष होता. त्याचे वैराग्यशील व ज्ञानी असे तीनशें शिष्य झाले. मग तो स्वदेशास येण्यासाठीं निघाला. मार्गांत जो शरण येई त्यास तो उपदेश करी; असे सातशें शिष्य झाले. त्यांसहवर्तमान तो स्वदेशीं गेला. त्याची कीर्त्ति सर्वत्र पसरल्यानें मोठमोठाले लोक सुद्धां लांबलांबून दर्शनास येऊं लागले. त्याच्याजवळ अष्टसिद्धि हात जोडून उभ्या राहूं लागल्या; तरी कोणीं गरिबानेंही भिक्षेस आपल्या घरीं बोलाविलें असतां तो तेथें आवडीनें जाई. शेवटीं तो गाणगापुरास येऊन राहिला. तेथें त्याचा मोठा महिमा वाढला.

त्याचें वर्चस्व क्षेत्रस्थ ब्राह्मण, पंडित, वैदिक यांना सहन न होऊन ते त्याची निंदा करीत. एक तर त्याणें गृहस्थाश्रम केल्यावांचून संन्यास घेतला; तोही एकीकडे ठेवून दिगंबर झाला; धर्माचा त्याग केला, परंतु पोटास गोळा पाहिजे तो कांहीं चुकला नाहीं; अशा खुळा कल्पना मनांत आणून पांचशें ब्राह्मण एकत्र जमून स्वामीचा

छळ करावयास निघाले. तों मार्गांत असा चमत्कार झाला कीं, अकस्मात अतोनात वारा सुटला व सर्वांचीं वस्त्रें उडून जाऊन ते नग्न होऊन राहिले. ते एकमेकांकडे पाहून लाजले; परंतु सगळेच दिगंबर झाल्यानें कोणीं कोणास हंसावें ? त्या वेळीं त्यांना पश्चात्ताप झाला; व स्वामीची निंदा करितों त्याचा हा परिणाम ह्मणून ते समजले. मग परत गांवांत जावें तर लोक हंसतील व अप्रतिष्ठा होईल; ह्यास्तव स्वामीस शरण जाण्याचा त्यांचा विचार ठरला. नंतर त्यांनीं स्वामीकडे जाऊन त्याची स्तुति केली; व अपराध कबूल करून क्षमा मागितली. तेव्हां स्वामीस त्यांची दया आली. मग सिद्धीस आज्ञा करून सर्वांना नवीं वस्त्रें दिलीं. नंतर सर्वांनीं त्यांस साष्टांग नमस्कार केला; व त्यांची आज्ञा घेऊन घरोघर गेले. तेव्हांपासून स्वामींचा कोणी द्वेष करीनासा झाला.

दुसरा चमत्कार असा कीं, नरसिंहसरस्वती स्वामीनें कोणास न कळवितां एकदां गंगेवर जाऊन उदकांत प्रवेश केला. ते बुडी मारून खालीं गेले, पण चार घटिका झाल्या तरी वर आले नाहींत; हें पाहून एका कोळ्यास नवल वाटलें. मग स्वामीस सुसरीनें गिळिलें असेल अशी मनांत कल्पना आणून त्यानें बुडी मारिली; आणि पाहूं लागला तों जळांत एक दिव्य मंदिर दिसत होतें, तेथें सात अप्सरा होत्या, त्यांणीं स्वामीची घरांत नेऊन षोडशोपचारांनीं पूजा केली; मिष्टान्नभोजन घातलें; व मुखशुद्धीस विडा दिला. मग त्यांना विचारून स्वामी मंदिराबाहेर आले; तों हा कोळी दृष्टीस पडला. त्यास विचारिल्यावरून झालेला सर्व प्रकार त्याणें स्वामीस निवेदन केला. मग ही गोष्ट कोणास सांगूं नको; तुला द्रव्य देतों असें बोलून मोहोरा, होन यांणीं भरलेला एक हांडा त्यास देऊन वर आले.

आणखीं एक चमत्कार असा झाला कीं, एक अगदीं गरीब ब्राह्मण, ज्याच्या घरीं वेळेवेळेची पंचाईत, त्याणें पायां पडून व हात जोडून माझ्या घरीं भिक्षेस यावें ह्मणून नरसिंहसरस्वतीस लीनतेनें आमंत्रण दिलें. तेव्हां स्वामीनें 'बरें आहे; वाटेल त्या दिवशीं येऊं' ह्मणून सांगितलें. हें ब्राह्मणानें आनंदानें घरीं जाऊन आपल्या स्त्रीस कळविलें. पुढें एके दि-

वशीं वैश्वदेवसमयीं स्वामी त्याच्या घरीं गेले, तेव्हां ब्राह्मणास अत्यानंद झाला. त्याणें लागलेंच पायां पडून त्यास पाटावर बसविलें. त्या दिवशीं कण्यांचा भात व चिंचेचें सार असल्यामुळें तो मोठ्या विचारांत पडला. उभयतां स्त्रीपुरुषें संकोचलेलीं पाहून स्वामींनीं ह्मटलें कीं, दूधकण्या खाव्या असें माझ्या मनांत आहे. तुमच्या घरीं कण्यांचा भात केलेला आहेच,पण दूध नाहीं; यास्तव तुमच्या आंगणांत ह्मैस आहे तिचें दूध काढून आणा. तेव्हां तो ब्राह्मण ह्मणाला, ती वांझोडी आहे; बारा वर्षें होऊन गेलीं तरीं फळली नाहीं. हें ऐकून स्वामींनीं सांगितलें कीं, ती आजपासून जन्मभर दूध देईल; ह्या माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा. मग ब्राम्हणानें त्या वांझ्या म्हैशीचें आठ शेर दूध काढून आणिलें. त्या ठिकाणीं स्वामींनीं स्वस्थपणें भोजन केलें. जातांना स्वामींनीं सांगितलें कीं, आह्मीं उद्यां सातशें शिष्यांसह भोजनास येऊं. तूं सर्व गांवकऱ्यांसही भोजनाचें आमंत्रण कर; पण फक्त पंचवीस मनुष्यांना पुरेल इतकेंच अन्न तयार कर. तें तितकें सर्वांना पुरेल. मग दुसरे दिवशीं त्यानें घरोघर भोजनाचें आमंत्रण दिलें. तेव्हां ह्यास वेळेवेळेची पंचाईत असतां हा सर्वांना भोजनाचें आमंत्रण देतो आहे; हा आज ह्यानें पोरखेळ मांडिला आहे असें लोकांच्या मनांत येऊं लागलें. दोन प्रहर होतांच नरसिंहसरस्वती स्वामी शिष्यांसुद्धां येऊन बसले; व गांवचे पांचशें ब्राह्मणही आले. पंचवीस मनुष्यांच्या बेताचें अन्न सर्वांना पुरून उरलें.मग हें स्वामींचेंच अद्भुत कृत्य असें लोक बोलूं लागले. नंतर भोजन झाल्यावर उरलेलें अन्न इतर जातींना वांटून टाकिलें. स्वामीच्या कृपेनें त्या ब्राह्मणाचें दरिद्र जाऊन तो सधन झाला.

दुसरा एक असा चमत्कार घडून आला कीं, एक परीट स्वामीच्या दर्शनास नित्य जाई व त्यांची मूर्त्ति ध्यानांत आणून मनांत पूजा करी. पुढें विजापुरचें राज्य करावें असें त्याच्या मनांत आलें, तोंच स्वामी तेथें प्रगट झाले आणि ह्मणाले कीं, तुझ्या मनांतला हेतु मला कळला; यास्तव तूं तो संकोच न धरितां खरोखर सांग; मी तुझे मनोरथ आतांच पूर्ण करितों. तेव्हां त्याणें सांगितलें कीं, विजापुरचें राज्य

करावें असें माझ्या मनांत आहे; परंतु आतां मी वृद्ध झाला ह्यामुळें राज्यवैभव, ऐषआराम, विषयविलास फार दिवस भोगावयास सांपडणार नाहींत; यास्तव पुढच्या जन्मीं हा हेतु पूर्ण व्हावा अशी त्यानें विनंती केली. मग 'तुझे मनोरथ पूर्ण होतील व माझी आठवण करतांच मी दर्शन देईन' असा वर देऊन गेले. इतक्यांत तो परीट मरण पावला. पुढें त्याणें विजापुरच्या यवनराजाच्या पोटीं जन्म घेतला. बादशहास पुत्र झाल्यानें आनंद झाला. पुढें तो मुलगा दिवसेंदिवस मोठा होऊन सोळाव्या वर्षीं राज्यावर बसला. तो विषयविलासांत निमग्न झाल्यामुळें स्वामींची आठवण विसरला; यास्तव त्याच्या पायांस रोग उत्पन्न झाला. त्यानें पुष्कळ उपाय केले तरीं बरा झाला नाहीं ह्मणून खिन्न झाला. एके दिवशीं तो निजला असतां स्वप्नांत त्यास पूर्व जन्माची सर्व आठवण झाली. तेव्हां स्वामींचें स्मरण करतांच त्यांनीं दर्शन देऊन सांगितलें कीं, उद्यां एक परमहंस येईल तो रोग नाहींसा करील. मग राजानें जागें झाल्यावर कोणी परमहंस येईल त्याचा बहुमान ठेवण्याची प्रधानास आज्ञा केली. दुसरे दिवशीं दुपारीं स्वामी तेथें प्रगट झाले. राजानें पायांवर मस्तक ठेवितांच तो रोगापासून मुक्त झाला. मग त्यास स्वामीनें उपदेश केला कीं, राज्यमदानें उन्मत्त होऊं नये; गरीब अनाथांना पिडूं नये; गाईब्राह्मणांचा प्रतिपाळ करावा; दुष्टांना दंड करावा; श्रीहरीला रात्रंदिवस भजत जावें; साधु, संत, ब्राह्मण यांस नमून असावें. असा उपदेश केल्यावर पुनः स्वामींची भेट केव्हां होईल ह्मणून राजानें विचारिलें असतां, तूं काशीस जा; तेथें भेट होईल ह्मणून स्वामीनें सांगितलें व आपण अदृश्य झाले. पुढें राजा काशीस गेला. भागिरथीचें स्नान करून स्वामीचें स्मरण करतांच साक्षात् दर्शन दिलें; व चार महिने येथें राहून माझ्या पादुकांची नित्य पूजा करून गाणगापुरास दर्शनास यावयास सांगितलें. मग तो आज्ञेप्रमाणें चार महिने तेथें राहून गाणगापुरास गेल्यावर स्वामीचें दर्शन घेऊन विजापुरास गेला. त्यास राज्यपद मिळालें हें स्वामीच्या कृपेचें फळ होय.

गाणगापुरास स्वामीनें शिष्यांना सांगितलें कीं, आतां तुह्मांस एथें माझें दर्शन दुर्लभ, यास्तव एथें पादुकांची स्थापना करून त्यांची

पूजा करीत जा; असें सांगून आपण अंतर्धान पावले. ते कृष्णेच्या कांठीं कुरुंदवाड ह्मणून गांव आहे तेथें प्रगट झाले. शेंकडों लोक त्यांच्या दर्शनास येऊं लागले; व ते नवसासही पावूं लागले.

एके बाईस मूल होत नव्हतें ह्मणून तिणें नवस केला कीं, जर मला मुलगा झाला तर त्यास मी स्वामींच्या दर्शनास घेऊन येईन. नंतर तिला पुत्र झाला. पुढें सहा महिने झाल्यावर मुलगा मरण पावला; मग आईनें तें प्रेत स्वामीपाशीं नेलें तों मुलगा जिवंत झाला.

एक सावकार मरण पावला, त्याची बायको सती जात होती. तिणें मार्गांत स्वामीची भेट घेतली व पायां पडतांच स्वामीनें तिला 'अष्टपुत्रासौभाग्यवती' असा आशीर्वाद दिला. तो ऐकून तिणें स्वामीस आपली सर्व हकीगत कळविली. तेव्हां तो ह्मणाला कीं, तुझा भ्रतार उठेल. मग ती तेथून प्रेताजवळ गेली, तों तिचा नवरा उठून बसला.

## मुद्गलभट.

हा वेदशास्त्रांत निपुण असे. कोणी कसाही पंडित आला असतां त्याच्याशीं टिकत नसे. इतकी विद्या असून तो निरभिमानी होता; तसाच तो निर्लोभी होता. वेळेवर अतितअभ्यागत आला असतां तो त्याचा सत्कार करी. श्रीराम, सीता, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न ह्या मूर्त्तींची तो नित्य पूजा करी. पुत्र, मित्र, भार्या आदिकरून सर्व जग त्यास श्रीरामरूप दिसे. तो अयाचितवृत्तीनें मिळेल तितक्यांत संतुष्ट होऊन कुटुंबाचें पालन करी. त्याच्या घरीं श्रीरामजयंतीचा मोठा उत्सव असे. दहा दिवस ब्राह्मणभोजन होई. भाविक लोक शिधासाहित्य देत. संत, महंत कीर्त्तन करीत; असें बहुत दिवस चाललें.

एकदां असा चमत्कार झाला कीं, तो कुटुंबासह महायात्रेस निघाला; तेव्हां आपला एक मुलगा देवतार्चन करावयाकरितां घरीं ठेवला होता. मुद्गलभटानें काशीस पोंचल्यावर भागिरथीचें स्नान करून विश्वेश्वराची पूजा केली. मग सर्व यात्रा करून समाधान पावला. त्यास रामनवमीस परत घरीं यावयाचें होतें ह्मणून तो परत येत असतां, एका गृहस्थानें त्यास आपल्या घरीं आग्रहपूर्वक रहावून घेतलें

व त्याची पूजा करून वस्त्रेंभूषणें दिलीं आणि रामजयंतीच्या उत्सवाकरितां द्रव्यही बरेंच दिलें.

त्याच्याजवळ पुष्कळ द्रव्य आहे असें पाहून त्याच्याबरोबर चोर चालले. त्यांनीं अरण्यांत हल्ला करून द्रव्य हिरावून घेण्याचा आपापसांत संकेत केला. ही गोष्ट मुद्गलभटास माहीत नव्हती. चोर व साव सर्व त्यास समान वाटत असल्यामुळें द्रव्याचें रक्षण केलें पाहिजे ही कल्पना त्याच्या मनांत आली नाहीं. असो.

चोरांनीं घात करण्याचा केलेला बेत पाहून श्रीरामचंद्रानें साकार रूप धारिलें. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न ह्यांनींही आपापलीं रूपें पालटून धनुष्य बाण हातांत धरिले. भरत व शत्रुघ्न पुढें; श्रीराम व लक्ष्मण मागें; असे ते चौघे रक्षण करीत असत. रात्रीस तीं सर्व निजल्यावर चौघे जण चारी प्रहर जागत बसत. ते चोरांकडे उग्र रूपानें व डोळे वटारून पहात होते. तेव्हां चोरांना भीति उत्पन्न झाली व आपला बेत फसतो असेंही वाटलें. मग तुह्मीं कोठें जाणार, असें चोरांनीं त्यांस विचारिलें. तेव्हां श्रीरामानें सांगितलें कीं, आह्मीं मुद्गलभटाचे चाकर आहों; त्यास त्याच्या घरीं पोंचवून मग आह्मीं अयोध्येस जाऊं. असें सांगितलें असतांही चोरांनीं त्यांना ओळखिलें नाहीं. मुद्गलभट घरीं सुखरूप पोंचल्यानंतर ते चौघेही रक्षणकर्ते अदृश्य झाले. हा चमत्कार पाहून चोरांना आश्चर्य वाटलें. मग हा भक्त आहे ह्मणून देवानें ह्याचें रक्षण केलें असेंही त्यांच्या मनांत आलें.

मुद्गलभट आल्याचें समजतांच गांवकरी दर्शनास आले. विचारपूस करूं लागले असतां, श्रीरामाच्या कृपेनें सुखरूप आलों ह्मणून सांगितलें. मग त्याणें देवघरांत जाऊन देवाचें दर्शन घेतलें. त्या समयीं द्वाराजवळ चोरांस पाहिलें, तेव्हां आमच्याबरोबर येथवर आलांत तर भाजीभाकर एथेंच खाऊन जावें असें त्यानें त्यांस सांगितलें. ते तेथें जेवल्यावर त्यांची दुष्ट बुद्धि निघून गेली. मग तुह्मीं ठेविलेले चौघे चाकर कोठें दिसत नाहींत; ते आहेत कोठें? असें चोरांनीं त्यास विचारिल्यावर तो ह्मणाला, मी चाकर ठेविले नव्हते. मग चोरांनीं

सर्व झालेला मागील प्रकार त्यास सांगितला. तेव्हां, श्रीरामचंद्राचेंच हें कृत्य ह्मणून तो समजला. मग तो चोरांचे पाय धरून ह्मणाला, तुह्मीं महाभक्त आहां ह्मणून तुम्हांस लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांसह श्रीरामाचें दर्शन झालें. मी पतीत आहे ह्मणून तो मला दर्शन दिल्याशिवाय गेला. हें भाषण ऐकून चोरांस पश्चात्ताप झाला. ते ह्मणाले, दुसऱ्याच्या संगतीनें नरकवास भोगावयास लागला असता; परंतु तुमच्या संगतीनें आमचा उद्धार झाला. श्रीजानकीनाथाचें दर्शन झालें. आह्मीं पावन झालों; आतां आह्मांस द्रव्य नको. मग मुद्गलभटानें डोळे झांकून रामाचें स्तवन केलें; त्या शंभर आर्या संस्कृतांत आहेत. स्तवन करतांच श्रीराम, सीता, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांणीं देवघरांत प्रगट होऊन त्यास दर्शन दिलें.

आणखी चमत्कार असा झाला कीं, श्रीरामजयंतीचा उत्सव चालला होता; साधुसंतांचें कथा कीर्त्तन होत होतें; तों तेल संपलें. बाजारांतून आणावें तर अपरात्रीस फिरण्याची मनाई असे. कीर्त्तनास येणारी मंडळीही सर्व रात्र तेथें राहून उजाडल्यावर घरीं जाई. कीर्त्तनांत तेल सरलें, तेव्हां रामास संकट पडलें. मग देव मुद्गलभटाचा विद्यार्थी होऊन तेलिणीकडे गेला; व एक आंगठी गहाण ठेवून घागरभर तेल घेऊन आला. तेव्हां, सकाळीं आंगठी आणून देऊन आपले पैसे घेऊन जा, असें त्यानें तेलिणीस सांगून ठेविलें. मग परत येऊन दिव्यांत तेल घातलें. त्या रात्रीं चारी प्रहर कीर्त्तन झालें.

सकाळीं आंगठी घेऊन तेलीण आली; व रात्रीस झालेला मजकूर सांगून मुद्गलभटाजवळ पैसे मागूं लागली, तेव्हां त्यास विस्मय वाटला. त्यानें आंगठी गहाण ठेवून कोणीं तेल आणलें ह्मणून विद्यार्थ्यांत चौकशी केली; तेव्हां सर्वांनीं कानावर हात ठेविले. मग मुद्गलभट, 'ही रामाचीच अघटित करणी' असें समजला; व ती आंगठी देव्हाऱ्यांत ठेवून प्रीतीनें पूजा करूं लागला.'

# अध्याय ५० वा.

## जनजसवंत, निरंजनस्वामी, कृष्णदास व जयरामस्वामी

### जनजसवंत.

हा यजुर्वेदी ब्राह्मण तापीच्या किनाऱ्यावर वरेट ह्मणून एक नगर आहे तेथें राहत असे. तो रामउपासक होता. तो गृहस्थाश्रमी असून निर्लोभी होता. श्रीराम, सीता व लक्ष्मण ह्या मूर्त्तींची तो पूजा करी. तो कीर्त्तनही करीत असे. ऐकावयास पुष्कळ भाविक लोक जमत.

एकदां असा चमत्कार झाला कीं, सात दिवस अहोरात्र एक सारखा पाऊस पडला; तेणेंकरून नदीस पूर आला. गांवांत पाणी शिरून पुष्कळ घरें पडलीं. तेव्हां गांवचे लोक हाहाकार करूं लागले. त्या वेळीं कोणी अशी युक्ति काढिली कीं, श्रीरघुनाथ भक्तांचें संकट निवारण करितो, अशा अर्थाचा उपदेश जनजसवंत रोज कीर्त्तनांत करीत असतो व त्यास श्रीराम साह्यही आहे; ह्यास्तव त्यास शरण जावें. ही युक्ति पसंत करून ते जनजसवंताच्या घरीं गेले; व भक्तिपूर्वक अवघे पायां पडले. त्या वेळीं कुटिळांनीं सर्व मजकूर त्यास निवेदन करून विघ्नाचें निवारण करावयासाठीं आर्जवानें प्रार्थना केली; व जर हें विघ्न निवारण झालें तरच तुह्मीं नित्य देवाची कीर्त्ति गातां ती खरी असें आमच्या अनुभवास येईल व ती खरी समजून आमची निष्ठा बसेल ह्मणून सांगितलें. हें ऐकून जनजसवंत देवघरांत गेला. त्यानें दार बंद करून डोळे मिटून चित्ताची एकाग्रता केल्यावर रघुनाथाची प्रार्थना केली, तों रामचंद्रानें ध्यानांत प्रगट होऊन सांगितलें कीं, हा धातूचा हनुमंत नदीतीरीं नेऊन ठेव; तो सर्व पाणी शोषून घेऊन लोकांस सुख होईल असें बोलून अदृश्य झाले.

मग अर्धा गज उंचीची धातूची मारुतीची मूर्त्ति जनजसवंतानें नदीच्या कांठीं नेऊन ठेविली. त्या मारुतीनें विक्राळ रूप धरून सर्व नदीचें पाणी सर्वांसमक्ष शोषून घेतलें. मग सर्व लोक जनजसवंताच्या पायां पडून त्याची स्तुति करूं लागले. निंदकांनीं कल्पना काढिली कीं, तीन दिवस झाल्यावर नदीचें पाणी सहजरीत्या ओस-

रलें. धातूची मूर्त्ति पाणी कसें पिईल? घरोघर मूर्त्ति आहेत; पण अशा गोष्टी कधीं घडल्या आहेत काय? तो टाणेटोणे, मंत्र, मोहिनी जाणतो. भाविक व भोळे व्यर्थ त्याच्या नादीं लागले. अशीं कृत्यें करण्याची त्याची शक्ति असती, तर दारोदार भीक कशाला मागता? अशा नाना कल्पना निघूं लागल्या. ही गोष्ट श्रीरामचंद्रास सहन झाली नाहीं. देव आधीं दुर्जनाला पुढें करून भक्ताचा छळ करवितो, मग अघटित कृत्य करून दाखवून संताचा महिमा वाढवितो.

मारुतीनें पाणी शोषून घेतलें ही गोष्ट विकल्पी लोकांना खरी वाटली नाहीं. मग असा चमत्कार झाला कीं, त्याच धातूच्या मारुतीच्या नाभीला दुसरीं चार भोंकें पडलीं त्यांतून उदकाच्या धारा चार दिवस अहोरात्र वहात होत्या. हा चमत्कार पहाण्यास ठिकठिकाणचे लोक येऊं लागले. त्या वेळीं कुटिलांची खात्री होऊन ते जनजसवंताच्या पायां पडले; व त्याची स्तुति करून श्रीरामाचें भजन करूं लागले. मूर्त्तीनें उदक शोषून घेतलें तें स्थान अद्यापि तेथें आहे. पोटाचें छिद्र तसेंच राहिलें आहे तें दिसतें. नंदुरबार परगण्यांत त्याचे वंशज होते ते निझऱ्यामध्यें येऊन राहिले. तेथेंच मूर्त्ति आहे. पुढें जनजसवंत रामरूप झाला. त्याची कीर्त्ति साधुसंत वर्णन कारितात.

## निरंजनस्वामी.

हा गणपतीची उपासना करी. नारदा, बिंदुसुरा, कर्पुरा या नद्यांच्या संगमांवर नामल गांवांत तो रहात असे. तो गणपतीवांचून दुसरें दैवत मानीत नव्हता. त्याची निष्ठा पाहून त्यास गणपतीनें साक्षात् दर्शन दिलें होतें. त्यास भेटावयास एकदां एक विद्वान् ब्राह्मण गेला, तोही स्नान करून पूजा करावयास बसला. निरंजन स्वामी नुसत्या गणपतीची पूजा करीत होता. असें पाहून तो विद्वान् ब्राह्मण त्यास म्हणाला, शाळिग्रामावांचून पूजा करणें शास्त्रविरुद्ध होय. विष्णूवांचून अन्य दैवतांची पूजा केली तरीं त्यांचें तीर्थ घेणें बरोबर नाहीं; असें म्हणून त्या ब्राह्मणानें शाळिग्रामाची मूर्त्ति त्यास दिली व पूजा करावयास सांगितलें. निरंजन स्वामीनें ती शाळिग्राममूर्त्ति हातांत घेतली व म्हटलें कीं, आजपर्यंत एकनिष्ठ उपासना होती;

आतां व्यभिचारभक्ति दिसते. गजानना, तुझी उपासना करितां देह पतन झाला तरीं पुरवला; पण माझें मन तुझ्याच ठिकाणीं रहावयाचें. ध्यानांत संपूर्ण रूप न दिसलें तरीं तुझें भजन सोडणार नाहीं.

निरंजनाची उपासनाभक्ति पाहून वैकुंठनाथ संतुष्ट झाले. विष्णुमूर्त्ति (शाळिग्राम) हातावर होती, तीस लागलीच सोंड फुटली. हा चमत्कार साधूसंत व विद्वान ब्राह्मण जवळ होते त्यांणीं पाहिला. मग लागलाच त्यांणीं आनंदानें टाळ्या वाजवून जयजयकार केला. शाळिग्रामाचा गणपति झाला हें पाहून लोक त्याच्या पायां पडले. मग स्वामीनें त्या मूर्त्तीची पूजा केली.

### कृष्णदास.

हा जातीचा ब्राह्मण होता. ह्याची मूळ कथा अशी आहे कीं, तो नित्य विष्णूची पूजा करी. तो गृहस्थाश्रमी असे. त्याची पहिली कांता निवर्त्तली, मग दुसरा विवाह करण्याचें मनांत आलें. व्यापार करण्याच्या निमित्तानें कृष्णदास एका राजाच्या सैन्याबरोबर गेला होता. त्या सैन्यानें गांव लुटला ह्यामुळें मोठा आकांत झाला. बायकापोरांची दाणादाण झाली. त्यांत त्याणें एका ब्राह्मणाच्या घरीं एक कुमारिका पाहिली; ती उपवर असून सुंदर होती, इतक्यावरून कृष्णदासानें तिशीं लग्न लाविलें. मग तो तिला घेऊन आपल्या गांवीं आला. ह्या गोष्टीस कांहीं दिवस लोटल्यावर तिला ऋतु प्राप्त होऊन सोळा संस्कार घडले.

एके दिवशीं ती पाणवठ्यावर पाणी आणावयास गेली असतां तिला तिच्या मामानें पाहिलें. तो जातीचा न्हावी होता. त्यांणीं एकमेकांस ओळखिलें. त्यास पहातांच तिला गहिंवर आला व त्याचाही कंठ सद्गदित झाला. तो तिला ह्मणाला, तुझा दोन वर्षें आम्हीं शोध करीत आहों; तों आज अकल्पित तुझी भेट झाली. आईनें तुझ्यासाठीं रडून रडून कंठीं प्राण धरून ठेविला आहे. तेव्हां भाचीनें सांगितलें कीं, गांव लुटला तेव्हां मी शेजारीं एका ब्राम्हणाकडे लपून राहिलें; तेथें एक ब्राम्हण येऊन मला येथें घेऊन आला व त्यानें मजबरोबर लग्नही लाविलें.

हें त्या दोघांचें भाषण दुसऱ्या बायकांनीं ऐकिलें. मग त्यांनीं ही गोष्ट गांवभर केली; तेव्हां लोकांनीं कृष्णदासाची परोपरी निंदा केली. दुसऱ्या जातींत अशी गोष्ट घडती तर ब्राह्मणांनीं लोंगेच शब्द लाविला असता; परंतु हे पडले ब्राह्मण. दुष्टानें सैन्यांत जाऊन न्हाव्याच्या कन्येशीं आचारविचार चट सारा गुंडाळून ठेवून अघोर नरकाचें साधन केलें; असें लोक उघड बोलूं लागले. तेव्हां विद्वान् ब्राम्हणांनीं कृष्णदासास सांगितलें कीं, तुला आम्हीं अपंक्त केलें आहे. जर हा नूतन व्यवहार असता, तर त्यांतल्या त्यांत सवड पाहून एखादा शास्त्रार्थ चालविला असता; परंतु दिवस फार होऊन अनेक संस्कारदेखील झाले; ह्यास्तव आतां देहांत प्रायश्चित्त घे असें स्पष्ट सांगितलें.

हाच अपवाद त्याच्या वैराग्यास कारण झाला. त्यानें ईश्वराकडे लक्ष लाविलें. चौऱ्यांयशीं लक्ष योनी फिरून नरदेह प्राप्त झाला; देहांत प्रायश्चित घेतल्यानें आत्महत्या घडेल म्हणून तें घेतलें नाहीं. त्याणें ब्राह्मणांना सांगितलें कीं, विद्या, वय, कुळ, जात यांपासून मी भ्रष्ट झालों ; आतां वैकुंठनायक माझा उद्धार करील. मग तो नित्य नामस्मरण हरिकीर्त्तन करीत असे. तो ज्ञानेश्वरीचें पारायण करी. तो पंढरीचा नेमाचा वारकरी झाला. तो होईल तितका परोपकार करी. त्याचें कीर्त्तन ऐकावयास पुष्कळ लोक जाऊं लागले. ब्राम्हण लोक कुचेष्टेनें 'कृष्णन्हावी' असें त्यास बोलत. कितीएक त्याच्या घरीं जाऊन हजामत करा असें ह्मणूं लागले; तेव्हां तोही वस्तरा कातर घेऊन ब्राह्मणांची हजामत करी. तो पूर्वीप्रमाणेंच स्नानसंध्यादि नित्य कर्में करी. अशा स्थितींत असतां पुढें त्याची अतिशय सत्कीर्त्ति वाढली.

## जयरामस्वामी.

ह्या सत्पुरुषास रुक्मिणीकांताचें साक्षात् दर्शन झालें. हा ब्राह्मणाचा मुलगा. ह्याचे आईबाप ह्यास घेऊन पंढरीस आलीं होतीं. त्यांचें मन तेथें रमल्यामुळें तीं संसाराविषयीं उदास होऊन तेथेंच क्षेत्रवास करून राहिलीं. कांहीं दिवस लोटल्यानंतर तीं मरण पावलीं, तेणेंकरून हा विरक्त झाला व श्रीपांडुरंगाच्या पायीं प्रीति ठेवून पंढ-

शीस राहून नामस्मरण करूं लागला. माझे आईबाप, गणगोत काय तें सर्व तूंच; तुझ्यावांचून मला दुसऱ्या कोणाचा आधार नाहीं असें तो पांडुरंगास म्हणे.

एके दिवशीं जयराम पुराण ऐकत असतां सद्गुरुसेवेचा महिमा पुराणिकानें वर्णन केला. मग गुरुगीतेंत सद्गुरुभक्ति सांगितल्यावर्हुकूम घडावी म्हणून तो तेथें सद्गुरुप्राप्तिस्तव अनुष्ठान करूं लागला. तें असें कीं, तो चार घटका रात्र उरल्यावर चंद्रभागेंचें स्नान करून पुंडलिकाची पूजा करी व क्षेत्रप्रदक्षिणा झाल्यावर महाद्वारांत येऊन पांडुरंगाच्या पायां पडे; व एकादशी, कीर्त्तन, साधुसंतांचें दर्शन, निरंतर नामस्मरण, अशा रीतीनें वागून दिवस काढीत असे.

ह्याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर त्यास पांडुरंगाचा दृष्टांत झाला कीं, 'वडगांवास कृष्णदास आहे त्यास तूं शरण जा; भक्तिपूर्वक त्याची सेवा केल्यानें तुला माझी प्राप्ति होईल.' असा दृष्टांत होतांच तो जागा झाला. व सद्गुरूची केव्हां भेट होईल असें त्यास झालें. मग तो पांडुरंगाच्या पायांवर मस्तक ठेवून तेथून निघून वडगांवास गेला. त्यानें कृष्णदासाच्या घरीं जाऊन त्यास साष्टांग नमस्कार घातला; त्यांना सकल वर्त्तमान विदित केलें; व वरदहस्त मस्तकावर ठेवून अनुग्रह करण्यासाठीं प्रार्थना केली. त्या वेळीं, मला ब्राम्हणांनीं जातीबाहेर टाकिलें आहें; आणि या कारणास्तव मी निराळी गुंफा बांधून एथें भजन करीत बसलों आहें; एखादा कुळवंत् ब्राह्मण पाहून त्यास शरण जाऊन त्यास गुरु कर; वगैरे आपली साद्यंत हकीगत कृष्णदासानें त्यास सांगितली. ती ऐकून जयरामानें त्याचे घट्ट पाय धरिले आणि म्हटलें, मला बाळकाला उपेक्षूं नका. कायेनें, वाचेनें, मनानें मी तुम्हांस शरण आलों आहें; मला पावन करावें. त्याचा निर्धार पाहून कृष्णदासानें त्याच्या मस्तकावर हात ठेविला; व अनुग्रह देऊन श्रीकृष्णभजनीं लाविला. जयराम द्वैतकल्पना टाकून अनन्यभावानें सद्गुरूची सेवा करूं लागला.

ज्ञानसंपन्न सद्गुरु पृथ्वीवर उदंड आहेत, त्यांचा उपदेश घेण्याचा टाकून ह्या पवित्र ब्राह्मणाच्या मुलानें ह्या भ्रष्ट कृष्णन्हाव्याचा उपदेश

कशाला घेतला, वगैरे अनेक प्रकारांनीं लोक त्याची विटंबना करूं लागले. त्याच्याशीं भाषण न करण्याचा लोकांनीं कट केला. आप्तवर्गांनीं सुद्धां त्यास सोडून दिलें; तरी त्याची जयरामानें पर्वा केली नाहीं. तो त्रिकाळ गुरूचें दर्शन घेऊन त्याची सेवा मनापासून करीत होताच. गुरूच्या चरणाचें तीर्थ आवडीनें प्राशन करी; तेणेंकरून तो कविता करूं लागला. तो कीर्त्तनही करी. भोळे भाविक जन कीर्त्तन ऐकावयास येत असत; परंतु वैदिक, शास्त्री, पुराणीक त्याचें तोंड सुद्धां पहात नसत.

पुढें असा चमत्कार झाला कीं, वडगांवास शंकराचार्यांची स्वारी आली; त्या वेळीं ब्राह्मणांनीं त्यांचा मानमरातब यथायोग्य ठेविला. सर्वांनीं दर्शन घेऊन साष्टांग नमस्कार घातले. भोजनाचा थाटही उत्तम केला होता. मग त्यांणीं जयरामाचा संपूर्ण वृत्तांत निवेदन करून त्याला शिक्षा करण्यासाठीं विनंती केली. ही अनुचित गोष्ट ऐकून आचार्यांस राग आला. मग त्यास धरून आणण्याचा हुकूम केला. तो ऐकतांच, आतां जयरामाची चांगली खोड मोडून त्यास शिक्षा होईल ह्मणून ब्राह्मणांना अत्यंत आनंद झाला.

शंकराचार्यांचे शिपाई कृष्णदासाच्या मठांत गेले; त्यांणीं जयरामास ओढीत नेऊन आचार्यांपुढें उभा केला. आचार्यांनीं त्यास विचारिलें कीं, सर्व वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ; त्यांस टाकून त्या भ्रष्ट न्हाव्यास शरण जाऊन त्याचा उपदेश तूं कां घेतलास ? तुला शिक्षा केली पाहिजे. हें ऐकून जयरामानें पायां पडून उत्तर दिलें कीं, माझा गुरु साक्षात् श्रीकृष्णरूप होय; ह्मणून मी त्यास शरण गेलों. स्वामींनीं कृपा करून तेथवर येऊन खात्री करून घ्यावी. न्हावी असेल तर मला शिक्षा करावी. हें ऐकून आचार्यांना विस्मय वाटला. ते लागलेच कृष्णदासाच्या मठांत गेले; तेव्हां कृष्णदास स्नान करून श्रीविष्णूची पूजा करीत होते. जयरामाची भक्ति पाहून सद्गुरु कृष्णरूप झाले. साक्षात् चतुर्भुज वैकुंठपति आचार्यांच्या पहाण्यांत आले; तेव्हां शंकराचार्यांनीं त्यास नमस्कार केला.' असें पाहून ब्राह्मणांस आश्चर्य वाटलें. मग आचार्यांनीं जयरामास सांगितलें कीं, कृष्णदास हा आह्मांस पांडुरंगरूप दिसत आहे; तुझी भक्ति धन्य होय. आतां तूं खुशाल

याची सेवा कर. आजपासून तूं बहिष्कारापासून दोषमुक्त झालास; हें आचार्यांचें वचन सर्वांना मान्य झालें.

---

# अध्याय ५१ वा.

## माणकोजी बोधला आणि मध्वनाथ.

### माणकोजी बोधला.

हा प्रेमळ भक्त धामणगांवामध्यें रहात असे. तो पांडुरंगाचें भजन करी. तो अगदीं विरक्त होता. त्याची स्त्री ममताई ही देखील भाविक व महा साध्वी होती. परमार्थाविषयीं ती आपल्या पतीस पूर्ण अनुकूळ होती. त्यांचा वडील मुलगा लखमोजी पाटील, ह्यास मात्र हें बापाचें भजन, कीर्त्तन वगैरे आवडत नसे. तो उघड बोले कीं, संसारावर पाणी सोडून नामस्मरण बाप करितो; ह्यास्तव लोक मला हंसतात. मधल्या मुलाचें नांव यमाजी व तिसरा विठोबा हा लहान असे. यमाजी बापाच्या मागें कीर्त्तनांत टाळ वाजवावयास उभा राही. त्यानें लज्जा, मान, लौकिक, आशा ह्यांचा त्याग केला होता. त्याच्या स्त्रिचें नांव भागीरथी. ती परम भाविक व सुलक्षणी असून फारच रूपवान होती. ती सासुसासऱ्यांच्या मर्जीचा कल पाहून त्याप्रमाणें वागे.

माणकोजी बोधला अतिशयच उदार असे; तसाच तो सुशील आणि सत्वधीर होता. तो याचकांची मर्जी कधीं मोडीत नसे. त्याणें एकदां आपलें सारें शेत कुटाविलें; तेव्हां पंढरिनाथानें प्रसन्न होऊन थोड्या ताटांस कणसें आणिलीं. रितीं पेवें होतीं तीं धान्यानें भरून गेलीं. त्याणें तन, मन, धन हीं पांडुरंगास अर्पण केलीं होतीं; ह्यास्तव त्याची सत्कीर्त्ति फार झाली.

बोधला प्रथमतः पांडुरंगास आरती ओंवाळून मग कीर्त्तनास प्रारंभ करी. तो सर्व प्रासादिक वचनें बोले. मागें टाळ वाजवावयास रुक्मिणीकांत उभा राही. तो भक्तिमार्ग प्रतिपादन करीत असे. बोधल्याची सत्कीर्त्ति ऐकून तेथच्या मुसलमान राजानें शिपाई पाठवून त्यास बोलावून नेलें; व तो त्यास ह्मणाला, आतांसें तूं बरेंच ढोंग मातविलें आहेस. तुझ्यांत कांहीं खरेपणा असेल, तर आह्मांस एखादा चमत्कार दाखीव. इतकें बोलून एके ताटांत मांस भरून तें झांकून आणविलें

व त्यास सांगितलें, हें तूं आतां खाऊन मुसलमान हो. तेव्हां बोधल्यास मोठें संकट पडलें. त्यानें सर्व हवाला देवावर ठेवून पांडुरंगाचा धांवा केला; तेणेंकरून त्याच्या संकटाचें निवारण झालें. तें असें कीं, त्या ताटावरचा रुमाल काढून पहातात तों आंतील मांसाचे तुकडे नाहींसे होऊन गुलाबाचीं फुलें झालीं. तेव्हां बोधलेबोवास देव प्रसन्न झाला अशी बादशहासुद्धां सर्वांची खात्री झाली. तो त्यास गांव इनाम द्यावयास तयार झाला; द्रव्यही पुष्कळ देत होता; पण कांहींएक न घेतां तो रित्या हातीं धामणगांवास परत गेला.

सत्त्व पहाण्याच्या हेतूनें एकदां पंढरीनाथ फकीर होऊन बोधल्याकडे गेले; तेव्हां मर्जी असेल तें मागा असें बोधल्यानें सांगितलें. त्यास कसोटीस लावून पहाण्याकरितांच तो वेषधारी फकीर ह्मणाला, तुझी सून भागीरथी अत्यंत रूपवति आहे ती मला दे. मग बोधल्यानें यमाजीस बोलावून त्याचें मत विचारिलें. तो बापाच्या पायां पडून, मी तुमच्या मर्जीबाहेर नाहीं ह्मणून बोलला. मग, मी तुला फकिरास देतों, असें बोधल्यानें भागिरथीसही सांगितलें. तेव्हां ती पायां पडून ह्मणाली, मी तुमची दासी असून इच्छेनुरूप वागणारी आहें. मग बोधल्यानें आनंदानें फकिराचें मागणें कबूल केलें. मग, इला मंगलस्नान घालून जेवूं घालून माझ्या स्वाधीन करा; मी घेऊन जात असतां तुम्हांस ममता उपजली, तर मी तिला टाकून विन्मुख परत जाईन; असें फकिरानें त्यास उघड बोलून दाखविलें. मग भागीरथी स्नान करून नवें लुगडें नेसली व हळद कुंकू लावून जेवली. नंतर बोधल्यानें तिला हातीं धरून संतोषानें फकिराच्या स्वाधीन केलें.

मग वेषधारी पांडुरंगानें 'तुझें कल्याण होवो' असा बोधल्यास आशीर्वाद देऊन भागिरथीस खांद्यावर बसविलें; आणि आपण निघून गेला. तो गांवांतून जाऊं लागला असतां, गांवकरी बोधल्यास वेड लागलें असें ह्मणूं लागले. त्यानें संसाराची माती करून टाकिली; असेंही कित्येक बोलूं लागले. त्या फकिरानें गांवच्या वेशीजवळ येतांच तिला खांद्यावरून उतरून खालीं ठेविली; आणि शंखचक्रपितांबरधारी असें चतुर्भुजरूप धरून तिला दर्शन दिलें. तें रूप पहातांच ती श्रीहरीच्या

पायां पडली व त्यास हृदयीं धरून न्याहाळून पाहूं लागली. तेंव्हां मी 'तुझ्या पोटीं येईन' असें बोलून तिला गांवाकडे पहावयास सांगून पांडुरंग लागलाच अदृश्य झाला.

त्या वेळीं ती मोठमोठ्यानें रडूं लागली व देवाचा धांवा करूं लागली कीं, स्वामींनीं मला ज्याच्या हातीं दिलें तो गुप्त झाला; आतां मला जाण्यास कोठें ठिकाण नाहीं. घरीं गेलें तर सासरा, नवरा हे रागावतील. आतां, प्रपंच ना परमार्थ; असें दोहोंना अंतरून तोंडघशीं पडलें; असा ती विलाप करीत असतां ही हकीगत लोकांनीं येऊन बोधल्यास सांगितली. मग माणकोजीनें यमाजीस हांक मारून सांगितलें कीं, फकिराच्या रूपानें प्रत्यक्ष गरुडध्वज आपलें सत्व हरण करण्यासाठीं आला होता. तूं खरोखर धर्मराज आहेस.मग त्या दिवसापासून सर्व लोक त्यास धर्मराज या नांवानें हांका मारूं लागले. मग सर्व मंडळीस घेऊन माणकोजी भजन करीत वेशीजवळ तिला आणावयास गेले. भागीरथी सासऱ्याच्या पायां पडली. त्यानें तिच्या मस्तकावर हात ठेवून तिला पांडुरंगाचें दर्शन झालें म्हणून तिचें भाग्य वर्णन केलें. मग तिला भजन करीत व मोठ्या थाटानें वाजत गाजत घरीं घेऊन आले. नंतर वर दिल्याप्रमाणें भागिरथीच्या उदरीं पांडुरंगानें जन्म घेतला; त्याचें नांव भगवंतबावा असें ठेविलें. त्याचा पुत्र भोजबावा. आषाढीची धामणगांवांत यात्रा भरत असते.

## मध्वनाथ.

हा पांडुरंगाची उपासना करी. त्यास देवानें साक्षात् दर्शन देऊन आपली कीर्ति वर्णन करण्याची आज्ञा केली; व तुझ्या जिव्हाग्रीं सरस्वती राहील ह्मणून वर दिला. मग तो कीर्त्तन करूं लागला. त्याची वरदवाणी ऐकतांच श्रोत्यांचें देहभान नाहींसे होई. पुढें देशोदेश फिरून लोकांना भक्तिमार्गाकडे वळविण्याविषयीं पांडुरंगाची आज्ञा झाली. कोणी पाखंडी, कुतर्की, वितंडवादी छळ करितील तर मी तेथें येऊन तुझें रक्षण करीन असा वर दिला. मग तो देशपर्यटणास निघाला.

मध्वनाथ गांवगन्ना कीर्त्तन करीत करीत औरंगाबादेस गेला. त्याची तेथें कीर्त्तनें झाल्यावर तेथच्या लोकांची पूर्ण श्रद्धा बसली. मग

लोकांनीं त्यास कुटुंबासह तेथेंच राहवून घेतलें. त्याचे तेथें बरेच शिष्य झाले; ते निरंतर सेवा करीत.

कान्होजी आंगऱ्या हा मुंबईमध्यें होता. तो धर्मशील व उदार असे. त्याच्याजवळ चौदाशें पंडित जमले, त्यांत भास्करराय हा मुख्य होता. त्यानें यजमानास बोध केला कीं, आपण प्राकृत हरिकीर्त्तन ऐकूं नये. तेव्हां कान्होजीनें त्यास सांगितलें कीं, उत्तम वक्ते व चतुर असे पुष्कळ हरिदास एथें उत्सवास येतील; त्यांच्याशीं वादविवाद करून त्यांना जिंकावें. त्या वेळीं तो मोठ्या हिंमतीनें ह्मणाला कीं, प्राकृत ग्रंथ आह्मीं आजपासून हातांत धरणार नाहीं व प्राकृत कीर्त्तनही ऐकणार नाहीं; आह्मीं हटकून हरिदासास जिंकूं. मग उत्सवास पुष्कळ हरिदास आले. त्यांचा व याचा नित्य वादविवाद होई; परंतु तो पंडित त्यांना आटोपला नाहीं.

इकडे मध्वनाथास पांडुरंगाचा मुंबईत जाऊन वादविवाद करण्याविषयीं दृष्टांत झाला. मग तो आपल्या कुटुंबासुद्धां व शिष्यमंडळी बरोबर घेऊन मुंबईस आला. तो येतांच कान्होजी आंगऱ्यानें त्यास सामोरें जाऊन साष्टांग नमस्कार करून आलिंगन दिलें. ही बातमी भास्करराय पंडितास लागतांच त्यास अभिमानाचा विशेष ताठा आला; व ह्या मध्वनाथास जर जिंकिला तर सर्व प्राकृत कथा बंद होतील; अशा अभिमानानें तो त्याचा द्वेष करूं लागला.

रात्रीस मध्वनाथाच्या कीर्त्तनाचा बेत झाला. हरिदास, पंडित आदिकरून मंडळी ऐकावयास आली होती. भास्करराय पंडित मध्यभागीं बसून क्रोधानें फुरफुरत होता. मध्वनाथांनीं सभेस नमस्कार करून मग कीर्त्तनास आरंभ केला. प्रथमारंभीं 'ज्ञानेशोभगवान्' ह्मणतांच तो पंडित संतप्त झाला व दांतओंठ चावून ह्मणाला, ज्ञानदेव, निवृत्ति इत्यादि हे संन्याश्याचे पुत्र; ह्यांस विष्णुअवतार ह्मणतोस ह्यास शास्त्राधार कोणता तो सांगावा. हें ऐकून मध्वनाथानें उत्तर दिलें कीं, वैकुंठनाथ लीलाविग्रही आहे; त्यास जात कसची आली आहे ? मत्स्य, कच्छ, वराह इत्यादि अवतार साक्षात् परमेश्वरानें घेतले असतां प्रतापामध्यें कांहीं एक उणपणा नाहीं; तद्वत निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान,

मुक्ताबाई ह्यांनीं यतीच्या पोटीं अवतार घेऊन अघटित चमत्कार करून दाखविले. पैठणच्या ब्राह्मणांनीं त्यांचा अति छळ केला; तेव्हां ज्ञानदेवानें रेड्याकडून वेद बोलविले. देव आणि भक्त ह्यांना कुळ जात नाहीं; ते जगाच्या हितार्थ स्वइच्छेनें अवतार घेतात ; नामाएवढें श्रेष्ठ साधन कलियुगामध्यें दुसरें नाहीं, यास भागवत प्रमाण आहे; असें सांगून तो संस्कृत श्लोक बोलून त्याचा अर्थही उघड करून दाखविला. त्या श्लोकाचाच तुकारामाचा अभंग मध्वनाथानें ह्मटला, व नामावर असंख्य लोक तरल्याचे दृष्टांत दिले; आणि विठ्ठलनामाचा गजर केला. त्या वेळीं भास्करराय पंडितासह सर्व हतगर्व झाले. त्यांस मध्वनाथ साक्षात् ईश्वरसा दिसूं लागला. मग त्याच्या पायां पडून भास्करराय पंडित ह्मणाला, आपण आतां खुशाल प्राकृत कीर्त्तन करावें. ह्याच तरण्याचा उपाय होय. आह्मी पुराण संस्कृत सांगतों, तरीं प्राकृत अर्थ सांगावा लागतोच; असें बोलून परस्पर आलिंगन देऊन संतोष पावले. मग रुक्मिणीपतीस मंगलारती ओंवाळिली व खिरापती वांटल्या. शेवटीं यजमान मध्वनाथास वस्त्रालंकार व बहुत द्रव्य देऊं लागला; परंतु नाथांनीं घेतलें नाहीं. पंडित हरिदास ह्यांचा गौरव करा, त्या योगानेंच मी संतुष्ट आहें ह्मणून त्यानें सांगितलें, नंतर ते औरंगाबादेस गेले.

औरंगाबादेंतील लक्ष्मणपंत हा मध्वनाथाचा शिष्य होता. त्यास चावडीवर रोजगार होता. तो दिवसास प्रपंचधंदा करून रात्रीं गुरूचें दर्शन घेऊन कीर्त्तनामध्यें त्याच्या मागें उभा राहून तालसूर देत असे; तेणेंकरून कीर्त्तनास अद्भुत रंग येत असे. त्याच्यावांचून नाथ कधींही कीर्त्तन करीत नसत व तोही सहस्र कामें टाकून हटकून वेळेवर येत असे. एकदां मध्वनाथाच्या घरीं महा उत्सव होता; सर्व साहित्याची तयारीही झाली; ह्याच वेळीं लक्ष्मणपंताचा यजमान विसाजीपंत याणें हिशोबामध्यें सोळाशें रुपयांची चूक काढिली. तो ऐवज न पटविल्यामुळें त्यास यजमानानें हाजी महंमदखान कोतवालाकडून कैदेंत ठेवविलें. अशी दशा झाल्यानें गुरूच्या घरीं होत असलेल्या उत्सवास अंतरलों ह्मणून लक्ष्मणपंत खिन्न झाला. मग आपली सुटका व्हावी ह्मणून त्याणें पंढरिनाथाची विनवणी केली.

लक्ष्मणपंत तुरुंगांत पडल्याची बातमी दुसऱ्या शिष्यांनीं मध्वनाथास सांगितली. ती ऐकतांच तो विसाजीपंताच्या घरीं गेला; पण तो कचेरींत बसला होता, ह्मणून नाथानें तिकडे जाऊन त्याच्या समोर उभें राहून विनंती केली कीं, लक्ष्मणपंतास चार दिवस माझ्या स्वाधीन करा; उत्सव संपल्यावर मी त्यास आणून तुमच्या हवालीं करीन. परंतु तें ह्मणणें नाकबूल करून त्यावर सोळाशें रुपये निघतात ते देऊन घेऊन जा; असा विसाजीपंतानें जबाब दिला. तेव्हां ऐवज लौकरच देववीन असें नाथानें सांगितलें; परंतु अविश्वास वाटून त्याणें तें कबूल केलें नाहीं.

मध्वनाथाकडे उत्सवास प्रारंभ झाला; संतांची पूजा होऊन समाराधना झाली; वाद्यांचा गजर चालू झाला; व दुसऱ्या हरिदासांचें रात्रीस कीर्त्तन सुरू झालें. पुष्कळ लोक ऐकावयास आले होते. एक प्रहर कीर्त्तन झाल्यावर, थोडा वेळ तरी नाथांनीं कीर्त्तन करावें असा सर्वांचा अभिप्राय पडला; त्या वेळीं लक्ष्मणपंत नसल्यानें नाथाला फारच वाईट वाटलें. दुसरे लोकही खिन्न झाले. त्या वेळीं असा चमत्कार झाला कीं, मध्वनाथाचें ह्मणणें अमान्य केल्यामुळें विसाजीपंतास पांडुरंगानें फकिराच्या वेषानें चांगली शिक्षा केली. हाजी महंमद कोतवाल निजला होता त्यासही काजीच्या वेषानें त्याकडे जाऊन असा मार दिला कीं, अंगांतून रक्त वाहूं लागलें. मग त्यास सांगितलें कीं, लक्ष्मणपंतास मध्वनाथाकडे आतांच नेऊन पोंचीव; अनमान केलास तर आणखी जबरदस्त शिक्षा करीन.

मग हाजी महंमद कोतवाल लक्ष्मणपंतास घेऊन विसाजीपंताकडे गेला; त्या वेळेस मध्यरात्र झाली होती. तेथची सर्व मंडळी निजली होती; तरी त्यानें हांका मारून विसाजीपंतास उठविलें. नंतर बाहेर येतांच त्यास घडलेला प्रकार सांगितला व आतां आपली फकीर होण्याची इच्छाही कळविली; आणि वस्त्रेंभूषणें टाकून लगेच गळ्यांत कफणी घातली. हें पाहून विसाजीपंतानें त्यास फकीर न होण्याकरितां पुष्कळ सांगितलें; पण तें सर्व फुकट गेलें. मग लक्ष्मणपंतास घोड्यावर बसवून मध्वनाथाकडे पाठविलें.

मध्वनाथ कीर्त्तनास उभे राहिले. तेव्हां, लक्ष्मण दोन घटकांनीं

येईल असें सर्वांना सांगितलें होतें; परंतु तो तुरुंगांत असल्यामुळें ही गोष्ट कोणास खरी वाटली नव्हती. त्यानें मोकळा होऊन आल्यावर सद्गुरूच्या पायां पडून मुळापासून झालेला सर्व वृत्तांत निवेदन केला; तेव्हां सर्वांना आश्चर्य वाटलें. मग मध्वनाथानें उल्हासानें कीर्त्तन केल्यावर सर्वांना आनंद वाटला. हाजी महमंदखान फकीर होऊन सद्गुरूचें दर्शन घेऊन रोजांत जाऊन बसला; व उत्साह यथासांग संपूर्ण झाला.

पुढें एका सेंदुरवाडेकर गृहस्थानें आपल्या गांवीं येऊन राहण्यासाठीं नाथास विनंती केली; ती मान्य करून तो कुटुंबासह तेथें जाऊन राहिला. गांवाजवळ एके ओढ्यांत म्हसोबा म्हणून दैवत होतें; त्याचें नांव गणपति ठेवून मोठा उत्सव केला. नाथाची भक्ति पाहून तेथें भागीरथी आली; तिचें त्यानें तेथें कुंड बांधिलें. त्यांत सर्व स्नान करितात. नाथांच्या दर्शनाकरितां लोकांची नित्यशः अतिशय गर्दी होई. पुढें वृद्धावस्था झाल्या कारणानें शरीर कृश झालें. मग आतां माझ्यानें पंढरीस येववत नाहीं; एथेंच सगुण दर्शन देशील तर जिवास सुख होईल अशी विठोबाची प्रार्थना केली; तों दृष्टांत झाला कीं, उद्धवभट जोशाच्या आंगणांत मी आहें; तर तूं तेथें जाऊन दीड पुरुष जमीन खण. तुझी भक्ति पाहून मी एथें आलों आहें; असा दृष्टांत होतांच त्यास अत्यानंद झाला.

दुसरे दिवशीं मध्वनाथ त्या वाड्यांत गेले; व उद्धवभटास दृष्टांत झाल्याचा वृत्तांत सांगितला. मग कुदळी घेऊन मध्वनाथ खणूं लागले. त्यास पुष्कळ शिष्यांनीं मदत करून दीड पुरुष खाडा केला; तों रुक्मिणीसह पांडुरंगमूर्त्ति दृष्टीस पडली. तेव्हां विठ्ठलनामाचा गजर करून भक्तमंडळीनें आनंदानें टाळ्या वाजवून जयजयकार केला. मग तेथेंच देवालय बांधून सुमुहूर्त्तावर मूर्त्तीची यथाविधि स्थापना केली; तेव्हां मंगलवाद्यें वाजूं लागलीं; ब्राह्मणसंतर्पण झालें; रात्रीस कीर्त्तन होत होतें; व शेवटीं गोपाळकाला झाल्यावर ललीत झालें. मार्गशीर्ष महिन्यांत तेथें उत्सव होत असतो.

मध्वनाथाचे शिष्य लक्ष्मणपंत, त्याची हकिगत वर वर्णन केली आहे. दुसरा यादोपंत नगरकर; त्यालाही गुरुसेवा चांगली घडली. तो पंढरीस

राहिला; व त्याणें संन्यास घेऊन चंद्रभागेंत देह ठेविला. तिसरा शिष्य अमृतराय; तो तर जगप्रख्यात आहे. तो चांगली कविता करी. त्याणें तिच्याद्वारें भगवत्कीर्त्ति वर्णन केली आहे. अस्तु.

शेवटीं महीपति कवि ह्मणतात कीं, हृदयामध्यें रुक्मिणीकांत बसून मला क्षणक्षणां आठवण देई. त्याला भक्तकथा आवडतात ह्मणून त्याणेंच मजवर कृपा करून मजकडून हीं भक्तचरित्रें लिहविलीं. संतांचीं चरित्रें वाचिल्यानें चित्त शुद्ध होतें; मत्सर जातो, तेणेंकरून भवसमुद्र तरतो; आणखी हा ग्रंथ घरीं ठेविला असतां विघ्नें बाधत नाहींत; असा करुणाकरानें या ग्रंथास वर दिला आहे तो निरोप मी सांगतों.

आणखी कवि म्हणतात कीं, आतां देवाधिदेवा गरुडध्वजा, मला तुझी मुक्ति, धनदौलत कांहींएक नको; तुझ्या दासांची कीर्त्ति वर्णन करीव. ब्रम्हज्ञान, योगसाधन मला नको; तुझें सगुणरूप पहावें हीच माझी इच्छा. मोक्षाचा अधिकारी मी नाहीं. तुझी सत्कीर्त्ति मुखानें गावी आणि तुझें रूप माझ्या हृदयांत राहावें असें मनांत आहे; तो माझा हेतु पूर्ण कर.

हा ग्रंथ शके सोळाशें शाण्णव, जयनामसंवत्सर, फाल्गुन वद्य चतुर्थी रोजीं, प्रवरा नदीच्या दक्षिणेस पांच कोसांवर ताहराबाद ह्मणून गांव आहे तेथें समाप्त झाला.

आतां शेवटीं या 'मूरकर मंडळी'ची अशी प्रार्थना आहे कीं, देवाधिदेवा पंढरीनाथा, तूं कृपेचा केवळ सागर आहेस; तूंच भक्तांचें निर्मळ प्रेम पाहून व त्यांचे आळ पुरवून त्यांस आपल्या चरणीं ठाव दिलास; इतकेंच केवळ नव्हे, तर हजारों पापी जनांवरही कृपा केलीस; तर आतां हीन, दीन, कुमति अशा या आह्मां दासांवरही तुझी कृपादृष्टि असावी इतकेंच आम्हीं हात जोडून मागणें मागतों.

समाप्त

# पद.

( चाल–पहातांचि पहातां गुप्तचि झाला ठकडा गेला ठकवूनी ।
हरि कां ग येईना अजूनी ॥ )

सगुण चारित्रें परम पवित्रें सगुणरूप ध्यानां चित्तीं ।
तरले असंख्य जन तरती ॥ धृ० ॥

नास्तिक पथ सोडुनि द्या जन हो सत्पथगामी राजनिती ।
आचरा करितों ही विनती ॥
भावबळें आकळे परमेश्वर दावि सांवळें रूप प्रिती ।
अनुभव ये करितां भक्ती ॥
सगुणभक्तिनें दामाजीचा म्हार होऊनि रमापती ।
बेदरीं भरलें द्रव्य अती ॥
रूप पहातां राज्य सोडुनी होय बावरा म्लेंच्छपती ।
दिधली देवें त्या मुक्ती ॥ सगुण चरि० ॥ १ ॥

नक्रें धरितां गजेंद्र चरणीं आठवी ईशा सत्वमती ।
सोडवि श्रीहरि त्वरित गती ॥
प्रल्हादास्तव स्तंभीं प्रगटुनी दैत्य मर्दिला पापमती ।
दिधली मुक्ती त्या अंतीं ॥
वस्त्राहरणीं द्रुपदनंदिनी धांवें बोले रमापती ।
येई कृष्णा रक्षीं सती ॥
सत्वर येउनी पुरवी वसनें अनंत ब्रह्मांडाधिपती ।
लाजविले नास्तिक कुमती ॥ सगुण चरि० ॥२॥

पार्थसारथी झाला भावें देखुनियां हो दृढभक्ती।
ऐसा श्रीवर भक्तपती ॥
मिराबाइचें गरळ प्राशुनी दावी नृपतें चमत्कृती।
संतत संतपदा नमिती ॥
नाथाचें घरीं उदक वाहिलें श्रीखंड्या द्विज राजमती।
धुणीं धुई जनिचीं किती ॥
चोख्यामेळ्याघरीं जेविला गुरें ओढिलीं सहजगती
तरले साधू नच गणती ॥ सगुण चरि० ॥३॥

ज्ञानोबाची भिंत ओढिली अगाध लीला जगत्पती।
रक्षिसी भक्तां धन्य कृती ॥
सगुणोपासक निर्गुण झाले नाहिं आले कीं या जगतीं।
योगी निजरूपीं रमती ॥
श्रवण मनन निजध्यासन करितां साक्षात्कारें ये प्रचिती।
नातर व्यर्थचि बा फजिती ॥
म्हणे मूरकर मंडळी भावें सगुणिं धरावी सतत रती।
निगमागम संमत असती ॥ सगुण चरि० ॥४॥

# हिंदुलोकांचें मूर्त्तिपूजन.

इंग्लिश लोकांचें राज्य या देशांत होण्यापूर्वीं व विशेषेंकरून ख्रिस्तीधर्मोपदेशक लोकांचा आह्मांस विटाळ होण्यापूर्वीं, आमचे लोक आपलीं वेदशास्त्रें, पुराणें इत्यादि परमपूज्य मानून व नीतीनें आचरण करून अगदीं धर्मनिष्ठ असत; आणि त्यांच्या मनांत आपल्या कोणत्याही देवधर्म, आचारविचार, शास्त्रें पुराणें इत्यादिकांविषयीं संशय येत नसे. परंतु जेव्हांपासून ख्रिस्ती लोकांनीं आपला स्वधर्म वाढविण्याच्या हेतूनें आमच्या देवधर्मांची, वेदशास्त्रांची पुराणपोथ्यांची कुत्सित निंदा चालू केली, तेव्हांपासून आमच्यांतील कांहीं अर्ध्या हळकुंडानें सगळें जग पिंवळें करूं पहाणाऱ्या अर्धवट सुधारकांच्या डोक्यांत अनेक शंका घुसल्या; व तेणेंकरून ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज इत्यादि पंथ उत्पन्न झाले. आह्मीं पाषाणाची, लांकडाची, धातूची किंवा मातीची मूर्त्ति करून, तिला देव मानून तिची भक्ति करतों ह्मणून आह्मीं मोठे वेडगळ व अज्ञानी ! आह्मांसारखे धर्मभोळे व पापी सगळ्या जगांत सांपडणार नाहींत; अशी त्यांची समजूत झाली आहे ! व ह्या राम, गणपति, मारुती इत्यादि देवांच्या मूर्त्ति फेंकून दिल्यावांचून आह्मां हिंदुलोकांची अक्कल फैलावणार नाहीं अशी त्यांची ओरडही नेहमीं ऐकूं येते !! आतां हा अशा प्रकारचा गैरसमज होण्याचें कारण वास्तविक पहातां, केवळ त्यांचें हिंदुधर्माविषयीं अज्ञान होय असें दिसतें. उघडच आहे, ज्ञान कोठून होईल? कारण, त्यांनीं आमच्या धर्मग्रंथांचें अथपासून इतिपर्यंत नुसतें मननरूप* वाचन तरी केलें असेल काय? किंवा त्यांनीं कोणा जाणत्या अध्यापकाकडून ते ग्रंथ चांगले श्रवण तरी केले

* एके ठिकाणीं जें सांगितलें आहे, त्याचा दुसरे ठिकाणीं सांगितलेल्याशीं विरोध प्रतीत होतो ; त्याची पुढें एकवाक्यता कशी केली आहे हें पहाणें याचें नांव मननरूप वाचन.

असतील काय? असें जर नाहीं, तर मग यांना अशा अफाट हिंदुधर्माचें ज्ञान केव्हां व कसें झालें असेल तें असो! आह्मीं तर असें समजतों कीं, एवढे थोरले ग्रंथ नुसते पहाण्याला सुद्धां त्यांना वेळ मिळाला नसेल. कारण, बाल्यदशेमध्यें कोठें मराठीचा थोडासा अभ्यास होतो न होतो, तों इंग्रजी शिकण्याचा त्यांच्या पाठीमागें आईबापांचा धोशा! पुढें कांहीं वर्षे अभ्यास करून ते बी० ए०, एम्० ए०, इनजिनिअर, वकील, ब्यारिस्टर किंवा निदान कारकून होऊन पोटाचा कोणता तरी एखादा धंदा चालू करतात. अशा या गर्दीमध्यें वर सांगितलेल्या ग्रंथांचें वाचन, मनन तसेंच साधकत्व बाधकत्व कोणत्या स्थळीं आहे व त्याचें निराकरण कसें व कोठें केलें आहे, हें त्यांना कसें कळावें हें आह्मांस समजत नाहीं. आह्मांस तर असें वाटतें कीं, मिशनरी लोकांच्या अति सहवासाचा हा परिणाम असावा. मुलगा ख्रिस्ती शाळेंत गेला, कीं त्याच्या हातीं ख्रिस्ती पहिलें पुस्तक आलेंच! त्यांत त्यांच्या धर्माची स्तुति असते एवढेंच नव्हें, तर हिंदुधर्माची निंदाही असावयाचीच!! कारण, त्यांची समजूत अशी आहे कीं, अन्य धर्माची कुचेष्टा केल्याशिवाय आपल्या धर्माची प्रतिष्ठा होणार नाहीं!!! 'तुमचा देव दगडाचा, लांकडाचा, चिखलाचा, धातूचा; त्याला तोंड असून तो खात नाहीं व बोलत नाहीं; कान असून ऐकत नाहीं; पाय असून चालत नाहीं; व ज्याला आपलें स्वताचें रक्षण करतां येत नाहीं, तो दुसऱ्याचें काय करील?' अशी त्या पुस्तकांतील वाक्यें विद्यार्थ्यांच्या नेहमी कानीं पडावयाचीं. यावरून त्या विद्यार्थ्यांची अशी समजूत होते कीं, खरोखरच आमच्या या देवांत कांहीं सामर्थ्य नाहीं व त्यांना देव ह्मणणें हेंच अगदीं अयोग्य होय! अशा प्रकारें कां एकदां त्यांच्या मनांत प्रेरणा झाली, म्हणजे आमचे हिंदु वाडवडील केवळ मूर्ख होते असें ह्मणण्याविषयीं त्यांचा सहजच कल होतो. असा समज होणारे बहुतकरून ख्रिस्ती विद्यालयांत शिकलेले असतात, व त्यांनीं ख्रिस्ती व्याख्यानें ऐकलेलीं असतात; किंवा निदान या ख्रिस्ती लोकांनीं निंदक बुद्धीनें आमच्या धर्मावर

केलेले टीकाग्रंथ त्यांनीं वाचलेले असतात. काय जें त्यांना हिंदु-धर्माविषयीं ज्ञान झालेलें असतें, तें वर सांगितलेल्या साधनांवरून! मग किती यथार्थ ज्ञान झालें असेल याचा वाचकांनींच विचार करावा.

आमचें असें ह्मणणें आहे कीं, त्यांनीं केवळ मूर्त्तिपुजेवरून मूर्त्तिपुजकांचीं धर्ममतें व ईश्वरसंबंधीं ज्ञान यांचें अनुमान न करतां, त्यांच्या धर्मग्रंथांत ईश्वर ह्मणजे काय याचा जो उत्तम खुलासा केला आहे इकडे लक्ष दिलें पाहिजे; ह्मणजे त्यांची चूक त्यांसच सहज कळणार आहे. मूर्त्तिपुजकास ईश्वराविषयीं ज्ञान नसतें असें ह्मणणें ही मोठी चूक आहे. उदाहरणार्थ, गणपतीच्या मूर्त्तीच्या संबंधानें त्याच्या पुजकाच्या मनांत कशी भावना असते, व त्या मूर्त्तीतील ईश्वरत्वाविषयीं त्याला कितपत ज्ञान असतें, हें खालीं दाखल केलेल्या 'गणपति अथर्वशीर्षांतील' उताऱ्यावरून चांगलें ध्यानांत येईल. "त्वमेव ज्ञानमयो विज्ञानमयोसि सर्वं जगदिदं त्वत्तो जायते."(ज्ञानमय, विज्ञानमय तूंच असून हें सर्व जगत् तुझ्यापासून झालें आहे.) "सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति." (हें सर्व जगत् तुझ्या सत्तेनें राहतें)"सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति"(हें सर्व जगत् तुझ्या ठिकाणीं लीन होणार—मिळून जाणार.) "त्वमेव साक्षदात्मासि नित्यं" (तूंच साक्षात् नित्य आत्मा आहेस) "त्वमेव वाङ्मयस्त्वं चिन्मयः त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः" (तूंच वाङ्मय, तूंच चिन्मय, तूंच आनंदमय व तूंच ब्रह्ममय आहेस.)

एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "भू जल तेज समीर ख रवि शशि काष्टादिकीं असे भरला। स्थिरचर व्यापुनि अवघा जगदात्मा तो दशांगुळें उरला ॥" यावरून ईश्वररूप जी ही सृष्टि तिच्याच द्वारानें आपण ईश्वरास ओळखला पाहिजे; कारण, ही सृष्टि ईश्वरापासूनच उत्पन्न झाली आहे. वास्तविक पहातां, जगनियंत्या परमेश्वराचें रूप गुण कसे आहेत, एतद्विषयीं परिस्फुटता आजपर्यंत कोणीही करूं शकला नाहीं व पुढेंही करूं शकणार नाहीं; असें सर्व धर्मांचें व महान् ऋषिमुनींचें मत आहे. तुकारामबुवा अभंगांत एके ठिकाणीं ह्मणतात कीं,

तूज घालुनीयां पूजीतों संपुष्टीं । परी तुझ्या पोटीं चवदा भुवन ॥
तूजलागीं आह्मीं घालितसों माळ । परी तूं वेगळा सर्वांहूनी ॥
तूजलागीं आह्मीं गात असों गीत । परी तूं *अतीत सर्वांहूनी ॥

केव्हां केव्हां सुधारक लोक आह्मांस असें ह्मणतात कीं, आह्मीं हिंदुलोक 'ईश्वराच्या मूर्तीचें' पूजन करतों. आतां पहा कीं, निर्गुण, निराकार, अखंड जो ईश्वर त्याची मूर्त्ति कशी बनवितां येईल ? आणि जर त्याची मूर्त्ति करतां येत नाहीं, तर मग पूजा तरी कशी करावयाची? आह्मीं मूर्त्तिपूजक लोक जी मूर्त्तींची पूजा करतों ती त्या निर्गुण, निराकार, अखंड अशा ईश्वराची नसून त्याच्या सगुणरूपाची ह्मणजे सृष्टींतील अवतारी व सत्पुरुषांच्या मूर्त्तींची; आणि अशा परमपूज्य पुरुषांच्या प्रतिमेची पूजा करणें ह्मणजे त्यांचें उत्तम स्मारक करण्यासारखें होय. भक्तिभावानें ईश्वराची पूजा मूर्त्तीच्या द्वारानें केली असतां त्यास पोंचते, याजविषयीं तुकाराम महाराज एके ठिकाणीं असें ह्मणतात कीं,

केला मातीचा पशुपति । परी मातीसि काय ह्मणती ।
शिवपूजा शिवासि पावे । माती मातीमाजी सामावे ॥ १ ॥
केला पाषाणाचा विष्णू । परी पाषाण नव्हे विष्णू ।
विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥ २ ॥
केली कांशाची जगदंबा । परी कांसें नव्हे अंबा ।
पूजा अंबेची अंबेला बेणें । कांसें राहे कांसेंपणें ॥ ३ ॥

आह्मीं हिंदुलोक राम, शंकर, दत्तात्रेय इत्यादि सत्पुरुषांच्या मूर्त्तींस पूज्य मानून त्यांचें फुलें, गंध, अक्षता आदिकरून संस्कारानें पूजन करून गौरव करतों ह्मणून निराकार भक्त आह्मांस हंसतात; परंतु मुसलमान लोक महंमदाला धर्मसंस्थापक व ईश्वराचा अवतार समजून त्याचा सत्कार करतात हें मूर्त्तिपूजन नव्हें काय ? महंमदाला आकार नव्हता ? तसेंच विद्वान् ह्मणविणारे ख्रिस्ती लोक येशूला परमे-

* मन, वाणी इत्यादिकांना अगोचर.

श्वराचा पुत्र मानून त्याची भक्ति करतात हें काय? येशू मूर्त्ति नव्हता काय? आणि जर तो मूर्त्ति होता, तर त्याची उपासना करणें हें मूर्त्तिपूजन नव्हे काय? आमच्या मुंबईमध्यें कोटांत व्हिक्टोरिया महाराणीचा दगडाचा पुतळा आहे हें सर्वांस ठाऊक आहे. तो ज्या वेळेस येथें स्थापन केला, त्या वेळेस तेथें जमलेल्या साहेब मंडळीनें आपापल्या टोप्या हातांत घेऊन त्या पुतळ्यास मान दिला; हा येथील सन्मान विलायतेंत असणाऱ्या खुद्द राणीसरकार साहेबांस पोंचला! हा मूर्त्तिपुजनाचाच एक प्रकार नव्हे काय? शिवाय आमचे निराकारी व एकेश्वरी भक्तमंडळींतील लोक परमेश्वरास निर्गुण, निराकार समजून जरी त्याची प्रार्थना करतात, तरी तेही आमच्याप्रमाणें मूर्त्तिपूजक ठरतात. कारण, ते अशी प्रार्थना करतात कीं, 'प्रभू, तूं आमच्याकडे कृपादृष्टीनें पहा व आमचे सर्व अपराध पोटांत घाल.' देव जर निराकार आहे असा त्यांचा समज आहे, तर कृपादृष्टीनें पहाण्यास त्याला डोळे कोठले व अन्याय पोटांत घालण्यास त्याला पोट कोठून आलें? असो. तात्पर्य काय कीं, तेही आमच्याप्रमाणें सगुणभक्ति ह्मणजे मूर्त्तिपूजन करतात असें ठरतें.

हल्लीं मुंबई, कलकत्ता, पुणें, इंदूर, अमदाबाद इत्यादि ठिकाणीं आमच्या सुधारक ह्मणविणारांनीं परमेश्वराची प्रार्थना करण्याकरितां मंदिरें स्थापन केलीं आहेत. ह्या ठिकाणीं सभासद नियमित दिवशीं नियमित वेळीं जमून ईश्वराची प्रार्थना करतात. हा प्रकार केवळ गैर आहे असें जरी नाहीं, तरी ईश्वरप्रार्थनेची पूर्वींची जी आमची रीत आहे ती ह्यांना कोणत्या रीतीनें गैरवाजवी वाटली ह्मणून ही यांनीं नवीन युक्ति शोधून काढली? आपापले घरीं नियमित वेळीं स्वच्छ स्नान करून देवाच्या खोलींत एकांतांत ईश्वराच्या कल्पित मूर्त्तीचें स्वस्थपणें पुष्प, चंदनादि करून भक्तिपुरःसर ईश्वरपूजन व भजन करण्याचे जे आमचे पूर्वींचे उत्तम मार्ग, ते नापसंत होऊन एखाद्या जागेंत बूटस्टॉकिंगासह ईश्वरप्रार्थनेचीं पुस्तकें वाचणें हें आवडूं लागलें आहे! स्नानविधि आटोपल्यावर भोजनापूर्वीं पुष्पादिकांचा सुगंध ग्रहण करणें हा प्रकार शरिराला

किती हितकारक आहे हें वैद्यशास्त्राचे आधारानें विद्वान् लोकांस अ-लीकडे बरेंच कळूं लागलें आहे. बरें, जे सुधारक लोक मूर्त्तिपूजा वाईट ह्मणून समाजांत म्हणत असतात, ह्यांनीं तरी सर्वांनीं ती खरो-खर सोडली आहे काय? तर नाहीं. कित्येक सुधारकांच्या घरांत मूर्त्ति आहेत; कित्येकांच्या घरांत जरी उघडपणें मूर्त्तिपूजन करीत नाहींत, तरी त्यांच्या घरीं लग्न, मुंज वगैरे कार्यें आलीं म्हणजे ते खुशाल मूर्त्तींचें यथाविधि पूजन करतात; व कित्येक अशा प्रसंगीं आपलें रहातें शहर सोडून एखाद्या खेड्यापाड्यांत जाऊन लपून चोरून मूर्त्तिपूजन करून तें कार्य उरकतात हें सर्वांस ठाऊक आहे. तर अशा लोकांच्या, पुढें तिखट व मागें पोंचट अशा वर्त्तनानें काय होणार आहे? असो.

बहुतेक निःपक्षपाती विद्वान् लोकांचें असें म्हणणें आहे कीं, पृथ्वीवरील सर्व भाषांमध्यें संस्कृत भाषा ही फार जुनी आहे. ग्रीक, ल्याटीन, हिब्रू, आरबी इत्यादि भाषा जरी फार जुन्या आहेत, तरी संस्कृत ही भाषा त्यांच्याही पेक्षां फार पुरातन आहे. कारण, या सर्व भाषांमध्यें संस्कृत शब्दांची फार मिसळ असून संस्कृत धातूं-पासून त्या भाषेंतील अनेक शब्दांची उत्पत्ति झालेली आहे असें आढळतें. आणि यावरून ते असें अनुमान काढतात कीं, सर्व भाषांची ही भाषा जननी आहे. हिंदुलोकांचा परम पूज्य जो वेदधर्म तो या संस्कृत भाषेमध्यें लिहिलेला आहे. यावरून ही भाषा हिंदुलोकांची आहे असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. आणि हिंदुलोकांचा वेदधर्म आणि मूर्त्तिपूजन फार प्राचीनकाळीं सर्व प्रदेशांत चालूं होतें असें इतिहासावरून कळतें.

रशियाच्या सरहद्दीवर गणपतीचें एक देऊळ आहे. आरबस्थानांत महादेवाचें देऊळ आहे. आपण केव्हां केव्हां वर्त्तमानपत्रांत वाच-तो कीं, पृथ्वीच्या गर्भांत ( खाणींत ) दगडाच्या किंवा धातूंच्या हिंदूच्या देवांच्या मूर्त्ति सांपडतात. आमच्या वाचकांस वर्त्तमान-पत्रांत वाचलेलें स्मरत असेलच कीं, सन १८८२ त वसईजवळ सोपारा ह्मणून एक खेडें आहे, तेथें ठाण्याचे कलेक्टर मि० भूल्क

साहेब यांस सुमारें सातशें वर्षांपूर्वींचा बुद्धाच्या वेळचा एक सात मण वजनाचा दगडी करंडा सांपडला होता. तो उघडून पहातां त्यांत एक तांब्याचा करंडा असून त्यांत तांब्याच्या आठ मूर्त्ति दिसून आल्या. ख्रिस्तीधर्माच्या आरंभीं मोशानें ईश्वराच्या दहा आज्ञा म्हणून लिहिल्या आहेत; त्यांत एक अशी आहे कीं, 'तूं मूर्त्तींची पूजा करूं नको;' यावरून असें सिद्ध होतें कीं, त्या वेळेस मूर्त्तिपूजा त्यांच्यांत चालू होती. या वरील सर्व गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, मूर्त्तिपूजन सर्व पृथ्वीभर अनादिकालापासून चालू आहे. सामवेदांत षड्विंशब्राह्मणांत उत्पातशांति प्रकरणामध्यें 'प्रतिमा हसति रोदिति स्फुटति'; अथर्वण वेदांत गणपत्यथर्वशीर्षफलश्रुतिप्रकरणामध्यें 'अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति. सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति' असा मूर्त्तिपुजनाविषयीं आधार सांपडतो.

याप्रमाणें वेद मूर्त्तिपूजा कबूल करीत असतां, आणि एका ऋचेचाही खरा अर्थ समजण्याची अंगीं शक्ति नसतां इतकेंच नव्हें, तर त्या अनादि वेदब्रह्माच्या साऱ्या पुस्तकांवर एक वेळ दृष्टीही न पाडतां, ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या नादीं लागून आमचे अलिकडील हिंदुसुधारक लोक मूर्त्तिपूजा वेदांत* नाहीं अशी पोपटपंची नेहमी करितात. हं! वेदांत काय आहे? हिंदुधर्म सगळा बाष्कळ! प्रेत जळून गेल्यावर शिजलेल्या भाताच्या गोळ्यांचा (पिंडांचा) मेलेल्या मनुष्याशीं काय संबंध व प्रेतक्रिया हवी तरी कशा करितां? मुलगामुलगीचें मन मिळालें ह्मणजे आईबापांचें त्यांच्या लग्नांत रुकार नाकार कशास पाहिजेत? असें पांडित्य ते नेहमी करितात, याला काय ह्मणावें?

आमच्या वेदधर्मांत कर्म, उपासना व ज्ञान असे मोक्षाचे तीन

---

*आमच्या अनादि वेदग्रंथांत मूर्त्तिपुजनास आधार नाहीं, असें जें सुधारकांचें म्हणणें आहे, त्याचा सुमारें तेरा चौदा वर्षांपूर्वी दयानंदसरस्वतीस्वामीबरोबर पुण्यांत खासगीवाल्यांच्या व माणकेश्वराच्या दिवाणखान्यांत जे वादविवाद झाले त्यांजवरून निर्णय ठरलेलाच आहे.

उपाय सांगितले आहेत. कर्म व उपासना हीं दोन ज्ञानाचीं साधनें आहेत. आणि ज्ञानच कायतें मोक्षाचें साधन आहे. ज्याप्रमाणें फलोत्पत्तीला कारण फूल असून फल आल्यावर फुलांचा नाश होतो, त्याप्रमाणें ज्ञानास कारण कर्में ( मूर्त्तिपुजनादि प्रकार ) असून त्या कर्माचरणानें एकदां ज्ञानाची प्राप्ति झाली ह्मणजे कर्में साहाजिक सुटतात. बहुतेक लोक मोक्ष ह्मणजे स्वर्गच समजतात, आणि त्यांत सुखाचे भोग फार आहेत अशी त्यांची समजूत असते. पुण्यकर्मेंकरून स्वर्ग प्राप्त होतो; परंतु स्वर्ग हा मोक्ष नव्हे. वेदांत मोक्षाची निराळी व्याख्या केली आहे. मोक्ष ह्मणजे मुक्त. बंधनापासून सुटणें याला मोक्ष म्हणतात. आतां बंधन तें काय व त्यापासून सुटणें तें कसें याजविषयीं दोन शब्द लिहूं.

सत्‌रूप, चिद्रूप आणि आनंदरूप असें एकच ब्रह्म आहे. त्याचा देशानें किंवा काळानें अंत होत नाहीं; म्हणून त्याला अनंत अपार असें म्हणतात. त्याच्या ठिकाणीं दुसरें कांहींही जाहलें नाहीं व व्हावयाचें नाहीं. तें जसें होतें व सध्यां आहे तसेंच तें सदां सर्वकाळ रहाणार. ही एवढी अवाढव्य सृष्टिरचना झाली, तरीही त्या ब्रह्माचे ठायीं कांहीं विकार जहाला नाहीं; हें मोठें आश्चर्य वाटण्याजोगें आहे. इतकेंच नाहीं, परंतु समजण्यासही फार कठीण आहे. अनंत, अपार, एकसंध जें ब्रह्म तें एवढी सृष्टिरचना व तिचे असंख्य फेरफार झाले व होत असतांही तें ब्रह्म आहे तसेंच आहे; त्यांत कांहीं बिघाड होत नाहीं म्हणजे त्याच्या ठिकाणीं हें सर्व कांहींच नाहीं हें कसें? तें एकटेंच सघन आहे; त्यांत दुसऱ्या एकाही पदार्थाचा प्रवेश झाला नाहीं व व्हावयाचा नाहीं हें कसें? याचें उत्तर असें आहे कीं, सृष्टि ही खरी ह्मणजे सत् पदार्थ नाहीं; ती केवळ भासमान आहे. जसें शुक्तिरजत किंवा रज्जुसर्प किंवा स्वप्नपदार्थ हे उत्पन्न झाले नसून भासमान मात्र आहेत व भासकाळीं मात्र ते खरेसे वाटतात. स्वप्नपदार्थ जागृतावस्थेंत खोटे असे अनुभवास येतात, तद्वतच शुक्तिरजत व रज्जुसर्प उत्पन्न न होऊन भासतात. ते शुक्ति व रज्जु ज्ञानकालीं ना-

हींसे होतात; यावरून ते सत् पदार्थ नाहींत. शुक्तिकेवर रजत व दोरीवर साप असा भास होतो, त्या वेळींच ते असतात. त्या ज्ञानाच्या पूर्व व उत्तर कालीं नसतात. तर पूर्व व उत्तर कालीं शुक्ति व दोरच असतात. रजत व सर्प हीं भ्रमकालींच असतात. तसेंच जगत् किंवा संसारज्ञान हें भ्रमज्ञान आहे. रजत व सर्प अल्पकालिक भ्रम आहे, व जगत् किंवा संसार दीर्घकालिक भ्रम आहे. सर्व भ्रमपदार्थ आपापल्या अधिष्ठानज्ञानानें नाहींसे होतात. ह्मणजे शुक्तिकेच्या ज्ञानानें रजत नाहींसें होतें व दोरीच्या ज्ञानानें सर्प नाहींसा होतो. तद्वत् आपणासकट म्हणजे मी म्हणणारें जें ज्ञान त्यासकट सर्व प्रपंच 'भ्रम आहे.' या भ्रमपदार्थाचें अधिष्ठान ब्रह्मस्वरूप आहे. त्या ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें असतां मी व सर्व जगत् ( जगत्, प्रपंच, संसार हे तिन्ही शब्द एकाच पदार्थाचे वाचक आहेत ) नाहींसे होतात. मी म्हणणारें ज्ञानासकट सर्व जगत् नाहींसें होणें याला मोक्ष म्हणतात. हाच काय तो खरा मोक्ष. इतर मोक्ष जे सांगितले आहेत ते खरे मोक्ष नाहींत. ते मोक्ष म्हणजे दुःखराशींतून थोडी सुटका. जसा कोणी भारवाही पुरुष आपलें ओझें खालीं उतरून आपण कांहीं वेळपर्यंत थोडा विसांवा घेतो, तसे हे इतर ठिकाणीं सांगितलेले मोक्ष आहेत. यज्ञ, दान, तप, व्रतें, उपोषणें करणें; धर्मार्थ दवाखाना घालणें; धर्मार्थ विद्याशाळा घालणें; वाटेवर तळीं, विहिरी, धर्मशाळा बांधणें; यांपासून जो मोक्ष होतो तो या प्रतीचा असतो. ज्ञानेंकरून जो मोक्ष होतो तो असा नव्हे. मी म्हणणारें ज्ञान व जगत् यांचें अधिष्ठान जें "ब्रह्मचैतन्य" त्या अधिष्ठानाचें ज्ञान झालें असतां मी व सर्व जगत् यांचा बाध ह्मणजे हीं नाहींशीं होतात. असें झालें ह्मणजे मग सुख व दुःख कोठेंच राहिलें नाहीं. केवळ सुखमय होऊन असणें आहे. मी ह्मणणारें जें ज्ञान तें त्या अधिष्ठानचैतन्याशीं ऐक्य पावतें; ह्मणूनच सर्व सुखमय, अनंत, अपार होऊन असणें जें त्याचें नांव मोक्ष. म्हणजे बंधनापासून सुटका किंवा पुनरावृत्ति नाहीं म्हणजे जन्म आणि मृत्यु हीं नाहींत.

येणें जाणें, पुनरावृत्ति, किंवा बंधन तें काय व त्यापासून सुटका ती कशी हें आतां सांगावयाचें आहे. सत्, चिद् , आनंद, अपार व अफाट रूप जें ब्रह्म त्याच्या ठिकाणीं 'मी' अशी वृत्ति ( ज्ञान ) उत्पन्न होते. तें ज्ञान आपल्याला ब्रह्माहून वेगळें पहातें. त्या ज्ञानाला त्याच वेळीं त्या ब्रह्माच्या ठायीं जगत् दिसतें. हें आपल्याला ब्रह्माहून वेगळें पहाणें व त्यालाच जगत् दिसणें याचें नांव अज्ञान. यालाच बंधन म्हणतात. मी ब्रम्हाहून वेगळा नाहीं; मीच नाहीं; माझें अधिष्ठान जें ब्रह्म तेंच मी आहें; असें समजणें म्हणजे 'मी' ब्रह्माचे ठिकाणीं अगदीं नाहींसें होणें; म्हणजे अज्ञान नाहींसें होणें, तेंच ब्रह्मस्वरूप होणें ( पूर्वींचेंच आहे; मध्यें भ्रमानें वेगळें वाटलें होतें तें जाणें ) याचें नांव अज्ञाननाश. यालाच मोक्ष म्हणतात. 'मी म्हणणारें ज्ञान' कायम राहून हा वर सांगितलेला मोक्ष कधींही व्हावयाचा नाहीं. इतर धर्मांत सांगितलेले मोक्ष व आमच्या हिंदुधर्मांत स्वर्गादि मोक्ष हे मी म्हणणारें ज्ञान कायम असून या स्वर्गांचें ( मोक्षांचें ) सुख घेतें. आतां हे मोक्ष असे आहेत कीं, मनुष्य आपल्या गुणानें आपली योग्यता वाढवितो; व त्या त्या योग्यतेनुसार तो आपणास लहान मोठीं भाड्याचीं घरें घेतो; इतकेंच नाहीं, त्यापेक्षां मोठे महाल, मंदिरें आपल्या ह्या पैशानें विकत घेतो किंवा नवीन बांधितो; परंतु हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, त्या पुरुषाजवळ पैसा आहे तोंपर्यंतच त्याला तीं सुखाचीं स्थानें असावयाचीं. तो जवळचा पैसा सरला व आणखी पैशाची गरज लागली म्हणजे तीं सुखाचीं स्थानें नाहींशीं होतील, त्याचें नांव स्थित्यंतर. तसेंच येथें देहांतर किंवा जन्मांतर आहे. तें जन्मांतर एक आत्मज्ञानानेंच बंद होणारें आहे. इतर साधनांनीं बंद होणारें नाहीं. आतां कर्म व उपासना हीं दोन्हीं ज्ञानाचीं साधनें आहेत; परंतु त्यांना मोक्षसाधनें असेंही ह्मटलें आहे. तीं साक्षात् मोक्षास कारण नांहींत; परंतु परंपरेनें मोक्षास कारण होतात.

कर्म, उपासना व ज्ञान हे ईश्वरप्राप्तीचे तीन मार्ग आहेत. कर्में-करून इंद्रियें निश्चल होतात व उपासनेनें मन निश्चल होतें. मन

हें अन्य उपायेंकरून स्थिर व्हावयाचें नाहीं. तें फार चंचल आहे. तें एका क्षणांत अनेक पदार्थ धारण करतें. एक पदार्थ सोडून दुसरा पदार्थ धरणें हा त्या मनाचा स्वभावच आहे. तें स्थिर करण्याला मन स्थिर करण्याचाच अभ्यास केला पाहिजे. प्राण-निरोधन ह्मणजे प्राणायाम करून प्राण अगदीं स्तब्ध करणें किंवा साकारमूर्त्तीचें ध्यान करणें हाच त्याला स्थिर करण्याचा उपाय आहे. कर्मानुष्ठानानें इंद्रियांना स्थिरता आली ह्मणजे उपासनेला फार मदत होते; सगुणउपासनेशिवाय निर्गुणउपासनेला जोर येत नाहीं; आणि निर्गुणउपासनेशिवाय ज्ञानाला साह्य मिळणार नाहीं. अशा या क्रमवार पायऱ्या आहेत. त्या क्रमवारच उल्लंघन केल्या पाहिजेत. कोणी ह्मणेल कीं, मी प्रथमच्या दोन पायऱ्या न पहातां शेवटली ह्मणजे ज्ञानच प्राप्त करून घेईन, तें त्याला चांगलें साध्य होणार नाहीं. परंतु वर सांगितलेल्या क्रमानें आल्यास तें सुसाध्य आहे. जी वस्तु आपण एक वेळही पाहिलेली नाहीं, ती कधींच आपल्या ध्यानांत येत नाहीं. या न्यायानें ज्या परमेश्वराच्या आकाराचा आह्मांला स्वप्नांतसुद्धां तर्क नाहीं, त्याची आह्मीं कशी प्रार्थना करावी ? म्हणून आम्हांसारख्या अज्ञान्याला मन स्थिर करण्यास व ईश्वरभक्ति करण्यास मूर्त्तिपूजनच प्रबळ साधन आहे. आतां, जे कोणी आपणास पूर्ण ब्रह्मज्ञानी समजत असतील, त्यांनीं पाहिजे तर सगुण उपासना न करावी !

या ग्रंथांत सांगितलेले जे तुकाराम, ज्ञानदेव, चांगदेव, एकनाथ, रोहिदास वगैरे भगवद्भक्त होऊन गेले, त्यांना आसनीं, भोजनीं, शयनीं एका देवावांचून दुसरें कांहीं दिसत नसे. "मन रामीं रंगलें, अवघें मनच राम झालें। सबाह्य अभ्यंतरीं, रामरूप कोंदलें ॥" याप्रमाणें त्यांच्या मनाची स्थीरता झाली होती. ईश्वराचें ध्यान करतेवेळेस किंचित् डोळे झांकले (तितक्यांतच डोळे थोडेसे उघडून दुसऱ्यानेंही उघडले आहेत कीं काय हें पहाणें) यांत ध्यान तें कसलें ? आणि मन स्थिर तें कसें व्हावें ? मन स्थिर होण्यास साकार मूर्त्तीचेंच ध्यान केलें पाहिजे. आतां कदाचित् सुधारक लोक म्ह-

णतील कीं, ईश्वराचे गुणानुवाद गाणें किंवा त्याची दया, क्षमा इत्यादि गुण मनांत आणणें हेंच त्याचें ध्यान; तर मग त्या ध्यानकाळीं त्यांच्यापुढें दुसरे संसारांतील पदार्थ येतात कीं नाहीं? जर ते येतात तर त्या सुधारकांनीं संसाराचेंच ध्यान केल्यासारखें होत नाहीं काय? व्यवहारकालीं व उपासनाकालीं संसारच जर मनांत येत आहे, तर संसारनिवृत्ति कशी होईल? संसारनिवृत्तीचा खरा उपायच होत नाहीं व 'मी' म्हणणारें ज्ञान (तेंच सर्व जगतास म्हणजे संसारास जाणणारें ज्ञान) जावत्कालपर्यंत कायम आहे, तावत्कालपर्यंत संसारनिवृत्ति होणें नाहीं म्हणजे मोक्ष नाहीं असा आमचा समज आहे.

सुधारकांच्या नेहमी ह्मणण्यांत येतें कीं, मूर्त्तिपूजेपासून अनेक तोटे आहेतः—मूर्त्तिपुजेमुळें लोक अज्ञानी होतात; देवळें बांधण्यांत विनाकारण पैसा खर्च होतो; मूर्त्तिपुजनांत वेळोवेळीं निरर्थक वेळ जातो व द्रव्य खर्चतें; व्यभिचारास उत्तेजन मिळतें; दोरे बांधून व अंगारे लावून ढोंगी लोक बायाबापड्यांस फसवितात इ० इ०. आतां या सर्व त्यांच्या म्हणण्यामध्यें विशेष अर्थ आहे असें नाहीं; परंतु 'मूर्त्तिपूजेमुळें लोक अज्ञानी होतात' या म्हणण्याचा येथें थोडासा विचार करूं, म्हणजे बाकीच्या आरोपांत तथ्यांश किती आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येणारें आहे.

जगाची उत्पत्ति केव्हां झाली, मनुष्याची स्थिति प्रथम कशी होती व मग कशी झाली, यांबद्दल खात्रीलायक लेख नाहीं; तथापि इतिहास जेथपासून उपलब्ध आहे त्याजवरून असें दिसतें कीं, हिंदुस्थान, ग्रीस, रोम, चीन, जपान, मिसरदेश इत्यादि जीं राष्ट्रें उदयास आलीं, त्या बहुतेकांत हा मूर्त्तिपुजनाचा मार्ग जारीनें चालू होता व सध्यांही आहे. मूर्त्तिपुजनानें जर कांहीं अनिष्ठ होण्यासारखें असतें तर असें कधींच घडलें नसतें. शिवाय, ज्यांनीं जन्ममरणापासून मुक्त होण्याकरितां तपाचरणांत आपलीं सगळीं आयुष्यें घालवून आम्हांसारख्या पामरांस बोधद्वारें संसारबंधनापासून मुक्त होण्याकरितां सोपा मार्ग करून ठेविला आहे, त्या व्यास, वाल्मिका-

दि महात्म्यांनीं वरील मार्गास कधीं चांगलें म्हटलें नसतें; एवढेंच न- व्हे, तर त्यांनीं त्याचा जनास उपदेशही केला नसता. रामायणांत असें लिहिलें आहे कीं, राजा रामचंद्रानें रामेश्वरक्षेत्रीं शिवलिंग स्थापन केलें; वाल्मिकानें लहुकुशांस हजार कमळें शंकरास वहाण्यास सांगितलें. तर त्या रामराजास व वाल्मिकास मूर्त्तिपुजनापासून 'अज्ञान वाढतें' हें कसें समजलें नव्हतें? असो. वरील काळापासून पुढें जों जों पहावें तों तों मूर्त्तिपुजनास सबळ आधारच दिसतात. अर्जुन शक्तीची स्तुति करीत असे; कृष्णानें रुक्मिणीला देवीच्या देवळांत नेली; द्वारकेंत गणपतीचें देऊळ व काशी येथें शिवाचें प्राचीन काळापासून महात्म्य आहें. कलियुगांत तर मूर्त्तिपूजन फारच वाढलें. कविमुकुटमणि कालिदास हा मूर्त्तिपूजक (देवीउपासक) होता म्हणून त्याच्या कवित्वशक्तीस मांद्य आलें होतें असें कोठेंही ऐकिवांत नाहीं! श्रीरामदासस्वामीच्या झोळींत आपल्या सगळ्या राज्याची वक्षीसचिठ्ठी टाकून अल्लख करण्यास तयार असा ज्या रामभक्त ( मूर्त्तिपूजक ) शिवाजीचा कडकडीत देशाभिमान. पहिले बाजीराव, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, महादजी शिंदे वगैरे शूर मंडळी; रामशास्त्री वगैरे राजकार्यधुरंधर; ज्ञानदेव, रामदास, नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे संत कवीश्वर यांनीं आपल्या अतर्क्य बुद्धीनें व कृतीनें जें या आर्यभुमीस वैभव आणिलें, ते मूर्त्तिपूजक होते म्हणून मतिमंद होते काय? मूर्त्तिपुजनापासून त्यांच्या कोणत्याही कीर्त्तिरूप व शुभकार्यास अडथळा झाला नाहीं; हें तर असो, परंतु वरील सत्पुरुप जर मूर्त्तिपूजक व धर्मनिष्ठ नसते तर त्यांच्या हातून वरील कृत्यें खरोखर झालीं नसतीं. पहा, शिवाजीला जर कथा ऐकण्याचा नाद नसता व भीष्मार्जुनांच्या पराक्रमाचें वर्णन त्याला ऐकावयास सांपडलें नसतें, तर शहाजीप्रमाणें त्याला विजापुरच्या दरबारीं शरमिंदा होऊन रहाणें भाग पडलें असतें; हें मार्मिक वाचकांस येथें निराळें सांगणें नलगे. असो. विषयविस्तारभयास्तव हें इतकेंच ठेवून आपण प्रस्तुत विषयासंबंधीं शेवटचे दोन शब्द सांगून या विषयाची रजा घेऊं. ते हेच कीं, मूर्त्तिपूजन हा ईश्वरप्राप्तीचा सरळ व सोपा

मार्गी आहे, त्याचा वास्तविक हेतु आमच्या उतावळे सुधारकाच्या ध्यानांत न येतां, ते विलक्षण आग्रहानें व मदानें हजारों धर्मपंथ उपस्थित करून आपलें अमोलिक आत्मिक नुकसान करून घेत आहेत. इतकेंच केवळ नव्हें, परंतु आमच्या महाराष्ट्रीय जमावाचे तुकडे तुकडे करून एकीचा भंग करीत आहेत; आणि त्यामुळेंच सध्यां आम्हीं सर्व प्रकारें दुःखसागरांत पतन होत आहोंत. तर आतां त्यांनीं या आमच्या म्हणण्याचा पूर्ण विचार करून आणि मूर्त्तिपूजनासंबंधी आजपर्यंत केलेल्या चुका दुरुस्त करून सद्धर्मानुयायी व्हावें व नाना पंथ व नाना मतें स्थापित केल्याचे दुराग्रह सोडून देऊन सन्मार्गानें वर्त्तन करावें; हीच आमची त्यांस हात जोडून प्रार्थना आहे.

श्रीनारायणार्पणमस्तु

# सुचना.

या मंडळीनें केलेल्या पुस्तकांसंबंधी किंमत पाठविणें अथवा पत्रव्यवहार करणें तो मुंबईंत, जी. आय. पी. रेलवे, ऑडिट ऑफिस, बोरीबंदर; अथवा मुंबईंत, दुर्गादेवीनजीक कापडगल्ली येथें 'श्रीदत्त-मंदिरां'त, रा० रा० **काशिनाथ संभाजी मूरकर** यांच्या नांवें करावा; ह्मणजे पुस्तकें त्वरित पाठविण्यांत येतील. आमचीं कोणतींही आठ पुस्तकें एकदम मागविल्यास टपालखर्च वगैरे पडणार नाहीं. तसेंच आमचीं कोणतींही बारा पुस्तकें एकदम मागविल्यास टपालखर्च न पडतां आमच्या पुस्तकांपैकीं मागविणाराच्या मर्जीस येईल तें एक पुस्तकही कमिशनदाखल देण्यांत येईल. पुस्तकें व्ह्याल्युपेयेबल बुक-पोस्टनेंही पाठविण्यांत येतील. आमच्या पुस्तकांशिवाय मुंबईंत मिळणारीं कोणतींही इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदुस्थानी व गुजराथी पुस्तकेंही पाठविलीं जातील.

मुंबई,
ता० १ फेब्रुआरी १८९० }

मूरकर मंडळी.